म. ग्रं. सं. ठाणे.
विषय [illegible]
सं. क्र. 22९

REFBK-0006767

# प्राचीन भारत


लेखक

व. द. ताम्बे
एम्. ए., बी. टी.

मा. गो. काटदरे
बी. ए. ( ऑन्. ), बी.टी.



REFBK-0006767



मङ्गल साहित्य प्रकाशन

**अभ्यासकांसाठीं इतिहासग्रंथ**
विजयादशमी, सं. २००२ : ५ ऑक्टो ४६
आवृत्ति पहिली : पृष्ठसंख्या ३३६
**प्रकाशन ३० वें : मूल्य पांच रुपये**

★

**मङ्गल साहित्य प्रकाशन**
**संचालक** : अमरेन्द्र गाडगीळ
**अनुशासक** : १ दि. वि. काळे, एम्. ए.
२ रा. त्र्यं. रानडे.

प्रकाशिका :
सौ. मङ्गला अमरेन्द्र गाडगीळ
**मङ्गल साहित्य प्रकाशनां**करतां
आनंदचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४

मुद्रक :
१ ते ३२ पृष्ठें—लक्ष्मण नारायण चापेकर
**आर्य संस्कृति मुद्रणालय**
१९८/१ उ सदाशिव, टिळक रस्ता, पुणें २.
३३ ते ३०४ पृष्ठें गंगाधर शंकर दाते
**कलागृह छापखाना,**
६६६ सदाशिव पेठ, पुणें २
बाकी पृष्ठें—
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ
**अग्रणी मुद्रणालय**
आनन्दचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४

# प्रास्ताविक निवेदन

अलिकडे बहुतेक सर्व विद्यालयांतून प्राचीन भारताचा इतिहास विशेषत: वरच्या वर्गांत शिकविला जातो. इतिहास हा विषय मनोरंजक खरा; पण तो शिकविण्यासाठीं लागणारी योग्य साधनसामुग्री नसेल तर तोच क्लिष्ट होतो. प्राचीन भारताच्या इतिहासाच्या बाबतींत आमच्या अनेक अध्यापकमित्रांची हीच तक्रार आहे. आम्हालाही नूतन मराठी विद्यालयांत विशेषत: मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांना शिकवितांना हीच अडचण येई. ती दूर करण्याचा आपणच शक्य तर प्रयत्न करावा असें आम्ही दोघांनीं ठरविलें व लगेच त्या मार्गाला लागलोंही. विषयाची मांडणी केली आणि पहिलीं दोन तीन प्रकरणें हातोहात लिहूनही काढलीं. परंतु पुढील प्रकरणें लिहितांना मात्र असंख्य अडचणी येऊं लागल्या. त्यांतील मुख्य अडचण म्हणजे साधनांचा व माहितीचा अभाव. पुण्यांतील बहुतेक सर्व ग्रंथालयें धुंडाळल्यानंतर जी माहिती हातीं लागली तिच्या आधारानें हा ग्रंथ साधारणपणें तीन वर्षांच्या कालावधींत लिहून पुरा झाला.

प्रथमत: हें पाठ्यपुस्तक करण्याचा आमचा विचार होता. परंतु गोळा केलेली माहिती भरपूर झाली आणि तींतील कमी कोणती करावी हा प्रश्न उलगडेना. शिवाय, पाठ्यपुस्तक करावयाचें म्हणजे चित्रें, आलेख, कालादर्श इ० अनेक गोष्टी त्यांत हव्या. महागाईमुळें तें शक्य नव्हतें. त्यामुळें सध्यां हा एक आधारग्रंथ म्हणून तरी तयार करावा असें आम्ही ठरविलें. आज हा ग्रंथ वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला अतिशय आनंद होतो आहे. हा आमचा पहिलाच प्रयत्न असल्यान त्यांत कांहीं न्यून असण्याचा संभव आहे. वाचकांनीं कृपया तें आमच्या निदर्शनास आणल्यास आम्ही त्यांचे ऋणी होऊं.

हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं आम्हांस अनेक मित्रांचें साहाय्य झालें आहे. त्यांच्या अमूल्य मदतीवांचून हें काम पूर्ण करणें आम्हांस शक्य नव्हतें. विषयाची चर्चा करून योग्य तें मार्गदर्शन करण्याच्या कामीं डॉ. गोपालाचारी, डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, प्रा. व. ग. राहूरकर, प्रा. अ. गं. मंगरूळकर, प्रि. रा. प. सबनीस, श्री. बाळाराव तुळपुळे इ. विद्वानांची वारंवार मदत झाली. पुस्तकें जमा करणें ही दुसरी महत्त्वाची अडचण होती. त्या कामीं नू. म. वि. चे मुख्याध्यापक प्रा. दबडघाव व प्रा. बापट यांची व ग्रंथालयांतील सर्व कार्यकर्त्यांची आम्हांस चांगली मदत झाली. परिशिष्टांतील ‘ भारतीय संस्कृतीचा अतिभारतीय विकास ’ हा भाग मुळांत प्रा. श्री. म. माटे संपादित असलेल्या ‘ हिंदुत्वकोशा ’- साठीं तयार करण्यांत आला होता. तो छापावयास मान्यता दिल्याबद्दल प्रा. माटे यांचे व तो लिहून दिल्याबद्दल प्रा. मंगरूळकर यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोंत.

हें पुस्तक योग्य प्रकारें सजविण्याच्या कामीं महाराष्ट्रांतील श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञ गु. प्रि. ना. ग. नारळकर यांनीं ज्या सूचना केल्या त्यांमुळेंच हें पुस्तक आजच्या स्वरूपांत तयार झालें.

सुमारें तीनशें पानांचें पुस्तक या महागाईच्या दिवसांत छापण्याचें धाडस केल्याबद्दल व तें अत्यंत सुबक व आकर्षक छापल्याबद्दल ‘ मङ्गल साहित्य प्रकाशन ’ संस्थेचे संचालक मा. अमरेन्द्र गाडगीळ व त्यांचे सहकारी यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

विजयादशमी
संवत्, २००२

लेखक

# प्राचीन भारत

## विभाग १ ला

### – रूपरेषा –


**प्रकरण १ लें— ऐश्वर्यसंपन्न भारत.**

( १ ) वंदे मातरम्, ( २ ) जगावर उपकार, ( ३ ) जगाला आदर्श, ( ४ ) निष्कर्ष.

**प्रकरण २ रें— भारताचा भूगोल.**

( १ ) रचना, ( २ ) लोक, ( ३ ) स्वाभाविक अनुकूलता, ( ४ ) अनुकूलतेचे प्रतिकूल परिणाम, ( ५ ) निष्कर्ष.

**प्रकरण ३ रें— प्राचीन इतिहासाचीं साधनें.**

( १ ) भारतीय साहित्य, ( २ ) अवशेष, ( ३ ) आलेख, ( ४ ) नाणीं, ( ५ ) परदेशीय साहित्य.

**प्रकरण ४ थें— भारताचे निर्माते.**

( १ ) भाग्यभू भारताचे खरे वारसदार, ( २ ) हिंदु कोण ? ( ३ ) भारताचीं विविध नांवें, ( ४ ) आर्यांचें मूळ वसतिस्थान, ( ५ ) भारतीय मानववंश.

**प्रकरण ५ वें— कालखंड का विषयखंड.**

( १ ) प्रास्ताविक, ( २ ) भिन्न लेखकांचीं भिन्न मतें, ( ३ ) विषयखंड पाडणेंच श्रेयस्कर.

**प्रकरण ६ वें— वैदिक काल** ( भाग १ )–वसाहती व राहाणी.

( १ ) प्रास्ताविक, ( २ ) वसाहतींचा विकास, ( ३ ) आर्यांची राहाणी.

**प्रकरण ७ वें— वैदिक काल** ( भाग २ )–सामाजिक व राजकीय स्थिति.

( १ ) वर्णव्यवस्था, ( २ ) आश्रमव्यवस्था, (३) राजकीय स्थिति, ( ४ ) राजकीय व सामाजिक गुन्हे.

प्रकरण ८ वें — **वैदिक काल** (भाग ३)—धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिति.
( १ ) देवता, ( २ ) यज्ञयाग, ( ३ ) तत्त्वज्ञान, ( ४ ) उद्योगधंदे, ( ५ ) वाङ्मय, कला व शास्त्रें.

प्रकरण ९ वें— **आर्ष काल** ( भाग १ ) – रामायणकालीन स्थिति.
( १ ) रामायणाचा काल, कर्ते, रचना, कथानक व महत्त्व, ( २ ) रामायणकालीन सामाजिक स्थिति, ( ३ ) रामायणकालीन राजकीय स्थिति.

प्रकरण १० वें— **आर्ष काल** ( भाग २ ) – महाभारतकालीन स्थिति.
( १ ) महाभारताचा काल, कर्ते, रचना, कथानक व महत्त्व, ( २ ) महाभारतकालीन सामाजिक स्थिति, ( ३ ) महाभारतकालीन राजकीय स्थिति.

प्रकरण ११ वें— **बौद्ध काल**.
( १ ) आर्ष कालअखेर आर्यांची सामाजिक स्थिति, ( २ ) जैन धर्म, ( ३ ) बौद्ध धर्म, ( ४ ) बौद्ध धर्माच्या प्रसाराचीं कारणें.

प्रकरण १२ वें— **बौद्धकालीन परिस्थिति.**
( १ ) सामाजिक स्थिति, ( २ ) राजकीय स्थिति, ( ३ ) आर्थिक स्थिति, ( ४ ) सांस्कृतिक स्थिति, ( ५ ) बौद्ध धर्माचा ऱ्हास.

—:०:—

# विभाग २ रा

## – रूपरेषा –

प्रकरण १ लें— **संधिप्रकाश.**
( १ ) मगधाचा पूर्वेतिहास, ( २ ) राजघराणीं व त्यांचे काल, ( ३ ) शिशुनाग घराणें, ( ४ ) नंद घराणें.

प्रकरण २ रें— **अलेक्झांडरचें अश्रुविमोचन !**

( १ ) पाश्चिमात्यांची यशस्वी मावार, ( २ ) अलेक्झांडर-पूर्ववृत्त, ( ३ ) स्वारीचीं कारणें, ( ४ ) राजा पोरस, ( ५ ) स्वारीची माहिती व परिणाम.

प्रकरण ३ रें— **भारताचा शुभचंद्र.**

( १ ) चंद्रगुप्ताचें क्षात्रकुलीनत्व, ( २ ) असंतोषाचा जनक चाणक्य, ( ३ ) असंतोषाचा भडका, ( ४ ) राज्य-विस्तार, ( ५ ) मेग्यॅस्थेनिसच्या दृष्टींतून भारत, ( ६ ) आदर्श राज्यव्यवस्था.

प्रकरण ४ थें— **राजभिक्षु अशोक.**

( १ ) राजकीय परिस्थिति, ( २ ) बालपण व राज्यप्राप्ति, ( ३ ) राज्याभिषेक, ( ४ ) साम्राज्यविस्तार, ( ५ ) परिवर्तन, ( ६ ) बौद्धधर्मप्रचार, ( ७ ) लोकोपयोगी कृत्यें, ( ८ ) राज्यव्यवस्था, ( ९ ) योग्यता, ( १० ) मौर्य कालाचें समालोचन.

प्रकरण ५ वें— **अराजक.**

( १ ) मौर्य साम्राज्याचा अस्त, ( २ ) शुङ्ग घराणें, ( ३ ) कण्व घराणें, ( ४ ) समालोचन.

प्रकरण ६ वें— **यवनांचें भारतीभवन.**

( १ ) ग्रीक लोकांच्या स्वाऱ्या, ( २ ) शकांच्या स्वाऱ्या, ( ३ ) कुशानांच्या स्वाऱ्या, ( ४ ) पार्थियनांच्या स्वाऱ्या.

प्रकरण ७ वें— **आंध्रांचा उत्तरदिग्विजय.**

( १ ) आंध्रांचें पूर्ववृत्त, ( २ ) आंध्रांचें पहिलें साम्राज्य, ( ३ ) आंध्रांचें दुसरें साम्राज्य, ( ४ ) आंध्रांचें कार्य.

प्रकरण ८ वें— **भारतीय सुवर्णकिरणें.**

( १ ) गुप्तसाम्राज्यस्थापना, ( २ ) अखंड विजयी समुद्रगुप्त, ( ३ ) समुद्रगुप्ताची कामगिरी, ( ४ ) समुद्रगुप्ताची योग्यता.

प्रकरण ९ वें— **भारताचें सुवर्णयुग.**

( १ ) वैभवशाली विक्रम, ( २ ) ठळक विशेष—सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक, ( ३ ) फा- हेनचें वर्णन.

प्रकरण १० वें— **साम्राज्याचा अस्त.**

( १ ) शेवटचे गुप्त राजे, ( २ ) हूण लोक, ( ३ ) साम्राज्य मोडलें.

प्रकरण ११ वें— **भारतीय गौरवाचा शेवटचा किरण.**

( १ ) सम्राट् हर्षवर्धन, ( २ ) राज्यश्रीचा ओघ, ( ३ ) दिग्विजय, ( ४ ) बौद्धधर्मस्वीकार, ( ५ ) दातृत्व, ( ६ ) विद्येची प्रगति, ( ७ ) राज्यव्यवस्था, ( ८ ) ह्युएन्त्संगचें वर्णन.

प्रकरण १२ वें— **विंध्यांद्रीच्या उत्तरेस.**

( १ ) रजपुतांचा उदय, ( २ ) रजपुत घराणीं ( मोठीं ), ( ३ ) रजपुत घराणीं ( लहान ), (४) रजपुतांचे स्वभाव-विशेष, ( ५ ) राजपुत-काळांतील परिस्थिति.

प्रकरण १३ वें— **विंध्याद्रीच्या दक्षिणेस.**

( १ ) चालुक्य, ( २ ) राष्ट्रकूट, ( ३ ) यादव, ( ४ ) होयसळ, ( ५ ) दुसरे चालुक्य, ( ६ ) चोल, ( ७ ) चेर, ( ८ ) पांड्य, ( ९ ) पल्लव, ( १० ) दक्षिणेंतील धार्मिक स्थिति. ( ११ ) द. तील सामाजिक स्थिति.

परिशिष्ट—

( अ ) अखंड भारतच कां ? ( आ ) आधुनिक ऋषिवर्य, ( इ ) संस्था, ( ई ) भार. संस्कृतीचा अतिभारतीय विकास.

# प्राचीन भारत

## विभाग पहिला

### प्रकरण १ लें

## ऐश्वर्यसंपन्न भारत

(१) वन्दे मातरम्;
(२) जगावर उपकार;
(३) जगाला आदर्श;
(४) निष्कर्ष.

**(१) वन्दे मातरम्:—** आईची थोरवी कोणाला कळत नाहीं? आपण आपल्या जन्मदात्रीला मातृदेवता म्हणतों. देवतेप्रमाणें तिला सदैव वन्दन करतों. तिचा शुभाशीर्वाद आपल्या सत्कृत्याचा पाठीराखा असतो. प्रभु रामचंद्रानें आपल्या आईच्या आशीर्वादानें दण्डकारण्यांतील वनवास विजयी केला तर छत्रपति शिवाजीमहाराजांनीं आईच्याच आशीर्वादानें शून्यांतून ब्रह्मांड निर्माण करावें त्याप्रमाणें आपल्या 'ढेकुळभर' छोट्या जहागिरींतून सर्व तऱ्हेच्या प्रतिकूलतेंतही हिंदूंचें 'नवेंच' स्वराज्य निर्माण केलें. मनुष्य लहान असो वा मोठा असो, गरीब असो वा श्रीमंत असो, श्रमजीवी असो वा बुद्धिजीवी असो, तो आपल्या आईची कूस पूज्यच मानतो. जगांत इतरत्र तो कसाही वागला तरी तिच्याशीं प्रतारणा तो कधींही करणार नाहीं. आपल्या मातेचें ऋण — मातृऋण— शिरावर घेण्यांत माणसानें आजपर्यंत आनंदच मानला व जगाच्या अंतापर्यंतही तो आनंद मानील. उलट, 'आईविना मनुष्य स्वतःस भिकारी'च समजतो.

पण या आईपेक्षांही एक मोठी आई प्रत्येकाला आहे. आपण तिला 'थोरली आई' म्हणूं. आपली आई आपल्याला फक्त जन्म देते. आपली थोरली आई आपल्याला जगविते. असंख्य लेंकरें या थोरल्या आईच्या अंकावर स्वच्छंदपणें खेळतात आणि तिनें दिलेल्या अन्नावर वाढतात. आपल्या जीवनाची सफलता आपण या आपल्या आईविषयींचें कर्तव्य कसें पार पाडलें यावर अवलंबून असते. तिच्याविषयींचें आपलें कर्तव्य पार पाडण्यांत जे चुकारपणा करतात ते मातृद्रोही ठरतात. या मातृद्रोह्यांच्या दैवीं सदैव पारतंत्र्य– दुसऱ्याचे गुलाम होऊन राहणेंच– असतें. स्वाभिमानी मातृभक्ताला असलें पारतंत्र्यांतील जिणें कधींच आवडणार नाहीं. आपली थोरली आई म्हणजे राष्ट्रमाता भारतभूमि. या भूमीवर ही आपली याच भावनेनें वास करणारे आपण सर्वजण भारतीय आहोंत. ही भारतभूमि आपल्या कुपुत्रांच्या कर्तव्यच्युतीमुळें आज कित्येक वर्षें पारतंत्र्यशृंखलांनीं बद्ध झाली आहे. तरी पण वीरप्रसू म्हणूनच जगभर तिची आजही ख्याति आहे. कांहीं भ्याड मातृद्रोह्यांनीं तिला या दुरवस्थेंत लोटलें असलें तरी तिचे आजचे व उद्यांचे सुपुत्र तिचे पांग फेडल्याशिवाय कसे राहतील ?

राष्ट्रमातेचा प्रत्येक सुपुत्र तिच्या वैभवाप्रीत्यर्थ पडतील ते कष्ट करण्यास, प्रसंगीं स्वतःच्या प्राणांचें मोल देण्यासही, मागेंपुढें पाहात नाहीं हें ऐतिहासिक सत्य आहे. आपल्या राष्ट्राचें स्थान जगांतील श्रेष्ठतम राष्ट्रांच्या श्रेणींत अग्रस्थानीं असावें असें प्रत्येकाला वाटतें. याला कोणीही अपवाद नाहीं—मग तो इंग्रज असो, फ्रेंच असो, जर्मन असो, जपानी असो, रशियन असो वा चिनी असो. आपलें राष्ट्र वैभवाच्या अत्युच्च शिखरावर विराजमान झालेलें असावें, आपली संस्कृति विश्वविजयी व्हावी अशीच प्रत्येकाची भावना असते. आपल्या पूर्वजांनीं सुद्धां 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' हेंच नव्हतें का ध्येय ठेविलें ? आजही भारतीयांच्या मनांत हीच भावना वास करीत असल्यास नवल तें काय ?

आपल्या कर्तृत्वानें आपण आपल्या राष्ट्रमातेला उत्कर्ष प्राप्त करून द्यावा असें वाटण्याचें कारण एकच कीं, तिचें मोठेपण हें स्वर्गाहूनही

अधिक श्रेष्ठ आहे अशी आपली भावना असते. 'जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी' या सुभाषितांत हीच भावना आपल्या पूर्वजांनीं व्यक्त केली आहे. हीच भावना निरनिराळ्या कविश्रेष्ठांनीं निरनिराळ्या शब्दांत व्यक्तविली आहे. वंगपुत्र बंकीमचंद्र यांना ही 'सुजला, सुफला, मलजयशीतला' व 'सस्यश्यामला' अशी भरतभूमि सर्व तऱ्हेच्या ऐश्वर्यानें नटलेली देवताच वाटते; तर जगन्मान्य कविश्रेष्ठ गुरुदेव रवीन्द्रनाथांना 'भुवनमनमोहिनी, निर्मल सूर्य करोज्ज्वल धरिणी' अशी ही तेजस्वी भूमि जगज्जननीच वाटते. आणि खरोखरच आपल्या निसर्गदत्त वैशिष्ट्यांमुळें व सुपुत्रांच्या थोर कृतीमुळें आपला हा भारत अखिल जगाला ललामभूत झालेला नाहीं का ? म्हणूनच आपण आपल्या या श्रेष्ठ भारतमातेला वन्दन करतांना म्हणतों— वन्दे मातरम् !

(२) **जगावर उपकार:**—(अ) भारताचा इतिहास कितीतरी जुना आहे. जगाच्या पाठीवर ईजिप्शियन, असीरियन, ग्रीक इत्यादि ज्या प्राचीन संस्कृति होऊन गेल्या असें मानतात त्यांत भारतीय आर्य-संस्कृतीला पहिलें स्थान आहे. मॅक्स मुलर, लुडविग्, हिलेब्राट, वेबर इत्यादि पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांनींहि आर्यसंस्कृतीचें प्राचीनतमत्व व श्रेष्ठत्व मुक्तकंठानें प्रशंसिलें आहे. इतकेंच नव्हे, तर आर्यसंस्कृति ही इतर संस्कृतींचें उगमस्थान होय, असाच निष्कर्ष सर्वांना काढावा लागतो. या संस्कृतीची कालमर्यादा ठरविणें आतापर्यंत कोणालाही शक्य झालें नाहीं. त्याचबरोबर हेंही ध्यानांत ठेवावें कीं जुनाटपणामुळें या सनातन संस्कृतीचें मूळचें तेज लोपून ती निःसत्त्व झाली असेंही घडलेलें नाहीं. या संस्कृतीला नामशेष करण्याचे प्रयत्न आजपर्यंत अनेक आक्रमकांनीं केले; परंतु त्या सर्व आक्रमणांच्या तडाख्यांतूनही ही चिवट संस्कृति सूर्याप्रमाणें आपल्या प्रखर तेजानें आजही विलसत आहे. कारण ही संस्कृति विश्वकल्याणाच्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानावर उभारलेली आहे. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु' हें विशाल मानवधर्माचें सार आपल्या आर्य पूर्वजांनीं हजारों वर्षांपूर्वी प्रत्यक्ष आचरणांत आणिलें होतें. आर्यांनीं जगाला दिलेला मानवधर्माच्या तत्त्वज्ञानाचा अमोलिक ठेवाच जगाच्या सुव्यवस्थित घडणीला कारणीभूत झाला आहे. ऋग्वेद हा आर्य तत्त्वज्ञानाचा आदिग्रंथ इंग्लंड जर्मनीसारख्या

आजच्या सुधारलेल्या राष्ट्रांतील अनेक विद्वानांनीं अभ्यासिला असून त्या ग्रंथाच्या अतुल गुणश्रेष्ठत्वाबद्दल प्रांजलपणें निर्वाळा दिलेला आहे. मात्र त्याचबरोबर एक दुर्दैवी घटनाही ध्यानांत घेण्यासारखी आहे कीं, आज भारतीयांना वेदांचा अभ्यास करावयाचा असेल तर तो पाश्चात्य पंडितांनीं वेदांवर लिहिलेल्या ग्रंथांच्या आधारानेंच करावा लागतो !

अशा तऱ्हेनें अखिल जगताचें कल्याण साधणारें तत्त्वज्ञान जगाला शिकवून आपल्या आर्य पूर्वजांनीं जगावर मोठे उपकार केले आहेत. या आर्य संस्कृतीच्या किंवा मानवधर्माच्या शिकवणीची कल्पना या प्रकरणाच्या शेवटीं दिलेल्या उताऱ्यांवरून व परिशिष्ट (ब) व (क) यावरून येऊ शकेल.

(आ) भारतीय तत्त्वज्ञानानें जगाला ज्ञान दिलें तद्वतच भरतभूमीनें जगातील कित्येक महान् राष्ट्रांना जीवन दिलें आहे. इंग्लंड, फ्रान्स, बेल्जम, यांसारख्या मोठमोठ्या देशांना भारतांत निर्माण होणाऱ्या पदार्थांवर अवलंबून राहावें लागतें. आपला हा देश म्हणजे कच्च्या मालाचें प्रचंड पुरवठाकेन्द्र. येथून लागेल तेवढा कच्चा माल परदेशांत जातो आणि तेथें त्याचा पक्का माल बनून जगांतील व्यापारी पेठांत तो येतो. आणि या मालाच्या विक्रींतील नफ्यावर ते देश गबर होतात. असा हा व्यवहार आज कित्येक वर्षें चालू आहे. हा कच्चा माल बाहेर जावयाचा थांबला किंवा बाहेरून येणाऱ्या पक्क्या मालावर जर बहिष्कार घातला गेला तर जगाच्या बाजारपेठेला धक्का बसलाच म्हणून समजा. नुसत्या परदेशी कापडावर बहिष्कार घालण्याच्या सन १९०८ च्या आंदोलनामुळें मँचेस्टरच्या गिरण्या ओस पडल्या, या एकाच उदाहरणावरून भारतीय व्यापारावर मोठमोठ्या देशाचें जीवन कसें अवलंबून आहे हें ध्यानांत येईल. इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज इत्यादि युरोपियनांनीं या देशाचा व्यापार हस्तगत करण्यासाठीं सतराव्या शतकांत आपसांत घोर संग्राम केले आणि आज अमेरिकेसारखें सधन राष्ट्रही या देशांतील कारखाने, उद्योगधंदे आपल्या मालकीचे करूं पाहात आहे, यावरून या देशाचें व्यापारी नि आर्थिक महत्त्व ध्यानांत येईल.

(२) जगाला आदर्शः—आपल्या देशाचे असे कित्येक विशेष सांगतां येतात कीं ज्यांमुळें या देशाला आशिया खंडांतच काय पण सबंध जगांतही अद्वितीय स्थान प्राप्त झालें आहे. जगांतील कोणत्याही एका देशाला भारतासारखी स्वाभाविक अनुकूलता लाभलेली नाहीं. या स्वाभाविक अनुकूलतेविषयीं पुढील प्रकरणांत आपण स्वतंत्रपणें विवेचन करणार आहोंत. या ठिकाणीं आपणांस एवढेंच ध्यानांत ठेवावयाचें आहे कीं या स्वाभाविक अनुकूलतेमुळेंच सर्व जगाचे डोळे आपल्या देशाकडे लागून राहिलेले असतात. पण कशासाठीं? येथील लोकांपासून कांहीं शिकावें म्हणून? येथील लोकांशीं स्नेह करावा म्हणून? केवळ व्यापार वाढवावा म्हणून? या सर्व प्रश्नांचें उत्तर 'नाहीं' हेंच येतें. मग कशासाठीं तर? या प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें आहे. ग्रीक सम्राट् शिकंदर भारतावर कां चालून आला? शक, कुशान, हूण इत्यादि यवन हिंदुस्थानावर स्वारी करून कां आले? अफगाण कोणत्या हेतूनें इकडे आले? बाबर कां आला? शेवटीं इंग्रज पांच हजार मैलांवरून इकडे आले ते कशासाठीं? या सर्व प्रश्नांचें उत्तरही एकच, आणि तें आपण सर्वजण ओळखतों. तें उत्तर असें कीं, भारतासारखा सधन व समृद्ध असा हा विस्तीर्ण देश आपल्या अधिराज्याखालीं असावा अशीच प्रत्येक आक्रमकाची आकांक्षा होती आणि आहे. ही आकांक्षा सफल करण्यासाठीं कुणी धर्मप्रसाराच्या बुरख्याखालीं, तर कुणी व्यापाराच्या मिषानें; कुणी आर्यधर्माच्या 'संरक्षणा'च्या उच्च भावनेनें तर कुणी भारतीयांची 'सुधारणा' करण्याच्या उदात्त हेतूनें, या देशांत प्रवेश केला! सर्वांनाच आपला अंतस्थ हेतु सफल करतां आला नाहीं. ज्यांना तें जमलें ते आज भाग्यवान् ठरले आहेत आणि ज्यांना तें जमलें नाहीं तेही कांहीं रिक्त हस्तानें परत गेले नाहींत. तर जातांना येथील निरपराधी लोकांच्या क्रूर कत्तली करून व अगणित संपत्ति लुबाडून ते गेले. या देशाविषयीं एवढें आकर्षण परकीयांना कां वाटावें? याचीं कारणें अनेक आहेत. पुढील प्रकरणीं आपण त्यांचा विचार करूं. या ठिकाणीं फक्त एकाच सामान्य कारणाचा उल्लेख आपणांस करावयाचा आहे. तें कारण असें कीं, हा देश सर्व दृष्टींनीं समृद्ध नि परिपूर्ण आहे.

कोणी अशी शंका घेईल कीं, जगाला आदर्श असलेल्या या देशाचें अनुकरण करावयाचें सोडून हा देश जिंकण्याची इच्छा कां व्हावी ? या शंकेचें उत्तर असें कीं, जें जें उत्कृष्ट व परिपूर्ण असेल तें तें आपल्या मालकीचें असावें असें वाटणें हा मनुष्यस्वभावच आहे. शेजारच्या बागेंतील पिवळे जर्द हापूस आंबे पाहून सर्वसामान्य मनुष्य चलितचित्त झाल्याशिवाय राहील का ? कायद्याचा बडगा पाठीवर नसता तर त्यानें त्यांवर आपली मालकीच प्रस्थापित केली असती. पण देशाच्या रक्षणाला ऐनवेळीं कोठला कायदा येणार ? आंतरराष्ट्रीय कायदे असले तरी ते राहतात पुस्तकांत ! त्यामुळें एखाद्या देशावर आपली मालकी असावी असें दुसऱ्या एखाद्या बलवान् देशाला वाटलें कीं संपलें त्या देशाचें स्वतंत्र अस्तित्व. सांगावयाचें इतकेंच कीं, भारतावर मालकी असावी असें परकीयांना वाटतें याचें मुख्य कारण भारताची परिपूर्णता.

ही परिपूर्णता कळसास पोहोंचविण्याचें श्रेय प्राचीन भारतीय महर्षींना आहे. स्वाभाविक अनुकूलतेबरोबर आपल्या अलौकिक गुणांच्या प्रभावानें त्यांनीं भारताला अमरपद प्राप्त करून दिलें आहे. आपण भारतीय लोक त्यांचें गुणगान करूं यांत नवल नाहीं. परंतु पाश्चात्य पंडितांनींहि निःसंकोचपणें व मनापासून त्यांचा गौरव केला आहे, हें पाहिलें म्हणजे अभिमानानें मन बहरून आल्याशिवाय राहात नाहीं. आणि त्या थोर लोकांच्या थोर कला, संस्कृति व थोर कृति यांचें अनुकरण करावयास हवें असा आपल्याच मनाचा आग्रह सुरू होतो. सर्व सद्गुणांच्या मूर्ति राम व कृष्ण, ज्यांच्या पराक्रमाचीं वर्णनें ऐकून जग जिंकण्यास निघालेल्या शिकंदराचें सैन्यसुद्धां चळचळां कांपावयास लागलें तो चंद्रगुप्त मौर्य, अतुलनीय पराक्रमामुळें व दुर्दमनीय महत्त्वाकांक्षेमुळें पाश्चात्यांनीं गौरविलेला समुद्रगुप्त, ज्यानें आपल्या अलौकिक दातृत्वानें जगाला चकित करून सोडिलें तो हर्ष, या सर्व व्यक्ति आपणांस श्रेष्ठतमच वाटतील. परंतु रामायण-महाभारतासारखे अद्वितीय ग्रंथ लिहिणारे वाल्मीकि व व्यास, किंवा त्यांच्याहि पूर्वी ऋग्वेदासारख्या प्रचंड व अमर ग्रंथांचे रचयिते आर्य महर्षि, राज्यशास्त्रावर अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिणारा आर्य चाणक्य, व्याकरणासारख्या अवघड विषयाचीहि सूत्ररूपांत मांडणी करणारा पाणिनी, नाट्यशास्त्राचा

जनक भरतमुनि, लहान वयांत आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेनें जगाला थक करून भारतांत पसरलेल्या बौद्ध धर्माचें खंडन करणारे श्रीमत् आद्य शंकराचार्य, महाकवि कालिदास, कादम्बरीकर्ता बाणभट्ट, नीति व वैराग्य-शतकांचा कर्ता भर्तृहरि व यांशिवाय गणिती भास्कराचार्य, ज्योतिषी आर्यभट्ट, वैद्यकाचा प्रणेता धन्वंतरी इत्यादि विज्ञानाच्या सर्व शाखांचे अधिकारी सर्व जगाला वंदनीय ठरले आहेत. या सर्व थोर लोकांच्या कृति आजही आपणांसमोर आहेत. हा केवढा आदर्श आपणांपुढें व जगापुढें आहे ?

(४) **निष्कर्ष:—** जगाच्या उपलब्ध इतिहासांत जीं प्राचीन राष्ट्रें केवळ नाममात्रेंकरून आज जिवंत आहेत त्यांच्यामध्यें संस्कृतीचा अरुणोदय होण्यापूर्वींच आपल्या प्राचीन भारताचा संस्कृतिसूर्य मध्यबिंदूवर आलेला होता. भारतीय मनाची व बुद्धीची भरारी जितकी उंच व दूर पोहोंचली होती तितकी पृथ्वीच्या पाठीवरील तत्कालीन कोणत्याही राष्ट्राची पोहोंचलेली नव्हती.

भारताचा प्राचीन इतिहास म्हणजे रत्नांची खाण ! थोडें उकरलें कीं एकापेक्षां एक पाणीदार व तेजस्वी रत्नें या खाणींत सांपडतील. अशा या सुवर्णरत्नभूमींत आपला जन्म झाला हें आपलें केवढें भाग्य ! 'दुर्लभं भारते जन्म । मानुषं तत्र दुर्लभम् ।' असें एकानें म्हटलेलें आहे.

(अ) **उतारे :—** १ डब्ल्यू. डी. ब्राऊन– "निःपक्षपाती निरीक्षकाला हिंदु वाङ्मय आणि तत्त्वज्ञान जगांतील सर्व वाङ्मयांचें व ज्ञानाचें उगमस्थान आहे हें मान्य करावेंच लागेल. हिंदु लोक असंस्कृत, अविद्य किंवा मागासलेले नाहींत. उलट त्यांच्यापासून स्फूर्ति घ्यावी, अनेक गोष्टी शिकाव्या व अनुसराव्या इतकें त्यांचें ज्ञानभांडार विशाल आहे."

**मनु :—** २ "अस्मद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्व मानवाः ॥"

(आ) **थोडक्यांत :—**

१ "जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ।"

२ भारतानें जगाला मानवधर्म शिकविला आहे. भारतीय संस्कृति अमर असून तिचें तत्त्वज्ञान जगाला उपकारक ठरलें आहे. भारत हें कच्च्या मालाचें मोठें कोठार असून जगांतील मोठे मोठे देश त्या मालावर गब्बर झाले आहेत.

३ भारतीयांच्या थोर कला, संस्कृति व कृति जगाला आदर्श आहेत. पराक्रम, दातृत्व, विद्वत्ता, विज्ञान वगैरे बाबतींत जगानें या देशापासून धडे शिकावेत असा याचा पूर्वकालीन महिमा आहे.

(इ) प्रश्न :—१ भारताचें मोठेपण कशामध्यें आहे ?
२ 'मातृभूमीचीं थोरवी' थोडक्यांत सांगा.

(ई) स्वाध्याय :—खालील पुस्तकें वाचा—

१ भारतीय श्रेष्ठत्व— ले. कै. द. गो. लिमये व बेडेकर. २ भारतवर्षाचा इतिहास–ले. कै. डॉ. बाळकृष्ण. ३ भारतीय संस्कृति–ले. साने गुरुजी. ४ राष्ट्रमीमांसा–ले. 'दुर्गातनय.'

——

प्रकरण २ रें

# भारताचा भूगोल

(१) रचना; (३) स्वाभाविक अनुकूलता;

(२) लोक; (४) अनुकूलतेचे प्रतिकूल परिणाम;

(५) निष्कर्ष.

(१) रचनाः—(नकाशा क्रमांक १ पाहा.) भरतखण्ड हें एक प्रचंड द्वीपकल्प आहे. याच्या तीन बाजू सागरांच्या मोठमोठ्या खंदकांनीं वेष्टिलेल्या असून एक बाजू अभेद्य व दुर्गम अशा पर्वततटांनीं रक्षिलेली आहे. पूर्वेस गंगासागर (बंगालचा उपसागर), पश्चिमेस सिंधुसागर (पश्चिम किंवा अरबी समुद्र), दक्षिणेस हिंदी महासागर व उत्तरेस हिंदुकुश, काराकोरम व हिमालय पर्वत, अशा या देशाच्या चतुःसीमा आहेत. या देशाचा विस्तार तरी केवढा अवाढव्य ! दक्षिणोत्तर लांबी १९०० मैल आणि पूर्व-पश्चिम रुंदी १८०० मैल; एकूण क्षेत्रफळ सुमारें अठरा लक्ष चौरस मैल आहे. रशिया वगळून राहिलेला सबंध युरोप भारताच्या या अफाट क्षेत्रांत बसवितां येतो. एकटा पंजाब ग्रेट ब्रिटनला किंवा बंगाल जर्मनीला आपल्या पोटांत घालूं शकेल !

भारतवर्षाचे स्वाभाविकपणेंच दोन भाग पडतात. विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील भागाला 'उत्तर हिंदुस्थान' आणि दक्षिणेकडील प्रदेशाला 'दख्खन' किंवा 'दक्षिण हिंदुस्थान' म्हणतात. यांपैकीं पहिला अधिक सुपीक व समृद्ध, दाट वस्तीचा व इतिहासप्रसिद्ध आहे. पर्वतराज हिमालयाचीं उत्तुंग शिखरें; हिंदुकूश, काराकोरम, हाला, सुलेमान, पत्कोई, नाग, लुशाई, चीन इत्यादि पर्वताचे प्रचंड पहाड, गंगा, सिंधु, ब्रह्मपुत्रा इत्यादि बाराही महिने दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या, गंगा ते सिंधु यांच्या

दरम्यान १३०० मैल लांबच लांब पसरलेलें विस्तीर्ण पठार, असा हा उत्तर हिंदुस्थानाचा भूगोल आहे. परंतु ह्या भूगोलाला इतिहासानें केवढें मोठें स्थान प्राप्त करून दिलें आहे! पृथ्वीतलावरील नंदनवन म्हणून ओळखिला जाणारा भारताचा मुकुटमणि काश्मीर, सर्व जगताला आपल्या दिव्य ज्ञानामृताच्या प्राशनानें पुनीत करणाऱ्या तेजस्वी ऋषि-मुनींचीं वसतिस्थानें, आर्यसंस्कृतीचें व विद्येचें पवित्र मंदिर असलेली वाराणशी, तक्षशिला, नालंदा, प्रयाग आणि इतर अनेक दृष्टींनीं महत्त्व पावलेलीं पाटलिपुत्र (पाटणा), इंद्रप्रस्थ (दिल्ली), पुरुषपूर (पेशावर), उज्जयिनी, अयोध्या इत्यादि शहरें व व्यापारी पेठा अशा सर्व विशेषांमुळें हा भूप्रदेश वैभवानें नटलेला आहे. परकीयांचें लक्ष प्रथम याच भागाकडे वेधलें आणि त्यामुळें त्या सर्वांच्या स्वाऱ्यांचा लोंढा प्रथम उत्तरेंत आणि तेथून पुढें दक्षिणेकडे असाच चालत आला आहे.

'दख्खन'चा प्रदेश बहुंशीं डोंगराळ आहे. मात्र या भागांतील पर्वतांची उंची उत्तरेकडील पर्वतांच्या उंचीपेक्षां पुष्कळच कमी आहे. नर्मदा, तापी, कृष्णा, गोदावरी इत्यादि नद्या या भागांतून वाहतात. कृष्णा व गोदावरी या नद्यांकाठचा प्रदेश विशेष सुपीक आहे. या भागाचें वैशिष्ट्य म्हणजे येथील खनिज संपत्ति. सर्व तऱ्हेची खनिज संपत्ति व उपयुक्त धातु प्रामुख्यानें याच भागांत सांपडतात.

(२) **लोकविषयक माहिती**:—स. १९४१ च्या खानेसुमारीप्रमाणें या देशाची लोकसंख्या ४२ कोटि ५० लक्ष आहे. या एवढ्या अफाट लोकसंख्येमध्यें विविधता असणें अगदीं साहजिक आहे. धार्मिक, भाषाविषयक, प्रांतविषयक, जातिविषयक असे अनेक भेद आज येथें दृष्टीस पडतात. हिंदु, मुसलमान ख्रिश्चन, झोरास्ट्रियन् हे प्रमुख धर्म आज या देशांत आहेत. राष्ट्रीय हिंदुधर्मीयांची संख्या स्वाभाविकपणेंच सर्वांत अधिक आहे. हिंदुधर्मीयांमध्येंही बौद्ध, जैन, शीख, प्रार्थनासमाजी, ब्राह्मो-समाजी, महानुभाव वगैरे निरनिराळे संप्रदाय किंवा पंथ असून जातींची व पोटजातींची संख्याही फार मोठी आहे. आजमितीस येथें सुमार ४३ प्रमुख जाति आणि २३७८ पोटजाति आहेत. पारतंत्र्यामुळें आज जरी

पंथभेदाचें किंवा जातीभेदाचें स्वरूप तीव्र वाटत असलें तरी भारताच्या एकराष्ट्रीयत्वाला त्यामुळें बाध येऊं शकत नाहीं.

देशाच्या अवाढव्य विस्तारामुळें आणि प्रदेश अरण्यमय व डोंगराळ असल्यामुळें निसर्गतःच या भूप्रदेशाचे वेगवेगळे तुकडे पडले आहेत. त्यामुळें येथील लोकांचे परस्परांशीं संबंध कमी येतात. त्यामुळें भाषा व प्रांतभेद निर्माण झाल्यासारखे वाटतात. आज येथें सुमारें १५० भाषा बोलल्या जातात. तसेंच महाराष्ट्रीय, कानडी, बंगाली, पंजाबी अशीं प्रांतनिदर्शक नावेंही त्या त्या प्रांतांतील लोक थोड्या फार अभिमानानें धारण करितांना दिसतात. परंतु या सर्व विविधतेच्या बुडाशीं सांस्कृतिक एकत्व निश्चित आहे. उदाहरणार्थ, एकूण भाषा १५० असल्या तरी त्यांतील मुख्य भाषा सहाच आहेत, आणि या सर्व भाषा संस्कृतोद्भव आहेत. हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, तामीळ आणि कानडी या मुख्य भाषा. यांपैकीं पहिल्या चार तर संस्कृत भाषेच्याच कन्यका; तामीळ व कानडी या भाषा सर्वस्वीं संस्कृतापासून झालेल्या नसल्या तरी त्या भाषांतील बहुसंख्य शब्द संस्कृतामधूनच घेतले आहेत. प्रसिद्ध तत्त्ववेत्ता मॅक्स मुलर यानें म्हटल्याप्रमाणें 'संस्कृत ही जगांतील सर्व भाषांची जननी आहे!' तसेंच संस्कृतीच्या एकत्वामुळेंच प्रांतभेद विसरून लोक स्वातंत्र्यप्राप्तीकरतां एकत्र आल्याचीं उदाहरणें अनेक आहेत. मात्र त्याबरोबरच हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, ही एकराष्ट्रीयत्वाची भावना येथील लोकांच्या अंतःकरणांत सतत प्रज्वलित राहिली नाहीं व त्यामुळें परचक्राचें निवारण येथील लोक सतत करूं शकले नाहींत, ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे!

**(३) भारताची स्वाभाविक अनुकूलताः—** निसर्गदेवतेनें भारतावर वरदहस्त ठेविला आहे हें खालील गोष्टींवरून ध्यानांत येईल. जगाच्या पाठीवर कोणत्याहि एका देशाला एवढें भाग्य लाभलेलें नाहीं. संपन्नतेचे किंवा वैभवाचे सर्व मणि एकत्र गुंफून तयार केलेला हा हार भारतमातेच्या गळ्यांत एका काळीं तेजानें चमकत होता. त्या वेळीं 'सुवर्णभूमि' म्हणून भारताच्या नांवाचा जगभर डंका गाजत होता. अशा या सुवर्णभूमीला निसर्गदेवतेनें काय काय दिलें आहे तें पाहूं.

(क) **संरक्षणः**—जर्मनीला सिग्फ्रिड, फ्रान्सला मॅजिना, चीनला चायना वॉल अशी तटबंदी बांधून काढावी लागली. या सर्व भिंती अभेद्य म्हणून मानल्या जात. परंतु चालू युद्धांत त्यांचा भेद होऊन त्या कोसळल्या, निरुपयोगी ठरल्या. कारण त्या मनुष्यनिर्मित होत्या. परंतु भारताच्या उत्तरेकडील प्रचंड भिंत हिमालयाच्या व इतर प्रचंड पर्वतांच्या रूपानें उभी असून तिचा भेद करणें मानवी शक्तीच्या बाहेर आहे. वायव्येकडील खैबर व बोलन यांसारखीं असलेलीं दारें बंद केलीं कीं शत्रूला प्रवेश बंद! तसेंच भारताच्या तिन्ही बाजूंना सागरांनीं सांखळी केलेली असल्यामुळें बलाढ्य भारताचें सर्व बाजूंनीं संरक्षण होऊं शकतें. नाविक सामर्थ्याशिवाय तिकडूनही येण्याचें साहस कोणी करणें सहसा शक्य नाहीं. त्यामुळें विमानांच्या उड्डाणालाहि अडचण वाटण्यासारख्याच या चतुःसीमा आहेत. (क्र. २ च्या नकाशांत पाहा.)

(ख) **निसर्गाच्या राजमार्गावरः**— युरोपाकडून व मध्यपूर्वेकडून अतिपूर्वेकडे आणि ऑस्ट्रेलियाकडे जाणाऱ्या महत्त्वाच्या नौकामार्गावर व व्यापारमार्गावर भारत उभा आहे. त्यामुळें चीन, जपान, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड तसेंच रशिया, इराण, अफगाणिस्तान यांपासून ग्रीस, रोम, आफ्रिका इत्यादि दूरदूरच्या भूप्रदेशांशीं भारताचा व्यापार सुलभतेनें चालूं शकतो. त्याच्या अवाढव्य विस्तारामुळें त्याचे हातपाय इतके दूरवर पोहोंचूं शकतात. (क्र. २ च्या नकाशांत पाहा.)

(ग) **सुपीक प्रदेशः**—आपला हा देश अतीशय सुपीक असून फळाफुलांची व धनधान्यांची येथें समृद्धि आहे. बारा महिने दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या, त्यांवर काढलेले प्रचंड कालवे व बांधलेलीं मोठमोठालीं धरणें, भरपूर पाऊस यांमुळें येथील बराच मोठा भूप्रदेश सदैव ओला राहूं शकतो. पंजाबांत ९५ लक्ष एकर, संयुक्तप्रांतांत ३० लक्ष एकर, म्हैसूरमध्यें १३ लक्ष एकर अशा विस्तृत जमिनी कालव्यांच्या व धरणाच्या पाण्यानें लागवडीला आणल्या जातात. त्यामुळें थोड्या कष्टांत हजारों प्रकारचें उत्तम पीक या जमिनींतून निघूं शकतें. शेतीला प्राधान्य व भरपूर उत्तेजन दिल्यास या देशाला धान्यासाठीं कधींच

कोणावर अवलंबून राहावें लागणार नाहीं, इतकेंच नव्हे तर हा देश इतरांना धान्यपुरवठा करूं शकेल. तांदूळ, गहूं, ज्वारी, बाजरी, सर्व प्रकारचीं द्विदळ धान्यें, गळिताचीं धान्यें, सर्व प्रकारच्या भाज्या या भूमींतून मुबलक निघूं शकतात. तसेंच समशीतोष्ण हवा व पुरेसा पाऊस पडत असल्यामुळें जनावरें पाळणें हा एक येथील प्रमुख धंदा आहे. त्यामुळें दूधदुभतेंही भरपूर प्रमाणांत असतें.

(च) **भारताचा मित्र हिमालयः**—नगाधिराज हिमालय भारताच्या कसा उपयोगी पडत आहे हें ध्यानांत ठेविण्याजोगें आहे. एखाद्या मित्राप्रमाणें भारताच्या सौख्यासाठीं मोठ्या जाकरूकतेनें तो सीमेवर कायम उभा आहे. त्याच्या सान्निध्यामुळें आपले अनेक फायदे आहेत. त्यांपैकीं (१) परचक्रापासून या बाजूनें आपलें संरक्षण होऊं शकतें. (२) मध्य-आशियांतील कोरड्या वाऱ्यांना थोपवून धरल्यामुळें रखरखीत हवामाना-पासून आपलें रक्षण होतें व त्यामुळें सुखकारक हवा आपणांस लाभते. (३) गंगा, सिंधु, ब्रह्मपुत्रा यांसारख्या महानद्यांचे उगम हिमालयांत आहेत. (४) आणि शेवटीं, महान् ऋषिमुनींना तपस्या करण्यास योग्य अशीं असंख्य तपोवनें, मानस सरोवरांसारखीं स्वर्गीय जलाशयें व कैलास व माऊंट एव्हरेस्ट यांसारखीं स्वर्गलोकांशीं पृथ्वीतलाचा संबंध जोडणारीं उत्तुंग शिखरें हिमालयांत आहेत हे विशेष होत.

(छ) **भौतिक विविधताः**—भारताचा हा एक विशेष आहे कीं या ठिकाणीं हवामान, पाऊस, जमीन, मानव या सर्वांचे सर्व प्रकार पाहावयास मिळतात. विषुववृत्तापासून ८° वर असणाऱ्या कन्याकुमारी-पासून उत्तरेकडे ३४° वर असणाऱ्या काश्मिरांतील गिल्गिटपर्यंत आपला देश पसरला आहे. त्यामुळें आफ्रिकेंतील जळजळीत उष्णतेपासून तों ध्रुव-प्रदेशांतील गोठण-बिंदुपर्यंत सर्व प्रकारची हवा येथें अनुभवावयास मिळते. जाकोबाबाद (सिंध) येथील सरासरी उष्णतामान १२५° अंश असतें, तर सिमला, महाबळेश्वर इत्यादि ठिकाणचें उष्णतामान ३५° खालींही असतें. तसाच पाऊस—चेरापुंजी येथें ४६० इंच तर सिंधमध्यें ३ इंच, त्याचप्रमाणें गंगा-सिंधूच्या खोऱ्यांतील सुपीक व सघन जमीन येथें आहे, तर राजपुताना-

कच्छचीं वाळवंटेंही येथें आहेत. काश्मिरांतील गोरींपान व मद्रासमधील काळीं कुळकुळीत माणसेंही येथें आहेत. सारांश, निसर्गाची मनोरंजक विविधता येथें एकत्र आढळते.

(च) **प्रचंड मनुष्यबळः**—भारतांतील साडेबेचाळीस कोटि माणसांचें सामर्थ्य केवढें दांडगें असावयास पाहिजे हें इतर देशांतील मनुष्यबळाकडे पाहून चटकन ध्यानांत येतें. फक्त आठ कोटि सामान्य माणसें जगावर साम्राज्य गाजविण्यास पुरेशीं होतात, असें जगांत इतरत्र दिसतें.

(छ) **कच्चा मालः**—आपला हा देश कच्च्या मालाचें प्रचंड पुरवठाकेंद्र आहे हें मागें सांगितलें आहेच. कापूस, ज्यूट, अशुद्ध लोखंड इत्यादि पदार्थ या कच्च्या मालांत मोडतात.

(ज) **खनिज संपत्तिः**—आश्चर्यानें थक्क होण्याजोगी खनिज संपत्ति या भूमीच्या उदरांत सांठविलेली आहे. प्रतिवर्षी ५३०० कोटि मेट्रिक टन दगडी कोळसा या भूमींतून काढतां येईल असा अमेरिकन भूशास्त्रज्ञांचा अंदाज आहे. परंतु आज फक्त २ कोटि ६० टनच कोळसा बाहेर काढला जातो. अमेरिका व फ्रान्स या देशांच्या खालोखाल हिंदुस्थान आज लोखंड पुरवीत आहे. मँगनीजचें उत्पादन पहिल्या प्रतीचें आहे (१३.३६००० मेट्रिक टन), अभ्रकाचा सांठा जगांतील उत्पादनाच्या $\frac{2}{3}$ आहे, तांबें, जस्त, अल्युमिनियम, क्रोमाइट, इल्मेनाईट, मोनॉइट, गंधक इत्यादि धातूही येथें भरपूर प्रमाणांत आहेत; मीठ, ग्रॅफाईट, सॉल्टपीटर इत्यादि क्षार येथें आहेत. रॉकेल व पेट्रोलियम यांच्या खाणी आहेत. संगमरवरीसारखे उत्कृष्ट दगड आहेत.

(झ) **इतर संपत्तिः**— अब्जावधि रुपये किंमतीचें सोनें या देशांतून दरवर्षी बाहेर जात आहे. कोलार, अनंतपूर, हैदराबाद, छोटा नागपूर येथें सोन्याच्या मोठमोठ्या खाणी आहेत. काश्मीर व सीलोन या ठिकाणीं नीळ, गोंवळकोंडें, बुंदेलखंड येथें हिरे, कारोमांडेल किनाऱ्याकडे मोतीं, अशा तऱ्हेची अमूल्य संपत्ति आपल्या देशांत आहे. प्रसिद्ध कोहिनूर हिरा प्रथम कोल्लूर येथें सांपडला. इंग्लंडच्या राजमुकुटांत जरी आज तो

झळकत असला तरी तो आमचा आहे एवढें आम्हीं अवश्य ध्यानांत ठेवावयास हवें.

(ञ) **सृष्टिसौंदर्य**:— भारतीय सृष्टिसौंदर्याची थोरवी अखिल जग ओळखतें. पृथ्वीवरील नंदनवनाची उपमा फक्त काश्मीरालाच यथार्थतेनें लागू पडते. गुलाबाच्या फुलांचे भव्य ताटवे, सफरचंदासारख्या सुमधुर फळांचे लोंबते घड, सर्वत्र थंडगार हिरवळ, पुष्पफळांनीं बहरलेले वृक्ष व वेली व त्यांवर स्वच्छंदपणें विहार करणारे निरनिराळ्या रंगांचे पक्षी असे असंख्य नयनमनोहर देखावे काश्मीरांतच जाऊन पाहावे. माणसानें जन्मास यावें व काश्मीर पाहून मरावें तरच तो भाग्यवान् !

वरील सर्व विवेचनावरून एक गोष्ट ध्यानांत येईल कीं, भारतीयांना एवढा अमोलिक ठेवा दिलेला आहे कीं सर्व तऱ्हेचीं सौख्यें त्यांनीं स्वावलंबेंच उपभोगावीं. परंतु दुर्दैवानें वस्तुस्थिति तशी नाहीं. हें असें कां?

(४) **अनुकुलतेचे प्रतिकूल परिणाम**:— (अ) स्वभावतःच मनुष्याची वृत्ति सुखासीन असते. **थोडे कष्ट पण भरपूर सुख मिळालें** कीं दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची फिकीर तो सहसा करीत नाहीं. अशा तऱ्हेनें सुखाच्या आधीन झाल्यावर साहजिकच तो आळशी, चैनी व विलासप्रिय बनतो. आपणही असेच आळशी व चैनी बनलों, आपल्या देशांतील संपत्तीची, ज्ञानाची व शास्त्रकलांची आपण जोपासना केली नाहीं, आणि त्यामुळें परकीयांनीं आपल्याला सर्वस्वीं लुबाडलें.

(आ) भारताच्या उत्तरेकडील पर्वतांची प्रचंड भिंत आणि बाकी सर्व बाजूंनीं समुद्रांचे खंदक यामुळें या देशाला नैसर्गिक संरक्षण लाभलें आहे ही गोष्ट तर खरीच पण त्याबरोबरच हेंही लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं याच नैसर्गिक तटबंदीमुळें **हा देश जगापासून बरींच वर्षें वेगळा राहिला.** जगाशीं संबंध कमी आल्यामुळें विचारांची, कल्पनांची व योजनांची देवाण-घेवाण जगाशीं फारशी झाली नाहीं. जगांत चाललेल्या घडामोडी भारतीयांना कळत नसत. जग पुढें जात चाललें पण भारतीय मात्र पुराणप्रिय व मागासलेले राहिले. भौतिक व भौगोलिक शास्त्रांतील

प्रगति व सामाजिक व राजकीय आंदोलनें वगैरे कित्येक बाबतींत आपला देश मागें पडला.

(इ) येथील सर्व प्रदेश डोंगराळ, मधून मधून पर्वतांचीं शिखरें वर उपटलेलीं आहेत, तर खोल व भयाण दऱ्यासुद्धां ठिकठिकाणीं आहेत. सर्व **प्रदेश खांचखळग्यांनीं भरलेला असल्यामुळें वाहतुकीच्या दृष्टीनें कुचकामाचा** आहे. वाहतूक अवघड असल्यामुळें व्यापारावर अनिष्ट परिणाम होतो.

(ई) वाहतुकीच्या अडचणीमुळें लोकांचे परस्परांशीं निकट संबंध राहूं शकत नाहींत. त्यामुळें लोकांत **एकराष्ट्रीयत्वाची व ऐक्याची भावना निर्माण होणें कठीण जातें.** अवाढव्य विस्तारामुळें आणि डोंगराळ प्रदेशामुळें एका टोंकाचा संबंध दुसऱ्या टोंकाशीं फारसा येत नाहीं. त्यामुळें उत्तरेकडे आलेलें परचक्र दक्षिणेकडील लोकांना मुळींच जाणवत नाहीं व दक्षिणेकडील लोकांचीं दुःखें उत्तरेकडील लोकांना सहसा कळत नाहींत.

**(उ) या देशाचा किनारा दन्तुर नाहीं व त्यामुळें उत्कृष्ट बंदरें नाहींत.** नद्याही डोंगराळ प्रदेशांतून वाहतात. त्यांचा प्रवाह वेगवान् असल्यामुळें त्या नौकानयनाला निरुपयोगी आहेत.

(ऊ) शेती हाच मुख्य धंदा; त्यामुळें शेतकरी लोकांचा भरणा अधिक. **बाराही महिने शेतींतच गुंतल्यामुळें त्यांचें शिक्षण होत नाहीं.** बहुसंख्य लोक निरक्षर आहेत. खेड्यांची संख्या जास्त आहे.

**(ओ) अनेक वीर्यशाली जाति निस्तेज व निर्वीर्य झाल्या आहेत.**

(५) **निष्कर्षः**— जगांतील इतर कोणत्याही देशाला लाभली नाहीं इतकी नैसर्गिक अनुकूलता भारताला लाभली. या अनुकूलतेमुळें परकीयांना या देशाचें वैषम्य वाटून त्यांनीं या देशाला लुबाडण्यासाठीं स्वाऱ्या सुरू केल्या. प्राचीन आर्यांनीं अशा सर्व स्वाऱ्या परतविल्या व ह्या भूमीला सुवर्णभूमि या नांवानें अलंकृत केलें. परंतु ही संपन्नता अलीकडील

भारतीयांना टिकवितां आली नाहीं. नैसर्गिक अनुकूलतेमुळें स्वास्थ्य लाभलें व त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं या दुर्गुणांचा प्रादुर्भाव झाला आणि शेवटीं परकीयांच्या वर्चस्वाखालीं देशाला राहण्याची पूर्वीप्रमाणें पाळी आली. ह्या पारतंत्र्यांतून त्याची मुक्तता होऊन पुन्हा तो संपन्न व्हावा असें तुम्हांस वाटतें ना ?

(अ) उतारे:--

(१) गायन्ति देवाः किल गीतकानि
धन्यास्तु ते भारतभूमिभागे ।
स्वर्गापस्वर्गास्पद मार्गभूते
भवन्ति भूयः पुरुषाः सुरत्वात् ॥

—विष्णुपुराण २.३.२४

(२) "सृष्टिदेवतेनें आपली समृद्धि, सामर्थ्य व सौंदर्य हीं सर्व पूर्णपणें ओतून कोणत्या देशास मृत्युलोकींचें नंदनवन बनविलें आहे हें पाहण्यास मी जर सर्व जग धुंडाळूं लागलों तर मला हिंदुस्थानाकडेच बोट दाखवावें लागेल. मानवी अंतःकरणाच्या व बुद्धीच्या श्रेष्ठ वृत्ति व शक्ति कोणत्या देशांत पूर्णावस्थेस पोहोंचल्या आहेत ? सृष्टींतील व संसारांतील अत्यंत महत्त्वाच्या गूढ प्रमेयांचा सूक्ष्म व खोल विचार कोठें झाला आहे ? असे प्रश्न मला कोणीं विचारले तर मी त्यांस 'हिंदुस्थान, हिंदुस्थान, हिंदुस्थान' असें एकच उत्तर देईन ! मानवी इतिहासाच्या सामुग्रीपैकीं अत्यंत महत्त्वाच्या बोधकारक सामुग्रीचें भांडार केवळ एकट्या हिंदुस्थानांतच सांठविलेलें आहे." मॅक्स मुलर– 'हिंदुस्थान, व तें आम्हांस काय शिकवील ?'

(आ) थोडक्यांत—

(१) **भौगोलिक रचना**—द्वीपकल्प, दक्षिणोत्तर लांबी १९०० मैल, पूर्वपश्चिम रुंदी १८०० मैल, एकूण क्षेत्रफळ १८ लक्ष चौरस मैल.

उत्तर हिंदुस्थान व दक्षिण (दख्खन) असे दोन स्वाभाविक विभाग. हिमालय, हिंदुकुश, काराकोरम इत्यादि पर्वत व गंगा, सिंधु, ब्रह्मपुत्रा इत्यादि मोठ्या नद्या.

(२) **लोकविषयक माहिती**— लोकसंख्या सुमारें ४२ कोटि ५० लक्ष. ४३ मुख्य जाति, २३७८ पोटजाति. भाषा एकूण सुमारें १५०; भाषा ६ हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, तामील, कानडी संस्कृताशीं निकट संबंधित. 'संस्कृत हीं जगांतील सर्व भाषांची जननी आहे.' —मॅक्स मुलर.

### (३) भारताची स्वाभाविक अनुकूलता—

१ संरक्षण- नैसर्गिक तटबंदी-उत्तरेकडे प्रचंड पर्वत व बाकी तिन्ही बाजूंस पाणी.
२ निसर्गाच्या राजरस्त्यावर- भारताच्या अवाढव्य विस्तारामुळें त्याचे संबंध दूरदूरच्या देशांशीं पोहोंचूं शकतात.
३ सुपीक प्रदेश-थोड्या कष्टांत हजारों प्रकारचें पीक.
४ भारताचा मित्र-हिमालय.
५ भौतिक विविधता-हवामान, पाऊस, जमीन, मानव इ०.
६ प्रचंड मनुष्यबळ-४२ कोटि ५० लक्ष.
७ अगणित खनिज संपत्ति.
८ सृष्टिसौंदर्य-काश्मीर-भारतीय नंदनवन.

### (४) स्वाभाविक अनुकूलतेचे प्रतिकूल परिणाम—

१ लोक चैनी, आळशी व विलासप्रिय.
२ नैसर्गिक तटबंदीमुळें देश जगापासून वेगळा राहिला.
३ वाहतुकीसाठीं प्रदेश कुचकामाचा.
४ सर्व लोकांचे परस्परांशीं संबंध कमी आले त्यामुळें अनेक वाद.
५ किनारा दंतुर नसल्यामुळें बंदरें कमी-व्यापार मागासला.
६ अनेक वीर्यशाली जाति निस्तेज व निर्वीर्य बनल्या.

(इ) **प्रश्न**—(१) भारताची स्वाभाविक रचना कशी आहे ? त्यामुळें भारताचे कोणते फायदे झाले आहेत ?

(२) भारताला निसर्गतःच कोणत्या अनुकूल गोष्टी लाभल्या आहेत ?

(३) स्वाभाविक अनुकूलतेचे भारतवासीयांवर कोणते परिणाम झाले ?

(ई) **स्वाध्यायः**—वाचा—

'आपला हिंदुस्थान'—(ले. मिनू मसानी) अनुवादक श्री. गोरे.

'भारतीय श्रेष्ठत्व'—ले. श्री. लिमये, बेडेकर.

'वेदकालीन भारताचा इतिहास'—ले. श्री. काशीकर.

---

प्रकरण ३ रें

# प्राचीन इतिहासाचीं साधनें

(१) भारतीय साहित्य;
(२) अवशेष-मोहें-न्-जोदारो, हरप्पा;
(३) आलेख-शिलालेख ताम्रपट इ०;
(४) नाणीं;
(५) परदेशीय साहित्य.

(१) भारतीय साहित्यः— आज आपण बऱ्याच सुधारलेल्या जगांत वावरत आहोंत. हल्लीं छापखाने, तारायंत्रें, टेलिफोन, रेडिओ इत्यादि साधनें उपलब्ध आहेत. आगगाड्या, आगबोटी, मोटारी, विमानें यांमुळें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणें अतिशय सुकर व सुलभ झालें आहे त्यामुळें आणखी कांहीं वर्षांनीं आजच्या जगाचा इतिहास लिहिण्याचें जर ठरविलें तर मुळींच कठीण जाणार नाहीं. वर्षांचाच काय पण प्रत्येक दिवसाचा किंवा तासाचाही इतिहास आपणांस सहज लिहितां येईल. समजा सध्याच्या लढाईचा इतिहास आणखी शंभर वर्षांनंतर लिहावयास घेतला तर आपणांस कोणकोणतीं साधनें उपलब्ध आहेत ? रोजची वित्तंबातमी देणारीं वर्तमानपत्रें, देशाचा इतिहास व माहिती देणारीं पुस्तकें, अनेक पंडितांचीं व लष्करी तज्ज्ञांचीं भाषणें, सेनापतींच्या रोजनिशा, सैनिकांचीं खाजगी पत्रें आणि प्रवाश्यांचीं वर्णनें इत्यादि.

ही झाली हल्लींची स्थिति. पण जवळ जवळ पांच हजार वर्षांपूर्वीचा इतिहास लिहावयाचा तो कसा शक्य आहे ? त्या वेळीं हल्लींचीं कोणतींच साधनें उपलब्ध नव्हतीं. फार काय, लिहिण्याची कलाही कोणाला अवगत नव्हती. मग ग्रंथ तर दूरच राहिले ! मग हा पांच हजार वर्षांपूर्वीचा इतिहास कसा शोधून काढला असेल? हल्लींप्रमाणें प्राचीनकाळींचा इतिहास

जुळविणें सोपें नाहीं; तें काम फार कष्टाचें, संशोधनाचें आणि खर्चाचें आहे. तरी देखील अलीकडे हा इतिहास जुळविण्यास उपयोगीं पडतील अशीं कांहीं साधनें हातार्शी आलेलीं आहेत. सरकाराच्या पुराण-वस्तु-संशोधन खात्यानें अनेक ठिकाणीं उत्खननें करून व जुने अवशेष शोधून काढून प्राचीन इतिहासाच्या जुळणींत बहुमोल भर घातली आहे. अशा साधनांचा विचार या प्रकरणांत आपण करणार आहोंत. प्रथमतः आपण तयार असलेल्या प्राचीन साहित्याचा विचार करूं.

(अ) **प्राचीन धर्मग्रंथः**— आर्यांचे वेद हे जगांत अद्वितीय वाङ्मय ठरले आहेत. सामाजिक, धार्मिक, आर्थिक वगैरे सर्व प्रकारचें तत्त्वज्ञान वेदांत सांठविलेलें आहे त्यामुळें अतिप्राचीनकालीन आर्यांच्या परिस्थितीवर चांगलाच प्रकाश पडतो. त्याशिवाय ब्राह्मणें, उपनिषदें, पुराणें, मनुस्मृति, अर्थशास्त्र इत्यादि सारखे महान् ग्रंथ इतिहासाच्या जुळणीला बरेच उपयुक्त आहेत. रामायण, महाभारत हे ग्रंथ म्हणजे त्या काळच्या आर्य संस्कृतीचे काव्यमय इतिहासच आहेत. त्याचप्रमाणें कालिदासाचीं 'मालविकाग्निमित्र' यासारखीं नाटकें किंवा बाणाचें 'हर्षचरितम्' व बिल्हणाचें 'विक्रमांकदेवचरित' इत्यादि ग्रंथ त्या काळींच्या इतिहासाला पुरावेच आहेत.

(आ) **वंशावळीः**— आपल्या वंशाची माहिती लिहून ठेवावी, त्या वंशांत झालेल्या पराक्रमी, थोर, कर्तृत्ववान् व विशेष लोकांची माहिती जगाला द्यावी ही इच्छा थोड्याफार प्रमाणांत प्रत्येकाच्या ठिकाणीं असणारच. राजेरजवाड्यांच्या ठिकाणीं ही इच्छा प्रबळ असते. म्हणून कोणातरी विद्वानाकडून आपल्या वंशाची हकिकत ते लिहून घेतात. अशाच कांहीं जुन्या काळच्या वंशावळी अलीकडे सांपडल्या आहेत. पुराणांतील राजवंशावळी, नेपाळ व ओरिसा प्रांतांतील राज-वंशावळी प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांवरून आपणांस त्या वेळच्या राजांची माहिती मिळते. भारताचा प्राचीन इतिहास राजवंशावळीवरून समजण्यास साधारण खि. पू. ६५० पासून प्रारंभ होतो. खि. पू. ६५० ते खि. पू. ३२५ पर्यंत म्हणजे शिकंदरच्या मोहिमेपर्यंत जी माहिती मिळते ती

बरीचशी त्रोटक आहे. तसेंच बरेचसे राजकालही अनिश्चित व विवाद्य आहेत. गुप्तकालापासून मात्र फ्लीटच्या संशोधनामुळें काळाला निश्चितता आली आहे.

(इ) **वंशेतिहासः**— वर म्हटलेंच आहे कीं, प्राचीन राजे आपल्या पराक्रमाचीं, कर्तृत्वाचीं, बुद्धिचातुर्याचीं वर्णनें लिहून ठेवीत. वंशपरंपरागत लिहून ठेविलेल्या अशा माहितीला वंशेतिहास म्हणतात. असे अनेक वंशेतिहास परकीयांच्या आक्रमणाखालीं नष्ट झाले आहेत. अशाच इतिहासाचें एक प्रकरण ओरिसा प्रांतांतील हाथी गुम्फाच्या भिंतीवर लिहिलेलें आढळलें आहे. तें जवळ जवळ २१५० वर्षांपूर्वीचें असावें.

(ई) **राजतरंगिणीः**— कल्हण नांवाचा एक पण्डित काश्मीरच्या राजाच्या पदरीं होता. राजाच्या आज्ञेवरून त्यानें काश्मीरचा इतिहास लिहिला. अर्थात् 'राजतरंगिणी' म्हणजे जरी काश्मीरचाच इतिहास असला तरी त्यावरून त्या वेळच्या इतर देशांची माहिती आपोआप मिळूं शकते. उदाहरणार्थ, काश्मीरच्या राजानें नेपाळावर स्वारी केली असेल तर त्याच्या पराक्रमाच्या माहितीबरोबरच नेपाळामधील त्या वेळचा राजा, त्याची स्थिति वगैरेंची माहिती मिळूं शकते. असेच इतर कांहीं ग्रंथ सांपडतील तर इतिहास लिहिणें सोपें होईल.

(२) **अवशेषः— (अ) मोहेन्-जो-दारो; (आ) हरप्पाः—** इ. स. १९२१ सालीं पंजाबांत मॉंटगोमरी जिल्ह्यांतील हरप्पा या गांवीं जुन्या मुद्रा व कांहीं रंगीत भांडीं सांपडलीं. त्यानंतर कांहीं दिवसांनीं सिंध प्रांतात लारखाना जिल्ह्यातील मोहेन्-जो-दारो या गांवांत बौद्ध स्तूपाचे कांहीं अवशेप आढळले. तेथें सरकाराच्या पुराण-वस्तु-संशोधन खात्यांतील लोकांनीं खणून पाहिलें त्या वेळीं त्यांना त्याच्याखालीं उत्तम बांधकाम केलेलें आढळलें. म्हणून वरील दोन्ही ठिकाणीं उत्खननास सुरुवात करण्यांत आली. हें उत्खननाचें काम इ. स. १९२७ पर्यंत चाललें होतें. तें पूर्ण झाल्यावर त्यांत सापडलेल्या अवशेषांचें संशोधन करण्यांत येऊन कांहीं आडाखे बसविण्यांत आले. त्यांची माहिती आपण अगदीं सारांशरूपानें मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. दोन्ही ठिकाणांच्या

संस्कृतीचें स्वरूप पूर्णांशानें एकच असल्यानें त्यांचा एकत्रच विचार केला आहे.

**या संस्कृतीचे कालविभागः**— या संस्कृतीमध्यें सोनें, रुपें व तांबें या धातूंबरोबर दगडाचाहि उपयोग केला आहे म्हणून या काळास 'मिश्रयुग' म्हणतात. मोहेन्-जो-दारोच्या प्रदेशांत बांधकामाचे सात थर सांपडले आहेत. त्यांतील वरचा थर अलीकडच्या काळांतील समजला जातो. तरी पण तो काळ इ. स. पूर्व ३००० च्या जवळपास असावा. अगदीं खालचा थर प्राचीन काळचा ठरविला आहे. त्याचा काल सुमारें इ. स. पूर्व ४००० वर्षें समजतात.

**शहर-रचनाः**— त्या वेळच्या लोकांना शहर-रचनेची पूर्ण माहिती होती. मोहेन्-जो-दारो हें एक शहरच आहे. त्यांतील रस्ते आंखीव व प्रशस्त आहेत. रस्त्यांच्या कडेला मोठमोठीं घरें व वाडे बांधलेले आहेत. मधून मधून अरुंद बोळही आहेत. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस नाले आहेत. स्वयंपाकगृहें व स्नानगृहें रस्त्यालगतच बांधलेलीं असल्यामुळें वापरलेलें पाणी ताबडतोब नाल्यात जातें. प्रत्येक घरांत एक स्नानगृह असे. चोवीस खांब असलेला एक प्रशस्त दिवाणखाना मोहेन्-जो-दारो येथें सांपडला आहे. येथील एक महत्त्वाचा विशेष हा कीं येथें १८० फूट×१०८ फूट एवढ्या विस्ताराचें एक प्रचंड स्नानगृह आहे. त्यांत एक मोठें तळें आहे. सर्व बांधकाम भाजलेल्या विटांचें असून त्याला चुन्याचा गिलावा आहे.

**शिक्के व ताम्रपटः**— येथें सुमारें सहाशें मुद्रा अगर शिक्के सांपडले आहेत. प्रत्येक शिक्क्यावर चित्रलिपीच्या एक दोन ओळी व एक प्राणी असें काढलेलें आहे. ओळींतील अक्षरें संस्कृत भाषेंतील आहेत.

**चित्रें व मूर्तिः**— येथें मातीचीं कांहीं स्त्री-चित्रें सांपडलीं आहेत. त्या स्त्रीच्या कमरेभोंवतीं एक वस्त्र गुंडाळलें आहे व तिच्या गळ्याभोंवतीं कांहीं अलंकारही आहेत. हीं चित्रें पृथ्वी देवतेचीं असावींत.

**हरप्पाः**— येथील एका शिक्क्यावरून पृथ्वी देवतेला मनुष्यबलि देण्यांत येत असल्याचें दिसून येतें; एका शिक्क्यावर लहानशा सिंहासनावर

योगासन घालून बसलेली शिवमूर्ति काढलेली आहे. मोहेन्-जो-दारो येथील लोकांत लिंगपूजा रूढ होती. येथें व हरप्पा येथें दोन लिंगमूर्ति सांपडल्या आहेत. एका मुद्रेवर एक पिंपळासारखें झाड कोरलेलें आहे. त्या झाडास ते लोक पवित्र मानीत असत. मुद्रांप्रमाणेंच तांब्याच्या-पत्र्यावर कांहीं प्राणी कोरलेले आढळतात.

**अलंकार व आयुधें:**— त्या वेळीं लोंकर व सूत कांतले जात असे व त्याचीं वस्त्रेंही विणीत. स्त्रिया व पुरुष दोघेंही दागिने वापरीत असत. श्रीमंत लोकांचे दागिने सोन्या-चांदीचे व हस्तिदंताचे असत. गरिबांचे तांब्याचे, शिंपल्यांचे, हाडाचे वगैरे असत. घरांतील भांडीं अनेक आकारांचीं असून तीं तांब्याचीं केलेलीं असत. कुऱ्हाडी, करवती, वस्त्रें वगैरे हत्यारें ब्रॉझचीं असत. मातीचीं खेळणीं अनेक तऱ्हांचीं असत. गोट्या व फांसेही तेथें सांपडले आहेत.

आहार:— गहूं आणि यव हीं धान्यें येथील लोक खात असावेत. याशिवाय त्यांच्या आहारांत गाईचें, बकऱ्याचें व इतर कांहीं प्राण्याचें मांस, अंडीं व मासे असत.

सारांश, अशा प्रकारची संस्कृति मोहेन्-जो-दारो व हरप्पा येथें सांपडलेली आहे. हिचे मूळ उत्पादक कोण असावेत यासंबंधीं अजून निश्चित एकमत झालेलें नाहीं. मात्र ही संस्कृति वैदिक आर्यांची नव्हे हें सर्वांस मान्य आहे. घरांची रचना, विहिरी, स्नानगृहें, गटारांची व्यवस्था, मूर्तिकाम, नक्षीकाम इत्यादि बाबतींत हे लोक पुष्कळच सुधारलेले होते. ते द्राविडीयन् असावेत असें अनेक पंडितांचें मत आहे. द्राविडीयन लोक लिंगोपासक होते. शिवाय त्यांचा बॅबिलोनियन लोकांशीं व्यापार चालू होता त्यावरून ते निःसंशय सुधारलेले होते.

(३) लेख:—

(अ) **शिलालेख**—कागदाच्या संशोधनापूर्वी लोक लिहिण्यासाठीं दगडांचा उपयोग करीत. जें लिहावयाचें असेल तें डोंगर, खडक, भिंती यांमधील दगडांवर ते कोरून ठेवीत. त्यास शिलालेख म्हणतात. अत्यंत

प्राचीन शिलालेख खि. पू. ३ ऱ्या शतकापासूनचे आढळतात. सर्वांत महत्त्वाचे शिलालेख म्हणजे अशोकाचे. त्यांवर त्यानें आपल्या धर्माज्ञा कोरून ठेविल्या आहेत. अजमीर व धार येथें सांपडलेल्या लेखशिलांवर नाटकांतील कांहीं प्रसंग कोरलेले आहेत. चितोड येथें एका शिलेवर वास्तुशास्त्रावरील एक टीका खोदली आहे. आजमितीस असे हजारों शिलालेख सांपडले असून त्यांयोगें प्राचीन इतिहासाच्या जुळणीस बरीच मदत झाली आहे.

(आ) **धातुलेखः**—धातूंच्या पत्र्यावरील लेखांना धातुलेख म्हणतात. तांब्याच्या पत्र्यावरील लेख म्हणजे ताम्रपट. हे लेख बहुधा दानविषयक असत. खि. पू. २०० च्या सुमारचा सोहगौर येथील एक ताम्रपट सांपडला आहे. तो सरकारी धान्यागार-विषयक आहे. असेच कित्येक ताम्रपट, लोहपट सांपडले आहेत.

(इ) **पत्रें**—धातूंच्या पत्र्याप्रमाणें झाडाच्या पानांचाही लिहिण्यासाठीं उपयोग करीत असत. शकुंतलेनें दुष्यंताला कमलपत्रावर लिहिलेलें पत्र आपल्याला माहीत आहे. अशाच तऱ्हेनें ताडपत्र, भूर्जपत्र वगैरे पानांचा उपयोग लिहिण्यासाठीं केला जाई. जसा कागद नव्हता तशी त्या वेळीं शाईही नव्हती. केळीच्या देठाचा आधुनिक निर्झरणीप्रमाणें उपयोग होत असे. हजारों वर्षांपूर्वीं लिहिलेलीं ताडपत्रें आजही स्पष्टपणें वाचतां येतात, यावरून त्या वेळचें लेखन कसें पक्कें होतें हें ध्यानात येऊन विस्मय वाटतो.

(ई) **लेणीं**—बौद्धविहार, स्तूप, स्तम्भ व लेणीं हीं जगाच्या अंतापर्यंत टिकणारीं प्रचारसाधनें इतिहासबांधणीला निश्चित उपयुक्त आहेत. या सर्व ठिकाणीं राजे व त्यांचीं कृत्यें, त्यांच्या प्रोत्साहनानें कोरून ठेविलेली धर्मविषयक माहिती व इतर तत्त्वज्ञान इत्यादि विविध गोष्टी आपणांस आजही पाहावयास सांपडतात. कार्ला, अजिंठा, सांची, गया इत्यादि ठिकाणीं लेणीं, स्तूप, स्तम्भ, चैत्य वगैरे सर्व चांगल्या स्थितींत आहेत.

(४) **नाणीं**:—नाणीं इतिहास-संशोधनाच्या कामीं विशेष उपयोगी

असतात कारण नाण्यांमुळें काळाचा बोध फार स्पष्ट रीतीनें होतो. इंडो-ग्रीक व इंडो-पार्थियन या राजवंशांचा इतिहास नाण्यामुळेंच उजेडांत आला. तसेंच मीतरी येथें सांपडलेल्या चांदीच्या मोठ्या मुद्रेवरून दुसऱ्या कुमारगुप्ताची माहिती मिळाली. देशाच्या सर्व भागात, विशेषतः उत्तर हिंदुस्थानांत, प्राचीन राजांचीं सोनें, चांदी व तांबें या धातूंचीं बरींच नाणीं सापडलीं आहेत. या नाण्यावर त्या त्या राजाचें नांव व काळ किंवा क्वचित् त्या राजाचें वैशिष्टय दाखविणारें एखादें चिन्ह कोरलेलें आढळतें. त्यावरून बरीच माहिती मिळूं शकते.

(५) परदेशी साहित्यः—

प्राचीन इतिहासाचें आणखी एक महत्वाचें साधन म्हणजे परदेशस्थांनीं लिहून ठेविलेली माहिती हें होय. अलेक्झांडरच्या स्वारीमुळें ग्रीकांचा प्रवेश ह्या देशात झाला. तेंव्हापासून पाश्चात्य लोक प्रवासाच्या हेतूनें या देशांत येऊं लागेल. त्यानीं येथें येऊन येथील प्रमुख शहराना व यात्रेच्या ठिकाणाना भेटी देऊन, राजदरबारीं कांहीं काळ राहून सर्व परिस्थितीचें निरीक्षण केलें व तें सर्व संकलित रीतीनें लिहून ठेविलें. पाश्चात्यांप्रमाणें पूर्वेकडून चिनी प्रवासीही वेळोवेळीं या देशात आले होते. त्या सर्वांनीं लिहून ठेविलेली माहिती प्रत्यक्ष पाहिलेली व निःपक्षपातीपणाची असल्यामुळें ती इतिहासाला योग्य अशीच आहे. चंद्रगुप्ताच्या दरबारीं येऊन राहिलेला ग्रीक वकील मेग्यास्थेनिस, टॉलेमी, विक्रमादित्याचे काळीं आलेला चिनी प्रवासी फाहेन, हर्षवर्धनाचे वेळीं आलेला ह्युएनत्संग व पुढें कांहीं वर्षांनीं आलेला ईत्सिंग इत्यादि सर्वांनीं त्या त्या वेळची सर्व परिस्थिति लिहून ठेविली आहे. ती सर्व माहिती अत्यंत उपयुक्त अशीच आहे.

तसेंच व्यापारानिमित्त या देशातील व्यापारी ब्रह्मदेश, सीलोन, जावा, सुमात्रा, चीन या पूर्वेकडील व इराण, अफगाणिस्थान, बॅक्ट्रिया, ग्रीस या पश्चिमेकडील देशांत जात असत. अर्थातच अशा लोकाच्या रीतिरिवाजाबद्दल, धर्मसंस्कृतीबद्दल त्यांना कुतूहल वाटे व त्यासंबंधीं मिळाली ती माहिती त्यानीं लिहून ठेविली आहे. या सर्व माहितीचा उपयोग प्राचीन इतिहास लिहिण्यास झाला आहे.

**निष्कर्ष:**--वरीलप्रमाणें प्राचीन इतिहासाचीं अनेकविध साधनें आहेत. या साधनांपैकीं बरीचशीं मुसलमान व पोर्तुगीज लोकांनीं जाळून टाकल्यामुळें फारच थोडीं हाताशीं राहिलीं आहेत. त्यामुळें बराच इतिहास अंधकारांत गडप झालेला आहे, व तो प्रकाशांत आणणें अत्यंत बिकट काम आहे.

(अ) **थोडक्यांत:**--प्राचीन इतिहासाचीं साधनें.

(१) भारतीय साहित्य, प्राचीन धर्मग्रंथ, वंशावळी, वंशेतिहास, राजतरंगिणी.

(२) अवशेष--मोहेन-जो-दारो, हरप्पा.

(३) लेख--शिलालेख, धातुलेख, पत्रें, लेणीं, नाणीं.

(४) परदेशी साहित्य:--चिनी प्रवासी, ग्रीक वकील इत्यादि.

(आ) **प्रश्न:**--(१) प्राचीन इतिहास लिहिण्यास कोणत्या साधनांचा उपयोग करितात ?

(२) आजचा इतिहास तुम्ही कोणत्या साधनांच्या साहाय्यानें लिहाल ?

## प्रकरण ४ थें

# भारताचे निर्माते

(१) भाग्यभू भारताचे खरे वारसदार; (३) भारताचीं विविध नांवें;
(२) हिंदु कोण ?; (४) आर्यांचें मूळ वसतिस्थान;
(५) भारतीय मानववंश.

(१) **भाग्यभू भारताचे खरे वारसदार:**—आपल्या देशीचा प्राचीन इतिहास भव्य आणि वैभवशाली आहे असें आपण मागें म्हटलें. आतां तो प्रत्यक्ष इतिहास आपणांस अवगत करून घ्यावयाचा आहे. हा इतिहास कोणीं घडविला ? इतिहास माणसें घडवितात. तो कांहीं स्वयंभू नाहीं. मग आपला हा भव्य इतिहास घडविणारीं माणसें कोण होतीं ? आपला व त्याचा संबंध काय ? आपण त्या कर्तृत्ववान् पूर्वजांचे वंशज आहोंत का ? आपणच या भाग्यभूचे खरे वारसदार आहोंत का ? इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें आपणांस या प्रकरणांत मिळवावयाचीं आहेत.

प्रथम आपण शेवटच्या प्रश्नाकडे वळूं. कारण आपणच या भारतभूमीचे खरे वारसदार आहों अशी आपल्या मनाची खात्री आहे. कोणीही आमचा हा वारसा हक्क नाशाबीत करूं शकणार नाहीं. आपली ही भावना आपल्या अंतःकरणांत कायम आहे. तरीही ऐतिहासिक व व्यावहारिक दृष्टया आपला हा हक्क सिद्ध होतो का हें आपण पाहूं या.

आपल्या देशांत नाना धर्मांचे व नाना पंथांचे लोक बरेच दिवस स्थायिक होऊन राहिले आहेत. मुसलमान आहेत; पार्शी, खिस्ती, यहुदी, चिनी, जपानी, इंग्रज वगैरे अनेक जातींचे लोक येथें आहेत. हे सर्व लोक या देशांत राहतात म्हणून ते राष्ट्रीय होऊं शकतात का हा प्रश्न आहे. राष्ट्रीयत्वाची तात्त्विक चर्चा आपणांस येथें करावयाची नाहीं. परंतु त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा कस कांहीं व्यावहारिक निकषांवर आपण घासून पाहूं.

अगदीं पहिला निकष म्हणजे आपला हा इतिहासच. आज 'हिंदु' म्हणून ओळखले जाणारे आपण सर्व लोक भारताचा प्राचीन इतिहास आपला–आपल्या पूर्वजांचा–इतिहास म्हणून मानतों. त्या इतिहासाबद्दल आपण अभिमान बाळगतों. वैदिक काळांतील आर्यांचें अगाध ज्ञान; रामायण-महाभारतांतील राम, कृष्ण, भीष्म, द्रोण, धर्म, द्रौपदी, सीता इत्यादि पूजनीय व्यक्ति; गौतम बुद्ध, महावीर, अशोक इत्यादि बौद्ध कालातील थोर विभूति, आणि चंद्रगुप्त, विक्रमादित्य, हर्ष इ० सम्राट् या सर्वांविषयीं आत्मीयता आपणां हिंदूंशिवाय इतर कोणीं दाखविली आहे? चंद्रगुप्त 'आमचा होता' असें मुसलमान म्हणतात का? विक्रमादित्य 'आपला' असें इंग्रज म्हणेल का? परोपकारी व सहृदय पाश्चर्यांलाही समुद्रगुप्त किंवा हर्ष कधीं 'आपले' वाटतील का! गौतम बुद्ध व ख्राइस्ट् यांची शिकवण पुष्कळशी सारखीच असली तरी ख्राइस्ट्चे अनुयायी स्वतःस गौतमाचे अभिमानी म्हणविणार नाहींत. आपल्या पूर्वेतिहासाबद्दल, तो इतिहास घडविणाऱ्या व्यक्तींबद्दल, त्यांच्या गुणांबद्दल, पराक्रमांबद्दल ममत्व आपल्याशिवाय इतरांना कसें वाटणार? त्यांना त्यांचा इतिहास प्रिय वाटतो. इंग्रजांचा विजयी वुइल्यम किंवा तुर्कांचा केमाल हे त्यांचे त्यांनाच आदरणीय वाटणार. तात्पर्य असें कीं, भारताच्या प्राचीन इतिहासाबद्दल फक्त भारतीय हिंदूंनाच आदर व अभिमान वाटत असल्यामुळें तेच या देशाचे 'राष्ट्रीय' घटक होत. म्हणून तेच या भूमीचे वारसदार आहेत.

दुसरा निकष म्हणजे जगाचा व्यवहार. जगांतील सर्व मोठ्या देशांच्या व्यवहाराकडे पाहिलें तर आपणांस असें आढळेल कीं, ज्या ज्या लोकांनीं त्या देशाला देशपण दिलें, ज्यांनीं ज्यांनीं आपले देह त्या भूमीच्या उद्धारार्थ कष्टविले, आणि ज्यांनीं ज्यांनीं केवळ आत्मीयतेच्या भावनेनें त्या भूमीच्या वैभवार्थ आपलें रक्त आटविलें, त्यांनाच फक्त त्या भूमीवर हक्क सांगतां येतो. हा न्याय इंग्लंड, अमेरिका, जर्मनी, जपान, रशिया यांसारख्या सुधारलेल्या व पुढारलेल्या देशांत अक्षरशः आजही पाळला जात आहे. अमेरिकेंत हिंदी लोक स्थायिक होऊन राहिले आहेत, म्हणजे ते तेथील रहिवासी झाले आहेत. परंतु त्यांना सामान्य नागरिकत्वाचे हक्कसुद्धां आजपर्यंत मिळालेले नाहींत. पुढेंमागें मिळाल्यास नागरिकत्वाचे

हक्क मिळतील. पण अमेरिकनांना मिळणारे सर्व राजकीय हक्क तेथील हिंदी लोकांना कदापिही मिळणार नाहींत. दक्षिण आफ्रिकेंत आज निर्माण झालेला प्रश्न हेंच सिद्ध करितो. इंग्लंडमध्येंही हीच तऱ्हा, जर्मनींतही हीच तऱ्हा. इंग्लंड इंग्रजांचा, जर्मनी जर्मनांचा, फ्रान्स फ्रेंचांचा, अमेरिका अमेरिकनांची हें जितकें खरें तितकेंच हिंदुस्थान हिंदूंचा हेंही खरें.

तिसरा निकष भावना. हिंदुस्थानाचें राजकीय स्वातंत्र्य हें ध्येय मानून त्यांत 'पाकिस्तान' करावें म्हणजे हिंदुस्थानाचीं 'हिंदु हिंदुस्थान' व 'इस्लाम हिंदुस्थान' अशीं दोन शकलें करावीं, तरच आम्ही स्वातंत्र्य-प्राप्तीसाठीं लढूं, असें मानणारे बहुसंख्य मुसलमान भारतीय स्वातंत्र्याच्या मार्गांत एकसारखे अडथळे निर्माण करीत आहेत. याच्या उलट, अखंड भारताचें परमोच्च वैभव हें ध्येय मानून तें साध्य करण्यासाठीं आवश्यक असलेलें राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याकरतां हिंदु वीर भारतमातेच्या चरणीं आपलें तन-मन-धनादि सर्वस्व अर्पण करण्यास अहमहमिकेनें पुढें येत आहेत, रक्त सांडीत आहेत व फांसावर जात आहेत. भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या संगरांत इंग्रज, पार्शी इतकेंच नव्हे तर आपणांतूनच धर्मांतर करून गेलेले खिश्चनसुद्धां आजपर्यंत कधीं सहकार्य करूं शकले नाहींत. भारतीय स्वातंत्र्यतत्त्वाशीं भारतीयांचे मित्र म्हणून एकरूप होणारे दादाभाई नौरोजी हे अपवाद होत. शिवाय राष्ट्रीय भावनेचें गमक एका व्यक्तीच्या मनोवृत्तींत पाहावयाचें नसून तें सर्वसामान्य समाजाच्या मनोवृत्तींत पाहावयाचें असतें, तेव्हां भावनेच्या निकषावरही हिंदुच राष्ट्रीय म्हणून तेच भारताचे वारसदार.

या सर्व निकषांखेरीज धर्म, संस्कृति, परंपरा, इतिहास व आचार-विचार हे एकराष्ट्रीयत्वाचे निदर्शक किंवा प्रमाण म्हणून मानलेले घटक हिंदूंचेंच राष्ट्रीयत्व सिद्ध करूं शकतील. फार खोलांत आपणांस शिरावयाचें नसल्यानें आपण हा विषय येथेंच संपवूं. ध्यानांत एवढेंच ठेवावयाचें कीं, हें राष्ट्र आकस्मिक कारणांनीं उत्पन्न झालेलें नसून हजारों वर्षांची तपश्चर्या त्याच्यामागें उभी आहे. अनंत काळापासून आपल्या पूर्वजांनीं या राष्ट्रवृक्षाला आपल्या रक्तमांसाचें खत घालून त्याची जोपासना व त्याचें संवर्धन केलें आहे. हा राष्ट्रवृक्ष त्यांनीं आपल्या स्वाधीन केला आहे तो

त्याचें विच्छेदन करण्यासाठीं नसून त्याला बहर आणण्यासाठीं आहे. आपण आपलें कर्तव्य पार पाडण्याची मनोमन प्रतिज्ञा करूं या.

**हिंदु कोण ?** :—वर आपण 'हिंदु' शब्दाचा उल्लेख बऱ्याच वेळां केला आहे. शिवाय सर्व जग आपणांस याच नावानें ओळखीत आहे व आपल्या देशाचें आजचें नांव आपणांवरूनच पडलें आहे. तेव्हां हें हिंदु नांव आपणांस केव्हां मिळालें ? याचा अर्थ काय ? आपण थोडक्यांत विचार करूं.

हा 'हिंदु' शब्द केव्हां व कसा रूढ झाला याविषयीं मोठे मनोरंजक उल्लेख आहेत. पार्शी लोकांच्या वाङ्मयांत प्रथम हा शब्द 'हप्त हिंदु' अशा वेदांतील 'सप्त सिंधु' शब्दाच्या अपभ्रष्ट स्वरूपांत निर्देशिलेला आढळतो. ''सप्त सिंधु' म्हणजे हिंदुस्थान.

> गंगे च यमुने चैव गोदावरी सरस्वती
> नर्मदा सिंधु कावेरी ( जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु ) ॥

या श्लोकांत सप्त सिंधूंचा म्हणजे सात नद्यांचा उल्लेख आहे. हिंदुस्थानांतील उत्तर व दक्षिण पथांतील सर्व मोठ्या नद्यांचा यांत समावेश आहे. यावरून 'सप्त सिंधु' म्हणजे हिंदुस्थान. तेव्हां पार्श्यांच्या निर्देशावरून 'हिंदु' म्हणजे या सप्तसिंधूंच्या प्रदेशांत म्हणजे हिंदुस्थानांत राहणारे लोक असा अर्थबोध होतो.

ग्रीकांनींही या 'हिंदु' शब्दाचा उल्लेख आपल्या वाङ्मयांत याच अर्थानें केला आहे. इ. स. च्या ७ व्या किंवा ८ व्या शतकांत मुसलमानांनीं या शब्दाचा सर्रासपणें उपयोग करण्यास सुरवात केली. तेव्हांपासून हा शब्द आजतागायत चालत आलेला आहे. 'हिंदु' हा शब्द कोणत्याही अर्थानें उपयोगांत आला असला तरी आर्य संस्कृतीचा आजचा निर्दर्शक शब्द तोच आहे. फरक इतकाच कीं, आर्य जातीशीं द्रवीड, मंगोलियन, शक कुशान, हूण इत्यादि परकीयांचा संकर झाल्यामुळें मूळची आर्य जाति लोप पावली. संकरानंतर या सर्व निरनिराळ्या पंथीय लोकांना 'हिंदु' हें नांव पडलें. या शब्दाची व्याप्ति फार मोठी आहे.

आर्य शब्दाप्रमाणें एका विशिष्ट वर्गाचा निदर्शक हा शब्द नाहीं. संस्कृतितीच पण वर्ग जास्त व्यापक झाला. या वर्गात वैदिक, शीख, जैन, बौद्ध, आर्यसमाजी, ब्राह्मोसमाजी इत्यादि सर्व पंथीयांचा समावेश होतो. हे सर्व पंथ आर्य नसले तरी हिंदु आहेत.

अयोध्या, मथुरा, माया (हरिद्वार), काशी, कांची, अवंतिका (उज्जैन), द्वारावती (द्वारका), रामेश्वर हीं हिंदूंचीं पवित्र तीर्थक्षेत्रें देशाच्या सर्व भागांत ठिकठिकाणीं विखुरलेलीं आहेत. त्याचप्रमाणें श्रीमत् आद्य शंकराचार्यांनीं चार दिशांना स्थापन केलेले चार मठ—उत्तरेंत बद्रिकेदार येथील ज्योतिर्मठ, पश्चिमेकडील द्वारका येथील शारदा मठ, पूर्वेकडील पुरी येथील गोवर्धन मठ आणि दक्षिणेकडील म्हैसूरमधील शृंगेरी मठ— हीं हिंदूंमधील एकत्वाचीं प्रतीकें आहेत. जे. रॅम्से मॅक्डोनल्ड यांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, "हिंदुस्थान व हिंदुत्व शरीर व आत्मा यांप्रमाणें एकमेकांशीं एकरूप आहेत." (India and Hindustan are organically related as body and soul).

(२) **भारताचीं विविध नांवें**—माणसांत ज्याप्रमाणें राम, गोविंद, माधव, लीला, मालती अशीं विशेष नांवें ठेविलेलीं असतात त्याप्रमाणें पुणें, मुंबई, कानपूर, पेशावर अशीं गांवांचीं व चीन, जपान, रशिया, इंग्लंड अशीं देशांचींही नावें ठेवलेलीं असतात. या नांवांना आपण विशेष नांवें म्हणतों; कारण हीं नांवें विशेष ओळख करून देण्यासाठीं ठेविलेलीं असतात. निरनिराळया संस्कृतींचे लोक आपल्या नांवातही आपली संस्कृति कायम राखीत असतात; जसें, ख्रिश्चन संस्कृतीचे लोक जॉन, वुइल्यम, मेरी अशीं नांवें ठेवितात. इस्लामी संस्कृतीचे लोक महंमद, इस्माईल अशीं नावें ठेवितात. हिंदु संस्कृतीचे लोक वर सांगितल्याप्रमाणें राम, कृष्ण इत्यादि नांवें ठेवितात. आपला धर्म,संस्कृति, परंपरा इत्यादींची कायम ओळख राहावी हा नामकरणांतील उद्देश असतो. देशांच्या व गांवांच्या नामकरणालाही हाच नियम लावितात. इंग्लंडमधून अमेरिकेंत वसाहती स्थापन करण्यासाठीं गेलेल्या लोकांनीं आपल्या वसाहतींना न्यू इंग्लंड, व्हर्जिनिया अशीं स्वतःच्या संस्कृतीचीं निदर्शक नांवें अगदीं अलीकडच्या काळांतही

9066

दिलेली आढळतात. त्याच्याही अलीकडे यावयाचें झाल्यास चालू महायुद्धांत जपानानें जिंकलेल्या सिंगापूरचें शूनान नांव ठेवल्याचें उदाहरण अगदीं ताजें व वरील वृताचें स्पष्ट द्योतक आहे. हाच प्रकार अतिप्राचीन काळीं आपल्या देशाच्या बाबतींत घडला आहे.

आपल्या देशाला ' आर्यावर्त ', ' ब्रम्हावर्त किंवा ब्रम्हर्षिदेश ', ' भारत ', ' हिंदुस्थान ' अशी वेगवेगळीं नांवें वेगवेगळ्या काळांत ठेवण्यांत आलीं आहेत. हीं सर्व नांवें आर्य संस्कृतीचीं निदर्शक आहेत. आर्यांनीं जेव्हां प्रथम पंजाबांत वसाहत केली तेव्हां त्यांनीं त्या वसाहतीला ' ब्रम्हावर्त ' म्हणजे ' श्रेष्ठ लोकांचें वसतिस्थान ' असें नांव दिलें. पुढें ते गंगेच्या खोऱ्यांत गेले. त्या प्रदेशाला त्यांनीं ' ब्रम्हर्षिदेश ' असें नांव दिलें. पुढें त्यांच्या वसाहतीचा विस्तार वाढत वाढत आर्यांनीं सर्व उत्तर हिंदुस्थान व्यापलें व या वसाहतीला ते ' आर्यावर्त ' म्हणूं लागले. आर्यांचा दक्षिणेंत प्रवेश बराच उशिरां झाला. ते या दक्षिणेकडील प्रदेशाला ' दक्षिणदेश ' असेंच म्हणत. कालांतरानें आर्य संस्कृतीचा प्रसार अखिल हिंदुस्थानभर झाला आणि यापुढील ' भारत ', ' हिंदुस्थान ' हीं नांवें सबंध देशाला दिलीं गेलीं.

**हा देश भारत कोणामुळें** ?:—पुराणग्रंथमूलक असा समज आहे कीं, दुष्यन्त व शकुन्तला यांचा पुत्र जो भरत तो या देशाचा सार्वभौम राजा झाला. आणि त्यावरून या देशास ' भारत ' हें नांव पडलें. या भरताचा संबंध महाभारतकारांनीं कुरुकुलाशीं लाविला आहे. आणि कुरूंच्या घराण्यांतील यादवीच्या कान्यास 'महाभारत' व यादवीस 'भारतीय युद्ध' असें नांव आज प्रचलित आहे. या भरताचे अनुगामी ते भारत व त्यांचा हा देश असें मानण्याची एक प्रथा आहे.

ऋग्वेदांतही भरत नांवाच्या लोकांचा उल्लेख आहे. आप्री सूक्तांत भारती नांवाच्या देवीचा उल्लेख आहे. ही देवी भरतांच्या कुळाचें संरक्षण करणारी कुलदेवता. ऋग्वेदांत दाशराज्ञयुद्ध नांवाच्या एका महायुद्धाचें वर्णन आहे. या युद्धांत भाग घेतलेले राजा दिवोदास व त्याचा पुत्र सुदास हे भरतांचे

नेते. त्यांना या युद्धांत विजय मिळाला व त्यांचें राज्य अखिल भरतखण्डावर पसरलें. म्हणूनही या देशाला 'भारतवर्ष' हें नांव प्राप्त झालें असावें असें दुसरें मत आहे.

या दोहोंपैकीं कोणतेंही मत खरें मानलें तरी आपल्या मुख्य समजुतीला कोठेंच बाध येत नाहीं. हा देश आर्यांचा, हा आपला मुख्य मुद्दा. कारण, आर्यांनीं या भूमीला देशपणाचा साज दिला. भरताचे अनुगामी भारत किंवा ऋग्वेदांतील भरत हे दोघेही आर्यच होते. त्यामुळें हा देश भारतांचा किंवा भरतांचा असला तरी तो आर्यांचाच होय.

हिंदुस्थान हें नांव बरेंच अलीकडचें आहे. हिंदूंचें स्थान तें हिंदुस्थान अशी या नांवाची सरळ व्युत्पत्ति आहे. हिंदु या शब्दाला अर्थ व इतिहास असून हा शब्द एका संस्कृतीचा निदर्शक आहे. हा शब्द केवळ एका विशिष्ट जातीचा वाचक आहे अशी समजूत करून कांहीं लोक 'हिंदीस्तान' असें या देशाचें नांव ठेवूं पाहात आहेत. परंतु वरील सर्व विवेचनावरून त्यांची काय चूक होते आहे हें ध्यानांत येईल. तसेंच इंग्रजांनीं 'इंडस्' वरून 'इंडिया' असें अपभ्रष्ट नांव या देशाला दिलें आहे तेंही आपल्या देशाच्या राष्ट्रीयत्वाला बाध आणणारें असल्यामुळें आपणास मान्य नाहीं.

( ४ ) **आर्यांचें मूळ वसतिस्थान:**—वेदकालीन मानवी संस्कृतीचें ज्ञान करून देणारीं प्रत्यक्ष प्रमाणें सांपडणें बरेंच कठिण आहे. मानवी प्रगतीचे जे पूर्वपाषाणयुग, नवपाषाणयुग इत्यादि कालखंड पडतात त्यांत आर्य वंशच प्रगत झाला हें विद्वानांनीं सिद्ध केलें आहे. परंतु हें सर्व त्यांनीं तर्कांच्या व अनुमानाच्या आधारानें केलें. या तर्कशास्त्राच्या जोरावर त्यांनीं आर्यांच्या मूळ वसतिस्थानाविषयीं मोठी मनोरंजक माहिती दिली आहे.

प्रथमत: शास्त्रज्ञांनीं आर्य संस्कृतीच्या विकासाचे दोन कालविभाग कल्पिले. ( १ ) आर्य वंशाचे सर्व लोक एकत्र राहात होते तो काल. त्यास 'मूलगृहकाल' असें म्हणतात. ( २ ) कालांतरानें आर्यांच्या शाखा निरनिराळ्या दिशांना पसरल्या तो काल, त्याला 'वसाहतींचा काल' असें म्हणतां येईल.

अतिप्राचीन काळीं केव्हां तरी सर्वच आर्यवंशीय लोक एकत्र राहात

होते. ग्रीक, ट्यूटन, आर्याणी ( इराणी ), भारतीय वगैरे सर्व संस्कृति आर्य संस्कृतीच्याच कन्यका आहेत. आर्यांचा प्रमाणग्रंथ 'ऋग्वेद' व इराण्यांचा 'अवेस्ता' यांत भरपूर साम्य आढळतें. युरोपांतील प्राचीन ग्रीक व लॅटिन भाषांशीं संस्कृत भाषेचें शब्दसाम्य व अर्थसाम्यहि आहे. ज्याअर्थी ऋग्वेद हा अतिप्राचीन म्हणजे इतिहासालाही ज्ञात नसलेल्या काळांत रचिला गेलेला असल्याचें सर्व पण्डित मान्य करितात त्याअर्थीं त्याच ग्रंथाचें अनुकरण व अनुवाद इतरांनीं केला हें स्पष्ट होतें. सारांश जगांतील पहिला मानव आर्य होता व याच आर्य मानवाच्या निरनिराळ्या शाखा निरनिराळ्या भूप्रदेशांत वसाहत करून राहिल्या आणि आज त्या निरनिराळ्या संस्कृतींच्या घटक म्हणून ओळखिल्या जात असल्या तरी त्यांचें मूळचें स्थान एकच होते.

या मूळच्या स्थानाबद्दल मात्र भिन्न मतें आहेत.

( अ ) कै. लोकमान्य टिळकांनीं वेदग्रंथांचा अतिशय सूक्ष्म अभ्यास करून 'The Aretic Home in the Vedes' हा अमोलिक ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. या ग्रंथांत त्यांनीं आर्य मूळचे उत्तर ध्रुवाकडे राहाणारे होते असा तर्क केला आहे. आपल्या मताच्या पुष्टचर्थ त्यांनीं असें विवेचन केलें आहे कीं, आर्यांचा मूळ ग्रंथ ऋग्वेद हा ते हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच रचिला गेला आहे. त्यांत अनेक ठिकाणीं उषःकालाचीं वर्णनें आहेत त्यावरून आर्यांना उषःकालाचें विशेष कुतूहल वाटत असावें असें दिसतें व असा दुर्मिळ देखावा फक्त उत्तर ध्रुवाच्या बाजूलाच शक्य आहे. तेव्हां आर्य मूळ तेथें होते व कालांतरानें ते दक्षिणेकडे सरकत सरकत मध्य आशियापर्यंत आले. पुढें त्यांच्या अनेक टोळ्या होऊन त्यांतील कांहीं इकडे आल्या.

( आ ) दुसरें मत लॅथॅम, व्हिटने इत्यादि पाश्चिमात्य लेखकांचें. त्यांच्या मताप्रमाणें आर्य मूळचे मध्य युरोपांतील रहिवासी होत. याला पुरावा म्हणून ते लॅटिन् व ग्रीक भाषांचें संस्कृत भाषेशीं साधर्म्य असल्यामुळें संस्कृताची उत्पत्ति त्या भाषांपासून झालेली आहे असें विधान करितात.

( इ ) सुप्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्ते मॅक्समुलर यांनीं हिंदुस्थानांतील व

जगांतील प्राचीन धर्मग्रंथांचें अध्ययन करून व विशेषतः ऋग्वेदावरून आर्यांचें मूळ वसतिस्थान मध्य आशिया होय असें मानिलें आहे.

( ई ) या तीनही मतांहून अगदीं भिन्न व रूढ मतांना धक्का देणारें असें चवथें मत श्री. नारायणराव भवानराव पावगी यांचें आहे. तें असें कीं, मानवोत्पत्तीला भूशास्त्रदृष्ट्या आर्यावर्त हीच भूमि अधिक योग्य असल्यामुळें याच भूमींत आर्यांची मूळ वसाहत असणें अगदीं स्वाभाविक आहे.

यांपैकीं कोणतेंच मत ग्राह्य किंवा अग्राह्य ठरविणें हें फार अवघड काम आहे. निर्णायक मत जोंपर्यंत सिद्ध झालें नाहीं तोंपर्यंत आर्य या देशांत बाहेरून आले हेंच रूढ मत सर्वसामान्य लोक मानतात; आणि हें मान्य केल्यानंतर साहाजिकच त्यांच्या आगमनापूर्वीं येथें कोण लोक राहात होते हा प्रश्न उद्भवतो. इतिहाससंशोधकांनीं अनुमानानें ठरविलेल्या क्रमाप्रमाणें आपणही या लोकांची थोडक्यांत ओळख करून घेऊं.

**( ५ ) भारतीय मानववंशः—**

**( अ ) आदिद्रवीड किंवा कोलः—**तुम्ही भिल्ल पाहिला असेलच. कसा काळाकभिन्न आणि आडदांड दिसतो ! डोळे लालभडक, चेहेरा उग्र, कातडी राकट आणि पेहेराव जंगली. शिक्षणाचा गंध नाहीं, कपडालत्ता माहीत नाहीं; कच्चें मांस व कंदमुळें हा आहार; दऱ्या-खोरीं व दाट जंगलांतील गुहा हीं यांचीं घरें; हिंस्र पशूंची शिकार करणें हा त्यांचा धंदा; त्यांची सर्वच तऱ्हा रानटी. आपल्या देशांतील पहिला माणूस हाच असें कांहीं इतिहासकार मानतात.

सातपुडा, विंध्य व सह्य या पर्वतांच्या कडेकपाऱ्यांत हे भिल्ल राहातात. बंगालामध्यें व हिमालयाच्या पायथ्याशीं राहाणारें गोंड, संताळ वगैरे लोक, ओरिसांतील मुंडा व आसाममधील नाग लोक हे सर्व रानटी लोक भारतीय आदिवंशाचे असावेत असा समज आहे. यांनाच पुष्कळ इतिहासकार ‘ आदिद्रवीड ’ किंवा ‘ कोल ’ असें म्हणतात. हे सर्व लोक अतिशय शूर, धाडसी व लढवय्ये आहेत. ब्राह्मणाला जसें यज्ञोपवित तसा यांना तिरकमठा. यांची नेमबाजी अगदीं अचूक असते.

आपण त्यांना मागासलेले म्हणतों कारण ते आपल्या दृष्टीनें सुसंस्कृत नाहींत, त्यांची संस्कृति श्रेष्ठ दर्जाची नाहीं. परंतु आपणास आश्चर्य वाटेल कीं, एके काळीं या लोकांचीं राज्यें होतीं. मराठी राज्यांत भिल्लांना वतनें दिलेलीं होतीं. आपल्या वतनावरील हक्क प्रस्थापित करण्यासाठीं उमांजी नाईकानें ब्रिटिशांविरुद्ध केवढें प्रचंड बंड केलें ! अलीकडे या सर्व वन्य जातींत झपा-ट्यानें सुधारणा होत आहे. अल्पकालांतच हे सर्व लोक आपल्यासारख्या सुसंस्कृत स्थितिप्रत येऊन पोहोंचतील अशी आशा करूं या.

( **आ** ) **द्रवीड**:—एखादा माणूस मद्रासी आहे हें त्याच्या पेहेरावा-वरून व चेहेऱ्यावरून आपण ओळखूं शकतों. तो द्रवीड आहे. तामीळ, मल्यॉळी, कानडी, तेलगू, कोडगू, तुळू, कुरुख, गोंडी इत्यादि भाषा बोल-णारे दक्षिणापथांतील लोक द्रावीड संस्कृतीचे म्हणून ओळखिले जातात. या द्रावीड संस्कृतीच्या लोकांनीं एका काळीं सर्व दक्षिण हिंदुस्थान, सीलोन व हिंदुस्थानाच्या वायव्येकडील प्रदेश व्यापिला होता. द्रवीड लोकांची वस्ती हिंदु-स्थानांत किती काळ आहे तें नक्की माहिती नाहीं. तथापि आर्य लोक इकडे येण्यापूर्वीं ते बराच काळ येथें राहिलेले होते असें एक प्रबळ मत आहे. आर्यांनीं उत्तर हिंदुस्थान व्यापिल्यावर द्रवीड दक्षिणेंत आले. आर्यांनी हळूहळू सबंध देश व्यापिला परंतु त्यांनीं द्रविडांचा संहार न करितां उलट त्यांना आपल्या समा-जांत समाविष्ट करून घेतलें. द्रावीड संस्कृतीचा आर्य संस्कृतीशीं संयोग जितक्या उत्तम तऱ्हेनें झाला तितका दुसऱ्या कोणत्याही संस्कृतीचा दुसऱ्या एखाद्या संस्कृतीशीं झाला नाहीं. आर्य संस्कृतीचें हें एक वैशिष्ट्यपूर्ण भूषण आहे.

द्रवीड लोकही हिंदुस्थानांतील मूळचे लोक नव्हते, आर्यांप्रमाणें तेही उपरेच असावेत असा इतिहासकारांचा समज आहे. बहुधा ते भूमध्य समुद्राच्या आसमंतातील प्रदेशांतून इकडे आले असावेत. सर्व देशभर जरी ते पसरलेले असले तरी दक्षिणेंत त्यांचा वावर अधिक. त्यांच्यांत पुष्कळच सुधारणा झाल्या आहेत आणि आर्यांचा सहवास हा त्यांना व देशाला हितावह ठरला आहे असा या इतिहासकारांचा निष्कर्ष आहे. केवळ भाषाभिन्नत्वामुळें आर्यांपासून कांहींसे निराळे वाटतात. वास्तविक त्यांनीं आपल्या वाङ्मयांत संस्कृत शब्दांचा

बऱ्याच मोठ्या प्रमाणांत वापर केला आहे; इतकेंच नव्हे तर नम्माळवार यानें रचिलेल्या द्राविड वेदांत चारी वेदांतील ऋचांचें तामीळ भाषेंत भाषांतर केलें आहे. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं हिंदुस्थानांतील द्रावीड संस्कृतीवर आर्य संस्कृतीचा चांगलाच पगडा बसला होता. द्रवीड लोक राम-कृष्णादि आर्य देवतांचेच उपासक; मूर्तिपूजा, यज्ञयाग, होमहवनादि विधि वगैरे धार्मिक आचार हे लोक आर्यांप्रमाणेंच पाळीत आले आहेत. प्रेतपिशाच्चांच्या भजनीं न लागतां पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश या पंचमहाभूतांची ते पूजा करितात. त्याचप्रमाणें पाषाण, वृक्ष, सर्प, सूर्य, वरुण व अग्नि यांचीही ते उपासना करितात.

हे लोक कृष्णवर्णी, बुटके, बसक्या नाकाचे व कुरूप चेहेऱ्याचे असून शांत स्वभावाचे व उद्योगप्रिय आहेत. शेती व व्यापार हे त्यांचे मुख्य धंदे होत. व्यापारांत त्यांनीं केलेली प्रगति विस्मयजनक होती. कालिकत, सुरत, भडोच इत्यादि बंदरांतून जगांतील दूरदूच्या देशांशीं—इराण, अरबस्तान, चीन, इ०— त्यांचा फार मोठा व्यापार चाले. लोखंड, सोनें, रुपें, तांबें, इ० धातूंचा उपयोग त्यांना माहीत होता. या धातूंपासून ते सुंदर भांडीं बनवीत व त्यावर नक्षीकामही करीत. नदीस धरण बांधून पाणी अडविणें व कोरड्या जमिनीला पाणी पुरविणें त्यांस अवगत होतें. नौका बांधणें व परदेशीं प्रवास व व्यापार करणेंही त्यांना चांगलें माहीत होतें. त्यांनीं गावें व शहरें वसविलीं असून राजा, महाराजा यांच्या नेतृत्वाखालीं सुधारलेली त्यांची राज्यपद्धति होती. या सर्व सुधारणा आर्य छापाच्या होत्या हें विसरतां येणार नाहीं. तरीपण अद्याप बरेचसे जुने आचार त्यांनीं कायम राखले आहेत.

**( ई ) आर्य:—उत्पत्ति :**

आर्यांच्या उत्पत्तिकाळाविषयीं अनेक मतें आहेत. ऋग्वेद ह्या आर्यांच्या प्राचीनतम ग्रंथावरून आर्य संस्कृतीची ओळख होते. पण ऋग्वेदाचाच काळ जेथें अनिश्चित आहे तेथें ते रचणाऱ्या आर्यांच्या उत्पत्तीचा काळ कसा कळणार ? श्री. अविनाशचंद्र दास आपल्या ‘ वेदिक इंडिया ’ या ग्रंथामध्यें ऋग्वेदरचनेचा काळ इ. स. पू. २५००० मानतात तर मॅक्सम्युलरसारखे पाश्चात्य विद्वान तो इ. स. पू. १२०० इतका अलीकडे आणतात. हीं दोन्ही

मतें ग्राह्य मानलीं जात नाहींत. मॅक्सम्युलरचें मत तर अनेक विद्वानांनीं चुकीचें ठरविलें आहे. भारतीय युद्धाचा काळ इ. स. पू. ३१०१ हा निश्चित् केला गेला आहे ( चिं. वि. वैद्य ). वेदरचना भारतीय युद्धाच्या अगोदरची असल्यामुळें कै. लोकमान्य टिळक ऋग्वेदरचनेचा काळ इ. स. पू. ४००० च्या सुमारास असावा असें मानतात तेंच अधिक सयुक्तिक आहे. अर्थात् आर्यांच्या उत्पत्तीचा काळ या काळाच्या कित्येक शतकें आधींचा असला पाहिजे हें उघड आहे. तसेंच भारतांत त्यांचा प्रवेश केव्हां झाला हेंही अनिश्चित आहे.

**वर्णनः—** आर्यांचें चित्रही तुम्ही पाहिलेलें असेल. आदिद्रवीड व द्रवीड लोकांहून किती सुरेख आहे हा ! बांधा उंच, नाक सरळ, डोळे सतेज व काळेभोर, वर्ण शुभ्र, अंगपिंड मजबूत आणि एकंदर याचें स्वरूप देखणें आहे. श्रेष्ठ संस्कृतीची छाप त्याच्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसते. राहणी अत्यंत टापटिपीची नि सुव्यवस्थित, आहार सात्त्विक व जीवनसत्त्वपूर्ण, आचारविचार आणि रीतिभाति नमुनेदार, अतिशय उच्च असा बौद्धिक दर्जा अशा तऱ्हेची सर्वांगीण उन्नति झालेली अशी ही श्रेष्ठ मानवजाति स्वयंप्रकाशित तर आहेच परंतु आपल्या तेजाकिरणांची फांक या अन्धःकारमय जगतांत पाडून सर्वत्र सुसंस्कृतता, सुविद्यता आणि सौजन्य निर्माण करणारी म्हणून अखिल मानवजातीची हितकर्ती ठरली आहे. आर्य म्हणजे मानवतेचें पूर्ण विकसित स्वरूप. श्रेष्ठतम बुद्धिमत्ता व सतेज अंगकांति यांमुळें त्यांचें जेतेपद विशेष झळकतें. आर्य विद्वान, शूर सत्यप्रिय व धर्मनिष्ठ होते. भारतांत त्यांच्या अनेक टोळ्या आल्या. येथील मूळच्या लोकांशीं त्यांना कांहीं काळ झगडावें लागलें. येथील मूळच्या लोकांना ते ‘ अनार्य ’ किंवा ‘ दस्यु ’ ( दास ) असें म्हणत. त्यांच्याशीं झुंजत त्यांना पलीकडे रेटीत त्यांनीं आपल्या वसाहती पंजाबांत व गंगा-यमुनांच्या कांठच्या प्रदेशांत स्थापन केल्या. येथील लोकांना पुढें त्यांनीं आपल्या मृदुतेनें जिंकून आपल्यांत सामील करून घेतलें. अशा तऱ्हेनें पुढें जात जात त्यांनीं अखिल भरतखण्ड व्यापलें. अशा ह्या श्रेष्ठ लोकांची विशेष विस्तृत माहिती आपण कालखण्डशः पुढील प्रकरणांत पाहूं.

**उतारे**:– अ ( १ ) " तो मनुष्य हिंदु होय कीं, जो सिंधूनदीपासून तों समुद्रापर्यंत पसरलेल्या देशाला आपली ' पितृभू ' मानतो; नि जाति सारखें आक्रमण करीत करीत व विस्तार पावत पावत, जें जें अंतर्भूत झालें तें तें पचवीत आणि जें जें पचविलें त्याला त्याला महनीय स्वरूप देत, अखेर ' हिंदुजाति ' म्हणून जगांत प्रसिद्ध झाली व ज्या जातीच्या उत्पत्तिचा धागा थेट वेदकालीन सप्तसिंधूशीं जाऊन पोंहोंचतो, त्या जातीचें रक्त ज्यांच्या अंगांत खेळत आहे ; मुख्यतः संस्कृत भाषेंत जी आविष्कृत केली गेली व जी एक इतिहास, एक वाङमय, एक कला, एक शिल्पशास्त्र, एक कायदा, एक धर्मशास्त्र, एक आचार, एक संस्कार, एक तऱ्हेचीं क्रियाकर्में व विधिनियम, समान उत्सव आणि समान यात्रा यांच्या समुच्चयानें जी बनली गेली आहे, अशी या ' हिंदुजातीची, संस्कृति जो स्वतःची मानतो; आणि जो या सर्वांवर या भूमीला ' पुण्यभू ' समजतो; तिच्यांत आपले तत्त्ववेत्ते व ऋषी, अवतार व धर्मगुरु उत्पन्न झाले असें मानतो व हीच माझी पुण्यभूमि व तीर्थभूमि आहे अशी निष्ठा ठेवितो तो तो ' हिंदु ' होतो. "

श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांच्या ' नवा हिंदुधर्म ' या पुस्तकावरून.

( २ ) भाषा साम्याची उदाहरणें—

| संस्कृत | लॅटिन् | झेंद | ग्रीक | इंग्रजी |
|---|---|---|---|---|
| पितृ | पेटर | पितर | पतिर | फादर |
| मातृ | मेटर | मातर | मीतिर | मदर |
| सुनुः | सिनुः | हुनुः | — | सन् |
| केन्द्र | — | — | — | सेंटर |
| हार्दिक | — | — | — | हार्टिली |

आ **थोडक्यांत**:– ( १ ) भाग्यभू भारताचे खरे वारसदार हिंदूच होत.

( २ ) जो या भरतभूमीला पितृभू व पुण्यभू मानतो तोच हिंदू.

( ३ ) पार्शी, इराणी, अरब वगैरे लोकांनीं ' हिंदू ' शब्दाचा उल्लेख आपल्या वाङ्मयांत प्रथम केला. सप्तसिंधूचें अपभ्रष्ट रूप हप्तहिंदु, सप्तसिंधू म्हणजे भारत. भारतांत राहाणारे ते हिंदु.

(४) अखिल हिंदूंत संस्कृति एकच आहे. एक देश, एक भाषा, एक इतिहास, एक धर्म, एक परंपरा हीं राष्ट्राचीं लक्षणें हिंदुराष्ट्र कल्पनेची पूर्तता करण्यास सिद्ध आहेत.

(५) या देशाचीं 'ब्रह्मावर्त,' 'ब्रह्मर्षिदेश,' 'आर्यावर्त,' 'हिंदुस्थान' हीं नामाभिधानें आर्यांचा वारसाहक्क सिद्ध करतात.

(६) आर्यांच्या मूलवसतिस्थानासंबंधीं चार मतें:—

(अ) लोकमान्य टिळक — उत्तर ध्रुवाजवळील प्रदेश.

(ब) लॅथॅम, व्हिटने इ. — मध्य युरोप.

(क) मॅक्समुल्लर — मध्य आशिया.

(ड) श्री पावगी — हिंदुस्थान.

(७) भारतीय मानववंश

(अ) आदि द्रविड किंवा कोल — रानटी असंस्कृत.

(ब) द्रवीड — आर्य संस्कृतिचा पगडा.

(क) आर्य.

**प्रश्नः**— (१) या भाग्यभू भारताचे खरे वारसदार कोण? त्यांचा वारसाहक्क कसा सिद्ध होतो?

(२) हिंदु कोणास म्हणावे? हिंदूंचें सांस्कृतिक एकत्व सिद्ध करा.

(३) या देशाला कोणतीं नांवें होतीं? त्या नांवावरून काय बोध होतो?

(४) आर्य, द्रवीड याविषयीं सविस्तर माहिती लिहा.

**स्वाध्यायः**—(१) "नवा हिंदुधर्म" — लेखक महादेवशास्त्री दिवेकर

(२) 'आर्यांचा इतिहास' — " श्री. पावगी

(३) 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' विभाग ७–२३

—०—

# प्रकरण ५ वें

## कालखंड का विषयखंड ?

### (१) प्रास्ताविक; (२) भिन्न लेखकांची भिन्न मतें; (३) विषयखंड पाडणेंच श्रेयस्कर.

**प्रास्ताविक**:-हिंदुस्थानला कमीतकमी हजार वर्षांचा अखंड इतिहास आहे. पौर्वात्य व पाश्चात्य राष्ट्रांत हिंदु संस्कृतीला समांतर अशा ग्रीक रोमन मिसरी बॅबिलोनियन इ. संस्कृत्या होऊन गेल्या ही गोष्ट खरी आहे. परंतु या एकाहि संस्कृतीला सुरवातीपासून आजतागायत टिकाव धरण्याचें भाग्य लाभलेलें नाहीं. परचक्राच्या जबरजस्त फटकाऱ्यासरशीं या संस्कृत्या पार जमीनदोस्त होऊन आज त्यांचा मागमूसही उरलेला नाहीं. सुदैवानें हिंदु संस्कृती मात्र याहिपेक्षां जबरदस्त तडाख्यांना तोंड देऊन आजतागायत अमर राहिली आहे.

हिंदुस्थानच्या या दीर्घ व अखंड इतिहासांत धार्मिक, सामाजिक व राजकीय अशीं अनेक स्थित्यंतरें घडून आलीं आहेत. त्यामुळें या देशाच्या इतिहासाचा सलग अभ्यास करण्यापेक्षां त्याचे निरनिराळे कालखंड पाडून अभ्यास करणें जास्त सोईचें आहे. या दृष्टीनें विचार केला तर सामान्यतः हिंदुस्थानच्या इतिहासाचे तीन काखंड पडतात.

**१ ला प्राचीन काल**—अगदीं सुरवातीपासून ते थेट हर्षवर्धनाच्या अंतापर्यंत.

**२ रा मध्ययुगीन काल**— मुसलमानांच्या स्वाऱ्यापासून अफगाण साम्राज्याच्या अंतापर्यंत.

**३ रा अर्वाचीन काल**— मोंगल साम्राज्याच्या स्थापनेपासून आजतागायत.

ठोकळमानानें वरील तीन कालखंड योग्य आहेत परंतु या प्रत्येक

कालखंडाचा स्वतंत्र अभ्यास करूं लागल्यावर असें आढळून येतें कीं या प्रत्येक कालखंडांत अशा कांहीं घटना आहेत कीं ज्यावरून त्या कालखंडाचे उपकालखंडहि पाडतां येतील. उदा० — प्राचीन कालखंडांत वैदिक धर्माच्या, उत्कर्षाचा, बौद्ध धर्माच्या उदयास्ताचा व हिंदूधर्माच्या पुनरुत्थापनाचा असे तीन उपकालखंड मानता येतील.

कालखंड किंवा उपकालखंड पाडतांना कोणती तरी एक महत्त्वाची घटना गृहित धरावी लागते. कोणत्या घटनेला किती महत्त्व द्यावयाचें हा प्रत्येक लेखकाचा स्वतंत्र प्रश्न आहे. त्यामुळें कोणत्याही इतिहासाचे कालखंड किंवा उपकालखंड पाडण्यांत इतिहासकारांचें एकमत झाल्याचें क्वचितच आढळून येतें. ज्या देशांचा इतिहास पूर्ण ज्ञात; विश्वसनीय व आधुनिक साधनांच्या उपयोगामुळें स्पष्ट झालेला आहे त्या इतिहासाच्या बाबतींतही असे मतभेद जेथें आढळून येतात, तेथें हिंदुस्थानच्या अस्पष्ट व बऱ्याच अंशीं अज्ञात असलेल्या प्राचीन इतिहासाच्या बाबतींत इतिहासकारांचें मतैक्य नसल्यास त्यांत आश्चर्य मानण्याचें कांहीं कारण नाहीं.

"हिंदुस्थानचा इतिहास फार दीर्घ असून तो निश्चित करण्यासाठीं लागणाऱ्या साधनांचा अभाव फार आहे; त्यामुळें या देशाचा इतिहास लिहिणाऱ्या लेखकाला बऱ्याच अंशीं अनुमानावर अवलंबून रहावें लागतें. या दृष्टीनें पाहूं गेल्यास मध्ययुगीन व अर्वाचीन कालाची माहिती जमा करण्याची परिस्थिति थोडीफार समाधानकारक आहे. कारण या कालाची माहिती देणारे कागदपत्र, लेख, नाणीं व त्या काळाचें अवशेष बरेच आहेत; पण प्राचीन कालाचा इतिहास पाहूं गेल्यास सर्वच परिस्थिति मोठी निराशाजनक आहे. प्रत्यक्ष लिहिलेले ग्रंथ नाहींत, पाठांतर पद्धतीमुळें मूळच्या वाङ्‌मयांत अनेक दोष शिरलेले आहेत. इतर साधनें फार तुटपुंजीं आहेत. या व अशा सारख्याच इतर कारणांमुळें इतिहासाच्या लेखकांत अनेक मतभेद आढळून येतात. त्याबद्दल कोणासही दोषी धरतां येणार नाहीं. जो तो लेखक सामान्यतः अनुमानावर आपल्या विषयाची उभारणी करणार. अनुमानें चुकीची ठरल्यास विषयाची उभारणीही चुकणार, या दृष्टीनें विचार केल्यास अमका बरोबर व तमका चूक

असें आपणांस खात्रीनें सांगता येणार नाहीं. पुढल्या संशोधनानें मागलें संशोधन खोटें ठरावें असाच प्रकार अनेकवार झाला आहे. तेव्हां प्रामाणिक संशोधकांस व त्यांनीं कष्ट करून मिळविलेल्या माहितीस योग्य तो मान देऊन आपण त्या इतिहासाचें अध्ययन करावयास हवें.

**भिन्न लेखकांचीं भिन्न मतें**:—प्राचीन इतिहास लिहिणाऱ्या लेखकांत श्री. रमेशचंद्र दत्त, श्री. चिंतामणराव वैद्य, श्री. राधाकुमुद मुकर्जी, डॉ. बालकृष्ण, श्री. सत्यनाथ अय्यर व डॉ. व्हिन्सेंट स्मिथ ह्यांची प्रामुख्यानें गणना होते. यांपैकीं प्रत्येकानें आपल्या दृष्टीनें कोणती तरी एक घटना महत्त्वाची धरून त्या आधारानें प्राचीन इतिहासाचे उपकालखंड पाडले आहेत. श्री. रमेशचंद्र दत्तांनीं धार्मिक व इतर वाङ्मयाला महत्त्व देऊन वैदिक काल, महाकाव्य काल, न्याय व तत्त्वज्ञान काल, पुराणकाल इ. उपकालखंड पाडले आहेत. श्री. चिंतामणराव वैद्यांनीं इतिहासाचीं साधनें हें मुख्य सूत्र धरून अति-प्राचीन काल, आर्यबौद्ध काल, हिंदुकाल असे तीन उपकालखंड मानले आहेत. डॉ. बालकृष्णांनीं आपल्या हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत जे कालखंड मानले आहेत ते कांहीं ठिकाणीं कालाला महत्त्व देऊन व कांहीं ठिकाणीं विषयाला महत्त्व देऊन अशा दुहेरी पद्धतीनें मानले आहेत. घटनेला महत्त्व देऊन वेदकाल, आर्यकाल व बौद्धकाल असे तीन काल, व काळाला महत्त्व देऊन राजकीय विभाग अशी त्यांची मांडणी आहे. प्रो. औतुरकरांनीं 'प्राचीन हिंदु साम्राज्य' या पुस्तकांत अतिप्राचीन काळ व प्राचीनकाळ असे दोनच खंड मानले आहेत. हे मानतांना मुख्य सूत्र बहुधा साधनांचा त्रोटकपणा किंवा विपुलता हेंच असावें.

**विषयखंडच पाडणें श्रेयस्कर**:—प्राचीन इतिहासाच्या कालखंडासंबंधीं वर दिलेली भिन्न लेखकांची भिन्न मतें पाहिलीं म्हणजे एक गोष्ट प्रामुख्यानें ध्यानांत येते, व ती म्हणजे कोणत्याहि दोन लेखकांत कालासंबंधीं एकमत नाहीं. प्रत्येक लेखकानें आपल्या स्वतःच्या सोईप्रमाणें कालखंड पाडून घेतले आहेत.

त्यातल्यात्यांत डॉ. बाळकृष्णांनीं प्राचीन इतिहासाची केलेली रचना

जास्त श्रेयस्कर वाटते. कालासंबंधीं मतभेद असणें शक्य आहे. परंतु विषयाची संगतवार माहिती मिळविण्याच्या दृष्टीनें त्यांनीं जी रचना केली आहे ती जास्त सोईची आहे. म्हणून सर्वस्वीं जरी त्यांचें अनुकरण या पुस्तकांत करण्यांत येत नसलें तरी, बऱ्याच अंशीं त्यांनीं केलेल्या रचने प्रमाणें या पुस्तकाची रचना करण्यांत आली आहे.

या दृष्टीनें पुस्तकाचे प्रथम दोन स्वतंत्र विभाग करण्यांत आले आहेत. पहिल्या विभागांत आर्यांच्या सामाजिक, धार्मिक, वैचारिक व सांस्कृतिक जीवनाची माहिती देण्यांत आली असून दुसऱ्या विभागांत त्यांच्या राजकीय जीवनाची व राजकीय घडामोडींची माहिती दिली आहे.

पहिल्या विभागाचे वेदकाल, आर्यकाल व बौद्धकाल असे तीन भाग पाडून त्या प्रत्येकांत त्या विषयाच्या अनुरोधानें येणारी सर्व माहिती देण्यांत आली आहे. असें करतांना कालाचा विचार बाजूस पडला आहे. ही गोष्ट खरी आहे. उदा. वेदकालाची माहिती देतांना वैदिक वाङ्मयाची माहिती संपूर्णपणें एकत्र देण्यांत आली आहे. वास्तविक हें सर्व वाङ्मय एकाच काळीं निर्माण झालेलें नाहीं. मनुस्मृतीचा काळ फारच पुढला म्हणजे इ. स. चें दुसरे शतक आहे. पण असें असूनही प्राचीन वाङ्मयाची एकत्रित माहिती मिळावी या हेतूनें त्या सर्व ग्रंथांची माहिती वैदिक वाङ्मय या विषयाखालीं दिली आहे. शंकराचार्यांचा काल इ. स. ७८८ हा आहे, पण त्यांची माहिती बौद्धधर्माच्या ऱ्हासाची कारण मीमांसा देतांनाच दिली आहे. हें सर्व मुद्दाम करण्याचे कारण इतकेंच कीं, प्राचीन इतिहसांत कालापेक्षां विषयालाच जास्त महत्व आहे. काल थोडाफार पुढें मागें झाल्यास त्यामुळें फारसा घोटाळा होत नाही. पण विषयाची माहिती एकत्रित न मिळाल्यास वाचकाची पंचाईत होते. ही दृष्टी डोळ्यापुढें ठेवून या ग्रंथाची मांडणी करण्यांत आली आहे.

दुसऱ्या विभागांत उत्तरेतील प्रमुख राजघराण्यांची माहिती देण्यांत आली आहे. चंद्रगुप्त, अशोक, समुद्रगुप्त, विक्रमादित्य व हर्ष हें पांच भारतीय सम्राट् होऊन गेले. म्हणून त्यांच्या कर्तबगारीबद्दलच्या माहितीला सर्वांत जास्त प्राधान्य

देण्यांत आलें आहे. या थोर व्यक्तींच्या ज्या विविध घटनांची गुंफण गोंवली गेली आहे. त्या घटनांना दुय्यम स्थान दिलें आहे. अशोकाच्या मृत्यूनंतर व गुप्त घराण्याच्या स्थापनेपर्यंत नांव घेण्यासारखा एकही सम्राट भारतांत झाला नाहीं. म्हणून त्या काळाचे अराजक यवनांचें हिंदुस्थानावरील अक्रमण व आंध्रांचा उत्तर-दिग्विजय असे तीन विभाग केले आहेत. हर्षानंतर उत्तरेंत व दक्षिणेंत झालेल्या घडामोडींना स्वतंत्र स्थान दिलें आहे.

शेवटीं मुद्दाम परिशिष्ट जोडून त्यांत विविध माहिती दिली आहे. प्राचीन काल संपला असला व आज जरी आपण अर्वाचीन युगांत वावरत असलों तरी प्राचीन काळच्या ऋषिमुनींची आठवण करून देणारे विवेकानंदासारखे ऋषि आजही आपल्यांत आहेत. शांतवनांत असलेले गुरूंचे आश्रम मोडून त्या जागीं भव्य शालागृहें उभारलेलीं आज जरी आपणास दिसत असलीं तरी देखील प्राचीन काळच्या गुरुशिष्यांचें तेजस्वी व प्रेमळ जीवन दर्शविणारें गुरुदेव टागोरांचें शांतिनिकेतन आजही अस्तित्त्वांत आहे. आजपर्यंत ही भूमि अखंड व पवित्र राहिली. तिच्या रक्षणार्थ व वैभवार्थ लक्षावधि नरवीरांनीं आपले प्राण वेंचलें; पण त्याच भूमीचें विच्छेदन करण्याचें प्रयत्न सुरू झाले आहेत. या प्रत्येक गोष्टीची माहिती खऱ्या भारतवासीयास असणें आवश्यक आहे; म्हणून राजकीय विचारप्रवाहांत न शिरतां अभ्यासूदृष्टीनें त्यांचा परामर्ष घेतला आहे.

## – थोडक्यांत –

१ हिंदुसंस्कृति फार प्राचीन आहे व अनेक संकटांना तोंड देऊन ती जिवंत राहिली आहे.

२ हिंदुस्थानाच्या इतिहासाची दीर्घता आणि साधनांचा अभाव यांमुळें मतभेदाला जागा जास्त आहे.

३ प्रत्येक लेखकानें आपल्याला योग्य वाटली ती घटना मुख्य धरून इतिहासाचे कालखंड पडले आहेत.

४ प्राचीन इतिहासांत कालाला फारसें महत्त्व नसून विषयाला जास्त महत्त्व असल्यामुळें विषयखंडच पाडणें जास्त श्रेयस्कर आहे.

**प्रश्न**—( १ ) कालखंड पाडण्याची जरूरी काय आहे. ? प्राचीन इतिहासाचे कालखंड पाडण्यांत अडचणी कोणत्या आहेत ?

( २ ) कालखंड कसे पाडतात ? प्राचीन इतिहासाचे कालखंड कोणीं कसे पाडले आहेत ?

( ३ ) कालखंडापेक्षां विषयखंड पाडणें श्रेयस्कर वाटतें का ? कारण ?

**स्वाध्याय**—( १ ) भिन्न लेखकांनीं पाडलेल्या निरनिराळ्या कालखंडांचा नीट काळजीपूर्वक अंभ्यास करा, व प्राचीन इतिहासाची सुरुवात जास्तीत जास्त किती मागें जाईल तें ठरवा.

## प्रकरण ६ वें

# वैदिक काल ( भाग १ ला )

## ( आर्यांच्या वसाहती व राहणी )

**प्रास्ताविकः**—आर्य लोक मूळचे हिंदुस्थानांतले का उत्तर ध्रुव प्रदेशांतले या संबंधींच्या वादाचा विचार आपण मागील प्रकरणांत केला. त्यांपैकीं सामान्यतः प्रचारांत असलेलें लोकमान्य टिळकांचें मत आपण गृहित धरून चालूं या. मूळचे उत्तर ध्रुव-प्रदेशांत असणारे आर्य कालांतरानें दक्षिणेकडे सरकत सरकत हिंदुस्थानाच्या वायव्य हद्दीजवळ आले, व तेथून ते हिंदुस्थानांत शिरले हें मत मान्य केल्यानंतर त्यांनीं आपल्या वसाहतींचा विस्तार कसा केला, त्यांचें जीवन कशा प्रकारचें होतें, त्यांनीं वाङ्मय कोणतें निर्माण केलें वगैरे गोष्टी आपणांस माहीत करून घेतल्या पाहिजेत. ही माहिती वेदांवरून व विशेषतः ऋग्वेदावरून मिळते; म्हणून या कालाला वैदिक काल असें नांव दिलें आहे. ठोकळमानानें हा काळ इ. स. पू. ४५०० पासून इ. स. पू. २०९०—२५०० पर्यंतचा मानला आहे.

**वसाहतींचा विकासः**—उत्तर ध्रुव प्रदेशांतून निघालेलें आर्य क्रमाक्रमानें दक्षिणेस येऊन मध्य आशियांत स्थिर झाले. मध्य आशियापर्यंतचा सर्व मुलुख ओसाड असून तेथें कायम वसति करून राहावें असें लोभनीय कांहींहि नव्हतें. यामुळें तेथील मुक्काम हालवून आर्य पुन्हां दक्षिणेकडे सरकूं लागले. शेवटीं ते सध्यांच्या अफगाणिस्थानांत आले. तेथें त्यांच्यांत फाटाफूट झाली. एक टोळी पश्चिमेस इराणकडे गेली, व दुसरी पूर्वेकडे जाऊन हिंदुस्थानाच्या वायव्य भागांतून या देशांत शिरली. आर्यांच्या या प्रवासांत त्यांचीं बायकामुलें व गुरावासरांचे कळप त्यांच्याबरोबर होतें. असे हें भटके लोक हिंदुस्थानांत शिरल्यावर थोड्याच दिवसांत तें सिंधुनदीच्या कांठीं आले. बारा

महिने दुथडी भरून वाहणारें सिंधु नदीचें तें अफाट पात्र, तिच्या दोन्ही तीरांवर दूरवर पसरलेलीं विस्तीर्ण चराऊ कुरणें, आसमंतात् फळांफुलांनीं नटलेला रमणीय निसर्ग; असलें दृश्य आर्यांनीं आजपर्यंत कोठेंहि पाहिलें नव्हतें, तें पाहिल्यावर त्यांनीं आपली आजपर्यंतची भटकेगिरीची वृत्ती सोडून येथेंच कायम वसति करून राहण्याचा निश्चय केला. सिंधु नदीच्या कांठाकांठानें वसाहती होऊं लागल्या. हिंदुस्थानांत वसाहती करण्यास फार चांगली परिस्थिति आहे या गोष्टीचा वास लागतांच आर्यांच्या इतर अनेक टोळ्या हिंदुस्थानाकडे धांव घेऊं लागल्या. वसाहती वाढत चालल्या तशी मूळची जागा अपुरी पडूं लागली, तेव्हां धाडशी आर्य आणखी पुढें पूर्वेकडे निघाले. त्या भागांत अनार्य व द्रवीड लोक होते. त्यांचे व आर्यांचे झगडे होऊं लागले. परंतु आर्यांच्या सर्वश्रेष्ठ गुणांपुढें इतरांस माघार घ्यावी लागली. याप्रमाणें सिंध, पंजाब, गंगा-यमुनेचें खोरें, बिहार, बंगाल येथपर्यंत आर्य वसाहतींचा विस्तार झाला. उत्तरेकडील वसाहतींचें कार्य पुरें झाल्यावर आर्यांचें लक्ष दक्षिणेकडे गेलें, पण तें ऋग्वेदकाळीं नव्हे. आर्यकालीं अगस्तिमुनींनीं आर्यांना दक्षिणेचें द्वार मोकळें करून दिलें.

आर्यांच्या वसाहतीसंबंधींचें वर दिलेलें मत सर्वसाधारणपणें मान्य केलें जातें.पण या मताला विरोधी अशीं दोन महत्त्वाचीं मतें आहेत. पहिलें मत रा. काशीकर यांनीं आपल्या 'ऋग्वेदकालीन सांस्कृतिक इतिहास' या पुस्तकांत मांडलें आहे. त्यांच्या मताप्रमाणें आर्य पंजाबांत येऊन सर्व स्थिरस्थावर झाल्यानंतर अनार्यांशीं लढण्याचा कंटाळा व यज्ञयागांतील हिंसा या दोन मुद्यांवर त्यांच्यांत फाटाफूट होऊन एक पक्ष परत माघारीं इराणाकडे निघून गेला. हेच इराणी लोक होत. या गोष्टीला पुरावा भाषेचा. वैदिक संस्कृत भाषा व इराणी लोकांची झेंद भाषा यांमध्यें व्याकरण व शब्दकोश या दृष्टींनीं बरेंच साम्य आहे. याशिवाय आर्य व इराणी देवतांतही बरेंच साम्य आढळून येतें. वैदिक यम, मित्र, सोम इत्यादि आर्य देवतांचीं इराणी स्वरूपें अनुक्रमें यिम, मिथ्र, हओम हीं आहेत. वैदिक व पारशी धर्मातील यज्ञपद्धति एकच आहे. सोमयाग दोन्ही

धर्मांत प्रचलित आहे. आर्यांप्रमाणें इराणी लोकांतही उपनयन-विधी आहेत. आपल्या जानव्याप्रमाणें इराणी लोक ' कोश्ती ' घालतात. या सर्व समान गोष्टींचा अर्थ एकच आहे व तो म्हणजे आर्य व इराणी लोकांचा संबंध फार जवळचा आहे. रा. काशीकरांच्या मताप्रमाणें तो संबंध आर्यच पुन्हा माघारीं इराणांत गेल्यामुळें आलेला आहे.

भारताचार्य चिंतामणराव वैद्यांनीं ' महाभारताचा उपसंहार ' या पुस्तकांत दुसरें मत दिलें आहे. ऋग्वेदांत वारंवार येणारें ' भरत ' हें नांव सूर्यवंशीय आर्यांचें आहे. या सूर्यवंशीय आर्यांचीं राज्यें पंजाबापासून पूर्वेस अयोध्येपर्यंत पसरलेलीं होतीं. ऋग्वेदांत चंद्रवंशीयांच्या मूळ उत्पादकांचींही नांवें आहेत. हे क्षत्रिय आर्य असून अग्नीचे उपासक होते. ते तिबेटाकडून गंगेच्या खोऱ्यांत प्रथम आले व तेथून सरस्वतीच्या तीरावर येऊन त्यांनीं कायम वसति केली. सूर्यवंशीय व चंद्रवंशीय आर्यांत अनेक लढाया झाल्या. त्यांतील महत्त्वाचें युद्ध म्हणजें परुष्णी ( रावी ) नदीच्या कांठीं झालेलें ' दाशराज्ञयुद्ध ' होय. त्यांत सूर्यवंशीय आर्यांचा पराभव थोडक्यांत टळला. चंद्रवंशीय आर्यांचा मूळ पुरुष पुरुरवा. त्याच्या आईचें नांव इला. हिमालयाच्या उत्तरेकडील प्रदेशास इलावर्ष म्हणतात. या गोष्टीवरून चंद्रवंशीय आर्य तिबेटाकडून गंगेच्या खोऱ्यांत आले या विधानास पुष्टी मिळते. सूर्यवंशीय आर्यांवर विजय मिळवितां न आल्यामुळें चंद्रवंशीय आर्य सरस्वतीच्या तीरावरून गंगायमुनेच्या किनाऱ्यानें दक्षिणेस पसरले. चंद्रवंशीय आर्य वर्णानें काळसर असून मल्लविद्येचे उपासक होते. त्यांची भाषाही सूर्यवंशीय आर्यांपेक्षां निराळी होती. भाषाशास्त्र, शीर्ष-मापनशास्त्र इ. शास्त्रांच्या आधारानें दोन्ही वंशांतील भिन्नत्व सिद्ध झालें आहे. त्यावरून वसाहतींचें कार्य एकाच लोकांकडून झालेलें नसून भिन्न टोळ्यांकडून व भिन्न दिशेनें झालें असलें पाहिजे असें अनुमान निघतें.

वरील मतांच्या चर्चेंत शिरण्याचें आपणांस कारण नाहीं. नेहमींच्या रूढ मतांशिवाय हीं दोन महत्त्वाचीं मतें आहेत एवढेंच आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे. मात्र या विवेचनांत आर्यांनीं कोठें व केव्हां वसाहती केल्या याचा उल्लेख नाहीं. प्राचीन वाङ्मय चाळीत असतांना आर्यांच्या वसाहतींसंबंधीं

जो उल्लेख येतो त्यावरून मिळणारी माहिती संकलित करून खालीं दिली आहे. त्यावरून आर्यांच्या वसाहतींसंबंधींची सुस्पष्ट व संगतवार कल्पना येईल.

गांधार–कंदाहार, सुराष्ट्र–काठेवाड, कांबोज–काश्मीर, गुर्जर–गुजराथ, पांचाल–पंजाब, मालवदेश–माळवा, अंग–उत्तर बंगाल, देवराष्ट्र–महाराष्ट्र, वंग–दक्षिण बंगाल, कामरूप–आसाम, मरुदेश–सिंध-रजपुताना.

## आर्यांची राहणी

**आर्यांची शरीरयष्टी:**—आर्य मनुष्य शरीरानें उंच व धिप्पाड दिसे. त्याचा वर्ण गोरा असून डोळे काळेभोर असत, नाक सरळ व चिंचोळें असे. डोक्यावर विपुल केंस असत. वाणी शुध्द व स्पष्ट असे. हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच्या आर्यांचें हें वर्णन आहे. हिंदुस्थानांत आल्यावर आर्यांचें हें शुद्ध स्वरूप टिकूं शकलें नाहीं. कारण येथें आल्यावर त्यांचा द्रवीड लोकांशीं संबंध आला. द्रवीड कन्यकांबरोबर विवाह केल्यामुळें त्यांच्या संततींत दोन्ही वर्णांचें मिश्रण झालें. विशेषतः गंगायमुनेच्या खोऱ्यांत वसाहती करणाऱ्या आर्यांत हें प्रमाण जास्त होतें. याचें कारण तेथें द्रवीड लोकांची वसति जास्त होती. सिंधु नदीच्या कांठीं वसाहत करणाऱ्या मूळच्या वसाहतवाल्यांवर द्रवीड लोकांशीं देवाणघेवाण करण्याचा प्रसंगच आला नव्हता, त्यामुळें त्या भागांतील आर्यांचें शुद्ध स्वरूप टिकून राहूं शकलें. यामुळें पंजाब, राजपुताना या भागांतच फक्त शुद्ध आर्य रक्ताचे लोक सांपडूं शकतात.

**आर्यांचीं घरें:**—ऋग्वेदांत घर या अर्थीं गृह, दम, पस्त्या व हर्म्य असे शब्द आढळतात. त्यांपैकीं पस्त्या व हर्म्य म्हणजे घराला लागूनच गुरें बांधण्यासाठीं जे सोपे तयार केलेले असत ते. घराला पुढें व मागें असे दोन दरवाजे असत. घरांत अनेक विभाग म्हणजे खोल्या असत. प्रत्येक आर्यांच्या घरांत प्रज्वलित अग्नीसाठीं कुंड असे. घरें बांधण्याकडे दगडाचा उपयोग फारसा केला जात नसे. प्रारंभीं घरांची रचना फार साधी होती. भिंजाऱ्यांऐवजीं दारें पट्ट्यांनीं बांधीत. सर्वसाधारण घरें जरी लहान होतीं तरी, कांहीं ठिकाणीं घरें तीन मजली व भव्य असल्याचा उल्लेख आहे. द्रवीड लोकांशीं संबंध

आल्यानंतर आर्यांच्या गृहरचनेंत फरक पडला. द्रवीड लोक या बाबतींत जास्त पुढारलेले होते हे मोहेंजोदारोच्या उत्खननावरून सिद्ध झालें आहे. घरें बांधण्याकडे विटांचा उपयोग या वेळेपासून पुढें चालू झाला. अशीं अनेक घरें मिळून एक खेडें होत असे. प्रत्येक खेड्याला संरक्षणासाठीं सभोंवार कुंपण घातलेलें असे. आर्यांच्या वसतिस्थानांना अनार्यांपासून नेहमींच भीति असे. त्यांच्या हल्ल्यापासून रक्षण व्हावें म्हणून मैदानांनाही तटबंदी करीत व त्यांवरही हल्ला करणें कठिण व्हावें म्हणून बाहेर खंदक खणीत.

**आर्यांचा आहारः**–ऋग्वेदांत वारंवार येणारा यव शब्द सर्व धान्याला लागू पडतो. ऋग्वेदांत तांदुळाचा व गव्हाचा उल्लेख नाहीं. यावरून तीं दोन्ही धान्यें त्यावेळच्या आर्यांच्या खाण्यांत नसावींत असें अनुमान निघतें. धाना, तीळ, सातु, इ. धान्यें प्रचारांत होतीं. धान्य प्रथम चाळणीनें चाळून, जात्यानें दळून किंवा दगडांनीं कुटून त्याचें पीठ करीत व तें दुधांत कालवून त्याची भाकरी बनवून ती भाजून खात. जेवणांत दूध, दहीं, तूप, इ. जिन्नसांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जाई. दूध घुसळून त्याचें ताक करीत. ताक करण्यासाठीं 'मन्था' म्हणजे रवी वापरीत. फळें व भाजीपाला यांचाही जेवणांत उपयोग करण्यांत येई. अन्न शिजविण्यासाठीं ज्या भांड्यांचा उपयोग करीत त्यांना 'पचन' म्हणत. 'पात्र' म्हणजे खऱ्या अर्थानें पाणी पिण्याचें भांडें. भांडीं तांब्याचीं, लोखंडाचीं, लांकडाचीं किंवा मातीचीं असत. आर्य मांसाहारही करीत. कांहीं विशेषप्रसंगीं मांस खाण्याचा प्रघात होता. बैलाचें, रेड्याचें मांस खात. घोड्याचें मांस मात्र खात नसत. मांस भाजून शिजवून खात. ऋग्वेदांत मिठाचा उल्लेख नाहीं, यावरून मीठ खाण्याचा प्रघात नसावा असें वाटतें. पेयांमध्यें दुधालाच जास्त प्राधान्य होतें. सोमपान म्हणजे दारू पिणें रूढ होतें. सोमवेलीच्या रसापासून दारू तयार करीत व ती दुधांत मिसळून पीत. धान्यापासूनही दारू तयार होत असे. मात्र ती लोंकरीच्या वस्त्रांतून गाळल्यानंतर पीत असत.

**आर्यांची कुटुंब-व्यवस्थाः**–'नना' व 'तत' हीं आईबापांना

लावण्यांत येणारीं लाडकीं नांवें आहेत. पितापुत्रांचा संबंध प्रेमळ असे. लहान वयांत मुलांवर पित्याची सत्ता चालत असे, पण मुलगा वयांत आल्यावर बाप त्याच्यावर घरची जबाबदारी सोंपवीत असे. थोरल्या मुलाची पत्नी हीच घराची स्वामिनी मानण्यांत येई. सामान्यतः एकत्र-कुटुंब-पद्धति अंमलांत होती. तीन पिढ्यांपर्यंत एकत्र राहात असत. कुटुंबांतील मंडळी विभक्त होण्याच्या वेळीं उत्पन्नाच्या वांटण्या होत. गृहकर्में पार पाडण्याची जबाबदारी थोरल्या मुलावर असल्यामुळें त्याला उत्पन्नांत थोडा जास्त वांटा मिळे. शारीरिक व्यंग असल्यास किंवा मिळकत संभाळण्याची लायकी नसल्यास मिळकतींत वांटा मिळत नसे. परंतु अशा अपात्र माणसाच्या पोषणाची जबाबदारी इतरांवर असे. अशा माणसांची संतति अव्यंग निपजल्यास तिला तिचा वांटा मिळत असे. अविवाहित मुलीला मिळकतींत वांटा मिळूं शके. निपुत्रिकाची मिळकत मुलीच्या मुलाकडे जात असे. दत्तक घेण्याचा अधिकार स्त्रियांस होता. गृहाची अन्तर्व्यवस्था व मुलांचें संगोपन हीं स्त्रीचीं मुख्य कर्तव्यें मानण्यांत येत असत. याशिवाय दळणें. विणणें, शिवणें इ. कामें स्त्रियाच करीत.

**आर्य स्त्रियांची स्थितिः**—विवाहापूर्वीं स्त्री पित्याच्या किंवा तो नसल्यास ज्येष्ठ बंधूच्या ताब्यांत असे. विवाह झाल्यावर तिच्यावर फक्त पतीचाच हक्क असे. विवाहित स्त्रीला गृहस्वामिनीचा मान मिळे. यज्ञप्रसंगीं पतीबरोबर तिचा अधिकार चालत असे. पतीचे मातापितर, धाकटीं भावंडें, नोकरचाकर हे तिच्या अधिकारक्षेत्रांत येत. स्त्रिया सुशिक्षित होत्या. मुलांबरोबर मुलींनाही शिक्षण मिळे. विवाह न करतां आपलें जीवन आध्यात्मिक विचारांत घालवावयाचें एकाद्या स्त्रीनें मनांत आणलें तर, तिला तशी परवानगी मिळत असे. ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांच्या कर्त्या स्त्रिया आहेत यावरून त्यांचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें. लोपशा, घोषा, इंद्राणि, विश्वावार इ. मंत्ररचना करणाऱ्या स्त्रियांचीं नांवें ऋग्वेदांत आढळतात. स्त्रिया केवळ बौद्धिक बाबतींतच पुरुषांची बरोबरी करीत असत असें नव्हे. त्या युद्धांत सामील होत, सारथ्य करीत व प्रसंगीं प्रत्यक्ष युद्धही करीत. गोषाची पद्धत नव्हती. समारंभ-प्रसंगीं त्या पुरुषांच्या बरोबरीनें

समाजांत वावरत. वेश्याव्यवसाय होता, पण त्याचें प्रमाण फारच अल्प होतें. सतीची चाल अस्तित्वांत नव्हती. विधवा स्त्रियांना पुनर्विवाहाची परवानगी होती.

**आर्यांचे विवाह-विधि.**—विवाहाच्या बाबतींत एकपत्नीत्व व बहुपत्नीत्व असे दोन्ही प्रकार होते पण बहुपत्नीत्वाची चाल राजे, क्षत्रिय व श्रीमंत लोक यांतच फक्त रूढ होती. एका स्त्रीनें अनेक पती करण्याची चाल ऋग्वेदकाळीं तरी नव्हती. विवाह संस्था धार्मिक व अतिशय पवित्र मानली जात असे. विवाह हा देवतांनीं सांगितलेला विधि असून वंश राखणें हा त्याचा हेतु आहे अशी आर्यांची कल्पना होती. पुत्र देण्याविषयीं वारंवार प्रार्थना केलेल्या ऋग्वेदांत आढळतात. मुलीबद्दल कोठेंहि किंवा कोणीही प्रार्थना केलेली नाहीं, कारण त्या परधन मानण्यांत येत. स्त्रीला आपला पति निवडण्याचें स्वातंत्र्य होतें. प्रौढ वयांतच मुलामुलींचे विवाह होत. लग्न करण्याबद्दल स्त्रीवर जरी सक्ती नव्हती तरी विवाह करून पतिगृहीं जाणें हेंच स्त्रीचें खरें कर्तव्य समजण्यांत येई. हुंडा-पद्धति आजच्या स्वरूपांत नव्हती. वधू किंवा वर यांपैकीं ज्या कोणाची बाजू या ना त्या दृष्टीनें कमी असेल तो विरुद्ध बाजूस हुंडा देई, मात्र तो द्रव्याच्या स्वरूपांत नसून गोधनांत असे. ज्या पित्याला सर्व मुलीच असत तो आपल्या ज्येष्ठ मुलीचा विवाह ठरवितांना तिचा पहिला मुलगा तिनें आपणास दत्तक दिला पाहिजे अशी अट घालीत असे. विवाहसमारंभ वधूगृहीं मोठ्या थाटानें साजरा होई. वरपक्षाच्या सन्मानार्थ गोमांसाची मेजवानी होत असे. विवाह-विधि अग्नीला साक्ष ठेवून करीत असत. समारंभानंतर पिता आपल्या मुलीला पतीच्या घरीं पाठवीत असे. पतिपत्नी मोठ्या समारंभानें गृहप्रवेश करीत.

**आर्यांची शिक्षणपद्धति**:— ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिक आर्यांस शिक्षणाचा अधिकार होता. ब्राह्मण मुलाला वयाच्या पांचव्या वर्षी व इतरांस वयाच्या आठव्या वर्षी उपनयन-विधि करून गुरुगृहीं शिक्षणासाठीं पाठविण्यांत येई. तेथें तो बारा वर्षे शिक्षण घेई. शिक्षणांत मुख्य स्थान धर्माला

असून इतर व्यवसायांचें ज्ञानही गुरुगृहींच मिळत असे. शिक्षण देण्याकरितां गुरूनें कांहीं द्रव्य वगैरे घेण्याची पद्धति नव्हती. गुरूच्या घरीं असतांना शिष्याला सर्व प्रकारचीं कामें करावीं लागत. गुरूच्या घरीं गरीब, श्रीमंत, सामान्य व राजपुत्र असा कोणत्याहि प्रकारचा भेद नव्हता. गुरुशिष्याचें नातें अत्यंत प्रेमाचें असून गुरु शिष्याला आपल्या पोटच्या मुलाप्रमाणें वागवी. मुलींनाही गुरुगृहीं शिक्षण मिळत असे. मुलांप्रमाणें मुलींची मुंज करून त्यांस शिक्षणासाठीं गुरुगृहीं पाठविल्याचे उल्लेख प्राचीन ग्रंथांत आहेत. सर्व शिक्षण संपल्यावर गुरूच्या परवानगीनें व गुरूचा आशीर्वाद घेऊन मुलगा पुन्हा स्वगृहीं जाई. जातांना तो आपल्या कुंवतीप्रमाणें गुरुदक्षिणा देई. त्या बाबतींत कोणावर कधींच सक्ती केली जात नसे. या दक्षिणांतून व राजे लोकांनीं दिलेल्या उत्पन्नांतून गुरूचा चरितार्थ चालत असे.

## — थोडक्यांत —

**वसाहतींचा विकास**:–सामान्य मत–ध्रुवप्रदेशाकडून निघालेले आर्य हिंदुस्थानाच्या वायव्य भागांतून सिंधुनदीच्या कांठीं आले व तेथून हळूहळू पूर्वेस पसरले.

विरोधी मतें–( १ ) पंजाबांत आल्यावर आर्यांत फाटाफूट होऊन एक टोळी इराणांत गेली. ( २ ) वायव्येकडून कांहीं व तिबेटाकडून कांहीं अशा भिन्न टोळ्या हिंदुस्थानांत आल्या.

**आर्यांची राहणी**:––शरीरयष्टी उंच व धिप्पाड, गौरवर्ण, तीक्ष्ण डोळे, शुद्ध भाषा, बुद्धिमान.

घरें–प्रारंभीं साधीं; घरांना व गांवांना रक्षणाची सोय.

आहार–शाकाहार व मांसाहार, दूधदुभतें, सोमपान.

कुटुंबव्यवस्था–पिता मुख्य; एकत्र-कुटुंब-पद्धति; हक्क.

स्त्रियांची स्थिति–स्त्रिया शिकलेल्या, गृहकृत्यांत दक्ष; पुरुषांच्याबरोबर हक्क.

विवाह-विधि–मुलांस जास्त मान; हुंडा-पद्धति–विवाह संस्कार.

शिक्षण पद्धति—गुरुगृहीं १२ वर्षे अध्ययन—सर्व विद्यांचे ज्ञान मिळे.

**प्रश्न:**—( १ ) आर्यांच्या वसाहतींच्या विकासाविषयींची तुम्हांस माहीत असलेलीं भिन्न मतें द्या.

( २ ) खालील गोष्टींविषयीं थोडक्यांत माहिती द्या—
आर्यांचीं घरें, कुटुंब-व्यवस्था, स्त्रियांची स्थिति, शिक्षणपद्धति.

**स्वाध्याय:**—( १ ) हिंदुस्थानाचा नकाशा काढून त्यांत आर्यांच्या वसाहतींचीं नावें भरा.

( २ ) प्राचीन काळच्या कुटुंब-व्यवस्थेचे, विवाह-विधींचे व शिक्षण-पद्धतीचे कोणते अवशेष हल्लीं शिल्लक आहेत ते नीट पाहून त्यांची नोंद करून ठेवा.

—०—

## प्रकरण ७ वें

# वैदिककाल ( भाग २ रा )

## ( आर्यांची सामाजिक व राजकीय स्थिति )

( १ ) वर्णव्यवस्था; ( २ ) आश्रम व्यवस्था;

( ३ ) राजकीय स्थिति; ( ४ ) राजकीय व सामाजिक गुन्हे.

**प्रास्ताविकः**—वर्णव्यवस्थेचा उगम कसा झाला यासंबंधीं विद्वान मंडळींनीं अनेक तर्क केलेले आहेत. कांहींचें म्हणणें असें कीं, हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं आर्यांत वर्ण नव्हते. हिंदुस्थानांत आल्यावर नैसर्गिकरीत्या चार वर्णांची उत्पत्ति झाली. पंजाबांत आल्यावर आर्यांचा अनार्यांशीं संबंध आला. वर्ण, भाषा, संस्कृति या दृष्टींनीं अनार्य आर्यांपेक्षां फारच मागासलेले व हीन होते. त्यांपैकीं कांहींनीं आर्यांचें दास्य पत्करिलें. आर्यांनीं त्यांस शूद्र म्हणून आपल्या सेवकवर्गांत सामील करून घेतलें. येथून वर्णव्यवस्थेस सुरुवात झाली. वर्ण म्हणजे रंग. त्यावरून गौर रंगाच्या आर्यांचा एक वर्ण व काळ्या अनार्यांचा दुसरा वर्ण असे दोन वर्ण निर्माण झाले. त्यानंतर अनार्यांशीं झगडा करून वसाहती पुढें रेटणाऱ्या शूर व धीट लोकांचा निराळा वर्ग निर्माण होऊन त्यांस क्षत्रिय हें नांव मिळालें. समाजाचा योगक्षेम शेती, उद्योगधंदे, व्यापार या मार्गानें करणाऱ्यांचा जो वर्ग निर्माण झाला त्यांस वैश्य म्हणूं लागले. यज्ञयागासाठीं, देवतांची आराधना करण्यासाठीं विद्वान लोकांचा वर्ग तयार झाला; तो वर्ग म्हणजे ब्राह्मण होय. याप्रमाणें चातुर्वर्ण्य-पद्धति तयार झाली.

दुसऱ्या विद्वानांचें मत निराळें आहे. ते म्हणतात, आर्य हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच त्यांच्या समाजांत ब्राह्मण व क्षत्रिय असे दोन स्वतंत्र वर्ण निर्माण झाले होते. ब्राह्मणांकडे विद्येचें व क्षत्रियांकडे संरक्षणाचें अशीं स्वतंत्र कामें

देण्यांत आलीं होतीं. हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं आर्य भटक्या वृत्तीचे असल्यामुळें इतर वर्ण निर्माण झाले नाहींत. पुढें पंजाबांत येऊन शेती करूं लागल्यावर वैश्य वर्ण निर्माण झाला. गंगायमुनेच्या खोऱ्यांत शिरल्यावर तेथील मूळच्या लोकांचा व आर्यांचा झगडा उत्पन्न होऊन युद्धांत बंदिवान केलेल्या अनार्यांस आपलें दास्य पत्करण्यास लावून आर्यांनीं चौथा शूद्र वर्ण निर्माण केला. विवाहसंबंध व धंदा यांच्या कडक नियमांमुळें कालांतरानें या व्यवस्थेला जातींचें स्वरूप प्राप्त झालें.

**वर्णव्यवस्था**:–वरील तर्कांपैकीं निश्चित खरा तर्क कोणता हें सांगणें फार कठिण आहे; पण त्यावरून कांहीं गोष्टी मात्र निश्चित समजतात. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य हे तीन आर्यांचे वर्ण होते व हिंदुस्थानांत झालेल्या अनार्यांबरोबरच्या झगड्यांतून चौथा शूद्र वर्ण तयार झाला. आर्यांच्या तिन्ही वर्णांत लग्नाचें किंवा व्यवसायाचें बंधन आरंभीं नव्हतें. क्षत्रियांस निग्रह केल्यास ब्राह्मण होतां येत असे. शूद्रांचें नशीब मात्र कायम झालें होतें. सेवा हाच त्यांचा एकमेव व्यवसाय ठरला होता. त्यांचा वर्ण नीच समजला जात असे. एकूण त्रैवर्णिक आर्यांचा वर्ण जन्मापेक्षां कर्माप्रमाणें ठरत असे. कोणासही समाजसेवेपैकीं कोणतेंही अंग पत्करण्याचा अधिकार होता; व त्यावरून त्याची जात ओळखिली जाई; जन्मावरून नव्हे. खालीं प्रत्येक वर्णाचें काम काय होतें याची माहिती दिली आहे.

**ब्राह्मण**:—ब्राह्मणाचे धंदे एकंदर सहा सांगितले आहेत. पठण-पाठण, यजन-याजन, दान-प्रतिग्रह. यांपैकीं त्याचें आद्य कर्तव्य म्हटलें म्हणजे पठण किंवा अध्ययन. वेद पाठ करून ते जतन करण्याचें काम ब्राह्मणांचें होतें. वेद पाठ करण्याचा अधिकार तिन्ही वर्णांस असूनही ब्राह्मणांनीं तें काम उत्तम रीतिनें केल्यामुळें त्यांस समाजांत मोठेपणा प्राप्त झाला. वेदांबरोबर इतर विद्यांचेंही अध्ययन त्यांस करावें लागत होतें. पाठण किंवा अध्यापन म्हणजे स्वतः मिळविलेलें ज्ञान दुसऱ्यांस शिकविणें. हें काम ब्राह्मणांचें विशिष्ट कर्तव्य म्हणून समजलें जाई. सर्व वर्णांना ब्राह्मण हे गुरु होते. निरनिराळ्या धंद्यांना लागणारें ज्ञानही ब्राह्मण गुरुच देत. अध्ययन व अध्यापन यांत ब्राह्मणांचा बहुतेक वेळ

जात असल्यामुळें त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी इतर लोकांवर, विशेषतः राजे लोकांवर होती. यजन म्हणजे यज्ञ करणें. प्रत्येक गृहस्थाश्रमी ब्राह्मणानें स्वतः घरीं अग्नि ठेवून प्रत्यहीं त्याची पूजा व होम करावा असा नियम होता. वैदिककालीं तरी निदान प्रत्येकाच्या घरीं अग्नि होताच. याजन म्हणजे क्षत्रिय, वैश्य या वर्णाचे जे लोक यज्ञ करतील त्यांच्या यज्ञांत ऋत्विजाचें काम करणें; थोडक्यांत म्हणजे पुरोहिताचें काम करणें. हा अधिकार फक्त ब्राह्मणांसच होता; इतरांस तो नव्हता. प्रतिग्रह म्हणजे दान घेणें. हाही निव्वळ ब्राह्मणांचाच अधिकार आहे. ब्राह्मणांचा चरितार्थ चालण्यासाठीं ही सोय करण्यांत आली होती. समाजांत जे दानधर्म चालत त्यांचा फायदा ब्राह्मणांस मिळत असे. दान स्वतः देणें हेंही ब्राह्मणांचें एक काम होतें. याप्रमाणें अध्ययन करणें, यज्ञ करणें, व दान देणें हीं तीन कर्तव्यें व अध्यापन, याजन व प्रतिग्रह हे तीन अधिकार असे सहा व्यवसाय ब्राह्मणांस करावे लागत असत.

**क्षत्रियः**—वर वर्णन केलेल्या ब्राह्मणाच्या कामांपैकीं अध्ययन-विद्या शिकणें, यजन—यज्ञ करणें व दान देणें हीं तीन कामें क्षत्रियांस मोकळीं असून त्याचें विशिष्ट काम म्हटलें म्हणजे प्रजापालन, प्रजारक्षण व युद्ध हें होतें. यज्ञ करणें, विद्या शिकणें व दान देणें हें जरी क्षत्रियाचें कर्तव्य असलें तरी तें त्याच्या उपजीविकेचें साधन नव्हतें. क्षत्रिय पूर्वकाळीं वेदाध्ययन चांगलें करीत व होमहवनही करीत. परंतु वेदविद्या पुढें हळूहळू कठिण होत गेली; यज्ञाचें स्वरूप क्लिष्ट होत गेलें व त्यामुळें क्षत्रिय या कर्तव्यांत मागें पडले असावेत. पण क्षत्रियाचें मुख्य कर्तव्य जें प्रजापालन व युद्ध करणें तें मात्र त्यांनीं अखंड चालू ठेविलें. शस्त्रधारणाचा धंदा क्षत्रियांनींच चालविला होता. मात्र, संकटप्रसंगीं सर्व जातींनीं शस्त्र धारण करावें असा शास्त्राचा दंडक होता. क्षत्रियांनीं संकटप्रसंगींसुद्धां याचना करूं नये असा कटाक्ष होता. तशीच वेळ आली तर त्यांनीं शेती किंवा गोरक्षण करावें. युद्धाच्या बरोबरीनें क्षत्रियांचें दुसरें कर्तव्य म्हटलें म्हणजे प्रजापालन होय. राज्य करणें हा फक्त क्षत्रियांचाच अधिकार होता. क्षत्रियांशिवाय इतरांस राज्य करण्याचा अधिकार नव्हता. मात्र

सर्व क्षत्रियांस राजपद मिळणें अशक्य होतें. तेव्हां इतर क्षत्रियांना शिपाईगिरीचा धंदा सांगितला होता.

**वैश्यः**—क्षत्रियांप्रमाणेंच वैश्यांनाही ब्राह्मणांच्या कर्तव्यांपैकीं यज्ञ करणें, विद्या शिकणें व दान देणें हीं कर्तव्यें मोकळीं होतीं, परंतु त्यांचीं विशिष्ट कर्तव्यें म्हटलीं म्हणजे कृषि, गोरक्षण व वाणिज्य हीं होत. कृषि म्हणणे शेती, आर्यांच्या वसाहतींची वाढ होत जाऊन सिंधु, गंगा व यमुना या नद्यांच्या सुपीक प्रदेशांवर त्यांची सत्ता स्थापन झाल्यामुळें शेती व गोरक्षण हे दोन धंदे विशेष भरभराटीस आले. जमीन तयार करणें, बीं पेरणें, पिकें काढणें, धान्य गोळा करणें या कामांत वर्षातील सर्व दिवस मोडूं लागले. वैश्यांना हीं कामें सांगितलीं आहेत. त्याचप्रमाणें या सुपीक प्रदेशांत विस्तीर्ण चराऊ कुरणें असल्यामुळें गोरक्षणाचा स्वतंत्र धंदा झाला. आर्यांना मुळांतच जनावरांची आवड होती. आतां त्यांना अनुकूल परिस्थिति मिळाली व शेतीसाठीं त्यांना जनावरांची जरुरीही भासूं लागली. त्यामुळें जनावरांची निगा राखणें हें स्वतंत्र कर्तव्य झालें. शेतीच्या जनावरांत दुभतीं जनावरें व कामाचीं जनावरें असा भेद होता. त्यांची योग्य निगा राखून त्यांचा उपयोग करून घेणें हें वैश्याचें कर्तव्य होतें. त्याचा चरितार्थ कृषि, गोरक्षण व वाणिज्य यांवरच चालत असे. वाणिज्य म्हणजे व्यापार. हिंदुस्थानांत आल्यावर व वसाहतींची वाढ झाल्यावर व्यापार वाढला. आपल्याजवळच्या आवश्यकतेपेक्षां जास्त असलेल्या वस्तू दुसऱ्यास देऊन त्याच्या मोबदल्यांत आपणास हव्या असणाऱ्या वस्तू दुसऱ्याकडून घेणें या सामान्य व्यवहारांतून व्यापार उदयास आला. हें काम वैश्य करीत. त्यापासून त्यांना चांगली प्राप्ति होई. मात्र हे तीन व्यवसाय असे होते कीं, त्यांतच सारा वेळ खर्च होऊन अध्ययन व यज्ञ हे अधिकार असले तरी त्यांकडे लक्ष देण्यास वैश्यांना वेळ मिळत नसे. यामुळें वैश्यवर्ण पुढें कमी प्रतीचा ठरत गेला. शिवाय या तिन्ही कामांत सेवक म्हणून शूद्रांचाही संबंध जास्त येऊं लागल्यामुळें वैश्य हीन ठरूं लागले.

**शूद्रः**—शूद्र वर्णाची उत्पत्ति कशी झाली हें आपण पूर्वींच पाहिलें आहे. हा वर्ण सर्वस्वीं आर्येतरांचाच होता. त्यामुळें आर्यांचीं कर्तव्यें व शूद्रांचीं

कामें अगदीं निराळीं होतीं. विद्या शिकणें, यज्ञ करणें, दान देणें हीं त्रैवर्णिकांचीं कर्तव्यें शूद्रांस संपूर्णपणें बंद होतीं. तिन्ही वर्णांची सेवा हें एकच कर्तव्य त्यांना सांगितलें होतें. ते आर्यांचे दास होते. द्रव्यसंचय करण्यास त्यांस बंदी होती. शूद्रांना पोटभर अन्न घालणें व त्यांना पांघरण्यासाठीं जुनीं वस्त्रें देणें एवढेंच त्यांच्या धन्याचें त्यांच्या बाबतींतलें कर्तव्य होतें. शूद्रांची संख्या वाढल्यानंतर या स्थितींत थोडा बदल झाला असावा. शेती करण्याची त्यांस परवानगी मिळाली असावी. धन मिळविण्याचा अधिकारही त्यामुळें त्यांना प्राप्त झाला असावा. कालांतरानें त्यांस यज्ञ करण्याचीही मुभा मिळाली असावी. मात्र हे यज्ञ, यज्ञीय व्रताचरण न करतां अमंत्रक करावेत असा नियम होता.

**इतर जाती**—या चार वर्णांशिवाय पुढें बऱ्याच कालानंतर एकमेकांच्या संबंधांमुळें ज्या जाती निर्माण झाल्या त्यांना संकर-जाती म्हणतात. त्या प्रत्येक जातीचें स्वतंत्र कर्तव्य सांगितलें आहे. ब्राह्मण स्त्री व क्षत्रिय पति यांपासून झालेली संतति **सूत** होय. या सूतांचे धंदे म्हटले म्हटले राजाचे स्तुतिपाठ गाणें; पुराणें पाठ करून सांगणें; किंवा सारथ्य करणें हे होत. ब्राह्मण स्त्री व वैश्य पति यांपासून झालेली संतति **वैदेह** होय. त्यांचें काम अंतःपुरांतील स्त्रियांचें रक्षण करणें हें होतें. क्षत्रिय स्त्री व वैश्य पति यांच्या संततीस **मागध** म्हणत. त्यांच्याकडे राजाचे स्तुतिपाठ गाणें हें काम होतें. या तिन्ही जाती आर्याआर्यांतील संबंधापासून निर्माण झाल्यामुळें फार हीन समजल्या जात नसत.

परंतु आर्य वर्णाच्या स्त्रियांस शूद्रांपासून जी संतति होई ती अति निंद्य समजण्यांत येत असे. वैश्य स्त्री व शूद्र पति यांच्या संततीस **आयोगव** म्हणत. त्यांचा धंदा सुतारीचा असे. क्षत्रिय स्त्री व शूद्र पति यांची संतति **निषाद**. त्यांचा धंदा मासेमारी हा असे. ब्राह्मण स्त्रीला शूद्रापासून होणारी संतति ही सर्वांत निंद्य व हीन समजत. त्यांस **चांडाळ** म्हणत. त्यांच्याकडे शिरच्छेदादि क्रूर कर्में सोंपविलेलीं असत. त्यांना इतकें निंद्य मानण्यांत येई कीं त्यांची वसति गांवाच्या वेशीबाहेर असे व ते मेलेल्या जनावरांच्या मांसावर आपली उपजीविका करीत.

या हीन जातींच्या एकमेकांतील संबंधापासून आणखी पंधरा जाती निर्माण झाल्या. त्यांच्या हीनतेवरून त्यांचे धंदे व जाती ठरल्या. सैरंध्र, श्वपाक, पुक्कस अशीं त्यांचीं नांवें आहेत. पुढील काळांत जातींची संख्या आणखी वाढली. आजमितीस हिंदुस्थानांत सुमारें ३५० निरनिराळ्या जाती आहेत.

**आश्रमव्यवस्थाः**—ज्याप्रमाणें वर्ण-व्यवस्था हें वैदिक आर्य समाज-पद्धतीचें एक मुख्य अंग आहे, त्याचप्रमाणें आश्रमव्यवस्था हेंही एक त्या समाजाचें महत्त्वाचें अंग आहे वर्ण-व्यवस्थेचा उगम नदीसारखा आहे. मुळांत बोटाएवढी असणारी पाण्याची धार पुढें जशी प्रचंड नदाचें स्वरूप धारण करते, तशी आर्य व आर्येतर या सामान्य भेदांतून उत्पन्न झालेली वर्णव्यवस्था पुढें प्रचंड व अफाट झाली. आश्रमव्यवस्थेचें स्वरूप याच्या अगदींच उलट आहे. उपमा द्यावयाचीच झाली तर आश्रमव्यवस्थेला एकाद्या सरोवराची देतां येईल. मुळांत त्याचें स्वरूप मोठें व रमणीय होतें. परंतु कालांतरानें हें सरोवर आटत जाऊन आज तें जवळ जवळ कोरडें पडलें आहे.

**आश्रमव्यवस्थेचा उगमः**— आश्रमव्यवस्थेचा उगम प्रत्येक व्यक्तीच्या सामान्य जीवनपद्धतींत पाहावयास सांपडतो. बालवयांत विद्यार्जन, तरुण वयांत कुटुंब-व्यवस्था, उतारवयांत समाजसेवा व शेवटच्या दिवसांत सर्वसंगपरित्याग करून परमेश्वर-चिंतन, हेंच सामान्यपणें प्रत्येक व्यक्तीचें जीवन असावें. सामान्य व्यक्तीनें आपल्या मनाप्रमाणें आंखलेल्या या जीवनक्रमास आर्यांनीं रेखीव स्वरूप देऊन जी एक पद्धति तयार केली ती म्हणजेच आश्रमव्यवस्था होय. या व्यवस्थेचा उद्देश प्रत्येक व्यक्तीचें आयुष्य रेखीव, सुसंघटित व सुरळीत चालून त्यास ऐहिक व पारमार्थिक जीवनाचा आनंद मिळवितां यावा. आयुष्याचे चार निरनिराळे भाग करून त्यांस त्यांनीं स्वतंत्र नांवें दिलीं व त्या प्रत्येक भागांत कोणतें कर्म करावयाचें तें सांगून टाकलें. त्याची माहिती खालीं दिली आहे.

**ब्रह्मचर्याश्रमः**—मुलगा सात आठ वर्षांचा झाल्यावर उपनयनविधि होऊन मुलाचा या आश्रमांत प्रवेश होई. येथून पुढें १२ वर्षें किंवा क्वचित् प्रसंगीं जास्त काळ सुद्धां त्यास गुरुगृहीं राहून विद्याभ्यास करावा लागत

असे. वैदिक काळीं अध्यापनाचें कार्य ब्राह्मणांनीं आपल्या शिरावर घेतलेलें असल्यामुळें त्यांच्यापाशींच जाऊन विद्या संपादन करावी लागत असे. प्रत्येक ब्राह्मणाचें घर हें त्या काळींची शाळाच होती, व तेथें जाऊन प्रत्येक जण शिकत असे. प्रत्येक आर्य मुलानें शिक्षण घेतलेंच पाहिजे असा नियम होता; मग तो ब्राह्मण, क्षत्रिय, किंवा वैश्य कोणीही असो. या ठिकाणचें मुख्य शिक्षण धार्मिक असे ही गोष्ट खरी, परंतु वेद विद्येबरोबर इतर विद्याही त्या ठिकाणीं शिकविल्या जात असत. साधारणपणें एकाच गुरूच्या घरीं हें शिक्षण होत असे. त्या ठिकाणच्या शिक्षणाबद्दलची शिस्त कशा प्रकारची होती तें पुढील उताऱ्यावरून ध्यानांत येईल.

" आयुष्याचा पहिला चतुर्थांश ब्रह्मचर्यानें काढावा. धर्मतत्त्वांचें ज्ञान संपादन करीत गुरूपाशीं किंवा गुरूच्या पुत्रापाशीं राहावें. गुरूच्या नंतर निजावें व गुरूच्या पूर्वीं उठावें. घरांतील काय काम करावयाचें असेल तें शिष्यानें करावें. काम झाल्यावर गुरूपाशीं जाऊन अध्ययन करावें. शुचिर्भूत व कार्यदक्ष असावें, गुरूनें भोजन केल्यावांचून आपण भोजन करूं नये. जे गंध किंवा रस ब्रह्मचाऱ्यानें सेवन करावयाचे नाहींत ते त्यानें सेवन करूं नयेत. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मचर्याचे सर्व नियम पाळावेत. "

भोजनाची व्यवस्था गुरुगृहींच होत असे. विद्यार्थी गुरुगृहीं काम करीत असत. बहुतेक ब्राह्मण विद्यार्थी भिक्षा मागत. क्षत्रियास व वैश्यास भिक्षा वर्ज्य होती. पण त्यांना देखील गुरूगृहीं काम करावें लागत असे. गुरूची मर्जी सदैव संभाळावी लागे. कारण शिष्यांना त्याच्या कृपेवांचून विद्या मिळणार नाहीं असा समज व विश्वास रूढ होता. गुरूबद्दल अतिशय आदर दर्शविला जात असे. गुरुपत्नी व गुरुपुत्र यांसही मान द्यावा लागे. शिक्षण चालू असतांना कोणासही घरीं जावयास मिळत नसे. शिक्षणासाठीं किंवा भोजनासाठीं कोणाही विद्यार्थ्यास कांहींही द्यावें लागत नसे. सर्व शिक्षण संपल्यावर, विद्यार्थी आपल्या विषयांत उत्तम तयार झाल्यावर त्यास आपल्या घरीं जाण्याची परवानगी मिळत असे. त्या वेळीं एक समारंभ होत असे त्यास 'समावर्तन' म्हणत. या प्रसंगीं गुरु आपल्या शिष्यांना उपदेश करून घरीं जाण्याची परवानगी देई. विद्यार्थी गुरूचें ऋण

स्मरून त्यांस गुरुदक्षिणा देत. सामान्यतः दोन गाई ही गुरुदक्षिणा ठरलेली असे, पण त्याबाबतींत सक्ति नव्हती. कोणी गरीब शिष्य कांहींच देत नसे, तर कोणी क्षत्रिय शिष्य सर्व राज्य गुरुदक्षिणा म्हणून देत असे. गुरुदक्षिणा देण्यांत विद्यार्थ्यांत मोठी चुरस लागत असे.

प्रत्येक विद्यार्थ्याला निराळा अग्नि ठेवून त्याचें पूजन करावें लागत असे. सकाळ-संध्याकाळ सूर्य, अग्नि व इतर देवता यांचें स्तवन करून तीन वेळां स्नान करावें लागे. क्षत्रियास वेदविद्येशिवाय धनुर्विद्या, राजनीति व दंडनीति यांचें शिक्षण ब्राह्मण गुरुच देई. वैश्यांना वार्ताशास्त्र, शिल्प या विद्यांचें ज्ञान हेच गुरु देत. ज्योतिष, वैद्यक वगैरे निरनिराळ्या विद्या ब्राह्मण प्रथम स्वतः शिकत. व नंतर इतरांस शिकवीत. विद्येंतील प्रावीण्याबद्दल राजाकडून ब्राह्मणांस मोठी दक्षिणा मिळत असे.

**गृहस्थाश्रमः-** शिक्षण संपल्यावर गुरूच्या परवानगीनें या आश्रमाचा स्वीकार करावा असा नियम होता. विवाह करून प्रत्येकानें आपला संसार निराळा मांडून अग्नीची पूजा व अतिथींची सेवा करून कुटुंबाचें पोषण करावें असा या आश्रमाचा मुख्य धर्म सांगितला आहे. या आश्रमासंबंधींचे नियम पुढील उताऱ्यांत आढळून येतात.

" गृहस्थाश्रमी पुरुषानें केव्हांही केवळ आपल्याच उपयोगासाठीं अन्न शिजवूं नये व पशूंची व्यर्थ हिंसा करूं नये. त्यानें दिवसां, पूर्वरात्रीं किंवा उत्तररात्रीं निजूं नये. सकाळ व संध्याकाळ यावांचून भोजन करूं नये. अतिथीचा सदैव सन्मान करावा. यजन, अध्ययन व दान या कर्मांचें आचरण करावें. ब्रम्हचारी व संन्यासी यांस अन्नदान करावें. स्वतंत्र धंदा करून किंवा राजापाशीं याचना करून जें द्रव्य मिळेल त्या द्रव्यांतून कुटुंबपोषण व यज्ञयागादिक क्रिया कराव्यात. "

या आश्रमाच्या पालनानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांची प्राप्ति होते असा समज असल्यामुळें या आश्रमाची थोरवी सर्वांत जास्त आहे. वृद्धापकाळ आल्यानंतर आपल्या पुत्रावर या कौटुंबिक जबाबदारींचा भार टाकून आपण मुक्त व्हावें असा शास्त्राचा आदेश आहे.

**वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम**:—वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम यांचा एकत्रित विचार करण्याचें कारण इतकेंच कीं, वानप्रस्थाश्रम ही संन्यासाश्रमाची पूर्वतयारी होय. संन्यासाश्रमांत सर्वसंगपरित्याग करावा असा आदेश आहे. तो यशस्वीपणें पार पाडतां यावा म्हणून मनाची जी तयारी करावी लागे ती वानप्रस्थाश्रमांत होत असे. गृहस्थाश्रम संपवून व संसार मुलाबाळांच्या स्वाधीन करून मनुष्यानें वनांत जावें. बायको जिवंत असल्यास तिला बरोबर घेऊन जावें, व वनांत राहून चतुर्थाश्रम घेण्याची पूर्वतयारी करावी. हा वानप्रस्थ म्हणजे वनांत प्रस्थित झालेल्या मनुष्याच्या स्थितीचा तिसरा आश्रम होय. आणि याप्रमाणें कांहीं वर्षें देहाचे क्लेश सोसण्यास मन तयार झाल्यावर केवळ परमेश्वर-चिंतन करण्यासाठीं घेतलेला चौथा आश्रम म्हणजे संन्यास होय. संन्यास घेण्याचा अधिकार प्रथम तिन्ही वर्णांस होता. कालांतरानें तो फक्त ब्राह्मण वर्गापुरता मर्यादित झालेला दिसतो. याचें कारण बहुधा त्या आश्रमांत सांगितलेलें कष्टमय कर्म हेंच असावें.

संन्याश्याचीं बाह्य लक्षणें म्हटलीं म्हणजे भगवीं वस्त्रें परिधान करणें, डोकें मुंडन करणें, त्रिदंड धारण करणें व कमंडलु घेणें. संन्याश्याला इतर आश्रमांतील कर्में करण्यास पूर्ण बंदी होती. विशेषतः जर संन्याशी गृहस्थाश्रमी होईल तर तो पतित होईल असें सांगितलें आहे. या आश्रमासंबंधींचे नियम पुढील उताऱ्यांत आढळतील.

" संन्याश्यानें सर्वांशीं सदयतेनें वागावें, सर्व इंद्रियें ताब्यांत ठेवावीं, कोणाजवळ कांहींही न मागतां व स्वतः तयारी करून न शिजवतां, कोणी अन्न आणून दिलें तरच ग्रहण करावें. माध्यान्हकाळापर्यंत जर कांहींच मिळालें नाहीं तर जेथें धूरही येत नाहीं अशा घरीं भिक्षा मागावी. जरुरीपेक्षां अधिक मागूं नये. ओसाड घर, अरण्य, वृक्षाचा तळ, नदीचा तीर अशा एकान्त स्थळीं राहावें. एका ठिकाणीं शक्य तों एकच दिवस मुक्काम करावा. संग्रह मुळींच करूं नये. अहिंसा, ब्रह्मचर्य, सत्य, सरळपणा, अक्रोध, असूया, दम व चहाडी न करणें हीं आठ व्रतें पाळावीं. अन्न व वस्त्र याशिवाय इतर कोणत्याही गोष्टीचा स्वीकार

५

करूं नये. आपण होऊन कोणास उपदेश करूं नये. गतगोष्टींचा शोक करूं नये. ''

वर वर्णन केलेली आश्रमव्यवस्था ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांनाच फक्त लागू होती. त्यांनीं चारी आश्रम पाळलेच पाहिजेत अशी आज्ञा होती. परंतु त्यांचें योग्य पालन करण्यासाठीं मनोनिग्रहाची अत्यंत जरुरी असल्यामुळें प्रारंभीं जरी ही व्यवस्था उत्तम ठरली असली तरी हें सामर्थ्य जसजसें कमी पडत गेलें तसतशी आश्रम-व्यवस्था मोडकळीस आली.

**राजकीय स्थिति:**--आर्यांचीं मुळांत लहान लहान कुटुंबें होतीं. त्यांतूनच पुढें वैदिक राज्यांची उत्पत्ति झाली. राज्यव्यवस्थेंत राजा हा मुख्य सत्ताधारी होता. सामान्यत: राज्य वंशपरंपरेनेंच चाले. कांहीं ठिकाणीं राजा हा समितीकडून निवडला जात असे. राजाचा अधिकार कधींही अनियंत्रित नव्हता. त्याला लोकमताला योग्य तो मान द्यावाच लागे. लोकमत, राष्ट्रसामिति जनसामिति किंवा ग्रामसमिति यांच्या द्वारें प्रगट होत असे. स्वत:च्या राज्याबद्दल लोकांना अतिशय अभिमान वाटत असे. शांततेच्या वेळीं राजा हा प्रजेचा रक्षक व न्यायाधीश असे. विशेषप्रसंगीं लोक राजाला नजराणे देत असत. ठराविक कर देण्याची पद्धति त्या वेळीं रूढ नव्हती. युद्धप्रसंगीं राजा लोकांचा व सैन्याचा मुख्य सेनापति होत असे. प्रजेसाठीं, युद्धांत विजय मिळविण्यासाठीं किंवा आपला पराक्रम जाहीर करण्यासाठीं राजा यज्ञ करीत असे. हा यज्ञ राजा स्वत: न करतां बहुधा आपल्या पुरोहिताकडून करवून घेत असे.

ऋग्वेदकाळांतील आर्यांचीं राज्यें फार लहान होतीं. ग्रामिणी हा ग्रामाचा मुख्य अधिकारी असे. शांततेच्या किंवा युद्धाच्या काळींही सर्व सत्ता त्याच्या हातीं एकवटलेली असे.

राजा हा वंशपरंपरा राज्य चालवीत असे ही गोष्ट खरी आहे; परंतु त्याच्या नेमणुकीला प्रजेची संमति लागत असे. कांहीं ठिकाणीं प्रत्यक्ष प्रजाच आपला राजा निवडीत असे.

राजाचें निवासस्थान इतरांहून अगदीं भिन्न असे. तें अत्यंत रमणीय

व भव्य असे. राजाचे आश्रित राजाजवळ असत व ते राजाची स्तुति करीत. राजाच्या लवाजम्यांत इतरांबरोबर राजघराण्यांतील इतर पुरुष व कांहीं राजे-रजवाडे यांचा समावेश होत असे. युद्धांत मिळालेल्या लुटीचा तो एकटाच मालक नसे, त्या लुटीचे भाग करून ते अधिकारी व सैनिक यांच्यांत वाटण्यांत येत असत. हल्लींच्या कोणत्याही राजाच्या उत्पन्नाची मुख्य बाब म्हटली म्हणजे जमीनमहसूल. ऋग्वेदकाळीं राजाची जमिनीवर मालकी नव्हती, न्यायनिवाड्याचें काम राजाकडेच असे व तें तो सल्लागारांच्या मदतीनें करीत असे. युद्धप्रसंगीं सैन्याचा मुख्य म्हणून सेनापतीची नेमणूक होई व त्याच्या हाताखालीं निर-निराळ्या गांवचे अधिकारी काम पाहात. राजाविषयीं, अधिकाऱ्यांविषयीं किंवा राज्याविषयीं प्रजेंत काय बोलणें चालतें तें समजण्यासाठीं किंवा शत्रूकडील हालचालींची सूक्ष्म माहिती होण्यासाठीं हेरांची व्यवस्था या काळींही होती. सामान्यतः प्रत्येक राज्य स्वतंत्र असे. जवळच्या राज्याशीं सलोखा ठेवण्यापलीकडे एरवीं त्यांचा फारसा संबंध येत नसे. सबंध आर्य जमातीवरच एखादें प्रचंड संकट कोसळल्यास अर्थातच सर्व आर्य राजे एकत्र येत. लहान राज्यांत अधूनमधून कुरबुरी किंवा लहान प्रमाणावर युद्धप्रसंगही होत असत.

राजा हा प्रजेनें निवडलेला असल्यामुळें त्याच्याबद्दल प्रजेच्या अपेक्षा अर्थात जास्त असणार. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलांतील १७३ व्या सूक्तांत या अपेक्षा राज्याभिषेक-प्रसंगीं पुढीलप्रमाणें मांडलेल्या आहेत.

“ हे राजा, आम्हीं तुला उदयाला आणलें आहे. तूं आमचा राजा हो. तूं नित्य व स्थिर राहा. तूं सर्वांचा राजा असावास अशी इच्छा सर्व लोक करोत. राजा, तूं येथेंच अस. च्युत होऊं नकोस. पर्वतासारखा स्थिर राहा. इंद्राप्रमाणें पृथ्वीवर स्थिर राहा व राष्ट्राचें संरक्षण कर.”

“ आकाश, पृथ्वी व पर्वत ज्याप्रमाणें अचल आहेत, त्याप्रमाणें लोकांचा हा राजा कायम टिको. ”

“ वरुण, बृहस्पति, इंद्र व अग्नि तुला राज्यावर स्थिर करोत व तुझें राष्ट्रही स्थिर करोत.”

“ इंद्राच्या कृपेनें सर्व प्रजा तुलाच नजराणे देवोत. ”

वरील उताऱ्यांत राजाचे व प्रजेचे अधिकार यांचें स्वच्छ प्रतिबिंब आपणास पाहावयास सांपडतें.

## राजकीय व सामाजिक गुन्हे

ऋग्वेद्काळीं गरीब व श्रीमंत असा स्पष्ट भेद आर्य समाजांत होता. गरिबांना श्रीमंतांनीं दानधर्म करावा, असा आदेश अनेक ठिकाणीं देण्यांत आला आहे. गुलाम ठेवण्याची पद्धति त्या वेळीं होती. पुरोहितांना दान म्हणून दास देत असत. परंतु गुलामांचा बाजार आस्तित्वांत नव्हता. कर्ज काढण्याची पद्धति या काळीं होती. विशेषतः द्यूत-प्रसंगीं असें कर्ज काढण्याची गरज फार भासत असावी. कर्जाची रक्कम परत न केल्यास कर्जदाराला धनकोचें दास्य स्वीकारावें लागे. कधीं कधीं त्या कर्जाची फेड कर्जदाराच्या बांधवांनीं करावी म्हणून कर्जदारास एका खांबास बांधून ठेवीत व कर्जफेड केल्यानंतर त्यास सोडून देत. कर्जदार व धनको यांत एक मध्यस्थ असे.

चोरी, लबाडी, परस्त्रीशीं संबंध, जादूटोणा हे सामाजिक गुन्हे समजण्यांत येत असत. या गुन्हेगारांना शिक्षा होत असत. चोरी करणाऱ्यांचे अनेक प्रकार ऋग्वेदांत वर्णन केले आहेत. तस्कर म्हणजे दरोडेखोर, स्तेन म्हणजे सामान्य चोर, तायु म्हणजे गुरें चोरणारा चोर, **परिपंथिन** म्हणजे वाटमारी करणारे चोर. या सर्व गुन्हेगारांना खांबाला बांधून ठेवीत. पुढें त्यांना जामीन घेऊन सोडीत, कीं गुन्हा कबूल करीपर्यंत उपाशी ठेवीत, कीं इतर कांहीं शिक्षा करीत याचा उल्लेख कोठेंच आढळत नाहीं.

**उतारे**—"वर्णव्यवस्थेवर आज जोराची टीका होत असली तरी मुळांत जाऊन पाहिलें तर ही संस्था सुरू करण्यांत आर्यांचा सद्हेतूच दिसून येतो. वर्णाची निश्चिति जन्मावर नसून कर्मावर होती, ही गोष्ट ध्यानांत ठेवणें जरूर आहे. त्रैवर्णिक आर्यांस आपला वर्ग बदलतां येत असे, ही गोष्ट ध्यानांत ठेवल्यास वर्णव्यवस्थेला नांवें ठेवणें कठिण जाईल. वर्ण कर्मावरून न ठरतां जन्मावरून ठरूं लागल्यानंतर व जातिसंस्था वाढल्यानंतर वर्ण-व्यवस्थेचा उदो उदो करणें शहाणपणाचें ठरणार नाहीं. अस्पृश्यता हा आज

हिंदुसमाजाला कलंक आहे व तो पुसून टाकणें हें भारताच्या प्रत्येक पुत्राचें परम कर्तव्य आहे. ”

—नवा मानवधर्म

## – थोडक्यांत –

**वर्ण-व्यवस्था**:— उगम, उद्देश, स्वरूप.
ब्राह्मण—अध्ययन, अध्यापन, यजन-याजन, दान-प्रतिग्रह.
क्षत्रिय—रक्षण, युद्ध व प्रजापालन.
वैश्य—कृषि, वाणिज्य, गोरक्षण.
शूद्र—सेवा.

**आश्रम-व्यवस्था**:— उगम, उद्देश, स्वरूप.
ब्रह्मचर्याश्रम—शिक्षण.
गृहस्थाश्रम—कुटुंब पोषण.
वानप्रस्थाश्रम—संसाराच्या जबाबदारींतून मुक्तता—परमेश्वर-चिंतन.
संन्यास—सर्वसंगपरित्याग—ईश्वरभक्ति.

**राजकीय स्थिति**:— राजाचे अधिकार, नियंत्रण, परराष्ट्रांशीं संबंध, राजाविषयीं प्रजेच्या अपेक्षा, राजकीय व सामाजिक गुन्हे.

**प्रश्न**:—( १ ) वर्णव्यवस्थेचे उद्देश, उगम व स्वरूप याबद्दलची माहिती द्या.
( २ ) ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांचीं कामें व अधिकार कोणते ते सांगा.
( ३ ) आर्यांच्या आश्रम-व्यवस्थेविषयीं तुम्हांस काय माहिती आहे ?
( ४ ) प्राचीन काळच्या आर्य राजाचे अधिकार व त्याचे प्रजेशीं असणारे संबंध यांबद्दलच्या कल्पना स्पष्ट करा.

**स्वाध्याय**:—( १ ) वर्ण-व्यवस्थेवर व त्यांत करावयाच्या सुधारणेबद्दल एक छोटा निबंध लिहा.

( २ ) आर्यांची आश्रमव्यवस्था डोळ्यापुढें ठेऊन तुम्हीं आपलें स्वतःचें आयुष्य कसें घालविणार तें ठरवा.

( ३ ) हल्लींच्या राज्यपद्धतींत आढळून येणारे दोष प्राचीन काळीं कसे टाळले होते त्याचें विवेचन करा.

—०—

## प्रकरण ८ वें

# वैदिक काल (भाग ३ रा)

## (आर्यांची धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक स्थिति)

(१) देवता; (३) तत्त्वज्ञान;
(२) यज्ञयाग; (४) उद्योगधंदे;
(५) वाङ्मय, कला व शास्त्रें.

**धार्मिक स्थितिः—**

(१) **देवता**— सृष्टीचीं विविध स्वरूपें पाहून आर्यांना अतिशय आनंद व कुतूहल वाटलें असलें पाहिजे; व त्यांतूनच त्यांच्या देवताविषयक कल्पना निर्माण झाल्या असल्या पाहिजेत. रोज नित्य नियमानें उगवणारा व मावळणारा तेजस्वी सूर्य, सारें विश्व व्यापून टाकणारा प्रभावी मरुत्, पृथ्वीवर आपल्या कृपेचा वर्षाव करून धनधान्याच्या राशी निर्माण करणारा कृपाळू वरुण इत्यादि सृष्टीच्या विविध स्वरूपावर आर्य विचार करूं लागले व त्यांनाच ते देवता मानूं लागले. प्रत्येक देवतेच्या सामर्थ्याविषयीं, कृपेविषयीं सुंदर सूक्तें आर्यांनीं रचिलीं आहेत.

आर्यांच्या सर्व देवतांत त्यांची आवडती देवता म्हणजे **इंद्र.** ऋग्वेदांतील अडीचशेंहून अधिक सूक्तें या देवतेच्या वर्णनाविषयींचीं आहेत. या देवतेची मूळ कल्पना आर्य उत्तर ध्रुवाजवळ होते तेव्हांच सुचली. पुढें आर्य हिंदुस्थानांत आल्यावर या देवतेला राष्ट्रदेवतेचें स्वरूप प्राप्त झालें. त्याचें कारण अनार्यांशीं वारंवार होणारीं युद्धें. इंद्र हा द्यौचा पुत्र आहे अशी कल्पना. त्याला सोमपान अतिशय प्रिय आहे त्यामुळेंच त्याच्या अंगांत वीरश्रीचा संचार होतो.

सोमपानासाठीं आणि युद्धांत साहाय्य करण्यासाठीं इंद्राला नेहमीं आवाहन केलें जातें. पर्जन्यवृष्टीचा उत्पादक तोच आहे. यामुळें पर्जन्याकरतांही त्याची वारंवार प्रार्थना केली जाते.

इंद्राच्या खालोखाल **अग्नि** देवतेला महत्त्व आहे. अग्नि हा देवांचा पुरोहित आहे. देवांना यज्ञस्थलीं आणण्याचें त्याचें काम आहे. तो कुटुंबवत्सल लोकांचा देव आहे. तो त्यांच्या बायका-मुलांचें संरक्षण करितो व कुटुंबाचा उत्कर्ष घडवून आणितो. गृहासंबंधींच्या कोणत्याही संस्कारांत अग्नीची पूजा आणि स्तुति असते. अग्नींत तूप इत्यादि टाकल्यानंतर त्याच्या ज्या प्रचंड ज्वाळा उत्पन्न होतात व धडधडणाऱ्या अग्नीचा जो आवाज निघतो त्यावरून त्याची वृषभाशी किंवा गरुड पक्षाशीं तुलना केलेली आढळते.

अधिकारक्षेत्राचाच विचार केला तर **वरुण** देवतेचा मान बराच मोठा आहे. त्याच्या सामर्थ्यामुळेंच पृथ्वि स्थिर राहाते. सूर्याला आधार देऊन त्याचा मार्ग वरुणानेंच आंखून दिलेला आहे. त्याच्या आज्ञेमुळें चंद्र व तारे आपल्या मार्गानें हिंडतात. दुःखापासून व पापापासून लोकांस मुक्त करून तो त्यांस दीर्घायुषी बनवितो. उंच प्रदेशांत सुवर्ण सिंहासनावर बसून पृथ्वीवर घडणाऱ्या सर्व गोष्टींचें तो निरीक्षण करितो. मनुष्याच्या अंतःकरणांत चाललेले विचारसुद्धां त्याला समजतात. पृथ्वीवरील नीतिमत्तेचा सूत्रधार तोच आहे. त्याचा संबंध समुद्रजलाशीं आहे. सर्व नद्या त्यालाच येऊन मिळतात. या कल्पनांवरूनच पुढें वरुण देवतेला जलदेवतेचें स्वरूप प्राप्त झालें.

**मित्र** ही हिंदी-इराणी देवता आहे. ती फक्त दिवसाची देवता आहे असें पूर्वींच्या भाष्यकारांचें मत आहे. पण अर्वाचीन भाष्यकार मित्र याचा अर्थ कृपाळू सूर्य असाच करितात. मित्र या शब्दावरूनच त्याचा लोकांशीं असलेला स्नेह व्यक्त होतो. मित्र लोकांचें निरीक्षण करितो. लोकांना कर्तव्य-तत्पर करितो. त्यानें घालून दिलेल्या नियमाप्रमाणें वागणाऱ्यांस तो विपुल संपत्ति देतो. त्यानें ज्यांचें रक्षण केलें आहे त्यांना कधींही दुःख प्राप्त होत नाहीं.

**मरुतां**ची संख्या प्रथम सात, नंतर एकवीस व कोठें कोठें तर ती एकशेंऐशी सांगितली आहे. रुद्र हा मरुताचा पिता आहे. इंद्राला साहाय्य करणें,

युद्धांत सदैव त्याच्याच मागोमाग राहाणें हीं त्याचीं प्रमुख कार्यें आहेत. ते स्वच्छ व सूर्यासारखे तेजस्वी आहेत. ते हरीणाप्रमाणें सुंदर व चपळ आहेत. वीराप्रमाणें ते लढाईत घुसतात. त्यांच्या सामर्थ्यापुढें पर्वतदेखील नमतात. आकाशाच्या छतांतून ते पर्जन्यवृष्टि करितात. उत्कृष्ट योद्धे व चांगले घोडे यांची ते आपल्या भक्तांवर खैरात करितात.

ऋग्वेदाचें संपूर्ण नववें मंडल सोम देवतेच्या वर्णनानें भरलें आहे. सोम म्हणजे दारू देणारी वनस्पति. या मंडलांत सोमयागांतील सोमाच्या उपाययोजना, तो तयार करण्याच्या कृति, यांचें वर्णन आलें आहे. पर्वतांतून सोमरस आणणें, पिळणें, गाळणें, भांड्यांत ठेवणें, दुधांत मिसळणें व इंद्राला सोमपानार्थ बोलाविणें इत्यादि कृति त्यांत सांगितल्या आहेत.

**उषा** देवता मूळची कोठली याबद्दल वाद आहे. उषा देवतेचें कार्य फारसें महत्त्वाचें नाहीं पण तिच्यावर रचिलेलीं सूक्तें मात्र अतिशय सुंदर आहेत. ती रथांत बसून येते व सूर्याला आपल्याबरोबर आणते, लोकांना जागे करून कार्यप्रवृत्त करिते, अंधकाराचा नाश करून पृथ्वीला प्रकाश देते, लोकांना आपापल्या उद्योगासाठीं जाण्यास ती मार्ग दाखविते. ती रात्रीची बहीण आहे.

पहिला मृत मनुष्य अशी **यम** देवतेची मूळ कल्पना आहे. ऋग्वेदांत त्याला ‘ राजा ’ म्हटलें आहे. कोणत्याही निसर्गनिर्मित देवतेहून यम हा निराळा आहे. तो आकाशांत राहातो. मृत वीर त्याच्या निवासस्थानांत एकत्रित जमतात. मेलेल्या पितरांची तो काळजी घेतो. एका सुंदर वृक्षाखालीं इतर देवांबरोबर तो सोम पितो. तो प्रेत भक्षण करितो. यज्ञांत त्याचें महत्त्व आहे. अग्नि हा त्याचा मित्र व पुरोहित आहे. मृत्यु हा यमाचा मार्ग आहे. यमाच्या दारावर दोन कुत्रे आहेत ते त्याच्या घराचें रक्षण करितात व लोकांवर लक्ष ठेवितात.

वरील देवतांखेरीज अश्विनौ, रुद्र, द्यौ, सविता, पूषन्, पर्जन्य, वात, अदिति, आप, विश्वेदेव इत्यादि देवतांचीं वर्णनें ऋग्वेदांत आलीं आहेत. येथें सर्वांचें वर्णन देणें शक्य नसल्यामुळें त्यांचा फक्त उल्लेखच केला आहे.

**यज्ञयागः**— देवतांना संतुष्ट करण्याचें आणि देवता व भक्त यांचे

स्नेहसंबंध उत्पन्न करण्याचें साधन म्हणजे यज्ञ. देवतांची आराधना केली असतां त्या भक्तांना कृपाप्रसाद देण्यास तयार असतात. तो कृपाप्रसाद मिळविण्यासाठीं यज्ञयागाची जरुरी आहे. हवि अर्पण करणें हें यज्ञांतील मुख्य कर्म. हवीमध्यें दूध, तूप, धान्य, मांस व सोम या वस्तूंचा समावेश होतो. ऋग्वेदकाळची यज्ञपद्धति साधी होती. मात्र सोमयाग फार क्लिष्ट होता. यज्ञांत ' होता ' हा प्रमुख. तो सूक्तें म्हणत असे किंवा स्वतः तयार करीत असे. ' अध्वर्यु ' हा प्रत्यक्ष स्वतःच्या हातांनीं विधि करीत असे. ' उद्गाता ' हा सामें गात असे. याशिवाय आणखीही मदतनीस असत. सोमयोगांत पुरोहितांना बरीच दक्षिणा मिळत असे. पण हा यज्ञ फार खर्चिक असल्यामुळें फक्त राजे लोक किंवा श्रीमंत लोकच तो करीत.

अश्वमेध व दर्शपूर्णमास हे यज्ञ ऋग्वेदकाळीं होते. यज्ञाचा हेतु देवतांना संतुष्ट करणें. देवतेविषयींची आर्यांची भावना स्नेहस्वरूपाची होती. त्यांच्या आवाहनाला ओ देऊन देव यज्ञाला येत.

ऋग्वेदकाळीं मूर्तिपूजा नव्हती. नदीसूक्तांत नदीपूजेचा उल्लेख आला आहे. सर्वांत सिंधु नदीला मान अधिक. नदीसूक्ताच्या आठव्या मंत्रांत सिंधु नदीकांठींच्या प्रदेशांतील वस्तूंचें सुंदर वर्णन आलें आहे. 'चांगले घोडे, उत्तम रथ, सुंदर वस्त्रें, सुवर्णाचे अलंकार, अन्न, लोंकर उत्पन्न करणारी सिंधु नदी पुण्यशील व सुंदर आहे ' असें सिंधूचें महात्म्य वर्णन केलें आहे. प्राणिपूजा ऋग्वेदांत नाहीं. वृक्षपूजा व पर्वतपूजा फक्त सामान्य लोकांत रूढ असावी.

ऋग्वेदकाळीं मनुष्ययज्ञ प्रचारांत होता किंवा नव्हता याबद्दल वाद आहे. ऋग्वेदांतील पुरुषसूक्तांत पुरुषमेधाची कल्पना आहे. या सूक्तांचा विनियोग पुरुषमेधांत आहे. शुक्ल यजुर्वेदांत १८४ पुरुषांच्या मेधाचें वर्णन आहे. यावरून या काळीं पुरुषमेध प्रचारांत होता असें अनुमान निघतें. पण तो प्रघात आर्य हिंदुस्थानांत येण्यापूर्वींचा आहे का आर्य हिंदुस्थानांत आल्यावरही तो तसाच चालू होता याबद्दल निश्चित मत देतां येत नाहीं. पुरुषमेधाचें जें वर्णन आहे त्याचा अर्थ कांहीं विद्वान असा करितात कीं, अशा पुरुषांचा वध करीत

नसावेत. ते फक्त वधस्तंभांना बांधले जात असावेत व निरनिराळ्या देवतांना औपचारिक अर्पण केल्यानंतर त्यांना मुक्त केलें जात असावें.

**तत्त्वज्ञान**:—वरुण हें नीतीचें अधिदैवत मानलें जात असे. देवता अन्तरिक्षांतून मानवांच्या हालचालींचें निरीक्षण करीत असतात असें वारंवार म्हटलें आहे. योग्य मार्गापासून किंवा कर्तव्यापासून च्युत होणें म्हणजे पाप अशी ऋग्वेदकाळीं कल्पना होती. ठराविक वेळीं उत्पन्न होणाऱ्या निसर्ग-चमत्कारावरून आपलेंही आयुष्य नियमित व सुसूत्र असावें अशी त्यांस इच्छा झाली व त्यांतून नीतिशास्त्राचा उगम झाला.

पाप हें महाभयंकर समजून तें नाहींसें करण्यासाठीं वरुणाची प्रार्थना करण्यांत येई. पापी मनुष्यावर वरुण पाश टाकतो. पाप हें जड ओझ्याप्रमाणें आहे. तें हलकें करण्याचें सामर्थ्य फक्त देवतेंतच आहे. पापाकडे मनुष्याची नैसर्गिक प्रवृत्ति आहे. पापाला मनुष्य एकटाच जबाबदार नसून पूर्वजांनीं केलेलीं पापें पुढील पिढीसही भोगावीं लागतात. पापामुळें परमेश्वर भक्तापासून विभक्त होतो. सुरापान, बहुपत्नीत्व, अनार्यांचा वध, लूट, द्यूत, चोरी, व्यभिचार, अप्रामाणिकपणा, जादूटोणा व मातापितरांचा अवमान इत्यादि गोष्टींची पापांत गणना केली आहे. मनुष्यानें सदैव पापापासून दूर राहून सदाचरण करावें असें वारंवार सांगण्यांत आलें आहे. गरिबाला दान देणें, भुकेल्याला अन्न देणें, सेवकास चांगलें वागविणें, अतिथीला विन्मुख न धाडणें इत्यादि सदाचरणाचे नियम ऋग्वेदांत सांगितलें आहेत.

**पुनर्जन्म**:—ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांत मरणोत्तर जीवनाचा विचार मांडण्यांत आला आहे. सर्व देव अमर आहेत व ते आपल्या पूजकांना अमरत्व देण्यास तयार असतात असें सांगितलें आहे. मनुष्य मेल्यावर त्याचा पार्थिव देह मातींत मिसळून जातो पण आत्मा अमर राहातो. मृताचे पितर त्याच्यासाठीं दुसरें स्थान शोधून ठेवितात. पूषन् हा नवीन आत्म्याला त्याच्या स्थानाकडे नेतो. आत्म्याला प्रथम एक प्रवाह ओलांडावा लागतो. नंतर यमाचे पहारेकरी म्हणून असलेले रुंद नाकाचे, चार डोळ्यांचे, अंगावर ठिपके असलेले दोन कुत्रे ओलांडून तो आपल्या निवासस्थानाकडे जातो. हेंच यमाचें निवासस्थान.

तेथें अखंड प्रकाश, न आटणारें पाणी आनंद व सुख असतें. याच स्थानीं आत्म्यास नवीन देह प्राप्त होतो.

**पितरांबद्दलची भावना:**— अमर देवाप्रमाणेंच परलोकीं गेलेल्या पितरांबद्दल आदर व्यक्त करण्यांत आला आहे. श्राद्धप्रसंगीं यम आणि अग्नि यांच्याबरोबर सर्व पितरांना सोम व हवि सेवन करण्याकरितां पाचारण केलें जातें. हे अमर मृतात्मे आपल्या संततीची काळजी वाहतात व यज्ञप्रसंगीं यजमानास संतति, संपत्ति व आशीर्वाद देतात. कुलाचे, जातीचे व राष्ट्राचे पितर निरनिराळे मानलेले आहेत.

**अधोलोक:**—पापी, दुष्ट, वरुणाच्या आज्ञा मोडणारे अशा लोकांना परलोकीं स्थान नाहीं. त्यांच्या देहाबरोबर त्यांचा आत्माही खोल गर्तेंत जातो. यमाचा दूत म्हणून कपोत हा त्यांना अंधारमय व दुःखमय अशा निवासस्थानीं नेतो. तेथें अधार्मिक, यज्ञ न करणारे, असत्य बोलणारे व आचारहीन असे लोक राहातात.

ऋग्वेदकालीन आर्यांचें तत्त्वज्ञान हें असें आहे. त्यांत निराशावादला कोठेंही स्थान नाहीं. जीवनाविषयीं किंवा कर्माविषयीं कधींही तिरस्कार व्यक्त केलेला नाहीं. एकंदरींत जीवन सुंदर व रमणीय असून तें जगण्यासाठीं दीर्घायुष्य मिळावें अशीच प्रत्येकानें इच्छा व्यक्त केली आहे.

## आर्थिक स्थिति:-

**आर्यांचे उद्योगधंदे:**— मुळांत आर्यांच्या गरजा फार कमी होत्या. सिंधु, गंगा, यमुना या नद्यांच्या कांठींची जमीन अत्यंत सुपीक असल्यामुळें व आर्य लोक स्वतः अत्यंत कल्पक व कष्टाळू असल्यामुळें त्यांना अन्नधान्याची कमतरता कधींच भासली नाहीं. सामान्य गरजा सहजासहजीं भागूं लागल्यानंतर इतर गरजा भासूं लागल्या. पूर्वींच्या शेती व गोपालन या उद्योगांबरोबर इतर उद्योग निर्माण झाले. श्रमविभागाचें तत्त्व अंमलांत येऊन कारागिरांचे अनेक प्रकार उदयास आले. त्यांपैकीं कांहीं उद्योगधंद्यांविषयींची माहिती खालीं दिली आहे.

**गोपालन व शेती:**— शेती व गुरें पाळणें या दोन उद्योगांवर

९०८८ ८७७

आर्यांची उपजीविका मुख्यत. होत असे. परमेश्वरानें पशुधन मुबलक द्यावें म्हणून ते वारंवार प्रार्थना करीत असत. सर्व पशूंत गाय महत्त्वाची मानली जाई कारण तिच्यापासून खाण्याचे अनेक जिन्नस व यज्ञांत देण्याचे हवि तयार होत. गाईच्या कांतड्याला विशेष किंमत असे. नवीन लग्न झालेल्या वधूवरांस गाईचें कांतडें मुद्दाम बसण्यासाठीं देत. दहीं, दारू इत्यादि पदार्थ ठेविण्यासाठीं तिच्या कांतड्याच्या पिशव्या करीत. रथाला छप्पर म्हणून गाईच्या कांतड्याचा उपयोग करीत. गाय हीच आर्यांची मुख्य संपत्ति होती. तिच्या संरक्षणासाठीं 'गोत्र' बांधलेले असत. एकमेकांच्या गाई ओळखूं याव्यात म्हणून गाईचे कान चित्रविचित्र कापीत. शेतीकडे मुख्यतः बैलांचाच उपयोग करीत. ओझ्याच्या गाड्यांना बैल जोडीत. रथाला घोडे जोडीत.

शेतांत खत म्हणून जनावरांच्या शेणाचा उपयोग होत असे. जमीन चांगली नांगरून, कोळपून मग तींत एका पोकळ काठीच्या साहाय्यानें बीं पेरीत. शेताला लागणारें पाणी विहिरींतून काढीत. कांहीं ठिकाणीं पाण्यासाठीं कालवेही काढलेले होते. वर्षांतून साधारणपणें दोन पिकें काढीत. धान्य निघाल्यावर तें स्वच्छ जमिनीवर पसरून बैलांकडून त्याची मळणी होत असे. धाना, सातु, तीळ इत्यादि पेरीत असत.

**सुतारकामः**—सर्व धंद्यांमध्यें लांकूडकाम करणाऱ्या सुताराला अधिक मान मिळत असे. युद्धांत, शर्यतींत व खाजगी उपयोगासाठीं वापरण्यांत येणारे रथ, गाड्या, नावा इत्यादि वस्तु तो तयार करीत असे. लांकूड कापणें, सांधे जोडणें, चाकें कांतणें हीं सर्व कामें सुतार करी. सुताराच्या कामाला केवढा मान दिला जात असे तें खालील उपमेवरून दिसून येईल. "ज्याप्रमाणें सुतार आपलें चाक तयार करितो त्याप्रमाणें आम्हीं ऋषी सूक्तरचना करितों." घरें बांधतांना लागणारें सर्व लांकूडकाम सुतारच करी. झाडाचा बुंधा पोखरून त्याची नाव तयार करीत. नाव चालविण्यासाठीं वल्ह्यांचा उपयोग करीत असत. ऋग्वेदांतील एका सूक्तांत शंभर वल्ह्यांच्या नावेचा उल्लेख आला आहे. पुष्कळ माणसें बसूं शकतील अशी मोठी व डौलदार नाव सुतार बांधूं शकत असे.

**धातुकामः**—सोनें, रुपें, तांबें व लोखंड या धातूंचा शोध आर्यांस ऋग्वेदकाळींच लागला होता. सोनें नदीच्या पात्रांत सांपडे. सिंधु नदीच्या पात्रांत विपुल सोनें मिळत असे. लोखंडापासून पोलाद तयार करून त्याचा व्यवहारांत सार्वत्रिक उपयोग करीत. विशेषतः पोलादाचीं उत्तम शस्त्रें तयार होत. दगडाचींही हत्यारें प्रचारांत होतीं. सुऱ्या, तलवारी, कुऱ्हाडी यासारखीं आयुधें पोलादाचीं व तांब्याचीं असत. तीक्ष्ण धारेचे वस्तरे न्हावी लोक वापरीत.

**विणकामः**—यावेळच्या आर्यांस कापूस व लोंकर या दोन्ही वस्तु माहीत होत्या. त्यांपासून सूत कांतून तें विणण्याची कला त्यांस अवगत होती. विणण्याच्या कलेचा उल्लेख पुढील उपमेंत आढळतो. " ज्याप्रमाणें विणकर उभ्या-आडव्या धाग्यांनीं आपला पट विणतो त्याप्रमाणें परमेश्वर दिवस व रात्र यांच्या साहाय्यानें काल उभारतो. " स्त्री व पुरुष दोघेंही कापड विणण्यांत पटाईत होतीं. सुताचा धागा पट्ट व मजबूत व्हावा म्हणून त्यास खळ लावीत. कपडे शिवीत असल्याचा उल्लेख कोठें आढळत नाहीं. गुंडाळण्याचें व पांघरण्याचें अशीं दोनच वस्त्रें पुरुष वापरीत. याशिवाय इतरही अनेक सुंदर वस्त्रांचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. शिरस्त्राण वापरण्याची पद्धत आर्यांनीं अनार्यांकडून उचलली. ' शिप्रा ' नांवाचें शिरस्त्राण फक्त युद्धप्रसंगीं वापरीत. पादत्राणें वापरीत नसत.

**सुवर्णकारः**—सोन्या-चांदीचे अलंकार सोनार तयार करीत असे. श्रीमंत लोक सोन्या-चांदीचे दागिने वापरीत व गरीब लोक तांब्याचे वापरीत. पायांत घालावयाचीं कडीं, गळ्यांत घालावयाचे हार किंवा माळा, कानांत घालावयाचीं कर्णफुलें इत्यादि दागिने प्रचारांत होते. रत्नांचा अलंकार करण्याकडे उपयोग करीत असत. हिमालय पर्वत व बाल्हिक देश या प्रदेशांत रत्नें सांपडत. मोतीं इतके विपुल होते कीं, घोड्यांच्या गळ्यांत मोत्यांच्याच माळा घालीत. दागदागिन्यांची हौस फक्त स्त्रियांसच होती असें नाहीं; पुरुषही मोठ्या हौसेनें कांहीं दागिने अंगावर घालीत असत.

**व्यापारः**—वस्तु पुष्कळ व चांगल्या निपजूं लागल्यामुळें त्यांची देवघेव वाढून व्यापार सुरू झाला. देशांतला अंतर्गत व्यापार जमिनीवरून किंवा नद्यांतून होत असे. सुमेरिया, ईजिप्त वगैरे बाह्य देशांशीं चालणारा व्यापार

समुद्रमार्गें होत असे; पण तो द्रवीडांच्या ताब्यांत होता. धातु, रत्नें, धान्य व कापड या व्यापाराच्या मुख्य वस्तु असत. वस्तुवस्तूंच्या साहाय्यानें चालणारी देवघेव-पद्धत या काळीं रूढ होती. चलन अजिबात नव्हतें असें नाहीं. देवघेवी-साठीं ' निष्क ' नांवाचें नाणें घेतल्याचा उल्लेख ऋग्वेदांत ऋषीच्या तोंडीं आहे.

**समारोप**:—वर वर्णन केलेले उद्योगधंदे होत. याशिवाय किरकोळ धंदे पुष्कळच होते. सामान्यतः बाप जो धंदा करीत असे तोच मुलगा पुढें चालवीत असे. त्यामुळें कारागिरींतील कौशल्य पिढीजात होऊन बसे. मात्र याचा अर्थ उद्योगस्वातंत्र्य अजिबात नव्हतें असा नाहीं. कारण बापाचा धंदा आवडेल तरच तो करावा अशी सवड होती. उद्योगस्वातंत्र्य किती होतें याची कल्पना खालील मनोरंजक उताऱ्यांत आढळेल.

"...मी एक कवी आहें. माझे वडील वैद्य आहेत, आई कांतड्यांचें काम करिते. गाई जशा गोठ्याकडे धांवतात तसे निरनिराळीं कामें करणारे आम्ही पैशाच्या मागें धांवतों..."

## सांस्कृतिक स्थिति:—

**कला:— गायनकला**:— ऋग्वेदकाळीं संगीत बरेंच प्रचारांत होतें व त्याची प्रगतिही बरीच झाली होती. ऋग्वेदाची रचनाच छंदोबद्ध आहे या एका गोष्टीवरून आर्यांची गानप्रियता व्यक्त होते. सप्त स्वर माहीत होते किंवा नाहीं याबद्दल दुमत आहे. वेबरच्या मताप्रमाणें सप्त स्वरांचा उगम मूळ भारतांत असून तेथून ते इराणांतून पाश्चात्यांच्या कानावर गेले असावेत. कांहीं वाद्येंही या काळांत निर्माण झालीं होतीं. तंतुवाद्य, वायुवाद्य व आघातवाद्य असे वाद्यांचे तीन प्रकार होते. दुंदुभि, वेणु, वीणा, कर्करी हीं वाद्यें प्रचारांत होतीं. गर्गर हे चर्मवाद्य होतें. बकुर हे युद्धाच्या वेळीं वाजविण्याचें वायुवाद्य होतें. बाण हें तंतुवाद्य होतें.

**नृत्यकला**:—समारंभप्रसंगीं किंवा आनंदोत्सवप्रसंगीं लोक एकत्र जमले कीं नृत्यें होत असत. ' नृतू ' असा एक शब्द ऋग्वेदांत आला आहे त्यावरून नृत्यकलेची माहिती मिळते. ' अलंकार घातलेल्या व अभिनय करणाऱ्या

नर्तकीप्रमाणें उषा प्रगट होते, ' असें एका मंत्रांत म्हटलें आहे. नृत्याच्या वेळीं ठेका धरून झांज वाजवीत असत.

**लेखनकला:**– आर्य लोक हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांनीं लिपि शोधलेली नव्हती. मोहेंजोदारोच्या उत्खननांत सांपडलेल्या दगडांवर जी लिपि आहे ती द्रवीडांची आहे. द्रवीडांना आपल्या समाजांत घेतल्यानंतर त्यांच्याकडून आर्य लिपि शिकले असें कांहीं विद्वानांचें मत आहे. ऋग्वेदकाळीं लेखनकला माहीत असली तरी तिचा उपयोग करीत असत किंवा नाहीं याबद्दल कोठेंही उल्लेख नाहीं. वेदमंत्र गुरुकडून शिष्यानें घ्यावयाचे असल्यामुळें लेखनकलेला फारसें महत्त्व नसावें असें वाटतें.

**करमणूक:**– करमणुकीच्या साधनांपैकीं द्यूत हें साधन सार्वत्रिक प्रचारांत होतें. ऋग्वेदांत द्यूतावर एक स्वतंत्र ' द्यूतसूक्त ' आहे. द्यूत खेळण्यांत लोक बेहोष होत व त्यापायीं भांडणें, कर्जबाजारीपणा, निंदा, व्यसन, सर्वनाश इत्यादि अनर्थ ओढवत असत. फांसे खेळतांना फसवेगिरीही चाले. चार फांशांनीं खेळत. विभिदक नांवाच्या वृक्षाच्या फळांचे फांसे तयार करीत.

रथांच्या शर्यती हें मनोरंजनाचें दुसरें साधन होतें. रथांच्या शर्यतींपासून दुहेरी फायदा होत असे. प्रेक्षकांची करमणूक होऊन शिवाय युद्धासाठीं लागणाऱ्या रथकौशल्याचीही वाढ होत असे.

शिकार हें जरा वरच्या दर्जाच्या लोकांचें करमणुकीचें साधन होतें. शिकारीसाठीं धनुष्यबाण, पिंजरे व जाळीं यांचा उपयोग करीत. सिंह, हरीण, डुक्कर, हत्ती, रेडे या प्राण्यांची शिकार निरनिराळ्या प्रकारांनीं करीत. पक्षी पकडण्याची हौस आर्यांना फार होती.

**शास्त्र.– वैद्यकशास्त्र:**–ऋग्वेदकालीन आर्यांना कांहीं रोगासंबंधीं चांगली माहिती झाली होती. यक्ष्मा म्हणजे क्षयरोग, हा फार भयंकर समजण्यांत येत असे. या रोगासंबंधींची भीति वारंवार व्यक्त करण्यांत आली आहे. कावीळ व अति दारू पिण्यामुळें होणाऱ्या रोगाचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. दूषित पाण्यापासून होणाऱ्या शिपद नांवाच्या रोगाची माहिती आर्यांना होती. हे रोग बरे करणारे वैद्य त्या काळीं होते. रोगनाशक अनेक वनस्पति आर्यांना

माहीत असून त्यांचा ते भरपूर उपयोग करीत. औषधांच्या जोडीला प्रार्थना व मंत्रविद्या यांचा उपयोग करीत. विषारी प्राण्यांच्या विषबाधेपासून मुक्त होण्यासाठीं मंत्रांचा उपयोग करीत असत. अशुभ गोष्टी टाळण्यासाठीं मंत्र म्हणण्यांत येत असत.

**गणित व ज्योतिष शास्त्र:**—ऋग्वेदांत परार्धपर्यंतच्या सर्व संख्या, गुणाकार, भागाकार, बेरीज व वजाबाकी यांचा उल्लेख आला आहे. ज्योतिष शास्त्रांतही बरीच प्रगति झाली होती. वर्षाची विभागणी बारा महिन्यांत करण्यांत आली होती. प्रत्येक महिना तीस दिवसांचा होता. तेराव्या अधिक महिन्याचाही उल्लेख आहे. ब्राह्मण-काळांत बारा महिन्यांची विभागणी सहा ऋतूंत केलेली आढळते. २७ नक्षत्रांचीं नांवें त्याच काळच्या वाङ्मयांत आढळून येतात. ग्रहणासंबंधींची माहिती ऋग्वेदांतच आली आहे.

## वैदिक वाङ्मय

**चार वेद:**—( १ ) **ऋग्वेद**—ऋग्वेदाची रचना कोणत्या काळीं झाली यासंबंधींचीं अनेक मतें आहेत. पण त्यांत एक गोष्ट निश्चित आहे कीं आर्यांच्या उ त्त र ध्रु व - नि वा सा पा सू न च या ग्रंथाची रचना सुरू झाली असावी व ते पंजाबांत स्थिर झाल्यानंतर ती पूर्ण झाली असावी. ऋग्वेदांत एकंदर दहा मंडलें आहेत. त्यांचे कर्ते विश्वामित्र, गौतम, अत्रि, भारद्वाज, वासिष्ठ वगैरे ऋषि आहेत. दहा मंडलांत मिळून १०२८ सूक्तें आहेत. सामान्यतः एक छंदोबद्ध वाक्य म्हणजे एक ऋचा होते व अशा अनेक ऋचा मिळून एक सूक्त तयार होतें. ऋग्वेदांत सृष्टिदेवतांना व पंचमहाभूतांना केलेल्या प्रार्थना आल्या आहेत. शत्रूंचा नाश व्हावा, मेलेल्यास उत्तम गति मिळावी, विवाहितास सुंदर पुत्र व्हावेत, पाऊस भरपूर पडावा, सर्वत्र ऐश्वर्य नांदावें वगैरे अनेक हेतु त्यांत गोंवण्यांत आले आहेत. ऋग्वेदांतील सूक्तांत गृहविषयक भावना, करुणरस, सृष्टिसौंदर्य, भाषासौंदर्य आढळून येतें. वीस सूक्तें संवादात्मक आहेत. त्यांपैकीं पुरुरवा व ऊर्वषी, यम व यमी यांचीं संवाद-सूक्तें फार प्रसिद्ध आहेत.

**यजुर्वेद:**—या वेदांत भिन्न प्रदेश, नवीन धार्मिक व सामाजिक कल्पना

यांची माहिती आपणांस मिळते. सिंधूच्या पूर्वेकडील प्रदेशाची माहिती या ग्रंथांत आली आहे. या प्रदेशांत यजुर्वेदाच्या अनुयायांच्या अनेक शाखा झाल्या व त्या हिंदुस्थानाच्या अन्य भागांत पसरल्या. या वेदांत यज्ञविषयक विधींची माहिती आली आहे. यजुर्वेदांत सर्व यज्ञविधींचे मंत्र ग्रथित केले आहेत. यांपैकीं कांहीं भाग पद्यात्मक व कांहीं गद्यात्मक आहे. भाषा ऋग्वेदाच्या भाषेसारखीच आहे. प्रजापति, रुद्र, शिव, इत्यादि नवीन देवता यजुर्वेदांत आढळतात. ऋग्वेदापेक्षां यजुर्वेदांत विष्णूला जास्त मान आहे. त्याचें व असुरांचें युद्ध हा एक महत्त्वाचा विषय या वेदांत आहे. यज्ञकर्म यथासांग पार पडावें म्हणून पुरोहितांची नेमणूक होई; यजुर्वेदांत त्यांना महत्त्वाचें स्थान आहे.

**सामवेदः**—या वेदास ऐतिहासिकदृष्टच्या फारसें महत्त्व नाहीं. यांत एकंदर १५४९ ऋचा आहेत, परंतु फक्त ७५ सूक्तेंच स्वतंत्र आहेत. बाकीचीं सर्व ऋग्वेदांतून घेतलीं आहेत. ऋग्वेदांतील सोमविषयक मंडलांतून घेतलेल्या सूक्तांचा सामवेदांत समावेश झाला आहे. यांतील ऋचा फक्त म्हणण्यासाठीं किंवा गाण्यासाठीं आहेत. त्याचे दोन भाग असून चार गानें आहेत. प्रत्येक सामऋचा अनेक रागांत गातां येणें शक्य असल्यानें सामांची संख्या बरीच वाढली आहे. अग्नि, सोम, इंद्र या देवतांविषयकच बहुतेक ऋचा आहेत.

**अथर्ववेदः**—अथर्ववेदांतील शेवटचें मंडल बाजूस ठेविलें तर त्याचा वेदांशीं कांहींही संबंध नाहीं. ज्या विधींसंबंधीं त्यांतील सूक्तें आहेत ते विधि कांहीं अपवाद सोडल्यास जन्म, विवाह, मृत्यु, राज्याभिषेक याविषयींचेच आहेत. ग्रंथ या दृष्टीनें अथर्ववेदाचा विचार केला तर तो परस्पर विसंगत अशा मंत्रांचा संग्रह आहे. रोग, दुष्ट प्राणी, राक्षस, चेटकी, शत्रु, ब्राह्मणांचे छलक इत्यादिकांच्या विरुद्ध म्हणण्याचे मंत्र त्यांत आहेत. शिवाय कुटुंबांत व ग्रामांत ऐक्य व्हावें, शत्रूंचीं मनें कळावींत, दीर्घायुष्य, आरोग्य लाभावें व उत्कर्ष व्हावा, प्रवासांत संरक्षण मिळावें, जुगारांत यश मिळावें म्हणून केलेल्या प्रार्थनाही त्यांत आहेत. प्रारंभीं अथर्ववेदाचीं तेरा मंडलें होतीं.

**उपनिषदें**:—वेदांत पंचमहाभूतांची भक्तिभावानें केलेली प्रार्थना आहे. कारण आरंभीं आर्यांना पंचमहाभूतांबद्दल आदर, आश्चर्य किंवा भीति वाटत

होती. उपनिषद्काळीं या भावना मागें पडून आर्य जास्त विचार करूं लागले. या पंचमहाभूतांना प्रेरणा देणारी एक प्रचंड शक्ति विश्वाच्या मुळाशीं आहे अशी त्यांची खात्री झाली. त्याविषयींचें सुंदर विवेचन उपनिषदांत पाहावयास सांपडतें. परमेश्वर, ब्रह्म, आत्मा याविषयींचे विचार उपनिषदांत आहेत. उप+नि+सद् म्हणजे जवळ बसणें. गुरूपाशीं बसून समजावून घेतलेले विचार म्हणून या विचारांना उपनिषदें म्हणतात. यांतील विचार अत्यंत तात्त्विक व गूढ असल्यामुळें जगांतील तत्त्वज्ञानांत उपनिषदांस फार मोठें स्थान आहे. तीं वाचल्यानंतर जर्मन पंडित शोपेन हायर म्हणाला—" उपनिषदें हीं माझ्या जीवाची तळमळ शांत करण्यास कारणीभूत झालीं. "

**ब्राह्मणः**— हे आध्यात्मिक ग्रंथ आहेत. हे सर्व गद्यांत आहेत. त्यांच्या विषयाचे तीन वर्ग होतात. ( १ ) विधि म्हणजे यज्ञासंबंधीं प्रयोगात्मक नियम; ( २ ) अर्थवाद म्हणजे मुख्य मुद्यांचें विवरण; व ( ३ ) उपनिषदें म्हणजे टीकात्मक विचार. ऐतरेय, तैत्तिरेय, शतपथ, गोथप, तांड्य इत्यादि ब्राह्मण ग्रंथाचे भाग आहेत. वेदांत दिसून येणाऱ्या संस्कृतिपेक्षां ब्राह्मण ग्रंथांतील सामाजिक स्थिति, आर्थिक परिस्थिति, सांस्कृतिक प्रगति अधिक उच्च प्रकारची दिसून येते. ब्राह्मण वाङ्मयापैकीं शतपथ ब्राह्मणाचा देशी व परदेशी वाङ्मयावर परिणाम झाला आहे.

**आरण्यकें:**— हीं गद्यरचनेच्या अधिक विकासाचीं फळें आहेत. जे धर्मनिष्ठ लोक घर सोडून अरण्याचा आश्रय करितात व पुढें यज्ञकर्मे करीत नाहींत, विशेषतः त्यांच्या उपयोगासाठीं आरण्यकें तयार झालीं असा एक समज आहे. दुसरा समज असा आहे कीं, या ग्रंथांतील गूढ विषयामुळें ते शिष्यास गांवांत न शिकवितां गुरूनें अरण्यांत, एकांतांत शिकविल्यामुळें त्यांस आरण्यकें म्हणतात. वेद, आरण्यकें व उपनिषदें यांना श्रुति असें म्हणतात.

**षड्दर्शनें:**— वेदांना आप्त-प्रमाण मानणारे असे हिंदु तत्त्वज्ञानाचे सहा मुख्य संप्रदाय आहेत. त्यांचीं सहा दर्शनशास्त्रें प्रसिद्ध आहेत. कपिलाचें सांख्य, पतंजलींचें योग, कणादाचें वैषेशिक, गौतमाचें न्याय, जैमिनीचें पूर्वमीमांसा व व्यासाचें उत्तरमीमांसा किंवा वेदान्त. या सर्व ग्रंथांत विश्वाचें

गूढ व तत्त्वज्ञान याचा विचार केलेला आहे. त्यावरून त्या काळींच्या आर्यांच्या उँच्च संस्कृतीची साक्ष पटते. न्याय दर्शनासंबंधीं श्लेगेल म्हणतो– “ त्यांतील बुद्धिवाद व तर्कपद्धति अनुपम असून त्या काळींचे ग्रीक लोक सुद्धां या स्थितीला पोहोंचले नव्हते. ” सांख्यासंबंधीं हंटर म्हणतो–“ उत्पत्ति, विकृति आणि उत्क्रांति यांचे सिद्धांत सांख्यानें जवळ जवळ पक्के केले आहेत. हळूहळू आधुनिक पंडितही ते मान्य करूं लागले आहेत. ” योगशास्त्र ही भारताची जगाला अमोल देणगी आहे. भविष्यकाळीं जगामध्यें सुख निर्माण करण्याचें तें एक अपूर्व साधन आहे. पूर्वमीमांसेंत वेदांतील व ब्राह्मणांतील कर्मकांड मोठ्या युक्तीनें सूत्रबद्ध केलें आहे. त्यांत तत्त्वांची चर्चा नाहीं परंतु त्यांतील तर्कशुद्ध मांडणी, चिकित्सक पद्धति व निर्णय देण्याची पद्धति फार मार्मिक आहे. वेदान्तशास्त्र हें सर्व उपनिषदांचें सार आहे.

**मनुस्मृतिः**–हा ग्रंथ इ. स. च्या दुसऱ्या शतकांत तयार झाला. मूळचा ग्रंथ भृगु ऋषींनीं लिहिला व मागाहून त्यांत बरीच भर पडली. बौद्ध धर्माच्या प्रसारामुळें वर्णाचा उच्चनीच भाव व रक्ताची शुद्धाशुद्धता याबद्दलचा कांटेकोरपणा फारच कमी झाला. त्याचें पुनरुज्जीवन व्हावें हा मनुस्मृतीचा हेतु आहे. बाह्य आपत्तींना तोंड देऊन आपला समाज शुद्ध राखण्यासाठीं कांहीं कडक निर्बंध ग्रंथकारानें निर्माण केले आहेत. त्यांत स्त्री-स्वातंत्र्याला विरोध, बालविवाहाचा पुरस्कार, अस्पृश्यतेची जरुरी, जन्मावरून ठरणाऱ्या जाती, मजूर व कारागीर यांच्या धंद्याचा हलकेपणा इत्यादि गोष्टी आल्या आहेत. आजच्या काळांत या गोष्टींचें समर्थन करणें अशक्य आहे. परंतु त्या काळच्या परिस्थितीचा विचार केला तर ग्रंथकाराचा प्रयत्न प्रामाणिक व स्वाभाविक वाटतो. तें कांहींही असलें तरी मनस्मृतींतील वचनें मात्र फार सुंदर आहेत. बौद्ध धर्माविरुद्ध केलेली प्रतिक्रिया असें मनस्मृतीचें स्वरूप असल्यानें त्यांतील वचनें सर्वकाळ लागू पडणारीं नाहींत.

**पुराणें**:–– ‘ पुराण ’ या नांवानें प्रसिद्ध असलेले नीतिबोधपर आणि संप्रदायविशिष्ट हेतूचे १८ ग्रंथ आहेत. पुराणांत देवताकथा, ऋषिवंश यांचें विवेचन असतें. बहुतेक उपलब्ध पुराणें ही महाभारतानंतरचीं आहेत

व त्यांतील बहुतेक प्राचीन कथा महाभारतावरूनच घेतलेल्या आहेत. वैष्णव पंथाची प्रतिष्ठा वाढविणें हा बहुतेक पुराणांचा हेतु आहे. कांहीं पुराणें शैव सांप्रदायिकही आहेत. पुराणांमध्यें पृथ्वीचें काल्पनिक वर्णन, जगाच्या उत्पत्तीबद्दलचा सिद्धान्त, प्राचीन देव, साधु व वीर यांचे पराक्रम, विष्णु-अवताराच्या कथा, सूर्यवंशी व चंद्रवंशी राजवंश आणि विष्णुसहस्रनाम व शिवसहस्रनाम इ. विषय आहेत. त्यांमध्यें उपासना, उपोषणें, नवस, उत्सव, तीर्थयात्रा व आराधना इत्यादिबद्दलचे नियम आहेत. गरुड, अग्नि, मत्स्य, वायु, मार्कंडेय, पद्म, भागवत हीं प्रसिद्ध पुराणें आहेत. शिवाय अनेक उपपुराणेंही प्रचलित आहेत. त्यांचें स्थान गौण आहे. त्यांत विषयापेक्षां विधीलाच जास्त प्राधान्य दिलेलें दिसतें.

## –उतारे–

**उषा देवतेविषयीं कल्पना**:–" जगांतील सर्व संपत्तीची सम्राज्ञी अशा शुभ उषे, आज येथें आम्हांवर प्रकाश पाड. आकाशाच्या प्रभावळींत ती दीप्तिसह प्रकाशलो आहे. अश्वांनीं युक्त अशा रथांत बसून जगास जागे करण्यासाठीं उषा येत आहे. सर्व जगावर सुखाची वृष्टि करीत व दिव्य प्रकाश देत ती आपलें तेज पसरीत आहे.... " " तिच्यामुळें आमचा प्राण आम्हांस पुन्हा मिळाला आहे."

**इंद्राचें महात्म्य**:––" कांपत असलेली विस्तीर्ण पृथ्वी ज्यानें निश्चल केली, क्षुब्ध पर्वतांस ज्यानें शांति दिली, आकाशाला ज्यानें आधार दिला, तोच इंद्र होय. "

## –थोडक्यांत–

**धार्मिक स्थिति**:– **देवता**–सृष्टीच्या विविध स्वरूपांतून उत्पत्ति; इंद्र, अग्नि, वरुण, मित्र, मरुत्, सोम, उषा या प्रमुख देवता.

**यज्ञयाग**:–देवतांना संतुष्ट करण्याचें साधन; मुख्य कर्म हवि अर्पण करणें; अश्वमेध, दर्शपूर्णमास, पुरुमेध प्रमुख प्रकार; मूर्तिपूजा नव्हती.

**तत्त्वज्ञान**:––पाप महाभयंकर, तें नाहीसें करण्यासाठीं वरुणाची प्रार्थना; सुरापान, बहुपत्नीत्व, लूट, द्यूत, चोरी, अप्रामाणिकपणा, मोठ्यांचा अवमान,

जादूटोणा इत्यादि मुख्य पापें. पुनर्जन्म आहे, पितर वंशजांची काळजी वाहतात; अधार्मिकांना नरकवास भोगावा लागतो.

**आर्थिक स्थितिः**—सामान्य गरजा भागल्यानंतर इतर उद्योगधंदे निर्माण झाले. गोपालन, शेती, सुतारकाम, धातुकाम, विणकाम, सुवर्णकाम, व्यापार, हे प्रमुख उद्योगधंदे. सामान्यतः बापाचा धंदा मुलगा करी पण उद्योगस्वातंत्र्य होतें.

**सांस्कृतिक स्थितिः**—कला—गायनकला, नृत्यकला, लेखनकला.

करमणूक—द्यूत, शर्यती, शिकार.

शास्त्र—वैद्यक, गणित, ज्योतिष.

वाङ्मयः चारवेद—ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेद.

उपनिषदें, आरण्यकें, ब्राह्मण, पुराणें, षट्दर्शनें, मनुस्मृति.

**प्रश्न**—(१) आर्यांना देवतांची कल्पना कशावरून सुचली? उषा, वरुण, इंद्र, मरुत् या देवतांचीं कामें कोणतीं?

(२) आर्य यज्ञयाग कशासाठीं करीत? प्रमुख यज्ञ कोणते?

(३) प्रमुख पापें कोणतीं? पापी माणसाची स्थिति काय होते?

(४) आर्यांच्या प्रमुख उद्योगधंद्यांविषयीं माहिती द्या.

(५) पुढील ग्रंथांविषयीं तुम्हांस काय माहिती आहे?—वेद, उपनिषदें, मनुस्मृति, पुराणें.

**स्वाध्यायः**—(१) आर्य देवतांविषयीं मिळणारीं निरनिराळीं चित्रें जमा करा.

(२) तुमच्या घरीं यज्ञयाग होतात त्याप्रसंगीं पुरोहितांना किंवा वडील माणसांना त्याविषयीं माहिती विचारा.

(३) तुमच्या खेडेगांवीं चालणाऱ्या धंद्याचें बारकाईनें निरिक्षण करा. प्राचीनकाळच्या कोणत्या गोष्टी त्यांत अजून चालू आहेत तें पाहा.

(४) प्राच्यविद्या-मंदिरांत जाऊन जुन्या ग्रंथांच्या प्रति पाहा.

—०—

## प्रकरण ९ वें

# आर्ष काल ( भाग १ ला )

## ( रामायणकालीन स्थिति )

**१ रामायणाचा काल, कर्ता, रचना, कथानक, व महत्त्व;**
**२ रामायणकालीन सामाजिक स्थिति;**
**३ रामायणकालीन राजकीय स्थिति.**

**१ रामायणाचा कालः—** रामायणांत वर्णन केलेल्या घडामोडी कधीं घडल्या हें सांगणें फार कठिण आहे. कारण त्यासंबंधींचा प्रत्यक्ष असा एकही पुरावा रामायणांत सांपडत नाहीं. कांहीं अप्रत्यक्ष पुराव्याच्या मदतीनें या घडामोडींचा काल ठोकळ मानानें ठरविता येणें शक्य आहे. हिंदूंच्या अवतार-कल्पनेंत राम व श्रीकृष्ण या दोघांचाही समावेश होतो. त्यांपैकीं श्रीकृष्ण ही व्यक्ति महाभारतकालची आहे. महाभारताचा काल इ. स. पू. ३०३१ हा ठरविण्यांत आला आहे. त्यावरून श्रीकृष्णाच्या अगोदरचा अवतार जो राम त्याचा काल इ. स. पू. ३०३१ च्या पूर्वींचा असला पाहिजे ही गोष्ट निश्चित आहे. दुसरा पुरावा म्हणजे रामायण-कथेचा अंतर्भाव खुद्द महाभारतांतच एक आख्यान म्हणून करण्यांत आला आहे. हें काम सौतीनें केलें. म्हणजे सौतीच्याही पूर्वीं बराच काल ही कथा प्रचलित असली पाहिजे. तिसरा महत्त्वाचा पुरावा म्हणजे रामायण व महाभारत या ग्रंथांत आर्यांच्या सामाजिक व राजकीय कल्पनांत दिसून येणारा फरक हा होय. रामायणांतील राम हा वारंवार आपल्या कुलाचा उल्लेख करितो यावरून त्या वेळीं आर्यांत कुलकल्पना जास्त श्रेष्ठ होती असें अनुमान निघतें. त्याच्या उलट महाभारतांतील श्रीकृष्ण, राष्ट्र समाज या कल्पनांचा पुरस्कार करितो. त्याचा अर्थ हाच कीं, रामायणकालीन

जादूटोणा इत्यादि मुख्य पापें. पुनर्जन्म आहे, पितर वंशजांची काळजी वाहतात; अधार्मिकांना नरकवास भोगावा लागतो.

**आर्थिक स्थितिः**—सामान्य गरजा भागल्यानंतर इतर उद्योगधंदे निर्माण झाले. गोपालन, शेती, सुतारकाम, धातुकाम, विणकाम, सुवर्णकाम, व्यापार, हे प्रमुख उद्योगधंदे. सामान्यतः बापाचा धंदा मुलगा करी पण उद्योगस्वातंत्र्य होतें.

**सांस्कृतिक स्थितिः**—कला—गायनकला, नृत्यकला, लेखनकला.

करमणूक—द्यूत, शर्यती, शिकार.

शास्त्र—वैद्यक, गणित, ज्योतिष.

वाङ्मयः चारवेद—ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेद.

उपनिषदें, आरण्यकें, ब्राह्मण, पुराणें, षट्दर्शनें, मनुस्मृति.

**प्रश्न**—(१) आर्यांना देवतांची कल्पना कशावरून सुचली? उषा, वरुण, इंद्र, मरुत् या देवतांचीं कामें कोणतीं?

(२) आर्य यज्ञयाग कशासाठीं करीत? प्रमुख यज्ञ कोणते?

(३) प्रमुख पापें कोणतीं? पापी माणसाची स्थिति काय होते?

(४) आर्यांच्या प्रमुख उद्योगधंद्यांविषयीं माहिती द्या.

(५) पुढील ग्रंथांविषयीं तुम्हांस काय माहिती आहे?—वेद, उपनिषदें, मनुस्मृति, पुराणें.

**स्वाध्यायः**—(१) आर्य देवतांविषयीं मिळणारीं निरनिराळी चित्रें जमा करा.

(२) तुमच्या घरीं यज्ञयाग होतात त्याप्रसंगीं पुरोहितांना किंवा वडील माणसांना त्याविषयीं माहिती विचारा.

(३) तुमच्या खेडेगांवीं चालणाऱ्या धंद्याचें बारकाईनें निरिक्षण करा. प्राचीनकाळच्या कोणत्या गोष्टी त्यांत अजून चालू आहेत तें पाहा.

(४) प्राच्यविद्या-मंदिरांत जाऊन जुन्या ग्रंथांच्या प्रति पाहा.



—०—

# प्रकरण ९ वें

# आर्ष काल ( भाग १ ला )

## ( रामायणकालीन स्थिति )

**१ रामायणाचा काल, कर्ता, रचना, कथानक, व महत्त्व;**
**२ रामायणकालीन सामाजिक स्थिति;**
**३ रामायणकालीन राजकीय स्थिति.**

**१ रामायणाचा काल:–** रामायणांत वर्णन केलेल्या घडामोडी कधीं घडल्या हें सांगणें फार कठिण आहे. कारण त्यासंबंधींचा प्रत्यक्ष असा एकही पुरावा रामायणांत सांपडत नाहीं. कांहीं अप्रत्यक्ष पुराव्याच्या मदतीनें या घडामोडींचा काल ठोकळ मानानें ठरविता येणें शक्य आहे. हिंदूंच्या अवतार–कल्पनेंत राम व श्रीकृष्ण या दोघांचाही समावेश होतो. त्यांपैकीं श्रीकृष्ण ही व्यक्ति महाभारतकालची आहे. महाभारताचा काल इ. स. पू. ३०३१ हा ठरविण्यांत आला आहे. त्यावरून श्रीकृष्णाच्या अगोदरचा अवतार जो राम त्याचा काल इ. स. पू. ३०३१ च्या पूर्वींचा असला पाहिजे ही गोष्ट निश्चित आहे. दुसरा पुरावा म्हणजे रामायण-कथेचा अंतर्भाव खुद्द महाभारतांतच एक आख्यान म्हणून करण्यांत आला आहे. हें काम सौतीनें केलें. म्हणजे सौतीच्याही पूर्वीं बराच काल ही कथा प्रचलित असली पाहिजे. तिसरा महत्त्वाचा पुरावा म्हणजे रामायण व महाभारत या ग्रंथांत आर्यांच्या सामाजिक व राजकीय कल्पनांत दिसून येणारा फरक हा होय. रामायणांतील राम हा वारंवार आपल्या कुलाचा उल्लेख करितो यावरून त्या वेळीं आर्यांत कुलकल्पना जास्त श्रेष्ठ होती असें अनुमान निघतें. त्याच्या उलट महाभारतांतील श्रीकृष्ण, राष्ट्र समाज या कल्पनांचा पुरस्कार करितो. त्याचा अर्थ हाच कीं, रामायणकालीन

जादूटोणा इत्यादि मुख्य पापें. पुनर्जन्म आहे, पितर वंशजांची काळजी वाहतात; अधार्मिकांना नरकवास भोगावा लागतो.

**आर्थिक स्थितिः**—सामान्य गरजा भागल्यानंतर इतर उद्योगधंदे निर्माण झाले. गोपालन, शेती, सुतारकाम, धातुकाम, विणकाम, सुवर्णकाम, व्यापार, हे प्रमुख उद्योगधंदे. सामान्यतः बापाचा धंदा मुलगा करी पण उद्योगस्वातंत्र्य होतें.

**सांस्कृतिक स्थितिः**—कला—गायनकला, नृत्यकला, लेखनकला.
करमणूक—द्यूत, शर्यती, शिकार.
शास्त्र—वैद्यक, गणित, ज्योतिष.
वाङ्मयः चारवेद—ऋग्वेद, यजुर्वेद, अथर्ववेद, सामवेद.
उपनिषदें, आरण्यकें, ब्राह्मण, पुराणें, षट्दर्शनें, मनुस्मृति.

**प्रश्न**—( १ ) आर्यांना देवतांची कल्पना कशावरून सुचली ? उषा, वरुण, इंद्र, मरुत् या देवतांचीं कामें कोणतीं ?
( २ ) आर्य यज्ञयाग कशासाठीं करीत ? प्रमुख यज्ञ कोणते ?
( ३ ) प्रमुख पापें कोणतीं ? पापी माणसाची स्थिति काय होते ?
( ४ ) आर्यांच्या प्रमुख उद्योगधंद्यांविषयीं माहिती द्या.
( ५ ) पुढील ग्रंथांविषयीं तुम्हांस काय माहिती आहे?—वेद, उपनिषदें, मनुस्मृति, पुराणें.

**स्वाध्यायः**—( १ ) आर्य देवतांविषयीं मिळणारीं निरनिराळी चित्रें जमा करा.
( २ ) तुमच्या घरीं यज्ञयाग होतात त्याप्रसंगीं पुरोहितांना किंवा वडील माणसांना त्याविषयीं माहिती विचारा.
( ३ ) तुमच्या खेडेगांवीं चालणाऱ्या धंद्याचें बारकाईनें निरिक्षण करा. प्राचीनकाळच्या कोणत्या गोष्टी त्यांत अजून चालू आहेत तें पाहा.
( ४ ) प्राच्यविद्या-मंदिरांत जाऊन जुन्या ग्रंथांच्या प्रति पाहा.

—०—

## प्रकरण ९ वें

# आर्ष काल ( भाग १ ला )

## ( रामायणकालीन स्थिति )

**१ रामायणाचा काल, कर्ता, रचना, कथानक, व महत्त्व;**
**२ रामायणकालीन सामाजिक स्थिति;**
**३ रामायणकालीन राजकीय स्थिति.**

**१ रामायणाचा काल:–** रामायणांत वर्णन केलेल्या घडामोडी कधीं घडल्या हें सांगणें फार कठिण आहे. कारण त्यासंबंधींचा प्रत्यक्ष असा एकही पुरावा रामायणांत सांपडत नाहीं. कांहीं अप्रत्यक्ष पुराव्याच्या मदतीनें या घडामोडींचा काल ठोकळ मानानें ठरविता येणें शक्य आहे. हिंदूंच्या अवतार-कल्पनेंत राम व श्रीकृष्ण या दोघांचाही समावेश होतो. त्यांपैकीं श्रीकृष्ण ही व्यक्ति महाभारतकालची आहे. महाभारताचा काल इ. स. पू. ३०३१ हा ठरविण्यांत आला आहे. त्यावरून श्रीकृष्णाच्या अगोदरचा अवतार जो राम त्याचा काल इ. स. पू. ३०३१ च्या पूर्वींचा असला पाहिजे ही गोष्ट निश्चित आहे. दुसरा पुरावा म्हणजे रामायण-कथेचा अंतर्भाव खुद्द महाभारतांतच एक आख्यान म्हणून करण्यांत आला आहे. हें काम सौतीनें केलें. म्हणजे सौतीच्याही पूर्वीं बराच काल ही कथा प्रचलित असली पाहिजे. तिसरा महत्त्वाचा पुरावा म्हणजे रामायण व महाभारत या ग्रंथांत आर्यांच्या सामाजिक व राजकीय कल्पनांत दिसून येणारा फरक हा होय. रामायणांतील राम हा वारंवार आपल्या कुलाचा उल्लेख करितो यावरून त्या वेळीं आर्यांत कुलकल्पना जास्त श्रेष्ठ होती असें अनुमान निघतें. त्याच्या उलट महाभारतांतील श्रीकृष्ण, राष्ट्र समाज या कल्पनांचा पुरस्कार करितो. त्याचा अर्थ हाच कीं, रामायणकालीन

कुलकल्पना मागें पडून राष्ट्रकल्पना बळावत चालली असली पाहिजे. वरील पुराव्यावरून निघणारें ठोकळ अनुमान हेंच कीं, रामायणांत वर्णन केलेल्या सर्व घटना इ. स. पू. २०३१ पूर्वी घडलेल्या आहेत.

या घटना घडल्यानंतर जवळ जवळ तीन हजार वर्षांनीं त्या लिहून काढल्या असाव्यात असें कांहीं विद्वान समजतात. रामायणांत मनूचा व बुद्धाचा उल्लेख आहे. "वेद आम्हांला प्रमाण नाहींत, इहपरलोकापलीकडे दुसरा लोक नाहीं" अशा तऱ्हेचीं वचनें जाबालीच्या तोंडीं आहेत. बुद्ध भिक्षु, शक, यवन, म्लेंच्छ, पल्लव इत्यादि लोकांचा उल्लेख आहे यावरून असें अनुमान निघतें कीं, हा ग्रंथ मनूच्या नंतर व बौद्ध धर्माच्या उत्कर्षकालीं लिहिला गेला असावा. इ. स. च्या २ ऱ्या किंवा ३ ऱ्या शतकांत रामायण लिहून पुरें झालें असावें असें कांहीं विद्वान लोकांचें मत आहे.

**रामायणाचे कर्ते:**—महाभारताचे तीन कर्ते जसे स्पष्ट दिसतात तसे रामायणाचे दिसत नाहींत. त्याचा अर्थ मात्र असा होत नाहीं कीं सध्यां उपलब्ध असलेलें रामायण एकट्या वाल्मीकीनेंच रचिलें. महाभारताप्रमाणें याही ग्रंथांत बराच भाग मागाहून घुसडण्यांत आला आहे. तो भाग कोणी घुसडला हें समजण्यास कांहीं मार्ग नाहीं. तेवढा भाग सोडून दिला तर ग्रंथाचा मुख्य भाग वाल्मीकीनेंच रचिला याबद्दल शंका वाटत नाहीं. रामानें सीतेचा त्याग केल्यानंतर ती १२ वर्षें वाल्मिकीच्या आश्रमांत होती. त्या काळांत आपल्या आयुष्यांत घडलेल्या सर्व गोष्टी तिनें वाल्मीकीला सांगितल्या असल्या पाहिजेत व त्यांतील कारुण्य व वीरश्री या गुणांमुळें वाल्मीकीची प्रतिभा जागृत होऊन त्यानें हें महाकाव्य रचिलें असलें पाहिजे, हेंच मत ग्राह्य वाटतें.

**रामायणाची रचना:** रामायणांत एकंदर २४००० श्लोक आहेत. ५०० सर्ग असून उत्तरचरित्र धरून ७ कांडें आहेत. हल्लीं उपलब्ध असलेल्या आवृत्तींत ६४५ सर्ग आहेत. त्यावरून मूळच्या ग्रंथांत पुढें बरीच भर पडली असली पाहिजे ही गोष्ट स्वच्छ दिसते. सर्व ग्रंथ अनुष्टुभ छंदांत लिहिलेला आहे. निराळ्या छंदांत लिहिलेला भाग प्रक्षिप्त मानण्यास हरकत नाहीं.

**रामायणाचें कथानक:**— रघुकुलांतील दशरथ राजाला उतारवयांत

राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न असे चार पुत्र झाले. रामाचा विवाह जनक राजाची कन्या सीता हिजबरोबर झाला. रामाला राज्याभिषेक होण्याच्या ऐनप्रसंगीं मंथरा दासीच्या सांगण्यावरून रामाची सावत्र आई कैकयी हिनें पूर्वीं दशरथानें दिलेले दोन वर मागून घेतले. एका वरानें रामाला १४ वर्षें वनवासाला जावें लागलें व दुसऱ्यामुळें भरताला अयोध्येचें राज्य मिळालें. बापाचें वचन पाळण्यासाठीं राम वनवासांत गेला. त्याच्याबरोबर सीता व लक्ष्मण हींही गेलीं. भरताला आपल्या आईच्या कृत्याचा राग येऊन तो रामाला परत आणण्यासाठीं वनांत गेला. रामानें त्याची समजूत घालून व त्यास आपल्या पादुका देऊन परत पाठविलें. त्या पादुका सिंहासनावर ठेवून भरतानें चौदा वर्षें अयोध्येचा कारभार पाहिला. वनवासांत असतांना लंकेचा राजा रावण यानें संधी साधून सीतेला पळवून नेलें. वानरांच्या मदतीनें रामानें लंकेवर स्वारी करून रावणास ठार मारलें व सीतेसह तो पुन्हा अयोध्येस येऊन राज्य करूं लागला. परंतु सीतेसंबंधींची कुरबुर ऐकून प्रजेसाठीं रामानें सीतेला तपोवनांत नेऊन सोडिलें. तेथें तिला लव व कुश असे दोन जुळे पुत्र झाले. वाल्मीकीनें त्यांस उत्तम शिक्षण दिलें. रामानें पाठविलेल्या अश्वमेध घोड्याला अटकाव केल्यामुळें रामाचा व त्यांचा संबंध आला. सीतेनें मात्र आपली शुद्धता दर्शविण्यासाठीं धरणी दुभंग करवून त्यांत उडी घेतली.

**रामायणाचें महत्त्वः**— काव्य, इतिहास, समाजनीति इत्यादि दृष्टींनीं रामायणाची गणना जगांतील सर्वश्रेष्ठ वाङ्मयांत केली जाते. पाश्चात्य ग्रंथकार या ग्रंथाला फार मान देतात. भारतीय लोक राम-सीतेला परमेश्वर मानून रामायणाचें भक्तिभावानें पूजन व श्रवण करितात. लहान मोठ्या प्रत्येक भारतीयास या ग्रंथाची माहिती ही असतेच.

काव्यदृष्ट्या या ग्रंथाइतका करुणरसानें ओथंबलेला सुंदर ग्रंथ जगांत नाहीं. वाल्मीकीची सर्व प्रतिभा या ग्रंथांत प्रकट झाली आहे. त्यांतील प्रत्येक श्लोक काव्य व अर्थ या दोन्ही दृष्ट्या पूर्ण व निर्दोष आहे.

आर्य संस्कृतीचा इतिहास सांगणारा ग्रंथ म्हणूनही रामायणाची योग्यता मोठी आहे. वेदकालीं हिंदुस्थानांत आलेल्या आर्यांच्या समाजरचनेचा,

वसाहतींच्या विस्ताराचा व धार्मिक कल्पनेचा साद्यंत इतिहास या ग्रंथांत पाहावयास सांपडतो.

पित्याचें वचन पाळणारा, एकवचनी, एकबाणी, एकपत्नीव्रती राम, भावासाठीं वनवासाचें दुःख सोसणारा लक्ष्मण, मिळालेल्या राज्याचा उपभोग न घेणारा भरत, पतिसाठीं वनवासाचे कष्ट सहन करणारी सीता व रामाची सेवा हेंच सर्वस्व मानणारा हनुमंत या व्यक्ति कवीनें निर्माण करून आदर्श समाज पद्धतीचें चित्र वाचकांसमोर उभें केलें आहे.

रामायणाचीं भाषांतरें जगांतील सर्व प्रमुख भाषांत झालेलीं आहेत. त्या सर्वांत संत तुलसीदासाचें हिंदी भाषेंतील 'तुलसी-रामायण' फार सुंदर व लोकप्रिय आहे. पाश्चात्य विद्वानांनीं या ग्रंथाबद्दल अत्यंत गौरवाचे उद्गार काढले आहेत. श्लेगेल म्हणतो– " वीररस उत्पन्न करण्यांत रामायण हा सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. " विल्यम हा दुसरा पंडित याहीपुढें जाऊन असें म्हणतो कीं– " संस्कृत भाषेंत रामायण हा एक अद्वितीय हिरा आहे. "

## २. रामायणकालीन सामाजिक स्थिति

**वर्ण-व्यवस्था**:—सर्व वर्णांत ब्राह्मण श्रेष्ठ मानले जात होते. त्यांनीं अध्ययन करावें, यज्ञांत पुढारीपण घ्यावें, राजाचे गुरु व्हावें, दक्षिणा घ्यावी पण राज्यकारभारांत ढवळाढवळ करूं नये. तें काम क्षत्रियांनीं करावें. अशा पद्धतीनें त्याकाळची व्यवस्था चालू होती. ब्राह्मण वर्गाला मान मिळत असला तरी कांहीं ब्राह्मण आपल्या कर्मानें आपली योग्यता कमी करून घेत असल्याबद्दलचे उल्लेख रामायणांत आहेत. त्रिजट नांवाचा ब्राह्मण हा शेती करून पोट भरीत होता. त्यांतही भागेना तेव्हां त्यानें भिक्षावृत्ति पत्करिली. आळशी, गोड खाणारे, अध्ययनाच्या नांवाखालीं लोकांस फसविणारे अशा ब्राह्मणांचा उल्लेख रामायणांत कांहीं ठिकाणीं आला आहे. भूमिदान न घेतां निष्क घेण्याची प्रथा ब्राह्मणांत रुढ होऊं लागली होती.

ब्राह्मणांच्या खालोखाल क्षत्रियांना मान मिळत असे. अध्ययन, यज्ञ करणें व दान देणें एवढ्याच अधिकारांवर क्षत्रिय संतुष्ट नव्हते. ब्राह्मणांच्या बरोबरीचा मान मिळविण्यासाठीं त्यांची धडपड सुरू होती हें बिभीषण,

विश्वामित्र यांच्या उदाहरणांवरून दिसून येतें. संकटांत सांपडलेल्यांच्या मदतीस धांवून जाणें हे प्रत्येक क्षत्रिय आपलें परम कर्तव्य मानीत असे. स्वाभिमान व कुलाभिमान त्यांच्या ठिकाणीं सदैव जागृत असे. युद्ध करण्यांत व राजकारण खेळण्यांत ते फार पटाईत होते.

वैश्य परदेशांतून माल आणून व्यापार करीत. त्यांचे निरनिराळे वर्ग होते. त्यांवर जे मुख्य असत त्यांना नैगम म्हणत. ते राजमंत्र्यावरोबर दरबारांत जात व राजास सल्लामसलत देत. वैश्यांनीं क्षत्रियांच्या आज्ञेंत राहावें असा एका जागीं उल्लेख आहे त्यावरून त्रैवर्णिक आर्यांत त्यांचा क्रम शेवटचा होता असें दिसतें.

शूद्रांना सेवेशिवाय दुसरा अधिकार नव्हता. यज्ञप्रसंगीं त्यांना राजाकडून बोलावणें येई. त्यांचे व इतर आर्यांचे संबंध कशा प्रकारचे होते याचा पत्ता लागत नाहीं. भिल्लिणीचीं उष्टीं बोरें रामानें खाल्लीं या एका उदाहरणावरून आर्यांत व शूद्रांत रोटी-व्यवहार चालत असे असें म्हणतां गेणार नाहीं. रामाच्या सद्गुणाचें ते एक उदाहरण म्हणून मानतां येईल. त्रैवर्णिक व शूद्र यांच्या एकत्र व्यवहाराचें एकही उदाहरण रामायणांत सांपडत नाहीं.

या चार वर्णांशिवाय अनेक संकर जाती या कालीं निर्माण झाल्या होत्या. मजूर, नट, आचारी, नाचणारे, बजवय्ये, ज्योतिषी, खेळणीं करणारे, विणकर, न्हावी, धोबी, इत्यादि अनेक धंदेवाल्यांचा उल्लेख रामायणांत आली आहे. निषाद, चांडाल, दस्यु या अतिनिंद्य जाती मानण्यांत येत असत.

**आश्रम-व्यवस्थाः**—सर्व आश्रमांत गृहस्थाश्रम श्रेष्ठ समजला जात असे. लक्ष्मणाला ब्रह्मचारी म्हटलें आहे, यावरून व्रतस्थ राहणाऱ्याला ती संज्ञा लावीत असत असें दिसतें. वानप्रस्थाश्रमांत जटावल्कलें धारण करून राहणें, फळमूळांवर जगणें, कुशास्तरणावर निजणें व व्रतस्थ राहणें या चार गोष्टी मुख्यतः पाळाव्या लागत असत. ऋषि गृहस्थाश्रमी किंवा संन्याशी अशा दोन्ही प्रकारचे होते. गृहस्थाश्रम न स्वीकारणाऱ्यांचे अनेक प्रकार रामायणांत सांगितले आहेत. कच्चें अन्न खाणारे, पानांवर जगणारे, पाण्यांत राहून तप करणारे, वायु भक्षण करून राहणारे असे अनेक प्रकारचे संन्याशी या काळीं होते.

**स्त्रियांची स्थिति**.–मुली बऱ्याच मोठ्या होईपर्यंत बापाच्या घरीं राहात. श्रीमंत मुलींना नृत्य, गायन, वादन, इ. विषय शिकवीत असत. चित्रकला पुरुषांना येत असल्याचा जसा स्पष्ट उल्लेख आहे तसा ती स्त्रियांनाही येत असल्याबद्दलचा नाहीं. मुली जाणत्या झाल्यावर मगच त्यांचे विवाह होत. सीतेच्या इतर बहिणींचे विवाह स्वंयवर-पद्धतीनें झाले नाहींत यावरून तो प्रकार फारसा प्रचारांत नव्हता, असेंच अनुमान निघतें. ' बापानेंच करून दिली म्हणून सीता रामाला प्रिय होती ' या वाक्यावरून ब्राह्म विवाहच लोकप्रिय होते असें दिसतें.

पति चांगला किंवा वाईट असो तोच स्त्रियांचा देव आहे अशी समजूत होती. नवऱ्याशीं स्त्री ज्या प्रकारानें वागते त्या प्रकाराप्रमाणें तिला स्वर्ग किंवा नरक मिळतो असें मानण्यांत येत असे. " पतिशिवाय स्त्रीला दुसरा आधारच नाहीं, " असे सीतेच्या तोंडचे उद्गार आहेत. " पति अनार्य असेल, दरिद्री असेल तरी देखील त्याच्याशीं दुजाभाव न ठेवितां स्त्रीनें प्रेमानेंच वागलें पाहिजे " अशा तऱ्हेचे पतिबद्दलचे विचार सीतेनें अनसूयेला सांगितले आहेत.

दशरथाच्या चार बायकांवरून बहुपत्नीत्वाची चाल या कालीं होती हें स्पष्ट आहे. रामाच्या एकपत्नीव्रताचा जो गौरव करण्यांत आला आहे त्यावरून बहुपत्नीत्वाबद्दल पंडितांना तिटकारा वाटत होता असें दिसतें. प्रसंग-विशेषीं स्त्रिया आपल्या पतीला बहुमोल सल्ला देऊं शकत असत हें सीता, तारा, मंदोदरी यांच्या उदाहरणांवरून ध्यानांत येतें.

रामायणकालीं विधवा स्त्रियांची स्थिति किती चमत्कारिक व केविलवाणी होती हें तारेच्या पुढील उद्गारावरून ध्यानांत येईल. ती म्हणते, " शूराला शहाण्यानें कधींही आपली कन्या देऊं नये. मी शूराची पत्नी झालें म्हणून आज विधवा झालें. माझा मान आतां संपला. " विधवा स्त्रिया एकवेणीधरा राहून पुण्याचरणांत आपला काल घालवीत. रामायणांत सतीचें फक्त एकच उदाहरण आहे, तेव्हां सती जाणे लोकप्रिय नव्हतें असेंच मानलें पाहिजे.

स्त्रिया फक्त सुपरिचित माणसांशींच संभाषण करीत. मोठ्या घराण्यांतील स्त्रिया शिबिकांत बसून रस्त्यानें जात. अवगुंठन ( बुरखा ) घेण्याची चाल होती.

तें न घेणें असभ्यपणाचें मानीत. विवाहित स्त्रियांना संध्यावंदन, तपाचरण वगैरे करण्याचा अधिकार होता. आमरण अविवाहित राहिलेल्या स्त्रियांचीं उदाहरणें रामायणांत आहेत.

**पापपुण्याच्या कल्पनाः**—या जन्मीं केलेल्या कर्माप्रमाणें मरणोत्तर स्वर्ग किंवा नरक याची प्राप्ति होते अशी समजूत या कालींही होती. पुनर्जन्म नसतोच असें म्हणणाऱ्यांचा एक वर्ग या वेळीं उदयास येत होता. जाबाली म्हणतो, " प्राणी एकटाच जन्माला येतो व एकटाच मरून जातो. संसारांत आसक्त होणारा मनुष्य उन्मत्त समजावा. " कोणकोणत्या गोष्टी केल्या म्हणजे पाप लागतें याची एक दीर्घ यादी रामायणांत दिली आहे. ब्राह्मणाचा वध करणें हें महापातक मानलें आहे. कडकडीत तपश्चर्येनें आपणाला जें कांहीं पाहिजे असेल तें परमेश्वराकडून मागून घेतां येतें अशी लोकांची समजूत होती. विश्वामित्र, रावण, इंद्रजित यांनीं तप करून देवांना प्रसन्न करून घेतलें व आपल्या इच्छा पूर्ण करून घेतल्या असें रामायणकार सांगतात.

**इतर समजुतीः**—सर्व लोकांचा ज्योतिष, स्वप्न, उत्पात, शकून, निमित्त, लक्षण, दिव्य इत्यादि गोष्टींवर भरंवसा होता. प्रयाणकालीं अमुक मुहूर्त असावा, लग्नकालीं अमुक नक्षत्र असावें, अमुक ग्रह शुभ, तमुक अशुभ इत्यादि कल्पना रूढ होत्या. कांचनवृक्ष स्वप्नांत दिसणें, सूर्याला खळें पडणें, ग्रहण लागणें, उल्कापात, तसेंच कावळ्याचें, गिधाडाचें, कुत्र्याचें ओरडणें अशुभ मानीत. मंत्रतंत्रांची आवड लोकांत बरीच होती. दिव्य करून आपली शुद्धता सिद्ध करण्याची चाल प्रचारांत होती, हें सीतेच्या उदाहरणावरून सांगतां येईल.

**व्यसनें:**—दारू व द्यूत हीं दोन व्यसनें फार बोकाळलीं होतीं. त्या दोन्ही व्यसनांची रामायणांत निंदा केलेली आहे. ब्राह्मणदेखील दारू पीत असें दर्शविणारें एक वाक्य दशरथाच्या तोंडीं आहे. भारद्वाजानें भरताच्या सैन्याला दारू पाजून खूष केल्याचा एक उल्लेख आहे. मद्य हें वीरपान आहे, तें पिऊन अंगांत वीरश्री चढते अशी समजूत होती. साखर, मध, द्राक्षें, खजूर किंवा मोहाचीं फुलें यापासून दारू तयार करीत.

द्यूताचे दोन-तीन उल्लेख रामायणांत आहेत. अक्षांनीं म्हणजे फांशांनीं

द्यूत खेळत. द्यूतांत जो हरत असे त्याचे अलंकार, वस्त्रें, काढून घेत असे वर्णन एके ठिकाणीं आहे.

**( ३ ) रामायणकालीन राजकीय स्थितिः--**

**राज्यें**:--या कालीं आर्यांचा विस्तार गंगायमुनेच्या खोऱ्यांत झाला होता. या संपन्न प्रदेशांत त्यांचीं अनेक लहान लहान राज्यें होतीं. विदेह, अयोध्या, कोसल इ. लहान राज्यांचा उल्लेख रामायणांत आहे. सम्राट कोणीही नव्हता. अयोध्येचें राज्य फार पुरातन व मातबर म्हणून श्रेष्ठ समजलें जात असे पण त्यांस सार्वभौमत्वाचा मान नव्हता. या कालीं आर्याआर्यांत झालेल्या एकाही युद्धाचा उल्लेख रामायणांत नाहीं यावरून या राज्यांचे आपापसांतील संबंध सलोख्याचे होते असें वाटतें. प्रत्येकजण आपल्या राज्याचाच फक्त विचार करीत असे.

**दक्षिणप्रवेशः**--या सुमारास विंध्य पर्वत ओलांडून आर्य दक्षिणेकडे येऊं लागले होते. राम दंडकारण्यांत म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांतच आला होता. रावणवध हें आर्यांच्या दक्षिणदिग्विजयाचें लक्षण होय. या दिग्विजयाचें श्रेय एका परीनें अगस्ति ऋषीकडे जातें. त्यानें आपल्या बंधूसमवेत प्रथम दक्षिणेंत येऊन आर्यांना दक्षिणेकडील वाट मोकळी करून दिली. या वेळीं दक्षिणेंत अनार्यांची वसति होती. त्यांना आर्यांचें हें आक्रमण पसंत पडलें नाहीं. ते त्यांच्या यज्ञसमारंभांत वारंवार व्यत्यय आणूं लागले. अशा वेळीं ऋषी राजाकडे संरक्षणासाठीं मदत मागत असत.

दक्षिणेंत आल्यानंतर रामाला अगस्ति, अत्रि वगैरे ऋषींचे आश्रम दिसले. ते एकमेकांपासून फार दूर होते यावरून वसाहतींचें काम फार तुरळक चालू होतें असें वाटतें. दक्षिणेंतील बहुतेक भाग अरण्यमय असून त्यांत वानर, राक्षस वगैरेंची वसति होती. हे वानर व राक्षस कोण होते याबद्दल मोठा वाद आहे. वाली, सुग्रीव, हनुमान यांचीं वर्णनें, भाषणें, कर्तबगारी पाहिली म्हणजे हे लोक पशू नसून आर्यांपेक्षां कमी सुधारलेली एक मानवजात होती असेंच मानावें लागते. त्याचप्रमाणें राक्षस ही एक अनार्य जात असावी. बिभीषण वेदविद्येंत पारंगत होता, लंकेंत वेदघोष चालत होता, मंदोदरी आर्य स्त्री-

प्रमाणें बोलते व वागते या गोष्टी पाहिल्या म्हणजे राक्षसांच्या जातीविषयीं संशय उत्पन्न होतो. या शंकेचें उत्तर कांहीं विद्वान असें देतात कीं, " राक्षस हे अनार्य रानटी लोक होत. पण रावण हा आर्य राजा त्यांचा प्रमुख असून त्यानें लंकेंत आपलें राज्य स्थापन केलें होतें."

**राजाचे अधिकार:–** प्रत्येक राज्याला राजा असलाच पाहिजे असा रामायणकर्त्याचा आग्रह आहे. राज्याला राजा नसेल तर लोकांत सत्त्व राहाणार नाहीं. एकमेक एकमेकांस माशाप्रमाणें खातील, व्यापार बंद होईल, साधु, असाधु यांत भेद राहाणार नाहीं, असें वर्णन रामायणांत आहे. राजा हाच लोकांचा पिता. पित्याप्रमाणें त्याचा अधिकार सर्व प्रजेवर चालत असे.

राजाचे अधिकार अनियंत्रित नव्हते. त्याला सल्लामसलत देण्यासाठीं सचिव, वृद्ध ऋषी, नगरांतील श्रेष्ठ लोक हे असत. महत्त्वाच्या निर्णयाला प्रजेची संमति लागत असावी असें रामाच्या राज्याभिषेकाच्या वेळीं घेतलेल्या प्रजेच्या मतावरून दिसतें. राजाला पदच्युत करण्याचा अधिकारही प्रजेचा होता. एका दुष्ट राजाला प्रजेच्या सांगण्यावरून रामानें वनवासांत पाठविल्याचा उल्लेख रामायणांत आहे. राजाच्या पश्चात त्याच्या थोरल्या मुलाकडे राज्य जात असे. सीता वनांत जाण्यास निघाली तेव्हां कैकयी तिला वल्कलें नेसवूं लागली. तेव्हां वसिष्ठ म्हणाले " सीतेला वनांत जाण्याचें कांहीं कारण नाहीं. रामाचें प्रकृत आसन सीता घेईल." वसिष्ठांच्या या उद्गारावरून नवऱ्याच्यामागें त्याचे अधिकार त्याच्या स्त्रीला प्राप्त होत असावेत असा बोध होतो.

**राजाचें कर्तव्य.–** राजाच्या कर्तव्यांसंबंधीं राम हा एक आदर्श आहे. राजानें स्वतःचें सुख न पाहतां प्रजेचें कल्याण केलें पाहिजे हाच त्या काळचा दंडक असला पाहिजे. कारण चवदा वर्षांच्या दीर्घ वनवासानंतर व रावणाच्या कैदखान्यांतून सीतेची सुटका केल्यानंतर मिळालेलें सुख रामानें प्रजेच्या इच्छेखातर दूर सारलें होतें. यांतील तत्त्व हेंच कीं, प्रजा ही राजाला पोटच्या मुलाप्रमाणें आहे. ती सुखी राहाण्यासाठीं राजानें सदैव झटलें पाहिजे. रामाच्या राज्यांत प्रजा इतकी सुखी होती कीं, ज्या राज्यांत प्रजा सुखी असते त्या आदर्श राज्याला 'रामराज्य' म्हणण्याचा प्रघात रूढ झाला आहे.

**सैन्यः**—पायदळ, रथ, अश्व व हत्ती अशीं सैन्याचीं चार अंगें होतीं. प्रत्येक पथकांत नियमित पायदळ, घोडेस्वार, रथ व हत्ती असत. पथकांच्या संख्येवरून सैन्याला सेना, अनीक, अक्षौहिणी वगैरे नांवें दिलेलीं होतीं. सर्व सैन्याचा नायक राजा हाच असे. तो नसेल तेव्हां त्यांचा भाऊ, मुलगा किंवा इतर कोणी आप्त सेनाप्रमुख होई. बाण, मुद्गल, चक्र, तोमर, गदा, मुसल, शूल हीं त्या वेळचीं मुख्य शस्त्रें होतीं. दारूचा शोध त्या काळीं लागला नव्हता. रथावरील ध्वज हस्तगत करणें याला फार महत्त्व होतें. पर्वतास्त्र, वाय्वास्त्र, नैर्ऋत्यास्त्र इ. अस्त्रांचीं नांवें रामायणांत आहेत.

सेना चालूं लागली कीं तिच्या सुखसोयींसाठीं रस्ते रुंद करणें, पाण्याची सोय करणें, छाया पाहणें वगैरे सोयी करण्यांत येत असत. आपल्या तळाचा पत्ता लागूं नये म्हणून तो सोडतांना जाळून टाकीत. गांवांना किंवा नागरिकांना सैन्याच्या हालचालींपासून उपद्रव होऊं नये याबद्दल फार काळजी घेतली जात असे.

युद्धांत पडलेल्या व जखमी झालेल्या लोकांची व्यवस्था एका सेनाध्यक्षाकडे असे. रामाच्या सेनेंत सुषेण हा वैद्य होता. रात्रीच्या वेळीं मशाली लावून घायाळ झालेल्यांचा शोध करीत.

साम, भेद, दाम व दंड या चार उपायांनीं शत्रूला नामोहरम करीत. शत्रूशीं लढाई करण्यापूर्वीं त्याच्याकडे वाटाघाटी करण्यासाठीं दूत पाठवीत. दूतांचा वध करण्यास बंदी होती. शत्रूकडील बातम्या काढण्यासाठीं हेर होते.

**इतर व्यवस्थाः**—वादी व प्रतिवादी यांचें म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन राजा न्यायनिवाडा करीत असे. राजाकडे तक्रार घेऊन जाणें सर्वांस सुलभ होतें. तक्रारींचा निकाल लावण्यास वेळ लागूं नये याबद्दल फार काळजी घेतली जात असे.

दानाध्यक्ष व कोषाध्यक्ष असे दोन अधिकारी असून त्यांच्याकडे अनुक्रमें दानधर्म व खजिना यासंबंधींची व्यवस्था सोंपविलेली असे.

नगराचा कारभार राजाच्या हातीं असे पण खेडेगांवांत त्याचा प्रतिनिधी काम पाहात असे.

## -उतारे-

**रामायणाची योग्यता**-" रामायणाचा हेतु लोकशिक्षण हाच होय. रामचरित्राचा विशेष स्वार्थत्याग हा होय. हें महाकाव्य ज्याच्या हातीं पडेल तो जर सहृदय असेल तर त्याला या ग्रंथाचें वेड लागल्यावांचून राहणार नाहीं. धीरोदात्त चरित्रें, गंभीर विचार, उच्च हेतु, बहुविध काव्यमय वर्णनें असे विविध संभारानें नटलेले ग्रंथ जगाच्या वाङ्मयांत फारच थोडे आढळतील. त्यांत रामायण हा श्रेष्ठ ग्रंथ आहे. आज हजारों वर्षें या ग्रंथामुळें वाचकांना संकट-प्रसंगीं जीवन व स्फूर्ति मिळाली आहे. " — महाराष्ट्रीय

" संस्कृत साहित्यांतील रामायण हा एक अद्वितीय हिरा आहे, कोणत्याहि कालीं व कोणत्याहि स्थलीं इतकें सुंदर काव्य कोणीहि पाहिलें नाहीं. "

— प्रो. विल्यम.

## -थोडक्यांत-

**रामायणाचा कालः**—कथानक इ. स. पू. २०३२ या कालीं घडलें; रचनाकाल इ. स. चें दुसरें शतक.

**कर्ते**:-वाल्मीकि; बराच भाग प्रक्षिप्त.

**रचनाः**--२४००० श्लोक, ५०० सर्ग, ७ कांडें, अनुष्टुभ छंद.

**महत्त्वः**—काव्य, इतिहास, आदर्श व्यक्तींचें चित्रण या दृष्टीनें श्रेष्ठ.

**सामाजिक स्थितिः**—वर्णाश्रम-व्यवस्था-ब्राह्मण लोभी; क्षत्रीय-वैश्य हीन वृत्तीकडे जाऊं लागले होते.

स्त्रियांची स्थिति-प्रौढ विवाह; विधवांची स्थिति करुणास्पद.

नीतिशास्त्र-पुनर्जन्माबद्दल वाद (जाबाली).

समजुति-अशुभ-शुभ शकुनावर विश्वास.

व्यसनें-द्यूत, दारू.

**राजकीय स्थितिः**—राज्यें-लहान स्वतंत्र राज्यें; साम्राज्याचा अभाव.

दक्षिण-प्रवेश-तुरळक आर्य वसाहतींची सुरुवात.

राजाचे अधिकार-प्रजेचें नियंत्रण.

राजाचें कर्तव्य–प्रजापालन.

सैन्य–सैन्याचीं अंगें, व्यवस्था, शत्रूस जिंकण्याचे मार्ग.

इतर व्यवस्था–न्याय-व्यवस्था; दानधर्म-व्यवस्था.

**प्रश्नः**—( १ ) खालील गोष्टींबद्दल माहिती द्या–

रामायणाचा काल, रामायणाचें महत्त्व, रामायणाची रचना.

( २ ) रामायणकालीन वर्णाश्रम-व्यवस्था, स्त्रियांची स्थिति, लोकांच्या समजुती यांविषयीं माहिती लिहा.

( ३ ) आर्य राजाचें कर्तव्य कोणतें ? रामानें तें कसें पाळलें ?

( ४ ) आर्यांचा दक्षिण-प्रवेश, सैन्य-व्यवस्था, व रामायणकालीन आर्य राज्यांची स्थिति यांविषयीं टिपणें करा.

**स्वाध्यायः**–( १ ) वाल्मीकि रामायणाची मराठी प्रत ( चिपळूणकर-प्रकाशन ) वाचा.

( २ ) रामायण-कथेंतून ऐतिहासिक माहिती कोणती मिळते तें नीट पाहून त्यावर एक निबंध लिहा.

( ३ ) पाश्चात्य देशांतील एका मित्रास रामायणाची थोरवी पटवून द्या.

## प्रकरण १० वें

# आर्ष काल ( भाग २ )

## ( महाभारतकालीन स्थिति )

**( १ ) महाभारताचा काल, कर्ते, रचना, कथानक व महत्त्व;**
**( २ ) महाभारतकालीन सामाजिक स्थिति;**
**( ३ ) महाभारतकालीन राजकीय स्थिति.**

**महाभारताचा काल:**—हल्लींच्या महाभारतांत एक लक्ष श्लोक आहेत. महाभारत एक लक्ष श्लोकात्मक कधीं झालें हें ठरविण्याचा उत्तम पुरावा म्हणजे इ. स. च्या पहिल्या शतकांत हिंदुस्थानांत आलेल्या डायॉनक्राय सोस्टोम या ग्रीक पंडिताच्या लेखाचा. त्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, हिंदुस्थानांत एक एक लक्ष श्लोकांचें महाकाव्य आहे. हें महाकाव्य म्हणजे महाभारतच होय. वर उल्लेख केलेल्या ग्रीक लेखकाचा काल साधारणपणें इ. स. ५० धरल्यास एक लक्ष श्लोकांच्या महाभारताचा काल तोच धरावा लागेल. यवनांचा उल्लेख महाभारतांत वारंवार आला आहे. शिकंदराच्या स्वारीच्या वेळीं आपला व यवनांचा परिचय झाला. ही स्वारी इ. स. पू. ३२० मध्यें झाली. वरील दोन्ही पुराव्यांवरून आपणांस असें म्हणतां येईल कीं इ. स. पू. ३२० पासून इ. स. ५० पर्यंतच्या काळांत हल्लीं उपलब्ध असलेलें महाभारत तयार झालें असलें पाहिजे. याच्या जोडीला इतर अनेक पुराव्यांचा विचार करून भारताचार्य श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं महाभारताच्या **रचनेचा** काल इ. स. पू. २५०-२०० च्या सुमाराचा आहे हें सिद्ध केलें आहे.

महाभारत ग्रंथ ज्या पायावर रचिलेला आहे तो मूळचा भारत ग्रंथ केव्हां झाला असावा याचा विचार करणें जरूर आहे. भारतीय युद्धानंतर तो ग्रंथ झाला हें उघड आहे. मग हें भारतीय युद्ध कधीं झालें ? यासंबंधीं

अनेक विद्वानांनीं आपलीं मतें दिलीं आहेत. श्री. मोडकांच्या मतें तें युद्ध इ. स. पू. ५००० या वर्षी झालें असावें. 'आतां कलियुग सुरू झालेंच असें जाण ' हें श्रीकृष्णाच्या तोंडचें वाक्य महाभारतांत आहे. त्यावरून कलियुगाच्या सुरवातीसच हें युद्ध झालें असलें पाहिजे. आर्यज्योतिषांच्या मतें कलियुग इ. स. पू. ३१०१ मध्यें लागलें. म्हणजे भारतीय युद्धाचा काळ इ. स. पू. ३१०१ हा असावा असें अनुमान निघतें. भारताचार्य श्री. चिंतामणराव वैद्य यांनीं सर्व तर्कांचा विस्तारपूर्वक विचार करून शेवटीं हाच सन मान्य केला आहे. चंद्रगुप्त मौर्यांच्या पदरीं असलेल्या मेगॅस्थिनीस या ग्रीक वकीलाच्या ग्रंथांतील एका महत्त्वाच्या पुराव्यावरून भारतीय युद्धाचा काळ इ. स. पू. ३१०१ हाच असला पाहिजे या विधानास पुष्टी मिळते.

म्हणजे मूळ घटना इ. स, पू. ३००० च्या सुमारास घडली व त्यावर लिहिलेल्या ग्रंथांत भर पडतां पडतां त्याला आजचें एकलक्षात्मक श्लोकांचें स्वरूप इ. स. पू. २५०-२०० च्या सुमारास प्राप्त झालें असें आपण धरून चालूं या.

**महाभारताचे कर्ते:**—महाभारतासारखा एक लक्ष श्लोकांचा प्रचंड ग्रंथ एकाच मनुष्यानें लिहिला असेल ही गोष्ट शक्य वाटत नाहीं. महाभारतांत वर्णन केल्याप्रमाणें व्यास, वैशंपायन व सौति असे तिघेजण या ग्रंथाचे कर्ते आहेत. भारतीय युद्धानंतर व्यासांनीं 'जय' नामक ग्रंथ लिहिला. वैशंपायन व सर्पसत्र करणारा जनमेजय यांच्यांतील प्रश्नोत्तरांची भर पडून या 'जय' ग्रंथाचें 'भारत' झालें व त्यानंतर सौति व शौनक ऋषि यांच्यांतील वादविवादांची भर पडून 'भारता'चें 'महाभारत' झालें. या सर्व ग्रंथाचें श्रेय एकट्या व्यासांना देण्यांत येतें याचें कारण इतकेंच कीं, वैशंपायन व सौति यांनीं घातलेली भर व्यासांच्याच प्रेरणेनें व त्यांच्याच मतांस धरून घालण्यांत आली आहे. महाभारतांतील एक लक्ष श्लोकांपैकीं ८८०० श्लोक व्यासांचे आहेत, २४००० वैशंपायनांचे आहेत व उरलेले सर्व सौतीचे आहेत.

'भारता'चें महाभारत करण्यांत सौतीचे कांहीं ठळक हेतु होते. त्याच्या वेळीं वैदिक धर्मावर बौद्ध व जैन धर्मपंथांचे चौफेर हल्ले सुरू झाले होते. अशा

वेळीं सर्व सनातन तत्त्वें एकत्र करून वैदिक धर्माचें खरें स्वरूप लोकांपुढें मांडणें जरूर होतें. सौतीनें महाभारतांत हें काम केलें आहे. मूळचा ग्रंथ फक्त श्रीकृष्णाच्या स्तुतीनें भरलेला होता. त्याच्या जोडीला शिव, दुर्गा, स्कंद इत्यादि देवतांचीं स्तुतिपर वर्णनें घालून सौतीनें भिन्न उपासकांचा विरोध कमी करण्याचा प्रयत्न केला. आपल्या पूर्वजांविषयीं अभिमान उत्पन्न करण्यासाठीं विस्कळीत असलेलीं रामायण, सरस्वती, नलदमयंति, सावित्रि यासारखीं बोधप्रद आख्यानें किंवा गोष्टी सौतीनें महाभारतांत एकत्र दिल्या आहेत. वैदिक ज्ञानाचा संग्रह करण्यासाठीं महाभारतांत राजनीति, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, भूगोल, ज्योतिष इत्यादि शास्त्रांचा समावेश करण्यांत आला आहे. धर्माचें व नीतीचें शिक्षण देणें हाही एक सौतीचा उद्देश असावा असें विदुर नीतींत दिलेल्या व्यवहार-चातुर्य, धर्म व नीति यांच्या उपदेशावरून ध्यानांत येतें.

**रचना:**—महाभारतांतील एक लक्ष श्लोकांची विभागणी १८ पर्वांत केली आहे. प्रत्येक पर्वांत अनेक अध्याय आहेत. अशा सर्व अध्यायांची संख्या सुमारें २१०९ आहे. प्रत्येक अध्यायांत अनेक श्लोक आहेत. सर्व श्लोकांची बेरीज ८४५२५ इतकी भरते. हरिवंश म्हणून एक भाग मागाहून जोडण्यांत आला, तो १९ वा पर्व मानला जातो. त्यांत १५४८५ श्लोक आहेत. ते धरून महाभारतांतील श्लोकांची एकूण संख्या एकलक्षापेक्षां थोडी जास्त भरते.

**कथानक:**—भारतवर्षांत धृतराष्ट्र व पंडु असे दोन भाऊ होते: धृतराष्ट्राला शंभर पुत्र असून त्यांस कौरव म्हणत. पंडूस पांच पुत्र असून त्यांस पांडव हें नांव होतें. पंडूच्या पश्चात त्याच्या पांच मुलांना राज्य मिळूं न देण्याविषयीं कौरवांची खटपट सुरू झाली. त्यासाठीं त्यांनीं पांडवांस द्यूत खेळण्याचें आमंत्रण दिलें. क्षत्रियधर्मास अनुसरून पांडवांनीं म्हणजे सर्वांत वडील भाऊ धर्मराज यानें तें आमंत्रण स्वीकारिलें. द्यूत खेळतांना लबाडी करून कौरवांनीं पांडवांस सर्वस्व हरावयास लावून बारा वर्षें वनवासास व एक वर्ष अज्ञातवासास पाठविलें. त्याप्रमाणें वनवास व अज्ञातवास भोगून आल्यानंतर पांडवांनीं कौरवांकडे आपल्या राज्याची मागणी केली. श्रीकृष्णामार्फत हें भांडण सामोपचारानें मिटविण्याचा एक प्रयत्नही पांडवांनीं करून पाहिला परंतु दुर्योधनाच्या

उर्मट उत्तरामुळें युद्ध अटळ झालें. दोन्ही पक्षांत अठरा दिवस घनघोर युद्ध होऊन कौरवांचा पूर्ण पराभव झाला आणि पांडवांना राज्य मिळालें.

**ग्रंथांचें महत्त्वः**— भावाभावांतील भांडणाचा एक साधा विषय घेऊन त्यावर या प्रचंड ग्रंथाची उभारणी करण्यांत आली आहे. गृहकलहामुळें व स्वार्थामुळें कोणकोणते अनर्थ ओढवतात हें अनेक वेगवेगळ्या कथांतून अत्यंत परिणामकारक रीतीनें सांगण्यांत आलें आहे. हें सांगत असतांना समाजांतील अनेक गुणदोषांची चर्चा करून व्यवहारज्ञानाचे व नीतीचे सुबोध पाठ देण्यांत आले आहेत. असें करितांना अनेक इतर गोष्टींचा ऊहापोह होणें अपरिहार्य होतें म्हणून महाभारतांत कथा, वर्णनें, पूजा, मतें, उपदेश, उपासना, व्यवहार, तत्त्वज्ञान वगैरे अनेक विषय आले आहेत. यामुळें जगांतील सर्व विषयांची चर्चा झाली आहे. हा ग्रंथ वाचून झाल्यावर आतां नवीन असें सांगण्यासारखें कांहींच उरलें नाहीं असें म्हणावें लागतें. यावरूनच " व्यासोच्छिष्टं जगत्सर्वम् " — म्हणजे व्यासानें सर्व जग उष्टें केलें आहे असें म्हणतात.

महाभारत व श्रीमत् भगवद्गीता या ग्रंथांचीं भाषांतरें जगांतील बहुतेक सर्व प्रमुख भाषांतून झालीं आहेत. महाभारताचें संशोधन हा वेबर, हॉपकिन्स, मॅकडुगल इत्यादि पाश्चात्य विद्वानांचा हौशीचा विषय होता. एवढा प्रचंड ग्रंथ जगांत दुसरा झाला नाहीं व त्या ग्रंथाची सर इतर कोणत्याही ग्रंथास येणें शक्य नाहीं ही गोष्ट सर्वजण एकमुखानें मान्य करितात.

आपणां भारतीयांस तर या ग्रंथांनें अक्षरशः वेडें करून सोडलें आहे. हजारों वर्षांचा काल उलटून गेला असला तरी देखील या ग्रंथावरील आपली भक्ति अजून अणुमात्र कमी झालेली नाहीं. प्रत्येक जुनी पिढी नव्या पिढीला या ग्रंथाचे पाठ देते आणि नवी पिढी ते मोठ्या आनंदानें गिरविते. वीर पुरुषांना या ग्रंथानें अनेकवार स्फूर्ति देऊन कार्यप्रवण केलें आहे. शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी वगैरे थोर पुरुष या ग्रंथाच्या आधारानें आपल्या कार्याची ज्योत तेवत ठेवितात आणि तरुण मनें या ग्रंथांना साक्षी ठेवून स्वातंत्र्यासाठीं प्राणार्पण करितात.

## २ महाभारतकालीन सामाजिक स्थिति

इ. स. पूर्व ३००० पासून इ. स. पू. ३०० पर्यंतच्या कालांतील आर्यांच्या स्थितीचें व हिंदुस्थानांतील परिस्थितीचें प्रतिबिंब आपणांस महाभारतांत पाहावयास सांपडतें. महाभारत हा केवळ एक काव्यग्रंथ नसून आर्यांचा इतिहासही आहे. त्यांत त्यांची सामाजिक, राजकीय, धार्मिक स्थिति, चालिरीति, आचारविचार, नीतिकल्पना इत्यादि गोष्टी आढळून येतात.

**वर्णाश्रम-व्यवस्था:**—या काळीं निव्वळ चारच वर्ण नव्हते. आर्या-आर्यांतील व आर्य-अनार्यांतील संबंधांपासून अनेक जाति निर्माण झाल्या होत्या. या नवीन जातीकडे पाहाण्याची आर्यांची दृष्टि कशी होती हें ब्राह्मण व क्षत्रिय यांपासून झालेल्या सुतपुत्र कर्णाच्या रूपानें महाभारतांत पाहावयास सांपडते. पूर्वीची लग्नाची व धंद्याची मोकळीक दिवसेंदिवस कमी होत जाऊन वर्णांना बद्ध स्वरूप आलें होतें. पूर्वीं नवऱ्याच्या वर्णाप्रमाणें मुलाची जात ठरत असे परंतु अनुशासन पर्वांतील एका उल्लेखावरून तो नियम बदललेला दिसतो. तेथें असें सांगितलें आहे कीं, ब्राह्मणी व क्षत्रिया यापासूनच फक्त ब्राह्मण संतति संभवते. वैश्य किंवा शुद्र स्त्रीच्या पोटीं ब्राह्मण नवऱ्याकडून जन्मास येणारें मूल कधींही ब्राह्मण ठरणार नाहीं. संततीच्या श्रेष्ठकनिष्ठतेबद्दल वाद उत्पन्न झाला होता. उच्चवर्णीयांनीं हलक्या वर्णीयांशीं विवाह करूं नयेत अशी सर्वसामान्य लोकांची इच्छा होती. 'आम्हीं काय वाटेल तें केलें तरी आम्हीं ब्राह्मणच' असा आग्रह ब्राह्मण धरूं लागले असावेत असें युधिष्ठिराच्या एका उद्‌गारावरून दिसतें. "ब्राह्मण कोण?" असा प्रश्न केला असतां त्यानें उत्तर दिलें—"दया, शांति, सदाचार करणारा तोच फक्त ब्राम्हण." प्रत्येक जातीच्या कर्मांतही कालांतरानें बदल होत गेलेला दिसतो. मूळच्या कर्मांशिवाय ब्राह्मण वेतन घेऊन पूजा करूं लागले, ज्योतिष सांगूं लागले, पुरोहित बनूं लागले, मंत्री, दूत, वार्ताहर, सैनिक होऊं लागले व तेवढीच वेळ आली तर शेती, दुकानदारी, गोरक्षण इत्यादि व्यवसाय करूं लागले. वेदपठण व यज्ञ यांतील क्लिष्टता वाढूं लागल्यामुळें क्षत्रियांनीं अधिकार असूनही हें कर्म सोडलेलें दिसतें. युधिष्ठिर वेदांत प्रवीण होता याबद्दल त्याची निंदाच केलेली आढळते. क्षत्रियाला संकट-

प्रसंगीं वैश्यवृत्ति स्वीकारण्यास परवानगी देण्यांत आली. शूद्रांच्या संबंधामुळें वैश्यांनीं अध्ययन सोडलेलें दिसतें. पूर्वींचे कडक निर्बंध सैल होऊन शूद्रांची स्थिति थोडीफार सुधारली. त्यांना द्रव्यसंचय करितां येऊं लागला; शेती करण्याची परवानगी मिळाली व अमंत्रक यज्ञ करण्याचा व दान देण्याचा अधिकारही मिळाला.

आश्रम-व्यवस्थेंतही थोडासा बदल झाला. पूर्वींची गुरुगृहीं जाऊन शिक्षण घेण्याची प्रथा जरी अजिबात नष्ट झाली नसली तरी ऐपत असणाऱ्या क्षत्रियांनीं गुरूलाच आपल्या घरीं ठेवून घेण्याची पद्धति रूढ होऊं लागली होती हें कौरव-पांडवाना शिकविणाऱ्या द्रोणाचार्यांच्या उदाहरणावरून ध्यानांत येंत. अग्निपूजा हें गृहस्थाश्रमांतील कर्म प्रत्येकजण अत्यंत कसोशीनें पाळीत असे. शिष्टाईला जाण्याची घाई असूनही श्रीकृष्णानें आणि वनवासांतील खडतर कालांत पांडवांनीं हें कर्म पाळिलें होतें. आपली पत्नी व भावजय यांना घेऊन धृतराष्ट्र वानप्रस्थाश्रमाला गेला होता यावरून त्या आश्रमाची महती कायम होती असें वाटतें. अरण्यांत बसून तप करणाऱ्या एका शूद्राचा वध करण्यांत आला या गोष्टीवरून शूद्रांना हा अधिकार नव्हता हें स्पष्ट दिसतें. संन्यास घेण्याचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे काय यावर निर्माण झालेला वाद महाभारतांत आढळतो. स्त्रियांनीं संन्यास घेतल्याचीं उदाहरणें महाभारतांत आहेत.

**स्त्रियांची स्थितिः**–द्रौपदीला दिलेल्या 'पंडिता' या पदवीवरून स्त्रियांना शिक्षण देण्याची वहिवाट चालू होती असें दिसतें. लिहिणें, वाचणें व धर्मज्ञान हे मुख्य विषय होते. त्याशिवाय क्षत्रिय स्त्रियांना गायन, नृत्य, वादन इत्यादि कलांचें शिक्षण मिळत असे. स्त्रियांनीं शिकलेंच पाहिजे असा आग्रह नव्हता. नियोग पद्धतिमुळें ( पतीच्या असमर्थतेमुळें दुसऱ्याकडून संतति घेणें ) निर्माण होणारे दोष ध्यानांत आल्यामुळें पातिव्रत्याचें महत्त्व समाजाच्या मनावर ठसविण्यासाठीं द्रौपदी, दमयंती, सावित्रि इत्यादि स्त्रियांचा आदर्श तयार करण्यांत आलेला दिसतो. नलदमयंतीच्या संवादावरून पुनर्विवाहाला देखील बंदी करण्यांत आली असावी असें अनुमान निघतें. विवाहप्रसंगीं मुली चांगल्या जाणत्या व

प्रौढ असत. मुलीनें अविवाहित राहूं नये; बापाची पर्वा न करतां प्रत्येक स्त्रीनें विवाह करावाच असा दंडक होता.

पांडवांपैकीं अर्जुन, भीम वगैरेंनीं द्रौपदीशिवाय इतर अनेक स्त्रिया केल्या होत्या त्यावरून बहुपत्नीकत्वाची चाल याकालींही चालू होती हें उघड आहे. एका स्त्रीनें अनेक पती करण्याची एक विचित्र चाल महाभारतांत आढळते. हिमालयाच्या बाजूनें आलेल्या चांद्रवंशीय आर्यांत ही चाल होती. मात्र स्त्रीनें करांवयाचे सर्व पति एकाच कुटुंबांतील असावेत असा त्या बाबतींत नियम होता. ही चाल हिंदुस्थानांत रूढ होऊं शकली नाहीं.

विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं ब्राह्म, क्षात्र, गांधर्व, असुर व राक्षस हे पांच प्रकार या कालीं रूढ होते. पण लावून विवाह होत हें द्रौपदीच्या उदाहरणावरून दिसतें. त्या समारंभाला स्वयंवर म्हणत. या समारंभांत ब्राह्मणदेखील भाग घेत. द्रौपदीच्या स्वयंवराला पांडव ब्राह्मणवेशानें उपस्थित होते.

सतीची चाल चालू होती. पंडूबरोबर माद्री व श्रीकृष्णाबरोबर त्याच्या अनेक स्त्रिया सतीं गेल्याचीं उदाहरणें आहेत. अनाथ व विधवा स्त्रियांसाठीं पडद्याची चाल होती. चांद्रवंशीय आर्यांत मामाच्या मुलीबरोबर विवाह निषिद्ध मानीत नसत हें अनिरुद्ध-रुक्मी व अर्जुन-सुभद्रा यांच्या विवाहावरून ध्यानांत येतें.

**आहार**:—जय, भारत व महाभारत या ग्रंथांची रचना भिन्न काळीं झाली असली पाहिजे हें आहाराच्या निषिद्ध-अनिषिद्धतेवरून सांगतां येईल. पशु-पक्ष्यांचें मांस खाणारे ब्राह्मण, मधुपर्क-समारंभांत बैल मारणारे आर्य यांचा उल्लेख जसा महाभारतांतच आहे तसाच गाई-बैलांची हिंसा करणें पाप, पशुबळी-ऐवजीं धान्याचा किंवा पिठाचा बळी देणें, मांस खाणें, न खाणें या गोष्टींचा उल्लेखही आहे. आत्यंतिक हिंसेकडून अहिंसेकडे जाणाऱ्या समाजाचें हें चित्र आहे. दारु पिण्याची चाल महाभारतकालींही जोरांत चालू होती. मात्र दारूच्या दुष्परिणामाविषयींचा इशारा देतांना असें म्हटलें आहे कीं, 'दारूच्या एका थेंबानें ब्राह्मणाचें ब्राह्मणत्व नष्ट होईल.' तांदूळ, गहूं, सातु, मांस, दूध, तूप इत्यादि पदार्थ

जेवणांत असत. कांदा व लसूण फक्त चांडाल लोक खात. मेंढी, घोडी व गाढवी यांचें मांस निषिद्ध मानीत. जेवण फक्त दोनदांच घेत.

**पोषाख:**—पुरुषांचा पोशाख म्हटला म्हणजे एक नेसण्याचें वस्त्र ( अन्तरीय ) व दुसरें पांघरण्याचें वस्त्र ( उत्तरीय ). महाभारतांत शिंप्याचा उल्लेख नाहीं, यावरून ही कला आर्यांस माहीत नव्हती असें दिसतें. डोक्याला उष्णीष म्हणजे पागोटें असे. पुरुषप्रमाणेंच परंतु जास्त लांबीचीं दोन वस्त्रें स्त्रिया नेसत. विधवा स्त्रिया पांढरें उत्तरीय डोक्यावरून घेत. कपडे सामान्यतः कापसाचेच असत. सभेंतील श्रीमंत लोकांच्या वर्णनावरून रेशमी वस्त्रें प्रचारांत होतीं असें वाटतें. संन्यासी, भिक्षु हे लोक वल्कलें व हरणाचें कातडें वापरीत. लांकडाच्या किंवा कातड्याच्या वहाणा वापरण्याचा प्रघात रूढ होत चालला होता.

**अलंकार:**—सोन्या-चांदीचे, विविध प्रकारचे व कमीअधिक मौल्यवान अलंकार सामान्य लोकांच्याही अंगावर आढळून येत. श्रीमंत जडजवाहीर वापरीत. गाई, घोडे, हत्ती यांच्या अंगावर देखील अलंकार घालीत असत. मुकुट, कुंडलें, हार, केयूर, कडीं, बिंदी, कांची, नूपुर असे नाना प्रकारचे दागिने त्या काळीं होते.

**व्यसनें:**—वेश्यावर्ग अस्तित्वांत होता. आर्यांना द्यूत खेळण्याचें इतकें वेड होतें, कीं द्यूताचें आव्हान न स्वीकारणें हें कमीपणाचें समजत. या रूढी-पायींच पांडवांना वनवासांत जावें लागलें. लोकांत शिकारीची आवड फार होती.

**इतर माहिती:**— वडीलधाऱ्या मंडळींना फार मान मिळत असे. वयानें वृद्ध व ज्ञानानें श्रेष्ठ असा मनुष्य वंदनीय असे. ब्राम्हणाला राजदरबारांत फार मान असे. कर्तृत्व, उद्योग, महत्त्वाकांक्षा, शील व पराक्रम हे गुण श्रेष्ठ मानले गेले होते.

श्रीमंत लोक हत्तीवरून फिरत. ओझ्यासाठीं बैलाच्या गाड्या वापरीत. गायनाचा शोक विशेष होता. वीणा वाद्य फार लोकप्रिय होतें. शहराच्या बाहेर विस्तीर्ण बागा होत्या. आर्यांना उत्सव-समारंभाची फार आवड होती.

## महाभारतकालीन राजकीय स्थिति

**लहान लहान राज्यें:**— या काळीं राज्यांचीं नांवें लोकांवरून किंवा

राजावरून ठरत असत. महाभारतांत देशांच्या यादींत २१२ लोकांचें वर्णन केलें आहे त्यावरून इतक्या लोकांचीं लहान लहान पण स्वतंत्र राज्यें होतीं हें
५ उघड आहे. राज्याराज्यांत वारंवार युद्धें चालत. या युद्धांचा हेतु एकमेकांस नष्ट करण्यापेक्षां एकापेक्षां दुसऱ्यानें वरचढ होणें हाच असे. सूर्यवंशीय आर्यांनी पंजाबापासून हिमालयाच्या कडेकडेनें कोसल-विदेहापर्यंत आपलीं राज्यें स्थापन केलीं होतीं. चांद्रवंशीय आर्यांनीं गंगेच्या खोऱ्यांतून येऊन गंगायमुनेच्या दक्षिण किनाऱ्यानें व मध्यभारतांत आपलीं राज्यें स्थापन केलीं होतीं. शिकंदराच्या आगमनापर्यंत हीं लहान लहान राज्यें टिकून होतीं. प्रत्येक राज्याला राजधानी असून त्याभोंवतालच्या प्रदेशाचा त्यांत समावेश होत असे. कोसल, विदेह, कुरु, पांचाल, मत्स, गांधार, भोज, मालव, सिंधु, कांभोज हीं तत्कालीन कांहीं राज्यांचीं नांवें आहेत.

**राजसत्ता:**— प्रत्येक राज्याला राजा असे. मात्र राजापेक्षांही विद्वान
६ ब्राह्मण श्रेष्ठ मानला जात असे. विशेष महत्त्वाच्या प्रसंगीं राजे लोक आपल्या प्रजेचें मत घेत असत. युद्धासारख्या गंभीर प्रसंगीं सर्व विद्वान मंडळींची एक सभा बोलावून तेथें त्यांचें मत काय आहे हें समजावून घेतलें जाई. युधिष्ठिरानें राज्याभिषेकाच्या वेळीं प्रजेच्या संमतीची याचना केली या गोष्टीवरून या काळींही राजा हा प्रजेकडून निवडला जात असावा असें वाटतें. कांहीं ठिकाणीं प्रजासत्ताक राज्यपद्धति चालू असल्याचा उल्लेख बौद्ध वाङ्मयांत व ग्रीक लोकांच्या ग्रंथांत आढळतो. वर्णव्यवस्था ज्या प्रमाणांत दृढ होत गेली त्या प्रमाणांत राजसत्ता क्षत्रियांच्या हातांत दृढ होत गेली.

**साम्राज्य-कल्पना:**— राजानें आपण सम्राट झाल्याचें जाहीर करण्यासाठीं राजसूय यज्ञ करणें अवश्य असे. त्याप्रमाणें भारतीय युद्धांत विजयी झाल्यानंतर पांडवांनीं हा यज्ञ केला होता. महाभारतकालीं राजसत्ता जरी दृढ झालेली दिसत असली तरी सुद्धां लोकांच्या रक्षणासाठीं केलेले कायदे राजानें मोडूं नयेत, लोकांना दिलेले अधिकार आपल्या मर्जीनुरूप कमी करूं नयेत; नवीन कायदे करण्याचा अधिकार राजाला नाहीं, कायद्याचें उगमस्थान परमेश्वर किंवा ब्रह्मदेवाची आज्ञा हें होय असे दण्डक राजसत्तेवर लादलेले

महाभारतांत आढळतात. धर्मशास्त्रांत व राजनीतींत सांगितलेल्या कायद्यांची समबुद्धीनें व निःपक्षपातीपणानें अंमलबजावणी करणें एवढेंच राजाचें काम. लोकसभेचा सल्ला व अधिकार न मानणाऱ्या राजाला गादीवरून काढून टाकण्याचा अधिकार ऋषींचा आहे असें महाभारतांत म्हटलें आहे. अराजकतेचे दुष्परिणाम वर्णन करून अशा स्थितीपेक्षां जुलमी राजा परवडला असें महाभारतकार सांगतात. राजाला ईश्वरस्वरूप मानून त्याच्याबद्दल प्रत्येकानें पूज्यबुद्धि बाळगावी अशी इच्छा व्यक्त करण्यांत आली आहे. जिंकलेल्या राजास पदच्युत करूं नये. तो जिवंत असल्यास त्याला किंवा मृत असल्यास त्याच्या मुलाला किंवा इतर नातेवाईकाला ती गादी द्यावी असा नियम महाभारतकालीं होता.

**दंडस्वरूपः**—प्रजापालन व प्रजेस न्याय देणें हें राजाचें आद्य कर्तव्य मानण्यांत आलें होतें. त्यानें दुष्टास शिक्षा करून सज्जनांचा संभाळ करावा म्हणून सांगितलें आहे. मंत्री, हेर, युवराज, अमात्य, राष्ट्र, दुर्गबल व कोष हीं राज्याचीं मुख्य सहा अंगें होतीं. शत्रूंशीं साम, दाम, दंड, भेद व उपेक्षा या मार्गांनीं वागावें असा उपदेश केला आहे. प्रजेस न्याय देणें, चोरांचें निर्मूलन करणें, दुर्बलांचें रक्षण करणें, कर्तृत्ववान लोकांस प्रोत्साहन देणें या संबंधीं राजानें कसें वागावें, काय करावें, काय करूं नये याबद्दलचा सूक्ष्म विचार महाभारतांत दिला आहे.

**राजदरबारः**— प्रत्येक राज्याला राजधानी असे. राजधानीजवळ एक किल्ला असे. वालुकादुर्ग, डोंगरी, भुईकोट, मातीचा किल्ला, नरदुर्ग व अरण्यदुर्ग असे किल्ल्याचे सहा प्रकार महाभारतांत वर्णन केले आहेत. किल्ल्याभोंवतीं खंदक असून त्यांत भरपूर पाणी असे. शस्त्रें ठेवण्यासाठीं आयुधागार, कोष्ठागार, व कोषागार अशीं खातीं असत. अनुशासन पर्वांत प्रत्येक राजाला आठ मंत्री असावेत, असें सांगितलें आहे. इतर प्रमुख अधिकाऱ्यांची संख्या १४-१८ ठरविण्यांत आली आहे. अधिकारी नेमावयाचा तो हुषार, प्रामाणिक, सदाचारी असावा; शक्यतों वंशपरंपरेनें अधिकार द्यावेत; अधिकाऱ्यांशीं ममतेनें वागावें, त्यांचा मान राखावा; त्यांस पगार द्यावा, पुरोहिताची स्वतंत्र नेमणूक करावी;

राज्यांतील व बाहेरील माहिती काढण्यासाठीं हेर नेमावेत; स्वतःच्या संरक्षणासाठीं रक्षक नेमावेत इत्यादि सूचना महाभारतकारांनीं राजाला दिल्या आहेत.

**मुलकी कारभारः—** प्रत्येक गांवावरील प्रमुख अधिकाऱ्याला ग्रामाधिपति म्हणत. त्याच्यावर १०, २०, १००, १००० अशा क्रमानें इतर अधिकार असत. ग्रामाधिपतीला अरण्यांतील उत्पन्न वेतन म्हणून मिळत असे. १०० गांवांवरील अधिकाऱ्यास एक गांव आणि १००० गांवांवरील अधिकाऱ्यास एक शहर इनाम म्हणून मिळत असे. सर्व राज्याच्या मुलकी कारभारासाठीं हल्लींच्या गृहमंत्र्याप्रमाणें एक स्वतंत्र अधिकारी असे. शहराला नगराधिपति नांवाचा स्वतंत्र अधिकारी असे.

**वसूलः—** वसुलाची मुख्य बाब म्हणजे जमिनीवरील व व्यापारावरील कर. वसूल धान्याच्या किंवा सोन्याच्या रूपानें घेत. उत्पन्नाच्या एकदशांश भाग कर म्हणून द्यावा लागे. जमा केलेल्या धान्यासाठीं कोठारें बांधलेलीं असत. जमिनीची मालकी लोकांकडे असे. धनगर व गवळी आपल्याजवळील पशूंपैकीं एकपन्नासांश भाग राजास देत. व्यापारावरील कर एकपन्नासांश असे. कारागिरावरही कर असे. कर वसूल करितांना प्रजेला थोडादेखील त्रास होऊं नये याबद्दल काळजी घेत. प्रजा, राष्ट्र व राजा यांचे संबंध वर्णन करितांना एके ठिकाणीं असें वर्णन आहे कीं, "प्रजा हें वांसरूं, राष्ट्र ही गाय व राजा हा दूध काढणारा आहे." संकटप्रसंगीं कर न वाढवितां राजानें कर्ज काढावें व पुढें तें फेडावें असें सांगितलें आहे. कराच्या इतर बाबी म्हणजे वाहतुक, खाणी, मीठ, नदी, जंगल, बाजार या होत्या. वसुलीसाठीं विश्वासू मंत्री नेमण्यांत येत. जमिनीची मोजणी व मापणी केली जात असे. राजाची स्वतःच्या मालकीची जमीन व पशूंचीं खिल्लारें होतीं. सहदेवाला पशूंच्या रोगांची चांगली माहिती होती यावरून त्या वेळींही पशुवैद्य होते असें मानावयास हरकत नाहीं.

फौज, राजदरबार, राजाचा खाजगी खर्च, संरक्षण व पाटबंधारे या गोष्टींवर मुख्यतः खर्च होत असे. इनामें व अग्रहार राजानें चालवावेत म्हणून सांगितलें आहे. जमाखर्चाचें खातें स्वतंत्र असून त्यावर राजाची देखरेख होती. खजिना

नेहमीं भरलेला असून शिल्लक नेहमीं जास्त असावी असें वारंवार बजाविण्यांत आलें आहे.

**न्यायखातें:**—न्यायदरबारांत राजा बसत असे. त्याला मदत करण्यासाठीं न्यायसभा असे. त्यांत ४ ब्राह्मण, ८ क्षत्रिय, २१ वैश्य व ३ शूद्र असत. न्यायाच्या बाबतींत लांच घेऊं नये याबद्दल विशेष आग्रह धरला जात असे. स्वत:च्या मताप्रमाणें न्याय न देतां साक्षीपुराव्यांचा विचार करून मगच राजा न्याय देत असे. अपराधी श्रीमंत असेल तर त्यांस दंड, गरीब असेल तर त्यास कैद व दुष्ट असेल तर त्यास फटके देत. हत्या करणारे, आग लावणारे, चोर, जातिभ्रष्ट यांचा वध केला जाई. अन्याय केल्यास पातक लागतें या समजुतीमुळें न्याय योग्य दिला जाई. निकाल होतांच त्याची अंमलबजावणी होत असे.

**परराष्ट्रसंबंध:**—राज्याराज्यांचीं आपापसांत वारंवार भांडणें होत असत. यामुळें आपलें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं प्रत्येकजण जागरूक राहात असे. परशत्रूस जिंकावे कसें, आपलें स्वातंत्र्य टिकवावें कसें, मित्रराष्ट्रें कशीं संपादन करावींत, मांडलिक राजांशीं कसें वागावें यावद्दलच्या महाभारतकारांनीं दिलेल्या सूचना अत्यंत मार्मिक व परिपूर्ण आहेत. राजानें कधींही स्वस्थ बसं नये, दुसऱ्या देशावर स्वारी करावी अशी आज्ञा दिली आहे. लढाईचे नियम ठरलेले असत. देश जिंकतांना सरळ किंवा क्वचित कुटिल मार्गांचाही अवलंब करीत असत. प्रजेला आपल्या राजाबद्दल अभिमान व निष्ठा वाटत असे.

**सैन्य व युद्ध:**—युद्धप्रसंग वारंवार येत असत यामुळें सैन्याची पद्धति, रचना, युद्धाचे प्रकार इत्यादि बाबतींत फार प्रगति झाली होती. पदाति, अश्व, हत्ती व रथ असे सैन्याचे चार प्रकार होते. सैनिकाला धान्याच्या किंवा पैशाच्या रूपांत पगार मिळे. सैन्यांत एकापेक्षां एक वरचढ अधिकारी असत. सर्व सैन्याला धूर्त, शूर, दक्ष, बुद्धिमान, व्यूह व मंत्र जाणणारा, थंडीवाऱ्यास दाद न देणारा असा सेनापति असे. ढाल, तलवार, प्रास, परशू, भिंडीपाल, तोमर, गदा हीं मुख्य शस्त्रें होतीं. रथांचा उपयोग फार होत असे. अग्निबाण, विषबाण, वायुबाण असे बाणाचे नाना प्रकार होते. युद्धांत अस्त्रांचा व व्यूहांचा

उपयोग करीत असत. धर्मयुद्ध होत असे व त्याचे नियम ठरलेले असत. अक्षौहिणी ही सैनिकांची एका विभागांतील संख्या होय. व्यूह रचण्याची कला बरीच परिणत झालेली होती.

**व्यवहार व उद्योगधंदे**:—व्यापाराच्या व उद्योगधंद्याच्या वाढीकडे राजाचें लक्ष असे व त्यासाठीं एक स्वतंत्र खातें असे. शेती, व्यापार व गोरक्षण हे तीन मुख्य धंदे होते. शेती सुधारणें हें राजाचें प्रमुख कर्तव्य मानलें गेलें होतें. त्यासाठीं तलाव, तळीं, पाटबंधारे यांची सोय करण्यांत आली होती. शेतकऱ्यांस बीं व चार महिन्याचें धान्य सरकारांतून मोफत मिळे. जनावरांची फार काळजी घेण्यांत येई. समुद्रावरून परदेशांशीं व्यापार चालू होता. कापसाचीं, रेशमाचीं व लोकरीचीं वस्त्रें विणण्याचा धंदा चालू होता. कारागिरास सरकारांतून मदत मिळत असे. रंग तयार करण्याची कला साध्य झाली होती. याकाळच्या लोकांना धातूंची व रत्नांची चांगली माहिती होती. मयसभेच्या व लाक्षागृहाच्या वर्णनावरून इमारती बांधण्याची कला फार प्रगत झालेली दिसते.

व्यापार मुख्यतः वैश्यांकडे होता. ते भूमि ( खुष्की ), समुद्र, नद्या, या मार्गांनीं मालाची नेआण करीत. सुती व रेशमी वस्त्रें, रत्नें, सुगंधी पदार्थ, मसाल्याचे जिन्नस यांचा व्यापार होत असे. धंदेवाल्यांचे निरनिराळे संघ असत. वजनें व मापें रूढ झालीं होतीं. गुलामांचा व्यापार या काळीं नव्हता.

**श्रीमत् भगवद्गीता**:—महाभारतांत जीं आख्यानें आहेत त्या सर्वांत श्रीभगवद्गीता श्रेष्ठ समजली जाते. प्रत्यक्ष महाभारतांत या गीतेची अनेकवार स्तुति केली आहे. तिच्याबद्दलचा आदर सर्व काळच्या व सर्व जगांतल्या भाषांत अनेक ठिकाणीं व्यक्त करण्यांत आला आहे.

महाभारताप्रमाणें याचे कर्ते अनेक नाहींत. हा ग्रंथ अथपासून इतिपर्यंत एकाच दिव्य कल्पनेनें भारलेला, सर्वांगसुंदर व सुसूत्र आहे. सौतीनें स्वतः गीता लिहिलेली नाहीं. गीतेचें अनुकरण करून त्यानें अश्वमेध पर्वांत अनुगीता नांवाचा भाग घातला आहे.

कांहींच्या मतें गीतेंतही बरीच भर मागाहून घालण्यांत आली असली पाहिजे. परंतु भारताचार्य श्री. चिंतामणराव वैद्य यांच्या मताप्रमाणें हा ग्रंथ

एकाच लेखकाचा असला पाहिजे. कारण भाषा, कवित्व, विषय-प्रतिपादन, छंदोरचना या दृष्टींनीं तो ग्रंथ एकाच प्रतिभावान पुरुषावांचून दुसरा कोणी तयार करणें अशक्य आहे. तेव्हां श्रीकृष्ण हाच या ग्रंथाचा एकमेव कर्ता असला पाहिजे; इतर कोणीही त्यांत वांटेकरी नाही.

गीता ग्रंथ तत्त्वज्ञानविषयक आहे. मुळांत त्याचा भारताशीं कांहीं संबंध नसावा; सौतीनें ज्याप्रमाणें इतर अनेक गोष्टींचा संग्रह आपल्या महाभारतांत करून घेतला त्याप्रमाणें याही ग्रंथाचा समावेश त्यानें महाभारतांत करून घेतला असला पाहिजे असें कांहीं विद्वान मानतात. परंतु भारताचार्यांच्या मताप्रमाणें हें म्हणणें निरर्थक आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, गीतेची कल्पना श्रीकृष्ण व अर्जुन यांशिवाय होऊंच शकत नाहीं. गीतेंत वारंवार युद्धाबद्दलचा उल्लेख आहे. आणि ज्या ग्रंथांत श्रीकृष्ण व अर्जुन यांचा इतिहास सांगितला आहे, त्याच महाभारतांत श्रीकृष्णाचे विचार येणें जास्त संभवनीय आहे. तसें आहे असें मान्य केल्यास गीता मूळच्या भारताचा एक भाग आहे हें मान्य केल्यावांचून गत्यंतर नाहीं.

प्रथमदर्शनीं अशी शंका येते कीं, रणांगणावर एवढा विस्तृत व तत्त्वज्ञान-विषयक ग्रंथ सांगणें कसें शक्य आहे ? भारताचार्यांनीं या शंकेला उत्तर देतांना असें सांगितलें आहे कीं धर्मयुद्धाचे नियम, सैन्यरचना करण्यास लागणारा वेळ, युद्धभूमीचा विस्तार या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे ही गोष्ट असंभवनीय वाटत नाहीं. भारतीय युद्धाच्या वेळींच हा ग्रंथ तयार झाला असला पाहिजे असें त्यांचें ठाम मत आहे.

मनुष्याच्या उन्नतीस आध्यात्मिक व आधिभौतिक गुणांची अवश्यकता आहे. आर्यांच्या अंगीं जेव्हां हे दोन्ही गुण होते तेव्हां त्यांची प्रगति फार झपाट्यानें झाली. पुढें या गुणांतील समतोलपणा नष्ट होऊन एकाच गुणाकडे विचारांची दिशा झुकूं लागली. ऐहिक गोष्टींचा लोभ अधिक वाढूं लागला हें महाभारतांतील जरासंध, कंस, दुर्योधन या व्यक्तींच्या जीवनावरून ध्यानांत येतें. यज्ञयाग केल्यानें मोक्षप्राप्ति होते या विचाराचें प्राबल्यहि फार झालें होतें. अशा वेळीं निर्लोभवृत्तीनें आपलें कर्तव्य करीत राहावें असा उपदेश समाजाला करणें आवश्यक

होतें. तें काम श्रीकृष्णानें केलें. युद्धाला उभें राहिल्यानंतर ' मी माझ्या बांधवांना कसें मारूं ' असा संभ्रम अर्जुनाला झाला. तेव्हां ' फलाची आशा न धरितां तूं तुझें कर्तव्य कर ' असा उपदेश श्रीकृष्णानें त्यास केला. हाच उपदेश म्हणजे या ग्रंथाचें सार होय. या उपदेशांत ज्ञानेश्वरांना भक्तिमार्ग दिसला, लोकमान्य टिळकांना कर्मयोग आढळला, तर महात्माजींना अनासक्तियोग सांपडला. अशा रीतीनें जो तो विद्वान आपल्या विचाराचें प्रतिबिंब या ग्रंथांत पाहातो. याचा अर्थ इतकाच कीं, या ग्रंथांत सर्वच गोष्टींचें थोडक्यांत सार आलें आहे. त्यामुळेंच हा ग्रंथ आपल्या धर्माचा प्रमाण-ग्रंथ मानावयास हरकत नाहीं.

## —उतारे—

**राजाचें कर्तव्य:—**" ज्याप्रमाणें स्त्री आपल्या मुलाची काळजी वाहते त्याप्रमाणें राजानें आपल्या प्रजेची काळजी वाहावी. त्यानें दुसऱ्याच्या धनाचा लोभ धरूं नये. जे पीडित व दुःखित असतील त्यांचें पोषण करावें. शूरांचा अवमान करूं नये. वृद्ध व अनुभवी लोकांशीं नेहमीं दळणवळण ठेवावें. कधींही आळशी होऊं नये. कोणत्याही प्रसंगीं धैर्य सोडूं नये. प्रसन्न मुद्रेनें प्रजेस दर्शन द्यावें. कोणासही भेटीस प्रतिबंध करूं नये. "

**श्रीगीतेची थोरवी:—**" मोठमोठ्या पंडितांना गुंगविणारे आत्मविद्येचे गूढ सिद्धांत अत्यंत स्पष्टपणें थोडक्यांत व प्रासादिकपणें मांडणारा, भक्ति, ज्ञान कर्म या तीनही मार्गांचा सुंदर समन्वय घालणारा, संसारदुःखांनीं त्रस्त झालेल्यांस चिरशांति देऊन त्यांस धर्माचरणाचें निष्काम कर्मयोगी स्वरूप सांगणारा गीतेसारखा सुबोध व सुंदर ग्रंथ जगांतील वाङ्मयांत क्वचितच सांपडेल. "

—डॉ. बाळकृष्ण.

## —थोडक्यांत—

**काल:**—कथानक काल इ. स. पू. ३०३२; रचना-काल:—इ. स. पू. २५०–२००.

**कर्ते:**—व्यास, वैशंपायन व सौति.

**रचना:**—१ लक्ष श्लोक, १८ पर्वें, अनेक अध्याय, स्वतंत्र हरिवंश.

**महत्त्वः**—व्यवहारज्ञान व कलहाचे दुष्परिणाम सांगणारा आणि राजनीति शिकविणारा ग्रंथ.

**सामाजिक स्थितिः**—चार वर्णांत अनेक नव्या जातींची भर. विवाह व धंदे याबाबतचे कडक निर्बंध.

**वर्णाश्रमः**—ब्राह्मणांचा मोठेपणाचा आग्रह; यज्ञांतील क्लिष्टता; गुरूचें महत्त्व कमी; आश्रमांचें योग्य पालन.

**स्त्रियांची स्थितिः**—स्त्रिया सुशिक्षित, पातिव्रत्यास मान, बहुपत्नीकत्व होतें; बहुपतीत्व रूढ नव्हतें; विवाहाचे आठ प्रकार; सतीची व नियोगाची चाल.

**राजकीय स्थितिः**—राज्यें—लहान लहान पण स्वतंत्र; आपापसांत भांडणें.

राजसत्ता—राजाच्या हातांत सर्व सूत्रें; प्रजेच्या हक्कांकडे दुर्लक्ष नव्हतें.

मुलकी कारभारः—गांवचा मुख्य अधिकारी ग्रामाधिपति; नगरासाठीं नगराधिपति; जमिनीवरील व व्यापारावरील कराचें मुख्य उत्पन्न.

युद्धकालः—युद्धकलेंतील प्रगति व युद्धाचे प्रकार; शस्त्रें.

**प्रश्न :**—( १ ) खालील गोष्टींविषयीं माहिती द्या.—
महाभारताचा काल; महाभारताचे कर्ते; महाभारताचें महत्त्व.

( २ ) महाभारतकालीं आर्यांच्या समाजाची अधोगति कोणकोणत्या बाबतींत झाली होती ?

( ३ ) महाभारतकालीन आर्यांच्या राजकीय स्थितीची माहिती द्या.

( ४ ) रामायणकाल व महाभारतकाल यांतील सामाजिक व राजकीय स्थितीची तुलना करा.

**स्वाध्यायः**—( १ ) महाभारताची मराठी प्रत ( यंदे-प्रकाशन ) वाचा.

( २ ) महाभारताच्या कथेंतील ऐतिहासिक गोष्टी शोधून काढा.

( ३ ) महाभारतांतील तुमच्या आवडत्या व्यक्तीविषयीं माहिती मिळवून त्याचें एक छोटें चरित्र लिहा.

( ४ ) गीतेंतील एखादा तरी अध्याय पाठ करून गीतेच्या वार्षिक चढाओढींत भाग घ्या.

## प्रकरण ११ वें

# बौध्द काल

**१ आर्षकालअखेर आर्यांची सामाजिक स्थिति;**
**२ जैन धर्म;**
**३ बौद्ध धर्म;**
**४ बौद्ध धर्माच्या प्रसाराचीं कारणें.**

**प्रास्ताविकः**—आर्ष कालाचे अखेरीस आर्यांची समाजरचना जुनीपुराणी होऊन मोडकळीस आली. त्याच वेळीं भारतवर्षांत धर्मसुधारणेची व समाजजागृतीची एक प्रचंड लाट उसळून त्याखालीं आर्यांची समाजव्यवस्था कांहीं काल गुडप होऊन गेली. इ. स. पू. ५०० पासून पुढील सुमारें हजार वर्षांचा काळ म्हणजे या धर्मसुधारणेचा व समाजसुधारणेचा इतिहास होय. या काळीं बौद्ध व जैन धर्म उदयास आले व त्यांनीं हें धर्मजागृतीचें प्रचंड कार्य हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर घडवून आणिलें. या कार्याची गति व विस्तार एवढा आश्चर्यकारक होता कीं त्यापुढें सर्व जग थक्क होऊन गेलें. या दोन धर्मांपैकीं बौद्धधर्माला मिळालेली लोकप्रियता व त्याचा झालेला अफाट विस्तार या दोन कारणांमुळें या कालाला बौद्ध काल हेंच नांव देणें योग्य होईल.

### १ आर्षकालअखेर आर्यांची सामाजिक स्थिति

**श्रेष्ठत्वाचा आग्रहः**—समाज सुरळीत चालून प्रत्येकास सुख लाभावें म्हणून आर्यांनीं वर्णव्यवस्था सुरू केली होती. प्रारंभींच्या काळांत वर्णव्यवस्थेचा हा हेतु सिद्धीसही गेला होता. त्या काळीं त्रैवर्णिक आर्यांचा वर्ण जन्माप्रमाणें न ठरतां कर्माप्रमाणें ठरत असे. परंतु पुढील काळांत ही व्यवस्था टिकूं शकली नाहीं. लग्नाचे व धंद्याचे निर्बंध कडक होत गेले व वर्णसंकराच्या भीतीनें जो तो आपलें रक्त शुद्ध राखण्याचा प्रयत्न करूं लागला. यामुळें प्रत्येकाची जात

कर्मापेक्षां जन्मावर ठरूं लागली. ब्राह्मणाच्या पोटीं जन्माला येऊन एखादा अविद्वान निपजला तरी तो ब्राह्मणच ठरूं लागला. क्षत्रिय-वैश्यांच्या बाबतींतही हीच गोष्ट सुरू झाली. त्याच्याच जोडीला आपण करितों तेंच कर्म श्रेष्ठ असें प्रत्येकजण मानूं लागला. विशेषतः, वेदविद्या टिकविण्याचें अत्यंत अवघड कर्म आपण करितों यासाठीं इतरांनीं आपणांस सर्वश्रेष्ठतेचा मान दिलाच पाहिजे असा आग्रह ब्राह्मण धरूं लागले. ब्राह्मणांनीं आपलें पूर्वींचें कर्म व त्यागी वृत्ति कायम टिकवून धरली असती तर त्यांचा हा आग्रह योग्य ठरला असता. पण ब्राह्मण दान घेण्याच्या अधिकाराचा दुरुपयोग करून लोभी व स्वार्थी बनले होते. अशा स्थितींत त्यांच्या या आग्रहाला कोण किंमत देणार? या प्रकारामुळें समाजांत उच्चनीचतेवरून, श्रेष्ठकनिष्ठतेवरून वैमनस्य व धुसपूस सुरू झाली होती. प्रत्येकजण समानतेच्या वागणुकीचा हक्क मागूं लागला होता. आर्य समाजांतील पूर्वींचें ऐक्य नष्ट झालें होतें.

**शूद्रांची स्थितिः**—शूद्रांची स्थिति मूळांतच वाईट व लाजीरवाणी होती. त्यांनीं द्रव्य मिळवूं नये, सेवावृत्ति स्वीकारून राहावें, धनी देईल तें अन्न व वस्त्र वापरावें असा त्यांचा धर्म ठरवून देण्यांत आला होता. संकर जाती अत्यंत निंद्य समजल्या जात असल्यामुळें त्यांची स्थिति अत्यंत करुणास्पद झाली. उदाहरणार्थ चांडालांना गांवाबाहेर राहून मेलेल्या जनावरांच्या मांसावर आपली उपजीविका करावी लागत होती. ही अपमानास्पद स्थिति शूद्र फार काळ सहन करणें शक्य नव्हतें. आर्य समाजांतून फुटून निघण्याची वृत्ति त्यांच्यांत बळावूं लागली होती.

**हिंसाः**—पंचमहाभूतांना आर्यांनीं देवतास्वरूप मानलें होतें. त्यांना संतुष्ट करण्यासाठीं ते यज्ञयाग करीत व त्यांत पशूंचा बळी देत. प्रथम प्रथम अशा यज्ञांची संख्या फारच थोडी असल्यामुळें त्यांविरुद्ध कोणी फारशी तक्रार केलेली नव्हती. परंतु पुढील काळांत अशा यज्ञप्रसंगीं राजाकडून किंवा यजमानाकडून मिळणाऱ्या दक्षिणेच्या आशेनें ब्राह्मणवर्ग यज्ञसमारंभांना उत्तेजन देऊं लागला. यज्ञयागांच्या वाढत्या संख्येबरोबर मुक्या प्राण्यांच्या हिंसेचें प्रमाणही वाढत चाललें. आपल्या स्वार्थासाठीं व सुखासाठीं केली जाणारी ही

हत्त्या सामान्य लोकांना मानवेना. पुरोहित वर्गाच्या रोषाला भिऊन कोणी तसें उघडपणें बोलून दाखवीत नव्हते ही गोष्ट खरी, पण मनांतून प्रत्येकाला या हिंसेचा तिटकारा आला होता.

**वाङ्मय:**—आर्यांनीं निर्माण केलेलें सर्व वाङ्मय व विशेषतः धार्मिक वाङ्मय संस्कृतांत होतें. मुळांत सर्वच आर्यांना संस्कृत भाषा उत्तम येत असल्यामुळें या बाबतींत कोणाचीच तक्रार येणें शक्य नव्हतें. वसाहतींच्या विस्तारानंतर शूद्रांच्या सहवासामुळें आर्यांच्या भाषेंत बदल घडून येऊन अपभ्रष्ट भाषा प्रचारांत येऊं लागली. हिलाच प्राकृत भाषा म्हणतात. सामान्य लोक ही प्राकृत भाषाच बोलत असत. सर्व धार्मिक वाङ्मय संस्कृतांत असल्यामुळें सामान्य लोकांना धर्मविषयक बाबतींत उच्चवर्णीय आर्यांच्या तोंडाकडे पाहावें लागत होतें. अशा स्थितींत ब्राह्मण सांगतील तोच धर्म अशी स्थिति प्राप्त झाली. लोकांच्या अज्ञानाचा व असाह्यतेचा फायदा ब्राह्मण घेऊं लागले. तेव्हां हें सर्व जुनें वाङ्मय लोकभाषेंत आणण्याची लोकांची खटपट सुरू झाली.

**स्त्रियांची स्थिति:**—वेदकालीं स्त्रियांना मोठा मान व आदर असे. वेदविद्या शिकण्याचा, मंत्ररचना करण्याचा, न्यायसभेंत जाण्याचा व आपले विचार प्रगट करण्याचा पुरुषांच्या बरोबरीचा अधिकार त्यांना होता. पण ही आदर्श स्थिति फार काळ टिकली नाहीं. वर्णसंकराच्या भीतिमुळें किंवा स्वार्थामुळें स्त्रियांची एकेका क्षेत्रांतून हाकलपट्टी सुरू झाली. त्यांचा मान गेला व त्यांच्याबद्दचा आदरही मावळला. महाभारतकालीं द्रौपदीची झालेली विटंबना ही या स्थितीची दर्शक आहे. त्यांतल्या त्यांत अनाथ व विधवा स्त्रियांची स्थिति मोठी करुणास्पद झाली. नवऱ्याच्या पश्चात त्यांना समाजांत कांहींच स्थान उरलें नाहीं. स्वतंत्र, स्वावलंबी व मानाचें जीवन याला स्त्रिया अंतरल्या आणि कष्ट व पतिसेवा हेंच त्यांच्या नशिबीं आलें. या स्थितिमुळें आर्यांच्या समाजरचनेबाबत त्या असंतुष्ट झाल्या होत्या.

## २ जैन धर्म

**जैन धर्म:**- आर्यांच्या समाजांत उत्पन्न झालेले अनेक दोष काढून टाकून तो समाज सुधारण्याचे प्रयत्न याच काळांत झाले. या बाबतींत गौतम

बुद्धाचें नांव जरी प्रामुख्यानें घेतलें जात असलें तरी महावीर वर्धमानाची योग्यता कमी लेखून चालणार नाहीं. हिंदुस्थानांतून बौद्ध धर्म जवळ जवळ नष्ट झाला आहे. पण जैन धर्म मात्र आजतागायत कायम टिकून राहिला आहे. तेव्हां महावीराची व जैन धर्माची माहिती आपणांस असणें अवश्य आहे.

**महावीर वर्धमानः**-महावीरालाच जैन धर्माचा संस्थापक समजण्यांत येतें पण तें चूक आहे. त्याच्या अगोदर या धर्मांत २३ तीर्थंकर होऊन मेले. महावीर त्यांच्यासारखाच २४ वा तीर्थंकर होय. पण इतर तीर्थंकरांपेक्षां महावीराचें तेज व कार्य अधिक प्रभावी ठरल्यामुळें जैन त्यालाच श्रेष्ठ समजतात.

महावीर हा गौतमबुद्धाला समकालीन होता. त्याचा काल इ. स. पू. ५३९ ते इ. स. पू. ४६७ हा असावा. गंगेच्या उत्तरेस वैशालीजवळ कुंदग्राम येथील लिच्छवी कुळांत सिद्धार्थ नांवाचा एक राजा होता. त्याच्या राणीचें नांव त्रिशला. त्यांच्या पोटीं इ. स. पू. ५३९ मध्यें महावीराचा जन्म झाला. त्याचें लग्न यशोदा नामक एका सुंदर स्त्रीशीं झालें होतें. त्याला एक मुलगी झाली होती. आईबापांच्या मृत्यूनंतर ऐहिक सुखाबद्दल त्यांस विरक्ति उत्पन्न झाली व वयाच्या तिसाव्या वर्षीं संसार सोडून तो पारमार्थिक जीवनाचा विचार करूं लागला. बारा वर्षें धार्मिक अध्ययन केल्यानंतर त्याला आत्मक्लेश व दिगंबर वृत्ति या दोन गोष्टींची महती पटली. या वेळीं पारसनाथ हा तीर्थंकर होता. त्याच्या संप्रदायांत महावीर सामील झाला. सर्व विकारांना जिंकणारा म्हणून लोक त्यांस 'जिन' म्हणूं लागले. या नांवावरूनच त्याच्या अनुयायांना जैन हें नांव मिळालें. त्यांना 'निर्ग्रंथ' म्हणजे सर्व ऐहिक बंधनें तोडणारे असें दुसरेंही नांव आहे. आपल्या तत्त्वांचा प्रसार करण्यासाठीं महावीर अनेक ठिकाणीं हिंडला. विदेह, अंग, मगध या देशांतील राजघराण्यांनीं त्याच्या मतांचा स्वीकार केला. मगधाचे राजे अजातशत्रू व बिंबिसार हे महावीराचे शिष्य बनले. याप्रमाणें आपल्या मतांचा प्रसार करून त्यानें १४००० अनुयायी मिळविले. वयाच्या ७२ व्या वर्षीं राजगृहाजवळ पव या गांवीं त्यास मृत्यु आला. त्याच्यानंतर जैन धर्माला त्याच्याइतका प्रभावी प्रचारक न मिळाल्यामुळें तो धर्म मागें पडला. सध्यां गुजराथ, काठेवाड, दक्षिण महाराष्ट्र या भागांत जैन लोकांची संख्या विशेष

आहे. सर्व जैनांची लोकसंख्या ११ लक्ष ७८ हजाराच्या जवळपास आहे. जैन लोक व्यापारांत जास्त पुढारलेले आहेत.

**जैन धर्मातील तत्त्वें**:—सम्यक् श्रद्धा, सम्यक् ज्ञान व सम्यक् वर्तन ही जैन धर्माचीं तीन मुख्य तत्त्वें मानण्यांत येतात. सम्यक् श्रद्धा म्हणजे महावीराच्या सर्वश्रेष्ठतेवर व प्रमादरहिततेवर विश्वास. सम्यक् ज्ञान यांत अनेक विचारांचा समावेश होतो. परमेश्वर नाहीं, सृष्टि आपोआप निर्माण झाली, जगांत असंख्य व स्वतंत्र आत्म्यांचा संचार चालू आहे, मनुष्याला कर्माप्रमाणें मति मिळते, विरक्त मनुष्याचें कर्म नष्ट होतें वगैरे विचार याच सम्यक् ज्ञानाच्या तत्त्वांत येतात. सम्यक् वर्तनाच्या बाबतींत धर्मगुरु व सामान्य लोक असा भेद करण्यांत आला आहे. प्रत्येकाचें वर्तन निराळें सांगितलें आहे. प्रत्येक मुनीनें कायावाचामनें करून प्राणिहत्त्या न करणें, असत्य न बोलणें, चोरी न करणें, व्यभिचार न करणें व स्वार्थी श्रीमंत किंवा सुखासक्त न राहणें या पांच शपथा पाळल्याच पाहिजेत असा दंडक आहे. या शपथांच्या जोडीला शिस्त, पापकर्माची कबुली, आज्ञापालन, चिंतन, ज्ञानप्राप्ति या गोष्टी त्यानें केल्या पाहिजेत असें सांगितलें आहे. सामान्य मनुष्यानें हिंसा, असत्य भाषण, चोरी, व्यभिचार, हावरटपणा या गोष्टी न करितां प्राणिमात्राला संरक्षण देणें, योग्य धंदा निवडून उदरनिर्वाह करणें (शेती करूं नये कारण त्यांत प्राण्यांची हिंसा होते), दानधर्म करणें, उपवास पाळणें इत्यादि गोष्टी कराव्यात. सर्व वस्तू सजीव मानणें, विरक्तीचा आग्रह धरणें व अहिंसा-व्रताचें कडक पालन करणें या तीन गोष्टींना जैन धर्मांत फार महत्त्व दिलें जातें.

जैनांच्या समजुतीप्रमाणें प्रत्येक प्राण्याच्या ठिकाणीं पाप हें जन्मसिद्ध आहे. मनुष्याचा जन्म मिळणें याचाच अर्थ मागल्या जन्मींचें पाप भोगणें होय. अशा या पापी देहापासून शुद्ध व पवित्र अशा आत्म्याची सुटका करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. यासाठीं प्रत्येकानें आपल्या शरीराला जेवढे म्हणून क्लेश देतां येतील तेवढे द्यावेत. त्यासाठीं उपवास करावेत, हवापाणी वर्ज्य करावें, आत्महत्त्या करावी अशा एकापेक्षां एक वरचढ पायऱ्या सांगितल्या आहेत. इतरांप्रमाणें जैन लोक आत्महत्त्या हें पाप मानीत नाहींत उलट तो

सर्वश्रेष्ठ मार्ग समजतात. सर्वच लोकांना हा मार्ग स्वीकारणें शक्य नसल्यामुळें त्यांच्यासाठीं सदाचरण, अहिंसा वगैरे साधे व सरळ मार्ग सांगितले आहेत.

**पंथः**—जैन धर्मात दोन मुख्य पंथ आहेत. एक श्वेतांबर व दुसरा दिगंबर. इ. स. पू. ३१० या वर्षीं उत्तरेंत मोठा दुष्काळ पडल्यामुळें बारा हजार जैन यति भद्रबाहु याच्या नेतृत्वाखालीं उत्तरेंतून दक्षिणेंत म्हैसूर प्रांतांत आले. तेथील अतिउष्ण हवेमुळें त्यांना कपड्याची जरूरी भासेना. त्यामुळें साहजिकच त्यांनीं कपडे कमी किंवा अजिबात न वापरण्याचें धोरण स्वीकारलें. या कारणानें उत्तरेंतील व दक्षिणेंतील यतींमध्यें भेद पडले. इ. स. ८२ मध्यें वस्त्रें वापरावींत कीं नाहीं या विषयावर निकराचे भांडण होऊन हे भेद कायम झाले. विंध्य पर्वताच्या उत्तरेकडे राहाणारे जैन पांढरें वस्त्र वापरीत असल्यामुळें तें स्वतःला श्वेतांबर म्हणवून घेऊं लागले. दक्षिणेकडील जैन विवस्त्र असल्यामुळें त्यांना दिगंबर हें नांव मिळालें. श्वेतांबर जैन आपल्याप्रमाणें आपल्या देवांनाही पांढरें वस्त्र नेसवितात. दिगंबर जैनांचे देव त्यांच्याप्रमाणेंच विवस्त्र असतात. श्वेतांबर पंथांत स्त्रियांना साध्वी (संन्यस्त) होण्याचा अधिकार आहे. दिगंबरपंथीय लोक स्त्रियांना मोक्ष मिळेल असें मानीत नाहींत. त्यांनीं या जन्मीं पुण्य केलें म्हणजे पुढील जन्मीं त्या पुरुष होतील व मग त्यांस मोक्ष मिळेल अशी त्यांची समजूत आहे. 'स्थानकवासी' या नांवाचा आणखी एक पंथ जैनांत आहे. ते मूर्तिपूजा मानीत नाहींत. इ. स. १४७४ मध्यें या पंथाची स्थापना झाली. त्यांच्यांत अकरा उपपंथ आहेत.

**जैन धर्मग्रंथः**—जैन धर्मांतील प्रमुख धर्मग्रंथांना आगम (उपदेश) किंवा सिद्धांत असें नांव आहे. या ग्रंथांपैकीं पहिल्या ग्रंथाचीं बारा अंगें आहेत. हे सर्व ग्रंथ महावीर समाधिस्थ झाल्यावर बऱ्याच काळानंतर रचिले आहेत. यापैकीं कोणते ग्रंथ प्रमाण मानावेत याबद्दल जैन लोकांत बरेच मतभेद आहेत. स्थानकवासी फक्त ३३ ग्रंथच प्रमाण मानतात. या धर्मग्रंथांची भाषा अर्धमागधी असून ग्रंथांतील पाठ जैन देवालयांत नित्य-नियमानें म्हटले जातात. यांपैकीं कांहीं ग्रंथांचीं भाषांतरें पाश्चात्य व पौर्वात्य भाषांत झालीं आहेत.

## ३ बौद्ध धर्म

**गौतमबुद्ध:**—आर्यांच्या समाजरचनेंत सुधारणा घडवून आणणारा हा दुसरा महात्मा होय. आज हिंदुस्थानांत बौद्ध धर्म फारसा उरलेला नाहीं. पण चीन, जपान, ब्रह्मदेश या भागांत त्याचें बरेंच प्राबल्य असून त्याच्या अनुयायांची संख्या ४८ कोटीहून जास्त आहे. ही संख्या इतर कोणत्याही धर्माच्या अनुयायांच्या संख्येहून अधिक आहे.

नेपाळच्या उतरणीवर रोहिणी नदीच्या कांठीं कपिलवस्तु नांवाचें एक शहर होतें. तेथें शाक्य घराण्यांत शुद्धोधन नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या राणीचें नांव मायावती. त्यांना बऱ्याच वर्षांनंतर उतारवयांत एक मुलगा झाला ( इ. स. पू. ५६७ ). पुत्रप्राप्तीची इच्छा सिद्धीस गेली म्हणून त्यांनीं या मुलाचें नांव सिद्धार्थ ठेवलें. सिद्धार्थाला लहानपणापासून एकांतांत विचार करण्याची अत्यंत आवड होती. खेळ, खाणें, उंची कपडे इत्यादि गोष्टींचा तो तिटकारा करीत असे. या विरक्त मुलाकडे पाहून त्याच्या आई-बापांना अत्यंत दुःख होत असे. त्यामुळें त्यांनीं सिद्धार्थाला अतिशय लाडांत वाढविलें. त्याच्यासाठीं सर्व सुखसोयींनीं युक्त असा एक सुंदर राजवाडा बांधून देण्यांत आला. व तेथें कोणत्याही प्रकारचें दुःख त्याला ऐकूं येणार नाहीं किंवा दिसणार नाहीं अशी व्यवस्था करण्यांत आली. यशोधरा नामक एका सुंदर राजकन्येबरोबर त्याचा विवाह झाला. पुढें त्याला एक मुलगा झाला त्याचें नांव राहुल. वयाच्या २८ व्या वर्षापर्यंत सिद्धार्थ याप्रमाणें सुखोपभोगांत दंग होता.

शुद्धोधन वृद्ध झाल्यामुळें त्यानें सिद्धार्थाला राज्याभिषेक करण्याचें ठरविलें. सिद्धार्थाला आपल्या राज्याची कल्पना यावी म्हणून छन्न नांवाच्या एका विश्वासू सारथ्याबरोबर त्याला राज्यपाहणीसाठीं पाठविण्यांत आलें. रस्त्यानें जात असतांना महारोगानें ग्रस्त झालेला एक रोगी, वार्धक्यानें जर्जर झालेला एक म्हातारा व प्रेताच्या मागून रडत जाणाऱ्या लोकांचा एक थवा अशीं तीन दुःखी दृश्यें सिद्धार्थाच्या नजरेस पडलीं. त्यामुळें त्याचें मन अत्यंत दुःखी झालें व तो राजवाड्यांत परत आला. जगांत दुःख आहे याची जाणीव

होऊन त्या दुःखापासून मुक्त कसें व्हावें ही एकच चिंता त्याच्या मनाला लागून राहिली. पुढें त्यास एक संन्यासी भेटला. त्याच्या विरक्त वृत्तीचा सिद्धार्थाच्या मनावर फार परिणाम होऊन दुःखमुक्तीसाठीं आपणही विरक्त साधु व्हावें असें त्यास वाटूं लागलें. परंतु सर्व सुखाचा, यशोधरेचा व राहुलाचा त्याला एकाएकीं त्याग करवेना. त्यामुळें तो अधिक कष्टी झाला; पण घर सोडून वनांत जाण्याचे विचार त्याला सोडवेनात. पुढें एके दिवशीं कोणास चाहूल न लागूं देतां तो आपल्या सारथ्याबरोबर राजवाड्याच्या बाहेर पडला. गांवाबाहेर गेल्यानंतर त्यानें आपले कपडे, दागिने व इतर वस्तु काढून सारथ्याजवळ दिल्या व त्यास परत पाठविलें व आपण स्वतः मुंडन करून, भगवीं वस्त्रें परिधान करून एकटाच रानांत निघून गेला. तेथें त्यानें आळार कालाम व उद्दक रामपुत्त या दोन साधूंचें शिष्यत्व पत्करिलें. योगसाधन व आत्मक्लेश या मार्गाचा सात वर्षें अनुभव घेऊनही त्याच्या मनास समाधान लाभेना तेव्हां तो गयेजवळ उरुवेला अरण्यांत तप करण्यासाठीं निघून गेला व एका वडाच्या झाडाखालीं विचार करीत बसला. पांच वर्षांच्या घोर तपश्चर्येनंतर व ४९ दिवस समाधि लाविल्यानंतर त्यास धर्माचा खरा राजमार्ग दिसला. लोक त्याला बोध झाला म्हणून बुद्ध म्हणूं लागले. ज्या वृक्षाखालीं बसून त्याला हें ज्ञान प्राप्त झालें त्या वृक्षास बोधिवृक्ष म्हणतात.

यानंतर बुद्ध आपल्या मतांचा प्रसार करण्याकरतां बाहेर पडला. पहिलें प्रवचन काशीजवळ सारनाथ या ठिकाणीं झालें. तेथें त्यास पांच शिष्य मिळाले. तेथून तो राजगृह या ठिकाणीं आला. तेथील बिंबिसार राजानें महायज्ञाची तयारी केलेली पाहून व त्यांत बळी देण्यासाठीं आणलेल्या मुक्या प्राण्याकडे पाहून त्यास अत्यंत दुःख झालें. तेथें जमलेल्या सर्व लोकांस त्यानें 'अहिंसा परमोधर्मः' या तत्त्वाचा उपदेश केला. तो ऐकून बिंबिसारानें आपल्या प्रजेसह बुद्धाचें अनुयायित्व स्वीकारिलें. त्यानंतर तो कपिलवस्तु शहरीं आला. तेथें त्यानें आपल्या आईबापांस बौद्ध धर्माची दीक्षा दिली. बिहार, ओरिसा, संयुक्त प्रांत या भागांत हिंडून व सदाचार, दान, दया व

अहिंसा या तत्त्वांचा उपदेश करून बुद्धानें लक्षावधि शिष्य मिळविले. इ. स. पू. ४८३ या वर्षी कुशिनगर येथें त्यानें आपला देह ठेवला.

**बुद्धाची शिकवणः**— जगांतील सर्व दुःखापासून मनुष्यमात्राची सुटका करावयाची हाच हेतु बुद्धाच्या मनांत होता. तो साध्य करण्यासाठीं त्याला जो मार्ग सांपडला त्याचा त्यानें लोकांस उपदेश केला. बुद्धानें चार प्रमुख तत्त्वें सांगितलीं आहेत. ( १ ) जगांत दुःख अनंत आहे. ( २ ) या सर्व दुःखाचें मूळ मनुष्याला प्रत्येक गोष्टीबद्दल वाटणारी आशा, आसक्ति किंवा तृष्णा ही होय. ( ३ ) आसक्तीचा त्याग केल्याशिवाय दुःखमुक्त होतां येणार नाहीं. ( ४ ) आसक्तीचा त्याग करण्यासाठीं पुढील आठ गोष्टी केल्या पाहिजेत.

सम्यक् श्रद्धा, सम्यक् विचार, सम्यक् वाणी, सम्यक् कृति, सम्यक् व्यवसाय, सदाचार, दक्षता व चिंतन. या आठ गोष्टींचा अर्थ पुढील-प्रमाणें आहे.

दुःखमुक्तीचा एकमेव मार्ग म्हणजे आसक्तित्याग, त्या त्यागासाठीं मन तयार केलें पाहिजे. त्यासाठीं स्वतःची उन्नति करून सर्व विश्वाशीं समरूप झालें पाहिजे. आत्मोन्नतिसाठीं चोरी, मद्यपान, व्यभिचार, असत्य भाषण व हिंसा या गोष्टी न करितां दान, दया, सदाचार व ज्ञानसंग्रह या गोष्टी कराव्यात. उच्चनीचता पाळूं नये, सर्वांना सारखें लेखावें, सर्वांशीं प्रेमानें वागावें, कोणाचाही द्वेष करूं नये, गृहस्थाश्रमी माणसानें याप्रमाणें वागावें. अशा गृहस्थास उपासक हें नांव आहे. पण प्रत्येकानें उपासक न राहतां भिक्षु होण्याचा प्रयत्न करावा. भिक्षूनें वरील सर्व आज्ञा पाळून शिवाय अवेळीं भोजन न करणें, नाचरंगास न जाणें, सुगंध, भूषणें, विसाळी वस्त्रें न वापरणें, सोन्या-चांदीचें दान न घेणें हे नियमही पाळले पाहिजेत.

या मार्गानें गेलें असतां एकदम मोक्षप्राप्ति किंवा निर्वाणपद मिळणार नाहीं; त्यामुळें मनुष्य फक्त शुद्ध होईल. ज्याप्रमाणें सोन्याला पूर्ण शुद्धता येण्यासाठीं अनेक वेळां भट्टींतून जावें लागतें, त्याप्रमाणें माणसाला निर्वाणपद मिळ-विण्यासाठीं अनेक जन्मांतून जावें लागतें. सत्य भाषण, सदिच्छा व सदाचरण

यांमुळें मनुष्य शुद्ध होत जातो. अशा रीतीनें अनेक जन्मांच्या शुद्धतेनंतर येणारी जी निष्पाप स्थिति ती स्थिति म्हणजेच मोक्ष किंवा निर्वाण होय.

बुद्धाच्या या निर्वाण-कल्पनेचें हिंदूंच्या मोक्षकल्पनेशीं बरेंच साम्य आहे. हिंदु लोकही पुनर्जन्मावर विश्वास ठेवतात व पुढील जन्मीं चांगली गति मिळावी म्हणून या जन्मीं पुण्याचा संचय करितात. बुद्धानें हीच गोष्ट सांगितली आहे. तेव्हां गौतमबुद्धाचा हेतु नवीन धर्म स्थापण्याचा नसून आर्यांच्या समाज-रचनेंतील दोष काढून टाकणें हा होता असेंच मानलें पाहिजे. आर्यांच्या देवतां-बद्दल, परमेश्वराबद्दल, किंवा तत्त्वज्ञानाबद्दल त्यानें गैर असें एकही अक्षर काढलेलें नाहीं. तेव्हां बुद्धाला धर्मसंस्थापक म्हणण्यापेक्षां धर्मसुधारक म्हणणेंच जास्त योग्य ठरेल.

**पंथः**---बौद्ध लोकांत हीनयान व महायान असे दोन पंथ आहेत. हीनयान पंथाचा प्रसार आशिया खंडाच्या दक्षिण भागांत आहे. हे लोक बुद्धाला दुःखमुक्तीचा मार्ग सांगणारा एक सामान्य मनुष्य समजतात व धर्माच्या बाबतींत नाना प्रश्न उपस्थित करून त्याचें स्वरूप क्लिष्ट करण्यास विरोध दर्शवितात. महायान पंथाचे लोक आशियाखंडाच्या उत्तर भागांत आहेत. चीन व जपान या देशांत या पंथाचा प्रसार फार आहे. हे लोक बुद्धास निव्वळ उपदेशक न मानतां एक दिव्य अवतार मानतात. बुद्धाची त्यांनीं त्रिमूर्तींत स्थापनाही केलेली आहे. बुद्धानें स्वतः मूर्तिपूजेविरुद्ध प्रचार केला पण आज जगांत त्याच्या मूर्तिइतकी मूर्तिपूजा इतर कोणत्याही धर्मांत नाहीं. महायान पंथाचा उदय कनिष्काच्या वेळीं झाला.

**धर्मग्रंथः**---बौद्ध लोकांचा मुख्य व महत्त्वाचा धर्मग्रंथ म्हणजे त्रिपिटक. याचा अर्थ टोपली. त्रिपिटक म्हणजे तीन टोपल्या. यांपैकीं पहिल्या **विनय-पिटकांत** नवदीक्षित व उच्च भिक्षूंनीं पाळावयाचे नियम दिले आहेत. दुसऱ्या **सुत्तपिटकांत** बुद्धाच्या उपदेशाचें सार दिलें आहे. तिसऱ्या **अभिधम्म-पिटकांत** बुद्ध मतांचा उहापोह दिलेला आहे. त्रिपिटकाची भाषा पाली आहे. या ग्रंथाचे १९ पोटविभाग आहेत. त्यांपैकीं धम्मपद या भागाचेंच फक्त भाषांतर झालें आहे.

## ४ बौद्ध धर्माच्या प्रसाराचीं कारणें

**बौद्ध धर्माच्या प्रसाराचीं कारणें:**—गौतमबुद्धाच्या मृत्यूनंतर बौद्ध धर्माची वाढ इतक्या झपाट्यानें व इतक्या दूरवर झाली कीं त्या वाढीला जगांत दुसरी तोड सांपडणार नाहीं. बौद्ध धर्माच्या पूर्वीं स्थापन झालेल्या किंवा बौद्ध धर्मानंतर स्थापन झालेल्या दुसऱ्या कोणत्याही धर्मास हें भाग्य लाभलें नाहीं. बौद्ध धर्माला हें भाग्य कोणत्या कारणामुळें लाभलें त्याचा विचार केला पाहिजे.

**आदर्श नेता:**—बौद्ध धर्माच्या संस्थापकाचें सर्वच जीवन अद्भुत होतें. राजाचा एकुलता एक आवडता पुत्र व लहानपणापासून अत्यंत सुखांत वाढलेला अशी स्थिति असतांनाही दुःखापासून मुक्त होण्याचा मार्ग शोधून काढण्यासाठीं त्यानें वैराग्य पत्करिलें. राजपुत्रानें जगासाठीं केलेला हा त्याग, आणि त्यासाठीं भोगलेल्या यातना व कष्ट या गोष्टीमुळें सामान्य लोकांचीं मनें भारून गेलीं. हे कष्ट बुद्धानें केवळ स्वतःला दुःखमुक्त होण्यासाठीं सोसलेले नव्हते. तसें पाहिलें तर तो स्वतः अत्यंत सुखांत होता, परंतु सर्व जगाची दुःखापासून मुक्तता करण्याच्या तळमळीनेंच त्यानें या लोकविलक्षण गोष्टी केल्या. आपल्या सुखासाठीं झिजणारा हा राजपुरुष पाहून, त्याचें तेज अवलोकून व त्याची मधुर वाणी ऐकून लोक त्याच्या मताकडे झपाट्यानें वळले.

**साधी शिकवण:**—बुद्धाची शिकवण अगदीं साधी, सरळ व सामान्य लोकांसही समजण्यासारखी होती. त्यांत ईश्वर, आत्मा, स्वर्ग नरक इत्यादि गहन विषयांचा विचार नसून सदाचरणाचा साधा उपदेश होता. चांगलें कर्म केलें असतां चांगली गति मिळते, व तेंच प्रत्येकाचें ध्येय असावें हें त्याच्या तत्त्वज्ञानाचें थोडक्यांत सार होतें. इतकें साधें व सरळ तत्त्वज्ञान सामान्य लोकांच्या कानावर पडल्यानंतर लोकमताचा ओघ आपोआपच वैदिक धर्माकडून बौद्ध धर्माकडे वळला.

**लोकभाषेचा स्वीकार:**—हें सर्व तत्त्वज्ञान बुद्धानें लोकभाषेंत सांगितलें. त्यावेळची लोकभाषा पाली होती. बुद्धानें सांगितलेलें हें तत्त्वज्ञान व पुढील इतर सर्व वाङ्मय या पाली भाषेंतच लिहिलें गेलें. यापूर्वीं सर्व धर्मविषयक वाङ्मय संस्कृतांत होतें. उच्चवर्णीय कांहीं थोड्या आर्यांशिवाय संस्कृत भाषा

कोणासच येत नव्हती व त्यांच्याशिवाय दुसरे कोणी त्या भाषेंत व्यवहारही करीत नव्हते. अशा स्थितींत धर्माचें ज्ञान करून घ्यावयाचें म्हटलें म्हणजे या ब्राह्मणांकडे पाहावें लागे. ते सांगतील तेंच खरें मानणें भाग होतें. लोकभाषेंत धार्मिक विचार मांडण्यास ब्राह्मणांचा विरोध होता. बौद्ध वाङ्मयानें या दृष्टीनें एक प्रकारची क्रांतिच केली असें म्हटलें पाहिजे. धार्मिक वाङ्मय लोकभाषेंत झाल्यामुळें कोणासही तें समजे व कोणाच्याही मध्यस्थीशिवाय तें स्वतःचें स्वतःस आकलन करून घेतां येत असे. थोडक्यांत म्हणजे बौद्ध धर्मानें सामान्य लोकांस अज्ञानाच्या अंधकारांतून ज्ञानाच्या प्रकाशांत आणलें होतें. त्यामुळें सामान्य लोकांचा कल साहजिकच बौद्ध धर्माकडे वळला.

**समानतेची वागणूकः**–आर्यांच्या समाजापैकीं बरेचजण या ना त्या कारणामुळें त्या समाजरचनेवर रुष्ट होते. कोणास यज्ञयागांत होणारी मुक्या प्राण्यांची हिंसा मान्य नव्हती, कोणास माणुसकीलाही खालीं मान घालावयास लावणाऱ्या वागणुकीचा तिटकारा आला होता, स्त्रियांना स्वतःच्या स्थितीबद्दल हळहळ वाटत होती, ब्राह्मणांच्या मोठेपणाला इतर लोक कंटाळले होते. म्हणजेच आर्य समाजापैकीं फार मोठा वर्ग तो समाज सोडण्याची व नवीन आदर्श समाजांत सामील होण्याची इच्छा करीत होता. बौद्ध धर्मामुळें त्यांची ही इच्छा पुरी झाली. त्या धर्मांत सर्वांनाच प्रेमाची, समानतेची व स्वातंत्र्याची वागणूक दिली जात होती. बौद्ध धर्मानें उच्चनीचता न मानतां बंधुभाव बाळगण्याची आज्ञा दिली होती. त्या धर्मांत प्रत्येकाला आपली उन्नति करून घेण्यास पूर्ण वाव होता. या सर्वांचा परिणाम होऊन असंतुष्ट आर्यांचा फार मोठा वर्ग बौद्ध धर्मांत झटकन् सामील झाला.

**राजाश्रयः**–बौद्ध धर्माचा इतक्या झपाट्यानें प्रसार होण्याचीं इतर कांहीं जरी कारणें असलीं तरी सर्वांत महत्त्वाचें कारण म्हणजे त्या धर्मास मिळालेला राजाश्रय होय. स्वतः गौतमबुद्ध राजघराण्यांतील असल्यामुळें इतर राजांचें साहाय्य मिळविणें त्यास सोपें गेलें. त्याच्या स्वतःच्या हयातींतच शुद्धोधन बिंबिसार या राजांनें बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. स्वतः राजानेंच एखाद्या धर्माचा बुद्धिपुरःसर स्वीकार केल्यानंतर ‘ यथा राजा तथा प्रजा ’ या

न्यायानें स्वार्थासाठीं किंवा भीतीनें प्रजाही त्याचें अनुकरण करिते. बौद्ध धर्माच्या बाबतींत हीच गोष्ट घडली. राजा बौद्ध झाला म्हणून प्रजाजनही बौद्ध झाले. बौद्ध धर्माला खरा राजाश्रय मिळाला तो अशोकाच्या कारकीर्दींत. त्यानें स्वत: बौद्ध धर्माचा स्वीकार करून आपलें सर्व आयुष्य बौद्ध धर्माचा प्रसार करण्यांत घालविलें. ६०००० प्रचारक हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर पाठवून त्यानें बौद्ध धर्माचा सर्वत्र फैलाव केला. या प्रचारकांत त्याचा मुलगा महेंद्र व मुलगी संघमित्रा होती. स्तूप, स्तंभ, शिलालेख, धर्मपरिषदा या साधनांच्या द्वारें अशोकानें बौद्ध धर्माचा प्रसार केला. अशोकानंतर बौद्ध धर्माचा स्वीकार करणारा दुसरा राजा मिनँडर म्हणजे मिलिंद होय. हा ग्रीक राजा होता, पण हिंदुस्थानांत आल्यावर त्याला बौद्ध धर्माची महती पटून त्यानें त्या धर्माचा स्वीकार केला. बौद्ध वाङ्मयांत ‘ मिलिंदाचें प्रश्न ’ ही एक फार महत्त्वाची भर पडली. कनिष्क हाही परकीय राजा होता. त्यानें बौद्ध धर्माचा स्वीकार करून अश्वघोषाच्या नेतृत्वाखालीं बौद्ध धर्मपरिषद् बोलाविली, व त्या प्रसंगीं त्रिपिटकाची नवी आवृत्ति काढली. कनिष्कानंतरचा व अशोकाच्या तोडीचा दुसरा श्रेष्ठ राजा म्हणजे हर्ष. त्यानेंही बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हर्षाची बुद्धिमत्ता, दातृत्व व राजनीतिकौशल्य या गुणांचा ओघ बौद्ध धर्माकडे वळल्यामुळें बौद्ध धर्माला वैभव प्राप्त झालें. एकंदरींत या राजांच्या आश्रयामुळें बौद्ध धर्माचा कीर्तिध्वज उंच फडकत राहिला.

**भिक्षूंचें साहाय्य:**—निव्वळ उत्तम तत्त्वज्ञान व राजाश्रय एवढ्याच गोष्टी असून चालत नाहीं. धर्माचा प्रसार जगाच्या कानाकोपऱ्यांत होण्यासाठीं त्यागी, प्रभावी अशा उत्कृष्ट प्रचारकांची जोड असावी लागते. बौद्ध धर्माच्या सुदैवानें त्या धर्माला अशा गुणांनीं युक्त असलेल्या असंख्य प्रचारकांची मदत मिळाली. बुद्धाच्या शिकवणीचा परिणाम होऊन अनेक स्त्री-पुरुष हें कार्य करण्यासाठीं भिक्षुव्रत स्वीकारून प्रचारक बनले. धर्माचें पवित्र व उदात्त कार्य करण्याच्या आड आलेल्या सर्व संकटांना त्यांनीं यशस्वीपणें तोंड देऊन आपलें कार्य केलें. कश्यप भिक्षु जवळ जवळ चार हजार मैलांचा खडतर प्रवास करून इराण-तिबेट या मार्गानें चीन देशांत गेला व. तेथील राजास त्यानें बौद्ध

धर्माची दीक्षा दिली. कश्यपासारख्या त्यागी, कार्यकुशल व निष्ठावंत प्रचारकांच्या मदतीमुळें बौद्ध धर्म वृद्धिंगत झाला. या पुरुषांच्या बरोबरीनें स्त्रियांनींही या कार्यांत भाग घेतला. बुद्धानें स्त्रियांना स्वातंत्र्य दिलें होतें; त्यामुळें जुन्या समाजरचनेंत कुजत पडलेल्या स्त्रियांना हा नवा मार्ग योग्य वाटला व त्या भिक्षुणी बनल्या.

**बौद्ध स्मारकें**:—बौद्ध राजांनीं व भिक्षूंनीं बांधलेले स्तूप, विहार, मंदिरें, विद्यालयें, स्तंभ व लेणीं इत्यादि गोष्टी लोकांच्या सतत डोळ्यासमोर येत असल्यामुळें त्यांच्या मनांतील बौद्ध धर्माबद्दलचें प्रेम व आस्था बऱ्याच काळपर्यंत टिकून राहण्यास मदत झाली.

## उतारे

**महावीराचा उपदेशः**— " उच्च धर्माचें रहस्य माझेकडून समजावून घ्या. कपट, लोभ, क्रोध, व गर्व यांपासून शहाण्या माणसानें परावृत्त व्हावें. शहाण्या माणसानें जोडे, छत्री वापरूं नयेत. द्यूत खेळूं नये. दुसऱ्याची ईर्षा करूं नये. आपल्याला कोणी मारलें, तरी रागावूं नये. कोणी शिव्या दिल्यास खवळूं नये. सर्व दुःख शांत चित्तानें सहन करावें. कोणाही प्राण्याची हिंसा न करणें हेंच सर्व धर्माचें सार आहे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य व अपरिग्रह हीं पांच व्रतें प्रत्येकानें पाळावींत."

**गौतमबुद्धाचा उपदेशः**—" ब्राह्मण कुलांत जन्म झाला म्हणून एकाद्यास ब्राह्मण म्हणतां येणार नाहीं. ज्याच्यांत खरी सात्त्विकता व सत्य असतें तोच ब्राह्मण. ज्याच्या मनांत क्रोध व द्वेष आहे, जो प्राण्यांची हिंसा करितो, जो खोटें बोलतो, जो स्वतःला उच्च समजून इतरांची अवहेलना करितो, तोच खरा चांडाळ."

" प्रत्येक मनुष्याला आपल्या कर्माचें फळ मिळतें. तुम्ही वर आकाशांत उडालांत, समुद्राच्या तळाशीं दडलांत, गिरिकंदरांत लपलांत, तरी देखील तुम्हांला तुमच्या दुष्कृत्यांचें फळ मिळाल्याशिवाय राहाणार नाहीं."

## थोडक्यांत

**आर्षकालअखेर आर्य समाजाची स्थिति :**

(१) प्रत्येक वर्ण आपल्या श्रेष्ठत्वाबद्दल आग्रह धरूं लागला.
(२) शूद्रांची स्थिति अत्यंत केविलवाणी झाली.
(३) यज्ञयाग व हिंसा यांची वाढ झाली.
(४) स्त्रियांना अत्यंत वाईट वागणूक मिळूं लागली.
(५) धार्मिक वाङ्मय संस्कृतांत असल्यामुळें इतरांची ब्राम्हणांविरुद्ध तक्रार होऊं लागली.

**जैन धर्म :**

**संस्थापक**–२३ तीर्थंकर, २४ वा महावीर वर्धमान ( इ. स. पू. ५३९ ते ४६७ ). लहानपणीं विरक्त, आत्मक्लेशाची व दिगंबरवृत्तीची महती पटली. इंद्रियें जिंकणारा म्हणून जिन; त्यावरून जैन.

**तत्त्वें**: पुनर्जन्मावर विश्वास; देह अशुद्ध, आत्मा शुद्ध म्हणून आत्मक्लेश, आत्महत्या या मार्गांचा अवलंब; सदाचरण, अहिंसा हे प्रमुख सद्गुण.

**पंथ**: श्वेतांबर व दिगंबर.

**बौद्ध धर्म :**

**संस्थापक** गौतमबुद्ध (इ. स. पू. ५६७ ते ४८३ ); दुःखी दृश्यांमुळें गृहत्याग, सात वर्षे तपाचरण, गयेस आत्मचिंतन, तेथें बोध झाला म्हणून बुद्ध प्रचार-कार्य.

**तत्त्वें**:––आसक्ती हें दुःखाचें मूळ–दुःख नष्ट करण्याचें साधन आसक्तीचा त्याग, आत्मोन्नति, सदाचरण, अहिंसा; मोक्षप्राप्ति–निर्वाण.

**पंथ**:—महायान व हीनयान.

**प्रचाराचीं कारणें**:––( १ )एक आदर्श नेता. ( ५ ) राजाश्रय.
( २ ) साधी शिकवण. ( ६ ) भिक्षूंचें साहाय्य

(३) लोकभाषेचा स्वीकार. (७) बौद्ध स्मारकें.
(४) समानतेची वागणूक.

**प्रश्न:**—(१) आर्यकालअखेरीं आर्य समाजाची स्थिति कशी झाली होती ?
(२) महावीर वर्धमान कोण ? त्यानें कोणत्या तत्त्वांचा उपदेश केला ?
(३) गौतमबुद्धाचें चरित्र व शिकवण याविषयीं माहिती द्या.
(४) बौद्ध धर्माचा प्रसार इतक्या झपाट्यानें कां झाला ?
(५) जैन व बौद्ध धर्मांतिल तत्त्वांची तुलना करा.

**स्वाध्याय:**—(१) महावीर वर्धमान (पांगळकृत) व गौतमबुद्ध (धर्मानंद कोसंबीकृत) यांचीं चरित्रें वाचा.
(२) जैन व बौद्ध धर्मांतील तुम्हांला मान्य होणाऱ्या तत्त्वांची नोंद करा.
(३) बौद्ध-कथा समजावून घेण्यासाठीं जातक-कथा (ले. तुंगार) वाचा.
(४) अबूचा पहाड, बुद्धगया, अजिंठा, वेरूळ इ. ठिकाणीं सफरी काढून त्या त्या धर्माबद्दल अधिक माहिती मिळवा.

## प्रकरण १२ वें

# बौद्धकालीन परिस्थिति

### ( बुद्धापासून चंद्रगुप्तापर्यंतच्या काळाची माहिती )

( १ ) सामाजिक स्थिति;
( २ ) राजकीय स्थिति;
( ३ ) आर्थिक स्थिति;
( ४ ) सांस्कृतिक स्थिति;
( ५ ) बौद्धधर्माचा ऱ्हास.

### १ सामाजिक स्थिति

**सामाजिक स्थिति**:—बुद्ध ज्या शाक्य घराण्यांत जन्मला त्या शाक्य घराण्याची खुलासेवार माहिती उपलब्ध आहे. शाक्यांच्या अंमलाखालीं चालम्मा, सामगाम, शिलावती, देवदह इत्यादि गांवें होतीं. या कुलाचे राजकारणा-संबंधींचे व न्यायदानासंबंधींचे सर्व व्यवहार संथागार नांवाच्या एका सभेमध्यें कपिलवस्तु गांवीं चालत व त्या प्रसंगीं वृद्ध व तरुण लोक हजर असत. शाक्य लोक आपला राजा निवडीत. सर्व पंथांच्या भिक्षूंसाठीं कपिलवस्तूजवळ न्यग्रोधाराम नांवाचा मठ होता. अशाच तऱ्हेचे मठ निरनिराळ्या गांवीं बांधण्यांत आले होते. स्थानिक व्यवहारासंबंधींची चर्चा लोकसभेपुढें एखाद्या वृक्षाखालीं होत असे. गांवाभोंवतीं असलेल्या जंगलावर सर्वांची सारखीच मालकी होती. ब्राह्मणांचीं खेडीं स्वतंत्र होतीं. खोमदुस्य हें ब्राह्मणांचें खेडें होतें. न्यायाधीश कायदेपंडित, धर्मशास्त्रज्ञ, त्यांवर आठ कुलांच्या प्रतिनिधींचें एक मंडळ, त्यावर राजाचा उपाध्यक्ष व अध्यक्ष, अशी न्यायाच्या बाबतींत अधिकाऱ्यांची श्रेणी होती.

शाक्य कुलाशिवाय बली, कोलियन, मल्ल, मौर्य, विदेह, लिच्छवी

वगैरे अनेक कुळें त्या वेळीं होतीं. या घराण्यांचा कारभार कसा चालत असे याबद्दल खात्रीलायक माहिती मिळत नाहीं.

समाजाची रचना ग्रामपंचायतीच्या पायावर केलेली होती. लोक एकएकटे घरें बांधून, लांब न राहतां एकत्र राहात. प्रत्येकाजवळ स्वतःच्या मालकीचीं गुरें असत, पण त्यांना चरण्यासाठीं स्वतंत्र कुरणें नव्हतीं. पीक काढून घेतल्यावर गुरें सर्व शेतांतून हिंडत. सर्व शेतांची लागवड एकाच काळीं होत असे व त्यांना पाणी देण्याची व्यवस्था पाट काढून केलेली असे. प्रत्येक शेताला स्वतंत्र कुंपण नसे; सर्व शेतांना मिळून एकच कुंपण असे.

पीक निघण्याजोगी जागा एकत्र करून ती सर्व कुटुंबात वांटण्यांत येत असे. प्रत्येक कुटुंबाला आपल्या वांट्यांतील उत्पन्नच तेवढें घेतां येत असे. वांट्याची विक्री किंवा गहाण-खरेदी करतां येत नसे. यासंबंधींचे तंटे तोडण्याचें काम पंचायतीकडे असे. वडील मुलाला निराळे असे कांहींही हक्क नव्हते. स्त्रियांना जमिनींत वांटणी नव्हती; त्यांच्या मालकीचें धन म्हणजे जडजवाहिर व कापड. बहुतेक लोक खेड्यांतच राहात. आजच्या खेडयांतील लोकांपेक्षां त्या वेळच्या खेड्यांतील लोकांचा दर्जा श्रेष्ठ होता. मोलमजुरी करणें कमी प्रतीचें मानीत व प्रत्येकजण स्वतंत्रपणें राहात असे. प्रत्येकाला आपल्या जातीचा, कुलाचा व खेड्याचा अभिमान वाटत असे.

वर्णव्यवस्थेंत बदल झाला होता. बौद्ध ग्रंथांत क्षत्रिय वर्ण सर्वांत श्रेष्ठ मानला आहे. पितृवंशाकडून व मातृवंशाकडून सात पिढया आपला वंश शुद्ध राखण्याविषयीं मोठा कटाक्ष असे. यानंतर ब्राम्हण, वैश्य व शूद्र असा वर्णांचा क्रम लावण्यांत आला होता. गाड्या तयार करणारे, दोऱ्या वळणारे, पक्षी मारणारे, न्हावी, कुंभार, चांभार, कोष्टी वगैरेंचा समावेश हीन जातींत केला जात असे. परंतु जन्मसिद्ध जातीवरून अमकाच धंदा अमक्याच माणसानें केला पाहिजे असा निर्बंध नव्हता. गुलाम होते असें दिसतें. न्यायाधीशानें दिलेल्या शिक्षेमुळें कोणी गुलाम होत; लढाईत कैद केलेल्यांनाही गुलामच मानीत.

कोणत्याही माणसाला आपला सामाजिक दर्जा बदलतां येत असे. राज-पुत्र कुंभार झाल्याचें, व्यापारी बनल्याचें; ब्राम्हण वैश्य झाल्याचें, सैनिक बनल्याचें, सुतार झाल्याचें अशीं विविध उदाहरणें सांपडतात. त्यावरून जातिभेद कठोर झाला नव्हता असें कांहींचें म्हणणें आहे. रोटी-व्यवहार उच्च-वर्णीयांतच फक्त होत. बेटी-व्यवहाराच्या बाबतींतील पूर्वींचे निर्बंध बरेच सैल झाले होते.

उंच उंच भिंती, मजबूत तट, पहारेवाल्यांचे बुरूज, मोठमोठ्या वेशी, त्याबाहेर पाण्याचे किंवा चिखलाचे खंदक असें शहरांचें वर्णन आढळतें. अशीं शहरें म्हणजे एक प्रकारचे किल्लेच होत. घरांचीं वर्णनें अनेक ठिकाणीं सांपडतात. घरांचे खांब लांकडी किंवा दगडी असत. घराला आंतून व बाहेरून गिलावा करीत व त्यावर उत्तम चित्रें काढीत. 'विनय' ग्रंथांत बाष्पस्नानाकरतां बांधलेल्या एका इमारतीचा उल्लेख आहे. तेथें गरम पाणी व सुवासिक चुन्याची भुकटी मिळत असे. श्रीलंकेमध्यें अनुराधापूर येथें अशा इमारतींचे अवशेष पाहावयास सांपडतात. मोठीं घरें फारशीं नव्हतीं. बहुतेक घरें एकमजली असून त्यांवर गवताचीं छपरें असत. शहरांच्या आरोग्यासंबंधीं विशेष काळजी घेतल्याचें दिसत नाहीं.

श्रीमंत, सरकारी नोकर, उच्च कुलांत जन्मलेले अशा लोकांचीं प्रेतें दहन करीत व त्यांवर स्तूप बांधीत. सामान्य लोकांचीं प्रेतें ठराविक ठिकाणीं टाकीत. तेथें तीं सडून जात किंवा पशुपक्षी तीं खाऊन टाकीत.

## २ राजकीय स्थिति

बौद्ध धर्माच्या उदयाच्या सुमारास जे राजकीय विभाग होते त्यांची कल्पना सोळा देशांच्या नांवांच्या यादीवरून करितां येईल. या देशांचीं नांवें भूगोलविषयक परिस्थितीवरून बनविलेलीं नसून त्या त्या ठिकाणच्या जाती-वर बसविलेलीं आहेत. हीं सोळा नांवें पुढीलप्रमाणें आहेत. अंग, मगध, कासी, कोसल, वज्जी, मल्ल, चेति, वंश, कुरु, पांचाल, मत्स, शरसेन, अस्सक, अवंति, गांधार व कांबोज.

अंग राजे मगधाच्या पूर्वेस रहात. त्यांची राजधानी चंपा. बुद्धाच्या वेळेस हें राज्य मगधाच्या मांडलिकत्वाखालीं होतें. मगध म्हणजे हल्लींचा बिहार प्रांत. या राज्यांत ८०००० गांवें होतीं. त्याचा परीघ २३०० मैल होता. कासी म्हणजे हल्लींच्या काशीजवळचा प्रदेश. बुद्धाच्या वेळीं हें राज्य कोसलच्या राज्यांत समाविष्ट झालें होतें. कोसल म्हणजे हल्लींचा नेपाळ. याची राजधानी श्रावस्ती. कोसल देश अतिशय भरभराटींत होता. मगधाशीं त्याचीं वारंवार भांडणें होत. कोसलांनीं काशीवरही स्वाऱ्या केल्या होत्या. वज्जी हा आठ कुलांचा संघ होता. त्यांत लिच्छवी व विदेह हीं दोन प्रमुख कुलें होतीं. येथें प्रजासत्ताक राज्यपद्धति होती. कुरु लोकांची राजधानी हल्लींच्या दिल्ली-जवळ इंद्रप्रस्थ ही होती. याचा परीघ २६ मैल होता. बुद्धाच्या वेळीं यांना फारसें महत्त्व नव्हतें. शूरसेनांची राजधानी मथुरा ही होती. अस्सक लोकांची वसाहत गोदावरीच्या कांठीं असून त्यांची राजधानी पोतन किंवा पोटली ही होय. अवंतीची राजधानी उज्जैन असून तेथील भूभाग अत्यंत सुपीक होता. गांधार म्हणजे हल्लींचा कंदाहार. त्याची राजधानी तक्षशीला. काम्बोज हा वायव्येकडील अगदीं कडेचा प्रदेश. त्याची राजधानी द्वारका होती.

अयोध्या, वाराणसी, मथुरा, मिथिला, राजगृह, उज्जैन, वैशाली वगैरे शहरें बौद्धकालीं प्रसिद्धीस आलीं होतीं.

बहुतेक ठिकाणीं राजसत्ताक पद्धतीच रूढ होती. राजाजवळ महात, घोडेस्वार, सारथी, तिरंदाज व सैन्यास उपयोग पडणारे ( म्हणजे बाजारबुणगे ) असे नऊ जातीचे लोक असत.

## ३ आर्थिक स्थिति:

**धंदे व संघ**:—बौद्धकालीन आर्थिक स्थितिसंबंधींची माहिती फारशी कोठें मिळत नाहीं. अजातशत्रूनें बुद्धाची भेट घेऊन त्याला व्यावहारिक फायदा दर्शविणाऱ्या सोळा धंद्यांची यादी दिली होती, तीवरून त्या काळीं मुख्य धंदे कोणते होते हें ध्यानांत येतें. सैनिक, सारथी, सेवक, माळी, धोबी, कोष्टी, कुंभार, कारकून इ. धंदे त्या वेळीं चालत. याशिवाय शेतकी हा एक मुख्य व्यवसाय होता. याची जाणीव स्वतः बुद्धानेंच अजातशत्रूला करून दिली. शेतकरी व कर

देणार यांवरच राजाचा व राज्याचा चरितार्थ चालत असतो हें बुद्धानें पटवून दिलें आहे. एके ठिकाणीं धंदेवाल्यांच्या संघांची यादी दिली आहे, तीवरून असे धंद्यांचे संघ अठरा होते हें ध्यानांत येतें. त्यांत लांकूड कापणारे, धातूचें, दगडाचें, मातीचें, कांतड्याचें, हस्तीदंताचें, सोन्याचांदीचें काम करणारे, कोष्टी, शिकारी, खाटीक, नाखवे, चितारी इत्यादींचा समावेश करण्यांत आला आहे. कांहीं महत्त्वाच्या कार्यासाठीं आमंत्रण देणें झाल्यास राजा अशा संघांना आमंत्रणें देत असे. संघाचे पुढारी श्रीमंत असून त्यांचा दर्जा उच्च गणला जाई. संघांतील लोकांमधील पतिपत्नींचीं भांडणें तोडण्याचा अधिकार संघांतल्या पंचांचा असे. संघासंघांत भांडणें झाल्यास तीं तोडण्यासाठीं संघांच्या प्रमुखांवर एक महाप्रमुख असे.

**वाहतुकः**—शेतकरी व किरकोळ धंदेवाले आपल्या मालाची वाहतुक नदींतून किंवा किनाऱ्याकिनाऱ्याजवळून होड्यांतून किंवा खुष्कीच्या मार्गानें करीत. दोनचाकी गाड्यांचे तांडे करून प्रवास करीत असत. उत्तम सडका व पूल नव्हते. एका देशांतून दुसऱ्या देशांत शिरतांना गाडीवाल्यांना कर द्यावा लागे. गाडीवाल्यांच्या संरक्षणासाठीं शिपाई पुरविण्यांत येत, पण त्यांचा खर्च करांतूनच वसूल करीत.

**व्यापाराच्या जिनसाः**—वाहतुकीच्या साधनांचा अभाव असल्यामुळें प्रवाश्यांची ये-जा एकंदरींत कमी असे. परंतु व्यापाराच्या जिनसांची वाहतूक मात्र मोठी होती. त्यांत मुख्यतः रेशमी कापड, चिलखतें, कपडे, सुगंधी द्रव्यें, औषधें, हस्तिदंती काम, जवाहीर, सोनें या गोष्टी मुख्य होत्या. चांदीचा व्यापार फारच थोडा होता.

**चलनपद्धतिः**—पूर्वीची, पदार्थ देऊन पदार्थ घेण्याची पद्धति नष्ट झाली होती. मात्र राजाचा छाप असलेलीं नाणीं प्रचारांत आलीं नव्हतीं. कहापन नांवाच्या तांब्याच्या नाण्यांवर सर्व व्यवहार चालत असे. अशा एका नाण्याचें वजन १॥ तोळे असे. त्यांच्या चोखपणाबद्दल त्यांवर शिक्के मारलेले असत. हे शिक्के कोण मारी हें कळण्यास मार्ग नाहीं. मोठमोठे व्यापारी हुंड्या देऊन व्यवहार करीत असत.

**लोकांचें उत्पन्नः**—सर्वसामान्यपणें लोकांची आर्थिक स्थिति चांगली होती. वस्ती असलेल्या प्रदेशाजवळ भरपूर जमीन फुकट मिळत असे. ती साफ करुन लागवडीस आणतां येत असे. पोटासाठीं मोलमजुरी करण्याचा प्रसंग येणें म्हणजे मोठी आपत्ति समजत. श्रीमंत लोकांची संख्या फारच थोडी होती. श्रीमंत सरदार व वंशपरंपरागत उत्पन्न मिळालेले भिक्षु यांचाच श्रीमंत वर्गांत समावेश होत असे. लक्षाधीश व्यापाऱ्यांची संख्या दहाबाराच होती व ते तक्षशीला, श्रावस्ती, काशी, राजगृह, वैशाली इ. धनाढ्य शहरांत राहत असत. मध्यमवर्गांतील व्यापारी बरेच होते. जमीनदार मुळींच नव्हते. शेतकरी व किरकोळ धंदे करून राहणारे यांचाच भरणा जास्त होता. शेतकरी हा स्वतः आपल्या शेताचा मालक असे. या लोकांचे अधिकारी त्यांचे त्यांनींच निवडलेले असत.

## ४ धार्मिक स्थिति

बहुतेक हिंदुस्थानभर, दाक्षिणेंत व हिंदुस्थानाच्या बाहेर चीन, ब्रह्मदेश, श्रीलंका, जपान, सुमात्रा, जावा, इ. देशांत बौद्ध धर्माचा प्रसार झालेला होता. बौद्ध धर्मांत अनेक संप्रदाय निर्माण झाले होते. वसाहतींच्या शेजारीं अरण्यें असत व त्यांमध्यें निरनिराळ्या संप्रदायाचे शिष्य राहात. त्यांची राहाणी वैराग्यासारखी असे. ते ध्यान, यज्ञ, हठयोग वगैरे करून आपल्या संप्रदायाची परंपरा चालवीत. शिकणें व शिकविणें या मार्गानें ते आपल्या पंथाचें ज्ञान लोकांना करून देत. ते स्वतः कांहींही मिळकतीचा धंदा करीत नसत. रानावनांत हिंडून ते कंदमुळें किंवा फळें जमवीत व त्यांवर स्वतःचा निर्वाह करीत किंवा जवळच्या गांवांत जाऊन बुद्धानें सांगितलेल्या नियमानुसार भिक्षा मागून पोट भरीत.

या वैराग्यांशिवाय परिव्राजक नांवाचे, धार्मिक कार्य करणारे, दुसरे लोक होते. ते गांवोगांव हिंडून तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र इ. चा उपदेश करीत. या कार्यासाठीं ते वर्षांतील आठ-नऊ महिन्यांचा काळ घालवीत. आपापल्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करितांना या लोकांचे वादविवाद होत असत, व अशा वादविवादासाठीं गांवोगांवीं सभागृहें बांधलेलीं असत. श्रावस्ती व वैशाली

गांवांत असे दिवाणखाने होते. या लोकांना राहण्यासाठीं त्यांच्याच वस्तीजवळ राई तोडून दिलेल्या असत. चंपारण्य व मोरीनिषाप हीं अशाच प्रकारचीं स्थानें होत.

या भ्रमण करणाऱ्या भिक्षूंमध्यें कांहीं स्त्रियाही होत्या. त्या ब्रह्मचर्यव्रतें पाळून राहात असत. अरण्यांत भिक्षु देहदंडन करून घेत असत. तापसी व संचारी भिक्षु असें भिक्षूंचे दोन पंथ होते. बऱ्याचशा लोकांनीं एखाद्याचें शिष्यत्व पत्करिलें किंवा एकाच तऱ्हेच्या मतांचा स्वीकार केला म्हणजे त्या लोकांचा पंथ बनून त्यास एखादें नांव मिळत असे. बौद्ध संघाला 'शाक्यपुत्तिय सम्मण' म्हणत. जैनांच्या संघाला 'नीगंठ' म्हणत. आजीविक नांवाचा आणखी एक पंथ होता. अशा प्रकारचे अनेक पंथ पुढें निर्माण झाले.

## ४ सांस्कृतिक स्थिति

**सांस्कृतिकः**—बौद्ध धर्म आज हिंदुस्थानांतून जवळ जवळ नष्ट झाला आहे ही गोष्ट जरी खरी असली तरी, बौद्ध संस्कृतीचे अवशेष मात्र आज-लागायत कायम आहेत, व ते पाहिले असतां बौद्धकालीन लोकांची कल्पकता, कष्टाळू स्वभाव व बुद्धिमत्ता यांची साक्ष पटते. स्तूप, स्तंभ, मठ, मंदिरें व लेणीं इत्यादि स्वरूपांत आज हे सांस्कृतिक अवशेष पाहावयास सांपडतात. त्यांची रचना, भव्यपणा व त्यांतील चित्रकला यांची मुक्तकंठानें स्तुति गाण्यांत पाश्चात्य व पौर्वात्य लोकांत चढाओढ लागलेली दिसते.

**स्तूपः**—गौतमबुद्धाच्या मृत्यूनंतर त्याच्या शरीराचें दहन करण्यांत आलें व त्याची जी राख झाली ती घेऊन त्याचे शिष्य दूरवर त्याच्या मतांचा प्रसार करण्यासाठीं गेले. ही राख एका करंडकांत ठेवून त्यावर त्यांनीं घंटेच्या आकाराचे स्तूप उभारले. आपल्या हिंदु लोकांत दहनभूमीवर वृंदावन बांधण्याची किंवा समाधी बांधण्याची जी चाल आहे तशाच प्रकारची स्तूप बांधण्याची चाल बौद्ध लोकांत होती. मूळच्या स्तूपांचें अनुकरण होऊन अनेक ठिकाणीं असे स्तूप बांधण्यांत आले. बौद्धांच्या बहुतेक लेण्यांत असे स्तूप आहेत. कांहीं आकारानें भव्य व सुंदर आहेत. कांहीं लहान पण सुबक आहेत. पुण्याजवळच्या कार्ले लेण्यांतील स्तूप बराच मोठा व प्रसिद्ध आहे. पण सर्वांत

सांचीजवळ अशोकानें बांधलेला स्तूप फार प्रख्यात आहे. हा स्तूप अर्ध-वर्तुलाकार असून त्याचा आकार छत्रीप्रमाणें आहे. त्याची उंची ५४ फूट आहे. त्याच्या भोंवतीं एक तट असून त्याला चार दरवाजे आहेत. त्यावरील नक्षीकाम अप्रतिम आहे.

**स्तंभः**—बौद्ध धर्माच्या प्रचारकार्यात स्तंभ हें एक प्रभावी साधन होतें. वाहतुकीच्या रस्त्यावर, बाजाराच्या ठिकाणीं, यात्रेच्या जागीं असे स्तंभ उभारण्यांत येत असत व त्यांवर बौद्ध धर्माची शिकवण कोरली जात असे. उद्देश असा कीं, जाणाऱ्या येणाऱ्या असंख्य लोकांच्या डोळ्यांपुढें या गोष्टी सतत याव्यात व त्याचा परिणाम त्यांच्या मनावर व्हावा.

असे स्तंभ अशोकानें बऱ्याच मोठ्या प्रमाणावर उभारले. अयोध्या प्रांतांत सांपडलेला स्तंभ ५० फूट असून तो अखंड आहे. पायाजवळ त्याचा व्यास ५० इंच असून तो वर निमुळता होत गेला आहे. त्याचें वजन अदमासें ५० टन भरेल. हे स्तंभ अवजड असले तरी ओबडधोबड नाहींत. त्यांसाठीं वापरण्यांत आलेले दगड आरशासारखे गुळगुळीत करण्यांत आलेले आहेत. सारनाथाजवळचा स्तंभ पाहाण्यासारखा आहे. त्याचा तळचा भाग घंटेसारखा असून त्याला कमळाच्या पाकळ्यांचा आकार देण्यांत आला आहे. मधल्या बाजूस एक वाटोळा दगड असून त्यावर चक्र कोरलें आहे. त्याच्या बाजूस एका पुष्ट बैलाचें चित्र आहे. या वाटोळ्या दगडाच्या चारी बाजूंस चार प्रचंड सिंह उभे करण्यांत आले आहेत. या स्तंभाची गणना जगांतील सर्वोत्कृष्ट शिल्पकृतींत करण्यांत येते.

**लेणीं:**— बौद्धधर्माचें अमर स्मारक म्हणजे त्यांनीं डोंगरांत खोदलेलीं हीं अजस्र लेणीं होत. जवळ जवळ दोन हजार वर्षांपूर्वीं कोणतीही आधुनिक साधनें उपलब्ध नसतांना केवळ मानवी कौशल्यावर भरंवसा ठेऊन हीं कामें कशीं केलीं असतील हें एक न उलगडणारें कोडेंच आहे. आज सर्व साधनांची अनुकूलता असूनही कोणाही शास्त्रज्ञास असलें काम करितां येणार नाहीं. हें काम किती दिवस करण्यांत येत होतें, त्याला पैसा किती लागत होता, त्याची

आखणी कोणी केली, त्यांत अपयश कितीदां आलें याबद्दल कांहींच तर्क करितां येत नाहीं.

साधारणपणें डोंगरांत हीं लेणीं खोदण्यांत आलेलीं आहेत. त्यांचा उपयोग बहुधा बौद्ध भिक्षूंना राहण्यासाठीं किंवा प्रवचनासाठीं होत असावा. मऊ पण बळकट दगड पाहून डोंगरांत खोलवर अशीं लेणीं खोदण्यांत येत त्यांत खांब, छत, कमानी काढण्यांत येत व त्यांवर पशु, पक्षी, माणसें यांचीं चित्रें कोरण्यांत येत. शिल्पकलेच्या दृष्टीनें लेण्यांतील कोरीव काम अतिशय सुबक आहे.

अशीं लेणीं सर्व हिंदुस्थानभर पसरलीं आहेत. पण त्यांतल्या त्यांत हैद्राबाद संस्थानांत असलेलीं वेरूळचीं व अजिठ्यांचीं लेणीं सर्व जगांत प्रसिद्ध आहेत. विशेषतः या लेण्यांतील चित्रकला पाहून मन थक्क होऊन जातें. इतक्या वर्षांनंतरही तीं जणूं कांहीं कालच काढलीं आहेत असा भास होतो. त्यांचे रंग अगदीं ताजे वाटतात. चित्रांचे नमुने इतके विपुल व विविध आहेत कीं पाहणारा कंटाळून जावा. आज हीं चित्रें पाहण्यासाठीं दिवा घेऊन जावें लागतें, इतका तेथें अंधार आहे. पण अंधारांत काढलेल्या या चित्रांचा आकार प्रमाणबद्धता, सौंदर्य यांत शोधूनही चूक काढतां येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर, चित्रांतील व्यक्तींच्या मुखावरचे भावही दाखविण्यांत कोठेंही कसूर किंवा चूक झालेली नाहीं. या चित्रांपैकीं कनोजच्या हत्तीच्या पिलाचें चित्र, झुरणीस लागलेल्या राजकन्येचें चित्र हे उत्कृष्ट कलेचे नमुने मानले जात.

**मठ**.– बौद्ध भिक्षूंची संख्या जसजशी वाढूं लागली, तसतशी त्यांच्या राहण्याची सोय करणें हें मुख्य काम होऊं लागलें. त्याचप्रमाणें बौद्ध धर्माच्या अनुयायांची संख्या बाहेरच्या देशांत वाढूं लागल्यानंतर चीन, ब्रह्मदेश, सयाम, श्रीलंका या देशांतून अनेक यात्रेकरू बुद्धाच्या पवित्र ठिकाणाचें दर्शन घेण्यासाठीं येऊं लागले. त्यांची सोय करणें हेंही एक काम झालें. या दोन्ही कारणांसाठीं ठिकठिकाणीं मठ बांधण्यांत येऊं लागले. त्यांना विहार असें म्हणत. बिहार प्रांतांत अशा विहारांची संख्या जास्त असल्यामुळें त्या प्रांताला बिहार हें नांव पडलें.

अशोकानें अशा तऱ्हेचे दोन मोठे मठ बांधले. एक अशोकाराम व दुसरा कुक्कुटाराम. या मठांत बौद्ध लोकांच्या मोठमोठ्या सभा होत व तेथें महत्त्वाचे निर्णय घेतले जात.

**विद्यालयें:**—लोकांना ज्ञान देण्याचें काम बौद्ध भिक्षुच करीत. अशा ज्ञान देण्याच्या पाठशाळा सर्व देशभर होत्या. त्यांतूनच पुढें विश्वविद्यालयें निर्माण झालीं. अशा विश्वविद्यालयांत नालंदाचें विद्यापीठ सर्व जगांत प्रसिद्ध होतें. इ. स. ७०० ते इ. स. १२०० पर्यंत हें विद्यापीठ भरभराटींत होतें. बौद्ध धर्माचें तत्त्वज्ञान शिकण्याचें हें महत्त्वाचें शैक्षणिक केंद्र मानलें जाई. सध्यांच्या बिहार प्रांतांतील पाटण्याजवळ हें विद्यापीठ होतें. या विद्यापीठांत शिक्षण घेण्यासाठीं चीन, तिबेट वगैरे दूरच्या देशांतून विद्यार्थी येत, त्यांची संख्या १०००० होती. या विद्यापीठांत एकाच वेळीं हजारों विद्यार्थी शिक्षण घेत होते. विद्यापीठाचे नियम अत्यंत कडक असून विद्यार्थ्यांचें आचरण शुद्ध व पवित्र होतें. विद्यार्थ्यांचा सर्व काळ शिकण्यांत जात असे. या विद्यापीठांत प्रवेश मिळण्यासाठीं प्रवेशपरीक्षा असे व ती फार कडक होती. बौद्ध व वैदिक तत्त्वज्ञान, व्याकरण, भाषाशास्त्र, वैद्यक, शस्त्रकर्म व तर्कशास्त्र हे मुख्य विषय होते. शीलभद्र, गौतमी यांच्यासारखे महापंडित या विद्यापीठाचे मुख्याध्यापक होते. विद्यार्थी विद्यापीठांतच राहात. विद्यापीठाची इमारत सहामजली भव्य असून त्यांत आठ मोठे दिवाणखाने, ३०० लहान खोल्या व धर्मगंज नांवाचें ग्रंथालय होतें.

याचसारखें दुसरें प्रसिद्ध विद्यापीठ तक्षशिलेचें होतें. तें हल्लींच्या पेशावरजवळ वसलें होतें. इ. स. पूर्वी ७ व्या शतकापासून इ. स. च्या ४ थ्या शतकापर्यंत हें भरभराटींत होतें. येथील अध्यापकांची कीर्ति जगभर पसरलेली होती. येथें हुषार व गरीब विद्यार्थ्यांची सोय होत असे. वेद, शास्त्र, शेती, धनुर्विद्या, वैद्यक हे विषय या विद्यापीठांत शिकविण्यांत येत.

## ५ बौद्ध धर्माचा ऱ्हास

**प्रास्ताविक:**—गौतमबुद्धाच्या पश्चात् त्याच्या धर्माचा प्रसार फारच झपाट्यानें व दूरवरच्या देशांत होऊन बौद्ध धर्माच्या अनुयायांची संख्या

कोटीनें मोजतां येऊं लागली. हिंदुस्थानांतही वैदिक धर्माचें नांव क्वचितच ऐकूं येऊं लागलें. सर्वत्र बौद्ध धर्माचा विजय होत गेला. राजांचें पाठबळ मिळाल्यामुळें तर त्या धर्माला ऐश्वर्यच प्राप्त झालें. पण ही भरभराट पुढें टिकूं शकली नाहीं. कालांतरानें म्हणजे इ. स. च्या २ऱ्या-३ऱ्या शतकापासून बौद्ध धर्माच्या वैभावाला उतरती कळा लागली. इ. स. च्या ८ व्या शतकापर्यंत तो कसाबसा जीव धरून टिकला. पण पुढल्या धामधुमीच्या काळांत कालाच्या प्रचंड लाटेबरोबर बौद्ध धर्म हिंदुस्थानांतून तरी पार वाहून गेला. बौद्ध धर्माला लाभलेलें ऐश्वर्य कां लोपत गेलें त्याचा विचार पुढें केला आहे.

**बुद्धाची साधी पण आचरावयास कठिण अशी शिकवण:—** आसक्ति हेंच सर्व दुःखाचें मूळ असून त्याचा त्याग केला असतां मनुष्य दुःखमुक्त होतो; आसक्तीचा त्याग करण्यासाठीं सदाचरणानें वागून मनुष्यानें आपलें मन तयार केलें पाहिजे हें गौतम बुद्धाच्या शिकवणीचें सार होतें. वरवर पाहतां हें सांगणें अगदीं साधें, सरळ व सामान्य माणसालाही पटेल असें दिसतें, पण खोलवर जाऊन विचार करितां सदाचरणाचा किंवा आशात्याग करण्याचा उपदेश हा मनुष्यस्वभावाला सोडून आहे हें ध्यानांत येईल. कोणत्याही गोष्टीबद्दल मनांत इच्छासुद्धां उत्पन्न होऊं यावयाची नाहीं ही गोष्ट लाखांत एखाद्या माणसालाही जमणें जेथें कठिण आहे, तेथें आशेच्या किंवा सुखाच्या मागें धांवणाऱ्या सर्वसामान्य लोकांची काय दशा होत असेल हें निराळें सांगावयास नको. श्मशानवैराग्य प्राप्त झालें म्हणजे मनुष्याला कांहीं नकोसें वाटतें, पण त्या वैराग्याचा पहिला भर ओसरला कीं पूर्वीच्या साऱ्या सुखासाठीं त्याचें मन धडपड करूं लागतें. हा मनुष्यस्वभाव आहे. बुद्धाचा उपदेश त्याच्या विरुद्ध होता. यामुळें पहिल्या प्रथम लोक जरी त्यावर भाळून गेले, तरी कालान्तरानें त्यांतील अनैसर्गिकपणा त्यांच्या ध्यानांत आला. व्यवहारी माणसाला असत्य बोलूं नये, हिंसा करूं नये वगैरे गोष्टी व्यवहार संभाळतांना बाजूस साराव्या लागतात. बुद्धाचा तर या गोष्टींवर फार कटाक्ष होता. अर्थात् त्याचें अनुयायित्व पत्करून त्याच्या उपदेशाच्या विरुद्ध

वागणें लोकांना जड वाटूं लागलें. म्हणून बौद्ध धर्म सोडण्याकडे लोकांचीं मनें झुकूं लागलीं.

**बौद्ध धर्म सुखाच्या आड येतोः**—गौतमबुद्धाच्या मताप्रमाणें हें जग दुःखमय आहे. त्यांत सुखाचा अंश फार थोडा आहे. आणि यासाठींच प्रत्येकानें या मृगजलाच्या मार्गें न लागतां खऱ्या मोक्षप्राप्तीसाठीं सर्वसंगपरित्याग करून भिक्षु व्हावें. दुःखी, असहाय लोकांच्या मनावर बुद्धाच्या या सांगण्याचा परिणाम होऊन अनेक लोक भिक्षु झाले. स्त्रियाही भिक्षुणी बनल्या. पण कालांतरानें लोकांच्या ही गोष्ट ध्यानांत आली कीं, संसार जरी दुःखमय असला तरी त्यांत सुखही आहे व त्या सुखाचा उपभोग घेणें हा मानवी स्वभाव आहे. दुःख आहे म्हणून सुखच नको म्हणणें म्हणजे घुशी होतील म्हणून घर बांधणेंच नको असें म्हणण्यापैकीं आहे. भिक्षूचें जीवन म्हणजे हाल, कष्ट व त्याग. सामान्य माणसांना गोडी वाटण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं. मग भिक्षु होण्याची प्रवृत्ति कमी होत गेल्यास त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहींच नाहीं. या त्यागाच्या शिकवणुकीपेक्षां भोग व त्याग ही वैदिक धर्माची शिकवण लोकांना जास्त प्रिय वाटूं लागली. आर्यांनीं संसार करून मग संन्यास घेण्याचा उपदेश केला होता व मनुष्यस्वभावाला तोच योग्य होता. यामुळें वैदिक धर्माच्या शिकवणुकीकडे लोकांचें मन पुन्हां वळूं लागलें.

**बौद्ध धर्मांतील नास्तिकताः**—गौतमबुद्धानें किंवा त्याच्या अनुयायांनीं परमेश्वराबद्दल एक अवाक्षरही काढलें नव्हतें. याचें कारण काय असावें हें कोणाच्याच ध्यानांत आलें नाहीं. बुद्धाचा परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वासच नव्हता, का त्याला आर्यांच्या भावनेला धक्का द्यावयाचा नव्हता हें समजणें फार कठिण आहे. पण बौद्ध धर्मांत परमेश्वराचें नांव नाहीं, तेव्हां तो धर्म नास्तिकतेचा प्रसार करितो असें सामान्य लोकांस वाटूं लागलें. दुष्काळ, रोगराई, प्रलय या महाभयंकर संकटाच्या वेळीं मनुष्याला परमेश्वर आठवतो व त्याला प्रसन्न करण्याचा मार्ग तो हुडकूं लागतो. बौध धर्मांत परमेश्वरच नव्हता मग त्याला संतुष्ट करण्याचा मार्ग तरी कोठून येणार ? अशीं संकटें येणें म्हणजे परमेश्वराचा कोप होणें अशी सामान्य लोकांची समजूत होती. वैदिक धर्मांत पंचमहाभूतें व

त्यांना प्रेरणा देणारा परमेश्वर या कल्पना होत्या व परमेश्वराला संतुष्ट करण्यासाठीं यज्ञयागाचा मार्गही सांगितला होता. संकटांत सांपडलेल्या माणसांना या मार्गाचें महत्त्व पटूं लागलें. परमेश्वरावरची त्यांची श्रद्धा वाढूं लागली व ज्या प्रमाणांत ही श्रद्धा वाढत गेली त्या प्रमाणांत बौद्ध धर्माबद्दलची आस्था कमी होत गेली.

**बौद्ध तत्त्वज्ञान नवीन नव्हतें:**—बौद्ध धर्माचीं मुख्य तत्त्वें म्हणजे अहिंसा, सदाचरण व त्याग. प्रथम लोकांची अशी समजूत झाली कीं बुद्ध कांहीं तरी नवीन सांगतो आहे. पण विचार केला असतां यांत नवीन असें कांहींच नाहीं. हीं तत्त्वें आर्यांच्या वैदिक धर्मांत होतींच. फक्त लोकांना त्यांचा विसर पडला होता. उदा० अहिंसा हें तत्त्व. आर्यांनीं सर्रास हिंसा करण्याचा उपदेश कधींच केला नव्हता. दयेची महती त्यांनीं गायिली होती. धर्मकृत्याच्याच वेळीं हिंसेला त्यांची मान्यता होती, इतर वेळीं नाहीं. त्याचप्रमाणें सदाचरण. आर्यांचा पुनर्जन्मावर विश्वास असून पुढील जन्मीं चांगली गति मिळविण्यासाठीं प्रत्येकानें या जन्मीं सदाचरणानें राहावें असा त्यांचा आग्रह होता. त्यागाबद्दलही असेंच म्हणतां येईल. सुखोपभोग व त्याग यांचा उत्तम समन्वय त्यांनीं केला होता. सुख भोगून मग संन्यासी व्हावें असेंच त्यांचें मत होतें. एकूण हीं तत्त्वें लोकांना अपरिचित नव्हतीं. मग जीं तत्वें आपल्याही धर्मांत आहेत त्याच तत्त्वांसाठीं मुद्दाम दुसरा धर्म कां स्वीकारावा, असा विचार मनांत येऊन बौद्ध धर्म स्वीकारण्याबद्दलची लोकांची वृत्ति कमी होत गेली.

**भिक्षु-भिक्षुणींचें वाईट वर्तन:**—बौद्ध धर्माचें प्रचारकार्य मुख्यतः भिक्षु-भिक्षुणींनीं केलें. बौद्ध धर्माला प्रथमतः मिळालेले प्रचारक कश्यप भिक्षूसारखे त्यागी, शीलसंपन्न व कर्तबगार होते. पुढें अशा आदर्श प्रचारकांची संख्या घटत गेली. पूर्वीच्या प्रचारकांच्या अंगीं असलेले नीतिमत्ता, स्वार्थत्याग वगैरे गुण नवीन प्रचारकांत उरले नाहींत. त्यांच्या जागीं भोग, चैन, विलास, आळस, इत्यादि दुर्गुण वाढूं लागले. बौद्ध मठांत भिक्षूणींनाही प्रवेश होता. पूर्वीं त्यांचें आचरण शुद्ध होतें. पण बौद्ध धर्माच्या वाढत्या ऐश्वर्याबरोबर भिक्षु व भिक्षुणी कर्तव्यच्युत होऊन त्यांचें आचरण बिघडलें. पूर्वीचें

त्यागपूर्ण ध्येय 'जाऊन विलास हेंच त्यांचें ध्येय बनलें. अशा शीलभ्रष्ट प्रचारकांचा प्रभाव लोकांवर पडणार कसा? त्यांतच बौद्ध मठांची सांपत्तिक स्थिति राजाश्रय, धनिकांचा पाठिंबा व भाविक लोकांची अंधश्रद्धा यांमुळें सुधारली होती. मठांत सर्व प्रकारची चैन चालू झाली. उलट धर्मकार्यांचा लोप होऊं लागला. ही परिस्थिति पाहून अनेक नालायक, स्वार्थसाधू लोक चैनीच्या आशेनें भिक्षु होऊं लागले. अशांचा उपयोग तर दूरच राहिला, पण त्यांच्यामुळें बौद्ध धर्माचा अधःपात मात्र जवळ आला.

**बौद्ध धर्माचा राजाश्रय सुटला**:—बौद्ध धर्माचा प्रसार बिंबिसार, अशोक, हर्ष, कनिष्क, मिलिंद इत्यादि राजांच्या आश्रयामुळें फार झपाट्यानें झाला होता. त्या राजांनीं स्वतः बौद्ध धर्माचा स्वीकार करून आपली सर्व शक्ति त्या मतांचा प्रसार करण्यांत वेंचली होती. हिंदु धर्माच्या सुदैवानें इ. स. च्या पांचव्या शतकांत गुप्त घराण्यांतील राजे भारतीय सम्राट बनले. या राजांनीं स्वतः वैदिक धर्माचा स्वीकार करून त्याचें पुनरुजीवन करण्याकडे लक्ष दिलें. त्यांच्या प्रयत्नामुळें बौद्ध धर्माकडे वळलेली प्रजा पुन्हां वैदिक धर्माकडे वळूं लागली.

**बौद्ध धर्मांत फाटाफूट**:—बुद्धाच्या अनुयायांची संख्या जसजशी वाढत गेली तसतशी त्याच्या मताबद्दलची चर्चा वाढूं लागली व त्यांतून निरनिराळे अर्थ निघून, त्यावरून निरनिराळे पंथ उत्पन्न झाले. अशा पंथांपैकीं महायान व हीनयान हे दोन पंथ महत्त्वाचे आहेत. बुद्धानें सांगितलेल्या मार्गाचें कांटेकोरपणें आचरण करणारे ते हीनयान किंवा दक्षिण-बौद्ध व कालमानाप्रमाणें त्यांत बदल करणारे ते महायान किंवा उत्तर-बौद्ध मानले जाऊं लागले. या दोन पंथांशिवाय आणखीही लहानमोठे अनेक पंथ पुढें निर्माण झाले. या भिन्न पंथांत ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न अनेकवार झाले. त्या प्रयत्नांत तात्पुरतें यश जरी मिळालें तरी, कालांतरानें त्यांच्यांतील विरोध वाढत जाऊन मूळचें ऐक्य नष्ट झालें. अर्थात एकदां शक्तिक्षीण झाल्यानंतर बौद्ध धर्माचा विनाशकाल जवळ आला हें निराळें सांगावयास नको.

**शंकराचार्य व कुमारिलभट्ट यांचें कार्य**:—वैदिक धर्माला इ. स. च्या सातव्या व आठव्या शतकांत कुमारिलभट्ट व शंकराचार्य या दोन

अत्यंत बुद्धिमान व प्रभावी प्रचारकांचें साहाय्य मिळाल्यामुळें बौद्ध धर्माचा लोप होऊन वैदिक धर्म पुन्हा पूर्वीच्या तेजानें तळपूं लागला. कुमारिलभट्ट हे इ. स. ७०० च्या सुमारास उत्तर हिंदुस्थानांत जन्मले व त्यांनीं आपल्या प्रभावी वाणीनें वेदांना त्यांचें पूज्य स्थान पुन्हा प्राप्त करून दिलें. यज्ञयाग व पंचमहाभूतांची आराधना त्यांनीं पुन्हा सुरू केली. बौद्ध धर्माच्या संन्यास-मार्गावर त्यांनीं आपलें टीकास्त्र सोडलें, पण त्यांत त्यांना फारसें यश आलें नाहीं.

शंकराचार्यांचा जन्म केरळ प्रांतांत इ. स. ७८८ सालीं एका नंबुद्री ब्राह्मणाच्या कुळांत झाला. वडील लहानपणींच वारल्यामुळें आईनें त्यांचा प्रतिपाल केला. लहान वयांतच त्यांनीं संन्यासधर्म पत्करून गोविंदपादाचार्य या गुरूचें शिष्यत्व पत्करिलें. पुढें कांहीं दिवस अध्ययनांत घालवून नंतर ते काशीस गेले व तेथील पंडितांस त्यांनीं वादांत जिंकलें. यामुळें त्यांचें महत्त्व वाढलें. नंतर त्यांनीं उपनिषदें, गीता, वेदसूक्त यांवर शांकरभाष्य लिहिलें. सर्व हिंदुस्थानभर हिंडून व बौद्ध पंडितांशीं वाद करून त्यांनीं बौद्ध धर्माचें खंडन केलें. आपलें कार्य आपल्या मागेंही चालावें म्हणून त्यांनीं बद्रिकेदार, जगन्नाथपुरी, शृंगेरी व द्वारका येथें चार मठ स्थापन केले. वयाच्या ३२ व्या वर्षींच त्यांनीं हिमालयांत गुहाप्रवेश करून आपला अवतार संपविला.

शंकराचार्यांनीं वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें, पण हें कार्य करितांना त्यांनीं त्या वेळीं लोकप्रिय झालेली अहिंसा व संन्यास हीं दोन प्रभावी तत्त्वें आपल्या मतांत समाविष्ट करून घेतलीं. थोडक्यांत सांगावयाचें तर कुमारिलभट्टानें स्थापिलेल्या वेदप्रामाण्याच्या पायावर शंकराचार्यांनीं हल्लींच्या हिंदु धर्माची विस्तृत, मनोहर व भक्कम इमारत बांधली. त्यांच्या उद्योगामुळें बौद्ध धर्माचा लोप घेऊन वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन झालें.

## उतारे

**बौद्ध धर्म**:—“ सर्व जगाला व्यापक होऊं पाहाणारा जगांतील पहिला धर्म बुद्ध धर्मच होय. या धर्माच्या संस्थापकाला एखादा नवा धर्म मुळींच स्थापन करावयाचा नव्हता; दुःखानें संपूर्ण ग्रासलेल्यांना दुःखमुक्त करणें हाच त्याचा

एकमेव हेतु होता. बौद्ध धर्माइतके व्यापक धर्म म्हणजे ख्रिश्चन व इस्लाम हे होत; पण हे दोन्हीही बुद्धानंतर शेंकडों वर्षांनीं निर्माण झाले. बौद्धधर्मीयांची संख्या आज सुमारें पंचेचाळीस कोटि आहे. ”

**बौद्ध धर्माचा ऱ्हासः**—“ बुद्धाच्या पराजयाचीं कारणें उपजतंच त्याच्याबरोबर होतीं. त्याची सर्व भिस्त वर्तनावर होती. तत्त्वविचाराचा भाग बुद्धमतांत फारसा नाहीं. निर्वाण म्हणजे काय याची स्पष्ट कल्पना खुद्द बुद्धाला सुद्धां सांगतां आली नाहीं. बौद्ध धर्मांत ईश्वर तर मुळींच नाहीं, त्यामुळें भक्तीला मार्ग नाहीं. ज्ञानाची सुद्धां फारशी उठाठेव त्या धर्मांत नाहीं. बौद्ध धर्मांत ईश्वर तर नाहींच नाहीं, पण त्याला आत्माही मान्य नाहीं....”

## थोडक्यांत

**सामाजिक स्थितिः**—समितीच्या मध्यस्थीनें व्यवहार; ग्रामपंचायतीकडून गांवचा कारभार; कुटुंबासाठीं शेतीपुरती जमीन देण्याची पद्धत; क्षत्रियांना विशेष महत्त्व-धंद्याचे निर्बंध रद्द; सामाजिक दर्जा बदलण्याची सवलत; उत्तम घरें; चित्रकला; सार्वजनिक स्नानगृहांची सोय.

**राजकीय स्थितिः**—सोळा जातींवरून सोळा स्वतंत्र देश; अंग, कोसल, मगध, कुरु, लिच्छवी, शूरसेन इ. प्रमुख राज्यें; राजसत्तात्मक राज्यपद्धति रूढ; संघांचें महत्त्व व कार्य.

**आर्थिक स्थिति :**—सोळा धंदे; शेतकी मुख्य व्यवसाय; धंद्याचे १८ संघ; खुष्कीच्या व जलमार्गानें मालाची ने-आण; वाहतुकीवर कर; रेशीम, कपडे, चिलखतें, सुगंधी वस्तु, सोनें, सुबक वस्तु-व्यापारी जिन्नस; नाणें-कहापन; तांब्यावर देवघेव; लोकांची आर्थिक स्थिति चांगली.

**धार्मिक स्थिति :**—हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर बौद्ध धर्माचा प्रचार-अनेक संप्रदायांचा उगम-भिक्षु, बैरागी, परिव्राजक यांच्या मार्फत धर्मकार्य.

**सांस्कृतिक स्थिति:**–स्तूप, स्तंभ, लेणीं, मठ, मंदिरें यांचें बांधकाम; नालंद, तक्षशीला येथील विद्यापीठें.

**ऱ्हासाचीं कारणें:**—(१) आचरण्यास कठिण शिकवण.
(२) बौद्ध धर्माचा सुखाविषयींचा विरोध.
(३) नास्तिकता.
(४) तत्त्वज्ञानांत नाविन्य नाहीं.
(५) भिक्षु-भिक्षुणींचें वर्तन.
(६) राजाश्रय तुटला.
(७) बौद्ध धर्मात फाटाफूट.
(८) शंकराचार्य व कुमारिलभट्ट यांचें कार्य.

**प्रश्न:**—(१) बौद्धकालीन लोकांची सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थिति कशी होती.
(२) खालील गोष्टींविषयीं माहिती द्या.
स्तूप, लेणीं, नालंदाचें विद्यापीठ.
०(२) बौद्ध धर्माचा ऱ्हास कशामुळें झाला? थोडक्यांत विवेचन करा.

**स्वाध्याय:**—(१) आशिया खंडाचा नकाशा काढून त्यांत बौद्ध धर्माचा प्रसार कोठें कोठें झाला होता तें भरा.
(२) वेरूळ, अजिंठा, कार्लें येथील लेणीं, स्तूप, स्तंभ यांचीं चित्रें जमा करून त्यांच्या माहितीची एक छोटी मार्गदर्शिका तयार करा.

# विभाग दुसरा

## प्रकरण १ लें

## संधिप्रकाश

( १ ) मगधाचा पूर्वेतिहास;
( २ ) राजघराणीं व त्यांचे काल;
( ३ ) शिशुनाग घराणें;
( ४ ) नंद घराणें;

### ( १ ) मगधाचा पूर्वेतिहास.

पहिल्या विभागांत आपण आर्यांच्या धार्मिक व सामाजिक विकासाचें ज्ञान मिळविलें, त्यावरून आर्य मानव सर्वांत श्रेष्ठ कां हें तुमच्या ध्यानांत आलें असेल. त्याचबरोबर आर्यांच्या वर्णभेदांतून जातिभेद कसे निर्माण झाले व ते आपल्या ह्या एकजिनसी समाजाच्या नाशाला कारणीभूत कसे झाले हेंही तुम्हांला समजलें असेल. आर्यांच्या सामाजिक उत्कर्षापकर्षाचा जसा हा इतिहास तुम्ही शिकलां तसाच आतां त्यांच्या राजसत्तेच्या उत्कर्षाचा इतिहास या विभागांत तुम्हांस शिकावयाचा आहे. जगांतील आजच्या मोठ्या गणल्या गेलेल्या राष्ट्रांत ज्या काळीं मानवाची वस्ती सुद्धां झाली नव्हती इतक्या प्राचीन काळीं आपल्या आर्यांचीं साम्राज्यें सर्व तऱ्हेच्या ऐश्वर्यानें नटलेलीं पाहून तुम्हांला अभिमान व कौतुक निःसंशय वाटेल. परंतु त्याजबरोबर आपल्या या ऐश्वर्याचा नाश आपल्या स्वार्थांध वृत्तीमुळें व विस्कळीतपणामुळेंच झाला हें पाहून तुम्हांला खेदही झाल्याशिवाय राहाणार नाहीं. आपल्या समाजांतील हे गुणदोष पाहून आपल्याला बराच बोध घेण्यासारखा आहे.

आपल्या प्राचीन इतिहासाचा अभ्यास करितांना वेदकाळांतील व आर्षकाळांतील घडामोडींचा इतिहास आपणास वगळावा लागतो. कारण, त्या काळांतील इतिहास लिहिण्याला पुरेसे पुरावेच सांपडत नाहींत. तसे पुरावे

सांपडते तर दाशराज्ञयुद्धाचे जेते भरतनेते सुदास व दिवोदास यांचा इतिहास आपल्याला कळला असता. रामायण व महाभारत हे ऐतिहासिक काव्यग्रंथ खरे; पण त्यांवरून त्या काळांतील सुसंगत इतिहास जमविण्याइतकी माहिती कांहीं मिळत नाहीं. ती मिळती तर ईक्ष्वाकु कुळांतील सगर, ययाति, मांधाता, रघु इत्यादि नृपश्रेष्ठांचा इतिहास आपणास कळला असता. हा सर्व इतिहास अत्यंत बोधप्रद व स्फूर्तिदायक झाला असता. पुराव्याच्या अभावीं आपला फार मोठा इतिहास अज्ञात आहे.

शिलालेख, धातुलेख, ताम्रपट इत्यादि साधनांच्या आधारानें जो इतिहास आपणांस मिळूं लागतो, त्यांतील पहिला भाग म्हणजे मगध देशाचा इतिहास होय. तोही अंधारांत चांचपडत मार्ग शोधतात तसा शोधावा लागतो. पुष्कळशा राजांचीं नांवें सुद्धां मिळत नाहींत आणि ज्यांचीं नांवें मिळतात त्यांपैकीं बहुतेकांचा काळ अनिश्चित असतो. अशा परिस्थितींतही जो इतिहास जुळवितां आला तो विद्वानांनीं जुळविण्याचे प्रयत्न केले आहेत. त्यांपैकीं मगधाच्या इतिहासाकडे आपण आतां वळूं.

मगधाचा इतिहास इ. स. पू. सहाव्या शतकापासून सुरू होतो. या इतिहासाला 'मगधाचा इतिहास' म्हणण्याचें कारण असें कीं, मगध देश गंगा-यमुनांच्या कांठचा सुपीक प्रदेश असल्यानें आर्यांच्या पहिल्या वसाहतींतील महत्त्वाची वसाहत होता. मगध म्हणजे हल्लींचा बिहार प्रांत. याच वसाहतींत आर्यांचीं राज्यें व साम्राज्यें स्थापन झालीं. गुप्तकाळापर्यंतच्या बहुतेक राजांचा व सम्राटांचा देश मगध. मगधाचे राजेच भारतीय सम्राट बनले. त्या राजांचा इतिहास तो 'मगधाचा इतिहास.'

भारताचे विंध्य पर्वतामुळें निसर्गतःच दोन भाग पडतात. 'उत्तर भारत' व 'दक्षिण भारत' किंवा 'दख्खन'. आर्यांनीं प्रथम उत्तर भारत व्यापला. कारण, तेथील प्रदेश अत्यंत सुपीक व समृद्ध होता. याच भागांत त्यांच्या पहिल्या वसाहती झाल्या. वसाहतींचीं पुढें राज्यें झालीं. इ. स. पू. सहाव्या शतकांत या भागांत एकंदर ८० लहानमोठीं राज्यें होतीं. त्यांपैकीं कंबोज राष्ट्र (काश्मीरच्या उत्तरेस), सिंध सौवीर (सिंधु नदीच्या कांठीं) आणि मगध

(गंगा-यमुनांच्या कांठीं) हीं मोठीं राज्यें होतीं. त्यांतही मगधाचें राज्य विस्तारानें लहान असलें तरी तें अधिक सामर्थ्यवान होतें. बऱ्याच मोठ्या घराण्यांनीं मगधावर राज्य केलें. त्या घराण्यांची माहिती आपण आतां मिळवूं.

## २ राजघराणीं व त्यांचे काल

मगधाच्या गादीवर आलेल्या घराण्यांत शिशुनाग, नंद, मौर्य, शुंग, कण्व व गुप्त हीं घराणीं प्रसिद्ध असून त्यांचे काल खालीलप्रमाणें आहेत.

| | | |
|---|---|---|
| (१) शिशुनाग | घराणें:- | इ. स. पू. ६४२-४७० |
| (२) नंद | " | " ४७०-३२२ |
| (३) मौर्य | " | " ३२२-१८४ |
| (४) शुंग | " | " १८४-७३ |
| (५) कण्व | " | इ. स. पू. ७३ - २८ |
| (६) गुप्त | " | इ. स. ३२० - ४९० |

### (३) शिशुनाग घराणें:- (इ. स. पू. ६४२-४७०)

मगधाच्या शेजारीं काशी (वाराणशी—बनारस) चें राज्य होतें. शिशुनाग घराण्यांतील राजे हे मूळचे काशीचे राजे होते. मगधांतील लोकांनीं त्यांस मगधावर राज्य चालविण्यासाठीं बोलाविलें. मगधांतील लोकांना 'मल्ल' म्हणत. ते क्षत्रिय होते. काशीचे राजेही प्रसिद्ध ईक्ष्वाकु घराण्यांतील म्हणजे उच्च क्षत्रिय होते. शिशुनाग घराण्याचा संस्थापक शिशुनाग गादीवर येण्यापूर्वीं तेथें अश्वसेन नांवाचा राजा होता. अश्वसेनाच्या मृत्युनंतर ईक्ष्वाकु घराण्याचा शेवट झाला. शिशुनाग या क्षत्रिय सेनानीनें अश्वसेनाच्या मृत्युमुळें रिकामी झालेली गादी हस्तगत केली. शिशुनाग अतिशय पराक्रमी होता. कोसल देशाचा राजा 'वृत्त' यानें काशीच्या राज्यावर आपला वारसा प्रस्थापित करण्यासाठीं स्वारी केली असतां शिशुनागानें त्याचा पराभव केला. त्यामुळेंच मल्लांनीं त्याला मगधावर बोलाविलें असावें. शिशुनागानें आपला मुलगा काकवर्ण यास काशीच्या गादीवर बसविलें आणि स्वतः मगधाच्या गादीवर

बसण्यासाठीं गेला. काकवर्ण हा दुबळा राजा काशीवर आलेला पाहून पुन्हा वृत्तानें काशीवर स्वारी केली आणि तें राज्य आपल्या राज्यास जोडलें. शिशुनागाला ही गोष्ट कळतांच तो रागानें लाल झाला आणि कोसल देशावर ताबडतोब स्वारी करून त्यानें वृत्ताचा पुन्हा पराभव केला. यानंतर काशीचें राज्य त्यानें मगधांत सामील करून घेतलें.

शिशुनागानें इ. स. पू. ६४२ ते ६२७ पर्यंत राज्य केलें. त्याच्यानंतर त्याचा मुलगा काकवर्ण गादीवर आला. काकवर्ण व त्यानंतरचे दोन राजे क्षेमवर्धन व क्षेमजित् यांच्याविषयीं नाममात्र माहिती सांपडते. या घराण्यांतील पांचवा राजा प्रसेनजित. हा क्षेमजिताचा मुलगा. यानें बराच पराक्रम गाजवून मगधाचा विस्तार वाढविला. त्यानें आपली जुनी राजधानी कुशाग्रपूर बदलून ती गिरिव्राज येथें आणली.

**बिंबिसारः**—इ. स. पू. ५८२-५५४.

प्रसेनाजितास अनेक मुलगे होते. त्या सर्वांत बिंबिसार हा धाकटा. परंतु तो अतिशय पराक्रमी व बुद्धिमान असल्यामुळें बापाचा फार लाडका होता. आपल्यानंतर बिंबिसार गादीवर यावा अशी प्रसेनाजिताची इच्छा होती. परंतु त्याची ही इच्छा त्याच्या इतर मुलांना कळतांच ते बिंबिसाराचा द्वेष करूं लागले. इतकेंच नव्हे तर त्याच्या नाशासाठींही कांहीं गुप्त कट चालल्याची कुणकुण राजाला लागली. बिंबिसाराच्या जीवाला कांहीं अपाय होऊं नये म्हणून राजानें त्यास गुप्तपणें राज्याबाहेर पाठविलें. बिंबिसाराला पांडवांप्रमाणेंच अज्ञातवासांत कांहीं दिवस घालवावे लागले.

तो दक्षिणेंत वेण्णया नदीच्या कांठीं असलेल्या वेण्णातट शहरीं आला. राजवैभवाला तो आतां पारखा झाला. तरीपण त्यानें आपल्या मनाची शांति बिलकूल ढळूं दिली नाहीं. येईल त्या परिस्थितींत समाधानानें व शहाणपणानें राहाण्याची त्याची तयारी होती. हा सर्व त्याग कशासाठीं ? केवळ वडिलांच्या इच्छेसाठीं ! वडिलांचें मन दुखवून आपल्या भावांचा नाश करण्याइतकी ताकद त्याच्या मनगटांत खात्रीनें होती. परंतु त्याची संस्कृति श्रेष्ठ होती. मुसलमान राजपुत्रांसारखा तो बापाला बाप न मानणारा नव्हता. हिंदूंच्या

रक्तांत हा खुनशीपणा, हें क्रौर्य क्वचितच आढळेल. यांतच आपल्या संस्कृतीचें श्रेष्ठत्व आहे.

वेण्णातट शहरांत आल्यानंतर त्यानें एका व्यापाऱ्याकडे नोकरी पत्करली. जात्याच तो हुषार असल्यानें अल्पावकाशांतच त्यानें त्या व्यापाऱ्याची भरभराट करून दिली. त्यामुळें तो व्यापारी त्याच्यावर प्रसन्न झाला आणि त्यानें त्यास आपली मुलगी सुनंदा दिली. साहजिकच आतां तो आपल्यां पत्नीसह तेथेंच सुखासमाधानानें राहूं लागला.

अशा तऱ्हेनें दोन वर्षें गेलीं. इकडे मगधांत प्रसेनजित आजारी पडला. बिंबिसाराला भेटण्याची त्याला उत्कंठा लागून राहिली. शेवटीं त्यानें त्याला शोधून आणण्यासाठीं देशोदेशीं आपले दूत रवाना केले. दक्षिणेकडे आलेल्या दूतांना तो वेण्णातटीं भेटला. वडिलांच्या आजाराची बातमी कळतांच तो तावडतोब त्यांच्या भेटीसाठीं निघाला. पितापुत्रांची अत्यंत हृदयस्पर्शी भेट झाली. भेटीनंतर थोड्याच वेळांत प्रसेनजिताचा अंत झाला (इ. स. पू. ५८२). मरतेसमयीं त्यानें बिंबिसारासच गादीवर बसवावें अशी इच्छा व्यक्त केली. बिंबिसाराच्या भावांनींही विरोध न केल्यामुळें तो बापाच्या मरणानंतर गादीवर आला.

**राज्यविस्तारः–** बिंबिसार गादीवर आला त्या वेळीं त्याच्या राज्यांत मगध व काशी हे दोनच देश होते. पुढें त्यानें अंग देशावर स्वारी केली व तो देश आपल्या राज्यास जोडला. त्यानें आपली राजधानी गिरीव्रज येथून बदलून ती राजगृह ( हल्लीचें राजगीर ) येथें आणली. हें शहर संरक्षणाच्या दृष्टीनें अत्यंत सोयीस्कर होतेंच. शिवाय, त्याच्या सभोंवतीं मजबूत तटबंदी बांधून त्यानें तें अधिक संरक्षणक्षम केलें.

**महत्त्वाच्या गोष्टीः–** (१) बिंबिसाराच्या कारकीर्दींत बौद्ध व जैन धर्म उदयास आले. गौतम बुद्ध तर त्याच्या समकालीन होता. त्याच्या शिकवणीचा परिणाम बिंबिसाराच्या मनावर होऊन त्यानें त्या धर्माचा स्वीकार केला. राजाश्रय मिळाल्यानें बौद्ध धर्माची जोराची वाढ झाली. परंतु पुढें कांहीं दिवसांनीं त्यानें जैन धर्माचा स्वीकार केल्याचें जैन ग्रंथकार सांगतात. मात्र हें

धर्मांतर त्यानें एका स्त्रीच्या प्राप्तीसाठीं केलें असा उल्लेख जैन इतिहासकार श्री. शहा यांनीं आपल्या ग्रंथांत केला आहे.

(२) बौद्ध किंवा जैन धर्माची शिकवण बिंबिसाराच्या रक्तांत पूर्णपणें भिनली होती हें मात्र खरें आहे. कारण अंग देश जिंकणाऱ्या या क्षत्रियाचें क्षात्रतेज इराणचा राजा दरायस यानें भारतावर स्वारी केली असतां अहिंसारूप झालें ! दरायसचा प्रतिकार करण्यास बिंबिसार गेला नाहीं.

**महत्त्वाचीं कृत्यें**:– (१) बिंबिसारानें स्वतःच्या नांवाचीं नाणीं पाडलीं. प्राचीन काळांतील उपलब्ध असलेल्या नाण्यांमध्यें बिंबीसाराचींच नाणीं पहिलीं असावींत. प्राचीन राजे बहुधा आपल्या नाण्यांवर स्वतःची प्रतिमा खोदण्याऐवजीं स्वतःच्या धर्माचें किंवा कुळाचें निदर्शक असें चिन्ह खोदीत. बिंबिसाराच्या नाण्यांवर एका बाजूला दोन मोठे सर्प असून दुसऱ्या बाजूला शंखाचें चिन्ह आहे.

(२) बिंबिसारानें व्यापाराला बरेंच उत्तेजन दिलें. त्या वेळीं मालाची बरीचशी वाहतुक उंटावरून होत असे. ही वाहतुक सुलभ होण्यासाठीं राजानें मोठमोठ्या सडका बांधल्या. तक्षशीला ते राजगृह ही एक मोठी सरळ सडक त्यानेंच बांधली.

(३) बिंबिसाराच्या कारकीर्दींत भारताचा अरबस्तानाशीं फार मोठा व्यापार चाले. तो खुष्कीच्या मार्गानें उंटावरून चाले; तसाच तो जलमार्गानें जहाजांतूनही चाले. राजानें नवीन जहाजें बांधवून याही व्यापाराला बरेंच उत्तेजन दिलें.

(४) व्यापारी संघांची स्थापना : तांबट, सुतार, कोष्टी, लोहार, चांभार, न्हावी, धोबी इत्यादि वेगवेगळे व्यवसाय करणाऱ्या लोकांचे धंद्यानुसार गट पाडण्यांत आले. हल्लीं ज्याप्रमाणें सुधारलेल्या देशांत व्यापारी संघ ( Merchant Guilds ) असतात व ते आपली व आपल्या धंद्याची सरकारच्या मदतीनें उन्नति करतात, त्याप्रमाणें इतक्या प्राचीन काळींही आपल्या देशांत त्याच उद्देशानें स्थापन झालेले हे गट होते.

(५) बिंबिसार सर्व कलांचा व विद्यांचा भोक्ता होता. शिल्पकला,

चित्रकला, खोदकाम इत्यादि कलांमध्यें निष्णात असलेले कलाकार त्याच्या पदरीं पुष्कळ होते. त्याला स्वतःलाही कलेची आवड असल्यानें ती कला हस्तगत करण्यासाठीं तो तासच्या तास घालवीत असे. कलांप्रमाणेंच विद्यांचाही त्याला फार हव्यास असे. धनुर्विद्या, अस्त्रविद्या, इत्यादि विद्यांत प्रभुत्व संपादण्यासाठीं त्यानें खास शिक्षक नेमले होते. या सर्व गोष्टी त्यानें आपल्या पूर्ववयांत केल्या. उतारवयांत तो ' जैन ' बनला होता.

(६) बिंबिसाराचा विशेष म्हणजे त्याची उत्कृष्ट राज्यव्यवस्था. राजाला सल्ला देण्यासाठीं एक ' राजमंडळ ' असे. दण्डनायक, कोषाध्यक्ष, सेनापति, मंत्री व मुख्य प्रधान हे त्या मंडळांतील मुख्य अधिकारी होत. राज्यकारभाराचीं निरनिराळीं खातीं पाडण्यांत आलेलीं असून त्यांवर स्वतंत्र अधिकारी असत. असे एकंदर ५०० राज्याधिकारी त्याच्या राज्यांत होते. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी कीं या सर्व अधिकाऱ्यांची निवडणूक होत असे. निवडणुकीसाठीं वेगवेगळे मतदार संघही स्थापन करण्यांत आले होते. इतक्या प्राचीन काळीं निवडणुकीची अद्यावत् पद्धति पाहून कुणालाही नवलच वाटेल.

या राज्यव्यवस्थेंतील दुसरा एक विशेष असा कीं प्रत्येक खात्याचें स्वतंत्र दप्तर असून त्यांत त्या खात्याच्या कामाची नोंद असे.

**बिंबिसाराची योग्यता व शेवटः—** बिंबिसार हा शिशुनाग घराण्यांतील एक श्रेष्ठ राजा होऊन गेला. तो पराक्रमी असून शांततावादी होता. स्वतःचें राज्य वाढविण्यासाठीं इतरांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा त्यानें प्रयत्न केला नाहीं. तो विनयशील असून स्वाभिमानी होता. त्याचें बोलणें, चालणें व सामान्य वागणूक लोकांना आदरणीय वाटे. त्याची राज्यव्यवस्था सुयंत्रित होती. प्रजाहितासाठीं जें जें करितां येईल तें तें सर्व तो करीत असे.

त्याला सुनंदा, धारिणी, क्षेमा, चिलना व कोसलदेवी अशा पांच राण्या होत्या. त्यांच्यापासून त्यास अभयकुमार, मेघकुमार, कुणीक व नंदिसेन हे चार मुलगे व मनोरमा नांवाची एक मुलगी अशीं अपत्यें होतीं. यांपैकीं पहिले दोघे मुलगे जैन साधु बनल्यामुळें कुणीक हाच गादीचा वारस ठरला. कुणीक

स्वभावानें अतिशय तापट होता. अगदीं क्षुल्लक कारणावरून चिडून त्यानें आपल्या वृद्ध वडिलांस कैदेंत टाकलें व पुढें त्यांचा खूनही केला असें म्हणतात. जैन ग्रंथ मात्र ही गोष्ट खरी मानीत नाहींत. कुणीकानें बिंबिसाराला कैदेंत टाकलें हें खरें; परंतु या कृत्याबद्दल त्याच्या आईनें त्याची कानउघाडणी केल्यामुळें त्याला पश्चात्ताप झाला व स्वतःच्या या निंद्य वर्तनाची लाज वाटूं लागली. ताबडतोब वडिलांना मुक्त करण्यासाठीं तो मोठ्या त्वरेनें निघाला. त्यांच्या हातापायांतील लोखंडी बेड्या तोडण्यासाठीं त्यानें आपल्या खांद्यावर एक परशू घेतला होता. बिंबिसारानें दुरूनच त्याला त्या स्थितींत येतांना पाहिल्यावर त्याच्या मनाला धक्काच बसला. कारण, त्याला वाटलें कीं हा पोरगा आपणास ठार मारण्यासाठींच येत असावा. मुलाच्या हातून हत्त्या घडण्यापेक्षां आपणच आपला नाश केलेला काय वाईट ? असा विचार करून मुलगा जवळ येण्यापूर्वींच स्वतःचें डोकें आपटून त्यानें प्राण दिला. हा त्याचा मृत्यु इ. स. पू. ५५४ त झाला.

**अजातशत्रुः**— इ. स. पू. ५५४ ते ५२७.

बिंबिसाराच्या मृत्युनंतर त्याच्या नाशाला कारणीभूत झालेला त्याचा मुलगा कुणीक गादीवर आला. यालाच ‘अजातशत्रु’ असेंही नांव आहे. हा कुणीक बिंबिसाराच्या चिलना नांवाच्या राणीचा मुलगा. तो शूर व पराक्रमी होता; परंतु इतिहासांत ‘बापाला ठार मारणारा’ (पितृघ्न) अशीच त्याची प्रसिद्धि आहे. त्याच्या दोघां भावांनीं जैन धर्माचा स्वीकार करून ते त्याच्या प्रचारार्थ राज्यत्याग करून बाहेर गेल्यामुळें त्यास गादी निर्वेधपणें मिळाली. तो अतिशय महत्त्वाकांक्षी होता. गादीवर आल्याबरोबर आपलें राज्य वाढविण्यासाठीं त्यानें जोराच्या हालचाली सुरू केल्या. शेजारचे कोसल व वैशाली हे दोन देश जिंकून त्यानें ते आपल्या राज्यास जोडले. आतां त्याच्या राज्यांत मगध, काशी, अंग, कोंसल, वैशाली इतक्या राज्यांचा समावेश झाला होता. त्यानें पूर्वींची राजधानी राजगृह बदलून ती अंग देशाची राजधानी चंपानगर येथें आणली; परंतु ती त्याच्या साम्राज्याच्या दृष्टीनें एका बाजूला झाल्यामुळें त्यानें मगधामध्येंच मध्यवर्ती असें एक नवीन शहर

वसविलें. तें शहर म्हणजे पाटलिपुत्र--हल्लीचें पाटणा. हेंच शहर यापुढील बहुतेक सर्व सम्राटांचें राजधानीचें शहर होतें.

अजातशत्रूची सर्व कारकीर्द लढण्यांत गेली. राजधानी बदलल्यानंतर त्यानें उत्तरेस लिच्छवी देशावर स्वारी करून तो जिंकला. यानंतर एक जंगी मोहीम त्यानें हातीं घेतली. आतांपर्यंत एकाही राजानें जें केलें नव्हतें तें करून दाखविण्याची उमेद अजातशत्रूच्या ठिकाणीं होती. त्याचा अपमृत्यु झाला नसता तर त्यानें हें कार्य पुरें केलें असतें. हें कार्य म्हणजे दक्षिणेकडील मोहीम. विंध्य पर्वत ओलांडून पलीकडे दक्षिणेंत उतरणें अतिशय बिकट होतें. दक्षिणेंत येण्याला सुलभ असा मार्गच नव्हता. अजातशत्रूची दक्षिण-मोहीम जरी त्याच्या मृत्युमुळें अपुरी राहिली तरी दक्षिण देशाला जाण्याचा मार्ग मात्र तयार झाला हें कांहीं लहानसहान कार्य नव्हे. अजातशत्रु इ. स. पू. ५२७ त मृत्यु पावला.

अजातशत्रूच्या मृत्युनंतर शिशुनाग घराण्यांत दर्शक व उदय असे दोन राजे झाले. दर्शकानें इ. स.पू. ५२७ ते ५०३ पर्यंत आणि उदयानें इ. स. पू. ५०३ ते ४७० पर्यंत राज्य केलें. आणि उदयानें पाटलिपुत्राजवळ कुसुमपुर या नांवाचें एक शहर वसविलें. त्यानें जैन व बौद्ध या दोन्ही धर्मांना सारखीच मदत केली. यांच्याविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. उदयानंतर त्याचा सेनापति नंद गादीवर आला. या नंदाच्या नांवावरूनच नंद घराणें हें नांव आलें. या घराण्यानें इ. स. पू. ४७० ते ३२२ पर्यंत राज्य केलें.

### ४ **नंद घराणें**:—इ. स. पू. ४७०–३२२.

वस्तुतः नंद घराणें हे स्वतंत्र घराणें नसून शिशुनाग घराण्याची एक शाखा होय. नंद राजांच्या नाण्यांवर सर्प हें चिन्ह असल्यामुळें नंदांच्या घराण्याला नागवंश असेंही नांव दिलेलें आढळतें. नंद घराणें हें नांव पहिला राजा नंदवर्धन याच्यावरून पडलें. या घराण्यांत एकंदर नऊ राजे होऊन गेले. या संख्येवरून त्यांस ‘ नवनंद ’ असें म्हणतात. हे नवनंद म्हणजे नंदिवर्धन, महापद्म, अश्वघोष, ज्येष्ठमित्र, सुदेव, धनदेव, बृहद्रथ, बृहस्पति-

मित्र व महानंद ( धनानंद ) हे होत. या नवनंदांनीं सुमारें एक शतक मगधावर राज्य केलें.

**नंदिवर्धन**:—याचें मूळ नांव नंद असें होतें. हा शिशुनाग घराण्यांतील शेवटचा राजा उदय याचा सेनापति होता. यानें उत्तरेकडील बराचसा प्रदेश जिंकून राज्य वाढविल्यामुळें त्यास नंदिवर्धन ( वर्धन=वाढविणारा ) हें नांव पडलें.

नंदिवर्धन हा एक कुशल सेनापति होऊन गेला. त्यानें मगधांतील सर्व सैन्याची पुनर्रचना करून तें सुसंघटित केलें. नंदिवर्धनाला अपयश माहीत नव्हतें. एकाही लढाईंत त्यानें हार खाल्ली नाहीं. त्यामुळें त्यास 'अजेय' असें म्हणत. गादीवर आल्यानंतर त्यानें दक्षिणेकडील बराच प्रदेश जिंकला. त्याचें लग्न उदयाच्या कन्येशीं झालें असल्यानें व उदयाला पुत्र नसल्यानें त्यास निर्वेधपणें गादी मिळाली.

नंदिवर्धन गादीवर असतांना राज्यावर दोन नैसर्गिक आपात्ति आल्या. त्या म्हणजे अवर्षण व अतिवर्षण. या दोन्ही आपत्ति लागोपाठ आल्यामुळें लोकांचे बरेच हाल झाले. तरी पण नंदिवर्धनानें शोण नदीला एक कालवा खणून तो मगधांत सर्वत्र नेल्यामुळें लोकांची बरीच सोय झाली.

एकंदरींत नंदिवर्धनाची कारकीर्द बरीच यशस्वी झाली. त्याच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा महापद्मनंद गादीवर आला. याच्या कारकीर्दींत वैशाली येथें एक मोठी बौद्ध-धर्म परिषद भरली होती. स्वतः राजा त्या सभेचा अध्यक्ष होता. यावरून तो बौद्धधर्मीय होता हें स्पष्ट आहे. महापद्मनंदाला अनेक राण्या होत्या. त्यांपैकीं कांहीं क्षत्रिय असून बाकीच्या शूद्र होत्या. या राण्यांपासून त्याला सात मुलगे झाले. तिसऱ्या नंदापासून आठव्या नंदापर्यंत त्याच्या क्षत्रिय राण्यांपासून झालेले व शेवटचा धनानंद हा शूद्र राणीपासून झालेला. हे सर्व भाऊ क्रमाक्रमानें गादीवर आले. धनानंदाशिवाय इतर सर्व अल्पायुषी झाल्यामुळें त्यांच्या कारकीर्दींत फारसे महत्त्वाचे प्रसंग घडले नाहींत.

**धनानंद**:—हा एक महत्त्वाकांक्षी परंतु जुलुमी राजा होता. यानें उत्तरेकडील कंबोज राष्ट्र जिंकलें. कंबोजच्या स्वारींत त्यास बरीच लूट

मिळाली. तो पैशाचा अतिशय लोभी होता. त्यानें प्रजेवर नाना तऱ्हेचे कर बसवून पैसा उकळला. बरीच संपत्ति त्यानें जमिनींत पुरून ठेविली होती. सोन्याच्या एकूण नऊ राशी त्यानें पुरून ठेविल्या असल्याचा उल्लेख जैन कथांतून आढळतो. धनाच्या या लोभामुळेंच त्याला धनानंद असें नांव पडलें. शकदाल नांवाचा धनानंदाचा एक हुषार प्रधान होता. शकदालाच्या कर्तृत्वामुळें नंदांचें राज्य भरभराटीस आलें. नंदांच्या लष्कराची विशेष ख्याति आहे. या लष्कराच्या जोरावरच नंद राजे अनियंत्रितपणें सत्ता उपभोगूं शकले; व याच लष्कराच्या जोरावर चंद्रगुप्त मौर्यानें नंदांचा निःपात केला !

धनानंदाचा दरबार पाणिनि, वररुचि ( कात्यायान ) व चाणक्य यांसारख्यां विद्वान पंडितांनीं विभूषित होता. हे तिघेही तक्षशीला विद्यापीठांत प्राध्यापक होते. धनानंदानें त्यांस मोठ्या आदरपूर्वक बोलावून आणलें होतें. पाटलिपुत्रापासून जवळच नालंदा विद्यापीठ होतें. त्यांत ते तिघेही प्राध्यापकाचें काम करूं लागले. तक्षशीलेहून नालंदा येथें ते कां आले हें मात्र कळत नाहीं.

मगधांत आल्यावर पाणिनीनें अभ्यासाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही गोष्टींत लक्ष घातलें नाहीं. परंतु दुसऱ्या दोघांनीं मात्र राजकारणांत लक्ष घालण्यास सुरुवात केली. त्यांपैकीं चाणक्य लौकरच राजनीतिकुशल बनला. पुढील प्रकरणांत त्याच्या कामगिरीची माहिती येणार आहे. वररुचि व शकदाल यांच्यांत पुढें भांडणें होऊं लागलीं. वररुचीला शकदालाचें वर्चस्व रुचत नव्हतें. त्याचा नाश करण्यासाठीं एक संधी त्यानें लौकरच साधली. धनानंदाच्या वाढदिवसानिमित्त शकदाल त्यास कांहीं देणगी देणार होता. ही देणगी म्हणजे एक नवीन प्रकारचें शस्त्र होतें. शकदाल हें शस्त्र त्यास अगदीं निष्पाप मनानें देणार होता. पण तें तयार होत असल्याचा सुगावा वररुचीला लागतांच त्यानें तें शस्त्र राजहत्त्या करण्याच्या हेतूनें तयार केलें जात आहे असें विष राजाच्या मनांत भरविलें. निष्ठावंत शकदालाविषयीं राजाच्या मनांत अविश्वास निर्माण झाला. चाणाक्ष शकदालाच्या लक्षांत ही गोष्ट

येण्यास फारसा वेळ लागला नाहीं. त्यानें आपला विश्वास राजाला पटवून देण्याकरतां आत्मयज्ञ करण्याचें ठरविलें. ठरलेल्या दिवशीं त्यानें तें शस्त्र राजाला नजर केलें; व त्यानंतर लगेच आपला मुलगा श्रीयन याच्याकडून स्वतःचा शर-वध करून घेतला. घायाळ स्थितींत असतांच त्यानें राजाला घडलेला सर्व वृत्तांत मोकळेपणानें सांगितला व 'शकदालाचें घराणें राजद्रोही नाहीं' असा बाणेदारपणानें जबाब देऊन प्राणत्याग केला. या अद्भुत कृत्यामुळें राजाला त्याचा विश्वास पटला व त्यानें वररुचीला राज्यांतून हद्दपार केलें.

याच सुमारास चाणक्यानें जंगी तयारी करून चंद्रगुप्ताकरवीं मगधांत मोठी राज्यक्रांति घडवून आणली. त्यांत धनानंद व त्याचा आप्तगण बळी पडला.

**निष्कर्ष**:—एवंच शिशुनाग व नंद घराण्यांचा इतिहास हा भावी मौर्य-साम्राज्यरवीच्या उदयापूर्वींचा संधिप्रकाश होता असें म्हणतां येईल.

## थोडक्यांत

( १ ) अपुऱ्या माहितीमुळें मगधाचा पूर्वेतिहास आपणांस मिळत नाहीं.

( २ ) मगध ही आर्यांची पहिली मोठी वसाहत.

मगधाच्या गादीवर आलेलीं राजघराणीं:— ( १ ) शिशुनाग ( २ ) नंद ( ३ ) मौर्य ( ४ ) शुंग ( ५ ) कण्व ( ६ ) गुप्त.

**शिशुनाग घराण्यांतील राजे**:—

( १ ) शिशुनाग— इ. स. पू. ६४२-६२७; अतिशय पराक्रमी; काशीचें राज्य जिंकलें.

( २ ) बिंबिसार—इ. स. पू. ५८२-५५४, अत्यंत हुषार, पराक्रमी व त्यागी.

कामगिरी—( १ ) अंग देश जिंकला. राजधानी राजगृह.

( २ ) बौद्ध व जैन धर्मांचा उदय; बौद्ध धर्माला राजाश्रय.

( ३ ) नाणीं पाडलीं.

( ४ ) व्यापाराला उत्तेजन दिलें;जलमार्गानेंही व्यापार चाले.
( ५ ) व्यापारी संघांची स्थापना.
( ६ ) विद्याकलांना उत्तेजन.
( ७ ) उत्कृष्ट राज्यव्यवस्था – राजमंडळ – मतदारसंघ व निवडणूक.

( ३ ) अजातशत्रुः—इ. स. पू. ५५४–५२७; महत्त्वाकांक्षी राजा.
कामगिरीः—( १ ) साम्राज्य–मगध, काशी, अंग, कोसल व वैशाली.
( २ ) पाटलिपुत्राची स्थापना.
( ३ ) दक्षिण-मोहिमेंत अपयश–पण मार्ग तयार झाला.

**नंद घराण्यांतील राजेः—**

( १ ) नंदिवर्धनः—नंद घराण्याचा संस्थापक–अजेय होता.
( २ ) धनानंदः—महत्त्वाकांक्षी व जुलमी राजा, पैशाचा अतिशय लोभी. आर्य चाणक्यानें चंद्रगुप्त मौर्याच्या मदतीनें नंदांचा उच्छेद केला.

**प्रश्नः**—( १ ) मगधाचा इतिहास म्हणजे काय ? त्याचें महत्त्व कोणतें ?
( २ ) बिंबिसाराची योग्यता लिहा.
( ३ ) टीपा लिहाः—अजातशत्रु, शिशुनाग, शकदाल, नंदांचा नाश, नवनंद.

**स्वाध्यायः**—( १ ) भारतवर्षाचा संक्षिप्त इतिहास–डॉ. बाळकृष्ण.

## प्रकरण २ रें

# अलेक्झांडरचें अश्रुविमोचन !

( १ ) पाश्चिमात्यांची यशस्वी माघार ! ;
( २ ) अलेक्झांडर-पूर्ववृत्त ;
( ३ ) स्वारीचीं कारणें ;
( ४ ) राजा पोरस ;
( ५ ) स्वारीची माहिती व परिणाम.

## १ पाश्चिमात्यांची यशस्वी माघार !

### ( अ ) कैकुश्रूची गांधारावर स्वारी ( इ. स. पू. ५५८-५३० )

भारतावर चाल करून आलेला पहिला पाश्चिमात्य कैकुश्रु किंवा सायरस होय. कैकुश्रु हा इराणच्या गादीवर आलेल्या बलाढ्य राजांपैकीं एक असून त्याला ' थोर ' म्हणत असत. वस्तुतः इराणच्या साम्राज्याचा तो जनक. इ. स. पू. ५५८ त त्यानें गांधार देशावर स्वारी केली. प्रथमतः त्यास यश मिळालें परंतु त्याची पाठ फिरतांक्षणींच गांधार पुन्हा स्वतंत्र झाला.

### ( आ ) दरायसची स्वारी—( इ. स. पू. ५१६ )

दरायस हा भारतावर चाल करून येणारा दुसरा इराणी. हा इराणच्या हिस्टास्पीस नांवाच्या बादशहाचा मुलगा. तो बापापेक्षां अधिक पराक्रमी, महत्त्वाकांक्षी व धडाडीचा योद्धा असल्यामुळें भारत आपल्या साम्राज्याला जोडावा अशी त्यास इच्छा झाली. त्या वेळीं नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेशांत गांधारापासून अवंतीपर्यंत एकंदर सोळा लहान लहान राज्यें होतीं. हीं सर्व राज्यें विस्कळीत असल्यामुळें त्यांपैकीं प्रत्येकाला अलग गांठून जिंकणें सोपें आहे, ही गोष्ट दरायस जाणून होता. त्यामुळें एक एक प्रांत आपल्या राज्याला जोडण्याचें त्यानें ठरविलें आणि त्याप्रमाणें पंजाब-सिंधपर्यंतचा

प्रदेश त्यानें जिंकलाही. इ. स. पू. ५१६ चे सुमारास तांबड्या समुद्रांतून सिंधुनदीमार्गे स्कायलॅक्झ् नांवाच्या त्याच्या शूर सेनापतीच्या आधिपत्याखालीं बरीच मोठी फौज पाठवून त्यानें सिंधुनदीपर्यंतचा बहुतेक प्रदेश जिंकून आपल्या राज्यांत सामील करून घेतला. मात्र त्याच्या मृत्यूनंतर हा जिंकला गेलेला सर्व प्रदेश तेथील लोकांनीं हिसकावून परत घेतला आणि इराण्यांना गांधारापलीकडे हांकलून दिलें.

परिणाम:—(१) इराण व हिंदुस्थान यांचे परस्परांशीं व्यापारी संबंध येऊं लागले.

(२) मौर्यकालीन शिल्पकलेवर इराण्यांची छाप पडलेली दिसते.

(३) ग्रीकांचा बादशहा अलेक्झांडर यास हिंदुस्थानावर चाल करून येण्याचा मोह झाला.

## २ अलेक्झांडर-पूर्ववृत्त

मॅसिडोनियाचा बादशहा दुसरा फिलिप याचा मुलगा अलेक्झांडर किंवा सिकंदर इ. स. पूर्व ३५६ या वर्षीं जन्मला. वयाच्या १३ व्या वर्षापासून पाश्चात्य जगांतील तत्त्ववेत्त्यांचा अग्रणी ॲरिस्टॉटल याच्या नेतृत्वाखालीं त्याचा शिक्षणक्रम सुरू झाला. तरी पण त्याला तत्त्वज्ञान शिकण्याची मुळींच आवड नसे. लहानपणापासूनच त्याचा कल युद्धकलेकडे विशेष होता. तलवार हें त्याचें अतिशय आवडतें शस्त्र होतें. लहान वयांतच तो सर्व युद्धशास्त्रांत पारंगत झाला. बापाबरोबर तो अनेकदां रणांगणावर गेला. असल्यामुळें त्याच्या पराक्रमाचा कस लागलेला होता.

इ. स. पू. ४०० च्या सुमारास ग्रीस देश वैभवाच्या शिखरावर होता. ग्रीक लोकांचें शौर्य, वाङ्मय, कला व व्यापार त्या वेळीं पराकोटीस पोहोंचला होता. युरोपमधील सर्वश्रेष्ठ राष्ट्र म्हणून त्या वेळीं ग्रीसची ख्याती होती. ग्रीसच्या उत्तरेस मॅसिडोनिया नांवाचें एक छोटेखानी संस्थान होतें. या संस्थानांत पुढें फिलिप नांवाचा एक अत्यंत पराक्रमी राजा निपजला. फिलिपनें सर्व ग्रीस देश पादाक्रांत करून आपल्या राज्यास जोडला. त्याच पराक्रमी

फिलिपचा मुलगा अलेक्झांडर. तोही 'बापसे बेटा सवाई' होता. फिलिपनें एकापाठोपाठ एक असे भराभर देश जिंकण्यास सुरुवात केली. त्यामुळें अलेक्झांडरला वाटे कीं, आपणांस जिंकण्यासाठीं आतां कांहीं शिल्लक राहात नाहीं. या विचारासरशीं तो रडूं लागे, असें म्हणतात. त्याचें महत्त्वाकांक्षी मन पाहून फिलिपला अतिशय हर्ष होई. आपल्यामागें आपला मुलगा जग जिंकल्याशिवाय राहाणार नाहीं अशी त्यास खात्री वाटे. पुढें लवकरच फिलिपचा खून झाला व वयाच्या विसाव्या वर्षीं अलेक्झांडरला मॅसिडोनियाच्या गादीवर बसावें लागलें. त्याचें पोरसवदा वय पाहून ग्रीक लोकांनीं व उत्तरेकडील रानटी टोळ्यांनीं त्याच्याविरुद्ध मोठी उठावणी केली. पण अलेक्झांडर त्या सर्वांस पुरून उरला. फिलिपचा खून अलेक्झांडरनेंच राज्यलोभानें केला अशी लोकांची समजूत होती. म्हणून लोकांनीं त्याच्याविरुद्ध बंड केलें. परंतु त्यानें सर्व बंडखोरांना झोडपून काढलें आणि आपला अंमल दृढ बसविला.

### ३ भारतावर झेप (इ. स. पू. ३२७ ते ३२३)

रानटी टोळ्यांचा नायनाट करून आणि बंडखोरांचा पराभव करून अलेक्झांडरनें आपल्या राज्यांत शांतता प्रस्थापित केली. ग्रीस देशावरच केवळ राज्य करून अलेक्झांडरसारख्या महत्त्वाकांक्षी पुरुषाला स्वस्थ कसें बसवणार! त्याचें लक्ष पूर्वेकडे वळलें. ग्रीस, मिसर हे देश जिंकून तो इराणांत उतरला. दरायसच्या प्रचंड सैन्याबरोबर दोनदां लढाई देऊन तोही देश त्यानें जिंकला. तेथून इ. स. पू. ३२९ त तो गांधार देशांतून भारताच्या सरहद्दीपर्यंत आला. पण मागें मिसर देशांत बंड उद्भवल्यामुळें त्याला परत जावें लागलें. मात्र पुन्हा दोन वर्षांनीं इ. स. पू. ३२७ च्या उन्हाळ्यांत तो काबूलमार्गें भारतावर चालून आला. भारतावरील त्याच्या स्वारीमागें त्याचा कोणता मुख्य हेतु होता हें समजाऊन घेणें आवश्यक आहे. त्या दृष्टीनें या स्वारीचीं कारणें कोणतीं तीं पाहूं.

( १ ) भारतावर स्वारी करावी हा विचार अलेक्झांडरचे मनांत राजधानी सोडण्यापूर्वीं नव्हता. इराण जिंकल्यानंतर त्यानें हा बेत ठरविला असावा. हीरोडोटसनें व इतर ग्रीक लेखकांनीं अखिल जगताला भारताच्या

वैभवाची, श्रीमंतीची आणि असामान्य मानवी सामर्थ्याची आधींच ओळख करून दिली होती. अलेक्झांडरच्या कानापर्यंत भारताच्या वैभवाच्या वार्ता जाऊन आदळत होत्या. तें वैभव प्रत्यक्ष जाऊन पाहावें व भारतीय मानवाची ओळख करून घ्यावी अशी अलेक्झांडरच्या मनांत तळमळ उत्पन्न झाली असावी. ग्रीक इतिहासकार म्हणतात कीं, अलेक्झांडरला भौगोलिक प्रदेश पाहण्याची व त्यावरील इतिहास जाणून घेण्याची स्वाभाविक आवड होती. या कारणामुळें त्याचें लक्ष भारताकडे वेधलें असेल हेंही अनेक कारणांपैकीं एक कारण असणें शक्य आहे.

( २ ) भारतीय संस्कृतीचें जगभर विलसत असलेलें श्रेष्ठत्व त्या महत्त्वाकांक्षी बादशहाच्या ध्यानांत आलें होतें. भारताचें हें मोठेपण आपण तेव्हांच धुळीला मिळवूं आणि ग्रीक संस्कृतीचा विजयध्वज त्या ठिकाणीं फडकवूं असा विचार त्याच्या डोक्यांत आला. ग्रीक संस्कृति ही विश्वविजयी व्हावी अशी आकांक्षा अलेक्झांडर बाळगीत होता. जग जिंकण्याचें त्याचें ध्येय होतें व तें साध्य करण्यासाठीं त्याचे हे सर्व प्रयत्न होते.

( ३ ) हिंदुस्थान ग्रीसपासून कितीतरी लांब, तेथील माणसें अतिशय शूर, प्रदेश तर सगळा डोंगराळ अशा अनेक अडचणी त्याच्या मार्गांत होत्या. त्यामुळें या देशावर राज्य चालविणें फार बिकट गोष्ट होती. हा देश जिंकण्याची इच्छा पुरी न झाल्यास निदान या देशांतील विपुल संपत्ति लुटून न्यावी आणि येथील लोकांवर आपल्या संस्कृतीची छाप बसवून त्यांना ती स्वीकारण्यास भाग पाडावें, असा विचार करीत त्याचे पाय हिंदुस्थानाकडे वळले.

या वेळीं हिंदुस्थानाची राजकीय परिस्थिति मोठी शोचनीय होती. नर्मदेच्या उत्तरेस जवळ जवळ दीडशें लहानमोठीं राज्यें असून तीं सर्व स्वतंत्र होतीं. त्यांतील कांहीं प्रजासत्ताक, कांहीं प्रधानमंडळाच्या तंत्रानें चालणारीं तर कांहीं ग्रामपंचायतीच्या तंत्रानें चालत होतीं. या सर्वांवर प्रबळ असा कोणी शास्ता नव्हता. मगधाचेंच काय तें एक प्रबळ असें राज्य होतें. पण तेथील राजा शूद्रवर्णीय असल्यामुळें प्रजा अगदीं असंतुष्ट होती. या सर्व राजांचीं आपआपसांत भांडणें व लढाया चालत. त्यामुळें त्यांची शक्ति

क्षीण झालेली होती. शिकंदराच्या जबरदस्त रेट्यापुढें त्यांना आपली अभेद्य फळी निर्माण करितां आली नाहीं. या फुटीर वृत्तीचा शिकंदराला मात्र चांगलाच फायदा मिळाला.

## ४ राजा पोरस

हिंदुस्थानाच्या सरहद्दीवर शिकंदरानें ३०,००० सैन्याची जमवाजमव केली. त्यांत घोडेस्वारांचा भरणा अधिक होता. प्रथम त्यानें आजूबाजूच्या डोंगराळ प्रदेशांतील टोळीवाल्यांचा पक्का बंदोबस्त केला. कारण न जाणो आपण पुढें गेलों असें पाहून ते मागून आपणांस सतावतील असें त्यास वाटलें. पुढील वर्षाच्या उन्हाळ्यांत अटक शहराच्या उत्तरेस १६ मैलांवर ओहिंड गांवीं त्यानें सिंधु नदी ओलांडली व तो तक्षशिलेच्या राज्यांत घुसला. अलेक्झांडरच्या माऱ्यापुढें आपला निभाव लागणें कठिण आहे हें जाणून या प्रदेशांतील छोट्या राजांनीं त्यास शरणचिठ्ठी दिली. तक्षशिलेचा राजा अंभी व पूर्वेकडील झेलम देशाचा राजा पोरस यांचें आपआपसांत फार दिवसांचें वैर होतें. पोरसचा सूड उगविण्यास ही नामी संधी आहे असा अंभीनें विचार केला!

अलेक्झांडरनें सिंधु नदीच्या कांठचे मंगलोर व महावन हे महत्त्वाचे किल्ले जिंकून तक्षशिलेंत प्रवेश केला. अंभीनें त्याला शरण जाऊन त्याच्याशीं स्नेह केला, व अलेक्झांडरला त्याच्या पुढील सर्व मोहिमांत त्यानें साहाय्य केलें. अलेक्झांडरनें तक्षशिलेंत मुक्काम ठोकून आसपासच्या इतर राजांना आपणांस शरण येण्याबद्दल निरोप पाठविले. अनेकांनीं त्या जुलमापुढें मान तुकविली. झेलमाधीश पोरस मात्र त्यास शरण गेला नाहीं.

झेलम व रावी या दोन नद्यांमधील राज्य करणारा हा हिंदु राजा तक्षशिलेच्या राष्ट्रद्रोही अंभीप्रमाणें परकीयांचे पाय चाटण्यास मुळींच उद्युक्त झाला नाहीं. अलेक्झांडरचें आगमन हें त्याच्या विजिगीषु मनोवृत्तीला, तेजस्वी पराक्रमाला आणि जाज्वल्य राष्ट्राभिमानाला आव्हानच होतें. हें आव्हान त्यानें स्वीकारलें. तो शरण तर गेला नाहींच, उलट अलेक्झांडरच्या आव्हानाला प्रतिवाद करण्यासाठीं त्यानें अभिसार देशाच्या ( काश्मीरमधील पंच व नवशेरा जिल्हे ) राजाला व शेजारच्या, जे त्याच्या ध्वजाखालीं येऊं शकतील अशा

त्याला वाटलेल्या, कांहीं लोकसत्ताकांच्या प्रतिनिधींना त्यानें एकत्र आणिलें. आणि एक मोठें बलाढ्य सैन्य तयार केलें.

## ५ स्वारीची माहिती व परिणाम

अलेक्झांडर जसजसा पुढें सरकूं लागला तसतसा भारतपुत्रांचा विरोध त्यास जाणवूं लागला. पेशावरच्या मैदानांत अष्टकराज नांवाच्या स्वाभिमानी राजानें आपल्या तुटपुंज्या सैन्यानिशीं त्याला प्रथम विरोधिलें. पुष्कलावतीच्या राजानें झुंजतां झुंजतां आपला देह समरांगणीं ठेविला. अष्टकानेंही त्याचेंच अनुकरण केलें. एकही वीरपुरुष रणभूमीला पाठ दाखवून परत आला नाहीं. अष्टकराजाच्या मृत्यूनंतर त्याचें राज्य तक्षशिलेच्या राजाचा हस्तक संजय याला देण्यांत आलें.

विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे मशकावतीची ( मशनगरची ) राणी क्रिओफिस हिनें स्त्री-पलटणींच्या साहाय्यानें अलेक्झांडरशीं कित्येक दिवस मेोठ्या निकरानें सामना दिला; पण शेवटीं तिचा नाश झाला.

**भारताचे कांहीं कुपुत्रः**—दुहीच्या विषामुळें भारताचा अनेक वेळां घात झालेला आहे. भारतीय युद्धासारखें जगड्व्याळ युद्ध दुहीमुळेंच झालें नाहीं का ? पोरसाची एकमुखी साम्राज्य स्थापिण्याची इच्छा अंभीच्या स्वार्थाच्या आड आली म्हणून त्यानें पोरसाशीं शत्रुत्व केलें. तो अलेक्झांडरला सामील झाला. भारतांत संचार करण्यासाठीं लागणारी सर्व माहिती त्यानें अलेक्झांडरला पुरविली. त्याच्याच पावलावर पाऊल टाकणारी दुसरी व्यक्ती म्हणजे सरहद्द प्रांतांतील एका लहान राज्याचा अधिपति शशीगुप्त. या शशीगुप्तानें दरायसला अलेक्झांडरच्या विरुद्ध पूर्वीं बरीच मदत केली होती. पण या वेळीं मात्र तो अलेक्झांडरला सामील झाला.

**सैन्यांच्या हालचालीः**—पोरस आपल्या सैन्यासह झेलमच्या पश्चिमतीरावर आला. अलेक्झांडर पूर्वतीरावर तळ ठोकून बसला. झेलम नदीला अफाट पूर येऊन ती या वेळीं दुथडी भरून वाहात होती. त्यामुळें दोन्ही सैन्यांना विशेष हालचाली करितां आल्या नाहींत. दोन महिनेपर्यंत दोन्ही सैन्यें समोरासमोर तळ देऊन बसलीं होतीं.

पुढें एके दिवशीं अलेक्झांडर घोडेस्वारांची एक तुकडी घेऊन उत्तरेकडे वीस मैल गेला व तेथें उतार शोधून त्यानें आपलें सैन्य होड्यांचा पूल बांधून नदीपार नेलें. भयंकर पाऊस आणि ढगांचा गडगडाट यामुळें पोरसाला अलेक्झांडरची ही हालचाल समजूं शकली नाहीं. अलेक्झांडर पश्चिमतीरावर आला हें समजतांच पोरसानें ५००० सैन्यानिशीं आपल्या मुलाला त्याचा प्रतिकार करण्यास पाठविलें. पण त्याचा अलेक्झांडरपुढें निभाव लागला नाहीं व त्यांत तो ठार झाला. मुलाच्या मृत्यूच्या वार्तेनेंही पोरसाची धीरवृत्ति ढळली नाहीं. त्यानें आपल्या सैन्याची आवश्यक ती रचना मोठ्या तडफेनें केली आणि अलेक्झांडरशीं लढण्यास तो सिद्ध झाला. अलेक्झांडरनें प्रथम पोरसाच्या सैन्याच्या डाव्या बगलेवर हल्ला चढवून ती झोडपून काढली; व पोरसाच्या उजव्या बगलेकडील रथ तिकडे येतांच अलेक्झांडरनें संधी साधून पोरसाच्या सैन्याची पिछाडी गांठली. इतक्यांत अलेक्झांडरचें उरलेलें सैन्यही नदी ओलांडून अलीकडे आलें. आणि त्यानें पोरसावर अग्निवर्षाव सुरू केला. त्यामुळें पोरसानें पुढें केलेले हत्ती उलटून सैरावैरा पळत सुटले. हत्तीच्या या गोंधळापुढें पोरसाचा नाइलाज झाला व त्यामुळें त्याचा पराभव झाला, असें मानतात. तथापि या लढाईंत अलेक्झांडरचेंही बरेंच सैन्य कामीं आलें.

आपल्या जित शत्रूंशीं वागतांना ज्या रुबाबांत अलेक्झांडर वागत असे त्याच रुबाबांत तो याही वेळीं कैदी झालेल्या पोरस राजाला भेटण्यासाठीं त्याच्या तंबूंत गेला. साडेसहा फूट उंचीच्या धिप्पाड व भव्य शरीरयष्टीच्या आणि देखण्या अशा त्या पुरुषास पाहून अलेक्झांडरला अतिशय आश्चर्य वाटलें. आणि त्यानें त्याला विचारलें, "मी तुला कसें वागवावें ?" "राजा ज्याप्रमाणें राजाला वागवील त्याप्रमाणें !" असें पोरसाचें बाणेदार उलट उत्तर ऐकून गुणग्राही अलेक्झांडरला मोठें समाधान वाटलें. त्यावर तो म्हणाला, "माझ्याचसाठीं मी तुला तसें वागवीन यांत शंका नाहीं. पण यापेक्षां दुसरें कांहींतरी माग." पोरसानें पुन्हा तितक्याच निर्भीडपणें उत्तर दिलें, "मी जें मागितलें त्यांत सर्व कांहीं आहे." हें उत्तर ऐकतांच अलेक्झांडरनें

त्याच्याशीं मोठ्या आदरानें हस्तांदोलन केलें; व त्याला त्याचें राज्य व आणखी इतर ४० नगरांचें राज्य परत केलें.

**अलेक्झांडर परतलाः**—पोरसाशीं झालेल्या युद्धप्रसंगानंतर अलेक्झांडर पूर्वेकडे निघाला. चिनाब व रावी नदीकडे असलेलीं 'कथाईओई' लोकांचीं राज्यें त्यानें नामशेष केलीं. बियास नदीपर्यंत आल्यानंतर त्याचें सैन्य पुढें जाण्यास तयार नव्हतें असें त्यास दिसून आलें. स्वदेशापासून आणि आप्तांपासून कित्येक वर्षे दूर राहिल्यामुळें तिकडील स्वाभाविक ओढ, हिंदुस्थानांतील कडक उन्हाळा व कष्टप्रद जीवन, स्नेहीसोबती झालेले बरेचसे सैनिक मरण पावलेले आणि यापुढें मगध-सम्राटाच्या बलाढ्य सैन्याशीं टक्कर द्यावी लागणार ही कल्पना; या सर्व कारणांमुळें त्याचे सैनिक कंटाळले. आणि स्वदेशीं परतण्याचा ते आग्रह करूं लागले. महत्त्वाकांक्षी अलेक्झांडरला सैनिकांमधील हें परिवर्तन पाहून अतिशय वाईट वाटलें. अलेक्झांडरनें त्यांचीं मनें वळविण्याचा व त्यांना उत्साह देण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या स्फूर्तिदायक भाषणानें सुद्धां त्यांच्या मनांवर कांहीं परिणाम न होतां ते त्यापुढें लढण्यास तयार होईनात. त्यामुळें त्याला आपल्या सर्व मनीषा जागच्या जागींच दाबून टाकाव्या लागल्या. आणि अखेर तो स्वदेशीं परत जाण्यास निघाला.

परत जातांना आपल्या सेनेचे त्यानें दोन विभाग केले. स्वतः अलेक्झांडर ८००० सैनिकांची एक तुकडी बरोबर घेऊन सिंधु नदींतून व पुढें समुद्रमार्गें इराणचे आखातांतून स्वदेशाकडे निघाला. बाकीचे १२००० सैनिक जमिनीवरून पूर्वीं आलेल्या मार्गानें परत गेले. वाटेंत सिंधमध्यें सिबीई, अगलासोई, मलोई इ० लोकांनीं त्याच्या सैन्याला अतोनात त्रास दिला. तथापि त्या सैन्यानें मोठ्या कष्टानें सरहद्द गांठली. या वेळीं त्याच्या सैन्यांतील बरेचसे लोक प्राणास मुकले. अलेक्झांडरही वाटेंत बाबीलोन येथें ताप येऊन मरण पावला (इ. स. पू. ३२३).

**स्वारीचे परिणामः**—पंजाबांत व सिंधमध्यें अलेक्झांडरनें आपलें युद्धनपुण्य येथील लोकांच्या चांगलें निदर्शनास आणिलें यांत शंकाच नाहीं. पण युद्धांतील विजय कांहीं त्याला सुलभतेनें संपादन करितां आलेले नाहींत

त्याला विरोध बराच झाला. अनेक लहानमोठ्या राजांनीं व्यक्तिशः त्याला विरोधून आपलें स्वातंत्र्य टिकविण्याचा कसून प्रयत्न केला. पुरुषांबरोबर स्त्रियांनींही या संग्रामांत भाग घेतला. यावरून या लहान लहान राज्यांतील प्रजेच्या अंतःकरणांत स्वकर्तव्याची जाणीव उत्पन्न झालेली होती हें स्पष्ट दिसतें. अंभीप्रमाणें किंवा शशीगुप्तप्रमाणें त्यांना आपल्या कातडीचा बचाव करून शिवाय स्वार्थही साधतां आला असता; पण असे राष्ट्रद्रोही फारसे निघाले नाहींत.

अलेक्झांडरनें भारताच्या सीमेवरील थोड्याशा प्रदेशांत घुसून कांहीं विजय मिळविले हें खरें असलें तरी तेवढ्यानें कांहीं अलेक्झांडर हिंदुस्थानांत विजयी झाला असें म्हणतां येण्यासारखें नाहीं. कारण इतर अनेक देशांप्रमाणें भारतवर्षही पादाक्रांत करावा, तो जिंकावा असा मोठा व्यूह रचून तो भारतावर चालून आलेला होता. परंतु सीमाप्रांतांतील कांहीं किरकोळ राजांशीं नि त्यांच्या एकाकी सैन्याशीं लढून कांहीं विजय मिळविण्यापलीकडे, मनाशीं योजिलेल्या प्रचंड मोहिमेंतील एखादी लढाई जिंकण्यापलीकडे अलेक्झांडर येथें विशेष कांहीं मिळवूं शकला नाहीं. नंदांच्या—मगध-सम्राटाच्या—बलाढ्य सेनेशीं मोठा संग्राम करून त्यांत त्यानें विजय मिळविला असता तर तो त्याचा खरा विजय ठरला असता. पण तेथपर्यंत तो जाऊंच शकला नाहीं. मग त्याचीं कारणें कोणतींही सांगितलीं जावोत.

ज्ञानकोशकार म्हणतात, " आम्ही पुरुराजाचा पराभव केला असें ग्रीक लेखक म्हणतात, पण हें संशयीत दिसतें. आपल्या इकडे कोठेंही या स्वारीचा उल्लेख नाहीं, त्यावरून कदाचित् ही स्वारी झाली नसावी. तक्षशिलेपर्यंत येऊनच अलेक्झांडर परतला असावा. किंवा स्वारी झाली असल्यास पुरु राजाचा जय झाला असावा असें वाटतें. कारण या युद्धानंतरही पुरुराज हा राज्यावर होता. "

थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं अलेक्झांडरच्या स्वारीमुळें भारताच्या केसालाही धक्का लागला नाहीं. त्याची स्वारी म्हणजे नुसती वावटळ होती. तिचा मागमूसही नंतर उरला नाहीं. कांहीं थोडे तात्कालिक परिणाम घडून आले; ते असे.

( १ ) भारताचा पश्चिमेकडील जगाशीं झपाट्यानें संबंध येण्यास मदत

झाली. ( २ ) व्यापार वाढला. ( ३ ) पौर्वात्य आचार-विचार, कला व शास्त्रें इत्यादींचा अभ्यास करण्यास पाश्चिमात्यांनीं सुरवात केली. ( ४ ) भारतीयांमध्यें ऐक्य-भावना निर्माण होण्यास साहाय्य झालें.

**हिंदुस्थानाच्या इतिहासांतील अलेक्झांडरचें स्थान.**— अलेक्झांडरच्या हिंदुस्थानांतील स्वारीला खात्रीलायक पुरावा नाहीं. त्याच्याच वंशजांनीं जी थोडी माहिती लिहून ठेवलेली आढळते तीवरूनच त्याच्या विषयीं काय तें मत बनवावयाचें.

प्लुटार्क नांवाच्या एका ग्रंथकारानें अलेक्झांडरचें चरित्र विस्तृतपणें लिहिलें आहे. त्या सर्व माहितीच्या आधारानें एक गोष्ट निर्विवादपणें सांगतां येईल कीं अलेक्झांडर हा एक महापराक्रमी योद्धा या जगाच्या पाठीवर होऊन गेला. हॅनिबॉल, सीझर इ. पाश्चिमात्य वीर पुरुषांच्या मालिकेंत त्याची गणना होऊं शकते. त्याची असामान्य धडाडी, अतुलनीय शौर्य, दुर्दमनीय महत्त्वाकांक्षा व अमोघ आत्मविश्वास या गुणांनीं त्याचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें. मॅसिडोनियाचें स्वतःचें राज्य रक्षून, इराण, तुर्कस्थान, अरबस्थान यांसारखे लांबलांबचे देश त्यानें हां हां म्हणतां पादाक्रांत केले. हें त्याच्या असामान्य कर्तबगारीचेंच द्योतक म्हणावें लागेल.

पण ज्या वेगानें तो हिंदुस्थानाच्या सीमेपर्यंत येऊन थडकला तो वेग हिंदुस्थानामध्यें पाऊल ठेवतांच त्याला कमी करावा लागला ही गोष्ट तितकीच सत्य आहे. पोरसाशीं झालेल्या युद्धांत तर हिंदुस्थानांतील सैनिकांचा पराक्रम त्याच्या चांगलाच प्रचीतीस आला. आणि त्याला कळून चुकलें कीं भारतीयांशीं लढणें वाटलें तितकें सोपें नाहीं. पोरस राजानें दाखविलेला स्वाभिमानी बाणा आर्य रक्ताला साजेसाच होता, याबद्दल कोणाचेंही दुमत होणार नाहीं. मात्र अलेक्झांडरसारखा राक्षसी सामर्थ्य असलेला योद्धा हिंदुस्थानांतील एखाद्या लहानशा सामर्थ्यानें धुळीस मिळाली असेंही म्हणणें धाष्टर्याचें होईल. अलेक्झांडरनें येथील अनेक राजांना जिंकून आपलें मांडलीक बनविलें व वायव्येकडील बराचसा प्रदेश आपल्या राज्यास जोडिला ही गोष्ट नाकबूल करून चालणार नाहीं. अर्थात् त्याचबरोबर हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं हिंदुस्थान संपूर्णतः

आपल्या ताब्यांत आणण्याची व तेथील संस्कृति नामशेष करून तेथें ग्रीक संस्कृतीची स्थापना करण्याची आकांक्षा बाळगून इकडे आलेल्या अलेक्झांडरच्या हातीं म्हणण्यासारखें कांहींच लागलें नाहीं. त्याच्या स्वारीमुळें भारताच्या विचार-प्रणालीवर व जीवनावर कोणताच कायम स्वरूपाचा परिणाम झाला नाहीं; आणि शेवटीं तर त्याला अल्पसा व कोरडाच विजय घेऊन परतावें लागलें.

श्री. सत्यनाथ अय्यर हे इतिहासलेखक म्हणतात, " अलेक्झांडरनें हिंदुस्थानांत मिळविलेला विजय हा त्याच्या दर्पोक्तिपूर्ण घोषणेच्या विरुद्ध वागून मिळालेला अर्थात् चोरटा विजय होता. कारण हा विजय हिंदुस्थानांतील एका लहानशा राज्याविरुद्ध लढून त्यानें मिळविला होता. नंदाच्या अतिबलाढ्य सेनासागराशीं त्याची गांठ पडली नाहीं. "

( अ ) **उतारे**:—( १ ) " इराणच्या दरायसनें बोलणें लावलें कीं, युफ्रेटिसच्या पश्चिमेकडील मुलुख मी आपणांस देतों. आपण तह करावा. शिवाय आपली मुलगीही अलेक्झांडरला देण्याचें त्यानें आश्वासन दिलें व वरदक्षिणा म्हणून आणखी क्रोडो रुपये देऊं केले ! हें देऊं केलेलें पाहतांच शिकंदरच्या सेनापतींना मोठा आनंद झाला. पारमेनिओ नामक एक लोभाळू सेनापती म्हणाला, " मी जर शिकंदर असतों तर असला देकार मी एकदम पत्करला असता." शिकंदरनें त्याची किंमत त्याला कळावी म्हणून उत्तर केलें, " होय, मी जर पारमेनिओ असतों तर मीही हा एकदम पत्करला असता. " पण शिकंदरला आहेराची किंवा लालुचीची कांहींच किंमत नव्हती. त्यानें दरायसला सडकून कळविलें की, " मला हें नको. युफ्रेटीसच्या पश्चिमेचा नव्हे तर अखिल आशियाचा स्वामी मी आहे हें कबूल कर, आणि जर तसें होत नसेल तर पुन्हां युद्धाला उभा राहा. कोणचेंच न करतां पळून जाशील तर मी तुला चैन पडूं देणार नाहीं. दडशील तेथून हुडकून काढीन. "

' पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ ' मधून.

( आ ) **प्रश्न**:—( १ ) वरील उताऱ्यावरून शिकंदरच्या स्वभावाचें वर्णन करा.

( २ ) अलेक्झांडरच्या स्वारीचीं कारणें कोणतीं ? महत्त्व काय ? परिणाम काय झाले ?

( इ ) **स्वाध्याय**:—' पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ- ' ले. प्रा. श्री. म. माटे.

—:०:—

## प्रकरण ३ रें

# भारताचा शुभचंद्र

( १ ) चंद्रगुप्ताचें क्षात्रकुलीनत्व;
( २ ) असंतोषाचा जनक चाणक्य;
( ३ ) असंतोषाचा भडका;
( ४ ) राज्यविस्तार;
( ५ ) मेगॅस्थिनीसच्या दृष्टींतून भारत;
( ६ ) आदर्श राज्यव्यवस्था;
( ७ ) निष्कर्ष.

### १ चंद्रगुप्ताचें क्षात्रकुलीनत्व

भारतीय सम्राटांमध्यें पहिलें स्थान चंद्रगुप्त मौर्यानें भूषविलें आहे. मौर्य घराण्यापासून भारतीय इतिहासाची खरी ओळख होऊं लागते. शिशुनाग घराण्यांतील बिंबिसार, अजातशत्रु, नंद घराण्यांतील महापद्मनंद इत्यादि शूर पराक्रमी असे मोठे राजे होऊन गेलें. परंतु सम्राट-पदाचा मान त्यांना मिळवितां आला नाहीं. शिवाय त्यांची भरपूर माहिती पुरविणारीं साधनेंही उपलब्ध नसल्यामुळें त्यांच्याविषयीं अधिक कांहीं म्हणतां येत नाहीं. परंतु मेगॅस्थिनीस व आर्य चाणक्य या चंद्रगुप्ताच्याच दरबारांत राहिलेल्या विद्वानांनीं तत्कालीन परिस्थितीचें योग्य ज्ञान करून देणारी माहिती लिहून ठेविली असल्यामुळें चंद्रगुप्तापासूनचा खरा इतिहास आपणांस मिळूं लागतो. म्हणून चंद्रगुप्त हा इतिहासाला ज्ञात असलेला पहिला सम्राट होय.

चंद्रगुप्ताच्या कुळाविषयीं कित्येक ग्रंथकारांनीं माहिती लिहीलेली आहे. त्याचा जन्म हीन कुळांत झाला असें हे ग्रंथकार आजपर्यंत सांगत आले. परंतु हें त्यांचें प्रतिपादन निराधार ठरविणारे पुरावे आतां उपलब्ध झाले आहेत.

त्यावरून जन्मानें तो शुद्ध क्षत्रिय होता असें सिद्ध झालें आहे याला पुढील पुरावे आहेत.

( १ )पाश्चिमात्य लेखकांच्या कोणत्याही लिखाणांत चंद्रगुप्त हीन असल्याचा उल्लेख नाहीं. जस्टिन, मेगॅस्थिनीस इत्यादि पाश्चिमात्य लेखक चंद्रगुप्त क्षत्रियच होता असें मानितात.

( २ ) प्लुटार्क या पाश्चिमात्य ग्रंथकर्त्यानें अलेक्झांडरचें जीवनचरित्र लिहिलें आहे. त्यामध्यें त्यानें चंद्रगुप्ताच्या व अलेक्झांडरच्या भेटीचा एक प्रसंग उल्लेखिलेला असून चंद्रगुप्त नंदाच्या हीन जन्माबद्दल त्याची निंदा करीत असल्याचें वर्णन केलें आहे. चंद्रगुप्त स्वतः हलक्या कुळांतील असता तर त्यानें नंदाची हेटाळणी केली नसती.

( ३ ) जैनांच्या कल्पसूत्रांत चंद्रगुप्ताचें, काश्यप गोत्रांतील स्थीवर मौर्य-पुत्र असें वर्णन आहे.

४ पुराणांत ' मुरा ' नांवाची स्त्री महापद्मनंदाच्या राण्यांपैकीं एक राणी होती असा उल्लेख आहे. ती दासी नव्हती. तेव्हां चंद्रगुप्त तिचा मुलगा असल्यास तो ' दासीपुत्र ' नाहीं हें स्पष्ट आहे. पण पुराणांतील हा उल्लेख निराधार आहे. ' मुरा ' या नांवावरून ' मौर्य ' अशी व्युत्पत्ति होऊंच शकत नाहीं. ' मुरा ' या शब्दावरून फार तर ' मौरेय ' होईल. ' मौर्य ' शब्द ' मुर ' या पुल्लिंगी शब्दापासून निर्मितां येतो, आणि पाणिनीच्या सूत्रांतील गणपाठांत ' मुर ' या गोत्राचा उल्लेख आहे. तेव्हां मौर्य घराणें ' मुर ' या मूळपुरुषावरून ओळखिलें जातें असें म्हणण्यास प्रत्यवाय नांहीं.

चंद्रगुप्ताची प्रत्येक कृती त्याच्या क्षत्रियत्वाची मूर्तिमंत साक्ष आहे. पं. राधाकुमुद मुकर्जी म्हणतात, " या दैदीप्यमान क्षात्रतेजाची विटंबना करण्यास प्रवृत्त होणाऱ्या पुरुषांच्या अज्ञानाची, स्वाभिमानशून्यतेची आणि हेकटपणाची कींव करावी तेवढी थोडीच ! "

**पूर्ववृत्त:—** चंद्रगुप्ताचा जन्म शाक्यांपैकीं मुरा नांवाच्या क्षत्रिय घराण्यांत झाला. त्याचा बाप मौर्य घराण्याला ललामभूत झालेला असा एक सेनानी होता. सरहद्दीवरील बंडें मोडण्यासाठीं गेला असतांना दुर्दैवानें तो त्यांत

मारला गेला. त्याची कुटुम्बीय मंडळी निराधार झाली. असहाय झालेली त्याची विधवा स्त्री त्या वेळीं गरोदर होती. पतिनिधनानंतर ती आपल्या भावांकडे गली. त्यांनीं तिला सुरक्षितपणें पुष्पपूर (पाटलिपुत्र) येथें आणिली. तेथें ती प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न झालें, तोच भावी सम्राट चंद्रगुप्त.

चंद्रगुप्ताच्या मामांनीं त्याच्या सुरक्षिततेकरतां त्याला एका गुराख्याकडे ठेविलें. त्या गुराख्यानें त्याला कांहीं दिवसानंतर एका शेतकऱ्याला विकून टाकिलें. त्या शेतकऱ्यानें त्याला गुरें राखण्याचेंच काम सांगितलें. असें म्हणतात कीं लहानपणापासूनच त्याला आपण इतरांहून कांहीं विशेष आहोंत असें वाटे. आपल्या संवगड्यांशीं खेळ खेळत असतांना तो स्वतःकडे राजाची भूमिका घेई आणि इतरांना आपले कनिष्ठ म्हणून वागवी. अशा त्याच्या खेळांमधून लुटुपुटीचा दरबार किंवा न्यायालय तो भरवीत असे. असाच एकदां हा खेळ खेळत असतां चाणक्यानें त्यास पाहिलें. त्याला पाहातांक्षणींच चाणक्याला त्या मुलांत कांहीं विशेष चमक दिसली. लगेच त्यानें त्या मुलास एक हजार कार्षापणांस विकत घेतलें. त्या वेळीं हा मुलगा आठ-नऊ वर्षांचा होता. चाणक्यानें त्यास त्या वेळीं प्रसिद्ध असलेल्या तक्षशिला विद्यापीठांत नेलें आणि स्वतःच्या देखरेखीखालीं सर्व प्रकारचें शिक्षण दिलें. थोडक्याच दिवसांत चंद्रगुप्त युद्धकला, राजकारण इत्यादि सर्व विषयांत पारंगत झाला.

**असंतोषाचा जनक चाणक्यः**—चाणक्याचें मूळ नांव विष्णुगुप्त असें होतें. त्याच्या गांवाचें नांव 'चणक' आणि म्हणून त्यास 'चाणक्य' असें म्हणत. 'कौटिल्य' असेंही नांव त्यास दिलेलें आहे; परंतु हें नांव त्याच्या शत्रूंनीं त्यास दिलें असावें. कारण राजनीतीमध्यें तो इतका निष्णात होता कीं आपल्या शत्रूंचे डावपेच अल्पावधींत ओळखून केव्हांच धुळीला मिळवून टाकी. शिवाय त्याची दंडनीति अतिशय कडक असल्यामुळेंही त्याचे विरोधक त्यास 'कुटिल' म्हणत.

चाणक्य हा एक अतिशय विद्वान व राजकारणपटु मुत्सद्दी होता. प्रथम तो नंदराजाच्या पदरीं असे. धनानंद राजानें त्याचा कांहीं अपमान केल्यानें नंदांचा उच्छेद करण्याची त्यानें घोर प्रतिज्ञा केली. लहानपणींच

तेजस्वी दिसणाऱ्या चंद्रगुप्ताला स्वतःच्या देखरेखीखालीं शिक्षण देऊन वाढविण्यांत त्याचा हाच हेतु होता. चंद्रगुप्ताकडून मगधामध्यें त्यानें एक मोठी राज्यक्रांति घडवून आणिली; व पुढें चंद्रगुप्ताला गादीवर बसवून व आपण त्याचा प्रधान राहून त्यानें आदर्श राज्यकारभार चालविला. 'अर्थशास्त्र' या नांवाचा एक अमूल्य ग्रंथ त्यानें लिहिला असून राजनीति, राज्यकारभार व समाजव्यवस्था इत्यादि विषयांची उत्कृष्ट माहिती त्या ग्रंथांत आहे.

**कौटिलीय अर्थशास्त्र**:–अर्थशास्त्रावरील वाङ्मयांत हा एक अति महत्त्वाचा ग्रंथ म्हणून गणला जातो. भारतीय वाङ्मयांतील दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत राज्यशासन व आर्थिक स्थिति यासंबंधीं प्राचीन काळची इतकी भरपूर व महत्त्वाची माहिती सांपडणार नाहीं. अर्थशास्त्राच्या मूळ ग्रंथावर पाश्चात्य व बंगाली लेखकांकडून अनेक टीकात्मक निबंध लिहिले गेले आहेत व त्याचीं अनेक भाषांत भाषांतरेंही झालीं आहेत. ग्रंथाचे मुख्य भाग किंवा अधिकरणें १५ असून त्यांत १८० विषय आहेत.

**शिकवण**:– "राजाला तत्त्वज्ञान, वेद व अर्थशास्त्र व शासनशास्त्र ह्या विद्या अवगत असल्या पाहिजेत."

**प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम्**
**नात्मप्रियं हितं राज्ञः प्रजानां तु प्रियं हितम्॥**

म्हणजे प्रजेच्या सुखांत राजाचें सुख असतें आणि प्रजेच्या कल्याणांतच राजाचें कल्याण असतें. राजाला स्वतःच्या प्रिय गोष्टीनें सुख होत नाहीं. तर प्रजेला जें प्रिय त्यानेंच राजाला सुख होतें. खाणी खणणें, मिठाचा व्यापार, सूतकाम व विणकाम, दारू तयार करण्याचे कारखानें, वेश्यावृत्तीवरील नियंत्रण, करवसुली, न्यायदान, सार्वजनिक आरोग्य व इतर सामाजिक बाबींची व्यवस्था इत्यादि विविध विषयांवर विवेचन या ग्रंथांत केलेलें आहे.

## ३ असंतोषाचा भडका

नंद राजाची कारकीर्द प्रजेला अप्रिय झाली होती. नंदाच्या जाचक आर्थिक व्यवस्थेमुळें लोक असंतुष्ट होते. लोकांवर त्यांनीं

अनन्वित अत्याचार केले होते. कांहीं नंद राजे स्वतः अनीतिमान व शीलभ्रष्ट असून प्रजेला त्यांच्याबद्दल बिलकूल आदर वाटत नसे. शिवाय चाणक्यकालीन राजा धनानंद हा जन्मानें शूद्र असल्यामुळें प्रजेच्या मनांत राजाविषयीं जो पूज्यभाव असावा लागतो तोही त्यास लाभला नव्हता. नंदांचें लष्करी सामर्थ्य फार मोठें होतें. परंतु ह्या सामर्थ्याच्या जोरावर त्यानें अनियंत्रितपणें राज्यकारभार चालविला होता. प्रजेच्या मनांत उत्पन्न झालेल्या असंतोषाचा आर्य चाणक्यानें पुरेपूर फायदा घेतला. त्यानें लोकांचीं मनें राजाविरुद्ध फितविलीं. तो स्वतः विद्वान असल्यामुळें नंदाविरुद्ध त्यानें मोठ्या पद्धतशीर रीतीनें प्रचार केला. हा प्रचार फळास आला आणि मगधांतील राज्यक्रांति यशस्वी झाली.

क्रांतींतील यश क्रांति घडवून आणणाऱ्या नेत्यावर जितकें अवलंबून असतें, तितकेंच एकनिष्ठ अनुयायांच्या निष्ठेवर अवलंबून असतें. मगधांतील या राज्यक्रांतीचा जनक चाणक्य होता, आणि क्रांतिवीरांचा अग्रणी चाणक्याचा पट्टशिष्य चंद्रगुप्त हा होता. चंद्रगुप्तानें नंदांचा शेवटचा राजा धनानंद याला ठार मारून नंद राजे साफ धुळीला मिळविले. चाणक्यानें चंद्रगुप्ताला मगधाच्या सिंहासनावर सम्राटपदाचा अभिषेक करविला ( इ. स. पू. ३२२ ).

## ४ चंद्रगुप्ताचा राज्यविस्तार

नंदांचें राज्य अखिल मगधावर पसरलें होतें. हें राज्य चंद्रगुप्ताच्या ताब्यांत आल्यानंतर त्यानें आजूबाजूच्या लहान लहान राजांना अंकित करून घेतलें आणि आपल्या साम्राज्याच्या सीमा दूरवर वाढविण्यास सुरुवात केली.

**ग्रीकांचें उच्चाटन**:– ( अ ) इ. स. पू. ३१७ त सिंधु नदीच्या प्रदेशांत वास्तव्य करून असलेल्या युडेमॉस नांवाच्या ग्रीक सेनापतीचा त्यानें पराभव केला. ( आ ) अलेक्झांडरनें हिंदुस्थानाच्या सरहद्दीवरील व त्यापलीकडील जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था पाहाण्यासाठीं आपला सेनापति सेल्यूकस निकेटर यास नेमिलें होतें. पाश्चात्यांच्या आक्रमणांपासून भारताचें रक्षण करणें हें चंद्रगुप्तासारख्या क्षत्रियाचें कर्तव्यच होतें. यवनांनीं व्यापिलेली ही भूमि सोडविण्यासाठीं त्यानें इ. स. पू. ३०५ मध्यें सेल्यूकसवर स्वारी करून

त्याचा पराभव केला. सेल्यूकसशीं झालेल्या तहानें—(१) हिरात, काबुल, गांधार इ. सिंधु नदीपर्यंतचा प्रदेश चंद्रगुप्तास मिळाला. (२) सेल्यूकसनें आपली मुलगी चंद्रगुप्तास दिली, (३) आपला वकील मेगॅस्थिनीस यास चंद्रगुप्ताचे दरबारीं ठेविलें, (४) आणि त्यास खंडणी दिली.

ग्रीकांचें उच्चाटन केल्यानंतर चंद्रगुप्तानें सौराष्ट्रावर स्वारी केली व तो देश आपल्या साम्राज्यांत समाविष्ट करून घेतला.

चंद्रगुप्तानें चोवीस वर्षें राज्य केलें. त्याच्या साम्राज्यांत सांप्रतचें अफगाणिस्थान, बलुचिस्थान, पंजाब, संयुक्त प्रांत, बिहार, काठेवाड व थोडासा बंगाल या प्रांतांचा समावेश झाला होता. म्हणजे नर्मदेच्या उत्तरेकडील सर्व हिंदुस्थानाचा तो सम्राट होता. व्हिन्सेंट स्मिथच्या मताप्रमाणें असें दिसतें कीं चंद्रगुप्ताचें विजयी सैन्य दक्षिणेकडे म्हैसूरपर्यंत संचार करून आलें. मात्र दक्षिणेकडे त्याचें साम्राज्य पसरलें असल्याचा पुरावा अद्याप उपलब्ध नाहीं.

(४) चंद्रगुप्त जैन होता, अशी जैनांची पारंपारिक समजूत आहे. त्याच्या अखेरीसंबंधीं अशी एक जैन दंतकथा आहे कीं, त्याच्या कारकीर्दीच्या शेवटीं उत्तर हिंदुस्थानांत बारा वर्षांचा दुष्काळ पडल्यामुळें चंद्रगुप्तानें आपल्या मुलास गादीवर बसविलें व स्वतः भद्रबाहु या जैन साधुबरोबर म्हैसूर प्रांतांत श्रवण-बेळगोळ येथें जाऊन बारा वर्षें कडक तप करून जैन-मताप्रमाणें वानप्रस्थाश्रम स्वीकारला. हा राज्यत्याग त्यानें इ. स. पू. २९८ मध्यें केला असावा.

## ५ मेगॅस्थिनीसच्या दृष्टींतून भारत

मेगॅस्थिनीस हा चंद्रगुप्ताच्या दरबारांत सेल्यूकसनें पाठविलेला ग्रीक वकील होता. त्यानें पूर्वी गांधारामध्येंही ग्रीकांच्या तर्फेनें उत्कृष्ट कामगिरी बजाविली होती. भारताचा पहिला ऐतिहासिक सम्राट चंद्रगुप्त याचा यथार्थ परिचय करून देणारा व भारताच्या तत्कालीन परिस्थितीचें निःपक्षपाती व यथातथ्य वर्णन करणारा पहिला परकीय गृहस्थ मेगॅस्थिनीस होय. चंद्रगुप्ताच्या दरबारांत ऐषआरामांत राहाण्यासाठीं तो आला नव्हता. त्यानें भारतांत सर्वत्र हिंडून, भौगोलिक, सामाजिक व राजकीय परिस्थिति स्वतः अवलोकून ती आपल्या ग्रंथामध्यें संकलित करून ठेविली. त्याच्या ग्रंथाचें नांव ‘ इंडिका ’ असें आहे.

या ग्रंथामुळेंच चंद्रगुप्ताची बरीच माहिती आपणांस मिळूं शकते. त्याचा हा ग्रंथ भारतीय इतिहासाला एक प्रमुख आधारभूत ग्रंथ झाला आहे. तो चंद्रगुप्ताचा समकालीन असल्यामुळें त्यास विशेष महत्त्व आहे.

मेगॅस्थिनीसच्या पुस्तकांतील कांहीं बोध-वाक्यें :

"चंद्रगुप्ताची राजसंस्था अत्यंत संघटित असून, त्यांतील विभाग आपापलें काम व्यवस्थितपणें बजावीत. केंद्रसत्तेच्या आज्ञा कसोशीनें पाळिल्या जात; आणि राज्यांतील एकंदर शिस्त वाखाणण्यासारखी होती.

चंद्रगुप्ताची राजधानी पाटलिपुत्र असून तें एक भव्य व वैभवानें नटलेलें शहर होतें. या शहराचें क्षेत्रफळ १८ चौरस मैल होतें. भव्य प्रासाद, रमणीय उपवनें, ठिकठिकाणीं पाण्याचे हौद, टोलेजंग इमारती; नाटकगृहें इत्यादि सर्व सुख-सोयींनीं समृद्ध असलेलें असें हें नगर इंद्रलोकाच्या अमरावती प्रमाणें दिसत होतें.

गुन्हे फार क्वचित् घडत. भारतीयांचा परस्परांवर विश्वास असे. स्वतःचीं घरें व मालमत्ता ते सहसा कडच्या-कुलुपांत ठेवीत नसत.

गुलामगिरीचा अभाव, स्त्रियांचें पातिव्रत्य आणि पुरुषांचें शौर्य हीं भारतीयांचीं वैशिष्ट्यें होत. येथील लोक शांत आणि उद्योगी; कष्टाळू आणि कलावान् असल्यामुळें सर्वत्र शांतता नांदत असे. सत्य आणखी सद्गुण यांना हिंदु लोक फार मान देत."

## ६ आदर्श राज्यव्यवस्था

(अ) राजकीय परिस्थिति—बिंबिसार व अजातशत्रु यांच्या एकतंत्री राज्यसत्तेनंतर भारतांत ठिकठिकाणीं अनेक प्रजासत्ताक राज्यें निर्माण झालीं. अलेक्झांडरच्या स्वारीच्या वेळीं सिंधु नदीच्या प्रदेशांत अशीं पुष्कळ स्वायत्त राज्यें पसरलेलीं होतीं. पोरसानें हीं सर्व राज्यें एकमुखी सत्तेखालीं आणण्याचा प्रयत्न केला. पण त्यांस या कामीं विशेष यश आलें नाहीं. या स्वायत्त राज्यांत अव्यवस्था, आपसांत कलह आणि बाहेरच्या शत्रूपासून स्वसंरक्षण करण्याची असमर्थता हे दोष असल्यामुळें तीं अगदीं दुर्बल झालीं होतीं. चाणक्य व चंद्रगुप्त यांनीं या परिस्थितीचें नीट आकलन केलेलें असल्यामुळें हीं लहान लहान राज्यें नामशेष करून एकमुखी साम्राज्य स्थापिण्याचे त्यानें प्रयत्न केले.

मात्र या साम्राज्याचें स्वरूप जुलुमी हुकूमशाहीसारखें नसून तें मर्यादित राजसत्तेसारखें होतें.

(आ) राज्यव्यवस्थेंतील विशेष--

(१) राजा व प्रजा यांचे परस्परसंबंध पालक-पाल्याचे होते.

(२) राजाला सल्ला देण्यासाठीं व त्याच्याशीं सहकार्य करण्यासाठीं श्रेणीवार मंडळाची व्यवस्था होती. मुख्य प्रधान, सेनापति, पुरोहित व युवराज हे प्रथम श्रेणींतील अधिकारी होते. वसूलमंत्रि, सार्वजनिक हिताचीं कामें करणारा मंत्रि, दरबारी पत्रव्यवहार पाहाणारा मंत्रि, अर्थमंत्रि इत्यादि द्वितीय श्रेणींतील अधिकारी होत. उद्योगधंदे, शेती, आरोग्य व ग्रामव्यवस्था इत्यादि खात्यांचे व्यवस्थापक तृतीय श्रेणींतील अधिकारी होत. याशिवाय पोरकीं पोरें, अनाथ विधवा, पंगू आणि भिकारी लोक इत्यादींची व्यवस्था पाहाण्यासाठींही स्वतंत्र अधिकारी असे.

सारांश, राजा प्रजेच्या हिताशीं पूर्णपणें एकरूप असे. प्रजेच्या सुखदुःखांमध्यें आपलीं सुखदुःखें पाहाण्याची त्याची प्रवृत्ति असे. आणि म्हणूनच मेगॅस्थिनीससारखे परकीय लोक त्याच्या राज्यव्यवस्थेची मुक्तकंठानें स्तुति करितांना आढळतात.

(इ) विभागशःमाहितीः--१ राजा--हा राज्यांतील सर्वांत श्रेष्ठ अधिकारी होय. त्यास लष्करविषयक, न्यायविषयक, कायदे करण्याचा व राज्य चालविण्याचा असे सर्व महत्त्वाचे अधिकार होते. याशिवाय राज्याचा बंदोबस्त पाहाणें, हिशेब तपासणें, निरनिराळ्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका करणें, हेरांकडून गुप्त माहिती गोळा करणें व सैन्याची पाहाणी करणें इत्यादि कामेंही तो बारकाईनें पाहात असे. राजा हा राज्याचा सर्वाधिकारी असला तरी तो आपल्या मंत्रिपरिषदेशीं विचारविनिमय करीत असे; इतकेंच नव्हे तर तो वेळोवेळीं प्रत्येक विभागाच्या प्रमुखाला बोलावून त्या त्या विभागाची माहिती मिळवीत असे. त्या वेळचे राजे रणभूमीवर प्रत्यक्ष लढण्यांत भाग घेत, आणि युद्धविषयक बाबतींतही ते कुशल असत. राजांना जरी त्या वेळीं अनियंत्रितपणें राज्यकारभार चालविण्याचे अधिकार असले तरी सुद्धां अलीकडील

सुधारलेल्या राज्यघटनांप्रमाणें अद्यावत् राज्यघटना त्या वेळींही आस्तित्वांत होत्या; आणि बहुधा त्या घटनेप्रमाणेंच राज्यकारभार चालविला जाई, हें विशेष होय.

२ मंत्रिमंडळ—राजाला राज्यकारभारांत सल्ला देण्यासाठीं इंग्लंडच्या आधुनिक 'कॅबिनेट'प्रमाणें एक मंत्रिमंडळ असे. त्या मंत्रिमंडळांतील मंत्र्यांची संख्या आवश्यकतेप्रमाणें कमीअधिक करण्यांत येई. मंत्र्यांच्या नेमणुका राजा करीत असे. मंत्रिमंडळाच्या बहुमतावरून निर्णय घेतला जात असे. प्रत्येक मंत्र्याची नेमणूक करितांना त्यास कांहीं कसोट्या द्याव्या लागत. विशेष कसोट्या दिलेल्या मंत्र्याला मख्य मंत्रि नेमण्यांत येई. मंत्र्यांना वार्षिक ४८००० कार्षापण पगार मिळत असे.

३ उत्पन्नविभाग—चंद्रगुप्ताच्या राज्यांतील उत्पन्नविभागाचें खातें हें हल्लींच्या 'रेव्हेन्यू डिपार्टमेंट्' सारखेंच होतें. त्याच्या राज्यांतील उत्पन्नाच्या मुख्य गोष्टी म्हणजे जमीनमहसूल—( हा एकंदर उत्पन्नाच्या $\frac{1}{6}$ असे. ) आयात-निर्यात मालावरील जकाती, व्यापारी कर वगैरे गोष्टीही होत्या. याशिवाय रस्तेपट्टी, पाणीपट्टी, जंगलें, खाणी वगैरेचेंही उत्पन्न येत असे. पण या अवाढव्य उत्पन्नाचा बराचसा विनियोग त्या दयाळू व प्रजाप्रेमी राजाच्या कारकीर्दीत लोककल्याणाकरतांच होत असे. उत्पन्नाप्रमाणेंच खर्चही जबर होता. खर्चाच्या मुख्य बाबी म्हणजे राजा, राजदरबार, लष्कर, तसेंच रस्ते, कालवे, पाटबंधारे वगैरे प्रजेच्या सुखसोयी होत्या. चंद्रगुप्ताच्या राज्यांत जमाखर्च व हिशोब यांची उत्कृष्ट व्यवस्था होती. व्यापार वगैरेवरची करआकारणी प्रमाणशीर होती. शिवाय करवसुलीची पद्धती जांचक नसून सौम्य होती.

४ जनगणना—करआकारणी करण्यासाठीं, आरोग्यव्यवस्था पाहाण्यासाठीं व इतरही कांहीं राजकीय योजनांसाठीं जनगणना ( खानेसुमारी ) करीत असत. प्रत्येक गांवामधील अधिकाऱ्यामार्फत जातवार लोकसंख्या, धंदे इत्यादि सविस्तर माहिती मिळविण्याची पद्धति होती. जनगणनेचें खातें कायम स्वरूपाचें होतें.

५ संरक्षणविभाग—चंद्रगुप्ताची सर्व मदार त्याच्या अफाट सैन्य-

बळावर होती. त्याचें सैन्य चतुरंग होतें. हत्ती, रथ, घोडदळ व पायदळ असे त्याच्या सैन्याचे चार विभाग होते. याशिवाय शिबंदी व वाहतुक हे विभाग सैन्यालाच जोडलेले असत. मेगॅस्थिनीसनें दिलेल्या माहितीप्रमाणें या लष्कर व्यवस्थेचें काम पाहाण्यासाठीं पांच सभासदांचें एक मंडळ असे. याच विभागाला जोडून एक आरमार विभागही होता. युद्धांतील सर्व योजना शास्त्रोक्त असत. सैन्याची शिस्त वाखाणण्यासारखी होती. लढण्याचीं हत्यारें भाला, तलवार, व धनुष्यबाण हीं असत. चंद्रगुप्ताचें लष्कर ९००० हत्ती,८००० रथ, ३०,००० घोडेस्वार व ३००,००० इतकें पायदळ होतें.

६ हेरखातें–राज्यांतील सर्व बारीकसारीक गोष्टींची, अधिकाऱ्यांच्या वर्तुणुकीची, परकीयांच्या वास्तव्याची, शत्रूच्या बेतांची, हालचालींची वित्तंबातमी हेरांकडून राजाला मिळे. हेरांचें सर्वत्र जाळें विणलेलें होतें. त्या खात्याची स्वतंत्र व्यवस्था असून हेरांना राजगृहांत केव्हांही प्रवेश मिळे.

७ चोख व त्वरित न्यायदान–प्रजेला त्वरित व योग्य न्याय मिळण्याची व्यवस्था करण्याबाबत चंद्रगुप्ताचा सदैव कटाक्ष असे. न्यायखात्यांतील वरिष्ठ अधिकारी राजा. आरोपीवर दया दाखविण्याचाही अधिकार त्यालाच असे. शिक्षा मात्र अत्यंत कठोर असत. साध्या गुन्ह्यांनासुद्धां हातपाय तोडण्यासारख्या शिक्षा असत. परंतु शिक्षांचें प्रमाण मात्र अल्प होतें.

८ सार्वजनिक हिताचीं कामें—रस्ते तयार करणें, प्रवाश्यांसाठीं छाया, धर्मशाळा, विहिरी इत्यादि सुखसोयी पाहाणारा एक स्वतंत्र विभाग असे.

९ शेती विभाग–कालवे व पाटबंधारे तयार करणें, शेतकऱ्यांना उत्तेजन देऊन शेती सुधारणें इत्यादि कामें या विभागाकडे असत.

१० प्रांतिक व स्थानिक शासनसंस्था–( अ ) प्रांतिक–चार प्रांत ( १ ) प्राच्य व ब्रह्मदेश; ( २ ) तक्षशिला; ( ३ ) माळवा; ( ४ ) सौराष्ट्र. प्रत्येकावरील अधिकारी राजघराण्यांतील असत. ( आ ) स्थानिक पंचायतपद्धति व बहुमतानें निर्णय; नगरक=नगराध्यक्ष; ग्रामणी=पाटील; गोप=५-१० ग्रामांचा अधिकारी, याशिवाय स्थानिक, प्रादेशिक, रज्जुक व महामात्र असे निरनिराळे अधिकारी होते.

## ७ निष्कर्ष

इ. स. पूर्वींच्या चवथ्या शतकांत इतकी सुसंबद्ध राज्यघटना पाहून कौतुक वाटतें. इंग्लंड, अमेरिका यासारख्या राजनीतिशास्त्रांत प्रथितयश व मुरब्बी असलेल्या देशांतील अद्यावत् राज्यव्यवस्थेइतपत चंद्रगुप्ताची राज्यव्यवस्था निर्दोष होती. मुलकी व लष्करी यांची व्यवस्था अलग ठेवणें, सत्तेचें केंद्रीकरण करणें, राखीव सैन्य ठेवणें इत्यादि या राज्यव्यंवस्थेचे विशेष होत. त्याचबरोबर कठोर शिक्षा व व्यक्तिस्वातंत्र्यावरील निर्बंध या दोषांकडेही दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

## उतारें

**चंद्रगुप्ताची थोरवी**— " आज ब्रिटिशांच्या प्रत्यक्ष सत्तेखालीं हिंदुस्थानांतील जितका प्रदेश आहे, त्याहून अधिक विस्तृत प्रदेशावर साम्राज्य स्थापणारा चंद्रगुप्त हा पहिलाच भारतीय राजा होय. चंद्रगुप्ताच्या राज्याची सीमा पश्चिमेस इराणला भिडली होती आणि हिरातपासून पाटलिपुत्राच्या पूर्वेलाही त्याचें राज्य पसरलेलें होतें. भारतीय राजांमध्यें विंध्य पर्वत ओलांडून दक्षिण हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापणारा हाच पहिला सम्राट होय. त्याचप्रमाणें आपल्या आयुष्याच्या पूर्वार्धांत ज्याला पाश्चात्यांच्या स्वाऱ्यांचा आणि त्यामुळें होणाऱ्या देशाच्या अवनतीचा समक्ष अनुभव आला होता असा हा पहिलाच सम्राट होय. शिकंदरानें खि. पू. ३२७ पासून ३२४ पर्यंत हिंदुस्थानांतील कांहीं प्रांत जिंकण्याचा आणि हातीं राखण्याचा प्रयत्न केला. पण त्यानंतर एकाच वर्षांत चंद्रगुप्तानें भारतांतील ग्रीक राज्याचें मुळापासून उच्चाटन केलें. ज्या नंदांच्या भीतीनें शिकंदराचें सैन्य स्वदेशीं परत जाण्याचा हट्ट धरून बसलें त्या नंदांचा असल्या दिग्विजयी सैन्याचें साहाय्य नसतांना सुद्धां चंद्रगुप्तानें सहज उच्छेद करून टाकिला. चंद्रगुप्तापासून मौर्यांच्या साम्राज्याला आणि भारताच्या अव्याहत आणि अविभाज्य इतिहासाला प्रारंभ झाला असें म्हणतां येईल. "

—**राधा कुमुद मुकर्जी**

" चंद्रगुप्त मौर्य आणि तत्कालीन परिस्थिति " ( पृष्ठ ३–४ )

## थोडक्यांत

(१) चंद्रगुप्ताचें क्षात्रकुलीनत्व—चंद्रगुप्त क्षत्रियच होता.

(२) पूर्ववृत्त—जन्म शाक्यांपैकीं मुरा नांवाच्या घराण्यांत बालपण गुराख्याकडे; चाणक्यानें विकत घेतलें; तक्षशिला येथें त्याचें सर्व शिक्षण; युद्धकला, राजनीति इ० विषयांत निष्णात झाला.

(३) मगधांतील राज्यक्रांति—चाणक्य व चंद्रगुप्त यांनीं घडवून आणिली; जुलमी नंदांचा नाश—मौर्यांचा उदय.

(४) चाणक्य—मूळ नांव विष्णुगुप्त—चणक गांवावरून चाणक्य; राजनीतिशास्त्रांत कुशल म्हणून त्यास कौटिल्य म्हणत; अर्थशास्त्राचा जनक.

(५) चंद्रगुप्ताचा राज्यविस्तार—

(अ) ग्रीकांचें उच्चाटन—युडेमॉस व सेल्यूकस यांचा पराभव.

(ब) सौराष्ट्र जिंकलें.

(क) साम्राज्य—गांधार ते बंगपर्यंतचा आर्यावर्त.

राज्यत्याग—इ. स. पू. २९८ जैन धर्माचा स्वीकार; साधू भद्रबाहुबरोबर दक्षिणेंत गमन—श्रवण बेळगोळ येथें तपश्चर्या.

(६) मेगॅस्थिनीसः—सेल्यूकसकडून चंद्रगुप्ताच्या दरबारांत आलेला ग्रीक वकील—भारताच्या परिस्थितींचें वर्णन.

(७) चंद्रगुप्ताची आदर्श राज्यव्यवस्थाः—

विशेषः—(१) राजा व प्रजा यांचे पालक-पाल्य संबंध.

(२) सल्लागार मंडळाची श्रेणीवार व्यवस्था.

विभागः—(१) राजा (२) मंत्रिमंडळ (३) उत्पन्न विभाग (४) जन-गणना (५) संरक्षण (६) हेरखातें (७) न्यायखातें (८) सार्वजनिक हिताचीं कामें

( ९ ) शेती ( १० ) प्रांतिक व स्थानिक शासनसंस्था.

निष्कर्षः—आजच्या सुधारलेल्या देशाप्रमाणें सुसंबद्ध राज्यघटना.

प्रश्नः—( १ ) चंद्रगुप्ताला मगधाची गादी कशी मिळाली ?

( २ ) चाणक्य कोण ? त्याची कामगिरी व योग्यता सांगा.

( ३ ) चंद्रगुप्ताच्या कामगिरीचें सविस्तर वर्णन करा.

( ४ ) " चंद्रगुप्ताची राज्यव्यवस्था आजच्या सुधारलेल्या देशांतील राज्यव्यवस्थेइतकी परिपूर्ण व सुसंबद्ध होती. " सिद्ध करा.

( इ ) **स्वाध्यायः**—( १ ) ' सम्राट चंद्रगुप्त '—ह. ना. आपटेकृत कादंबरी करमणूक म्हणून वाचा.

( 2 ) ' ChandraGupta and his Times "
— *by R. C. Mookerjee.*

## प्रकरण ४ थें

# राजभिक्षु अशोक ( इ. स. पू. २७३-२३७ )

( १ ) राजकीय परिस्थिति;
( २ ) बालपण व राज्यप्राप्ति;
( ३ ) राज्याभिषेक;
( ४ ) साम्राज्यविस्तार;
( ५ ) परिवर्तन;
( ६ ) बौद्धधर्म-प्रचार;
( ७ ) लोकोपयोगी कृत्यें;
( ८ ) राज्यव्यवस्था;
( ९ ) योग्यता;
(१०) मौर्यकालाचें समालोचन.

### १ राजकीय परिस्थिति

चंद्रगुप्त इ. स. पू. २९८ त राज्यत्याग करून दक्षिणेंत निघून गेल्यावर त्याचा मुलगा बिंदुसार गादीवर आला. त्याच्याविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. हा अतिशय शूर व पराक्रमी होता. त्यानें आपल्या साम्राज्याची मर्यादा दक्षिणेंत तुंगभद्रा नदीपर्यंत वाढविली. तसेंच त्यानें उत्तरेकडीलही बऱ्याच शत्रूंचा निःपात केला. त्यामुळें त्यास ' अमित्रघात ' ( शत्रूचा घात करणारा ) असें नांव मिळालें. त्याच्या दरबारांत मेगॅस्थिनीसच्यानंतर दैमाकोस या नांवाचा एक ग्रीक वकील होता. तसेंच इजिप्तचा बादशहा फिलाडेल्फस यानेंही आपला एक वकील बिंदुसाराच्या दरबारांत ठेविला होता.

कौटिलीय 'अर्थशास्त्रा'वरून चंद्रगुप्त व बिंदुसार यांच्या राज्यव्यवस्थेचें स्वरूप उत्कृष्ट तऱ्हेनें समजूं शकतें. त्या वेळचें मौर्य साम्राज्य मोठें असूनही तें

सुसंरक्षित व वैभवसंपन्न असें होतें. राज्यकारभार निरनिराळ्या खात्यांमध्यें विभागिलेला असल्यामुळें व त्या खात्यांवर प्रत्यक्ष राजाची देखरेख असल्यामुळें सुव्यवस्थित होता. विशेषतः लष्कर हें सर्वस्वीं राज्याच्या हुकमतीखालीं असल्यामुळें चंद्रगुप्त, बिंदुसार व अशोक यांच्यासारख्या महापराक्रमी व कर्तृत्ववान राजांना आपल्या साम्राज्याचा विस्तार वाढवितां आला व एकमुखी सत्ता निर्माण करितां आली.

बिंदुसाराच्या प्रधानमंडळांत चार प्रमुख प्रधान होते. त्यांच्या सल्ल्यानें तो बहुधा वागे. चंद्रगुप्ताप्रमाणें बिंदुसाराचेंही चतुरंग दळ होतें. या दळांतील सर्व मिळून सैनिकांची संख्या ७,००,००० होती. लष्करासाठीं स्वतंत्र खातें असून त्यांत पांच निरनिराळे विभाग होते. लष्कराची सर्व योजना हल्लींइतकी शिस्तवार नसली तरी ती पुष्कळच सुव्यवस्थित व सुसूत्र होती.

बिंदुसार इ. स. पू. २७३ त मरण पावला. त्या वेळीं त्याच्या राज्यांत दक्षिणेकडील कलिंग देश सोडून तुंगभद्रा नदीपर्यंतचा सर्व प्रदेश समाविष्ट होत होता. चंद्रगुप्ताच्या राज्याची सीमा नर्मदा नदी होती; तर बिंदुसारानें ती तुंगभद्रा नदीपर्यंत वाढविली.

## २ अशोकाचें बालपण व राज्यप्राप्ति

अशोक हा बिंदुसाराचा मुलगा. त्याच्या आईचें नांव सुभद्रांगी असून ती चंपा येथील एका ब्राह्मणाची मुलगी. तिला अशोक व वीताशोक हे दोन पुत्र होते. अशोकास सुशीम या नांवाचा एक सावत्र भाऊही होता.

सिंहली ( सीलोनी ) ग्रंथ असें सांगतात कीं, बिंदुसाराला १६ बायका असून त्यांपासून त्यास १०१ पुत्र झाले; अशोकानें त्यांपैकीं ९९ भावांचे खून केले; फक्त सर्वांत धाकटा भाऊ तिष्य याला त्यानें जिवंत ठेविलें. परंतु ही दंतकथा साफ खोटी आहे. कारण अशोकाच्याच शिलालेखावरून त्याचीं भावंडें त्याच्या कारकीर्दीच्या मध्यभागापर्यंत जिवंत होतीं; इतकेंच नव्हे तर, अशोकाला त्यांच्या भेटीची तळमळ लागलेली असे, हें स्पष्ट दिसतें. त्यावरून रक्ताच्या थारोळ्यांतून अशोकानें राज्यसिंहासनाचा मार्ग आक्रमिला असेल हें वस्तुस्थितीला सोडून आहे. बालपणीं तो द्वाड होता; आणि त्याचीं सर्वांशीं भांडणें होत हें खरें

आहे. बिंदुसारानें अशोकाच्या द्वडपणाला चांगलें वळण देऊन त्यास पराक्रमी व युद्धकलेंत निष्णात बनविलें होतें. अशोकाच्या युद्धकलानैपुण्याचें प्रत्यंतर बिंदुसारास आलेलें होतें. एकदां बिंदुसार गादीवर असतांना तक्षशिला येथें मोठें बंड झालें. तें मोडण्यासाठीं बिंदुसारानें प्रथम आपला वडील मुलगा सुशीम यास पाठविलें; परंतु त्याला त्या कामीं अपयश आलें. त्यानंतर अशोकाची त्या कामगिरीवर रवानगी झाली. अशोकानें थोड्याच दिवसांत तें बंड मोडून सर्वत्र शांतता प्रस्थापित केली. या त्याच्या कामगिरीमुळें बिंदुसाराला त्याच्या कर्तृत्वा–विषयीं विश्वास वाटूं लागला. आणि त्यानें त्यास उज्जयिनी येथें राजप्रतिनिधी म्हणून पाठविलें. त्याही कामांत अशोकानें आपलें विशेष कर्तृत्व प्रगट केलें. त्या वेळीं बिंदुसाराचा प्रधान राधागुप्त या नांवाचा होता. राधागुप्तानें राजाला अशोकासच आपला वारस नेमण्याची शिफारस केली. राजानें ती मान्य करून अशोकानें आपल्यानंतर गादीवर बसावें व सुशीमानें तक्षशिलेचा प्रांताधिकारी म्हणून काम पाहावें अशी योजना केली.

## २ राज्याभिषेक

बिंदुसारानें ठरवून दिलेल्या योजनेप्रमाणें अशोक मगधाच्या गादीवर बसला. परंतु तक्षशिला येथें असलेला त्याचा वडील भाऊ सुशीम यानें स्वतःस गादी मिळावी म्हणून अशोकाविरुद्ध बंड केलें. व तो पाटलिपुत्रावर चालून आला; अशोकानें त्याचा नायनाट केला; आणि आपलें राज्यपद निर्वेध केलें. सुशीमाच्या वतीनें इतर कांहीं लोकांनींही अशोकाच्याविरुद्ध उठावणी केली. परंतु तीही त्यानें तेव्हांच मोडून काढली. विरोधकांचा हा विरोध नाहींसा करण्यांतच त्याचीं चार वर्षें गेलीं हें त्याच्या राज्याभिषेकाच्या सनावरून लक्षांत येतें. त्यानें सर्वत्र शांतता प्रस्थापित होतांच इ. स. पू. २६९ त स्वतःस मोठ्या वैभवानें राज्याभिषेक करून घेतला.

वरील माहितीवरून एक गोष्ट स्पष्टपणें ध्यानांत येईल कीं, अशोकाला मुद्दाम रक्तपात करण्याची आवश्यकता नव्हती. प्रत्यक्ष पित्याकडूनच त्याची राज्यपदावर नेमणुक झाली होती. संभाव्य वारसदारांची कत्तल करण्याची व त्यांना नष्ट करून गादी बळकविण्याची हांव अशोकाला होती असा नाहक आरोप

त्याच्यावर केला जातो; परंतु तो चूक आहे हें आतां सिद्ध झालेंच आहे. आणखी एका कथेवरून अशोकाच्या मोठ्या मनाची साक्ष पटते. ती कथा अशी.

सुशीम ज्या वेळीं बंडांत ठार झाला, त्या वेळीं त्याची पत्नी गरोदर होती. बंडाळीच्या वेळीं ती पाटलिपुत्राच्या बाहेर पळून गेली आणि अस्पृश्यांच्य वसतींत लपून राहिली. त्या अस्पृश्यांच्या मुख्याला तिची दया येऊन त्यानें तिला मोठ्या ममतेनें वागविलें. थोडक्याच दिवसांत ती प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. त्याचें नांव तिनें निग्रोध असें ठेविलें. जन्मतःच त्या मुलाच्या तोंडावर पावित्र्याचें विशेष तेज चमकत होतें. तो सात वर्षांचा असतांनाच मोठा साधु म्हणून प्रसिद्धीस आला.

त्या साधुमुलाच्या राजकुलाविषयीं कुणालाच माहिती नव्हती. एकदां तो पाटलिपुत्रांत अशोकाच्या राजवाड्यावरून जात असतां अशोकाच्या दृष्टीस पडला. त्या तेजस्वी मुलाला पाहून अशोकाला अतिशय हर्ष झाला. त्यानें त्याला राजवाड्यांत बोलावून घेतलें. राजा त्याच्यावर खूष होऊन म्हणाला, “ बाळ ये, तुला पाहिजे त्या असनावर बैस. ” निग्रोधानें निःसंकोचपणें राजसिंहासनाकडे आपली दृष्टि वळवून त्यावर बसण्यासाठीं तो तिकडे निघाला. अशोकानें त्याचा हेतु जाणून त्यास स्वतःच्या हातानें आपल्या सिंहासनावर नेवून बसविलें; व त्याचा मोठ्या आदरपूर्वक सन्मान केला. असें म्हणतात कीं, अशोकानें पुढें त्याचें शिष्यत्व पत्करिलें. या गोष्टीवरून अशोकाच्या मोठ्या मनाची साक्ष पटते. त्यामुळें त्यानें राजपदासाठीं कत्तल केली असेल हें शक्य वाटत नाहीं.

## ४ साम्राज्यविस्तार

अशोकाच्या कारकीर्दीच्या पहिल्या कांहीं वर्षांत महत्त्वाची अशी कोणतीच घटना घडून आली नाहीं.वाडवडिलांनीं मिळवून ठेविलेल्या साम्राज्याचा मनमुराद उपभोग घेत, कधीं शिकार करीत तर कधीं मित्रमंडळीच्या सहवासांत मेजवान्या झोडीत व नृत्यगायनादि कलांचा आस्वाद घेत अशोकानें कांहीं वर्षें घालविलीं. मात्र त्याची वर्तणूक पापमय किंवा अश्लाघ्य असल्याबद्दलचे

दाखले आढळंत नाहींत. त्याचा आहार क्षत्रियाच्या आहाराप्रमाणें मद्यमांसंयुक्त असे, यावरून तो सनातनधर्मी शैवपंथी असावा असें दिसतें.

साम्राज्यविस्ताराच्या दृष्टीनें एकच युद्धप्रसंग त्यास करावा लागला. तो म्हणजे कलिंग देशाशीं युद्ध हा होय. या युद्धानंतर त्याच्या सर्व जीवनालाच कलाटणी मिळाली. हा लढवय्या क्षत्रिय बौद्ध भिक्षु बनला व पुढील सर्व आयुष्य त्यानें बौद्ध-धर्माचरणांत घालविलें.

**कलिंगाशीं युद्ध** ( इ. स. पू. २६१ )—कलिंगाशीं युद्ध हा प्रसंग म्हणजे जगाच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहिलेली एक क्रांतिकारक घटना होय. या युद्धकथेचा पराक्रमी नायक सम्राट अशोक. तेव्हांपासून अखिल जगताच्या अंतकरणांत तो एक तेजस्वी पुरुष म्हणून कायमचा विराजमान झाला. सत्य व मानवता या दोन उच्च तत्त्वांची शिकवण जगाला देऊन अखिल मानवजातीला सुखी करण्यांत अशोकानें आपलें जीवनसर्वस्व खर्च केलें ही प्रेरणा त्याला कलिंग-युद्धामुळें मिळाली. म्हणून हा युद्धप्रसंग महत्त्वाचा मानिला जातो. या युद्धाची थोडक्यांत हकीकत अशी.

गोदावरी व महानदी यांच्या दरम्यान कलिंग नांवाचा एक स्वतंत्र देश होता. हा देश आकारानें जरी लहान होता तरी त्यांतील लोक कर्तृत्वानें फार मोठे होते. आतांपर्यंत या देशाचें स्वातंत्र्य कोणीही महत्त्वाकांक्षी राजा नष्ट करूं शकला नव्हता. कारण या देशांतील लोक स्वातंत्र्यनिष्ठ, सुसंघटित व कसलेले सैनिक होते. ते स्वातंत्र्याची किंमत प्राणाहूनही जास्त मानीत. आपसांत भांडून परकीयांना आपल्या राज्यांत प्रवेश करूं देण्याची संधी त्यांनीं केव्हांच दिली नाहीं. हा कलिंग देश अत्यंत सुपीक असून, त्या वेळीं तर तो अत्यंत ऐश्वर्यसंपन्न होता. असा हा समृद्ध देश आपल्या साम्राज्यांत नसावा याचें अशोकास वैषम्य वाटे. त्यामुळें त्यानें कलिंगावर स्वारी करण्याची जंगी तयारी केली. इ. स. पू. २६१ त तो कलिंगावर चालून गेला.

कलिंगाच्या स्वातंत्र्यप्रेमी लोकांनीं आपल्या चिमुकल्या देशाच्या रक्षणासाठीं आपलें सर्व सामर्थ्य रणांगणांत आणून पणास लाविलें. ६०,००० पायदळ २००० घोडेस्वार व ७०० हत्ती एवढें कलिंगाचें सैन्य होतें; परंतु मौर्यांच्या

अफाट सामर्थ्यापुढें हें सामर्थ्य मुंगीसारखें होतें ! कलिंगाचा राजा खारवेल याचा या लढाईत पराभव झाला हें सांगणें नकोच. मात्र कलिंगांनीं या लढाईत दाखविलेला स्वाभिमानी बाणा कौतुकास्पद होता. अशोकानेंच आपल्या शिला-लेखांत लिहील्याप्रमाणें " या लढाईत एक लक्ष माणसें ठार झालीं, दीड लक्षांवर कैद करण्यांत आलीं आणि यांच्या कितीतरी पटीनें अधिक माणसांचा इतर रीतीनें संहार झाला. " यावरून कालिंगांनीं आपल्या स्वातंत्र्यासाठीं कितीं बळी दिले याची कल्पना करितां येईल. अशोकाच्या सामर्थ्यांपुढें त्यांचा निभाव लागला नाहीं व त्यांना हार खावी लागली. अशोकाच्या अभूतपूर्व यशाच्या दुंदुभि सर्वत्र झडूं लागल्या; व इतर भारतीय राजांचा भीतीनें थरकांप उडाला. भराभरा ते त्यास शरण येऊं लागले. दक्षिणेकडील चेर, चेल, पांड्य इ. व वायव्य सरहद्दीवरील राजे त्याचे मांडालिकें बनले. लंका, कामरूप, इजिप्त इ. देशांच्या राजांनीं त्याच्याशीं स्नेहसंधि करण्यासाठीं आपापले वकील पाठविले.

**अशोकाचें साम्राज्य:**–उत्तरेस हिंदुकूश पर्वतापासून दक्षिणेंत म्हैसूर-पर्यंत अशोकाचें साम्राज्य पसरलें होतें. कामरूप ( आसाम ) हा देश त्याच्या साम्राज्यांत प्रत्यक्षपणें समाविष्ट नव्हता. गांधार, काश्मीर, नेपाळ, अंग, वंग, मगध, कलिंग, देवराष्ट्र इ. सर्व प्रमुख देश त्याच्या साम्राज्यांत मोडत होते. अशोकाचें साम्राज्य हेंच पहिलें ऐतिहासिक भारतीय साम्राज्य होय.

**युद्धाचे परिणाम–**१ अखिल भारतीय साम्राज्य निर्माण झालें. २ अशोकाचा सर्वत्र दरारा वाढला. ३ मात्र या युद्धामुळें अशोकाचें हृदय-परिवर्तन झालें.

## ५ परिवर्तन

युद्धानंतर अशोक कलिंगाची पाहाणी करीत असतां तेथील कैक भयानक देखावे त्याच्या दृष्टीस पडले. या युद्धामुळें व त्यांतून उद्‌भवलेल्या रोगराईमुळें असंख्य लोकांचा झालेला संहार त्यानें पाहिला. हजारों कुटुंबांची झालेली धुळधाण त्याला प्रत्यक्ष दिसली. जिकडे जाईल तिकडे आक्रोश, विधवांचे हंबरडे व याशिवाय पोरक्या पोरांच्या करूण किंकाळ्या त्याच्या कानीं आल्या. युद्धांत लंगडे, पांगळे, अपंग झालेले असंख्य लोक त्यानें पाहिले.

एके काळीं सृष्टिसौंदर्यानें नटलेला तो प्रदेश युद्धामुळें उजाड झालेला त्याला दिसला. मैलच्या मैल हिंडूनही धान्याचा कण त्याला आढळला नाहीं. या सर्व दृश्यांचा त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला. एवढा पराक्रमी व कठोर अंत:करणाचा अशोक पण तोही या दुःखपूर्ण देखाव्यांनीं विरघळला. आपण आपल्या क्षुल्लक स्वार्थासाठीं नाहक ही दुर्दशा केली, हें जाणून त्याला फार पश्चाताप झाला. रक्तपाताला त्याचें मन पूर्णपणें विटलें व यापुढें हातांत शस्त्र न धरण्याची त्यानें प्रतिज्ञा केली. मगधाला परत आल्याबरोबर त्यानें सर्व राज्य-वैभवाच्या प्रतीकांचा त्याग करून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. मूळच्या अशोकाच्या अत्याचारी कृतींत क्रांति घडून आली. अशोक मनानें निर्मळ, शांत व पवित्र बनला.

श्री. सत्यनाथ अय्यर म्हणतात कीं, " अशोकानें यापुढील आपल्या आयुष्याला पावित्र्याचा उजळा देऊन आपलें व्यक्तिमत्व इतकें प्रखर केलें कीं, तो बौद्ध तत्त्वांचें मूर्तिमंत प्रतीक बनला ! "

## धर्मप्रचार

( १ ) इ. स. पू. २६१. अशोक बौद्ध उपासक बनला. अडीच वर्षांनंतर तो बौद्ध भिक्षु अथवा भिक्षुगतिक बनला.

( २ ) इ. स. पू. २५९ त त्यानें राज्यांतील सर्व शिकार बंद करविली.

( ३ ) क्षत्रिय असल्यामुळें अशोक मांसाहारी होता, परंतु मुक्या प्राण्यांची नाहक हत्या करणें पाप आहे असें समजून त्यानें राजवाड्यांतील हिंसा थांबविली.

( ४ ) बौद्ध धर्माच्या तत्त्वांचें सम्यग् ज्ञान मिळविण्यासाठीं पवित्र बौद्ध क्षेत्रांची त्यानें यात्रा केली. बुद्धगया, कपिलवस्तु, सारनाथ, प्रवस्ती, कुशीनगर इ० ठिकाणीं यात्रेकरूंच्या वेषांत तो गेला. अनेक पंडितांकडून त्यानें धम्मा ( धर्म ) ची माहिती मिळविली.

( ५ ) यात्रा चालू असतांना तत्कालीन बौद्धपंडितांत श्रेष्ठ असलेल्या उपगुप्त नांवाच्या पंडिताशीं त्याची गांठ पडून त्यानें त्याचें शिष्यत्व पत्करलें.

(६) बौद्ध तत्त्वांचा अशोकाच्या मनावर चांगलाच पगडा बसला; व तो स्वतः त्याचा प्रचारक बनला. मॅसिडोनिया ते चीनपर्यंतच्या सर्व देशांत त्यानें आपले प्रचारक पाठवून बौद्ध धर्माचा भारताबाहेरही प्रसार केला. भारतांत तर त्याचे प्रचारक कानाकोपऱ्यांत पसरलेले होते. अशोकानें सुमारें ६४,००० प्रचारक ठिकठिकाणीं पाठविले. त्यांच्यासाठीं त्यानें बांधलेल्या मठांची संख्याच ८०,००० चे वर होती. या प्रचारकांत त्याचीं मुलें महेंद्र व संघमित्रा हींही असून तीं प्रचारक म्हणून लंकेंत गेलीं होतीं.

(७) या सर्व प्रचारकांत एक वाक्यता असावी आणि बौद्ध प्रचारकाच्या संघांना बळकटी यावी या हेतूनें त्यानें पाटलीपुत्र येथें सर्व भिक्षूंची एक मोठी परिषद् भरविली. उपगुप्ताच्या अध्यक्षतेखालीं ही परिषद् सतत नऊ महिने चालली होती. याच परिषदेंत बौद्ध तत्त्वांचा संग्रह असलेल्या 'त्रिपिटकां'ची नवी आवृत्ति काढण्यांत आली.

(८) डोंगर, खडक असतील तेथें त्यांवर, नसतील तेथें स्तंभ व स्तूप उभारून अशोकानें बौद्ध धर्माच्या आज्ञा कोरून ठेविल्या आहेत. सारनाथ, पेशावरजवळ शहाबादगड, सोपारा, गिरनार, धौली, जामगड, अयोध्या इ० अनेक ठिकाणीं अशोकाचे स्तूप व स्तंभ सांपडले आहेत.

(९) याशिवाय बुद्धगयेसारख्या क्षेत्राच्या ठिकाणीं त्यानें भिक्षूंसाठीं संघाराम बांधिले. पाटलीपुत्र येथें त्यानें बांधिलेले अशोकाराम व कुक्कटाराम हे मठ प्रसिद्ध आहेत.

(१०) अशोकाच्या चौदा आज्ञा आहेत. त्यांत सत्य, अहिंसेचें पालन व धर्माचरण यांचा मुख्यत्वेंकरून उल्लेख आहे.

## लोकोपयोगी कृत्यें

अशोक आपल्या प्रजेस स्वतःचीं मुलें म्हणवी व या आपल्या मुलांवर तो कोणत्याही स्वरूपाचा जुलूम होऊं देत नसे. प्रत्येकानें आपल्या धर्मप्रमाणें वागून कोणाही प्राणिमात्रास त्रास न देतां दयेनें वागावें असें त्याचें मुख्य तत्त्व बनलें. तो आपल्या अधिकाऱ्यांना शांतीनें व दयाधर्मानें वागण्याच्या आज्ञा देत असे व या बाबतींत त्याची शिस्त अतिशय कडक होती. कलिंगाच्या

युद्धानंतर अशोकानें आपली कारकीर्द बौद्ध धर्माच्या प्रचारासाठीं व प्रजेच्या कल्याणासाठीं घालविली. प्रजेची सर्वांगीण उन्नति व्हावी यासाठीं त्यानें अनेक महत्त्वाच्या गोष्टी केल्या.

( १ ) सत्यधर्माचें पालन करून प्रत्येकानें आत्मोन्नति साधावी यासाठीं त्यानें ठिकठिकाणीं धर्माज्ञा कोरून ठेविल्या.

( २ ) प्रवाश्यांच्या सोयीसाठीं त्यानें सुंदर सडका बांधिल्या; सडकेच्या कडेनें दुतर्फा छायेसाठीं झाडें लाविलीं. दर दोन कोसांवर विहिरी खोदल्या, पाणपोईची व्यवस्था केलीं आणि जागोजाग धर्मशाळा बांधिल्या.

( ३ ) पाटलीपुत्रासारख्या मोठमोठ्या शहरांतून त्यानें पाण्यासाठीं विस्तीर्ण तलाव बांधिले. सुदर्शन या नांवाचा एक सुंदर तलाव त्यानें बांधिल्याचें सांगतात.

( ४ ) अशोकानें माणसांसाठीं व पशूंसाठीं मोफत दवाखाने काढले. या दवाखान्यांतून योग्य, मुबलक व शुद्ध औषधांचा पुरवठा व्हावा म्हणून औषधी वनस्पतींच्या बागा लाविल्या. पशूंसाठींही दवाखाने काढणारा हा पहिला सम्राट् होय.

( ५ ) प्रजेच्या शारीरिक शिक्षणाकडे त्यानें विशेष लक्ष घातलें.

( ६ ) चंद्रगुप्ताच्या वेळीं सामान्य गुन्ह्याबद्दलही अतिशय कडक शिक्षा असत. अशोकाच्या राज्यकारभाराची उभारणी ह्या धर्मावरच केलेली असल्यानें शिक्षांचें पूर्वीचें कठोर स्वरूप कायम राहणें शक्य नव्हतें. अशोकानें कठोर शिक्षा रद्द केल्या, फांशीची शिक्षा तर अजिबात रद्द केली.

( ७ ) अशोकानें शिक्षणाला उत्तेजन देण्यासाठीं तत्कालीन विश्वविद्यालयांना व पाठशाळांना भरपूर मदत केली. त्याच्या प्रजेचें साक्षरतेचें प्रमाण सांप्रतच्या हिंदी लोकांच्या साक्षरतेच्या प्रमाणापेक्षां जास्त होतें असें स्मिथ म्हणतो.

( ८ ) अशोकानें काश्मीरमधील श्रीनगर व नेपाळमधील देवपाटण हीं शहरें वसविलीं.

(९) अशोकानें कलेला उत्तेजन दिलें. शिल्पकला, चित्रकला, कोरींव काम इ० गोष्टी त्याच्या कारकीर्दींत बऱ्याच पुढें आल्या. सारनाथ येथील खांबाच्या चार सिंहाचें मथळ्याचें काम सर्व जगांत पहिल्या प्रतीचें आहे. अशोकाचे शिलास्तंभ ४० फूट उंचीच्या गुळगुळीत व एकसांधि दगडाचे आणि उत्तम कारागिरीचे आहेत. मांवांतील शिलालेखांच्या शिला तर कांचेप्रमाणें चकचकित आहेत.

सारांश, अशोकाच्या वेळीं शिल्पकला व चित्रकला पूर्णावस्थेंत गेलेल्या होत्या.

## ८ राज्यव्यवस्था

(अ) **राज्यविस्तारः**—अशोकाचें साम्राज्य जवळ जवळ सर्व हिंदुस्थानभर पसरलें होतें; हें आपण वर पाहिलेंच आहे. उत्तरेकडे हिंदुकुश ते हिमालय पर्वताच्या दरम्यानचा सर्व प्रदेश आणि दक्षिणेकडे तुंगभद्रा नदीपर्यंतचा प्रदेश त्याच्या साम्राज्यांत मोडत असे. अशोकाच्या साम्राज्याचा विस्तार ब्रह्मदेश वगळल्यास ब्रिटिश हिंदुस्थानापेक्षांही अधिक मोठा होता.

(नकाशा क. ४)

अशोकाची मुख्य राजधानी पाटलीपुत्र येथें असून मधून मधून त्याचें वास्तव्य श्रीनगर किंवा उज्जैनी येथेंही असे.

**ध्येयः**—प्रजेला व्यावहारिक, नैतिक आणि अध्यात्मिक उच्च दर्जा प्राप्त व्हावा यासाठीं अर्थशास्त्रांत वर्णिल्याप्रमाणें 'परोपकारी राज्यसत्ता' स्थापन करणें हें अशोकाचें ध्येय होतें. प्रजासुखांत राजाचें सुख व प्रजेचें हित हेंच राजाचें हित हें त्याचें ब्रीद होतें. प्रजेच्या हितासाठीं तत्पर राहाण्याची त्याच्या सर्व अधिकाऱ्यांना त्याची सदैव ताकीद असे.

**स्वरूपः**—चंद्रगुप्ताच्या राज्यव्यवस्थेसंबंधीं ज्याप्रमाणें मेगॅस्थेनीसच्या ग्रंथावरून सर्व माहिती कळूं शकते त्याप्रमाणें अशोकाच्या शिलालेखांवरून त्याच्या राज्यव्यवस्थेवर बराच प्रकाश पडतो. राजाची सत्ता सर्वश्रेष्ठ असून इतर सर्व विभाग त्याच्या संपूर्ण हुकमतीखालीं असत. राजाच्या आज्ञा प्रजेकडून पाळून घेण्यासाठीं एक मंडळ असे; व तें मंडळ राजप्रतिनिधींच्या हुकमतीखालीं

काम पाही. हे राजप्रतिनिधी बहुधा राजपुत्र किंवा राजानें नेमून दिलेले राजघराण्यांतील पुरुष असत.

अशोकाचें साम्राज्य बरेंच वाढलेलें असल्यामुळें प्रादेशिक विभाग व त्यांमधील राजप्रतिनिधी यांची संख्या वाढली. चंद्रगुप्ताच्या साम्राज्याचे चार विभाग होते. अशोकाच्या साम्राज्याचे सहा विभाग पाडण्यांत आले.

| | | |
|---|---|---|
| ( १ ) मगध:— | राजधानी— | पाटलीपुत्र |
| ( २ ) तक्षशीला:— | ,, | तक्षशीला |
| ( ३ ) पश्चिम विभाग:— | ,, | उज्जैनी |
| ( ४ ) कलिंग:— | ,, | कालिंग |
| ( ५ ) सुवर्णगिरी:— | ,, | सुवर्णगिरी |
| ( ६ ) तोसली:— | ,, | |

या प्रत्येक विभागावर एक राजप्रतिनिधी असे. याशिवाय 'रज्जुक' ( प्रांताधिकारी ), 'प्रादेशिक' ( जिल्हाधिकारी ), नगरक ( नगराध्यक्ष ), गोप ( ५–१० ग्रामांचा अधिकारी ) व ग्रामणी ( मशिल ) असे निरनिराळे स्थानिक अधिकारी होते.

**विभाग:—( १ ) धर्मपालन विभाग:—**अशोकानें हा एक स्वतंत्र विशेष विभाग निर्माण केला होता. प्रजेचीं दुःखें समजून घेणें, त्यांच्या अडचणींत त्यांना मदत करणें, धर्म शिकविणें व त्यांच्याकडून तो आचरून घेणें, राजकुलांतील स्त्रियांचें रक्षण करणें, इत्यादि महत्त्वाचीं कामें या विभागांतील अधिकाऱ्यांना सांगण्यांत आलीं होतीं. प्रजेकडून सद्धर्माचें पालन व्हावें आणि प्रजेला कसलाही उपसर्ग पोहोंचूं नये हें पाहण्याचें या विभागाचें मुख्य काम होतें. या विभागांत एकूण २५० अधिकारी असून त्यांना 'धर्ममहामात्र' 'वचभूमीक' आणि 'रज्जुक' अशीं नांवें होतीं. स्वतः राजा या सर्व अधिकाऱ्यांची एक विशेष सभाही घेत असे.

( २ ) **लष्कर विभाग:—**चंद्रगुप्ताप्रमाणें अशोकाजवळही प्रचंड खडें सैन्य होतें. त्याच्या सैन्यांत ६,००,००० पायदळ, ३०,९०० घोडेस्वार

९,००० हत्ती व शिवाय रथही होते. अशोकाचा सैन्यविभाग अत्यंत सुसंघटित असा होता.

या विभागाचें काम पहाण्यासाठीं ३० सभासदांचें एक युद्धमंडळ असे व या मंडळाचीं प्रत्येकीं पांच सभासदांचें अशीं सहा उपमंडळें होतीं. हीं ( १ ) आरमारदळ ( २ ) वाहातुकदळ ( ३ ) पायदळ ( ४ ) घोडदळ ( ५ ) रथदळ ( ६ ) गजदळ याप्रमाणें होतीं. शस्त्रें सांठवून ठेवण्यासाठीं अनेक शस्त्रागारें असत व घोडे, हत्ती ठेवण्यासाठीं पागा असत.

याशिवाय उत्पन्न विभाग, खानेसुमारी, हेरखातें, न्यायखातें ( शिक्षा सौम्य करून पुनर्घटना केलेलें ), सार्वजनिक हिताचीं कामें, शेती व उद्योगधंदे इ. विभाग चंद्रगुप्तानें घालून दिलेल्या पद्धतीप्रमाणेंच कामें करीत होते. त्यांत कोणत्याही स्वरूपाचा बदल अशोकानें केला नाहीं.

## ९ योग्यता

“ जगाचा इतिहास लिहिणारे इतिहासकार अलेक्झांडर, ज्यूलियस सीझर यांसारख्या जगद्विख्यात पुरुषश्रेष्ठांच्या मालिकेंत अशोकास अग्रस्थान देतात. त्यांच्या मतें अशोकाचें चारित्र्य अगदीं निर्दोष होतें. मानवी इतिहासांत राजभिक्षु म्हणून अशोकाचें नांव अजरामर झालें आहे. महत्त्वाकांक्षी आक्रमक होण्याच्याऐवजीं मानवी जीविताच्या सफलतेसाठीं त्यानें सम्राट्पदावर असूनही आपलें जीवनसर्वस्व वेंचलें, या एकाच गोष्टीमुळें अशोक अमरपदास पात्र ठरतो. ” असें प्रख्यात इतिहासकार सत्यनाथ अय्यर म्हणतात.

अशोकानें ४० वर्षें राज्यकारभार केला. इ. स. पू. २३२ त तो तक्षशीला येथें मरण पावला. अशोकाला ४ राण्या होत्या. त्यांपैकीं असंधिमित्रा या नांवाची राणी विदिशा येथील एक वैश्य स्त्री होती. तिला महिंद्र व संघमित्रा हीं दोन अपत्यें झालीं. हीं दोन्हीं मुलें लंकेंत धर्मप्रचारक म्हणून गेलीं व तिकडेच त्यांचा अंत झाला. दुसरी राणी ‘ कारुवाकी ’ ही सर्वांत त्याची आवडती होती. तिला ‘ तीवर ’ नांवाचा मुलगा झाला पण तो बापापूर्वींच मरण पावला. याशिवाय त्याला ‘तिष्यरक्षिता’ या नांवाची एक राणी होती. अशो

फार पुष्कळ मुलगे होते असें सांगतात. परंतु त्याच्या मृत्यूनंतर त्याचा नातू दशरथ गादीवर आला. यावरून त्याच्या मुलांचें काय झालें तें समजत नाहीं.

भारतीय इतिहासांतच नव्हे तर जगाच्याही इतिहासांत श्रेष्ठ राजांच्या नामावळींत अशोकाचें नांव अग्रगण्य आहे. अशोक हा सम्राट् होता; त्याचें साम्राज्य तुंगभद्रा नदीपासून उत्तरेकडे खोतानपर्यंत पसरलेलें होतें. ग्रीक, चिनी इ. दूरचे वकील त्याच्या दरबारांत स्वत: होऊन स्नेहसंधि करण्यासाठीं आलेले; विद्वान् पंडितांनीं राजदरबार मंडित केलेला; सत्य, धर्म, दया, शांति या सर्वांचें अधिष्ठान होऊन राहिलेलें पवित्र सिंहासन; प्रजेच्या हिताशीं एकरूप होणारे अधिकारी; सर्व दृष्टीनें सुखी असलेली प्रजा अशा या सर्व गोष्टी संकलितपणें सहसा एकत्र सांपडत नाहींत. अशोक याला अपवाद ठरून त्याचें स्थान जगाच्या इतिहासांत अक्षय्य सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेविलेलें राहील. आपल्या प्रजेच्या अंत:करणांत तर त्यानें आपल्या थोर कृत्यांनीं व उदात्त आचरणानें आपलें स्थान अढळ करून ठेविलें होतेंच. तलवारीच्या जोरावर साम्राज्य संपादणारे व राखणारे अनेक पराक्रमी राजे जगाचे पाठीवर होऊन मेले. पण तत्त्वज्ञान व प्रजावात्सल्य यांच्या जोरावर केवळ भारतांतच नव्हे तर भारताच्या बाहेरही साम्राज्य स्थापन करणारा व विश्वाचें मन जिंकणारा अशोकासारखा सम्राट् विरळाच.

## १० मौर्यकालाचें समालोचन

अशोकानंतर त्याचा नातू दशरथ मगधाच्या गादीवर आला व दुसरा नातू संप्रति हा उज्जैनी येथें स्वतंत्र राजा झाला. अशोकाच्या मृत्यूनंतर त्याच्या एकमुखी साम्राज्याचें स्वरूप फार काळ टिकूं शकलें नाहीं. पुढील मौर्य राजे दुर्बल ठरल्यामुळें मौर्य घराण्यांतील शेवटचा राजा बृहद्रथ गादीवर असतांना त्याचा सेनापति ‘ पुष्यमित्र शुंग ’ यानें त्याच्या विरुद्ध बंड केलें व त्याला ठार मारून मगधाची गादी बळकाविली. इ. स. पू. ३२२ ते इ. स. पू. १८५ या काळांत मौर्य राजांनीं भारताची धार्मिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या चांगलीच उन्नती केली. मौर्य काल हा भारताच्या वैभव संपन्नतेचा काळ होय.

१ **धार्मिकः**—मौर्य काळांत बौद्ध धर्माचा जगभर प्रसार झाला. त्यांतल्या त्यांत ह्या धर्माचा प्रसार सिरीया, इजिप्त, मॅसिडोनिया, चीन वगैरे सारख्या अत्यंत दूरच्या देशांत मौर्य राजांनीं निरनिराळे प्रचारक पाठवून केला. याच काळांत जैन धर्माचाही विकास झाला. संप्रति हा जैन धर्माचा अभिमानी होता. याच काळांत जैन पंथाचे दिगंबर व श्वेतांबर हे दोन पंथ झाले. मौर्य कालाचे कांहीं वर्षांत मथुरा व प्रयाग येथें ब्राह्मणधर्मीयांसी प्रचारकांनीं शैव व वैष्णव धर्माचा प्रसार केला.

२ **आर्थिकः**—( अ ) उत्पन्नाची व्यवस्था व्हावी यासाठीं गांवांचें वर्गीकरण करण्यांत आलें होतें. ग्रामपंचायतीची पद्धति चालू असून गोप नांवाचे अधिकारीही नेमण्यांत आले होते. एकंदरींत गांवांची स्थिती चांगली होती. राज्यांत शहरांची संख्या मोठी असून पाटलीपुत्रासारखीं प्रमुख शहरें सर्व सुखसोयींनीं सुसज्ज होतीं. शहरें बहुधा तटबंदिस्त असत. रस्त्यांच्या बाजूंनीं सांडपाण्याची व्यवस्था असून स्वच्छतेच्या इतर सोयीही होत्या.

( ब ) शेतीचें उत्पन्न फार मोठें असून शेतीला सर्व तऱ्हेनें उत्तेजन दिलें जात असे. धान्याखेरीज ऊंसाच्या लागवडीलाही प्रोत्साहन दिलें जात असे. जंगलाचें उत्पन्नही चांगलें येत होतें.

( क ) **उद्योगधंदे व व्यापारः**— खाणींत काम करणें, विणकाम, दारू तयार करणें, जहाजें बांधणें इ० धंदे भरभराटींत असून सुतारकाम व खोदकाम धंद्यांच पाऊलही प्रगतिपथावरच होतें. चांभार, रंगारी, कुंभार, कोळी, साखरेचे कारखानदार इत्यादिकांचे धंदे अस्तित्वांत होते. चंद्रावरील डागाप्रमाणें ह्या वैभवसंपन्न व सुव्यवस्थित अशा राज्यांत गुलामगिरीची पद्धति चालू होती. अंतर्गत व्यापार नद्यांमधून जलमार्गानें आणि जमिनीवरून चाले. पाटलीपुत्रापासून तक्षशीलेपयत मोठी सडक होती. व्यापाऱ्यांसाठीं रस्त्यावरसुद्धां सर्व सुखसोयी होत्या. दक्षिणकडे हिरे, मोतीं, सोनें इ.चा व उत्तरेकडे घोंगड्या, कातडीं व घोडे इ. चा व्यापार चालू होता. आयात व निर्यात व्यापारावर मात्र कडक नियंत्रण असून व्याजाचा दर शें. १५% होता.

( ड ) चैनीच्या व सुखसोयींच्या बाबतींत तर हें राज्य फारच पुढारलेलें

होतें. सुंदर कपडे व सोन्याचे दागिने वापरण्यांत येत असत. सर्व तऱ्हेच्या करमणुकींचीं साधनें असून गायनशाळा व नृत्यशाळाही अस्तित्वांत होत्या.

३ **सामाजिकः**— ( अ ) आंतरजातीय विवाहांना परवानगी होती. त्यामुळें व धंद्याच्या वाढीमुळें जाती वाढल्या. त्यामुळें अत्यंत गुंतागुंती होऊन जिकडे तिकडे 'सवगोलंकार' माजून राहिला होता. शूद्र राजेही गादीवर आल्यानें राजा हा क्षत्रियच असला पाहिजे या कल्पनेला धक्का बसला. चाणक्याच्या कर्तबगारीमुळें एकंदर ब्राम्हणांना महत्त्व आलें.

( ब ) स्त्रियांना भरपूर स्वातंत्र्य असून पुनर्विवाहासही मान्यता होती.

४ **सांस्कृतिकः**— (अ) भाषेच्या बाबतींत धार्मिक व वाङ्मयीन उपयोगाकरतां संस्कृत भाषा प्रचारांत असून प्राकृत व पाली या भाषाही अस्तित्वांत होत्या.

(ब) या काळांतील वाङ्मयप्रगति म्हणजे सूत्रपद्धतीनें सटीक असलेला राजनीतिग्रंथ या काळांत लिहिला गेला. त्याचप्रमाणें अर्थशास्त्र, धर्मसूत्रें, कथावस्थु, अशोकाचे आदेश हेही ग्रंथ तत्कालीनच होत.

(क) हा काळ शिक्षणाच्या बाबतींतही पुढारलेला असून तक्षशीला येथील विद्यापीठ फार प्रसिद्ध होतें. तेथें तत्त्वज्ञान, वेद, वर्तै आणि दंडनीति हीं चार शास्त्रें शिकविण्यांत येत.

(ड) चंद्रगुप्त व अशोक यांच्या कारकीर्दींत शिल्पकलेचा विकास होऊन शिल्पकलेंत उच्चांक गांठलेली पाटलीपुत्र येथील खोदकामें, ठिकठिकाणचे स्तूप, स्तंभही याच काळांत अस्तित्वांत आले.

असा हा वैभवसंपन्न व सुव्यवस्थित मौर्यकाळ बृहद्रथाचे मृत्यूबरोबर लयास गेला.

## उतारे

"एका जामातिकं इतिहासकाराच्या मतें, अशोक हा तत्कालीन युगांतील अग्रमण्य असा श्रेष्ठ राजा होऊन गेला. जगज्जेता शिकंदर, ज्यूलिअस सीझर

आणि मानवजातीच्या नामांकित मार्गदर्शक पुरुषांत तो पुरुषोत्तम ठरतो. त्याचें चारित्र्य पूर्णत्वास पोहोंचलें होतें. मानवी इतिहासांत 'राजर्षि' हेंच त्याचें खरें-खुरें स्थान आहे. रक्तपिपासू न बनतांहि तो एक युगप्रवर्तक म्हणून आधुनिक शास्त्रीय मनाची पकड घेतो!"

'सत्यनाथ अय्यर'

" मानवी जीवनाच्या पावित्र्याबद्दल अढळ निष्ठा बाळगिणारा आणि आपल्या बलाचा परिमित उपयोग करूनहि यशस्वी रीतीनें प्रचंड साम्राज्य चालविणारा अशोक हा इतिहासांतील एकटाच सम्राट होय. प्रगाढ बुद्धिमत्तेचा, सहृदय आणि प्रभावी चारित्र्याचा हा पुरुष आपल्या सत्कृत्यांपेक्षां आपल्या व्यक्तिमत्वामुळेंच जगांतील थोर पुरुषांत गणला जातो."

'टाइम्स ऑफ इंडिया' पब्लिकेशन

## थोडक्यांत

राजभिक्षु अशोकः—इ. स. पू. २७३ ते २३७.

( १ ) राजकीय परिस्थितिः—चंद्रगुप्ताचा मुलगा बिंदुसार इ. स. पू. २७३ त मरण पावला. त्याच्या साम्राज्याची दक्षिण-मर्यादा तुंगभद्रा नदी, कलिंग देश वगळून.

( २ ) अशोकाचें बालपणः—आईचें नांव सुभद्रांगी. अशोक, वीताशोक, सुशीम असे भाऊ. बालपणीं अशोक क्रूर होता. पुढें तो पराक्रमी व युद्धकलानिपुण झाला. तक्षशीलेचें बंड मोडलें. उज्जयिनी येथें राजप्रतिनिधीही होता. राज्यप्राप्ति—इ. स. पू. २७३. राज्याभिषेक—इ. स. पू. २६९.

( ३ ) साम्राज्यविस्तारः—( अ ) कलिंग देश जिंकला—इ. स. पू. २६१
( ब ) साम्राज्य—गांधार ते कामरूप व दक्षिणेंत तुंगभद्रा नदीपयत.

( ४ ) अशोकाचें परिवर्तनः—कलिंग युद्धांतील हिंसेमुळें त्याच्या

मनावर परिणाम होऊन तो बौद्ध भिक्षु बनला.

( ५ ) बौद्ध धर्मप्रचार:—( १ ) राज्यांतील हिंसा बंद.
( २ ) पवित्र बौद्ध क्षेत्रांची यात्रा व बौद्ध तत्त्वांचा अभ्यास केला.
( ३ ) उपगुप्त नांवाच्या बौद्ध पंडिताचें शिष्यत्व.
( ४ ) ६४,००० प्रचारक पाठविले; ८०,००० चे वर मठ स्थापिले.
( ५ ) भिक्षुपरिषदा भरविल्या.
( ६ ) स्तूप, स्तंभ उभारिले– अशोकाच्या १४ आज्ञा.

( ६ ) लोकोपयोगी कृत्यें:—( १ ) प्रजेचें मुलांप्रमाणें पालन.
( २ ) प्रवाश्यांसाठीं सडका, विहिरी, तलाव, धर्मशाळा.
( ३ ) माणसांसाठीं व पशूंसाठीं मोफत दवाखाने.
( ४ ) प्रजेच्या शारीरिक शिक्षणाकडे लक्ष. तक्षशीला, नालंदा.
( ५ ) विद्येला उत्तेजन; शिल्पकला, चित्रकला यांचा विकास.

( ७ ) राज्यव्यवस्था:—चंद्रगुप्ताप्रमाणें + धर्मपालन विभाग.

( इ ) प्रश्न:—( १ ) " अशोकाचें नांव भारतीय इतिहासांत अक्षय्य सुवर्णाक्षरांनीं कोरलें जाईल. " कां ?
( २ ) अशोकाच्या कामगिरीवरून त्याची योग्यता लिहा.
( ३ ) अशोकास राजभिक्षु कां म्हणतात ? तें नांव त्यानें कसें सार्थ केलें ?

( ४ ) अशोकाच्या राज्यव्यवस्थेविषयीं तुम्हांस काय माहिती आहे ?

( ई ) स्वाध्यायः—( १ ) ‘ सम्राट अशोक ’ ले. शहा.
( २ ) Ashok – V. Smith.
( ३ ) Life of Ashok – R. C. Mookerji.
कालतक्ता क्र. १

# प्रकरण ५ वें

# अराजक

१ मौर्य साम्राज्याचा अस्त
२ शुंग घराणें
३ कण्व घराणें
४ समालोचन

## १ मौर्य साम्राज्याचा अस्त

सम्राट् अशोक इ. स. पू. २२२ मध्यें मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर मौर्य घराण्यांत प्रबळ असा कोणीच सत्ताधीश झाला नाहीं. त्यामुळें यापुढील ४००-५०० वर्षांचा काळ अत्यंत धामधुमीचा व गुंतागुंतीचा गेला. मध्यवर्ति सत्ता दुर्बळ झाल्याबरोबर सर्वत्र अराजक माजलें. बाहेरून परकीय लोक या देशांत घुसून धुमाकूळ घालूं लागले, निरनिराळीं राज्यें स्वतंत्र होऊन आपापसांत भांडूं लागलीं, व मध्यवर्ति सत्ता हस्तगत करण्याचे जोराचे प्रयत्न होऊं लागले. या सर्व गोष्टींची संगतवार माहिती देणें जवळ जवळ अशक्य आहे. कारण या धामधुमीच्या काळांत ऐतिहासिक साधनें टिकणें शक्य नव्हतें. म्हणून या काळाची माहिती थोडक्यांत खालीं दिली आहे.

अशोकाला पांच बायका होत्या. त्याच्या मृत्युसमयीं त्याला बरींच मुलें होतीं व नातूहि होते. यामुळें राज्य मिळविण्याबद्दल सर्वांतच मोठी चुरस लागून राहिली. अशोकाचा मुलगा कुणाल व त्याचा मुलगा दशरथ यांचा गादीवर खरा हक्क होता, असें कांहीं इतिहासकार सांगतात. काश्मीरमध्यें जालुक नांवाचा अशोकाचा एक मुलगा होता. त्याचप्रमाणें गांधार देशांतहि त्याचा पणतु वीरसेन हा तिकडील व्यवस्था पाहात होता. या दोघांचाहि गादीवर हक्क पोहोंचत होता असें दुसरे इतिहासकार सांगतात. कुणालाची सावत्र आई तक्षीया-

रक्षीता हिनें कुणाल हा तक्षशीलेचा सुभेदार असतांनाच त्याचे डोळे काढविले होते. आंधळ्या कुणालानें आपला भाऊ संप्रति याच्या मदतीनें सुमारें आठ वर्षें राज्य केलें. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा थोरला मुलगा दशरथ हा गादीवर आला. गयेजवळच्या डोंगरावरील लेण्यांत या दशरथाचें नांव व 'देवानाम् प्रिया' ही पदवी खोदलेली आढळते. अजीविकांना त्यानें तीन लेणीं बांधून दिलीं होतीं. दशरथानंतर त्याचा भाऊ संप्रति हा मगधाचा राजा झाला. त्याचा उल्लेख जैन वाङ्मयांत वारंवार येतो. कारण त्यानें जैन धर्मास मोठा आश्रय देऊन हिंदुस्थानांत त्याचा प्रसार केला. जैन साधूंचे मठहि त्यानें स्थापन केले होते. संप्रतीच्या या जैन धर्मावरील प्रेमामुळें त्यास 'जैन अशोक' असें म्हणतात. पाटलीपुत्र व उज्जैन या प्रदेशांवर त्याचा अंमल दृढ होता असें दिसतें. संप्रती-नंतर त्याचा मुलगा सालीसुख हा गादीवर आला. यानंतरचे राजे फारच दुर्बल निपजले. त्यामुळें मौर्य घराण्याची सत्ता भराभर कमी होत गेली. ब्राह्मण वर्गा-कडून त्यांना फार विरोध झाला. मौर्य साम्राज्याचें जूं झुगारून देऊन कलिंग देश स्वतंत्र झाला. गोदावरी व कृष्णा या नद्यांच्या दुआबांत स्थापन झालेलें आंध्रांचें राज्य प्रबल होऊं लागलें. मौर्य घराण्यांतील शेवटचा राजा बृहद्रथ हा होय. एका लष्करी समारंभाचे वेळीं बृहद्रथाचा सेनापति पुष्पमित्र यानें आपल्या धन्याचा खून करून मगधाचें राज्य बळकाविलें.

यानंतरहि मौर्यांचें लहानसें राज्य मगधांत चालू होतें. सातव्या शतकांत हिंदुस्थानांत आलेला चिनी प्रवासी ह्यु–एन–त्संग याच्या वेळीं मगधांत पूर्ण-वर्मा या नांवाचा मौर्य घराण्यांतील राजा राज्य करीत होता. याशिवाय या मूळ मौर्य घराण्याला आपलें प्रमुख वडील घराणें समजणारीं लहान लहान मौर्य घराणीं इ. स. च्या सहाव्या, सातव्या व आठव्या शतकांत हिंदुस्थानच्या पश्चिम भागांत नांदत होतीं.

**२ शुंग घराणें**– स्थापना व अस्त (इ. स. पू. १८८ ते इ. स. पू. ७२)

बृहद्रथाचा सेनापति पुष्पमित्र यानें आपल्या धन्याचा खून करून मग-धाचें राज्य बळकाविल्याचा व त्याजागीं शुंग घराण्याची स्थापना केल्याचा उल्लेख वर आलाच आहे. पुष्पमित्र धरून शुंग घराण्यांत एकंदर दहा राजे

होऊन गेले. व त्यांनीं सुमारें ११८ वर्षें मगधावर सत्ता चालविली. परंतु पुष्पमित्राशिवाय त्या घराण्यांत नांव घेण्याजोगा दुसरा कोणीच राजा झाला नाहीं.

**पुष्पमित्रः**–(इ. स. पू. १८८–इ. स. पू. १५२) पुष्पमित्र हा बृहद्रथ मौर्याचा सेनापति असल्यामुळें त्याला सैन्याचा पाठिंबा चांगला होता. यामुळें त्याची ३६ वर्षांची राजवट युद्धप्रसंगांनीं भरलेली आहे. पुष्पमित्राचा वैदिक धर्माला पाठिंबा असावा असें पुराणांतील पुराव्यावरून वाटतें. बाणाच्या वाङ्मयांत व कालिदासाच्या नाटकांत पुष्पमित्राचा व त्याच्या वंशजांचा उल्लेख आलेला आहे. पुष्पमित्राची राजधानी पाटलीपुत्र हीच होती. पुष्पमित्राचा मुलगा अग्निमित्र यानें विदर्भावर स्वारी करून तो प्रांत शुंग घराण्याच्या अंमलाखालीं आणला. इ. स. पू. १७५ च्या सुमारास युक्राडिटीझाचा नातलग मिनँडर या ग्रीक राजानें मोठ्या सैन्यानिशीं हिंदुस्थानावर स्वारी केली. सिंध, काठेवाड व पश्चिम किनाऱ्यावरील कांहीं भाग त्यानें जिंकले. मथुरा नगरी जिंकून तो खुद्द पाटलीपुत्रावर चाल करून येण्यास निघाला. परंतु पुष्पमित्रानें त्याला वाटेंत अडवून त्याचा पूर्ण पराभव केला, व त्यास हिंदुस्थानाबाहेर हाकलून लाविलें. हळूहळू पुष्पमित्रानें आपले गेलेले प्रांत परत मिळविले.

या सर्व पराक्रमानंतर वैदिक परंपरेप्रमाणें आपलें सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठीं पुष्पमित्रानें मोठा अश्वमेध यज्ञ केला. यज्ञाच्या पूर्वी त्यानें आपला मुलगा वसुदेव याच्याबरोबर यज्ञाचा घोडा देऊन त्यास दिग्विजयासाठीं पाठविलें. सिंध प्रांतांतील यवनांना व इतर प्रांतांतील राजांना शुंग घराण्याचें सार्वभौमत्व मान्य करावयास लावून वसुदेव परत आला. या यज्ञासाठीं अनेक लोकांस निमंत्रणें पाठविण्यांत आलीं होतीं. त्यांत प्रसिद्ध व्याकरणकार पतंजलि हाही होता.

अश्वमेध यज्ञावरून पुष्पमित्राचें वैदिक धर्मावरील प्रेम व्यक्त होतें. बौद्ध वाङ्मयांत तो बौद्ध धर्माचा शत्रु म्हणून ओळखिला जातो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें पुष्पमित्रानें बौद्ध धर्मियांचा क्रूरपणें छळ केला. मगधापासून जालंदरपर्यंत पसरलेल्या अनेक बौद्ध मठांची त्यानें होळी केली. बौद्ध धर्माचें तत्त्वज्ञान सांगत हिंडणाऱ्या अनेक बौद्ध भिक्षूंना पकडून त्यानें ठार मारिलें. त्याच्या या छळाला

कंटाळून बरेच बौद्ध लोक दूर देशांत पळून गेले. बौद्ध वाङ्मयांतील वर्णन जरी अतिशयोक्तीचें असलें, तरी त्यावरून पुष्यमित्राचा बौद्ध धर्माविषयींचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

पुष्यमित्राच्या राज्याचा विस्तार दक्षिणेस विदर्भ व नर्मदा नदीपर्यंत होता. पंजाबांत त्याची सत्ता स्थापन झाली असली तरी त्याला तेथें ग्रीक सत्ताधिकाऱ्यांस तोंड द्यावें लागत होतें. ३६ वर्षें राज्य करून पुष्पमित्र इ. स. पू. १५२ मध्यें मरण पावला.

**पुष्पमित्रानंतरचे शुंग राजे:—**

पुष्पमित्रानंतर त्याचा मुलगा अग्निमित्र हा राजा झाला. अग्निमित्रानें सुभेदार असतांनाच विदर्भ प्रांत जिंकून आपलें तेज प्रगट केलें होतें. अग्निमित्रानंतरचा शुंग घराण्यांतील महत्त्वाचा राजा म्हटला म्हणजे भागवत. त्यानें एकंदर ३२ वर्षें राज्य केलें. त्यानें सध्या ग्वाल्हेर संस्थानांत मोडत असलेल्या प्रदेशांत एक मोठा स्तंभ उभारिला. शुंगाचें व ग्रीक राजाचें पुढें बरेंच सूत जमलेलें दिसतें. भागवताकडे आलेल्या ग्रीक वकिलानें वैदिक धर्माचा स्वीकार केला होता. त्याला महाभारताची फार गोडी लागली होती. शुंग घराण्यांतला शेवटचा राजा देवभूमि हा अत्यंत व्यसनी व नीच होता; त्याचा मुख्य मंत्री कण्व घराण्यांतील वसुदेव नांवाचा ब्राम्हण होता. देवभूमि हा कांहीं निंद्य कर्म करण्यांत गर्क असतांना वसुदेवानें त्याचा खून केला. देवभूमिबरोबरच शुंग घराण्याचें राज्य लयाला गेलें, व ममधावर कण्व घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली.

ग्रीक स्वारीचा प्रतिकार करून ग्रीकांना हुसकून लावून शुंग घराण्यानें मोठी कामगिरी केली. त्यांनीं स्वत: वैदिक धर्माचा स्वीकार करून व प्रसार करून बौद्ध धर्माला विरोध सुरू केला, ही गोष्टहि ध्यानांत ठेवणें जरूर आहे. शुंग घराण्याच्या कारकीर्दींत वाङ्मय व कला यांस थोडी उर्जितावस्था प्राप्त झाली होती.

**३. कण्व घराणें:**—स्थापना व अस्त (इ. स. पू. ७२ ते इ. स पू. २७)

शुंग घराण्यांतील शेवटचा राजा देवभूमि हा केवळ नांवाचा राजा असून

सर्व कारभार त्याचा मुख्य प्रधान वसुदेव याच्याच हातांत होता. देवभूमीला ठार मारून मगधाचें राज्य बळकाविण्याचा कट वसुदेवानेंच रचिला, व त्या प्रयत्नांत तो यशस्वी झाला. येथून पुढें मगधावरील शुंगांची सत्ता जाऊन तेथें कण्व राज्य करूं लागले.

वसुदेव धरून या घराण्यांत एकंदर चार राजे झाले. या सर्वांनीं मिळून फक्त ४५ वर्षें राज्य केलें. या चौघांपैकीं कोणाचीही विशेष माहिती उपलब्ध नाहीं. हे सर्वजण ब्राह्मण होते, व त्यामुळें या काळांत वैदिक धर्माला चांगलें उत्तेजन मिळालें असलें पाहिजे असें वाटतें. या घराण्यांतील शेवटचा राजा सुशर्मा यास आंध्र किंवा शातवाहन घराण्यांतील एका राजानें ठार मारून मगधावर आपली सत्ता चालू केली ( इ. स. पू. २७ ).

## ४. समालोचन

एकंदरींत अशोकाच्या मृत्यूनंतरच्या व गुप्त घराण्याच्या स्थापनेपर्यंतच्या काळांतील राजकीय घडामोडी फारशा महत्त्वाच्या नाहींत. शुंग घराण्यांतील पुष्पमित्र सोडून दिला तर कोणीहि राजा पराक्रमी किंवा बलिष्ठ वाटत नाहीं. साम्राज्याची वाढ, कलाकौशल्यास उत्तेजन किंवा धर्मप्रसार याही दृष्टीनें या काळास महत्त्व नाहीं. शुंग व कण्व घराण्याची स्थापना ज्या परिस्थितींत झाली ती परिस्थिति पाहिली म्हणजे मोंगल कालाची आठवण येते. स्वार्थ व त्यासाठीं होणारा रक्तपात हा प्राचीन परंपरेला मुळींच भूषणास्पद नाहीं.

या काळाचा फायदा परकीयांनीं मात्र चांगला घेतला. अशोकाच्या वेळीं मौर्य घराण्याच्या ताब्यांत असलेला विस्तीर्ण प्रदेश पुन्हां कोणाहि राजाला मिळवितां आला नाहीं. हिंदुस्थानाच्या पश्चिम भागांतून परकीय लोक आंत घुसूं लागल्या मुळें पश्चिम सीमा असुरक्षित झाली. विरोध नसेल तेव्हां हे परकीय लोक दूरवर आंत शिरत व राज्यें स्थापन करीत. परकीय लोकांना म्हणण्यासारखा विरोध फक्त पुष्पमित्राकडूनच झाला. त्याच्या विरोधामुळें मिनँडर मागें हटला व कांहीं काळ पंजाब प्रांत शुंग घराण्याच्या ताब्यांत आला. शुंग घराण्यांतील इतर राजांची

किंवा कण्व घराण्यांतील राजांची सत्ता मगधाच्या आसपासच्या प्रदेशापेक्षां दूरवर पोंहोंचत नव्हती. त्याच वेळीं कृष्णेच्या व गोदावरीच्या दुआबांत वाढीस लागलेली आंध्रांची सत्ता हेंही एक नवीन संकट मगधाच्या राज्याला ग्रासूं लागलें होतें.

बौद्ध धर्माची पिछेहाट व वैदिक धर्माचा पुरस्कार याच काळांत झाला असें दिसतें. अशोकाच्या वेळीं प्राप्त झालेलें वैभव शुंग व कण्व या ब्राह्मण राजांच्या राजवटींत लोप पावूं लागलें. पुष्पमित्रानें तर बौद्ध धर्मावर शस्त्रच धरिलें. त्यानें बौद्ध मठ जाळले. बौद्ध भिक्षू ठार मारिले व बौद्ध मंदिरांतील बुद्धाच्या मूर्ती खणून काढल्या. याप्रमाणें बौद्ध धर्माचा राजाश्रय सुटलाच त्याची लोकप्रियताही कमी झाली. उलट वैदिक धर्माला मिळालेल्या या संजीवनीमुळें तो धर्म पुन्हां डोकें वर काढूं लागला.

## थोडक्यांत

**मौर्य साम्राज्याचा अस्त**—अशोकाच्या मृत्यूनंतर मध्यवर्ति सत्ता कमकुवत झाल्यामुळें अराजक. अशोकानंतरचे राजे—कुणाल संप्रति, सालीसुख. ब्राह्मणांचा विरोध—कलिंग, आंध्र देश स्वतंत्र झाले. बृहद्रथाचा पुष्पमित्राकडून खून, मौर्य साम्राज्याचा अस्त.

**शुंग घराणें**—संस्थापकः—पुष्पमित्र (इ. स. पू. १८८–१५२)

कार्यः—१ मगधावर शुंगांच्या राज्याची स्थापना.
२ वैदिक धर्माला पाठिंबा.
३ ग्रीक लोकांचा पराभव.
४ बौद्ध धर्माचा छळ.
५ साम्राज्यविस्तार.

**कण्व घराणें**—शुंग राजा देवभूमि याच्या विरुद्ध कट करून वसुदेवाकडून कण्व घराण्याची मगधावर स्थापना.

चार राजे; ४५ वर्षे राज्य; ब्राह्मणांचें प्राबल्य.

**समालोचन**—१ अराजकतेचा काळ.
२ परकीयांच्या स्वाऱ्यांस सुरुवात.
३ बौद्ध धर्माचा ऱ्हास—वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन.

**प्रश्न**—१ पुष्पमित्राच्या कार्याविषयीं माहिती द्या—
२ खालील गोष्टींवर टिपणें द्या.
वीर कुणाल; कण्व घराणें; मौर्य साम्राज्याचा अस्त.

## प्रकरण ६ वें

# यवनांचें भारतीभवन

१ ग्रीक लोकांच्या स्वाऱ्या.

२ शकांच्या स्वाऱ्या.

३ कुशानांच्या स्वाऱ्या.

४ पार्थियन लोकांच्या स्वाऱ्या.

अशोकाच्या मृत्यूनंतरच्या काळांत भारतांत प्रबल असा सम्राट् कोणी झाला नाहीं; देशांत राजकीय उलथापालथ फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाली, व प्रजेला संभाळून सर्व देश एकजिनसी राखण्याचें कौशल्य कोणास दाखवितां आलें नाहीं. या सर्व घडामोडींचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. हिंदुस्थानाच्या पश्चिम सीमेवर परकीय लोकांचीं राज्यें होतीं. त्या लोकांनीं या संधीचा फायदा घेऊन या देशावर स्वाऱ्या केल्या, व ज्याला जेवढा लचका तोडतां आला तेवढा त्यानें तोडला. मगधाचें अफाट साम्राज्य कमी होतां होतां तें फक्त राजधानीच्या जवळपासच्या प्रदेशापुरतें मर्यादित झालें. हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या लोकांचीं राज्यें स्थापन झालीं. ही स्थिति भयानक होती यांत शंकाच नाहीं. पण या देशांतील मातीचा गुणच असा कीं ज्या कोणी या भूमीवर पाय ठेविला तो स्वतःचें परकीयत्व विसरून याच देशाशीं समरस होऊन गेला. मिलिंद, कनिष्क हे वास्तविक परकीय राजे; पण त्यांचीं नांवें प्राचीन भारताच्या इतिहासांत भारतीय श्रेष्ठ पुरुष म्हणून अजरामर झालेलीं आहेत. ग्रीक, कुशान, शक, पार्थियन इत्यादि परकीय लोक या काळीं भारतांत शिरले, पण थोड्याच दिवसांत ते भारतीय होऊन गेले. प्रथम ग्रीक लोक या देशांत आले.

## १ ग्रीक लोकांच्या स्वाऱ्या

हिंदुस्थानांत येणारा पहिला ग्रीक राजा म्हणजे अॅलेक्झँडर. त्यानें पौरवाचा पराभव करून सतलज नदीपर्यंतच्या प्रदेशावर आपला अंमल सुरू केला होता. परंतु चंद्रगुप्त मौर्यानें ग्रीक लोकांचा हा अंमल हिंदुकुश पर्वताच्या पलीकडे रेटला. अशोकाच्या वेळेपर्यंत ग्रीक लोकांनीं पुन्हां म्हणून वर डोकें काढिलें नाहीं. अशोकाच्या मृत्यूनंतर हिंदुस्थानांत आपल्याला विरोध करणारा प्रबळ सम्राट् कोणी नाहीं असें पाहून ग्रीक लोकांनीं पुन्हां या देशांत घुसून राज्यें स्थापन करण्याचा उद्योग सुरू केला.

ग्रीक लोकांच्या ताब्यांत मध्य आशियांतील बॅक्ट्रिया, पार्थिया इ. राज्यें होतीं. सेल्यूकस निकेटरचा नातू अँटायोकस याच्या व्यसनापायीं हीं दोन्हीं राष्ट्रें इ. स. पू. २५० च्या सुमारास स्वतंत्र झालीं. बॅक्ट्रियन लोकांनीं तेथला सुभेदार डायोडोटस यासच आपला राजा केलें. डायोडोटसच्या मुलानें पार्थियन राजाबरोबर स्नेहसंपादन केला होता. या राजाविरुद्ध मॅग्नीशियाचा रहिवासी युथिडेमस यानें बंड करून बॅक्ट्रियाचें राज्य बळकाविलें. युथिडेमसनें सिरियाचा राजा अंटायोकस-दी-ग्रेट याजबरोबर अनेक वर्षें युद्ध करून त्याला आपलें स्वातंत्र्य मान्य करण्यास भाग पाडिलें. इ. स. पू. २०६ मध्यें अंटायोकसनें हिंदुकुश पर्वत ओलांडून काबूल प्रांतांतील सुभागसेन या राजाचा पराभव करून त्याचा मोठा खजिना व हत्ती लूट म्हणून आपल्या बरोबर नेले. अंटायोकसनें आपली मुलगी युथिडेमसचा मुलगा डिमिट्रिअस यास दिली होती. डिमिट्रियसनें इ. स. पू. १९० मध्यें हिंदुस्थानावर स्वारी करून कबूल, पंजाब व सिंध हे प्रांत जिंकिले. डिमिट्रिअसच्या प्रांतांत बंड होऊन ते प्रांत त्याच्या ताब्यांतून गेल्यामुळें डिमिट्रिअसला हिंदुस्थानांत राहावें लागलें. डिमिट्रियसचा सेनापति मिनँडर हाही हिंदुस्थानांतच राहिला.

डिमिट्रिअसच्या ताब्यांतील बॅक्ट्रिया प्रांतांत बंड करून तो प्रांत जिंकणारा वीर पुरुष म्हणजे युक्राडिटीज. युक्राडिटीज बॅक्ट्रिया घेऊनच नुसता गप्प बसला नाहीं. त्यानें डिमिट्रिअसच्या हिंदुस्थानांतील प्रांतावरही चाल करून डिमिट्रिअसचा

पराभव केला. परंतु परत जात असतांना युक्राडिटीजाचा त्याच्याच ॲपोलो-डोटस नांवाच्या मुलानें खून केला.

**मिनँडर:**–ॲपोलेडोटस हिंदुस्थानकडे चाल करून येत असतांना त्यानें सिंधु नदी ओलांडण्यापूर्वीच डिमिट्रियसचा सेनापति मिनँडर यानें त्याला अडवून तह करण्यास भाग पाडिलें. मिनँडरनें डिमिट्रिअसच्या मुलीबरोबर विवाह केला होता. इ. स. पू. १६० ते इ.स. पू. १५० या कालांत गांधारपासून मथुरे-पर्यंतच्या ग्रीक साम्राज्याचा मिनँडर हाच मुख्य होता. याशिवाय त्याच्या ताब्यांत सिंधपर्यंतचें सिंधुनदीचें खोरें, व मध्यमिका व उज्जैन सोडून भडोचपर्यंतचा प्रदेश होता. त्याची राजधानी सागल ( सियालकोट ) ही होती. अयोध्याप्रांता-पर्यंत चाल करून त्यानें साकेत शहर हस्तगत केलें होतें. तसेंच चितोडजवळचें नागरी शहरही त्यानें जिंकिलें होतें. एकूण मध्य हिंदुस्थानापर्यंत मिनँडरचा अंमल चालू होता असें या पराक्रमावरून म्हणावयास हरकत नाहीं.

हिंदुस्थानचा कारभार मिनँडरनें अत्यंत न्यायीपणानें केला. हिंदुस्थानांत राहिल्यामुळें बौद्ध धर्माचा त्याच्यावर पगडा बसून त्यानें पुढें बौद्ध धर्माचा स्वीकार केला. बौद्ध वाङ्मयांत तो मिलिंद या नांवानें प्रसिद्ध आहे. बौद्ध धर्मतत्त्वां-वर पाली भाषेंत मिलिंदाचें ‘ मिलिंद पन्हा ’ म्हणजे “ मिलिंदाचे प्रश्न ” या नांवाचें पुस्तक फार प्रसिद्ध आहे.

काबूल प्रांतांत उद्भवलेलें बंड मोडण्यासाठीं मिनँडर गेला असतांना पुष्पमित्र शुंगानें त्यानें जिंकिलेले सर्व प्रांत परत मिळविले. पश्चिमेस थेट सिंधु नदीपर्यंत जाऊन त्यानें मिनँडरचा पराभव केला. मिनँडरच्या पश्चात् ग्रीक लोकां-चा अंमल हिंदुस्थानांत जवळ जवळ १०० वर्षें टिकला.

## २ शकांच्या स्वाऱ्या

मध्य आशियांत बॅक्ट्रियाच्या उत्तरेस ऑक्झस व जक्झार्टिज नद्यांच्या प्रदेशांत सिथियन किंवा शक नांवाचे लोक राहात होते. त्यांच्या पूर्वेस चीनमध्यें युएचि किंवा कुशानांची वसाति होती. कुशानांच्या पूर्वेस हूण लोक राहात होते. शकांच्या दक्षिणेस पार्थियन लोकांचीं राज्यें होतीं. इ. स. पूर्वी २ ऱ्या शतकांत या मध्य आशियांत एक प्रचंड वावटळ

उत्पन्न होऊन एकमेक एकमेकांस त्यांच्या प्रदेशांतून हुसकून लावूं लागले. हूणांनीं कुशानांना त्यांच्या राज्यांतून हुसकिलें. कुशानांनीं त्यांच्या पुढच्या शकांना त्यांच्या प्रदेशांतून उठविलें. आपल्या राज्याला मुकलेले हे शक किंवा सिथियन लोक बॅक्ट्रियाच्या राज्यांत घुसले. त्यांच्या लोंढ्यापुढें बॅक्ट्रियांतील ग्रीक लोकांची त्रेधा उडाली व ते काबूलकड पळाले, शकांनीं बॅक्ट्रियाच्या दक्षिणेस पार्थियाच्या राज्यांत घुसून फार प्राचीन काळापासून तेथें राहात असलेल्या आपल्या जातभाईंशीं सख्य जोडिलें. त्यांच्या मदतीनें शक लोक बलुचिस्थानांतून बोलन खिंडींतून पंजाबांत शिरले. पंजाबांतील तक्षशीला, व यमुनेच्या कांठचें मथुरा नगर त्यांनीं हस्तगत करून तेथें आपलें आसन स्थिर केलें. त्यांनीं स्वतःला 'क्षत्रप' ही पदवी घेतली. क्षत्रप पदवी धारण केलेल्या परकीय राजांचा अंमल या भागांत शंभर वर्षांहून अधिक काल होता.

या लोकांची एक टोळी इ. स. च्या पहिल्या शतकांत दक्षिणेकडे घुसली व त्यांनीं सुराष्ट्र उर्फ काठेवाड हा प्रांत व्यापला. उज्जैन प्रांतांतही त्यांची सत्ता स्थापन झाली होती. या लोकांनींच शक राजघराणें स्थापन केलें. त्या घराण्याचा अंमल या भागांत इ. स. ३९० पर्यंत होता. गुप्त घराण्यांतील राजांनीं, व विशेषतः विक्रमादित्यानें त्यांची सत्ता खिळखिळी करून टाकिली. गुप्त, आंध्र व कुशान यांच्या प्रचंड माऱ्यापुढें शकांना हिंदुस्थानांत मोठें साम्राज्य कधींच स्थापन करितां आलें नाहीं.

शकांनीं ग्रीक लोकांच्या नाण्यांचें व राज्यव्यवस्थेचें अनुकरण केलें होतें. त्यांच्या राजांची वैशिष्ट्यपूर्ण पदवी म्हटली म्हणजे 'राजराज'—'राजांचा राजा' ही होय. शकांचें नांव शक या नांवानें ओळखिल्या जाणाऱ्या कालगणनेशीं निगडित आहे. शकांचें एकसंधि असें राज्य जवळ जवळ नव्हतेंच. स्वतंत्र शक राज्यें अस्तित्वांत होतीं. त्यांपैकीं तक्षशीलेचें राज्य पल्हवांनीं नष्ट केलें, व मथुरेचें राज्य कुशानांनीं हस्तगत केलें.

### ३ कुशानांच्या स्वाऱ्याः—

युएचि लोक चीनच्या वायव्य भागांत वसति करून राहिले होते. तुर्कांच्या हिऊंग्नु नांवाच्या एका भटक्या टोळीनें त्यांना तेथून हुसकून लाविल्या-

मुळें युएचि लोक पश्चिमेकडे कुरणांच्या शोधार्थ निघाले. शकांच्या जक्झार्टीज नदीच्या प्रदेशांत शिरून त्यांनीं त्यांना हिंदुस्थानाकडे हांकून लाविलें. परंतु युएचि लोकांना या प्रदेशांत फार काळ राहातां आलें नाहीं. वु–सुन जातीच्या लोकांनीं त्यांना ऑक्झस नदीच्या प्रदेशांत हांकून दिलें. ऑक्झस नदीच्या दक्षिणेकडे युएचि लोकांनीं आपलीं पांच राज्यें स्थापन करून बॅक्ट्रियांत कायम वसाति केली. इ. स. पू. १० च्या सुमारास त्यांच्या राज्याला व्यवस्थित स्वरूप प्राप्त झालें होतें.

यानंतर सुमारें शंभर वर्षांनीं या युएचि जातीपैकीं कुशान नांवाच्या लोकांचा कॅडिफिसेस नांवाचा एक राजा झाला. (इ. स. ४० ) कुशानांची संख्या वाढूं लागली व त्यांना पूर्वीचा प्रदेश अपुरा पडूं लागला. तेव्हां कॅडिफिसेसनें कुशनांना हिंदुकुश पर्वताच्या प्रदेशावर स्वारी करून तो प्रदेश जिंकून दिला. कॅडिफिसेसनें याशिवाय काश्मीर, गांधार देशही जिंकिले. त्यानें बॅक्ट्रियावर आपला अंमल दृढ केला. पार्थियन लोकांचा पराभव केला. यामुळें इराणपासून झेलम नदीपर्यंत त्याचें साम्राज्य पसरलें. तो स्वतःला महाराज किंवा राजाधिराज म्हणवून घेत असे. त्यानें बहुधा बौद्ध धर्माचा स्वीकार केला असावा. वयाच्या ८० व्या वर्षीं तो मरण पावला.

पहिल्या कॅडिफिसेसच्या मागून इ. स. ७८ च्या सुमारास त्याचा मुलगा दुसरा कॅडिफिसेस हा गादीवर आला. तो मोठा पराक्रमी, धाडसी व महत्त्वाकांक्षी होता. त्यानें पंजाब प्रांत जिंकून काशीपर्यंतच्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापन केली. दक्षिणेस नर्मदा नदीपर्यंत त्याच्या राज्याची सीमा येऊन भिडली होती. तो स्वतःला सर्व जगाचा सत्ताधीश मानीत असे. त्याच्या नाण्यांवरून तो शिवाचा भक्त होता असें दिसतें.

**कनिष्कः**—कॅडिफिसेसशीं कनिष्काचा कांहीं संबंध नव्हता. कुशानांपैकीं तो एक अत्यंत पराक्रमी पुरुष होता. त्यामुळें दुसऱ्या कॅडिफिसेस नंतर कुशानांचें राज्य कनिष्काच्या हातांत आलें. त्याचा काळ कोणता असावा हें मात्र निश्चित सांगतां येत नाहीं. इ. स. ७८ मध्यें किंवा इ. स. १२० मध्यें त्याचें राज्यारोहण झालें असावें अशीं दोन मतें प्रचलित आहेत. कनिष्कानें एकूण ४२ वर्षें राज्य

केलें. इ. स. १२० हा त्याच्या राज्यारोहणाचा काल धरला तर, इ. स. १२० ते इ. स. १६२ हा कनिष्काच्या सत्तेचा काल मानावा लागेल.

कनिष्क हा मोठा युद्धप्रिय व कुशल राजा होता. त्यानें थेट पाटलीपुत्र नगरापर्यंत चाल करून तें जिंकलें. अशा रीतीनें उत्तर हिंदुस्थानांत पाटलीपुत्र शहरापर्यंत त्याचें साम्राज्य वाढलें. माळवा व सिंध हे दोन प्रांत त्याच्या साम्राज्यांत मोडत होते. सिंधुनदीच्या मुखाजवळचीं पार्थियन लोकांचीं राज्यें कनिष्कानें नष्ट करून टाकिलीं. काश्मीर प्रांत जिंकून त्यानें आपल्या राज्यास जोडला. कनिष्कपुरा या नांवाचें एक शहर त्यानें काश्मिरमध्यें बसविलें. त्याचीं नाणीं पेशावरपासून काशी गोरखपूर पर्यंतच्या सर्व प्रदेशांत सांपडतात. त्यानें स्वतःला देवपुत्र हें नांव घेऊन चीनच्या राजाला आव्हान दिलें. त्यानें चीनवर केलेल्या पहिल्या स्वारींत पानचौ या चिनी राजाकडून त्याचा पराभव झाला. पण दुसऱ्या स्वारींत पानयंग या चिनी राजाचा पराभव करून कनिष्कानें काशगर, कंदाहार, यारकंद व खोतान हे चीनमधील प्रांत हस्तगत केले.

कनिष्काची राजधानी पुरुषपूर म्हणजे हल्लींचें पेशावर नगर होय. तेथें झालेल्या उत्खननामुळें आतां कनिष्काबद्दलची पुष्कळच माहिती मिळूं शकते. या नगरांत कनिष्कानें पुढें बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर एक सुंदर इमारत उभारली ही इमारत कोरीव लांकडांचीं असून तेरा मजली म्हणजे सुमारें ४०० फूट उंच होती. तिच्यावर एक प्रचंड व मजबूत लोखंडी कळस होता. या इमारतीच्या शेजारींच एक बौद्ध मठ होता. तेथें विद्यादानाचें कार्य चालत असे. हें विद्यामंदीर गझनीच्या महमदानें पुढें नष्ट करून तेथील सुंदर मूर्ति भग्न केल्या.

**बौद्धधर्म स्वीकारः**—अशोकाप्रमाणें मोठा साम्राज्यविस्तार केल्यानंतर कनिष्कानें बौद्ध धर्म स्वीकारला. त्याच्या नाण्यांवर ग्रीक, इराणी, हिंदु व बौद्ध देवतांचीं चित्रें आहेत. कनिष्कानें स्वतः जरी बौद्ध धर्माचा स्वीकार केला असला तरी बौद्ध देवतांबरोबर तो शिवाचीही पूजा करीत असे.

कनिष्कानें आपल्या कारकीर्दींत काश्मिरांत श्रीनगर येथील कुंडलवन नांवाच्या मठांत बौद्ध भिक्षूंची एक धर्म परिषद भरविली. कनिष्क बौद्ध

ग्रंथांचा अभ्यास करीत असतां एकमेकांविरुद्ध असलेल्या अनेक मतांमुळें त्याच्या मनांत मोठा गोंधळ उत्पन्न झाला. तेव्हां पूज्यपार्श्व या मंत्र्याच्या संमतीनें त्यानें बौद्ध भिक्षूंचीं या बाबतींतलीं मतें अजमाविण्यासाठीं एक परिषद् बोलाविली. या परिषदेला सुमारें ५०० भिक्षू जमले होते. वसुमित्र हा या सभेचा अध्यक्ष असून, पाटलीपुत्र नगर जिंकलें तेव्हां तेथून आणलेला प्रसिद्ध विद्वान अश्विघोष उपाध्यक्ष होता. या सभेनें प्राचीन काळापासून सर्व सांप्रदायिक ग्रंथांचें नीट परीक्षण करून बौद्ध सांप्रदायिक तत्त्वांच्या तीन मुख्य विभागावर तीन मोठे टीकाग्रंथ तयार केले. त्यांपैकीं महाविभाना हा ग्रंथ बौद्ध धर्माच्या ज्ञानकोशासारखा आहे. हे सव ग्रंथ ताम्रपटावर लिहून एका स्तूपांत ठेवून देण्यांत आले. या परिषदेंत मध्यआशिया व चीन या देशांत बौध्द धर्माचा प्रसार करण्याची योजना आंखण्यांत आली. याच वेळीं महायान पंथ उत्पन्न झाला. बौध्द वाङ्मयाला व कलेला कनिष्काचा मोठा आधार होता. त्याच्या वेळीं प्रसिध्द लेखक अश्विघोष, तत्त्ववेत्ता नागार्जुन व वैद्य चरक हे होऊन गेले.

**राजवटीचें महत्त्व**:—कनिष्काच्या वेळीं कुशान साम्राज्य वैभवाच्या शिखरावर जाऊन पोहोंचलें. अशोकानंतर नांव घेण्यासारखें हें एक मोठें साम्राज्य होय. महायान पंथाचा उदय होऊन त्याचा सर्व अशियाखंडांत प्रसार झाला. मथुरेला जैन धर्म वाढीस लागला. कुशानांचा रोमन साम्राज्याशीं संबंध आलेला असल्यामुळें व्यापार व कला या बाबतींत रोमन लोकांची छाप हिंदुस्थानावर पडलेली दिसते. चीन वगैरे मध्य आशियांतील देशांशीं खुष्कीच्या मार्गानें व्यापार सुरू झाला. परकीय म्हणून आलेले कुशान भारतीय होऊन येथेंच राहिले.

उत्तरेकडील एका स्वारीच्या प्रसंगीं कनिष्क मारला गेला.

**कनिष्काचे वंशज**:—वासिष्क व हुविष्क या नांवाचे कनिष्काला दोन मुलगे होते. कनिष्काच्या अनुपस्थितींत ते हिंदुस्थानांत राजप्रतिनिधी म्हणून काम पाहात असत. त्यांपैकीं वासिष्क हा बापाच्या पूर्वीच मरण पावला. हुविष्क हा कनिष्कानंतर सम्राट् झाला. त्याच्या साम्राज्यांत काबूल, काश्मीर व मथुरा

या प्रांतांचा अन्तर्भाव होत होता. बौद्ध मठांना त्यानें मोठ्या देणग्या दिल्या. काश्मिरांत त्यानें हुष्कपूर नांवाचें एक नगर वसविलें.

हुविष्कानंतर इ. स. १८२ च्या सुमारास पहिला वासुदेव हा राजा झाला. त्याच्या नाण्यांवर शिव व नंदी यांचें चित्र आहे. त्याचे पुष्कळसे शिलालेख मथुरेला सांपडतात. वासुदेवाच्याच राजवटींत कुशानांच्या साम्राज्याला उतरती कळा लागून त्याचे अनेक स्वतंत्र विभाग पडले. कुशानांचें राज्य कां संपुष्टांत आलें तें निश्चित सांगणें कठिण आहे. डॉ. स्मिथच्या मताप्रमाणें इ. स. १६८ च्या सुमारास पश्चिम भागांत उत्पन्न झालेल्या प्लेगामुळें कुशानांची फार हानी झाली असावी. इराणांतील सस्सव घराण्याच्या जोरापुढें कुशान टिकूं शकले नाहींत हेंहि एक कारण असूं शकेल. इ. सनाच्या तिसऱ्या शतकाची माहिती मुळींच मिळत नसल्यामुळें त्याच सुमारास कुशान नष्ट झाले असावेत असें वाटतें.

## ४ पार्थियन लोकांच्या स्वाऱ्या

शकांच्या राज्याच्या दक्षिणेस पार्थियन लोकांचें राज्य होतें. त्यांचा पहिला राजा मिथ्राडेटीझ ( इ. स. पू. १७१ ते १३६ ) हा मोठा पराक्रमी राजा होऊन गेला. त्यानें आपली सत्ता थेट सिंधू नदीपर्यंत व त्याच्याहि पूर्वेस वाढविली. तक्षशीला व मथुरा येथील क्षत्रप राजे पार्थियम राजांचे अंकित असावेत. कारण त्यांनीं आपल्याला पार्थियन पद्व्या घेतल्या होत्या. तक्षशीलेचें राज्य मिथ्राडेटीझनें इ. स. १३८ च्या सुमारास आपल्या राज्यास जोडलें. इ. स. १२० मध्यें मौएझ हा तेथें राजा होता. याच सुमारास पार्थियन राजांना इराणांत रानटी टोळ्यांशीं झगडावें लागलें. त्यामुळें हिंदुस्थानावरील त्यांची पकड ढिली पडली. या संधीचा फायदा घेऊन हिंदुस्थानांतील त्यांच्या ताब्यांतील राजे स्वतंत्र होऊं लागले.

मिथ्राडेटीझ-दी-ग्रेट या पार्थियन राजानें पुन्हां आपली सत्ता दृढ केली. पंजाब व सीस्तान हे प्रांत त्यानें पुन्हां आपल्या ताब्यांत आणले. तक्षशीलेचा राजा अॅझेस हा त्याचा मांडलिक होता. इ. सनाच्या पहिल्या शतकांत हा अॅझेस स्वतंत्र झाला. इ. स. २० च्या सुमारास दुसऱ्या अॅझेसनंतर गोंडोफेरस हा पार्थि-

यन लोकांचा राजा झाला. त्यानें सिंध व अॅराकोशिया हे प्रांत जिंकले. गोंडोफेरसनंतर पार्थियन राज्याचे तुकडे पडले. दुसरा कॅडिफस या कुशान राजानें पंजाब प्रांत जिंकला. सिंध प्रांतहि पुढें पार्थियन राजांच्या ताब्यांतून गेला तरी देखील सिंधु नदीच्या भोंवतालच्या प्रदेशांत त्यांचीं लहान लहान राज्यें टिकून राहिलीं.

गोंडोफेरसच्या कारकीर्दींत प्रसिद्ध ख्रिस्ती मिशनरी सेंट थॉमस हा हिंदुस्थानांत आला. त्यानें गोंडोफेरस राजाला ख्रिस्ती संप्रदायाचा उपदेश इतक्या कळकळीनें व सुंदर रीतीनें केला कीं खुद्द राजा, त्याचा भाऊ व इतर पुष्कळ लोक ख्रिस्ती बनले. सेंट् थॉमस त्यानंतर दक्षिण हिंदुस्थानांत गेला, व तेथें त्यानें आपल्या धर्माचा प्रसार केला.

पार्थियन लोक हिंदुस्थानाच्या इतिहासांत 'पल्लव' या नांवानें ओळखिले जातात.

## थोडक्यांत

१ **ग्रीक लोकांच्या स्वाऱ्या**:—डिमिट्रियस—काबूल, पंजाब, सिंध.
मिनँडर—सिंध, उज्जैनी, भडोच, अयोध्या, चितोड.

२ **शकांच्या स्वाऱ्या**:—बलुचिस्थानांतून पंजाबांत प्रवेश—मथुरेपर्यंत स्वाऱ्या. साम्राज्य स्थापितां आलें नाहीं.

३ **कुशानांच्या स्वाऱ्या**:—**कनिष्कः**—( इ. स. १२०—१६२ )
युद्धप्रियताः—पाटलीपुत्रापर्यंत चाल—माळवा, सिंध, काश्मीर, चीन यांवर स्वाऱ्या. पुरुषपूर राजधानी.
बौद्ध धर्म स्वीकारः—बौद्ध धर्माला राजाश्रय. बौद्ध भिक्षु-परिषद्. त्रिपिटकाची नवी आवृत्ति. बौद्ध धर्म प्रसाराची योजना.

४ **पार्थियन लोकांच्या स्वाऱ्या**:—मिथ्राडेटीझ—सिंधू नदीपर्यंत सत्ता—क्षत्रपांस मांडलिक केलें.

मिथ्राडेटीझ-दी-ग्रेट—पंजाब व सीस्तान,
तक्षशीला हस्तगत.
गोंडोफेरस—ख्रिस्ती धर्माचा स्वीकार.

**प्रश्न**—१ प्राचीनकालीं हिंदुस्थानावर झालेल्या परकीय लोकांच्या स्वाऱ्यांची माहिती द्या.

२ कनिष्काच्या राजवटीची माहिती देऊन त्याची कामगिरी वर्णन करा.

**स्वाध्याय**— हिंदुस्थानाचा नकाशा काढून त्यांत परकीय लोकांनीं जिंकलेला प्रदेश निरनिराळ्या रंगांनीं भरा.

# प्रकरण ७ वें

# आंध्रांचा उत्तर दिग्विजय

१ आंध्रांचें पूर्ववृत्त.
२ आंध्रांचें पहिलें साम्राज्य.
३ आंध्रांचें दुसरें साम्राज्य.
४ आंध्रांचें कार्य.

## १ आंध्रांचें पूर्ववृत्त

पुराणांत आंध्र राजे व त्या प्रत्येकाचा काल यासंबंधींची माहिती आलेली आहे. मत्स्य पुराणांत आंध्र घराण्यांतील तीस राजांनीं मिळून सुमारें ४५० वर्षें राज्य केल्याचा उल्लेख आहे. वायु पुराणांत एकोणीस राजांचा उल्लेख असून त्यांनीं अजमासें ३०० वर्षें राज्य केलें असें म्हटलें आहे. पण वायु पुराणांतील राजांचा व त्यांच्या कालाचा आंकडा संशयातीत आहे. हे एकोणीस राजे बहुधा प्रमुख राजेच असावेत, व त्यांचा काल ३०० वर्षांचा असावा. इतर राजांचा व त्यांच्या कालाचा विचार वायु पुराणानें सोडून दिलेला दिसतो.

आंध्रांना शातकर्णी, शातवाहन, शालिवाहन अशीं निरनिराळीं नांवें दिलेलीं आढळतात. शातकर्णी ( १०० कान असलेले ) व शातवाहन हीं बहुधा टोळ्यांचीं नांवें असावींत. पुढील काळांत या टोळ्यांनीं आंध्र देश जिंकल्यानंतर त्यांना आंध्र म्हणूं लागले असावेत असें दिसतें. हल्लींच्या मद्रास इलाख्यांतील गोदावरी व कृष्णेच्या खोऱ्यांतील बेल्लारी जिल्हा हें शातवाहनांचें मूळ ठिकाण असलें पाहिजे. त्यांच्या उत्तरेला कलिंगांचें राज्य होतें. आंध्र हे आर्य नव्हेत हें निश्चित, व तितकेंच ते अनार्यहि नव्हेत हें खरें आहे. कांहीं ग्रंथकारांनीं त्यांना ब्राह्मण ठरविलें आहे, परंतु आंध्र ब्राह्मण नव्हते असें म्हणणारे ग्रंथकारहि बरेच आहेत. ते बहुधा द्रविड असावेत.

चंद्रगुप्त मौर्य व त्याच्याकडील ग्रीक वकील मेगॅस्थिनीस यांच्या वेळीं म्हणजे इ. स. पू. ३०० च्या सुमारास या द्रविड जातीच्या व तेलगू भाषा बोलणाऱ्या लोकांचें राज्य हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावर कृष्णा व गोदावरी नद्यांच्या दुआबांत स्थापन झालें होतें. लष्करी सामर्थ्याच्या बाबतींत आंध्रांचा क्रम चंद्रगुप्ताच्या खालोखाल लागत होता. आंध्रांजवळ त्या वेळीं १ लक्ष पायदळ, २ हजार घोडदळ व १ हजार हत्ती होते. त्यांच्या राज्यांत ३० तटबंदी नगरें असून अनेक गांवें होतीं. कृष्णेच्या कांठीं श्रीकाकुलम् ही त्यांची राजधानी होती. कांहीं ग्रंथकारांनीं धनकटक हें आंध्रांच्या राजधानीचें गांव म्हणून दिलें आहे. आंध्रांचें हें राज्य प्रथम स्वतंत्र असलें पाहिजे. परंतु बिंदुसाराच्या वेळीं मौर्यांनीं तें आपल्या राज्यांत सामील करून घेतलेलें दिसतें. कारण अशोकाच्या इ. स. पू. २५६ मध्यें लिहिलेल्या एका शासन लेखांत आंध्र लोक त्याच्या अंमलाखालीं असल्याबद्दल उल्लेख आहे. अशोकाच्यानंतर मौर्य साम्राज्याला उतरती कळा लागून त्या साम्राज्याच्या ताब्यांत असलेले प्रांत हळूहळू स्वतंत्र होऊं लागले हें आपण पूर्वीं पाहिलें आहे. त्याच वेळीं कलिंग व त्याचा दक्षिणेकडील आंध्र देश स्वतंत्र झाले.

## २ आंध्रांचें पहिलें साम्राज्य

मौर्यांची सत्ता झुगारून देऊन आंध्रांचें स्वतंत्र राज्य स्थापन करणारा पहिला आंध्र राजा सिमुक हा होय. इ. स. पू. २३५ च्या सुमारास सिमुक आंध्रांचा राजा झाला. त्यानें इ. स. पू. २१२ पर्यंत म्हणजे २३ वर्षें राज्य केलें. परंतु मौर्यांची सत्ता झुगारून देण्यापलीकडे त्यानें इतर काय केलें, याबद्दल माहिती मिळत नाहीं.

सिमुकाच्या मागून त्याचा भाऊ कन्ह किंवा कृष्ण हा आंध्रांचा राजा झाला. कृष्ण व त्याच्या नंतर गादीवर आलेला त्याचा पुतण्या शातकर्णी यांनीं प्रत्येकीं दहा वर्षें राज्य केलें. त्यांच्या राजवटींत आंध्रांची सत्ता झपाट्यानें वाढली. त्या काळांत आंध्रांचें राज्य गोदावरीच्या खोऱ्यांत पश्चिमेकडे नाशिकपर्यंत वाढलें. कोंकण देशहि त्यांच्या राज्यांत मोडत होता. याच वेळीं सोईच्या दृष्टीनें व मध्यवर्ति ठिकाण म्हणून आंध्रांनीं आपली पूर्वींची राजधानी बदलून ती प्रति-

पान २८८ पहा

ष्ठान किंवा पैठण या ठिकाणीं आणिली. पुण्याच्या उत्तरेस जुन्नरपासून अठरा मैलांवर नाणेघाट नांवाचा एक प्रसिद्ध घाट आहे. या घाटांतून पूर्वी कोंकण व देश यांतील दळणवळण चालत असे. त्या घाटांतील डोंगरावरं जे शिलालेख आहेत त्यांत सिमुक, कृष्ण, शातकर्णी, नागाविका राणी वगैरे आंध्र राज्यकर्त्यांचा उल्लेख आहे. शातकर्णीचें लग्न नागाविका नांवाच्या महाराष्ट्रीय स्त्रीशीं झालें होतें. त्यामुळें महाराष्ट्रांतील आंध्रांच्या सत्तेला मोठी बळकटी आली असली पाहिजे. शातकर्णीनें आपलें वैभव प्रसिद्ध करण्यासाठीं दोन अश्वमेध यज्ञ केले होते. शातकर्णीच्या वंशजांना शुंग राजांशीं झगडा करावा लागला. कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नाटकांत या झगड्याचें वर्णन आलें आहे. या झगड्यांत आंध्रांना हार खावी लागली. परंतु इ. स. १५६ च्या सुमारास गादीवर आलेल्या दुसऱ्या शातकर्णीनें माळवा जिंकून पूर्वींच्या पराभवाचें उट्टें काढलें. त्यानंतर आलेल्या आंध्र राजांनीं कण्व व उरलेल्या शुंग राजांची सत्ता नष्ट करून व मगधाची राजधानी पाटलीपुत्र हें नगर हस्तगत करून मगधावर कांहीं काळ आपली सत्ता स्थापन केली. यानंतर कुंतला शातकर्णी नांवाच्या राजाचा उल्लेख कामसूत्रांत आला आहे. त्यानें सहज म्हणून केलेल्या कपाळावरील प्रहारामुळें त्याची पत्नी मृत्यु पावल्याचा हा उल्लेख आहे. हाल नांवाचा आंध्र राजा मोठा लेखक म्हणून प्रसिद्ध आहे. त्यानें प्राकृत भाषेंत 'शप्तशति' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांत ७०० परिच्छेद असून ते सर्व उत्तम मानले जातात. याच सुमारास उत्तरेंत शकांची सत्ता वाढीस लागली. त्यांनीं आंध्रांच्या ताब्यांतील माळवा व महाराष्ट्र हे दोन देश जिंकले, या पराभवामुळें आंध्रांना मागें हटत हटत आपल्या पूर्वींच्या प्रांतांत येऊन राहावें लागलें. या नंतर आंध्रांचें पहिलें साम्राज्य जवळ जवळ नष्ट झालें. तें पुन्हां गौतमीपुत्र शातकर्णी व शालिवाहन यांच्या वेळीं उर्जितावस्थेस आलें.

## ३ आंध्रांचें दुसरें साम्राज्य

**गौतमीपुत्र शातकर्णी**—गौतमीपुत्र शातकर्णी हा सर्व आंध्र राजांत श्रेष्ठ राजा होय. तो इ. स. १०६ मध्यें गादीवर आला. त्यानें इ. स. १३० पर्यंत म्हणजे २४ वर्षें राज्य केलें. गादीवर आल्याबरोबर त्यानें आंध्रांची

गेलेली सत्ता पुन्हां स्थापन करण्याचे जोराचे प्रयत्न सुरू केले. त्याच्या प्रयत्नांना यश येऊन लवकरच महाराष्ट्र, उत्तर कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, काठेवाड, माळवा वगैरे देशांत आंध्रांचें दुसरें साम्राज्य स्थापन झालें. या पराक्रमामुळें शातकर्णीची आई गौतमी हिला अतिशय आनंद झाला. कार्ल्याच्या लेण्यांतील एका शिलालेखांत गौतमीचा हा आनंद खोदून ठेवलेला आहे. ती स्वतःला महाराजाची आई, व महाराजाची आजी म्हणवून घेते. गौतमीपुत्राचें वर्णन तिनें " शक, यवन, पल्लव राजांना नष्ट करणारा व क्षहरता घराण्याचा नाश करणारा, " म्हणून केलें आहे. क्षहरता हें शक घराणें असून त्यांनींच आंध्रांचें पहिलें साम्राज्य बुडविलें होतें. इ. स. १०९ च्या सुमारास गौतमीपुत्रानें क्षहरता घराण्यांतील राजाचा पराभव करून आपले गेलेले प्रांत परत मिळविले. आपला हा विजय प्रसिद्ध करण्यासाठीं गौतमीपुत्रानें पराभूत केलेल्या राजांचींच नाणीं घेऊन त्यांवर आपला शिक्का मारिला. " शकपल्लवादि जातिविहीन परकीय लोकांच्या हीन संस्कृतीपासून ब्राह्मण संस्कृति व बौद्ध संप्रदाय यांचें संरक्षण करणारा व जातिसंस्था पुन्हां प्रस्थापित करणारा " अशी प्रौढी गौतमीपुत्रानें स्वतःबद्दल मारिली आहे. वर वर्णन केल्याप्रमाणें बौद्ध व वैदिक धर्माच्या बाबतींत गौतमीपुत्र प्रामाणिकपणें वागला होता. ब्राह्मण व बौद्ध या दोघांनाही त्यानें उदार देणग्या दिल्या.

**पुलुमायि शालिवाहन** :—गौतमीपुत्राच्या मागून त्याचा मुलगा पुलुमायि शालिवाहन हा इ. स. १३० मध्यें गादीवर आला. त्यानें इ. स. १५८ पर्यंत म्हणजे २८ वर्षें राज्य केलें. पुलुमायीचा विवाह उज्जयिनी येथील शक राजा रुद्रदामन याची मुलगी दक्षमित्रा इजबरोबर झाला होता. परंतु या विवाहामुळें शक व आंध्र यांचें ऐक्य मात्र साधूं शकलें नाहीं. रुद्रदामन यानें आपल्या जांवयाचा दोनदां पराभव करून गौतमीपुत्रानें घेतलेला बराचसा मुलुख आंध्रांकडून परत जिंकून घेतला. उत्तरेंतील विजयामुळें हुरळून जाऊन रुद्रदामन दक्षिणेकडे चाल करून आला. परंतु या वेळीं मात्र शालिवाहनानें मोठ्या नेटानें

प्रतिकार करून त्याला उत्तरेंत पिटाळून लाविलें. रुद्रदामनाचा पूर्ण मोड मात्र पुलुमायीला कधींच करितां आला नाहीं.

शालिवाहन शक नांवाचा जो शक दक्षिण हिंदुस्थानांत चालू आहे तो पुलमायि शालिवाहनानें सुरू केला असावा, असा कांहीं इतिहासकारांचा तर्क आहे. पुलुमायीचें शालिवाहन हें नांव, व त्याचा रुद्रदामन या शक राजाशीं असलेला संबंध ध्यानांत घेतां हा शक त्यानें सुरू केला असावा असें वाटणें साहजिक आहे. परंतु तो शक इ. स. ७८ पासून सुरू होतो. म्हणजे इ. सनांतून ७८ वर्षें उणें केलीं म्हणजे शालिवाहन शक मिळतो. पुलुमायीचा काळ आपण इ. स. १३० ते इ. स. १५८ धरला आहे. मग या गोष्टींचा मेळ कसा घालावा हा प्रश्नच आहे. त्याला उत्तर म्हणून कांहीं इतिहासकार असें सांगतात कीं, कनिष्कानें हा शक प्रथम सुरू केला. कनिष्काचा काळ इ. स. ७८ ते इ. स. १२० हा आहे. तेव्हां हा मेळ जमणें शक्य दिसतें. उत्तरेंत चालू असलेल्या कनिष्काच्या या शकालाच शालिवाहन हें उपपद जोडून पुलुमायीनें तो आपला शक म्हणून चालू केला असावा.

**यज्ञश्री शातकर्णी**:—पुलुमायि शालिवाहनानंतर आंध्र घराण्यांत बरींच वर्षें नांव घेण्यासारखा असा कोणी राजा झाला नाहीं. इ. स. १६८ मध्यें गादीवर आलेला यज्ञश्री शातकर्णी मात्र बराच प्रसिद्ध आहे. त्यानें २९ वर्षें राज्य केलें. त्याच्या संबंधींचे शिलालेख नुसत्या महाराष्ट्रांतच नव्हे, तर उत्तर-कोंकणांत व कृष्णेच्या खोऱ्यांतील प्रदेशांतही सांपडतात. त्याचीं नाणींही गुजराथेंत व काठेवाडांत सांपडलीं आहेत. त्याच्या कांहीं नाण्यांवर गलबताचें चित्र आहे; त्यावरून यज्ञश्रीनें मोठें आरमार बांधलें असलें पाहिजे ही गोष्ट सूचित होते. पश्चिमेकडील क्षत्रप राजांकडून यज्ञश्रीनें ( रुद्रदामनानें बळकाविलेले ) आंध्रांचे प्रांत परत मिळविले.

**आंध्र साम्राज्याचा शेवट**:—यज्ञश्रीनंतरचे तीन राजे नांवापुरतेच राजे होते. त्यांच्या २५ वर्षांच्या राजवटींत आपापसांतील भांडणामुळें आंध्रांच्या साम्राज्याचे तुकडे पडले. इ. स. २२० च्या सुमारास आंध्रांचें साम्राज्य लयास

गेलें. आंध्र साम्राज्याचे जे तीन तुकडे झाले त्यांवर अभीर, कदंब व इक्ष्वाकु हे लोक राज्य करूं लागले.

## ४ आंध्रांचें कार्य

आंध्रांची सत्ता नर्मदेच्या दक्षिणेकडे स्थापन झाली होती, व गौतमीपुत्र व पुलुमायीच्या वेळीं पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंतच्या विस्तीर्ण प्रदेशावर त्यांचें साम्राज्य पसरलें होतें. दक्षिणेंत स्थापन झालेलें हें पहिलेंच साम्राज्य होय. आतांपर्यंत रिवाज असा होता कीं उत्तरेकडील राजांनीं दक्षिणेकडे स्वाऱ्या करून दक्षिणेंतील राजांना आपले मांडलिक बनवावयाचें. परंतु आंध्रांनीं हा रिवाज प्रथम मोडून व पुढें प्रत्यक्ष पाटलीपुत्रच हस्तगत करून मगधावर म्हणजे उत्तरेंत आपली सत्ता स्थापन केली. हा दक्षिण हिंदुस्थानाचा उत्तर हिंदुस्थानावरील पहिला विजय मानिला पाहिजे. आंध्रांच्या राज्यांत बौद्ध व हिंदु लोकांना समानतेनें वागविलें जात होतें. आंध्र स्वतः वैदिक धर्माभिमानी असूनही त्यांनीं बौद्ध धर्माला उत्तेजन व मदत दिली. त्यांच्या राजवटींत कार्ले, अजिंठा, वेरूळ, ( पांडव लेणें ) नाशिक इत्यादि ठिकाणांनजीक डोंगरांतून मोठमोठे विहार व स्तूप खोदले गेले. आंध्रांच्या वेळीं हिंदुस्थानाला मोठें भय शक या परकीय लोकांपासून उत्पन्न झालें होतें. शकांची प्रचंड लाट थोपवून धरण्याचें कार्य यशस्वी रीत्या आंध्रांनींच केलें. आंध्रांनीं हें कार्य केलें नसतें तर रुद्रदामन या महत्त्वाकांक्षी राजाच्याच वेळीं शकांनीं दक्षिणेंत आपला अंमल बसविला असता.

### थोडक्यांत

**पूर्ववृत्तः**—नांवें–शातकर्णी, शातवाहन, शालिवाहन.

स्थापना–चंद्रगुप्ताच्या वेळीं कृष्णा व गोदावरीच्या दुआबांत. चंद्रगुप्त व अशोकाच्या वेळीं मांडलिक. अराजकतेच्या काळांत स्वतंत्र.

**पहिलें साम्राज्यः**—सिमुकानें मौर्यांची सत्ता झुगारून देऊन आंध्रांचें स्वातंत्र्य जाहीर केलें. शातकर्णीच्या वेळीं पश्चिमेस नाशिक पर्यंत विस्तार–प्रतिष्ठान राजधानी. शुंगांशीं

झगडा, कण्वांचा पराभव, मगधावर सत्ता. शकांकडून-
विस्तारास पायबंद.

**दुसरें साम्राज्यः—** गौतमीपुत्र–( इ. स. १०६–१३० ) महाराष्ट्र, उ.
कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, काठेवाड, माळवा,
हस्तगत.
क्षहरतांचा पराभव.
ब्राह्मण व बौद्ध धर्माचा पाठिंबा.
शालिवाहन–( इ. १३०–१५८ )
रुद्रदामन या शक राजाबरोबर दीर्घ युद्ध.
शालिवाहन शक सुरू केला.

**आंध्रांचें कार्यः—**( १ ) उत्तरेवर राज्य करणारे दक्षिणेंतील पहिले सत्ताधीश.
( २ ) बौद्ध व वैदिक धर्मीयांस समान वागणूक.
( ३ ) शकांच्या वाढीस पायबंद.
( ४ ) विहार, स्तूप, लेणीं इ. बांधकाम.

**प्रश्नः—**१. आंध्रांच्या कार्याची सविस्तर कल्पना द्या.
२. खालील व्यक्तींबद्दल माहिती द्याः—
गौतमीपुत्र, शालिवाहन, यज्ञश्री.

# प्रकरण ८ वें

# भारतीय सुवर्ण किरणें

१ गुप्त साम्राज्य-स्थापना
२ अखंड विजयी समुद्रगुप्त
३ समुद्रगुप्ताची कामगिरी
४ समुद्रगुप्ताची योग्यता.

## १ गुप्त साम्राज्य स्थापना

**राजकीय परिस्थितिः**—मौर्यांचें साम्राज्य लयास गेल्यानंतर मगधाचेंहीं महत्त्व कमी झालें. मौर्यांचा इतिहास हा मगधाच्या वैभवशाली इतिहासाचा पूर्व भाग होय. हा भाग इ. पू. २८ त संपला, आणि मगधाचें राज्य नामशेष झालें. पुढें दोन अडीच शतकांच्या खंडानंतर मगधाच्या राज्याचा पुन्हां उदय झाला. गुप्त सम्राटांनीं वैभवाचा उच्चांक गांठला, आणि मगधाचा इतिहास पुन्हा नव्या वाढत्या वैभवानें नटला. मगधाच्या भव्य इतिहासाचा हा उत्तरभाग होय. या भागाची कालमर्यादा इ. स. २४५–६०० अशी आहे. या पुनरुदित साम्राज्याची माहिती या प्रकरणांत आपणांस मिळवावयाची आहे.

मौर्यांच्या एकमुखी सत्तेच्या नाशानंतरचा दोन अडीच शतकांचा काळ भारतीय इतिहासांतील एक अराजकतेचा काल म्हणून ओळखतात. उत्तरेंतील कनिष्काचें व दक्षिणेंतील आंध्रांचें अशीं दोन मोठीं साम्राज्यें वगळल्यास बाकी सर्वत्र असंख्य लहान लहान स्वतंत्र राज्यें होतीं. कनिष्काचें साम्राज्य इ.स. १६२त व आंध्रांचें साम्राज्य इ. स. २२० त नामशेष झालें. त्यानंतरचें एक शतक अतिशय गोंधळाचें व बेबंदशाहीचें गेलें. स्वतंत्र राज्यांची संख्या बेसुमार वाढली. त्यांच्या आपापसांत लढाया होऊं लागल्या. देशांतील शांतता पार नष्ट झाली. जिकडे तिकडे अंदाधुंदीचा कारभार सुरू झाला. त्यांतच उत्तरेकडे शक-कुशा-

नादि परकीय राजे प्रजेवर जुलूम करीत. त्यांच्या जुलमी कारभारामुळें तेथील लोक संत्रस्त झाले. प्रजेचें पालन करणारा राजा उरला नाहीं. धर्माचें रक्षण करणारा राजा उरला नाहीं. राजे स्वार्थान्ध होऊन आपसांत झगडूं लागले तर प्रजा काय करणार ? धार्मिक बाबतींत प्रजा उदासीन राहूं लागली. बौद्ध धर्माच्या लाटेचा जोर राजाश्रय नाहींसा होतांच ओसरला. जैन धर्म अखिल भारतीय केव्हांच झाला नाहीं. वैदिक धर्माचे प्रचारक अद्याप स्वस्थ होते. अशा या विपन्न परिस्थितींतून भारतीयांना वर काढण्याचें व त्यांची उन्नति करण्याचें महान कार्य गुप्त सम्राटांनीं केलें. त्यांनीं म्लान झालेल्या वैदिक-हिंदुधर्माला जिवंतपणा आणला. भारतीय व्यापार विश्वव्यापी केला आणि भारतीय कला व विज्ञान यांस अमर केलें. सारांश, गुप्तांनीं भारतांत ‘ सुवर्णयुग ’ निर्माण केलें. दिलें. गुप्त सम्राट् हे या साम्राज्यरवीचीं सुवर्ण किरणें होत.

**राज्य स्थापना**–इ. स. २४५. आंध्रांचें साम्राज्य इ. स. २२० च्या सुमारास नामशेष झालें. हें साम्राज्य उत्तरेकडे मगधापर्यंत पसरलें होतें. मगधाच्या आसपासचीं कित्येक राज्यें शातवाहनांचीं मांडलिक होतीं. परंतु पाटलीपुत्र येथील श्रीगुप्त या नांवाचा एक राजा शातवाहनांचा मांडलिक झाला नव्हता. त्याचें स्वतंत्र राज्य होतें. या श्रीगुप्ताचें पूर्ववृत्त अद्यापि अज्ञात आहे. परंतु गुप्त घराण्याचा संस्थापक हाच होय हें सिद्ध झालें आहे. अलाहाबाद प्रशस्तीवरून श्रीगुप्तापासून हें घराणें सुरू झालें, व हा श्रीगुप्त स्वतःस ‘ अधिराज ’ म्हणवीत असे हें स्पष्ट दिसतें. या प्रशस्तीमध्यें श्रीगुप्त प्रपौत्रस्य महाराजश्री घटोत्कच पौत्रस्य, महाराजाधिराज ‘ श्री चंद्रगुप्त पुत्रस्य ’ असे शब्द आहेत. हे शब्द समुद्रगुप्ताला उद्देशून आहेत हें उघड आहे. या प्रशस्तीवरून आपणांस गुप्तांचा वंशवृक्ष तयार करितां येईल. तो असाः—

श्रीगुप्त
|
घटोत्कच
|
पहिला चंद्रगुप्त (इ. स. ३२०–३३०)
|
समुद्रगुप्त ( इ. स. ३३०–३७५ )
|
रामगुप्त ( इ. स. ३७५–३८० )    दुसरा चंद्रगुप्त (इ.स. ३८०–४१३)
|
कुमारगुप्त ( इ. स. ४१३–४५५ )
|
स्कंदगुप्त ( इ. स. ४५५–४८० )
|
पुरुगुप्त ( इ. स. ४८० –४८५ )
|
नरसिंहगुप्त ( इ. स. ४८५–५२७ )

या वंशवृक्षावरून आपल्या ध्यानांत येईल कीं, गुप्त हा या घराण्याचा व मगधाच्या नवीन साम्राज्याचा संस्थापक होय. श्रीगुप्त व त्याचा मुलगा घटोत्कच यांनीं मगध देशावर कांहीं वर्षें राज्य केलें. परंतु या राज्याचें साम्राज्य बनविण्याचें श्रेय पहिल्या चंद्रगुप्तास देतात.

**पहिला चंद्रगुप्तः**— इ. स. ३२०–३३०. घटोत्कचाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा चंद्रगुप्त गादीवर आला. इ. स. ३२० त त्याच्या राज्यारोहणाचा प्रकट समारंभ झाला. या महोत्सवाच्या मुहूर्तावर त्यानें गुप्तसंवत् सुरू केला. पराक्रमी राजेच आपला पराक्रम अजरामर करण्यासाठीं नवीन शक सुरू करितात. शालिवाहनानें शक सुरू केला; तसाच विक्रमादित्यानें व अगदीं अलीकडे श्रीछत्रपति शिवाजी महाराजांनीं शक सुरू केला. शक सुरू करणाऱ्या राजास आपण

शककर्ता म्हणतों. चंद्रगुप्त शककर्ता होता. त्याला महाराजाधिराज अशी पदवी होती यावरून तो सम्राट् होता हें स्पष्ट आहे. गादीवर आल्याबरोबर चंद्रगुप्तानें वैशाली येथील लिच्छवी राजकन्या कुमारदेवी हिच्याशीं लग्न केलें. त्या योगानें मगध व वैशाली हीं दोन्ही राज्यें एकत्र येऊन चंद्रगुप्ताचें बळ वाढलें. साम्राज्य वाढविण्यास त्यास या लिच्छवी लोकांचा फार उपयोग झाला.

**साम्राज्य विस्तारः**—चंद्रगुप्ताच्या राज्यारोहणाच्या वेळीं त्याचें राज्य अगदींच लहान होतें. पाटलीपुत्राच्या भोंवतालचा मगधांतील कांहीं प्रदेश फक्त त्याच्या राज्यांत मोडत असे. कुमारदेवीशीं लग्न केल्यानें वैशाली देश त्याच्या राज्यांत समाविष्ट झाला. पुढें त्यानें पश्चिमेकडील शक टोळ्यांचा व उत्तरेकडील रानटी लोकांचा पराभव करून हळुहळू आपल्या साम्राज्याच्या मर्यादा वाढविण्यास सुरुवात केली. अशा तऱ्हेनें इ. स. ३३० मध्यें त्याच्या साम्राज्यांत मगध, वैशाली, साकेत इ. अलाहाबादपर्यंतचा प्रदेश, व दक्षिणेकडे नर्मदा नदीपर्यंतचा प्रदेश अंतर्भूत होता. चंद्रगुप्तानें स्वतःच्या, कुमारदेवीच्या व लिच्छवी लोकांच्या नांवानें नाणीं पाडलीं होतीं.

## अखंड विजयी समुद्रगुप्त —इ. स. ३३०–३७५

( अ ) **बालपण व राज्यारोहणः**—समुद्रगुप्त हा चंद्रगुप्ताचा अत्यंत आवडता मुलगा होता. क्वचित् ठिकाणीं त्याचा कच या नांवानेंही उल्लेख आढळतो. चंद्रगुप्त शककर्ता झाला तर समुद्रगुप्त अखंड दिग्विजयी झाला. बालपणीं अत्यंत हूड व आडदांड म्हणून तो प्रसिद्ध होता. पित्याकडून सर्व प्रकारचें उत्कृष्ट शिक्षण त्यास मिळाल्यामुळें त्याच्या हूडपणाचें रूपांतर पराक्रमांत झालें. त्यास युद्धकलेचें अमोल ज्ञान प्राप्त झालें होतें. उत्तम लढवय्या म्हणून लहानपणापासूनच त्याची ख्याति होती. त्याच्या पराक्रमाचीं स्तुतिसुमनें अनेक दंतकथांमध्येंही गोविलेलीं आहेत. तो पराक्रमाचा सूर्य होता. आपल्या अतुल शौर्यानें अखिल विश्व त्यानें हादरून सोडलें अशा स्वरूपाचे अनेक उल्लेख आहेत; आणि चंद्रगुप्ताची खरोखरच अशी महत्त्वाकांक्षा होती कीं, आपला सुपुत्र चक्रवर्तीच व्हावा. मराठ्यांच्या इतिहासांत शहाजी व शिवाजी यांच्या कार्याची महती गातांना ज्याप्रमाणें एक स्वराज्य–संकल्पक व दुसरा स्वराज्य-

संस्थापक ठरतो, त्याप्रमाणेंच चंद्रगुप्त व समुद्रगुप्त यांच्या कामगिरीचें स्वरूप ध्यानांत घेतांच एक साम्राज्य-संकल्पक व दुसरा साम्राज्य-संस्थापक ठरेल. शहाजी व चंद्रगुप्त यांच्या परिस्थितींत बरेंच भिन्नत्व होतें. मात्र दोघांच्या आकांक्षा एकाच स्वरूपाच्या होत्या. शहाजीच्या जहागिरीचा व प्रोत्साहनाचा फायदा शिवाजीस मिळून त्यास स्वराज्य स्थापितां आलें. तसेंच चंद्रगुप्ताच्या स्वतंत्र राज्याचा व प्रत्यक्ष अनुभवाचा फायदा समुद्रगुप्ताला मिळून त्यास भारतीय साम्राज्य स्थापन करितां आलें. त्याच्या कामगिरीचें विविध स्वरूप पाहिल्यावर त्याला कोणत्या प्रकारचें शिक्षण बालपणीं मिळालें असावें याची कल्पना येईल.

समुद्रगुप्त पराक्रमी होता व त्यास युद्धकलेचें सर्व शिक्षण मिळालें होतें हें आपण वर पाहिलेंच. पुढें आपणांस हेंही कळेल कीं, वैदिक आर्य संस्कृतीचा तो दीपक होता. यावरून आपणांस असें म्हणतां येईल कीं, गुप्त घराण्याची प्रतिष्ठा त्याच्या अस्सल आर्यत्वांत आहे. कित्येक शतकेंपर्यंत बौद्ध धर्माचा चाललेला उठाव ध्यानांत घेतां गुप्तांच्या या विशेष कामगिरीचें महत्त्व स्पष्ट होतें. बौद्ध धर्माची लाट येतांच आपलें अस्तित्व कायम टिकविण्यासाठीं कांहीं आर्य क्षत्रिय घराणीं कांहीं काळ शांत राहिलीं. गुप्त घराणें हें मूळच्या आर्य क्षत्रिय घराण्यांपैकीं होय. संधि मिळतांच हें घराणें प्रकाशांत आलें आणि त्यानें आपल्या मूळ वैदिक धर्माला पुन्हां उजळा दिला. वैदिक आर्य संस्कृतीबद्दलचा गुप्तांचा अभिमान त्यांच्या रक्तांत पुरेपूर भिनला होता. समुद्रगुप्ताच्या मनावर आपल्या आर्य वैशिष्ट्याचाच पगडा बसला असल्यास नवल नाहीं. चंद्रगुप्ताच्या नाण्यांवर लक्ष्मीचें चित्र असे. यावरून तोही वैदिक संस्कृतीचा अभिमानी होता हें स्पष्ट आहे. तेव्हां समुद्रगुप्ताच्या बालपणीं स्वसंस्कृतीविषयींचा अभिमान कायम राहावा असे संस्कार त्याच्या मनावर झाले असले पाहिजेत.

या सर्व शिक्षणाला राजनीतिशास्त्राची जोड मिळाली हें विशेष होय. समुद्रगुप्ताची राज्यव्यवस्था मौर्यांच्या राज्यव्यवस्थेइतकीच अद्यावत् होती. युद्धकला, राजनीति व स्वसंस्कृति अशा सर्व विषयांचें ज्ञान मिळालेला समुद्रगुप्त आपल्या डोळ्यांदेखत सिंहासनावर बसावा अशी विलक्षण हौस चंद्रगुप्ताला होती. त्याप्रमाणें इ. स. ३३० त त्याच्या राज्यारोहणाचा अपूर्व सोहळा चंद्रगुप्तानें

स्वहस्तें पार पाडला; आणि त्याच वर्षी मोठ्या समाधानानें त्यानें इहलोक सोडला.

**समुद्रगुप्ताची विजय-मालिका**:— कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत जेत्यांचे तीन प्रकार वर्णिले आहेत. धर्मविजयी, लोभविजयी व असुरविजयी हे ते प्रकार होत. धर्मविजयी जेते धर्मयुद्ध करून इतरांस जिंकतात, पण त्यांच्या स्वातंत्र्याचा अपहार करीत नाहींत; लोभविजयी जेते केवळ संपत्तीच्या अगर सत्तेच्या लोभामुळें दुसऱ्यांना जिंकतात; असुरविजयी जेते स्वार्थासाठीं इतरांना जिंकून त्यांच्या स्वातंत्र्याचा अपहार करतात व त्यांस आपले गुलाम बन-वितात. समुद्रगुप्त हा पहिल्या वर्गांतील जेता होता. साम्राज्यविस्तारापेक्षां सार्व-भौमत्वाची त्यास विशेष आवड होती असें दिसतें. तो थोर मुत्सद्दी होता तसाच पराक्रमी योद्धा होता. अपयश त्याला माहीत नव्हतें. विजयाची अखंड मालिकाच त्यानें गुंफली होती. त्या मालिकेंतील प्रत्येक विजय पुष्प त्याच्या अतुल शौर्याची साक्ष पटवितें.

( १ ) उत्तरेकडील विजयः—समुद्रगुप्त गादीवर आला त्यावेळीं उत्तरे-कडे असंख्य लहान लहान राज्यांचा सुळसुळाट झाला होता. पश्चिमेकडे माळवा, राजपुताना, सौराष्ट्र इ. प्रदेश शकांनीं व्यापला होता. मगधाच्या भोंव-तालीं रानटी टोळ्यांनीही बराच धुमाकूळ घातला होता. हा गोंधळ नाहींसा करून त्या जागीं एकछत्री साम्राज्य स्थापन करण्याचा समुद्रगुप्तानें प्रथम विचार केला. त्याप्रमाणें त्यानें अगोदर रानटी टोळ्यांचा बंदोबस्त केला, आणि नंतर इतर राज्यें जिंकण्याची मोहीम त्यानें सुरू केली.

या मोहिमेंत त्यानें अनेक राज्यें जिंकून तीं आपल्या साम्राज्यांत आणिलीं. त्यांपैकीं राजा चंद्रवर्मनचें पुष्कर्ण (जोधपूर), गणपतिनागाचें नळपूर (ग्वाल्हेर), नागसेनाचें पद्मावती, व बलवर्मनाचें कामरूप ( आसाम ) इ. राज्यें प्रमुख होत. याशिवाय वंग, दवाक ( डाक्का ), नेपाळ इ. देशांचे राजे त्यास कर देत, व त्याच्या आज्ञेंत राहात.

( २ ) दक्षिण दिग्विजय:—उत्तरेकडील आपलें साम्राज्य स्थिर केल्यानंतर समुद्रगुप्तानें आपली दृष्टि दक्षिणेकडे वळविली. दक्षिणेकडील ही

मोहीम त्याच्या उत्तरेंतील मोहिमेपेक्षां अनेक दृष्टींनीं भिन्न आहे. उत्तरेंतील प्रदेश त्यानें साम्राज्यासाठीं जिंकला; तर दक्षिणेंतील राज्यें जिंकून त्यानें तीं पुन्हां स्वतंत्र केलीं. पाटलीपुत्रापासून समुद्रगुप्ताची स्वारी इ. स. ३४७ च्या सुमारास निघाली. तीन वर्षेपर्यंत एकूण ३,००० मैलांचा प्रदेश पायाखालीं तुडवून इ. स. ३५० च्या सुमारास तो पाटलीपुत्रास परत आला. या त्याच्या स्वारींत त्यानें महाकांतार येथील व्याघ्रराज, कोसल देशाचा राजा महेंद्र, केरळ देशाचा राजा मंत्रराज, पिष्टपूर ( गोदावरीच्या कांठीं ) चा महेंद्रगिरी, गिरि-कोट्टुरचा स्वामिदत्त, कांचीचा विष्णुगोप, देवराष्ट्राचा कुबेर इ. बारा राजांशीं युद्ध करून त्यांस जिंकलें. परंतु त्यांपैकीं एकावरही मांडलिकत्व न लादतां त्यानें त्यांचें स्वातंत्र्य त्यांस परत दिलें. असा. असा हा त्याचा दिग्विजय गौरवपूर्ण आहे. युद्ध करून त्यानें आपलें अमोघ सामर्थ्य सिद्ध केलें. परंतु त्याचबरोबर जित राष्ट्रांना सन्मानपूर्वक स्वातंत्र्य देण्यानें आपल्या मनाचा मोठेपणाही त्यानें सिद्ध केला. पराक्रमानें जितका महान् तितकाच तो अंतःकरणानें विशाल होता!

( नकाशा क्र. ७ )

( ३ ) सरहद्दीचा बंदोबस्तः—वायव्य सरहद्दीवर यावेळीं शक कुशानादि परकीय टोळ्या वावरत असत. लुटालूट व जाळपोळ करून येथील प्रजेला त्रास देणें हा त्यांचा उद्योग असे. या टोळ्यांच्या नायकांना, देवपुत्र, शाही, शहानुशाही, मुरुंड अशीं वेगवेगळीं नांवें होतीं. अशा या सर्व टोळ्यांचा पाडाव करून समुद्रगुप्तानें सरहद्दीचा पक्का बंदोबस्त केला.

( ४ ) " आम्ही तुमचे मांडलिक ! ":—

समुद्रगुप्तानें एका पाठोपाठ मिळविलेल्या या विजयांचा परिणाम असा झाला कीं, कित्येक दूरच्या राजांनीं त्याचें मांडलिकत्व स्वीकारण्यासाठीं आपले वकील आपण होऊन त्याच्याकडे पाठविले. लंकेचा राजा मेघवर्मा, गांधार, अंग, वंग इ. देशांचे राजे त्याचे मांडलिक होण्यास अधीर झाले होते. या सर्वांशीं समुद्रगुप्तानें फक्त मैत्रीचा तह केला.

अशा तऱ्हेनें अखिल हिंदुस्थानभर समुद्रगुप्त जवळ जवळ अजातशत्रु

झाला. त्याच्या बलाढ्य साम्राज्याभोंवतीं असलेल्या या दोस्त मंडळामुळें त्याचें वैभव अधिकच खुलून दिसे !

( ५ ) अश्वमेध यज्ञः—

प्राचीन राजे आपलें सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठीं अश्वमेध नांवाचा यज्ञ करीत असत. समुद्रगुप्तानें असा यज्ञ करून आपलें सार्वभौमत्व सिद्ध केलें. अश्वमेध यज्ञ फक्त वैदिक धर्मीय क्षात्रिय राजेच करीत. समुद्रगुप्तानें हा यज्ञ केला यावरून आपल्या वैदिक संस्कृतीचा त्याला किती प्रखर अभिमान होता हें स्पष्ट कळतें.

## ३ समुद्रगुप्ताची कामगिरी

( १ ) साम्राज्य विस्तारः—वरील विवेचनावरून समुद्रगुप्ताच्या साम्राज्याची बरोबर कल्पना येईल. त्याच्या विजयमालिकेवरून आपणांस स्पष्ट बोध होईल कीं, समुद्रगुप्तानें हिंदुस्थानाच्या सर्व भागांतील लोकांस युद्धांत जिंकलें; परंतु त्याच्या प्रत्यक्ष साम्राज्याच्या मर्यादा त्या मानानें अगदींच लहान होत्या. त्याचें साम्राज्य नर्मदेच्या उत्तरेस राजपुताना व वंग या देशांच्या दरम्यानचा प्रदेश एवढेंच मर्यादित होतें. ( नकाशा क्र. ७ पहा ).

( २ ) वैदिक धर्माचें पुनरुज्जीवनः—समुद्रगुप्त वैदिक धर्माचा अभिमानी होता हें वर सांगितलेंच आहे. यावेळीं बौद्ध धर्मीयांत बराच विस्कळितपणा निर्माण झाला होता. बौद्ध तत्त्वें केवळ नाममात्र आचरिलीं जात होतीं. बौद्ध प्रचारकांचा पूर्वींचा उत्साह बराच मावळला होता. बौद्ध मतांत दोन उपपंथ निर्माण होऊन आपसांतील कलह वाढत होते. पूर्वींचा राजाश्रय नाहींसा झाल्यामुळें बौद्ध धर्माविषयीं लोकांत बरेंच औदासिन्य निर्माण झालें होतें. त्यांतच गुप्त राजे वैदिक धर्माचे अभिमानी निघाले. त्यांनीं वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें.

प्राचीन काळीं सामान्यतः राजांचा जो धर्म तोच प्रजेचा म्हणजे राष्ट्राचा धर्म म्हणून मानला जात असे. मौर्य राजे बौद्ध धर्मीय होते म्हणून त्या वेळीं प्रजाही बौद्ध धर्मीयच होती. गुप्त राजे वैदिक धर्मीय म्हणून त्यांची प्रजाही वैदिक धर्मीय बनली. समुद्रगुप्तानें वैदिक धर्माचा प्रचार प्रथम नाण्यांमार्फत

केला. त्याच्या नाण्यांवर लक्ष्मी, सरस्वती, गरुडध्वज, व अश्वमेधाचा अश्व अशीं वैदिक देवतांचीं चित्रें कोरलेलीं होतीं. अश्वमेध यज्ञ फक्त वैदिक धर्मानें पुरस्कृत केला होता. त्या यज्ञाचेंही समुद्रगुप्तानें पुनरुज्जीवन केलें. वैदिक काळांत संस्कृत ही राजभाषा होती. भाषा हें संस्कृतीचें एक प्रतीक मानतात. संस्कृत भाषा वैदिक संस्कृतीचें प्रतीक आहे. समुद्रगुप्तानें याच भाषेचा पुरस्कार करून ती पुन्हां एकदां राजभाषा केली. गुप्तकाळांतील बहुतेक वाङ्मय संस्कृतांमध्येंच लिहिलेलें आहे. वैदिक धर्माच्या प्रचाराच्या दृष्टीनें केलेली आणखी एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे राजधानीचा बदल होय. समुद्रगुप्तानें आपली राजधानी अयोध्येला नेली. ही नगरी त्या वेळीं वैदिक संस्कृतीचें केंद्र म्हणून ओळखिली जात असे. वेदाध्ययन केलेले अनेक पंडित या ठिकाणीं राहात असत. जवळ जवळ एक सहस्र वर्षें आपलें महत्त्व कायम टिकविणाऱ्या पाटलीपुत्र नगरींतून, समुद्रगुप्तानें आपली राजधानी हालविली. म्हणून यापुढें पाटलीपुत्राचें महत्त्व हळुहळू नामशेष झालें. अशा तऱ्हेनें बौद्ध धर्माचें महत्त्व बरेंच कमी करून वैदिक धर्माला उजळा दिला गेल्यानें गुप्तांच्या काळाला 'वैदिक धर्माचा पुनरुज्जीवन काल' असें म्हणतात.

( ३ ) विद्वानांना आश्रयः—हरिसेनाच्या प्रशस्तीमध्यें समुद्रगुप्त स्वतः तीक्ष्ण व कुशाग्र बुद्धिमत्तेचा होता असें त्याचें वर्णन आहे. तो एक श्रेष्ठ दर्जाचा कवि होता. त्याला कविराज असें नांवही दिलेलें आढळतें. स्वतः विद्वान असल्यामुळें तो विद्वानांचा चहाता होता. त्याच्या दरबारांत अनेक विद्वान असत. विद्येप्रमाणेंच तो नृत्य गायनाचाही भोक्ता होता. त्याच्या कांहीं नाण्यांवर स्वतःचे मांडीवर वीणा घेतलेलें चित्र आढळतें. त्यावरून त्यानें विद्येप्रमाणेंच ललितकलांचाही विकास केला असावा असें दिसतें.

( ४ ) आर्थिक विपुलताः—समुद्रगुप्ताचे संबंध ग्रीसपासून चीनपर्यंत सर्वत्र जोडले गेले होते. त्यामुळें व्यापार वाढला, व देशांत संपत्ति खेळूं लागली.

( ५ ) राज्यव्यवस्थाः—पुढील प्रकरणांत राज्यव्यवस्थेची माहिती विस्तारानें दिली आहे.

## समुद्रगुप्ताची योग्यता

गुप्तांच्या इतिहासांत समुद्रगुप्ताचें नांव अग्रगण्य आहे. अतुल पराक्रमी वीर, महान् योद्धा, थोर मुत्सद्दी, स्वधर्मनिष्ठ व परधर्मसहिष्णु राज्यकर्ता, स्वतः विद्यावान् असून विद्वानांचा आश्रयदाता—असा सर्वगुणसंपन्न सम्राट् जगाच्या पाठीवर विरळाच. त्याचें कर्तृत्व बिनतोड आहे. मोठ्या धडाडीनें लढून साम्राज्य स्थापन करणारे वीरपुरुष इतिहासांत अनेक झाले आहेत. परंतु राज्यें जिंकून राजांना त्यांचें स्वातंत्र्य परत देणारा निःस्वार्थी व मोठ्या मनाचा वीरश्रेष्ठ क्वचितच आढळतो. समुद्रगुप्त असा अद्वितीय वीरश्रेष्ठ होता.

इंग्रज इतिहासकार व्हिन्सेन्ट स्मिथ् समुद्रगुप्ताचा गौरव करतांना 'भारतीय नेपोलियन' या नांवानें त्याचा उल्लेख करतो. आमच्या दृष्टीनें ही तुलना अयोग्य आहे. स्मिथ्ला समुद्रगुप्ताबद्दल नेपोलियनइतका आदर वाटतो हें कौतुकास्पद आहे. परंतु आमच्या मतें समुद्रगुप्त नेपोलियनापेक्षां अनेक पटींनीं श्रेष्ठ आहे. पराक्रम व युद्धकलानैपुण्य या दोन बाबतींत कदाचित् दोघेही समतोल ठरतील. आपण या तुलनेचा थोडा अधिक विचार करूं.

या दोघांमध्यें अधिक दिसून येणारा महत्त्वाचा फरक असा कीं, समुद्रगुप्त अखंड विजयी होता, तर नेपोलियन शेवटीं अपयशी ठरला. शत्रूचा कैदी होऊन त्यास मरावें लागलें. जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा नेपोलियन अत्यंत हालअपेष्टा व अपमान सहन करीत अगदीं सामान्य माणसांप्रमाणें मरण पावला. तर समुद्रगुप्तानें आपला देश पूर्णपणें वैभवसंपन्न झालेला पाहिला, आणि अशा आपल्या वैभवशाली मातृभूमीच्या अंकावर शांतपणें डोकें ठेवून त्यानें सौख्यपूर्ण मरण पत्करलें.

दुसरा महत्त्वाचा फरक त्यांच्या मनोवृत्तींत आढळतो. नेपोलियननें स्वतःची वैयक्तिक महत्त्वाकांक्षा पुरी करण्यासाठीं दुसऱ्याचें स्वातंत्र्य हरण केलें. समुद्रगुप्तानें देशांतील अव्यवस्था व गोंधळ नाहींसा करण्यासाठीं प्रथम एकछत्री सत्ता स्थापन केली, व नंतर आपलें सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठीं अनेक राजांना जिंकलें. परंतु लगेच त्यानें त्यांचें स्वातंत्र्य त्यांस परत केलें. दुसऱ्यांना

आपले गुलाम बनविणारी साम्राज्यशाही आणि दुसऱ्यांचें स्वातंत्र्य कायम राखणारी साम्राज्यशाही यांच्यांत तुलना कशी व्हावी ?

तिसरा फरक त्यांच्या कर्तृत्वांत दिसून येतो. विद्या, कला, व्यापार, राज्यव्यवस्था इ. सर्व बाबतींत समुद्रगुप्तानें देशाचा उत्कर्ष केला. नेपोलियनानें विद्येला उत्तेजन दिलें. परंतु एकंदरींत देशाचा उत्कर्ष होण्याऐवजीं त्याच्यामुळें देश रसातळालाच गेला असें म्हणावें लागेल.

शेवटीं, दोघांच्याही चारित्र्याचा विचार केल्यास दोघे दोन टोकांना उभे असलेले दिसतील. समुद्रगुप्ताचें शील स्फटिकाप्रमाणें स्वच्छ होतें. नेपोलियनच्या कुशीलाचें वर्णन न केलेलेंच बरें.

सारांश, नेपोलियनइतका पराक्रमी व अद्वितीय राज्यकर्ता असूनही समुद्र-गुप्ताच्या अंगीं स्वधर्मनिष्ठा, विद्याभिरुचि, चारित्र्य संपन्नता इत्यादि दुसरे अनेक सद्गुणही एकवटले होते.

## उतारा

समुद्रगुप्ताच्या व्यक्तिमत्वाविषयीं मंजुश्री मुलाकल्पाचा कर्ता महायान बौद्ध यानें व्यासंगपूर्ण आणि लक्षवेधक माहिती दिली आहे. तो म्हणतो, ‘ गुप्त घराण्यांतील सम्राटांची मालिका समुद्रगुप्ताच्या नांवापासून सुरू होते. हा पुरुषश्रेष्ठ कडक शिस्तीचा, सर्वदक्ष, स्वयंनिष्ठ, पारलौकिकाविषयीं निष्काळजी असणारा आणि पशूंचें बलिदान करणारा होता. ’ समुद्रगुप्तानें सैन्यसत्तेचा अतिरेक केला नाहीं. त्याचे दक्षिण दिग्विजय त्याच्या शांततेच्या अखंड धोरणाची साक्ष देतात. श्री. अय्यंगार म्हणतात ‘ राज्यें गिळंकृत करणें हें राजाचें कर्तव्य आहे असें समजणारा तो एक नेपोलियन होता असें म्हणणें हें अत्यंत अन्यायाचें आहे. ’

‘ **गुप्तांचा इतिहास** ’ प्रा. रा. ना. दांडेकर, एम्. ए. पीएच्. डी.

## थोडक्यांत

( १ ) गुप्त घराणें:—संस्थापक श्रीगुप्त.

साम्राज्य संस्थापक:—पहिला चंद्रगुप्त इ. स. ३२०–३३० लिच्छवी राज्यकन्या कुमारदेवीशीं विवाह. लिच्छवी लोकांच्या

मदतीनें साम्राज्यविस्तार. गुप्तसंवत् सुरू. इ. स. ३२० नाणीं पाडलीं.

( २ ) सम्राट् समुद्रगुप्तः—इ. स. ३३०–३७५.

विजय-मालिकाः—( अ ) उत्तरेकडील विजय.

( आ ) दक्षिण-दिग्विजय-विजय-यात्रा, स्वातंत्र्य परत दिलें.

( इ ) सरहद्दीचा बंदोबस्त.

( ई ) सख्यत्वाचा तह-गांधार, अंग, वंग, लंका.

( उ ) अश्वमेध.

( ऊ ) वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन.

( ए ) विद्वानांना आश्रय—स्वतः कविराज.

योग्यताः—नेपोलियनापेक्षांही श्रेष्ठ.

( इ ) प्रश्नः—( १ ) समुद्रगुप्ताला ‘ भारतीय नेपोलियन ’ कां म्हणतात ? ही उपमा सार्थ आहे काय ? कां ?

( २ ) समुद्रगुप्ताची कामगिरी व योग्यता लिहा.

( ई ) स्वाध्यायः—हिंदुस्थानाचा नकाशा काढून त्यांत समुद्रगुप्ताचें साम्राज्य, व सभोंवारचीं मित्रराष्ट्रें निरनिराळ्या रंगांत दाखवा.

## प्रकरण ९ वें

# भारताचें सुवर्णयुग

१ वैभवशाली विक्रम.
२ ठळक विशेष–सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक.
३ फा–हेनचें वर्णन.

### १ वैभवशाली विक्रम ( इ. स. ३८०--४१३ )

समुद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर इ. स. ३७५ त त्याचा वडील मुलगा रामगुप्त अयोध्येच्या गादीवर आला. परंतु त्याच्या अपमृत्यूमुळें इ. स. ३८० त त्याचा धाकटा भाऊ दुसरा चंद्रगुप्त यास गादीवर बसणें भाग पडलें. तोच आपला प्रख्यात विक्रमादित्य. रामगुप्तापेक्षां चंद्रगुप्त अधिक पराक्रमी व कर्तृत्ववान् होता. रामगुप्ताच्या राजवटींत पश्चिमेकडील क्षत्रप पुन्हां प्रबळ झाले. या वेळीं शकसम्राट् रुद्रसिंह माळव्यावर राज्य करीत होता. तो अतिशय बलाढ्य होता. त्यानें रामगुप्तावर स्वारी करून मोठा बिकट प्रसंग निर्माण केला होता. रामगुप्त त्याच्या कैदेंतच पडावयाचा; पण शूर चंद्रगुप्तानें या प्रसंगांतून त्याची मोठ्या कौशल्यानें सुटका केली. त्यामुळें रामगुप्तापेक्षां चंद्रगुप्ताविषयीं लोकांच्या मनांत अधिक आदर व विश्वास वसत असे. पुढें तो गादीवर आल्यावर त्यानें केलेल्या महनीय कामगिरीमुळें तो आदर शतगुणित झाला असल्यास नवल नाहीं.

चंद्रगुप्त गादीवर आला त्या वेळीं साम्राज्यांत सर्वत्र शांतता होती. समुद्रगुप्तानें स्वपराक्रमानें निर्माण केलेला वचक अद्याप बहुतेक ठिकाणीं कायम होता. मात्र पश्चिमेकडील शकांचें प्राबल्य बरेंच वाढलें होतें. त्यांचें पुरतें

निर्दालन केल्याशिवाय गुप्त साम्राज्याला स्वास्थ्य लाभणें शक्य नव्हतें. शक तेवढेच गुप्तांचे एक बलाढ्य शत्रू होते. त्यांचें प्राबल्य हा गुप्तसाम्राज्याला कलंक होता. तो धुवून टाकून आपली कीर्ति धवल करणें हें चंद्रगुप्ताचें पहिलें कर्तव्य होतें. शिवाय, अशोकाप्रमाणें जगद्वंद्य होण्याची त्यास महत्त्वाकांक्षा होती. अशोकासारखा तो विद्वान्, रसिक व पराक्रमी होता. मात्र दोघांचीं ध्येयें भिन्न होतीं. अशोक राजभिक्षु होता; तर चंद्रगुप्त ऐश्वर्यसंपन्न सम्राट् होता. अशोकानें बौद्ध धर्माची ध्वजा विश्वविजयी केली; तर चंद्रगुप्तानें आपल्या सुवर्णयुगाची पताका जगभर मोठ्या डौलानें मिरविली. अशोक सात्विकतेची तेजस्वी मूर्ति; तर चंद्रगुप्त क्षात्रतेजाचा मूर्तिमंत तेजोगोल. भिन्न प्रवृत्तींचीं ही दोन प्रतीकें जगाला सदैव ललामभूत राहातील.

चंद्रगुप्ताचा विक्रम:—

( १ ) शकांचें निर्मूलन:—इ. स. ३८०–३९२. माळवा हें प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत म्हणजे अगदीं अलीकडे सुद्धां साम्राज्याचें अधिष्ठान मानितात. हा प्रांत अत्यंत सुपीक व सधन आहे. भारतीय साम्राज्याला हा प्रांत मध्यवर्ति आहे. त्यामुळें माळव्यावर सर्व सत्ताधीशांची नेहमींच दृष्टि लागून राही.

या वेळीं माळव्यावर शकराजा तिसरा रुद्रसिंह राज्य करीत होता. त्याच्या ताब्यांत माळवा, सौराष्ट्र, कोंकण व सिंध एवढा प्रदेश असून उज्जयिनी त्याची राजधानी होती. तो प्रबळ झाला असून गुप्तसाम्राज्याला धक्के देऊं लागला होता. म्हणून चंद्रगुप्तानें गादीवर आल्याबरोबर त्याच्यावर स्वारी केली. सुमारें बारा वर्षेपर्यंत ही मोहीम चालू असावी. शेवटीं चंद्रगुप्तानें शकांचा पूर्ण पराभव करून त्यांना सिंधू नदीच्या पलीकडे हाकलून लाविलें. माळव्याचें राज्य त्यानें आपल्या साम्राज्यांत समाविष्ट करून टाकिलें. अशा तऱ्हेनें जवळ जवळ तीन शतकें भारतांत वास्तव्य करून राहिलेल्या शकांचें उच्चाटन करण्यांत चंद्रगुप्ताला यश मिळालें. या त्याच्या कामगिरीबद्दल त्यास 'शकारि' असें नांव दिलें जातें. या वेळेपासून चंद्रगुप्तानें आपली राजधानी उज्जयिनीला आणिली. त्यामुळें चंद्रगुप्ताच्या राज्याचें वैभव फारच वाढलें.

(२) अश्वमेध यज्ञः—पश्चिमेकडील शकांवर विजय मिळविल्यावर चंद्रगुप्तानें अश्वमेध यज्ञ करून आपलें यश प्रसिद्ध केलें.

(३) आणखी स्वाऱ्याः— या वेळीं पंजाबकडील प्रदेशांत हूणांचा शिरकाव होऊं पाहात होता. हूण हे शक-कुशानांचा पाठलाग करीत मध्य आशियांतून इकडे आले. अद्याप ते हिंदुस्थानांत स्थिर झाले नव्हते. त्यांच्या कांहीं टोळ्या सरहद्दीवर व पंजाबांत धुमाकूळ घालीत होत्या. चंद्रगुप्तानें त्यांच्यावर स्वारी करून त्यांचा बंदोबस्त केला. त्यानंतर त्यानें वंग देशावर स्वारी करून तो देशही जिंकिला. या विजयानंतर त्यानें 'विक्रमादित्य' (पराक्रमाचा सूर्य) ही पदवी धारण केली.

(४) 'विक्रम–संवत्':— विक्रमादित्य आतां माळव्याचाही अधिपति झाला होता. पूर्वीं एका पराक्रमी मालवाधिपतीनें इ. पू. ५७ मध्यें 'मालव-संवत्' नांवाची कालगणना सुरू केली होती. तीच कालगणना विक्रमादित्यानें पुन्ह 'विक्रम-संवत्' या नांवानें चालू केली. ती उत्तर हिंदुस्थानांत आजही रूढ आहे. आज २००२ विक्रमसंवत् चालू आहे.

(५) विद्या व कला यांस उत्तेजनः— विक्रमादित्याचा दरबार विद्वान् व कलावान् लोकांचें आश्रयस्थान होता. त्याच्या दरबारांत अनेक विद्वानांचा परामर्ष घेतला जात असे. तरीपण त्याच्या दरबारांतील नऊ पंडित 'नवरत्नें' या नांवानें प्रसिद्ध आहेत. हीं नवरत्नें सुवर्णयुगाचीं नऊ सुवर्णभूषणेंच होत. त्यांची थोडक्यांत ओळख अशीः—

(१) कालिदासः—नवरत्नहारांतील हा मेरुमणि होय. त्याची कीर्ति इंग्लंडमधील शेक्सपियरप्रमाणें अमर आहे. तो उत्तम नाटककार व प्रतिभासंपन्न कवि म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या नाटकांपैकीं शाकुंतल, मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय इ. नाटकें व रघुवंश, मेघदूत इ. काव्यग्रंथ सर्वश्रुत आहेत. शाकुंतलची प्रशंसा तर पाश्चिमात्य पंडितही मुक्तकंठानें करितात. गटे नांवाचा जर्मन पंडित शाकुंतल वाचून हर्षानें नाचूं लागला असें सांगतात.

(२) विशाखदत्त–मुद्राराक्षस नाटकाचा कर्ता. (३) अमरसिंह—अमरकोशकार. (४) वराहमिहिर—ज्योतिषशास्त्रज्ञ. (५) वररुचि—वैय्या-

करणी. ( ६ ) धन्वंतरी–वैद्य. ( ७ ) क्षपणक–फलज्योतिषी. ( ८ ) शंकु–शिल्पकार. ( ९ ) वेतालभट्ट–मांत्रिक.

सारांश, वरील सर्व विद्वान् विज्ञानाच्या वेगवेगळ्या शाखांचे प्रणेते होते. त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांत ते आदर्श ठरले आहेत, आणि त्यांनीं घालून दिलेल्या मार्गांचें आजही सर्वत्र अनुकरण केलें जात आहे.

( ६ ) व्यापाराची भरभराटः––उज्जयिनी शहर या काळांत व्यापाराचें केन्द्र बनलें होतें. माळव्यासारख्या समृद्ध देशाची ती राजधानी असल्यामुळें येथूनच जगांतील व्यापाराच्या बऱ्याच उलाढाली केल्या जात असत. येथून भडोच, खंबायत, सोपारा या प्रसिद्ध बंदरांतून रोमपर्यंतच्या अतिदूरच्या प्रदेशांतही माल जात असे. हिंदुस्थानांतील मालाला जगाच्या बाजारपेठेंत बरीच मागणी असे. रेशमी व इतर तलम कापड, धान्यें व मसाल्याचे पदार्थ, तसेंच नाना प्रकारचे मूल्यवान जिन्नस या देशांतून बाहेर जात. जगाचा असा कोणताही भाग नाहीं कीं ज्या ठिकाणीं येथील माल जात नसे. त्यामुळें मागणीप्रमाणें पुरवठा करण्यासाठीं कारखाने व उद्योगधंदे यांची बेसुमार वाढ झाली होती. रेशीम तयार करणाऱ्या विणकऱ्यांचे मोठमोठे संघ त्या वेळीं स्थापन झाले होते. अशा संघांना राजाकडून सर्व तऱ्हेचें प्रोत्साहन मिळे. सारांश, हिंदुस्थानाचा व्यापार या वेळीं इतका भरभराटीला आला होता कीं, देशांत सर्वत्र सोन्याचा जणुं धूर निघत असे. उज्जयिनी तर अक्षरशः सुवर्णनगरी बनली होती.

( ७ ) प्रजाहिताचीं कामेंः––प्रजेच्या सोयीसाठीं ठिकठिकाणीं दवाखान्यांची व औषधांची व्यवस्था होती. सर्वांस धर्मस्वातंत्र्य होतें. विक्रमादित्य वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता. त्याच्या नाण्यांवरही लक्ष्मी, छत्रचामरादि चिन्हें इ. चित्रें असत. परंतु त्यानें इतर पंथीयांना सुद्धां ममतेनें वागविलें. प्रजेच्या सोयीसाठीं त्यानें ठिकठिकाणीं देवालयें, स्तूप, संघाराम व धर्मशाळा बांधिल्या. अशा तऱ्हेनें प्रजेचें पालन करणारा, विद्याकलांचा भोक्ता, व सुवर्णयुगाचा पराक्रमी सम्राट् विक्रमादित्य इ. स. ४१३ त परलोकवासी झाला. याच्या राजवटींत फा–हेन नांवाचा चिनी प्रवासी हिंदुस्थानांत आला होता. त्यानें

येथें जें जें पाहिलें त्याचें वर्णन लिहून ठेविलें आहे. त्याची त्रोटक माहिती या प्रकरणाच्या शेवटीं दिली आहे. ( आलेख )

## २ ठळक विशेष

( अ ) सामाजिक परिस्थिति—या काळांत जातिसंस्था स्थिर झाल्या होत्या. जन्मानें श्रेष्ठत्व मानलें जात असे. त्यामुळें उच्च-नीचतेचा वाद बराच माजला होता. तरीपण ब्राह्मणांना बराच मान होता. उच्च वर्णांतील लोक आचार-विचारांनीं उच्चच होते. लोक सामान्यतः शीलवान्, विद्यावान् व धनवान् होते. 'चांडाळाशिवाय कोणीही दारू पीत नाहींत आणि हिंसा करीत नाहींत, मांस खात नाहींत. फक्त चांडाळ शिकार करितात.' असें फा—हेननें वर्णन केलें आहे. स्त्रियांचें स्थान मात्र अगदीं कनिष्ठ समजलें जाई. 'स्त्रियांना चावकाखालीं ठेवीत', असे उल्लेख तत्कालीन ग्रंथांतून आढळतात.

( आ ) राजकीय परिस्थिति—गुप्तांच्या राज्यपद्धतीला परोपकारी राजसत्ता म्हणतां येईल. गुप्त राजे प्रधानमंडळाच्या सहकार्यानें राज्यकारभार चालवीत. परंतु पुष्कळ वेळां ते अनियंत्रित सत्ताही उपभोगीत असत. मात्र गुप्त राजांचा अंमल जुलमी कधींच झाला नाहीं. फा—हेन म्हणतो, 'हिंदुस्थानांतील लोक अतिशय सुखी आहेत. त्यांवर सरकारी निर्बंध फार कमी आहेत. कर अत्यल्प आहेत. शारीरिक शिक्षांचें प्रमाण अत्यंत कमी आहे; फक्त दंडाची शिक्षा दिली जाते.' यावरून गुप्त राजांचा काळ शांततेचा व सुखाचा होता असें दिसतें.

मौर्य राज्यव्यवस्थेप्रमाणेंच गुप्तांच्या राज्यव्यवस्थेचे वेगवेगळे विभाग होते. प्रत्येक विभाग आपलें काम चोख बजावीत असे. सर्व विभागांवर राजाची देखरेख असे. राज्याचे प्रादेशिक विभाग पाडून त्यांवर उपरिक, विशयपति असे अधिकारी असत. नगराच्या प्रमुखास नगरश्रेष्ठी म्हणत.

( इ ) आर्थिक परिस्थिति—गुप्तांचें साम्राज्य ऐश्वर्यानें नटलेलें होतें. राज्यांत मोठीं नगरें बरींच असून तेथील लोक श्रीमंत, दयाशील व कर्तव्यतत्पर होते. ठिकठिकाणीं विनामूल्य दवाखाने असून अनाथ, पोरकीं पोरें व विधवा यांचें संगोपन करण्यासाठीं अनाथालयेंही चालविलीं जात.

गुप्त काळांत हिंदुस्थानाचा व्यापार बराच भरभराटीस आला होता. रोम, इजिप्त, सीरिया, इराण, चीन, मलाया, जावा, इ० पूर्व-पश्चिम देशांशीं हिंदुस्थानाचा व्यापार चाले. त्यामुळें देशांत अगणित संपत्ति खेळत असे. बाहेरच्या व्यापाराप्रमाणें हिंदुस्थानाचा अंतर्गत व्यापारही बराच वाढला होता. बाहेर विक्रीसाठीं पाठवावयाच्या मालाचे असंख्य कारखाने काढण्यांत आले होते. व्यापाराच्या वस्तू अगणित होत्या. दक्षिण हिंदुस्थानांतून द्विदळधान्यें, दालचिनी, अत्तरें, हस्तिदंत, हिरे, मलमल इ. माल रोमला जाई. तसेंच भडोच बंदरांतून कापड, रेशीम, हिरे, माणकें, मोतीं, इमारती लाकूड, चिनी मातीचीं भांडीं इ. माल बाहेर पाठविला जाई.

( ई ) धार्मिक परिस्थितिः—गुप्त काळाला वैदिक संस्कृतीचा पुनरुज्जीवन काल म्हणतात. सुमारें एक सहस्र वर्षें अव्याहतपणें चालत आलेल्या बौद्ध धर्माच्या ओघाला गुप्त राजांनीं प्रतिबंध घालून वैदिक धर्माला जोरानें चालना दिली. त्यासाठीं त्यांनीं अनेक धार्मिक उत्सव-समारंभ सुरू केले, मूर्तिपूजेला प्राधान्य दिलें, व संस्कृत भाषेचा पुरस्कार करून वैदिक धर्मतत्त्वांचा प्रचार केला. गुप्तराजे बहुधा वैष्णव होते. बौद्ध धर्मीय प्रचारकच उदासीन राहिल्यामुळें त्या धर्माचें महत्त्व बरेंच कमी झालें होतें. शिवाय परकीय टोळयांनीं बौद्ध मठांचा विध्वंस करून कपिलवस्तु, कुशीनगर, व गया यांसारखीं बौद्ध धर्माचीं केंद्रस्थानें जवळ जवळ उजाड केल्यामुळें बौद्ध धर्माला उतरती कळा लागली. तसेंच त्याचा राजाश्रयही नाहींसा झाला. वैदिक धर्माला राजाश्रय मिळाल्यामुळें त्याची आपोआप प्रगति होऊं लागली. जैन धर्म अखिल भारतीय केव्हांच झाला नव्हता. त्याचा प्रसार पश्चिम भारतापुरताच मर्यादित होता.

वैदिक धर्माला चालना देणारे संस्कृत भाषेंतील अनेक ग्रंथ याच काळांत लिहिले गेले. कालिदास, विशाखदत्त, शूद्रक, भारवी, दंडी, अमरसिंह इत्यादि विद्वान् साहित्यिकांचा हा काळ होता. आतांपर्यंत कोणत्याही काळांत झाली नाहीं एवढी प्रगति विज्ञान व वाङ्मय या बाबतींत या काळांत झाली. वृद्ध वाग्भट, आर्यभट्ट, इ. थोर शास्त्रज्ञ याच काळांत झाले. अशा तऱ्हेनें

धार्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या भारताचा दर्जा गुप्तकाळांत बराच उच्च होता यांत शंका नाहीं.

निष्कर्षः—गुप्तकाळ हे भारतवर्षाचें सुवर्णयुग होय.

## ( ३ ) फा–हेननें केलेलें वर्णन

फा–हेनः—हा एक चिनी प्रवासी होता. यात्रेच्या निमित्तानें तो हिंदुस्थानांत आला. इ. स. ३९९–४१४ या काळांत त्याचें या देशांत वास्तव्य होतें. चीनमधून पायीं प्रवास करीत तो उत्तर हिंदुस्थानांत आला. हिंदुस्थानांतही त्यानें पायींच हिंडून येथील परिस्थितीचें निरीक्षण केलें; आणि तें सर्व त्यानें संकलित करून ठेविलें आहे. त्याच्या प्रवासाचा मार्ग मध्य चीन, गोबीचें वाळवंट, खोतान, काश्गर, उद्यन, गांधार, पंजाब अशा प्रदेशांतून होता. नंतर तो मथुरा येथें येऊन पोहोंचला. फा–हेन स्वतः बौद्ध असल्यानें ठिकठिकाणची बौद्ध धर्माची परिस्थिति अवलोकन करणें हें त्याचें एक मुख्य काम होतें. हिंदुस्थानांत आल्यावर त्यानें कनोज, अयोध्या, श्रवस्ती, कपिलवस्तु, कुशीनगर, वैशाली व पाटलीपुत्र अशा प्रमुख शहरांना भेटी दिल्या. मगधांत ठिकठिकाणीं त्यानें अशोकाच्या वेळचे स्तंभ व दवाखाने पाहून त्याबद्दल कौतुक व्यक्त केलें. पाटलीपुत्र येथें तो तीन वर्षें राहिला. तेथें त्यानें संस्कृत भाषेचा अभ्यास केला. त्याचा येथें येण्यांत बौद्ध तत्त्वांचें परिशीलन करणें हा मुख्य हेतु होता. त्याच्या मतें तो पूर्णपणें सफल झाला. तसेंच गुप्तकालीन राज्यव्यवस्थेचें त्यानें केलेलें वर्णनही तत्कालीन परिस्थितीचें प्रत्यक्षपणें निदर्शक असल्यानें ऐतिहासिक दृष्ट्या त्यास बरेंच महत्त्व आहे.

त्यानें केलेल्या वर्णनांतील कांहीं ठळक गोष्टीः—

( १ ) "...येथील लोक संपन्न असून सुखी आहेत. त्यांच्यावर सरकारचीं फारशीं बंधनें नाहींत. ज्याला जेथें जावेंसें वाटेल तेथें त्यानें जावें. शिक्षांचें प्रमाण फारच कमी असून देहदंड क्वचितच दिला जातो. फार मोठ्या गुन्ह्याबद्दल जास्तींत जास्त कडक शिक्षा म्हणजे उजवा हात तोडणें ही होय."

( २ ) "...गुप्तांची राज्यव्यवस्था अत्युच्च प्रतीची आहे. राजा

प्रधानमंडळाच्या सल्ल्यानुसार राज्यकारभार करितो. तरी पण राजे बऱ्याच प्रमाणांत अनियंत्रित सत्ता गाजवितात. मात्र त्यांचा कारभार जुलमी नसतो. लोकांना चोरांचिलटांची सुद्धां भीति नाहीं."

( ३ ) "...चांडाळाशिवाय इतर कोणीही दारू पीत नाहींत. कांदा–लसूण खात नाहींत, हिंसा करीत नाहींत, मांस खात नाहींत."

( ४ ) "...अनाथ व अपंग लोकांसाठीं दवाखाने काढलेले आहेत. त्यांस तेथें फुकट औषध मिळतें."

( ५ ) "...नगरें मोठीं व गजबजलेलीं असून तेथें भव्य वाडे, दवालयें, स्तूप व स्तंभ अशा सुंदर इमारती दृष्टीस पडल्या. कांहीं ठिकाणीं लांबच लांब अशा वैभवपूर्ण मिरवणुकीही आढळल्या." इ.

## उतारे

महान् विक्रम !

"विक्रमाच्यासंबंधीं विद्वानांमध्यें मोठमोठे अपसमज प्रसृत झालेले आहेत; परंतु जगाच्या कोणत्याही इतिहासांत आणि साहित्यांत न्यायपरायणता, उदारता, लोकप्रियता, परदुःखभंजन इत्यादि विक्रमाच्या गुणांविषयीं विपुल विवरण सांपडतें. हेंच त्याच्या अस्तित्वाचें व अपूर्व लोकप्रियतेचें प्रत्यक्ष प्रमाण आहे."

विश्वाराध्य विक्रम !

'पुरातन संस्कृत साहित्याबरोबरच प्राकृत, पैशाची व अपभ्रंश साहित्यांत, त्याचप्रमाणें अल्बेरूनी इत्यादि विदेशी प्रवाशांच्या भिन्न दृष्टिकोनाने केलेल्या विवरणामध्यें कोठेंही शताब्दीपूर्वींसुद्धां 'विक्रम' या नांवाव्यातिरिक्त किंवा उपाधिरूपानें अन्य प्रकारें विक्रमाचा उल्लेख सांपडत नाहीं. युनानी, अरबी साहित्याच्या इतिहासांत सुद्धां विक्रमाचें 'विक्रमादित्य' हेंच नांव मान्य केलेलें आहे.'

संपादकीय : **विक्रम विशेषांक,**
संपादक : **सूर्यनारायण व्यास.**

## थोडक्यांत

दुसरा चंद्रगुप्त ( विक्रमादित्य ):—इ. स. ३८०–४१३

कामगिरी:—( १ ) शकांचें निर्मूलन–माळव्याचें राज्य जिंकिलें.
( २ ) अश्वमेध केला.
( ३ ) पंजाब व वंग देश जिंकिले.
( ४ ) 'विक्रम-संवत्' सुरू केला.
( ५ ) विद्या व कला यांस उत्तेजन—'नवरत्नांचा हार.'
( ६ ) व्यापाराची भरभराट—उज्जयिनी व्यापाराचें केंद्र.
( ७ ) प्रजाहिताचीं कामें—मोफत दवाखाने, स्तूप, संघाराम, धर्मस्वातंत्र्य इ.

सुवर्णयुगाचे ठळक विशेष:—(१) सामाजिक-जातिसंस्था स्थिर, ब्राह्मणांना मान इ.
(२) राजकीय-उच्च प्रतीची राज्यव्यवस्था.
(३) आर्थिक-व्यापारामुळें संपन्न स्थिति.
(४) सांस्कृतिक-वैदिक संस्कृतीचें महत्त्व वाढलें.

फा–हेन:—चिनी प्रवासी–भारतांत वास्तव्य—इ. स. ३९९–४१४. सर्व परिस्थितीचें सविस्तर वर्णन.

प्रश्न—( १ ) दुसऱ्या चंद्रगुप्तानें विक्रमादित्य नांव कां धारण केलें ? तें सार्थ कसें ?
( २ ) गुप्तकाळांतील 'सुवर्ण'युग कोणतें ? या युगांतील ठळक विशेष सांगा.
( ३ ) गुप्तकालीन सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीचें थोडक्यांत वर्णन करा.
( ४ ) टीपा लिहा:—रुद्रसिंह, उज्जयिनी, फा–हेन.

स्वाध्याय:—'सिंहासनबत्तिशी' करमणुकीसाठीं वाचा.

## प्रकरण १० वें

# गुप्त साम्राज्याचा अस्त

( १ ) शेवटचे गुप्त राजे.
( २ ) हूण लोक.
( ३ ) साम्राज्य मोडलें.

### १ शेवटचे गुप्त राजे

पांचव्या शतकाचा पूर्वार्ध अत्यंत शांततेंत गेला. गुप्तांचें साम्राज्य या वेळीं वैभवशिखरावर विराजलेलें होतें. सम्राट् समुद्रगुप्ताच्या दिग्विजयाच्या दुंदुभि अद्याप सर्वत्र निनादत होत्या. विक्रमादित्याच्या विजयपताका अद्याप पूर्वीच्याच डौलानें फडकत होत्या. व्यापार भरभराटलेला होता; वैदिक संस्कृतीचे प्रचारक आपलें कार्य अविरतपणें करीत होते. सारांश, विक्रमादित्याच्या मृत्यूनें परिस्थितींत कोणताही बदल घडवून आणिला नव्हता. तरीपण हें वैभव पुढें फक्त अर्ध शतकच टिकून राहिलें. पुढील गुप्त राजे पराक्रमी नव्हते. त्यामुळें परकीय हूणांचें फावलें, आणि, त्यांनीं या वैभवपूर्ण साम्राज्याचा नाश केला.

दुसऱ्या चंद्रगुप्ताच्या ( विक्रमादित्याच्या ) मृत्यूनंतर त्याचा मुलगा पहिला कुमारगुप्त गादीवर आला. कुमारगुप्तानें इ. स. ४१३-४५५ पर्यंत राज्य केलें. तोही चांगला कर्तृत्ववान होता. त्यानें गुप्तांचें वैभवस्थान कायम राखिलें. अश्वमेध यज्ञ करून त्यानें आपलें अजिंक्यपद सिद्ध केलें. आपल्या नांवाचीं अनेक प्रकारचीं नाणीं त्यानें पाडिलीं त्याच्या नाण्यांवर गरुडध्वज व इतर वैदिक देवतांचीं चित्रें असत. त्यानें महेंद्रादित्य हें नांव धारण केलेलें आढळतें. त्याच्या कारकीर्दींत रेशमाचा धंदा विशेष जोरांत चालला होता. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या वर्षीं हूणांनीं या देशावर स्वारी केली. हूणांचा प्रतिकार करीत

असतांना कुमारगुप्त इ. स. ४५५ त मारला गेला. त्याचा मुलगा स्कंदगुप्त यानें हूणांची ही स्वारी परतवून लाविली. भीतरी येथील शिलालेखावरून असें कळतें कीं, स्कंदगुप्तानें एक रात्र उघड्या मैदानांत पडून विचार करण्यांत घालविली, आणि दुसऱ्या दिवशीं आपल्या पित्याच्या नाशाचा सूड घेण्याच्या निश्चयानें हूणांवर त्यानें स्वारी केली; आणि विजय मिळविला. स्कंदगुप्त (इ. स. ४५५–४६७) हाच शेवटचा पराक्रमी गुप्त सम्राट् होय. त्याच्यानंतर गुप्त साम्राज्य खिळखिळें झालें. केवळ नाममात्र त्याचें अस्तित्व इ. स. ६०० पर्यंत टिकून होतें. अशा या साम्राज्याला उतरती कळा आणणाऱ्या हूणांचा आपण थोडक्यांत परिचय करून घेऊं.

## २ हूण लोक

शक व यूची लोकांसारखेच हूण हे रानटी लोक होत. तेही टोळ्या टोळ्यांनीं जगभर भटकत असत. या हूणांनीं इ. स. ३७५-४५३ या काळांत युरोपभर मोठा धुमाकूळ घातला. हूणांच्या अनेक टोळ्या मध्य आशियांतून बाहेर पडलेल्या आढळतात. यावरून त्यांचें मूळ वसतिस्थान मध्य आशियांत कोठें तरी असावें असें वाटतें. हे लोक बरेच पराक्रमी असावेत. इ. स. ४८४ त यांच्या एका टोळीनें इराणचा ससेनियन् राजा फिरोज याचा नाश करून त्याच्या ताब्यांतील सर्व प्रदेश जिंकून शिवाय काबूलपर्यंत मजल मारिली. दुसरी एक टोळी इ. स. ४५५ त हिंदुस्थानांत आली; परंतु स्कंदगुप्तानें तिला परतवून लाविलें. पुढें इराण जिंकून आलेली टोळी पुन्हां हिंदुस्थानावर चालून आली. त्यांचा पुढारी तोरमण नांवाचा होता. त्यानें इ. स. ५०० च्या सुमाराला माळवा काबीज केला, आणि महाराजाधिराज पदवीही धारण केली. इ. स. ५०२ त तो मरण पावला; व त्याचा मुलगा मिहिरगुल (सूर्यफूल) गादीवर आला. मिहिरगुलाची राजधानी शाकल म्हणजे हल्लींचें सियालकोट येथें होती. मिहिरगुलाचें राज्य पूर्वेकडे खोतानपर्यंत पसरलेलें होतें. इ. स. ५१९ त त्याच्या दरबारांत सॉंग्-यून नांवाचा चिनी वकील आला होता. मिहिरगुल चीनच्या बादशहाचा मांडलिक असावा असें दिसतें. धाकट्या भावानें इ. स. ५३३ त

त्याच्यावर स्वारी करून त्याच्या गादीचा अपहार केला. त्यामुळें त्याला काश्मीरच्या राजाच्या आश्रयाला जावें लागलें. पुढें संधि साधून तो आपल्या आश्रयदात्यावरच उलटला, आणि काश्मीरचें राज्य त्यानें हस्तगत केलें.

हूण लोक स्वभावानें अतिशय क्रूर, दुष्ट व कृतघ्न होते. त्यांनीं बौद्ध भिक्षूंचा छळ केला, इतर लोकांच्या क्रूरपणानें कत्तलीही केल्या, त्यांचीं मंदिरें उध्वस्त केलीं, आणि पवित्र ग्रंथ जाळून टाकिले. तक्षशीलेचें भव्य विश्वविद्यालय हूणांनींच जमीनदोस्त केलें. या सर्व कृत्यांचा जनक मिहिरगुलच होय. सत्यनाथ अय्यर म्हणतात कीं, "मिहिरगुल हा मानवी आकृति धारण केलेला सैतान असून त्याला 'हिंदुस्थानाचा ॲटिल*' असें दिलेलें नांव सार्थ होतें."

मिहिरगुल इ. स. ५४२ त मरण पावला. त्याच्या क्रूरपणाची द्योतक अशी एक काश्मिरी कथा सांगतात कीं, तो केवळ करमणुकीखातर हत्तींना डोंगरावरून खालीं ढकलून देई, आणि त्यांचे हाल मोठ्या मजेनें पाही.

हूणांचा नाशः—हूणांचा नाश त्यांच्या क्रूरतेनें जवळ ओढवून आणिला. इ. स. ५२८ त माळव्याचा राजा यशोधर्मन् यानें मगधाच्या गुप्त राजाच्या मदतीनें हूणांचा हिंदुस्थानांत पुरता मोड केला. तसेंच इ. स. ५६५ त इराणचा पराक्रमी वीर नोशेखान यानें सर्व तुर्कांना एकत्र करून हूणांचा इराणमधूनही समूळ उच्छेद केला. हूण लोक स्वभावतःच पाशवी वृत्तीचे. त्यांच्या स्वाऱ्यांचे चिरस्थायी परिणाम ते काय होणार? त्यांच्या स्वाऱ्या म्हणजे नुसती टोळधाड होती. त्यांना संस्कृति आणि धर्म यांचा गंध नव्हता. विद्वत्ता व राजकारण यांचा त्यांच्या ठिकाणीं मागमूसही नव्हता. अशा या हूणांनीं केवळ अत्याचारांनीं अल्पकाल सर्व जग हादरून सोडिलें हें खरें. पण त्यांच्या स्वाऱ्यांमुळें महत्त्वाचे असे कोणतेच परिणाम या देशावर वा अन्यत्र झालेले नाहींत.

---

* ॲटिल हा हूणांचा एक नेता असून त्यानें अतिशय क्रूरपणें रोमन साम्राज्याचा विध्वंस केला. इतिहासकार त्याला चेंगिझखानाच्या ओळींत बसवितात.

मात्र हिंदुस्थानांत गुप्त साम्राज्याचें एकसंधी असलेलें स्वरूप त्यांच्यामुळें कायमचें नष्ट झालें; आणि सर्वत्र विस्कळितपणा आला हें विसरतां येणार नाहीं. तसेंच, वायव्येकडील प्रांतांतून बौद्ध धर्मांचेंही समूळ उच्चाटन झालें. त्याचबरोबर अनेक हूण लोक येथील लोकांत पूर्णपणें मिसळून गेले.

## ३ साम्राज्य मोडलें

पांचव्या व सहाव्या शतकांत झालेल्या या यवनांच्या स्वाऱ्यांमुळें उत्तर हिंदुस्थानांतील राजकीय व सामाजिक घडण पार बदलून गेली. गुप्तांची राज्यपद्धति मोडली, आणि त्यांच्या एकमुखी साम्राज्याचे अनेक तुकडे झाले. माळवा व मगध या ठिकाणीं कांहीं वर्षें गुप्तांचीं राज्यें कशींबशीं टिकून होतीं. रजपुतांचा उदय झाल्यानंतर गुप्तांचें घराणें पूर्णपणें नामशेष झालें. रजपुत घराण्यांची माहिती पुढें प्रकरणें १२ व १३ मध्यें दिली आहे. शेवटच्या गुप्त राजांचीं नांवें क्रमशः पुरगुप्त, नारसिंहगुप्त, दुसरा कुमारगुप्त, विष्णुगुप्त, बुधगुप्त, भानुगुप्त, कृष्णगुप्त, आदित्यसेन इ. होतीं.

## थोडक्यांत

( १ ) **शेवटचे गुप्त सम्राट्**:—पहिला कुमारगुप्त ( इ. स. ४१३-४५५ )
अश्वमेध यज्ञ, हूणांचा प्रतिकार करितांना मृत्यु.
स्कंदगुप्तः—( इ. स. ४५५—४६७ ) हूणांचा सूड, शेवटचा पराक्रमी गुप्त सम्राट्.
गुप्त साम्राज्य इ. स. ६०० पर्यंत टिकून होतें.

( २ ) **हूण लोक**:—रानटी, टोळ्यांनीं राहणारे, भटके लोक.
पुढारीः—‘ तोरमण ’: माळवा काश्मीज ( इ. स. ५०० ) ‘ महाराजाधिराज ’
‘ मिहिरगुल ’: हिंदुस्थानाचा ‘ ॲटिल ’. बौद्ध भिक्षूंचा छळ, कत्तली, मंदिरें उध्वस्त, पवित्र ग्रंथ जाळिले. तक्षशीलेचें विश्वविद्यालय जमीनदोस्त.
हूणांचा नाशः—इराणचा नोशेरवान यानें हूणांचा उच्छेद केला.

( ३ ) **साम्राज्य मोडलें**:—यवनांच्या स्वाऱ्यांमुळें राजकीय, सामाजिक घडण बदलून गेली.

एकमुखी साम्राज्याचे तुकडे झाले. बौद्ध धर्माचें वायव्य प्रांतांतून उच्चाटन.

प्रश्नः—( १ ) हूण लोकांची थोडक्यांत माहिती देऊन त्यांच्या स्वाऱ्यांचे गुप्त साम्राज्यावर झालेले परिणाम सांगा.

( २ ) टीपा द्याः—कुमारगुप्त, हिंदुस्थानाचा 'ॲटिल', स्कंदगुप्त.

प्रकरण ११ वें

# भारतीय गौरवाचा शेवटचा किरण.

१. सम्राट् हर्षवर्धन.
२. राज्यश्रीचा शोध.
३. दिग्विजय.
४. बौद्धधर्मस्वीकार.
५. दातृत्व.
६. विद्येची प्रगति.
७. राज्यव्यवस्था.
८. ह्यु–एन्त्संगचें वर्णन.

## (१) सम्राट् हर्षवर्धन (इ. स. ६०६–६४७)

**राज्यप्राप्ति**–गुप्त घराण्याच्या अस्तकालांत ठाणेश्वराला वर्धन वंश उदयास येत होता. या घराण्याची स्थापना पुश्यभूति नांवाच्या एका शिवभक्तानें केली. इ. स. ५८३ च्या सुमारास त्या घराण्यांतील प्रभाकरवर्धन नांवाचा राजा राज्य करीत होता. आरंभीं प्रभाकरवर्धनाचें राज्य जरी लहान असलें तरी त्यानें आपल्या पराक्रमानें हूणांचा बंदोबस्त करून पंजाब, गांधार, गुजरात व माळवा या भागांत आपली सत्ता स्थापन केली. त्याचा विवाह माळव्याचा राजा यशोधर्म याची मुलगी यशोवती इजबरोबर झाला होता. त्याला राज्यवर्धन, हर्षवर्धन व राज्यश्री अशीं तीन मुलें होतीं. राज्यवर्धन व हर्षवर्धन यांस त्यानें सर्व प्रकारचें उत्तम शिक्षण दिलें होतें, व राज्यश्रीचा विवाह कनोजचा राजा गृहवर्मा मौखरी याजबरोबर झाला होता.

हूण लोकांच्या स्वारीचा बंदोबस्त करण्यासाठीं राज्यवर्धन व हर्षवर्धन गेले असतां मागें प्रभाकरवर्धन आजारी पडला, व आजारांतच मरण पावला.

राणी यशोवती सती गेली. ही बातमी समजतांच राज्यवर्धन परत आला, व त्यानें ठाणेश्वराचें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. इतक्यांत पूर्वमाळव्याचा राजा देवगुप्त व गौड देशाचा राजा शशांक यांनीं कनोजच्या राज्यावर स्वारी करून गृहवर्म्यास ठार मारिलें. व राज्यश्रीस बंदिवासांत टाकलें. हें समजतांच राज्यवर्धन देवगुप्तावर चाल करून गेला, व त्यानें त्याचा पराभव केला. परंतु गौड देशाच्या शशांक राजानें विश्वासघात करून राज्यवर्धनास ठार मारिलें. (इ. स. ६०६) यामुळें हर्ष पोरका झाला. लागोपाठ आलेल्या आपत्तीमुळें हर्षाचें मन उद्विग्न झालें, व त्याच्या मनांत वैराग्य उत्पन्न होऊन तो गादीवर बसण्यास तयार होईना. कनोजच्या मंत्रिमंडळानें त्याची समजूत काढली; तेव्हां हर्षानें ठाणेश्वर व कनोज हीं दोन्ही राज्यें आपल्या ताब्यांत घेतलीं. हर्षानें आपलें राहण्याचें ठिकाण कनोज हें केलें.

हर्ष गादीवर बसला खरा पण त्याच्याकडे तीन बाजूंनीं संकटें आ करून बसलीं होतीं. पश्चिमेकडून हूणांची भीति होतीच. राज्यवर्धनाचा खून करणाऱ्या शशांकाचा सूड घ्यावयाचा होता. व देवगुप्ताच्या कैदेंतून राज्यश्रीची सुटका करावयाची होती. या सर्वांस दहशत बसावी म्हणून हर्षानें दिग्विजय करण्याचें ठरविलें. मोठी तयारी करून हर्ष दिग्विजयास बाहेर पडला. इतक्यांत राजश्री देवगुप्ताच्या कैदेंतून सुटून विंध्य पर्वताकडे पळून गेल्याचें समजलें. ही वार्ता मिळतांच हर्षानें आपला दिग्विजयाचा बेत तसाच सोडून दिला, व राज्यश्रीच्या शोधार्थ तो विंध्याद्रीकडे पळून गेला. बऱ्याच दिवसांच्या शोधानंतर त्याची व दिवाकर नांवाच्या बौद्ध भिक्षूची गांठ पडली. त्याच्या मदतीनें हर्षास राज्यश्रीचा शोध लागला. ज्या वेळीं हर्षाला ती दिसली, त्या वेळीं ती सती जाण्याच्या बेतांत होती. हर्षानें विनवणी करून सती जाण्यापासून तिला परावृत्त केलें, व आपल्याबरोबर दिवाकर मित्राच्या निवासस्थानापर्यंत आणिलें. परंतु दिवाकर मित्राची बौद्ध धर्मावरील निष्ठा व कळकळ पाहून तिलाही आपण बौद्ध भिक्षुणी व्हावें असें वाटूं लागलें. हर्षानें मोठ्या मिनतवारीनें तिची समजूत काढली, व सर्व शत्रूंचा निःपात केल्याबरोबर तिच्याबरोबर स्वतःही बौद्ध धर्म स्वीकारण्याचें अभिवचन दिलें; तेव्हां ती कनोजला परत येण्यास तयार झाली.

## ३ दिग्विजय

[ इ. स. ६०६ ते ६१२ ] राज्यश्रीच्या शोधाच्या जबाबदारींतून मुक्त झाल्यानंतर हर्षानें आपल्या दिग्विजयाचें अर्धवट राहिलेलें काम पुनः हातांत घेतलें. त्याच्या दिग्विजयाची जरी विश्वसनीय माहिती मिळूं शकत नसली, तरी ही गोष्ट निश्चित कीं हर्ष राज्यावर बसतांना जे शत्रू चोहोंकडून उठले होते, त्या सर्वांचा पुरा निकाल लावून पंजाब, सिंध, काठेवाड व नेपाळ इ. प्रांत त्यानें जिंकले. राज्यवर्धनाचा विश्वासघातानें खून करणाऱ्या शशांकाचा त्यानें पाठलाग करून त्यास रेटीत रेटीत त्याच्या राज्यापर्यंत नेलें, व त्याच्यामागें असलेल्या कामरूपच्या ( आसाम ) कुमारराजाशीं संधान जुळवून शशांकास पेंचांत आणलें. हा सर्व पराक्रम त्यानें अवघ्या ५ वर्षांत केला. उत्तरेकडील शत्रूंचा पूर्ण बंदोबस्त करून आपली सत्ता स्थिर केल्यानंतर हर्ष दक्षिणेकडे दिग्विजय गाजविण्याच्या हेतूनें विंध्याद्रि ओलांडून नर्मदा नदीपर्यंत आला. या वेळीं चालुक्य घराण्यांतील राजा पुलुकेशी (दुसरा) यानें साम्राज्य कमाविलें होतें. हर्षानें जो पराक्रम उत्तरेंत केला, तोच—साम्राज्य स्थापनेचा—पुलुकेशीनें दक्षिणेंत केला होता. अशा प्रबळ राजाशीं हर्षाची गांठ पडली. झालेल्या लढाईंत हर्षाचा पूर्ण पराभव झाला, व त्यास हात हालवीत परत जावें लागलें. या पुढील काळांत उत्तरेंत हर्ष व दक्षिणेंत पुलुकेशी हे प्रबळ राजे राज्य करूं लागले. इ. स. ६३५ मध्यें वल्लभीचा राजा ध्रुवसेन याचा पराभव करून हर्षानें त्याला आपला मांडलिक बनविलें होतें. हर्षानें त्याला आपली मुलगी देऊन त्याच्याशीं सख्य राखिलें. इ. स. ६४१ मध्यें हर्षानें चीनच्या राजाकडे आपलें एक शिष्टमंडळ पाठविलें होतें. इ. स. ६४३ सालीं त्यानें गंजम जिल्ह्यांतील कोंगोडावर स्वारी केली. त्या दिग्विजयामुळें हर्षाचें सामर्थ्य वाढलें. त्याचें साम्राज्य पूर्वेस ब्रह्मपुत्रा नदीपासून पश्चिमेस काठेवाडापर्यंत पसरलें. ओरिसाचा कांहीं भाग, कच्छ, यांचा समावेश त्याच्या राज्यांत होत होता. पंजाबांत फक्त जालंदर पर्यंतचाच मुलुख त्याच्या ताब्यांत होता. राजपुताना व सिंध हे प्रांत त्याच्या ताब्यांत नव्हते. आतां त्याच्या पदरीं १ लाख पायदळ, व ६० हजार

हत्ती होते. या सामर्थ्याच्या जोरावर हर्ष परकीय आक्रमणाविरुद्ध निश्चिंत होता.

## ४ बौद्धधर्मस्वीकार

राज्यावर उठलेल्या सर्व शत्रूंचा पूर्ण बंदोबस्त केल्यानंतर, व जिकडे तिकडे स्थिरस्थावर झाल्यानंतर हर्षानें राज्यश्रीस कबूल केल्याप्रमाणें दिवाकर मित्राच्या उपदेशावरून बौद्ध धर्माचा स्वीकार केला. हर्ष मूळचा वैश्यवर्णीय हिंदु होता. दक्षिण दिग्विजयास गेला असतांना त्यानें शंकराची पूजा केल्याचा उल्लेख आहे. पण पुढें कोसळलेल्या संकटांमुळें त्यास वैराग्य प्राप्त झालें, व तो बौद्धधर्मीय झाला.

बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर हर्षानें राज्यांतील प्राणिहत्या बंद केली. बौद्ध भिक्षूंसाठीं गंगेच्या कांठीं विहार बांधिले. काश्मीरच्या राजाजवळ बुद्धाचा एक दांत होता. तो त्याच्याकडून जबरदस्तीनें आणवून हर्षानें त्यावर कनोज येथें एक विहार बांधिला. चिनी प्रवासी हुएन्त्संग हिंदुस्थानांत आला त्या वेळीं कनोज येथें हर्षानें मोठी परिषद् भरविली. या परिषदेसाठीं दोन हजार लोक बसतील असा मोठा व शोभिवंत मंडप तयार करण्यांत आला होता. परिषदेच्या सुरुवातीस बुद्धाची मूर्ति वाजत गाजत आणून तिची स्थापना करण्यांत आली, व एका बाजूस स्वतः हर्ष व दुसऱ्या बाजूस कामरूपाचा राजा हातांत चामरें घेऊन उभे राहिले. या परिषदेंत ह्युएन्त्संगानें महायान पंथाचें विवेचन करून हीनयान वगैरे इतर पंथांस वादाचें आव्हान दिलें. त्यामुळें त्यांनीं ह्युएन्त्संगास ठार मारण्याचा विचार केला. ही गोष्ट हर्षाला समजतांच त्यानें विरोधकांस क्रूर शासनाची धमकी देऊन गप्प बसविलें. ही परिषद् पुढें १८ दिवस चालली. ओरिसा प्रांतांत हीनयान पंथाचा विशेष जोर होता. हर्षानें नालंदाहून विद्वान् महायानी लोक आणून त्यांची ओरिसा प्रांतांत धर्मोपदेशक म्हणून रवानगी केली.

बौद्ध भिक्षूंनीं दरवर्षीं निदान २१ दिवस तरी एके ठिकाणीं राहून बौद्ध तत्त्वज्ञानावर चर्चा करावी असा दंडक घातला; व त्यांच्यासाठीं त्यानें सर्व प्रकारच्या सोई केल्या. त्याच्या राजवाड्यांत रोज १ हजार बौद्ध भिक्षूंना व

५०० ब्राह्मणांना दानधर्म होई. दिवसाच्या तीन भागांपैकीं दोन भाग तो धार्मिक कामासाठीं राखून ठेवी.

### ५ दातृत्व

हर्ष इतिहासांत अमर झाला तो त्यानें ५।६ वर्षांत उत्तरेंत मोठें साम्राज्य स्थापन केलें म्हणून किंवा त्यानें बौद्ध धर्माचा स्वीकार करून त्याचा प्रचार केला म्हणुन नव्हे. कारण त्याच्या पूर्वीं अशोकानें त्याच्याहीपेक्षां मोठें साम्राज्य कमाविलें होतें, व बौद्ध धर्माचा प्रचार हिंदुस्थानाबाहेरही केला होता. हर्षाचें नांव चिरंतन राहण्याचें कारण म्हणजे कर्णाप्रमाणें किंवा कालिदासानें रघुवंशांत वर्णन केलेल्या रघुराजाप्रमाणें त्यानें दाखविलेलें दातृत्व होय. दर पांच वर्षांनीं हर्ष प्रयाग येथें मोठी यात्रा भरवीत असे. ही यात्रा अजूनही कुंभमेळा म्हणून चालू आहे. या यात्रेच्या वेळीं हर्ष बौद्ध व हिंदु देवतांची मिरवणूक काढून त्यांची स्थापना करी; व त्या वेळीं मोठा दानधर्म करीत असे दान देतांना हर्षानें कधीं भेदाभेद केला नाहीं. बौद्ध भिक्षूंबरोबरच तो वैदिक भिक्षुकांना, निर्ग्रंथी ब्राह्मणादि लोकांना, एवढेंच नव्हे तर नास्तिक लोकांनाही तो दान देत असे. या वेळीं त्या पांच वर्षांत कमावलेली सर्व संपत्ति हर्ष दान करून टाकीत असे. एका वेळीं तर हर्षाला स्वतःला पांघरण्यास देखील वस्त्र उरलें नाहीं. तेव्हां राज्यश्रीनें त्यास पांघरण्यास वस्त्र दिलें. अशा रीतीनें आकिंचन होण्यांत हर्षाला मोठा हर्ष होत असे.

### ६ विद्येची प्रगति

हर्ष विद्येचा मोठा चाहता होता. आपल्या उत्पन्नापैकीं चौथा हिस्सा तो विद्येच्या प्रगतीसाठीं राखून ठेवून खर्च करीत असे. या वेळीं विद्याधनाबद्दल सर्वत्र आस्था व उत्साह दिसून येई. अनेक ठिकाणीं बौद्ध भिक्षूंचे विहार असून त्यां-मधून असंख्य भिक्षू ज्ञानार्जन करीत असत. या शिवाय हिंदुधर्मीयांचेहि अनेक मठ असून त्यांतील अभ्यासू विद्यार्थ्यांची संख्या मोठी असे. नालंद, कनोज, प्रयाग, व गया या ठिकाणीं मोठमोठीं विश्वविद्यालयें असून त्या सर्वांत नालंदाचें विद्यापीठ फार प्रसिद्ध होतें. त्यांत दहा हजार विद्यार्थ्यांची सोय होत असे. ह्युएन्त्संगनें आपल्या प्रवासवर्णनांत या विद्यापीठाचें सुंदर वर्णन केलें आहे

याखेरीज हर्ष स्वतः मोठा विद्वान् असून त्यानें नागानंद हें प्रसिद्ध नाटक व रत्नावली व प्रियदर्शिका हे ग्रंथ लिहिले आहेत. हर्षाच्या पदरीं बाणभट्ट, हरदत्त, व जयसेन इत्यादि विद्वान् पंडित होते. बाणाची कादंबरी प्रसिद्ध आहे. त्यानें लिहिलेला हर्षचरित् ग्रंथ हर्षासंबंधीं ऐतिहासिक माहिती मिळविण्यास फार उपयोगी आहे. जयसेनाच्या विद्वत्तेवर खूष होऊन एकदां हर्षानें त्यास ओरिसा प्रांतांतील ८० गांवें इनाम दिलीं; पण त्यानें त्यांचा स्वीकार केला नाहीं.

## ७ राज्यव्यवस्था

हर्ष निरनिराळ्या प्रदेशांत हिंडून आपल्या राज्याची फार बारकाईनें पाहणी करी. हर्षाच्या वेळीं मंत्रिपरिषद् फार जबाबदार व महत्त्वाची असे. राज्याच्या गरजा फार कमी होत्या. लोकांना सक्तीनें वेठीस धरलें जात नसे. राज्याच्या मालकीच्या जमिनीचे चार भाग केलेले असत. त्यांपैकीं एक राज्यव्यवस्थेच्या खर्चासाठीं, एक दानधर्मासाठीं, एक विद्वान् लोकांना मदत करण्यासाठीं, व एक धार्मिक कारणासाठीं राखून ठेविलेला असे. कर कमी होते. जमिनीच्या उत्पन्नाचा भाग राजाला कर म्हणून द्यावा लागे. व्यापारी उद्योगधंद्यानिमित्त इकडून तिकडे जात, परंतु त्यांच्यावर फारच थोडे कर होते. नोकरांना जमिनीच्या रूपानें पगार दिला जाई. जुने कागदपत्र व्यवस्थित राहावे म्हणून हर्षानें नवीन दप्तर-खातें निर्माण केलें होतें. हर्षाचें सैन्य पायदळ, घोडदळ, हत्ती, व रथ असें चार प्रकारचें होतें. त्या वेळचे कायदे कडक असत. गुन्हा शाबीत करण्यासाठीं पाण्यांत, विस्तवांत टाकणें, विष देणें यासारखें दिव्य करावें लागे. तरी पण त्याची अंमलबजावणी मात्र क्वचित्च होई.

## ८ ह्युएन्त्संगानें केलेलें वर्णन

मागें सांगितल्याप्रमाणें बौद्ध धर्माच्या पवित्र स्थळांची यात्रा करण्यासाठीं निरनिराळ्या देशांचे प्रवासी हिंदुस्थानांत येत असत. गुप्तकाळीं फा-हेन हा प्रवासी अशाच निमित्तानें आला होता, व त्यानें येथें पाहिलेल्या अनेक गोष्टींचें मोठें रसभरित वर्णन करून ठेविलें आहे. हर्षवर्धनाचे काळीं ह्युएन्त्संग नांवाचा एक चिनी प्रवासी असाच हिंदुस्थानांत आला. याचा जन्म इ. स. ६०० च्या सुमारास झाला होता. लहानपणापासूनच तो मोठा विरक्त होता. वयाच्या २० व्या

वर्षी त्यानें बौद्ध धर्म स्वीकारिला. चिनी भाषेत लिहिलेल्या बौद्ध वाङ्मयानें त्याचें समाधान होईना. मुळांतलें खरें वाङ्मय पाहावें म्हणून तो हिंदुस्थानांत आला होता. तो ज्ञानाचा उपासक असून तीक्ष्ण बुद्धीचा, अत्यंत कष्टाळू, व धार्मिक वृत्तीचा होता. ६३० पासून ६४५ पर्यंत १५ वर्षें त्यानें या देशांत घालविलीं. उत्तरेस कांहीं काळ घालविल्यावर तो ओरिसा, कलिंग या देशांतून दक्षिणेकडे आला, व तेथून देवराष्ट्र, सौराष्ट्र, सिंध हे देश पाहून परत आपल्या देशास गेला. या प्रवासांत पाहिलेल्या अनेक स्थळांची, अनुभविलेल्या प्रसंगांची सुसंगत अशी माहिती ह्युएन्त्संगनें लिहून ठेविली आहे. त्यावरून हर्षकालीन भारतवर्षाची स्थिती चांगली ध्यानांत येते. ह्युएन्त्संग हर्षाच्या तसेंच दक्षिणेकडील बलाढ्य राजा पुलुकेशी याच्या दरबारांत कांहीं काळ होता. तेथें पाहिलेल्या अनेक गोष्टींचें त्यानें केलेलें वर्णन मजेदार व बोधप्रद आहे.

**भारतवासीयांचें शील**:—सर्वसाधारणपणें बहुतेक लोक सुखी व आनंदी असत. पैशाची वाण कधींही भासत नसे. लोक साधे, सरळ, व सच्चे होते. ते हलक्या मनाचे नसून प्रामाणिक, आदरातिथ्य करण्यांत तत्पर असत. पैशाअडक्याच्या कामांत ते निष्कपटी असले तरी न्यायाच्या कामांत ते फार दक्ष व चोख असत. या जन्मांत केलेल्या वाईट कर्मांचीं फळें आपणांस पुढील जन्मीं भोगावीं लागतील ही भीतीची तरवार त्यांच्यावर सारखी टांगलेली असते. या जगांतील ऐहिक सुख ते तुच्छ मानीत; ते लोक लांडीलबाडी करणारे शठ किंवा दुष्ट नसून आपल्या वचनाला जागणारे असे सच्चे व सभ्य असत.

**सामाजिक स्थिति**:—श्रीमंत लोकांत सुती, रेशमी, व लोकरीचीं वस्त्रें वापरण्याची चाल होती. त्यांच्यावर जरतारी काम केलेलें असे. तीं इतकीं मऊ व तलम असत कीं, नुसत्या श्वासानेंही तीं उडत. राजेरजवाड्यांचे व श्रीमंत मंडळींचे अलंकार मोठे चित्रविचित्र व विविध प्रकारांचे असत. ते डोक्यावर माणिकमोत्यांचे हार, तुरे, बिंदी इत्यादि चढवीत व अंगावर हार, कंकणें अंगठ्या घालीत. बालविवाहाची पद्धत नव्हती. विधवाविवाह होत नसत. पडद्याची व सतीची चाल चालू होती. स्त्रियांना नाना विद्यांचें व कलांचें उत्तम

शिक्षण मिळत असे. वर्णभेद तीव्र झाले होते, परंतु असंख्य पोटभेद मात्र निर्माण झाले नव्हते. प्रत्येक वर्ण स्वतंत्र व संघटित होता. सर्वत्र स्वातंत्र्य व सहिष्णुता यांचें राज्य होतें. अहिंसेचें तत्त्व लोकप्रिय झालें असल्यानें राजांनीं नियम करून हिंसा निषिद्ध केली होती.

**कनोजः**—कनोज ही हर्षवर्धनाची राजधानी. त्यासंबंधीं हुएन्त्संग म्हणतो, नगराच्या चारी बाजूंस एक खंदक असून समोरासमोर भक्कम आणि उंच बुरूज होते. तसेंच चोहोंबाजूस कुंज, पूल, तळीं, आणि तलाव असून त्याचें पाणी आरशाप्रमाणें चमकत असे. तेथें व्यापारी मालाची एकच गर्दी उडालेली असून देशोदेशींच्या निरनिराळ्या प्रकारच्या मौल्यवान् वस्तु तेथें मिळत. लोक सुखी व संतुष्ट असून त्यांचीं घरें धनसंपन्न व भरभक्कम होतीं. ते स्वभावानें प्रामाणिक, व निष्कपटी असून त्यांना पाहतांच ते सज्जन व कुलीन आहेत याची खात्री पटे. त्यांना विद्येची गोडी विशेष होती.

**विद्यालयें**:—नालंदा, विक्रमशीला व वल्लभी येथील विश्वविद्यालयें भव्य व फार प्रसिद्ध होतीं. नालंदाचें विश्वविद्यालय आश्रमपद्धतीचें असून तेथें विद्यार्थ्यांची राहण्याची, जेवणाची व शिकण्याची सर्व सोय विनामूल्य केलेली असे. विद्यार्थ्यांची संख्या ४००० असून या संस्थेनें २०० खेड्यांची जागा व्यापिली होती. इमारतींत आठ भव्य दिवाणखाने व दोनशें प्रशस्त दालनें होतीं. येथील शिल्पकाम पाहून ह्युएन्त्संगला आश्चर्य व कौतुक वाटलें. नालंदाचें विद्यापीठ फार प्रसिद्ध असून तेथील व्यवस्थेचा, आचार्यांचा व कुलपतींचा सर्वत्र मोठा लौकिक होता.

**इतर गोष्टीः**—इतर बरीच किरकोळ माहिती ह्यूएन्त्संगनें जमा केली होती. “ गंगा—यमुनांच्या कांठावर रोज शेंकडों माणसें जलसमाधि घेतात. या देशांतील लोकांची अशी समजूत आहे कीं, तांदळाच्या एका दाण्यावर राहून उपवास केला, व येथें संगमावर येऊन जलसमाधि घेतली कीं स्वर्ग मिळतो ”

“काशीचे नागरिक धनाढ्य असून त्यांच्याजवळ अमूल्य वस्तूंचा मोठा संग्रह होता. लोक दयाळू व विद्याभ्यासंगी होते. येथें एक १०० फूट उंचीची महेश्वराची तांब्याची सुंदर मूर्ति होती.”

" नैर्ऋत्येच्या बाजूस चरित्र नांवाचें मोठें बंदर असून तेथील व्यापारी दूरदूरच्या देशांचा प्रवास करितात. परदेशी लोक येथें येतात, व कांहीं काळ मुक्काम करितात. येथें निरनिराळ्या प्रकारच्या अमूल्य व अद्भुत वस्तू मिळतात."

" विद्येकरितां माळवा व मगध देश फार प्रसिद्ध आहेत."

" गुजरातची जमीन, हवापाणी व लोक माळव्यापेक्षां निराळे आहेत. वल्लभीची वस्ती दाट असून तेथें संपत्ति अलोट आहे. तेथें जवळ जवळ शंभर कोट्याधीश आहेत."

## थोडक्यांत

हर्षवर्धन (इ. स. ६०६–६४७)

**राज्यप्राप्तिः**—स्थानेश्वरास प्रभाकरवर्धनाकडून वर्धन वंशाची स्थापना.
प्रभाकरवर्धनाचा मृत्यु, राज्यवर्धनाचा खून व राज्यश्रीचें पलायन यांमुळें उद्विग्न झालेल्या हर्षवर्धनानें मंत्र्यांच्या आग्रहावरून स्थानेश्वर व कनोज हीं दोनही राज्यें ताब्यांत घेतलीं.

**राज्यश्रीचा शोध**—दिग्विजयाचें काम सोडून बहिणीचा शोध या दिवाकर मित्राच्या मदतीनें विंध्याद्रींत भ्रमण व बहिणीशीं भेट. सती जाण्यापासून, व भिक्षुणी होण्यापासून बहिणीला परावृत्त केलें.

**दिग्विजय**—हूणांचा पराभव, शशांकाचा पराभव—दक्षिणेवर स्वारी—पुलकेशी कडून पराभव- उत्तरेस सम्राट्.

**बौद्धधर्मस्वीकार**— दिवाकर मित्राकडून बौद्ध धर्माची दीक्षा.
प्राणिहत्त्या व शिकार बंद.
भिक्षूसाठीं विहार व बुद्ध मंदिरें.
कनोजला धर्मपरिषद्.
धर्मोपदेशकांची नेमणूक.

**विद्येची प्रगति**—विद्येचा चहाता, उत्पन्नाचा चौथा हिस्सा विद्येसाठीं.
नालंद कनोजचीं विद्यालयें.

नागानंद, रत्नावली, प्रियदर्शिका या ग्रंथांचें लेखन.

बाणभट्ट, हरदत्त, जयसेन इ. विद्वानांस आश्रय.

**राज्यव्यवस्था**–स्वतः राज्याची पाहणी.

मंत्रिपरिषद्

नवीन दप्तरखात्याची व्यवस्था.

सैन्याची व्यवस्था, चार प्रकारचें सैन्य.

न्यायव्यवस्था.

कालादर्श क्र. २

**प्रश्नः**– १ हर्षाचें थोडक्यांत चरित्र द्या.

२ खालील गोष्टींविषयीं टिपणें करा.

हर्षाचा दिग्विजय, बौद्धधर्म–स्वीकार, दातृत्व, विद्येची प्रगति.

३ ह्युएत्‌संगनें केलेल्या हिंदुस्थानच्या वर्णनाची थोडक्यांत माहिती द्या.

**स्वाध्यायः**–१ हिंदुस्थानच्या नकाशांत हर्षाचें साम्राज्य भरा.

२ रा. चिं. वि. वैद्यकृत 'मध्ययुगीन भारतवर्षा'तून हर्षाची माहिती वाचा.

# प्रकरण १२ वें

# विंध्याद्रीच्या उत्तरेस

(१) रजपुतांचा उदय
(२) रजपुत घराणीं–मोठीं
(३) रजपुत घराणीं–लहान
(४) रजपुतांचे स्वभावविशेष
(५) राजपुत काळांतील परिस्थिति

## १ रजपुतांचा उदय

सम्राट् हर्षवर्धन इ. स. ६४७ त मृत्यु पावला. त्याला मुलगा नसल्यानें राज्यांत सर्वत्र बेबंदशाही निर्माण होऊन त्याच्या सरदारांनीं स्वतंत्र राज्यें स्थापिलीं. परंतु या बेबंदशाहींतूनच भारताच्या राजकीय क्षितिजावर नवीन हिंदु राजघराणीं उदयास आलीं. विशेष गोष्ट ही कीं, हीं राज्यें आजही अस्तित्वांत आहेत. हर्षाच्या मृत्यूपासून मुसलमानी राज्यस्थापनेच्या काळापर्यंत, म्हणजे इ. स. ६४७–१००० पर्यंतच्या काळाला 'हिंदु साम्राज्याचा काळ' असें म्हणतात. कारण, या पूर्वीच्या काळांतील सम्राट् आर्य क्षत्रिय असले तरी त्यांना 'हिंदु' म्हणत नसत. 'हिंदु' हा शब्द हर्षानंतरच्या काळांत जास्त रूढ झाला. अर्थात् पूर्वीच्या राजघराण्यांचा लोप झाला आणि नवीन राजघराणीं इतिहासाच्या रंगभूमीवर अवतरलीं. मात्र तीं नुसतीं क्षत्रिय नसून रजपुत क्षत्रिय होतीं. कनोजचें वर्म घराणें, बदामीचें चालुक्य घराणें, कांचीचें पल्लव घराणें इ. घराणीं क्षत्रिय होतीं; परंतु तीं आपल्याला रजपुत म्हणवीत नसत. हर्षानंतरचीं नवीन हिंदु राजघराणीं आपल्याला रजपुत म्हणविण्यांत विशेष आनंद मानीत. तेव्हां हे रजपुत कोण व त्यांचा उदय कसा झाला हें आपणास पाहावयाचें आहे.

**हे रजपुत कोण ?**:–रजपुत ही नवीन निर्माण झालेली जात नव्हे. ते भारतीय उच्च वर्णीय आर्य असून वैदिक आर्यांचे पाणीदार वंशज होते. बौद्ध व जैन धर्माचा सर्वत्र सुळसुळाट झाला, त्या वेळीं आपलें आर्य तेज कायम टिकविण्याकरतां जे आर्य त्या वेळच्या समाजापासून दूर राहिले आणि संधि येतांच पुन्हां ज्यांनीं वैदिक सनातन धर्माची ध्वजा उंच फडकाविली आणि परकीय आक्रमणांपासून सनातन धर्माचें सतत ५०० वर्षें झगडून संरक्षण केलें ते आर्य म्हणजे हल्लींचे रजपुत होत. आश्चर्याची गोष्ट ही कीं, हींच रजपुत राजघराणीं कमी अधिक महत्त्वानें कां होईना, आजही राजघराणीं म्हणून भारतांत नांदत आहेत. असे अखंड चालत आलेले वंशवृक्ष जगाच्या पाठीवर आढळणार नाहींत.

टॉड् व स्मिथ् यांसारखे पाश्चिमात्य इतिहासकार, रजपुत हे आर्य क्षत्रिय नसून ते शक-हूणादि परकीयांचा आर्यांशीं संकर होऊन निर्माण झालेल्या एका नवीन जातीपैकीं होत असें प्रतिपादन करितात. परतु रिस्लेसारख्या पाश्चिमात्त्यांनींच शीर्षमापनशास्त्र व भाषाशास्त्र इ. शास्त्रांच्या आधारानें रजपुतांचें आर्यत्व सप्रमाण सिद्ध केलें आहे. तरतरीत व सरळ नाक, लांबट डोकें व उंच बांधा या आर्यवंशांच्या विशिष्ट खुणा रजपुतांच्या ठिकाणीं स्पष्टपणानें दिसतात. शिवाय, शौर्य, दाक्षिण्यप्रियता, कडवा स्वधर्माभिमान व चिकाटी इत्यादि आर्यांचे गुणविशेष रजपुताच्या ठायींच वसले आहेत. त्यामुळें रजपुत हे आर्य नव्हेत हें म्हणणें चुकीचें आहे. रजपुतांची ऐतिहासिक परंपरासुद्धां त्यांचें आर्यत्व सिद्ध करूं शकते. चाहमान, प्रतिहार, चालुक्य, परमार इ. प्रमुख रजपुत घराणीं वसिष्ठ, भारद्वाज या गोत्रांचीं आहेत. गोत्र हें मूळ कुळाचें निदर्शक असतें. तेव्हां हे रजपुत वसिष्ठ, भारद्वाजांच्या म्हणजेच आर्यांच्या कुळांत जन्मलेले आहेत. म्हणून ते आर्य आहेत. पूर्वीं वसिष्ठादिकांच्या काळीं वरिष्ठ दर्जाच्या जाति एकमेकांपासून अलग झालेल्या नव्हत्या. ब्राह्मणांचे क्षत्रिय होत व क्षत्रियांचे ब्राह्मण होत. तेव्हां रजपुत हे क्षत्रिय असले तरी ते वसिष्ठादि ब्राह्मणांच्या कुळांतील आहेत याविषयीं शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

तेव्हां रजपुत हे आर्य क्षत्रिय आहेत हें आपण पाहिलें. आतां रजपुत या

शब्दाची उत्पत्ति पाहूं. रजपुत हा शब्द नवीन नाहीं. राजपुत्र या शब्दांपासून तो बनलेला आहे. हा शब्द प्रथमतः साध्या क्षत्रियांच्या मुलांसाठीं वापरीत नसून राजकुलांतील क्षत्रियांसाठीं वापरीत असत. परंतु महाभारतांत या शब्दाचा असंख्य ठिकाणीं उपयोग केला आहे. तेव्हां रजपुत म्हणजे क्षत्रिय राजपुत्र एवढाच त्याचा अर्थ नसून कुलीन क्षत्रिय अशा व्यापक अर्थानें तो वापरला आहे. बाणाच्या हर्ष चरित्रांत रजपुत हा शब्द क्षत्रिय सैनिकाला उद्देशून वापरला आहे. सारांश, रजपुत म्हणजे उच्चवर्णीय क्षत्रिय; त्याला हिणकस असा कोणताही दुसरा अर्थ नसून तो अस्सल आर्यांचा निदर्शक आहे.

## ( २ ) रजपुत घराणीं–मोठीं

रजपुतांच्या प्रसिद्ध छत्तीस कुळ्यांपैकीं गुहिलोत, चाहमान, प्रतिहार, परमार, चंदेल, राष्ट्रकूट, चालुक्य इत्यादि प्रमुख कुळें आहेत. या सर्व राजकुलांतील राजांनीं मुसलमानांचीं हिंदु धर्मावरील आक्रमणें थोपवून धरण्यांत पराकाष्ठेचे प्रयत्न केले. किंबहुना आपल्याला असेंच म्हणावें लागेल कीं, रजपुतांच्याच रक्तसिंचनानें भारतीय संस्कृतीचें पावित्र्य आजतागायत रक्षिलें गेलें आहे. हजारों रजपुतांनीं त्या वेळीं केलेल्या आत्मत्यागामुळें हिंदु जाति जिवंत राहिली आहे. मुसलमानी आक्रमण हें शिकंदराच्या झेपांप्रमाणें कांहीं वावटळीसारखें ठरलें नाहीं. तलवार व कुराण हातांत धरून भारतीय संस्कृतीचा समूळ उच्छेद करण्याच्या दृढनिश्चयानें चालून आलेल्या मुसलमानांच्या तलवारीला तलवार भिडवून स्वधर्माचें संरक्षण रजपुतांना करावें लागलें. बुद्धिवादानें त्यांना जिंकून आपल्यांत सामील करून घेणें अगदीं अशक्य होतें. तेव्हां सतत पांचशें वर्षें परकीयाशीं केवळ स्वातंत्र्य व स्वधर्म यांच्या रक्षणासाठीं देह झिजविणाऱ्या रजपुतांची थोरवी काय वर्णावी ? अशा ह्या तेजस्वी राजकुलांमध्यें मेवाडच्या गुहिलोत कुलाला इतर घराणीं अग्रपूजेचा मान देतात. कारण, या घराण्यांतील पुरुष हे प्रभु रामचंद्राचे वंशज आहेत. तेव्हां या राजघराण्याची आपण प्रथम माहिती मिळवूं.

**गुहिलोत घराणें** :–इ. स. ७१२ त अरबांच्या हिंदुस्थानावरील स्वाऱ्यांना सुरुवात झाली. सिंधच्या दाहिर राजानें या स्वाऱ्यांना यशस्वीपणें तोंड दिलें. परंतु

फितुरीमुळें शेवटीं त्याचा घात होऊन सिंध प्रांत अरबांच्या ताब्यांत गेला. या मोहिमे-च्या वेळीं कासिमनें हिंदूंवर केलेले अत्त्याचार, कत्तली व बाटवाबाटवीचे अनन्वित प्रकार पाहून उत्तरेंतील हिंदु चमकले आणि या सर्व अनाचारांना पायबंद घाल-ण्यासाठीं ते सज्ज झाले. इ. स. ७३९–४० त अरब राजस्थानाकडे चाल करून येऊं लागले. त्या वेळीं चितोड येथील बाप्पा रावळ नांवाच्या एका सेनापतीनें अरबांचा एका मोठ्या युद्धांत प्रचंड पराभव केला. या विजयामुळें बाप्पाला चितोडचें सार्वभौमपद मिळालें. बाप्पा रावळ हा गुहिलोत घराण्याचा पहिला प्रसिद्ध पुरुष. रजपुतांमध्यें थोर विभूतीप्रमाणें बाप्पाला मान आहे. बाप्पानें अरबांस हिंदुस्थानच्या बाहेर हांकलून लाविलें आणि सिंधचा अमीर सेलिम याचा पाडाव करून त्याच्या मुलीशीं लग्न केलें. इ. स. ७६३ त अधिकारत्याग करून त्यानें संन्यास घेतला.

बाप्पानंतर चितोडचे गादीवर गुहिल राजा आला. गुहिलानें शत्रूशीं लढण्यांत आपलें सर्व आयुष्य वेचिलें. अरबांच्या स्वाऱ्या या वेळीं फार मोठ्या प्रमाणांत होऊं लागल्या होत्या. या स्वाऱ्यांना तोंड देतांना रजपुतांना रक्त व मांस यांचा अक्षरशः सडा शिंपडावा लागला. यावरूनच या प्रदेशाला मेद्पाट (मेवाड) असें नांव पडलें. गुहिलानें बाप्पा रावळपासून निघालेल्या शाखेस आपलें नांव दिलें. त्यामुळें या घराण्यास गुहिलोत घराणें हें नांव पडलें.

या घराण्यांत गुहिलानंतर खुमान, अल्लट, नरवाहन, शक्तिकुमार हे प्राचीन काळांतील व भीम, हमीर, संग, प्रताप हे अर्वाचीन काळांतील, मेवाडची स्वाभिमानी परंपरा कायम ठेविणारे राणे होऊन गेले. भोंवतालीं मुसलमानी राज्य झपाट्यानें पसरत असतांही ८०० वर्षें सतत लढून आपलें स्वातंत्र्य आज-तागायत कायम राखणारें हेंच प्रमुख घराणें होय. मेवाडचें राज्य आज १२०० वर्षें कायम राहिलें आहे. या घराण्याचें वैशिष्ट्य असें कीं, यांनीं कोणापुढेंही मान वांकविली नाहीं. अगदीं अलिकडचें उदाहरण द्यावयाचें झाल्यास, इ. स. १९१२ चे दिल्लीदरबारचे वेळीं आपल्या पूर्वपरंपरेला अनुसरून मेवाडचे राण्यानें हजर राहण्याचें नाकारलें. विशेष गोष्ट ही कीं, ब्रिटिश सरकारनें ही त्यांची परंपरा मान्य केली.

प्रा. चिं. वि. वैद्य म्हणतात, "या सर्व रजपुत वीर पुरुषांचीं चरित्रें म्हणजे स्वातंत्र्यदेवीचीं अनेक तीर्थेंच होत, व त्यांनीं भारताच्या इतिहासास पावनत्व आणिलें आहे."

मेवाडच्या प्राचीन राण्यांविषयीं सखोल माहिती उपलब्ध नाहीं; व पुढील राण्यांची माहिती या ग्रंथाच्या कक्षेंत येत नाहीं. त्यामुळें आपणांस या त्रोटक माहितीवरच विसंबून राहिलें पाहिजे.

**२ चाहमान ( चव्हाण ) घराणें:**—गुहिलोत घराण्याप्रमाणेंच चाहमान हेंही एक श्रेष्ठ घराणें आहे. वीर्यशाली वृत्तींत तर हें घराणें अग्रेसर मानावें लागेल. मेवाडच्या उत्तरेस शाकंबरी ( सांबर ) हें चाहमानांचें मूळचें राज्य. आज बुंदी, कोटा, शिरोही हीं प्रमुख राज्यें ह्याच घराण्यांतील वंशजांच्या ताब्यांत आहेत. पृथ्वीराज चव्हाण व त्याचा आजा विशालदेव हे सार्वभौम सम्राट् याच घराण्यांत होऊन गेले. पृथ्वीराजाचा पराक्रम व त्याचें औदार्य जगप्रसिद्ध आहे. परंतु पृथ्वीराजानंतर या राज्यास उतरती कळा लागली. पुढील राजांनीं दिल्लीच्या मुसलमानी राजांचें सार्वभौमत्व मान्य केलें. व कित्येक सरदारांनीं तर स्वार्थांध बनून मुसलमानी धर्मही स्वीकारिला. पराक्रमाचे बाबतींत जरी हें घराणें गुहिलोत घराण्याच्या तोडीचें असलें तरी बाणेदारपणा किंवा स्वाभिमानी बाणा या घराण्यांतील लोक कायम टिकवूं शकले नाहींत म्हणून त्यांस कमीपणा येतोच.

या घराण्याचा मूळ पुरुष चाहमान किंवा अनहिल समजला जातो. चाहमानाचें मूळ गांव नर्मदेच्या उत्तरेस असलेले महिष्मती असावें. चाहमानापासून पृथ्वीराजापर्यंत बरेच राजे होऊन गेले. परंतु त्यांची विश्वसनीय वंशावळ मिळत नाहीं. चाहमान हा कांहीं राजा नव्हता. तो या घराण्याचा संस्थापक होता. या घराण्यांतील पहिला राजा प्रसिद्ध सामंतदेव हा होय. या सामंतदेवानें सांबर प्रदेश जिंकून तेथें राज्य स्थापिलें. बाप्पा रावळ व सामंतदेव हे बहुधा समकालीन असावेत. सामंताचा काळ अनुमानानें इ. स. ७५० च्या सुमारास असावा असें मानतात. अरबांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करणाऱ्यांत सामंतदेवही होता.

सामंतानंतर जयराज, विग्रह, श्रीचंद्र, गोपेन्द्र, दुर्लभ, गूवक, वाक्पति,

सिंहराज इ. प्रसिद्ध राजे झाले. या सर्वांमध्यें गूवक हा पराक्रमांत अग्रणी समजला जातो. त्या वेळच्या रजपुत राजमंडळांत गूवकाइतका पराक्रमी कोणीही नव्हता. गुहिलोत व चाहमान या घराण्यांची ' शिव ' हीच कुलदेवता होती. गुहिलोत घराण्याची जशी एकलिंगजीवर निस्सीम श्रद्धा होती, तशीच चाहमान घराण्याची सांबराच्या हर्षदेवावर होती. या घराण्यांत होऊन गेलेला प्रसिद्ध सिंहराज हा अत्यत दानशूर असून त्यानें हर्ष देवस्थानास विपुल संपत्ति दिली व देवालयाचें छत्र व घुमट हीं सोन्याचीं करविलीं. एकंदरींत दानशूरता, वैभव, व पराक्रम या बाबतींत हें सूर्यवंशी रजपुत घराणें बरेंच प्रसिद्ध होतें.

**३ प्रतिहार घराणें:**—( इ. स. ७२५–१०१८ ) वरील दोन घराण्यांप्रमाणेंच अरबांचा प्रतिकार करण्यानें प्रतिहार घराणें उदयास आलें. या घराण्याला प्रतिहारी नांव पडण्याचें कारण असें कीं, या घराण्याचा मूळ पुरुष लक्ष्मण हा प्रभुरामचंद्राचा भाऊ व प्रतिहारी म्हणजे द्वारपाल होता. लक्ष्मण हा सूर्यवंशी असल्यानें हें घराणेंही सूर्यवंशी होतें. या घराण्यांतील मूळचा प्रसिद्ध पुरुष नागभट ( इ. स. ७२५–७४० ) हा होय. नागभटानें भिन्माल येथें प्रथम आपलें राज्य स्थापिलें असें एक मत आहे; तें खरें असो वा खोटें असो, मंडोर ( जोधपुरजवळ ) येथें प्रतिहारांचें राज्य होतें हें प्रसिद्ध आहे. मंडोर हें मारवाडांतील मुख्य शहर होय. आठव्या शतकाच्या प्रारंभीं मारवाड प्रांतावर अरबांच्या वारंवार स्वाऱ्या होत असत. नागभटानें पराक्रम गाजवून अरबांचा पाडाव केला व मारवाडाचें संरक्षण केलें.

नागभटानंतर विशेष प्रसिद्धीला आलेला राजा वत्सराज ( इ. स. ७७०–८०० ) हा होय. वत्सराजानें इ. स. ७८० त कनोजवर स्वारी केली आणि तेथील भंडिकुल राजाचा पाडाव करून तो कनोजचा सम्राट् बनला. हर्षाच्या वेळेपासून कनोजचें महत्त्व फार वाढलें होतें. कनोजची गादी मिळविणें हें त्या वेळच्या महत्त्वाकांक्षी राजांचं ध्येयच होतें. वत्सराजानें कनोजचें साम्राज्य पादाक्रांत केलें परंतु तेथील गादीवर स्वतः न बसतां राज्याचीं सर्व अधिकारसूत्रें वर्म घराण्याकडेच ठेविलीं. त्यानंतर त्यानें बंगाधिपति गोपाळ-

राजाचा पराभव केला. परंतु कांहीं दिवसांनीं दक्षिणेकडील राष्ट्रकूट राजा ध्रुव यानें वत्सराजाचा पराभव केला.

वत्सराजानंतर त्याचा मुलगा नागभट ( दुसरा—इ. स. ८००—८२५ ) यानें मात्र कनोजचें वर्म घराणें नामशेष करून आपली गादी कनोज येथें आणिली. आंध्र, सैन्धव, कलिंग, विदर्भ, इत्यादि राजे कनोजचे सामंत होते. त्यांचा नागभटानें पाडाव करून त्यांस आपले अंकित केले. वत्सराज व नागभट या दोघांनाही " परमभट्टारक महाराजाधिराज परमेश्वर " अशी पदवी लावण्यांत येत असे.

या घराण्यांतील सर्वश्रेष्ठ सम्राट् भोजराज ( इ. स. ८४०—८९० ) हा होय. यानें सर्वांत जास्त म्हणजे पन्नास वर्षें राज्य चालविलें. त्याचें राज्य पश्चिम ते पूर्वसमुद्रापर्यंत व दक्षिणेकडे विन्ध्य पर्वतापर्यंत पसरलें होतें. " भोजराजाचें अश्वदळ निरुपम आहे; त्याच्याजवळ उंटाचेंही सैन्य आहे. तो अत्यंत संपत्तिमान असून त्याच्या राज्यांत चोरांचें बिलकुल भय नाहीं " असें एका अरबी प्रवाशानें त्याच्याविषयीं लिहिलें आहे.

भोजराजानंतर त्याचा मुलगा महेंद्रपाल किंवा निर्भयराज ( इ. स. ८९०-९०८ ) गादीवर आला. सुप्रसिद्ध कवि व नाटककार राजशेखर हा त्याचा गुरु होता. महेंद्रपालहा चक्रवर्ती बादशहा होता. गुजराथचा चालुक्य राजा बलवर्मा हा त्याचा सामंत होता. त्याची शासनपद्धति न्यायपूर्ण व शांतताजनक होती. त्याच्या राज्यव्यवस्थेंतील एक विशेष म्हणजे त्यानें दप्तरांची व दानपत्रांची व्यवस्था ठेविली होती. महेंद्राच्या मागून दुसरा भोज, महीपाल, क्षितिपाल, राज्यपाल इ. राजे गादीवर आले. राज्यपालाच्या कारकीर्दीत गझनीच्या महंमदानें कनोजवर स्वारी करून कनोज शहर लुटलें. तेव्हांपासून कनोजचें महत्त्व कमी होत गेलें आणि प्रतिहारी घराण्याचा अंत झाला.

( इ. स. १०१८ )

( ४ ) **परमार घराणें**:—( इ. स. ९१४ ते १०१० ). अग्निकुंडापासून उत्पन्न झालेलें चवथें प्रतापशाली राजकुल धारच्या परमारांचें होय. हल्लीं हें कुल जवळ जवळ नामशेष झालें असलें तरी मध्ययुगांत त्यानें आपलें नांव

सर्वत्र गाजविलें होतें. परमार कुळाचें मूळ ठिकाण अबू होय. या घराण्याची उत्पत्ति केव्हां व कशी झाली हें विवाद्य आहे. मात्र या घराण्याची गादी कृष्णराज नांवाच्या राजानें इ. स. ९१४ त अवन्ती किंवा उज्जैन येथें प्रथम स्थापिली असावी व नंतर ती धारानगरी येथें नेली असावी अशी माहिती मिळते.

या घराण्यांत एकूण सहा राजे झाले. त्यांपैकीं तिसरा राजा सीयक किंवा श्रीहर्ष ( इ. स. ९५४–९७३ ) यानें हूण राजांचा पराभव केला व तो इ. स. ९७२ त माळव्याचा अधिपति बनला. त्याचा मुलगा वाक्पति किंवा मुंज हा महाप्रतापी राजा धारच्या गादीवर आला. त्यानें इ. स. ९७३-९९७ पर्यंत राज्य केलें. दक्षिणेंतील राष्ट्रकूटांचा पराभव केल्यानंतर मुंज राजानें पृथ्वीवल्लभ ही पदवी धारण केली. त्यानें दक्षिण टोंकाला असलेल्या चोल, चेर, पांड्य इत्यादि राजांचा पराभव केली होता. यावरून त्याची सत्ता दाक्षिणेंतही पसरली होती असें दिसतें. मुंज राजा जसा पराक्रमी होता तसा विद्वान्‌ही होता. स्वतः विद्वान् कवि असल्यामुळें त्याच्या दरबारांतही पंडितांचा भरणा विशेष होता यांत आश्चर्य नाहीं. संस्कृत वाङ्मयांत ख्यातनाम असलेले पद्मगुप्त, धनिक, हलायुध इ. पंडित त्याच्या आश्रयाला होते शेवटीं मात्र मुंजाचा तैलप राजाकडून कपटानें खून झाला ( स. ९९७ ).

मुंजराजाच्या नंतरच्या काळांत आणखी दोन राजे झाले. त्यांपैकीं भोजराज हा या कुळांतील सर्वांत पराक्रमी व विद्वान् राजा होऊन गेला. परंतु त्याचा काळ आपल्या कक्षेच्या बाहेरचा असल्यामुळें त्याची माहिती येथें देतां येणार नाहीं.

**( ५ ) चंदेल्ल घराणें:–** ( इ. स. ८३१ – १००० ) — चंदेल्लांचा बुंदेलखंडांत प्रवेश होण्यापूर्वीं तेथें परिहार घराणें राज्य करीत होतें. या परिहारांचा नन्नुक नांवाच्या चंदेल्लानें पराभव करून तें राज्य बळकाविलें. नन्नुक हा या घराण्याचा मूळ पुरुष होय. या वेळीं कनोजच्या साम्राज्यास उतरती कळा लागली असल्यानें नन्नुकास बुंदेलखंडावर स्वतंत्र राज्य स्थापितां आलें. त्याची राजधानी महोबा येथें होती.

नन्नुकानंतर जयशक्ति, विजयशक्ति, राहिल, धंग इत्यादि पराक्रमी राजे होऊन गेले. राहिलानें महोबाजवळ राहिल्यसागर नांवाचा विस्तीर्ण तलाव बांधिला असून त्याच्या कांठीं एक भव्य शिवमंदिरही आहे. धंगराजाची तुलना तर हमीरबरोबर केली आहे. इ. स. ९८९–९० त कम्मु येथें सबक्तगीनाबरोबर झालेल्या रणसंग्रमांत धंगराजानें विशेष पराक्रम गाजविला. त्याच्या राज्याचा विस्तार काशीपर्यंत झाला होता.

चंदेल्लांचीं स्वतंत्र नाणीं असून त्यांवर हनुमानाचा शिक्का आहे.

## ३ रजपुत घराणीं–( लहान )

( १ ) **चावडा घराणें**:–( इ. स. ७४६–९६१ ) भिन्माल येथील चाप कुळाच्या उपशाखेंत या घराण्याची गणना होते. या घराण्याचा मूळ पुरुष वनराज होय. यानेंच अनहिलवाड हें शहर वसवून तेथें आपली राजधानी केली ( स. ७४६ ). वनराजानें भिल्ल वगैरे वन्य लोकांच्या साहाय्यानें कान्यकुब्ज ( कनोज ) येथें जात असलेल्या सरकारी खजिन्यावर छापा घालून बरीच लूट मिळविली. या लुटीच्या जोरावर त्यास बरेंच सैन्य उभें करितां आलें व राज्य स्थापितां आलें. त्यानें स. ८०५ पर्यंत राज्य केलें. वनराजानंतर योगराज, रत्नादित्य, वैरिसिंह, मुंडराज इ. राजे गादीवर आले. परंतु ते कनोजच्या राजांचे मांडलिक होते. स. ९६१ त हें राज्य नामशेष झालें.

( २ ) **पाल घराणें**:–( इ. स. ७८०–१०२५ ) पूर्वींचें मोडकळीस आलेलें राज्य पादाक्रांत करून तेथें नवें बलिष्ठ राज्य स्थापन करणारें वंग देशांतील हें पाल घराणें गोपाल नांवाच्या राजानें इ. स. ७८० त नांवारूपास आणिलें. हर्षाची सत्ता संपुष्टांत आल्यानंतर वंग देशांत अंदाधुंदी सुरू झाली. गोपाल हा एक सरदार होता. तो शूर व मुत्सद्दी असल्यानें त्यानें बंडाळी मोडून सर्वत्र शांतता प्रस्थापित केली. प्रथमतः त्याची राजधानी पाटलीपुत्र येथें होती. परंतु पुढें त्यानें ती बदलून मोंगीर किंवा मुद्गिरि येथें नेली. त्याच्या राज्यांत मगधाचीही गणना होत असे. गोपालराजा बौद्ध मतानुयायी होता. गोपालानंतर त्याचा मुलगा धर्मपाल गादीवर बसला. त्यानें उत्तर

हिंदुस्थानाचा बराचसा प्रदेश जिंकिला होता. कनोजच्या एका राजालाही पदच्युत करण्यांत व दुसरा राजा त्या गादीवर बसविण्यांत त्यानें यश मिळविलें होतें. गांधार देशापर्यंत पाल राजांचा वचक निर्माण झाला होता. धर्मपालही बौद्ध होता. त्यानें विक्रमशीला येथें एक महाविद्यालय स्थापन केलें होतें.

धर्मपालाचा मुलगा देवपाल हा अत्यंत पराक्रमी राजा होऊन गेला. त्यानें आपला सेनापति लवसेन याच्या मदतीनें कामरूप व कलिंग हे देश जिंकिले. देवपालानंतर या घराण्यांत सहा राजे झाले. इ. स. १०२५ च्या सुमारास पालांची सत्ता नामशेष झाली, व सेन घराणें पुढें आलें. सेन हें दाक्षिणात्य ब्राह्मण घराणें होतें.

( ३ ) **कर्कोटक घराणें** ( इ. स. ६०२–८५५ )—या घराण्याचा मूळ पुरुष दुर्लभवर्धन इ. स. ६०२ त काश्मीरच्या गादीवर आला याच्या वंशांत एकूण १७ राजे झाले व त्यांनीं इ. स. ८५६ पर्यंत उत्तम प्रकारें राज्य केलें. प्रतापादित्य, ललितादित्य, जयापीड हे या घराण्यांतील प्रबळ राजे होत. ललितादित्य हा उत्तर हिंदुस्थानांतील एक बलशाली सम्राट् होऊन गेला. त्याच्या साम्राज्यांत मेकरान, तुराण, कंबोज, तिबेट, सिंध, कनोज, गौड, कलिंग, सौराष्ट्र इत्यादि राज्यें समाविष्ट होतीं. त्यानें दिग्विजय करून विपुल संपत्ति मिळविली व तिचा उपयोग प्रजेच्या हितार्थ केला. त्यानें ठिकठिकाणीं पूल, अन्नसत्रें, पाणपोया, देवळें, विहिरी हीं बांधविलीं. त्याचा नातू जयापीड हाही शूर व विद्वान् राजा होता. त्याच्या दरबारांत उद्भट, वामन इ. प्रख्यात पंडित होते. याच्यानंतरचे सर्व राजे दुर्बळ झाले व इ. स. ८५५ त हें घराणें नामशेष झालें.

इतर राजघराणीं दक्षिणेकडील असल्यामुळें त्यांच्याविषयींची माहिती पुढील प्रकरणांत स्वतंत्रपणें दिली आहे.

## ४ रजपुतांचे स्वभावविशेष

जगाच्या पाठीवर ज्या कांहीं थोड्या वीर्यशाली जाती निर्माण झाल्या त्यांत रजपुतांचें स्थान पहिलें मानावें लागेल. हाडाचा रजपुत कधींही भ्याड

असणार नाहीं. जर एकादा रजपुत पुरुष रणांगणावर शत्रूला पाठ दाखवून परत येईल तर त्याला घराचें दार उघडलें जाणार नाहीं. रजपुत स्त्री अशा पुरुषाला कधींही आदरानें वागविणार नाहीं. रजपुतानें एक तर लढून विजय मिळवावा नाहीं तर समरांगणांत मरून जावें. रजपुतांच्या प्राणांवरच प्रसंग गुदरल्यास स्त्रियांसह ते 'जोहार' करीत. अशा तऱ्हेचा स्वत्वाविषयींचा अभिमान जगांत विरळाच. स्त्रियांचें पावित्र्य रजपुतांना प्राणाहूनही प्रिय असतें. त्या पावित्र्याच्या रक्षणार्थ बलिदान केल्याचीं शेंकडों उदाहरणें रजपुतांच्या इतिहासांत आहेत.

रजपुत हे आर्य असल्यामुळें आर्यत्वाचे निदर्शक असे कित्येक थोर गुण त्यांच्या ठिकाणीं वसत होते. आर्य म्हणजे श्रेष्ठ. इतरांपेक्षां शौर्य, पराक्रम, विद्वत्ता, मनाचें औदार्य इत्यादि गुण आर्यांच्या ठिकाणीं विशेषत्वानें आढळतात. या सर्व गुणांचा प्रादुर्भाव रजपुतांच्या ठिकाणीं झालेला आढळतो. उच्च संस्कृति हा उच्च गुणांचा परिपाक होय. रजपुतांची संस्कृति उच्च होती असें आपण कां म्हणतों ? कारण, ते स्वाभिमानी, दृढनिश्चयी व पराक्रमी असून त्यांच्या ठिकाणीं स्वधर्म व स्वातंत्र्य यांविषयीं जाज्वल्य अभिमान, स्त्रियांच्या व देवतांच्या पावित्र्याविषयीं चाड, विद्वानांविषयीं आदर, इत्यादि प्रमुख गुण प्रखरतेनें दिसतात. परधर्मीयांनीं आर्य संस्कृतीचें एकही चिन्ह या आर्यभूमीवर जिवंत ठेवावयाचें नाहीं अशा निश्चयानें प्रचंड सैन्यानिशीं या देशावर स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यांचा ओघ सतत ५-६ शें वर्षें अविरत चालला होता. परंतु स्वधर्माविषयीं व स्वातंत्र्याविषयीं जळजळित अभिमान बाळगिणारे असंख्य रजपुत वीर तो ओघ थोपवून धरण्यास अचल निश्चयानें पुढें सरसावले. त्या वेळीं ते खरेखुरे ज्वालाग्राही बनले होते. रजपुत नसते तर हिंदु जाति कायमची नामशेष झाली असती.

रजपुत जसे पराक्रमी होते तसेच ते मनानें मोठे होते. शरण आलेल्यांवर त्यांनीं कधींही शस्त्र उगारिलें नाहीं. त्यांचें शस्त्र रक्षणासाठीं होतें, आक्रमणासाठीं नव्हतें. परंतु त्यांच्या मनाचें औदार्य त्यांच्या घातास कारण झालें. कारण, शत्रूशीं वागतांना तो जसा असेल तसें त्याच्याशीं वागण्याचें धोरण

ठेवावें लागतें हें त्यांस उमगलें नाहीं. विश्वासघातकी शत्रूशींही ते औदार्यानें वागले आणि त्यांनीं आपला नाश करून घेतला.

रजपुत ही अत्यंत इमानी जात आहे. एकदां दिलेला शब्द ते प्राण गेला तरी मोडणार नाहींत. या त्यांच्या गुणाचा पुढील मुसलमान सत्ताधीशांनीं चांगलाच फायदा करून घेतला.

रजपुत राजे विद्याभ्यासंगी व कलोपासक होते. त्यांच्या दरबारांत विद्वानांचा नेहेमीं भरणा असे. प्राचीन कलांची त्यांनीं चांगली जोपासना केली होती. विशेषतः पाल राजांनीं कलेला विशेष उत्तेजन दिलें. धीमान, वीतपाल यांसारखे विख्यात कलाकार त्या काळीं होऊन गेले. रजपुत राजांनीं संस्कृत भाषेला प्राधान्य दिलें. अशा प्रकारें रजपुत हे आर्यसंस्कृतीचे खरे उपासक व रक्षक ठरले आहेत.

## ५ राजपुत काळांतील परिस्थिति

**( अ ) धार्मिकः**—राजपुत काळांत बौद्ध धर्म बहुतेक लोप पावला. आणि वैदिक हिंदु धर्माची ध्वजा सर्वत्र फडकूं लागली. वंग देशांतील पाल राजे बौद्ध धर्मीय होते परंतु त्यांच्या धर्मावर वैदिक धर्माची छाप बरीच पडलेली दिसते. मूळचा बौद्ध धर्म सर्वस्वीं नष्टप्राय झाला होता. त्या वेळचे बौद्धानुयायी लोक मूर्तिपूजक बनले होते. बौद्ध धर्माचा ऱ्हास झालेला, आणि जैन धर्माचा प्रसार मर्यादित; त्यामुळें हिंदुस्थानांत या वेळीं एकच धर्म–हिंदु धर्म–सर्वत्र प्रचलित होता. सर्वत्र शिव, विष्णु, आदित्य इत्यादि देवतांची उपासना चालू होती. रजपुत राजे देवालयें बांधण्याकरितां अलोट पैसा खर्च करीत. त्यामुळें सर्व देश भव्य देवालयांनीं फुलून गेला होता. नेपाळ, कालिंजर, प्रभासपट्टण, उज्जयिनी येथें शिवाचीं विशाल देवालयें बांधण्यांत आलीं. तसेंच विष्णूचीं, सूर्याचीं, विंध्यवासिनीचीं अशीं अनेक मंदिरें ठिकठिकाणीं बांधण्यांत आलीं. काशी येथील विश्वनाथाचें देवालय त्या वेळच्या देवालयांत श्रेष्ठ होय.

लोकांत वेदांविषयींची श्रद्धा बळावली होती. पुनर्जन्म व कर्मविपाक या वैदिक कल्पनाही लोकांना पुन्हां मान्य होऊं लागल्या. श्रीमान् शंकराचार्य

व कुमारिलभट्ट यांनीं वैदिक मताचा प्रचार प्रभावानें करून इतर मतांचें खंडन केलें. त्यामुळें वैदिक धर्माचा प्रसार सर्वत्र झाला.

( आ ) **सामाजिकः**—रजपुतांच्या काळीं हल्लीं इतके जातीजातींतील पोटभेद कडक स्वरूपाचे नव्हते. हिंदुस्थानांतील सर्व ब्राह्मण सारखेच मानिले जात. कनोजी, दक्षिणी, गुजराथी ब्राह्मण असे सुद्धां भेद त्या वेळीं निर्माण झाले नव्हते व त्यांच्यांत गोत्रें तेवढींच भिन्न होतीं. क्षत्रियांतही हल्लींप्रमाणें पोटभेद नव्हते व त्यांच्यांत सरसकट विवाह होत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य या तीन मुख्य जातीखेरीज स्वतंत्र अशा बऱ्याच पोटजाती होत्या. तरी पण जातिभेदांची तीव्रता आजच्या इतकी नव्हती.

ब्राह्मणांप्रमाणेंच क्षत्रियही या कालीं शास्त्राध्ययन करीत. परमार कुलांतील मुंज, भोजराज, व काश्मीरचा हर्ष इत्यादि राजे विद्याव्यासंगी असल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे.

या काळांतील विशेष महत्त्वाची गोष्ट ही कीं, या वेळीं उच्च जातींत अन्नपानादि व्यवहार एकत्र होत असत. विशिष्ट क्षूद्रांसमवेतही प्रसंगविशेषीं त्या वेळीं भोजन करीत.

हिंदुस्थानांतील लोकांना दागिने व उंची वस्त्रें यांची पुरातन काळापासून आवड आहे. याही काळीं लोक मोत्यांचे कंठे, माणकें, पाच इ. मौल्यवान दागिने वापरीत व उंची पोषाख करीत.

बालविवाहाची चाल रूढ होती. पुनर्विवाहाला मान्यता नव्हती. क्षत्रियांच्या बायका पतीबरोबर सती जात असत. रजपुत लोक दाक्षिण्यप्रिय होते. ते स्त्रियांना फार मान देत.

( इ ) **राजकीय**—प्राचीन काळाप्रमाणें राजपुत काळांतही हिंदुस्थानांत कित्येक राज्यें होतीं. त्यांपैकीं कांहीं मोठीं साम्राज्यें असून त्यांच्या आधिपत्याखालीं लहान मांडलिक राज्यें होतीं. राज्य क्षत्रियानेंच करावें, हा अधिकार त्यांस ईश्वरानें दिला आहे अशी त्या वेळची समजूत होती. शासनपद्धति एकसत्ताकच बहुधा असे. परंतु कधीं कधीं लोकांकडूनही राजाची निवडणूक होई. बाप्पा रावळ व पाल राजा गोपाल यांची निवडणूक लोकांनीं केली होती. राज-

वंशाचा पिढ्यानुपिढ्या राज्य चालविण्याचा हक्क मानला जात असे. राजा हा विष्णूचा अवतार समजला जाई. त्यामुळें त्याच्या विरुद्ध सहसा कोणी जात नसे.

रजपुत राजे खडें सैन्य बाळगीत. सैन्यांत पायदळ व घोडदळ हे विभाग सामान्यतः असतच. कांहीं राजांजवळ गजदळ व उंटदळही होतें.

राजसत्ता अनियंत्रित असली तरी राजे स्मृतींप्रमाणें वागत असल्यामुळें त्या वेळीं नवीन कायदे करण्याची पद्धत नव्हती. एकंदरींत राज्यव्यवस्था सुव्यवस्थित असे.

## टिपणें

( १ ) कुमारिलभट्ट— इ. स. च्या सातव्या शतकांत आपल्या लोकोत्तर बुद्धिमतेच्या प्रभावानें जगाला दिपवून टाकणारे आणि वैदिक धर्माला पुन्हां जीवन देणारे कुमारिलभट्ट हे पहिले महान् पुरुष होत. हल्लींच्या हिंदुधर्माचा पाया त्यांनीं घातला आणि पुढील शतकांत दुसऱ्या एका महान् व्यक्तीनें त्यावर भव्य मंदिर उभारिलें कुमारिलभट्टांच्या खाजगी जीवनासंबंधीं, इतकेंच नव्हे तर त्यांच्या कालासंबंधीं सुद्धां कांहींच माहिती उपलब्ध नाहीं. साधारणपणें त्यांचा काळ इ. स. ६५०—७०० च्या दरम्यानचा असावा असें मानतात. इ स. ७०० हा त्यांच्या निधनाचा काल बहुतेक विद्वानांनीं मान्य केला आहे.

कुमारिलभट्टांचा जन्म आसाम प्रांतांत झाला असावा. त्यांस संस्कृत व्यतिरिक्त अनेक भाषा अवगत होत्या. सर्व द्राविडी व यावनी भाषांत ते पारंगत होते. त्यांनीं बौद्ध भिक्षुचा वेष घेऊन बौद्ध मतांचें प्रथम अध्ययन केलें आणि नंतर तीं मतें चूक असल्याचें साधार सिद्ध केलें. ते न्यायमीमांसादि शास्त्रांत पारंगत होते. मीमांसा शास्त्रावर त्यांनीं एक महान् ग्रंथ लिहिला आहे. त्यांची मुख्य कामगिरी म्हणजे बौद्ध मताचा पाडाव करून लोकांची वेदांवरील उडालेली श्रद्धा पुन्हा दृढ करणें ही होय. बौद्ध धर्मास वास्तविक सम्राट् हर्षाच्या पूर्वींच ओहोटी लागली होती. परंतु हर्षानें पुन्हां ही ज्योत नव्यानें प्रज्ज्वलित केली. ती साफ विझविण्याचें कार्य कुमारिलभट्टांनीं केलें आणि शंकराचार्यांच्या कामगिरीस कार्यक्षेत्र निर्माण करून दिलें.

(२) श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य :— कुमारिलभट्टांनीं बौद्ध मताचें खंडन केलें खरें; परंतु त्याची प्रतिक्रिया म्हणून त्यांच्या निधनानंतर बौद्ध मताची लाट पुन्हां परतली. अहिंसा व संन्यास हीं बौद्ध तत्त्वज्ञानांतील केन्द्र-तत्त्वें लोकांना इतकीं आवडलीं होतीं कीं, तीं सोडून पुन्हां वैदिक धर्मांतील हिंसायुक्त यज्ञयागादि कर्में स्वीकारिणें त्यांस मान्य होणें शक्य नव्हतें. कुमारिल-भट्टांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर बौद्ध मतें खोडून टाकिलीं; तरीपण लोकांच्या गळीं एकादी गोष्ट उतरविण्यास विरोध हा मार्ग नसून त्यांच्या प्रिय भावनांशीं समरस होणें हा व्यवहारी मार्ग आहे हें त्यांच्या ध्यानांत न आल्या-मुळें त्यांच्या मृत्यूनंतर पुन्हां बौद्ध मतांना आपोआप चालना मिळाली. शंकरा-चार्य व्यवहारनिपुण व मनुष्यस्वभाव जाणणारे होते. त्यांनीं लोकांच्या प्रवृत्तींना विरोध केला नाहीं; तर उलट त्यांच्या कलाप्रमाणें घेऊन त्यांस वैदिक तत्त्वज्ञान स्वीकारण्यास तयार केलें. म्हणून त्यांस सर्वव्यापी विजय मिळवितां आला. अशा सर्वमान्य आचार्यांचें जीवनचरित्र प्रथम आपण थोडक्यांत पाहूं आणि मग त्यांच्या कामगिरीची माहिती मिळवूं.

चरित्र :— शंकराचार्यांचा जन्म केरळ किंवा मलबार प्रांतांत कालदी गांवीं नंबुद्री ब्राह्मणाच्या कुळांत इ. स. ७८८ त झाला. त्यांचे वडील लहान-पणींच निवर्तले. त्यांच्या आईनें त्यांस वाढविलें. अनेक आपत्ती आल्या असतां ही त्यांनीं अगदीं लहान वयांतच आपलें सर्व शिक्षण पुरें केलें. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणें त्यांच्या आईनें त्यांच्या लग्नाचा विचार काढला. परंतु बालवयां-तच ध्येय निश्चित झालेलें होतें; आणि तें ध्येय लग्न करून साध्य होणें शक्य नव्हतें. आईच्या मनाविरुद्ध वागणें जरी त्यांना आवडत नव्हतें तरी ती गोष्ट ध्येयाच्या आड येणारी असल्यामुळें तिला मान्यता न देण्याचा त्यांनीं निश्चय केला; इतकेंच नव्हे तर लोकांवर छाप पाडण्यासाठीं आवश्यक असलेल्या संन्यासा-श्रमाची त्यांनी तयारी केली. त्यांच्या आईला ही गोष्ट कळतांच तिच्या मनाला केवढा धक्का बसला असेल! आपला एकुलता एक मुलगा संन्यास घेणार व आपल्याला अंतरणार ही कल्पनाच मुळीं असह्य होती. परंतु आईचें कसेंबसें समाधान करून त्या लोकोत्तर विभूतीनें आपला मार्ग आक्रमिण्यास प्रारंभ केला.

मलबार प्रांत सोडून ते उत्तरेकडे चालले. आर्यावर्त हेंच त्यांचें मुख्य कार्यक्षेत्र होतें. कारण, बौद्ध व जैन मतांचा प्रसार उत्तरेंत अधिक झाला होता, व त्या मतांवर त्यांना विजय मिळवावयाचा होता. त्यासाठीं ते उत्तरेंत गेले. जातांना वाटेंत विंन्ध्याद्रीच्या प्रदेशांत त्यांची गोविंदगुरूशीं गांठ पडली. गोविंदाचार्य हे गौडपादाचार्यांचे पट्टशिष्य होते. गोविंदाचार्यांकडून शंकराचार्यांनी संन्यासदीक्षा घेतली, व कांहीं वर्षें त्यांच्यापाशीं राहून त्यांनीं वेदांचा संपूर्ण अभ्यास केला. या नंतर त्यांच्या खऱ्या कामगिरीला प्रारंभ झाला.

प्रथम ते काशीस गेले. काशी हें त्यावेळीं मोठमोठ्या विद्वानांचें केन्द्रस्थान होतें. तेथील पंडितांची विद्वत्तेबद्दल विशेष ख्याति होती. शंकराचार्यांनीं आपल्या असामान्य बुद्धिमत्तेनें तेथील पंडितांस चकित करून सोडलें. त्यांना वादांत जिंकून त्यांनीं आपलें श्रेष्ठत्व त्यांच्या निदर्शनास आणिलें. या वेळेपासून त्यांच्या प्रचारकार्यास सुरुवात झाली.

आपलीं मतें सर्वांना समजावीं यासाठीं त्यांनीं वेदांवर भाष्यें लिहिलीं. भाष्यांखेरीज आणखीही कांही ग्रंथ त्यांनीं लिहिले. शांकरभाष्य व त्यांचे इतर ग्रंथही अगदीं साध्या, सरळ पण जोरदार अशा संस्कृत भाषेंत लिहिलेले आहेत.

अशा तऱ्हेनें नवीन ग्रंथ लिहून झाल्यावर त्यांनीं आपल्या मत प्रसारार्थ सर्व हिंदुस्थानभर संचार केला, व ठिकठिकाणच्या प्रसिद्ध विरोधी पंडितांस वादांत जिंकून आपलें मत प्रस्थापित केलें. कुमारिलभट्टांचे कट्टे अनुयायी म्हणून प्रसिद्ध असलेल्या मंडनमिश्रांस त्यांच्यापुढें हार खावी लागली व वादाच्या अटींत ठरल्याप्रमाणें त्यांनीं संन्यासदीक्षा घेतली. संन्यासाश्रमांतील त्यांचें नांव सुरेश्वराचार्य असें होतें. शंकराचार्यांनंतर शृंगेरी मठाचे गादीवर सुरेश्वराचार्यांची जगद्गुरु म्हणून योजना झाली. ख्रिस्ती धर्माप्रमाणें पोपला व त्याच्या गादीला जो मान आहे तोच मान हिंदुस्थानांत हिंदुधर्माप्रमाणें शंकराचार्य व त्यांच्या पीठाला आहे.

पुढें शंकराचार्यांनीं उज्जयिनीच्या पाशुपताचार्यांस तसेंच आसाम व काश्मीर येथील पंडितांस वादांत जिंकिलें. काश्मिरांत शारदांबेचें प्रसिद्ध देवालय आहे. या देवालयाचें पुढील दार नेहमीं बंद असे. जगांतील सर्व पंडितांवर जो

विजय मिळवील त्यालाच फक्त हें द्वार उघडण्याचा अधिकार होता. शंकराचार्यांनीं हें द्वार उघडिलें.

शंकराचार्य व्यवहारकुशल तर होतेच, तसेंच राजकीय धोरणाचेही होते. आपल्या मताचा लोकांवर कायम पगडा राहावा, देशभर अखंडपणें एकाच संस्कृतीचा अंमल राहावा व एकच धर्मसत्ता असावी या हेतूनें त्यांनीं चार दिशांस चार मठ स्थापन केले. उत्तरेस हिमालयांत बद्रीकेदार येथें, दक्षिणेंत शृंगेरी येथें, पश्चिमेस द्वारका येथें व पूर्वेस पुरी येथें ते चार मठ आहेत. शृंगेरी मठ हा सर्वांत श्रेष्ठ होय. 'शंकराचार्य' ही एक परंपराच निर्माण झाली, व सर्व धार्मिक अधिकार त्या पीठाकडे आले.

शंकराचार्य शांत स्वभावाचे असून ते सर्वांशीं सारख्याच प्रेमानें वागत, भिन्नभिन्न मतांच्या लोकांनाही त्यांच्या विषयीं अतिशय आदर वाटत असे. आणि म्हणून त्यांस जगद्गुरु पदवी देण्यांत आली; आणि खरोखरच ते सर्व जगाचे गुरु होते यांत शंका नाहीं.

हिमालयांतील केदारनाथाचें देवालय शंकराचार्यांनींच बांधविलें. तेथील पुजारी केरळ ब्राह्मणच असतात. शंकराचार्य नेपाळांतही गेले होते. तेथें आजही त्यांनी घालून दिलेले निर्बंधच पाळले जातात.

अशा प्रकारें सव हिंदुस्थानभर विजय संपादन करून शंकराचार्य बद्रीकेदार येथें गेले. तेथें जाण्यापूर्वीं आपल्या आईच्या भेटीसाठीं ते कालदीला आले होते. थोड्याच दिवसांनीं ती दिवंगत झाली. संन्यास घेतलेला असल्यामुळें त्यांस शास्त्राप्रमाणें आईचें क्रियाकर्मांतर करितां येत नव्हतें. परंतु तें करण्याची त्यांनीं इच्छा दर्शविली. त्यामुळें नातेवाईकांनीं त्यांच्यावर बहिष्कार घातला. तरीही त्यांनीं न डगमगतां एकट्यानेंच आईच्या मृत देहास घराच्या अंगणांत अग्नि दिला.

शंकराचार्य या पुढें फार दिवस जगले नाहींत. इ. स. ८२० त म्हणजे वयाच्या बत्तीसाव्या वर्षीं बद्रीकेदार येथें त्यांनीं देह ठेविला.

शंकराचार्यास 'प्रच्छन्न बौद्ध' असें म्हणत; यांतच त्यांच्या यशाचें मर्म आहे. त्यांनीं अहिंसा व संन्यास हीं लोकांना पटलेलीं तत्त्वें मान्य केलीं व

वेदाच्याच पायावर आपलें नवीन तत्त्वज्ञान उपदेशिलें. वेदांविषयीं व वर्णाश्रम-धर्माविषयीं त्यांनीं पूज्यभाव निर्माण केला. आणि हल्लींची हिंदुधर्माची व्यापक व भक्कम इमारत उभारिली.

## थोडक्यांत

(१) रजपुतांचा उदयः— रजपुत हे भारतीय उच्च वर्णीय आर्य. सनातन वैदिक धर्माचे रक्षक — राजकुलांतील क्षत्रिय — राजपुत्र.

(२) रजपुत घराणीं. (मोठीं)

(१) गुहिलोत घराणें:— बाप्पा रावळ, गुहिल, खुमान, अल्लट इ.

(२) चाहमान घराणें:— सामन्त, जयराज, सिंहराज इ.

(३) प्रतिहार घराणें:— नागभट, वत्सराज, नागभट (दुसरा), भोजराज, महेंद्रपाल इ.

(४) परमार घराणें:—श्रीहर्ष, मुंज इ.

(५) चंदेल्ल घराणें:— नन्नुक, जयशक्ति, धंग इ.

(३) रजपुत घराणीं:— (लहान) चावडा, पाल, कर्कोटक, इ.

(४) स्वभावविशेषः— वीर्यशाली, स्वाभिमानी, मानी, उदार, विद्वान्, स्वातंत्र्यवीर, स्वधर्माभिमानी, नीतिनिपुण, इमानी, कलोपासक इ.

**प्रश्न**–(१) ‘रजपुत’ हें नांव कसें रूढ झालें ?

(२) ‘रजपुत कोणापुढेंही मान वांकविणार नाहींत.’ अशीं मानीं घराणीं कोणतीं ? त्यांचा थोडक्यांत इतिहास सांगा.

(३) ‘रजपुत नसते तर हिंदु जाति नष्ट झाली असती.’ हें विधान उदाहरणें देऊन स्पष्ट करा.

(४) कुमारिलभट्ट व शंकराचार्य यांची कामगिरी सांगा.

**स्वाध्याय**–(१) मध्ययुगीन भारत–ले. चिं. वि. वैद्य. (पु. २रें)

(२) रजपुतांचा इतिहास. ले. देशपांडे.

(३) रजपुतांच्या गोष्टी.

(५) राजपुत संस्कृति.–ले. देशपांडे.

## प्रकरण १३ वें

# विंध्याद्रीच्या दक्षिणेस

१ चालुक्य
२ राष्ट्रकूट
३ यादव
४ होयसळ
५ दुसरे चालुक्य
६ चोल
७ चेर
८ पांड्य
९ पल्लव
१० दक्षिणेंतील धार्मिक स्थिति
११ दक्षिणेंतील सामाजिक स्थिति.

### प्रास्ताविक

उत्तरेंत राज्यांची उलथापालथ होत असतांना दक्षिण हिंदुस्थानांतही लहान मोठीं राज्यें उदयास येत होतीं, व कालांतरानें अस्तास जात होतीं. उत्तरेंतील मगधाच्या राज्याप्रमाणें दक्षिणेंतील आंध्रांशिवाय इतर कोणासही साम्राज्य स्थापन करितां आलें नाहीं. दक्षिणेंतील या राज्यांचें स्वरूपही फार मोठें नव्हतें. त्यांत चंद्रगुप्त, अशोक, विक्रमादित्य, किंवा हर्ष यांसारखे भारतीय कीर्तिसम्राट् कोणी झाले नाहींत. या व इतर अनेक कारणांमुळें दक्षिणेंतील राज्यांकडे सामान्यतः दुर्लक्ष केलें जातें, व त्यामुळें सामान्य वाचकाची अशी समजूत होते कीं, हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास म्हणजे फक्त उत्तर हिंदुस्थानाचा इतिहास होय. जणूं कांहीं उत्तरेंत या प्रचंड घडामोडी चालू असतांना दक्षिण देश रानटी

अवस्थेंत असून राजकीयदृष्ट्या थंड–मृतवत्–होता. पण ही समजून किती चुकीची आहे हें खालीं दिलेल्या दक्षिणेंतील राज्यांच्या वर्णनावरून ध्यानांत येईल.

## १ चालुक्य

चालुक्यांच्या उत्पत्तीबद्दल अनेक वाद किंवा मतें प्रचलित आहेत. विक्रमांकचरिताचा लेखक व चालुक्य घराण्यांतील ६ व्या विक्रमादित्याच्या पदरीं असलेला राजकवि बिल्हण, चालुक्यांचें मूळ ठिकाण अयोध्या म्हणून सांगतो. पण तें फारसें खरें वाटत नाहीं. कारण चालुक्य हें नांव आर्य किंवा संस्कृत वाटत नाहीं. डॉ. होअर्नेलच्या मताप्रमाणें चालुक्य हे तुर्की लुटारू असावेत. पुलकेशी हें नांव चालुक्य घराण्यांत व गुजराथेंतील चाप या जातीच्या लोकांत आढळून येतें; त्यावरून चालुक्य हे गुर्जर लोकांना जवळचे असावेत असें वाटतें.

विजापूर जिल्ह्यांत सांपडलेल्या एका शिलालेखांत दुसऱ्या पुलकेशी-पर्यंतच्या सर्व चालुक्य राजांची माहिती सांपडते. पुलकेशी – पहिला – याच्या पूर्वीं कांहीं राजे होऊन गेले असले तरी त्यालाच चालुक्य घराण्याचा संस्थापक मानण्यांत येतें. त्यानें वातापी ( बदामी–विजापूर जिल्हा ) हें ठिकाण जिंकून आपल्या पराक्रमाचें द्योतक म्हणून अश्वमेध यज्ञ केला. त्याचा मुलगा कीर्ति-वर्मन् यानें वनावसी व कोंकण हे प्रांत हस्तगत कले.

यानंतरचा महत्त्वाचा राजा म्हटला म्हणजे दुसरा पुलकेशी हा होय. त्याचा काळ इ. स. ६०८–६४२ हा आहे. हा कीर्तिवर्मन्चा मुलगा. त्यानें आपला काका मंगलेसा व त्याचे सहाध्यायी यांचा पराभव करून राज्य मिळविलें. त्यानें कदंन, गुर्जर वगैरे लोकांना जिंकिलें. हर्षानें दक्षिणेवर स्वारी केली असतां त्यानें हर्षाचा पराभव करून त्यास नर्मदापार घालवून दिलें. आरमारी चढाई करून कोंकण प्रांत जिंकला. तसेंच कलिंग, कोसल, पिष्टपूर या राज्यांवर स्वाऱ्या करून कांचीपर्यंतचा प्रदेश त्यानें जिंकिला. दक्षिणेकडे कावेरी नदी ओलांडून तो चोल, पांड्य व केरळ या राज्यांत शिरला होता. त्याचा हा दिग्विजय

कदाचित् अतिशयोक्तीचा असणें शक्य आहे, पण त्यावरून त्याच्या पराक्रमाची कल्पना येते.

दुसऱ्या पुलकेशीनें स्वतःला सत्याश्रय, पृथ्वीवल्लभ, परमेश्वर, वगैरे पदव्या घेतल्या होत्या. पुलकेशी आपल्या पराक्रमामुळें दक्षिणेंतील मोठा राजा ठरला. जवळ जवळ सर्व दक्षिण भागावर त्याचें राज्य पसरलें होतें. त्यानें पल्लवांचा पराभव करून त्यांचें राज्य आपल्या राज्यास जोडिलें.

पुलकेशीनें इ. स. ६२५ मध्यें आपला वकील इराणचा राजा खुश्रू याजकडे पाठविला होता. अजिंठ्याच्या लेण्यांत खुश्रूकडून परत भेटीला आलेल्या इराणी वकिलाच्या व पुलकेशीच्या भेटीचें एक चित्र आहे. इ. स. ६४१ मध्यें प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युयएनत्संग हा पुलकेशीच्या दरबारीं आला होता. त्यानें महाराष्ट्रांतील लोकांचें, पुलकेशीच्या राज्याचें व त्याच्या मांडलिक राजांच्या संबंधाचें मोठें मजेदार वर्णन लिहून ठेविलें आहे.

पल्लव राजा नरसिंहवर्मन् यानें कांचीजवळ पुलकेशीचा पराभव केला. त्यानें नायनराच्या हाताखालीं मोठी फौज देऊन त्याला चालुक्याची राजधानी जें बदामी शहर त्यावर रवाना केलें. त्यानें बदामीचा पूर्ण नाश करून तेथें आपला विजयस्तंभ उभा केला. पुलकेशी इ. स. ६४२ मध्यें मरण पावला. त्याच्यानंतर चालुक्यांच्या राज्यांत मोठा गोंधळ उडून सर्वत्र अव्यवस्था माजली.

चालुक्यांच्या दोनशें वर्षांच्या कारकीर्दींत बौद्ध धर्म हळूहळू मागें पडून वैदिक धर्माचें पुनरुत्थापन सुरू झालें. चालुक्य राजांनीं व प्रजेनें वैदिक धर्माला मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला. जैन धर्माला याच सुमारास दक्षिणेंत पाठिंबा मिळूं लागला. दुसऱ्या विक्रमादित्य चालुक्यानें जैन धर्माला राजाश्रय दिला होता. चालुक्य राजांच्या ध्वजावर वराहाचें चित्र असे.

चालुक्य राजांनीं शिल्पकलेस उत्तेजन दिलें. अजिंठा, एलिफंटा येथील लेणीं व चित्रकला त्यांच्याच कारकीर्दींत तयार झाली. चालुक्यांच्या वेळीं पश्चिम किनाऱ्यावरून परदेशीं मोठा व्यापार चालत होता, व चालुक्यांनीं आपल्या किनाऱ्याच्या रक्षणासाठीं मोठें आरमार तयार केलें होतें. इ. स. ७५८ पर्यंत चालुक्यांची सत्ता थोडीफार टिकून होती.

## २ राष्ट्रकूट

चालुक्यांचा पराभव करून त्या ठिकाणीं आपली सत्ता स्थापन करणाऱ्या राष्ट्रकूटांच्या उत्पत्तीबद्दलच्या माहितींतही बराच गोंधळ आहे. अशोकाच्या शिलालेखांत उल्लेखिलेल्या राष्ट्रीकांचे हे महाराष्ट्रीय वंशज असावेत. पण ते महाराष्ट्रांत राहात नसून पुढें कर्नाटकांतही पसरले होते. राष्ट्रकूटांची मातृभाषा कानडी असून त्यांनीं कानडी वाङ्मयाला मोठें उत्तेजन दिलें होतें. ते स्वतःला चांद्रवंशीय रजपुत म्हणवून घेत. त्यांचें मूळ ठिकाण लत्तालुरा म्हणजे हल्लींचें लातूर होय. दंतिदुर्गाच्या पूर्वीचे राष्ट्रकूट लातूरपासून पुढें वऱ्हाडांत पसरले होते.

राष्ट्रकूटांचा राजा पहिला इंद्र यानें गुजराथेंतील चालुक्य घराण्यांतील एका राजकन्येशीं विवाह केला होता. त्यानें वऱ्हाडांतील राज्य बळकट करून ठेविलें होतें. त्याचा मुलगा दंतिदुर्ग. तो इ. स. ७४५ मध्यें गादीवर आला. व त्यानें अकरा वर्षे राज्य केलें. भडोचच्या गुर्जरांचा व गुजराथेंतील चालुक्यांचा पराभव करून दंतिदुर्गानें आपलें राज्य वाढविलें. इ. स. ७५३ मध्यें त्यानें चालुक्य राजा दुसरा कीर्तिवर्मन् याचा पराभव केला व उत्तर महाराष्ट्र प्रांत आपल्या राज्यास जोडिला. माळव्यापर्यंत त्याच्या फौजा चाल करून गेल्या होत्या. दंतिदुर्ग हा जबरदस्त व दूरदर्शी असल्यामुळें आपल्याभोंवतीं असलेल्या राजांचें वर्म ओळखून त्यानें युद्ध करून किंवा राजकारण करून आपली महत्त्वाकांक्षा पुरी करण्याचा प्रयत्न केला. दंतिदुर्ग हा पक्का कर्मठ हिंदु होता. त्यानें हिंदु तीर्थांना व लोकांना भरपूर मदत केली होती. नाशिक, एलिचपूर किंवा वेरूळ यांपैकीं कोणतें तरी एक गांव राष्ट्रकूटांची या वेळीं राजधानी होतें.

दंतिदुर्गानंतर त्याचा काका पहिला कृष्ण हा राज्यावर आला. त्यानें इ. स. ७६० मध्यें पश्चिमेकडील चालुक्यांचा पूर्ण मोड केला, पूर्वेकडील चालुक्यांचाहि त्यानें पराभव केला. दक्षिण कोंकण जिंकून त्यानें तें आपल्या राज्यास जोडिलें. कृष्णाच्याच राजवटींत प्रसिद्ध कैलास लेणें खोदलें गेलें.

याच काळांत राष्ट्रकूटांची दक्षिणेंतील सत्ता दृढ होऊन उत्तरेकडे नजर टाकण्यास त्यांना संधि प्राप्त झाली.

यानंतर इ. स. ७८० मध्यें ध्रुव हा गादीवर आला. त्यानें शिववर्मा या पश्चिमेकडील राजाचा पराभव करून त्याचें राज्य आपल्या राज्यास जोडिलें. त्या राज्याची व्यवस्था पाहाण्यासाठीं त्यानें एक सुभेदार नेमला होता. पल्लव राजाविरुद्ध त्यानें कांचीवर सैन्य रवाना केलें होतें. त्यानें उत्तरेंत स्वारी करून वच्छराज या गुर्जर राजाचा पराभव केल्यामुळें राष्ट्रकूटांची कीर्ति वाढली.

तिसरा गोविंद यानंतर राष्ट्रकूटांचा राजा झाला. त्याला आपल्या थोरल्या भावाशीं झगडावें लागलें. गोविंदानें त्याचा जरी पराभव केला, तरी त्याला सौजन्यानें वागवून पुन्हां सुभेदार नेमिलें. इ. स. ८०३ मध्यें त्यानें पल्लवांवर स्वारी करून त्यांचा पराभव केला. विजयादित्य दुसरा या पूर्वेकडील चालुक्याचाही गोविंदानें परभव केला. याशिवाय गुर्जर प्रांत, बंगाल, व दक्षिणेंत पल्लवांच्या प्रांतांवर त्यानें स्वाऱ्या केल्या, या त्याच्या चढाईच्या धोरणामुळें श्रीलंकेचा राजा घाबरला, व त्यानें आपला एक पुतळा स्नेहदर्शक म्हणून गोविंदाकडे पाठविला. पराक्रम व मुत्सद्दीपणा या गुणांमुळें गोविंदाचें नांव विंध्याद्रीच्या दक्षिणेस गाजूं लागलें. राष्ट्रकूटांतील श्रेष्ठ राजा म्हणून त्याचा गौरव केला जातो तो अत्यंत योग्य आहे.

**अमोघवर्ष :–** ( इ. स. ८१४-८८० ) वयाच्या ६ व्या वर्षीं अमोघवर्षाला गादी मिळाली. त्याच्या बालवयाकडे पाहून राष्ट्रकूटांच्या ताब्यांतील अनेक राजांनीं राष्ट्रकूटांचें जूं झुगारून देण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यांत त्यांना यश तर लाभलेंच, शिवाय अमोघवर्षाला गादीवरून हांकलून लावण्यांतही त्यांना यश आलें. इ. स. ८१६–८२१ च्या काळांत अमोघवर्षाला पुन्हां गादी मिळाली. इ. स. ८६० मध्य त्यानें वेंगीचा राजा तिसरा विजयदित्य याचा पराभव केला. गुजराथेंतील राष्ट्रकूटांच्या एका घराण्याशीं त्याच्या इ स. ८३५ पासून कटकटी उत्पन्न झाल्या होत्या त्याही याच सुमारास बंद झाल्या. मात्र या घरगुती अडचणीमुळें त्याला उत्तरेंत हालचाल करितां आली नाहीं.

अमोघवर्ष हा वृत्तीनें धार्मिक होता. त्याला जैन धर्माबद्दल मोठें प्रेम वाटत असून त्यानें त्या धर्माला चांगला पाठिंबा दिला होता. असें असलें तरी त्यानें हिंदूंना मुळींच त्रास दिला नाहीं. उलट तो स्वतः महालक्ष्मीची पूजा करीत असे. त्याचा गुरु जिनसेन नांवाचा जैन होता. त्याच्याच उत्तेजनामुळें कानडी भाषेंतील पहिलें काव्य प्रसिद्ध झालें. सुलेमानानें त्याची तुलना बगदाद, कॉन्स्टॅन्टिनोपल, चीन इत्यादि देशांच्या बादशहांशीं केली आहे.

**दुसरा कृष्ण**—मिहिरराज भोज याच्याबरोबर दुसऱ्या कृष्णाचा झगडा सुरू झाला. पण त्यामुळें विशेष प्राप्ति कोणासच झाली नाहीं. पूर्वेकडील चालुक्य याच वेळीं स्वतंत्र झाले. परंतु गुजराथेंतील राष्ट्रकूटांचें घराणें या वेळीं या राज्यांत समाविष्ट करून घेण्यांत आलें. अमोघवर्षाप्रमाणें हाही जैन धर्माचा पुरस्कर्ता होता.

यानंतर १० व्या शतकांत राष्ट्रकूटांची सत्ता संपुष्टांत आली.

## ३ यादव

यादव राजे आपला पूर्वज श्रीकृष्ण मानतात. नाशिकापासून देवगिरीपर्यंतच्या प्रदेशावर त्यांची सत्ता चालत होती. भिल्लम हा कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वरी याचा मांडलिक होता. चालुक्यांच्या पडत्या काळाचा फायदा घेऊन भिल्लमानें कृष्णेपर्यंतचा प्रदेश हस्तगत केला, व इ. स. ११८७ मध्यें देवगिरी ही आपली राजधानी केली. होयसळांचा राजा बल्लाळ यानें गदगपाशीं भिल्लमाचा पराभव केल्यामुळें भिल्लमाच्या दक्षिणेकडील महत्त्वाकांक्षेस आळा बसला. याच स्वारींत भिल्लम मारला गेला. त्याच्यामागून त्याचा मुलगा जैत्रपाल हा गादीवर आला ( ११९१–१२१० ). त्यानें त्रिपुरीच्या कलचुरींना जिंकलें, व काकतीयांचा राजा महादेव याचा पराभव केला. गणपति काकतीयाची तुरुंगांतून सुटका करून त्यानें त्यास वरंगळचें राज्य दिलें. तो स्वतः वेद, तर्कशास्त्र, मीमांसा या विषयांत पारंगत होता. प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य याचा मुलगा लक्ष्मीधर हा त्याचा धार्मिक प्रमुख होता.

यानंतर इ. स. १२१० मध्यें सिंघण हा यादवांचा राजा झाला. त्यानें गुजराथवर दोन स्वाऱ्या केल्या, व दक्षिणेकडील कदंब राजांचाही पराभव केला.

सिंधणानंतरचा प्रसिद्ध राजा रामदेवराव. त्याच्याच कारकीर्दींत इ. स. १२९४ मध्यें अल्लाउद्दिनानें दक्षिणेंत स्वारी करून त्याचा पराभव केला. इ. स. १३१८ मध्यें यादवांचें राज्य नामशेष झालें.

## ४ होयसळ

द्वारसमुद्राच्या होयसळ घराण्याचा संस्थापक शाल नांवाचा पुरुष होता. विनयदित्य हा त्या घराण्यांतला पहिला प्रसिद्ध पुरुष. त्यानंतर नीप्रकम हा कल्याणीच्या चालुक्य राजांचा मांडलिक होता. चालुक्य व चोल यांच्या युद्धांत नीप्रकम व दुसरा विनयदित्य हे विशेषत्वानें पुढें आले. पाहिल्या बल्लाळानें आपली मूळची राजधानी बदलून म्हैसूर प्रांतांत बेलूर येथें ती नेली. द्वारसमुद्रावर आलेला हल्ला त्यानें परतवून लावला. त्याच्यानंतर त्याचा भाऊ भीतिदेव यानें आपला सेनापति गंगाराज याच्या मदतीनें इ. स. १११७ मध्यें चोल राजांचें गंगावदी हें ठिकाण जिंकिलें. नोलांबवदीवरील त्याची स्वारी अर्धवटच राहिली. तामीळ प्रांतांत चढाई करून त्यानें रामेश्वर गांठलें. इ. स. ११३७ च्या सुमारास सर्व म्हैसूर प्रांतावर त्याची सत्ता स्थापन झाली. त्यानें वैष्णव धर्माचा स्वीकार केला असला तरी जैन धर्माबद्दलची त्याची आस्था कायम होती. शैव पंथाला त्यानें पाठिंबा दिला होता. त्याच्या कारकीर्दींत अनेक देवळें बांधिलीं गेलीं. त्यानंतरच्या नरसिंहाच्या कारकीर्दींत होयसळांची सत्ता कमी झाली. दुसऱ्या बल्लाळानें देवगिरीचा राजा भिल्लम याचा इ. स. ११९१ मध्यें पराभव केला. त्यामुळें कृष्णानदीपर्यंत त्याची सत्ता वाढली. बल्लाळानें चालुक्यांची सत्ता झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य प्रसिद्ध केलें, व आपल्या नांवानें एक शक सुरू केला. विजयनगरचें राज्य स्थापन होईपर्यंत होयसळांची सत्ता दक्षिणेंत चालू होती.

## ५ दुसरें चालुक्य

यांना पूर्वेकडील किंवा वेंगीचे चालुक्य म्हणतात. बदामीच्या चालुक्य घराण्याचीच ही एक शाखा होती. दुसऱ्या पुलकेशीनें आंध्र प्रांत जिंकिल्यानंतर

तेथें आपला धाकटा भाऊ विष्णुवर्धन याची सुभेदार म्हणून नेमणूक केली. तो त्यापूर्वी महाराष्ट्राचा सुभेदार होता. इ. स. ६१५ मध्यें त्याची बदली वेलोरपासून विजगापट्टम्पर्यंतच्या प्रदेशाचा सुभेदार म्हणून झाली. पुलकेशीशीं तो अत्यंत स्वामिनिष्ठ होता. त्यानें स्वतःला विशमसिद्धी ही पदवी घेतली होती. पुलकेशीच्या मृत्यूनंतर हे पूर्वेकडील चालुक्य स्वतंत्र झाले. पुढील शंभर वर्षांचा त्यांचा इतिहास अज्ञात आहे. राष्ट्रकूटांच्या सत्तेचे जबरदस्त परिणाम या चालुक्यांना भोगावे लागले. राष्ट्रकूट राजा पहिला कृष्ण यानें या चालुक्यांचा राजा चौथा विष्णुवर्धन याला आपला मांडलिक केलें. तिसऱ्या गोविंदानें विजयादित्याला बंड केल्याबद्दल गादीवरून काढून टाकलें होतें, परंतु गोविंदाच्या मृत्यूनंतर त्यानें तें राज्य पुन्हां मिळविलें. इतकेंच नव्हे तर, इ. स. ८१४ मध्यें प्रत्यक्ष राष्ट्रकूटांच्या राज्यांत शिरून त्यानें अमोघवर्षाचा पराभव केला. त्यानें स्वतःला महाराजाधिराज व परमेश्वर ह्या पदव्या घेतल्या. त्याच्या राजवटींत पुष्कळ देवळें बांधलीं गेलीं. त्याच्यानंतर आलेला राजा तिसरा विजयादित्य याचा अमोघवर्षानें पराभव केला, परंतु त्यामुळें खचून न जातां विजयादित्यानें पल्लव, पांड्य, गंगा, राष्ट्रकूट वगैरे सत्ताधीशांचा पराभव केला. पहिल्या भीमानें राष्ट्रकूटांची सत्ता झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य इ. स. ८८८ मध्यें प्रसिद्ध केलें.

यानंतरच्या काळांत या चालुक्यांचें व राष्ट्रकूटांचें युद्ध बऱ्याच काळपर्यंत चाललें होतें. तिसऱ्या कृष्णानें ( राष्ट्रकूट ) चालुक्य राजा दुसरा अमा याचा पराभव करून त्यास कलिंगाकडे पिटाळून लाविलें; व त्या गादीवर आपला वारस म्हणून भद्प याची नेमणूक केली. राजराज चोल यानें चालुक्य राज्यांत शिरून मोठा धुमाकूळ घातला.

## ६ चोलांचें राज्य

पूर्व किनाऱ्यावर उत्तरेस वेल्लूरपासून दक्षिणेस पादुकोटापर्यंच्या प्रदेशास चोल ( केरळ ) म्हणतात. चोल व चेर यांचीं राज्यें स्वतंत्र असल्याचें अशोकानें मान्य कलें आहे. चोलांचा पहिला प्रसिद्ध राजा करिकाल हा होय. त्यानें श्रीलंकेवर स्वारी केली होती, व तेथून कावेरी नदीवर बांधल्या जाणाऱ्या प्रचंड

धरणासाठीं पुष्कळ मजूर आणिले होते. हा करिकाल राजा इ. स. च्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत होऊन गेला. त्यानंतर चेर राजे प्रबळ झाल्यामुळें चोलांची सत्ता कमी कमी होत गेली. चोलांचा कापडाचा व्यापार फार भरभराटींत असून त्यांचीं व्यापारी गलबतें पूर्वेस ब्रह्मदेश, मलाया वगैरे देशांपर्यंत जात होतीं. इ. स. च्या तिसऱ्या शतकांत पल्लव राजे राज्य करूं लागले. त्यांची राजधानी कांची होती. प्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग हा कांचीला गेला असतांना त्यानें चोलांसंबंधींची माहिती मिळवून लिहून ठेविली आहे. इ. स. च्या आठव्या शतकांत महाराष्ट्रांतील चालुक्य व कांचीचे पल्लव यांत मोठें युद्ध होऊन पल्लवांचा पराभव झाला. या संधीचा फायदा घेऊन चोल पुन्हां स्वतंत्र झाले.

यानंतरच्या प्रसिद्ध राजांपैकीं पहिला राजा विजयालय (८५०—८८०) यानें तंजावर जिंकून घेतलें. विजयालयाचा मुलगा आदित्य यानें पल्लवांची सत्ता झुगारून देऊन कांचीचा प्रदेश हस्तगत केला. त्याशिवाय त्यानें कोईमतूर व सालेम हे प्रांत पांड्यांकडून हस्तगत केले त्याचें व चेर राजा स्थानुरवि याचें मोठें सख्य होतें. आदित्य हा शिवाचा मोठा भक्त होता, व त्याच्या बापानें ज्याप्रमाणें तंजावरला दुर्गादेवीचें देऊळ बांधिलें, त्याप्रमाणें त्यानें शिवाचें देऊळ बांधिलें. त्याच्या नंतर त्याचा मुलगा परांतक यानें मदुरेवर हल्ला करून तें नगर हस्तगत केलें. इ. स. ९१५ मध्यें झालेल्या वेल्लूरच्या लढाईत त्यानें पांड्यांचा व सिंहलींचा पराभव केला. त्यानें श्रीलंका हस्तगत केली. पल्लवांच्या राज्यांत शिरून त्यानें वेलोरपर्यंतचा मुलूख आपल्या ताब्यांत आणिला. त्याच्या राजवटीच्या अखेरीस राष्ट्रकूटांचा राजा तिसरा कृष्ण यानें प्रत्यक्ष कांचीवर स्वारी केली. इ. स. ९४९ मध्यें तक्कोलमच्या लढाईत परांतकाचा मुलगा मारला जाऊन चोलांच्या सत्तेला उतरती कळा लागली.

यानंतरचा पुढील ४० वर्षांचा इतिहास फारसा उपलब्ध नाहीं. इ. स. ९८५ मध्यें आलेला राजराज हा नंतरचा प्रसिद्ध राजा होय. राजराजानें चेरांचें आरमार नष्ट करण्याचें पहिलें महत्त्वाचें काम केलें. त्यानें पांड्यांचा पराभव करून चोलांची सत्ता पुन्हां उत्तर श्रीलंकेपर्यंत वाढविली. म्हैसूरचा कांहीं भाग

त्यानें जिंकिला, त्यानें वेंगीच्या चालुक्यांच्या राज्यांत ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली. त्यांची आपापसांतील भांडणें बंद करून त्यानें त्यांच्याशीं नातें जोडिलें. त्यानें पूर्व समुद्रांत असलेलें मालदीव बेट हस्तगत केलें, यावरून त्याचें आरमार प्रबळ असलें पाहिजे हें सिद्ध होतें.

इ. स. १०१२ मध्यें राजेंद्र हा चोलांचा राजा झाला. त्यानें आपल्या बापाबरोबर अनेक स्वाऱ्यांत भाग घेतला होता. त्यानें पांड्य राजाचा मुकुट हस्तगत करून सिंहली लोकांचें राज्य आपल्या अंमलाखालीं आणिलें. चेर राजांचा पराभव करून त्यानें तें राज्य आपल्या ताब्यांत घेतलें. राजेंद्रानें उत्तरेंत स्वारी केली होती. त्याच्या फौजा गोदावरीपर्यंत जाऊन पोहोंचल्या होत्या, व त्याचा सेनापति ती नदी ओलांडून पलिकडेही गेला. ओरिसा प्रांत काबीज करून चोलांची सेना पश्चिम बंगालमध्यें घुसली. तेथील दोन राजांचा पराभव करून त्यांनीं गंगानदी ओलांडली. तेथील सत्ताधीशाचा पराभव करून ती सेना पुन्हां आपल्या प्रांतांत परत आली.

इ. स. १०२५ मध्यें राजेंद्रानें कद्राम व श्रीभोज या ठिकाणांवर आरमारी चढाई केली. हीं दोन्हीं ठिकाणें सुमात्रा बेटांत असावींत असा तर्क आहे. इ. स. १०२९ मध्यें श्रीलंकेनें चोलांची सत्ता झुगारून देण्याचा प्रयत्न चालविला. त्याचप्रमाणें पांड्यांच्या प्रदेशांत व केरळ प्रांतांत बंडें झालीं. राजेंद्रानें मोठ्या प्रयासानें तीं बंडें मोडलीं. राजेंद्राच्या राजवटीच्या अखेरीस सोमेश्वराच्या नेतृत्वाखालीं चालुक्यांच्या पश्चिमेकडील साम्राज्यावर स्वारी करण्यांत आली. राजेंद्राचा मुलगा राजाधिराज यानें कल्याणी शहर लुटून तेथील दरवाजावरील द्वारपालकांचे पुतळे आपल्या राजधानीस आणिले. राजेंद्राच्या मृत्युसमयीं चोलांचें साम्राज्य बलाढ्य असून त्यांचें आरमारही प्रबळ होतें.

राजाधिराजाच्या वेळीं श्रीलंकेनें पुन्हां स्वतंत्र होण्याचा प्रयत्न केला, पण क्रूर कृत्यें करून चोलांनीं त्यांचे प्रयत्न हाणून पाडले. चालुक्यांचा अनेक वेळां पराभव करूनही त्यांची सत्ता नष्ट करण्याचें चोलांना जमलें नाहीं. राजाधिराजानें अश्वमेध यज्ञ केला होता. त्याच्या पश्चात् दुसरा राजेंद्र गादीवर आला. त्यानें कोल्हापुरापर्यंत स्वारी करून तेथें एक विजय–स्तंभ उभारिला. त्यानंतरच्या वीर-

राजेंद्राच्या वेळीं चालुक्यांचा पुन्हां पराभव करण्यांत आला. वीरराजेंद्राचा मुलगा अधिराजेंद्र याच्या वेळीं चोलांच्या सत्तेला उतरती कळा लागली.

कुलोतुंग या चोलांच्या नातेवाइकानें चोलांचें राज्य बळकाविलें. त्याच्या वेळींही इ. स. १०७५ मध्यें श्रीलंका स्वतंत्र झाली. त्यानें पूर्वेकडील चालुक्यांची वेंगी ही राजधानी हस्तगत केली. पांड्यांचा व चेरांचा पुन्हां पराभव केला, आणि कलिंगावर स्वारी केली. कनोजच्या बनारसच्या राजांशीं त्याचे स्नेहाचे संबंध होते. पुढें गंगावदी व वेंगी त्याच्या ताब्यांतून गेल. त्याच्या राजवटींत कांची शहर भरभराटीस आलें. कुलोतुंगानें आपल्या राज्याची वसुलाच्या दृष्टीनें मोजणी केली होती.

तिसऱ्या कुलोतुंगानें पुष्कळ नवीन देवळें बांधिलीं. त्याच्या राजवटींत इ. स. १२०१ मध्यें दक्षिणेंत मोठा दुष्काळ पडला. पांड्यांच्या वाढत्या सत्तेपुढें चोलांची सत्ता इ. स. च्या १३ व्या शतकांत लोप पावली.

चोलांचें कार्य:— चोल राजांनीं राज्यव्यवस्थेसाठीं उत्तम माणसें नेमिलेलीं होतीं. ते राजाला वारंवार सल्ला देत, राजा स्वतः जाऊन राज्याची पाहाणी करीत असल्यामुळें प्रत्येकजण आपलें काम चोख बजावीत असे अधिकाऱ्यांना जमीन तोडून दिलेली असे. राज्याचें मुख्य उत्पन्न जमिनीवरील करापासूनच येत असे. हा कर धान्याच्या रूपानें वसूल केला जात असे. हें वसुलीचें काम खेड्यांतील पंचायत करीत असे. जमिनीची पाहाणी करून नंतरच कराचें प्रमाण ठरविण्यांत येत असे. जमिनीच्या कराशिवाय व्यापारीकर, जंगलें, मिठागरें यांपासूनही बरेंच उत्पन्न येई.

सैन्यांत हत्ती, घोडेस्वार व पायदळ असे विभाग असत. सैन्याच्या शिक्षणाकडे व शिस्तीकडे चांगलें लक्ष पुरविलें जाई. चोल राजे युद्धप्रसंगीं वाटेल त्या क्रूर उपायांचा अवलंब करीत असत. आरमाराच्या बाबतींत चोल राजांचें कार्य स्पृहणीय आहे. मलबार व कारोमांडेल किनाऱ्यावर तर त्यांची सत्ता होतीच, पण शिवाय बंगालच्या उपसागरांतही त्यांच्या आरमारी गलबतांचा स्वैरसंचार चालत असे.

खेड्यांची स्वायत्तता हें चोल राज्याचें वैशिष्ट्य होतें. राजराजाच्या वेळीं सर्व राज्याची ८ मंडलांत किंवा प्रांतांत विभागणी करण्यांत आली होती. प्रत्येक प्रांताची वलांदु व नदू यांमध्यें व प्रत्येक वलांदु व नदू यांची कोट्टम-मध्यें विभागणी करण्यांत आली होती. त्या कोट्टममध्यें अनेक स्वायत्त खेडीं असत. प्रत्येक खेड्याला अर व सभा अशा दोन समित्या असत. त्यांमध्यें गांवांतील प्रसिद्ध व अनुभवी लोक जमत. अरमध्यें सर्वसाधारण लोक येत, व सभेंत फक्त ब्राह्मणांना प्रवेश मिळे. प्रत्येक खेड्यांत निरनिराळ्या पेठा असत, व प्रत्येक पेठ आपल्या उमेद्‌वाराचें नांव सुचवीत असे. उमेद्‌वाराला कांहीं बंधनें होतीं. या समितीच्या पुढें अनेक पोटसमित्या करून त्या प्रत्येकीकडे खेड्याच्या व्यवस्थेचें एक एक खातें सोंपविण्यांत येत असे. समितीकडे न्याय-निवाडा, तसेंच सार्वजनिक इमारती, देवळें, जमिनी यांचें संरक्षण व व्यवस्था, करवसुली, जमिनीच्या मोजणींत सुधारणा करणें वगैरे कामें सोंपविलेलीं असत. सडका, तलाव, कालवे वगैरेंचा कारभार याच सभा पाहात.

## ७ चेर राजे

पश्चिमेस मलबार किनाऱ्यावर मंगरूळपासून दक्षिणेकडील प्रदेशास चेर म्हणतात. अशोकाच्या शासनपत्रांत या राज्याचा केरलपुत्र या नांवानें उल्लेख आढळतो. खिस्ती सनाच्या आरंभींच्या शतकांत या राज्याचा अरब-स्थानांतील बंदरांशीं मसाल्याच्या जिनसांचा व्यापार चालत होता. परंतु या चेर राज्याची प्राचीन माहिती उपलब्ध नाहीं.

इ. स. च्या दुसऱ्या व तिसऱ्या शतकांत करिकाल चोलाच्या मृत्यूनंतर चोलांच्या राज्यांत गोंधळ उत्पन्न झाला व तामीळ राज्याचें श्रेष्ठत्व सेनगुत्तवन चेर याच्याकडे गेलें. त्यानें उत्तरेवर स्वारी केली होती यांत कांहींच अर्थ नाहीं. परंतु दक्षिणेंतील इतर सत्ताधिकाऱ्यांवर त्यानें केलेल्या स्वाऱ्यांवरून तो उत्तम योद्धा होता यांत संशय नाहीं. त्याची आरमारी सत्ताही दृढ होती. त्यानें पन्नास वर्षें राज्य केलें. तो धर्माचा व विद्येचा मोठा भोक्ता होता. चेरांची राजधानी वंजी किंवा तिरुवंजीकालम् ही होती. चेरांचीं तीन घराणीं होतीं.

यानंतर चेरांची माहिती मिळत नाहीं. इ. स. च्या पहिल्या शतकांत प्रसिद्ध ख्रिस्ती मिशनरी सेंट थॉमस या भागांत आला होता व त्यानें सात ठिकाणीं चर्चेस् बांधल्याचा एक उल्लेख आहे. इ. स. च्या सहाव्या शतकांत या भागांत ख्रिस्ती धर्म नांदत होता. भास्कर रविवर्मन या चेर राजानें जोसेफ राबान या ज्यू इसमास आपल्या राज्यांत कांहीं जमिनी व सवलती दिल्या होत्या. ही गोष्ट इ. स. च्या आठव्या किंवा दहाव्या शतकांतील आहे. इ. स. च्या नवव्या शतकांत अरब लोक या भागांत येऊन राहिले व त्यांनी तेथील हिंदु स्त्रियांशीं विवाह केले. त्यांच्या संततीस मोपले म्हणतात.

वेल्लार नदीच्या दक्षिणेस पादुकोटापासून केपकामोरिन पर्यंतच्या प्रदेशास ‘ पांड्य ’ म्हणतात. पांड्य राजांची राजधानी मदुरा होती.

## ८ पांड्य राजे

इ. स. च्या सातव्या शतकांत पांड्यांचें राज्य पुन्हां वर आलें. सातव्या शतकांत कदुंगन व मारावरमन हे त्यांचे दोन प्रसिद्ध राजे होते. इ. स. ६४५ मध्यें सेंदन हा महत्त्वाचा राजा झाला. तो मोठा सेनापति व न्यायप्रिय होता. त्यानें चेरांचा पराभव केला असावा असें त्याच्या एका पदवीवरून दिसतें. यानंतरच्या अरिकेसरीच्या वेळीं ( इ. स. ६७०–७१० ) पांड्य राजे व पल्लव राजे यांच्यांत खटके उडूं लागले. नेलवेलीच्या लढाईंत त्यानें पल्लवांचा पराभव केला. चेरांचाही त्यानें खरपूस समाचार घेतला. तो मूळचा जैन धर्मीय होता परंतु पुढें त्यानें शैव पंथाचा स्वीकार केला. शैव पंथाचा स्वीकार केल्यानंतर त्यानें जैनांचा अतोनात छळ केल्याचा उल्लेख स्थानिक दंतकथेंत आढळतो. त्यानें चोल राजकन्येबरोबर विवाह केला होता. त्याच्यानंतर रणधीर हा राजा झाला. त्यानें मारुदूरच्या सत्ताधीशाचा पराभव करून मंगलोरला महारठ्यावर विजय मिळविला. इ. स. ७४० मध्यें राजसिंह हा पांड्यांचा राजा झाला. त्यानें कावेरी नदीजवळचा मुलुख हस्तगत करून पल्लवांचा बंदोबस्त केला होता. दुसरा कांतिवर्मन या चालुक्य राजाचाही त्यानें पराभव केला होता. त्यानंतर जतिला परांतक हा राजा झाला. त्यानें पल्लव व चेर राजांच्या हल्ल्यापासून आपल्या राज्याच उत्तम रक्षण करून शिवाय तंजावर, त्रिचनापल्ली, सालेम, कोईमतूर

वगैरे प्रांत आपल्या अंमलाखालीं आणिले. त्यानें अनेक ठिकाणीं शिवाची व विष्णूचीं देवळें बांधिलीं. इ. स. ८१५ मध्यें गादीवर आलेल्या श्रीवल्लभ या पांड्य राजान श्रीलंकेवर स्वारी केली होती. परंतु पल्लव राजाकडून त्याचा पराभव झाला. इ. स. ९२० च्या सुमारास परांतक चोल राजानें खुद्द मदुरेवर हल्ला करून पांड्यांचा अंमल उठविला.

## ९ पल्लव राजे

व्हिन्सेंन्ट स्मिथच्या मताप्रमाणें पल्लव ही हिंदुस्थानांतील मूळच्याच लोकांची जात असावी. चिं. वि. वैद्यांच्या मताप्रमाणें महाराष्ट्रांत वसाहत करणाऱ्या आर्यांपैकींच पल्लव हे होते. हे लोक शेकडों वर्षें महाराष्ट्री प्राकृत भाषा बोलत होते व कांचीस वसति केल्यानंतरही त्यांनीं आपली मूळ भाषा सोडिली नाहीं.

इ. स. १७८ मध्यें वीरकूर्च पल्लव यानें दक्षिणेंत मोठी मर्दुमकी गाजवून तेथील नागवंशी राजकन्येशीं त्यानें विवाह केला. वीरकूर्चाचा नातु कुमार विष्णू यानें इ. स. २०० च्या सुमारास कांची शहर हस्तगत करून तेथें त्यानें आपलें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. इ. स. ३३८ मध्यें गुप्त सम्राट् समुद्रगुप्त यानें हें राज्य जिंकिलें. इ. स. ५७५ च्या सुमारास सिंहविष्णु या पल्लव राजानें पुन्हां आपलें वैभव परत मिळवून पल्लवांची सत्ता चालू केली. पल्लव राजे हिंदु धर्माचे अभिमानी असून शव पंथाचे पुरस्कर्ते होते.

सिंहविष्णूनें पांड्य, चोल इ. राजांचा पराभव करून सिंहलद्वीपावर स्वारी करून तें जिंकलें. त्याचा मुलगा महेंद्रवर्मा याचा दुसऱ्या पुलकेशीननें पराभव केला. त्याच्या मागून नरसिंहवर्मानें पुलकेशिनचा इ. स. ६४२ मध्यें पराभव करून त्याचें मांडलिकत्व झुगारून दिलें. पुलकेशीनची राजधानी वातापी यावर हल्ला करून त्यानें तें शहर लुटलें. चालुक्य राजा विक्रमादित्य यानें सूड घेऊन पल्लवांची राजधानी कांची हस्तगत केली. याप्रमाणें पल्लव व चालुक्य यांचे झगडे आठव्या शतकापर्यंत चालले. इ. स. ७४० पासून पल्लवांच्या राज्याला उतरती कळा लागली. इ. स. ९०० मध्यें चोल राजा आदित्य यानें पल्लव घराण्याचा कायमचा नायनाट केला.

पल्लव राजे शिवोपासक असून त्यांनीं कांचीस शिवाचीं देवळें बांधिलीं. शैव पंथाचें मुख्य पीठ कांचीसच होतें. तेथें अनेक शैव साधु व कवी होऊन गेले.

## १० दक्षिणेंतील धार्मिक स्थिति

दक्षिणेंतील लोक धार्मिक बाबतींत बराच कालपर्यंत मागासलले होते. ते भूतखेतादि देवतांची पूजाअर्चा करीत व त्यांच्या शक्तविर विश्वास ठेवीत. पुढें आर्य दक्षिणेकडे येऊं लागल्यानंतर वैदिक धर्माच्या सहवासानें या रानटी लोकांत धार्मिक सुधारणा होऊं लागली. वैदिक धर्मापेक्षां जैन धर्माचा पगडा दक्षिणेंतील लोकांवर जास्त चांगला बसला. याचें कारण चंद्रगुप्त मौर्याच्या वेळीं इ. स. पू. ३०९ मध्यें दक्षिणेंत १२ वर्षांचा एक भयंकर दुष्काळ पडला. त्या प्रसंगीं आपद्ग्रस्त लोकांना मदत करण्यासाठीं सेवावृत्ति धारण केलेले जैन लोक दक्षिणेंत आले व त्यांनीं येथील लोकांना जैन धर्माची दीक्षा दिली. जैनानंतर सुमोरें सव्वाशें दीडशें वर्षांनीं बौद्ध लोक मतप्रचारासाठीं दक्षिणेंत आले. परंतु जैन धर्म म्हैसूरच्या दक्षिणेकडे इ. स. च्या सातव्या शतकापर्यंत जोर धरून राहिला. बौद्ध धर्माचा दक्षिणेंत प्रचार करण्याचें काम अशोकाचा मुलगा महेंद्र व अशोकानें पाठविलेल्या इतर प्रचारकांनीं केलें. इतकें करूनहि बौद्ध धर्माचें झाड दक्षिणेंत नीट मूळ धरूं शकलें नाहीं. इ. स. च्या सातव्या शतकांत जैन व हिंदु धर्माच्या जबरदस्त प्रसारामुळें बौद्धमत जवळ जवळ नष्ट झालें. जैन धर्माचा जोम विशेष असला तरी शंकराचार्यांच्या हिंदुधर्मप्रसारामुळें जैन धर्महि पुढें लुप्त होत गेला व हिंदु धर्माचें प्राबल्य दक्षिणेंत विशेष झालें.

**लिंगायत पंथः**—चालुक्यांची सत्ता समाप्त होण्याच्या सुमारास दक्षिणेंत कर्नाटकांत लिंगायत पंथाचा उदय झाला. बसव नांवाचा एक ब्राह्मण चालुक्य राजांच्या पदरीं प्रधान म्हणून होता. त्यानें इ. स. ११६० मध्यें या पंथाची स्थापना केली. जातिभेद मोडणें व वेदाचें प्राबल्य कमी करणें हे ह्या पंथाचे दोन मुख्य उद्देश होते. लिंगायत लोक शिव देवतेचे उपासक असून शिवलिंगाची पूजा करतात व त्याची चांदीची किंवा इतर धातूची प्रतिमा हिंदूंच्या

जानव्याप्रमाणें स्वतःच्या गळ्यांत सदैव अडकवितात. लिंगायतांचा वेदावर, पुनर्जन्मावर, जातिभेदावर मुळींच विश्वास नाहीं. विधवाविवाह त्यांस संमत आहे. लिंगायतांना वीरशैव असें दुसरेंहि नांव आहे. या पंथाच्या प्रसारामुळें कर्नाटकांतून जैन व वैदिक धर्मांचें उच्चाटन झालें. लिंगायत पंथाच्या वाङ्मयामुळें कानडी भाषेंत बरीच भर पडली आहे.

**भक्तिमार्गः**—कर्नाटकांत लिंगायत पंथाप्रमाणें महाराष्ट्रांत भक्तिमार्ग किंवा वारकरी पंथाचें महत्त्व विशेष आहे. या संप्रदायाचा प्रवर्तक ज्ञानेश्वर. तो पैठण जवळच्या आपेगांवच्या कुलकर्ण्याचा मुलगा. विठ्ठलपंत कुलकर्ण्यानें संन्यास घेतल्यानंतर पुन्हां गृहस्थाश्रमाचा स्वीकार केल्यामुळें त्याच्या मुलांना वाळींत टाकण्यांत आलें. परंतु ज्ञानेश्वरानें आपल्या अगाध बुद्धिमत्तेनें समाजाला आपल्या बाजूस वळवून घेतलें. ज्ञानेश्वरानें भगवद्गीतेवर टीका लिहिली, तीच प्रसिद्ध ज्ञानेश्वरी. बहुजनसमाजाला धर्माचा मार्ग समजावा म्हणून ज्ञानेश्वरानें हा ग्रंथ मराठींतच लिहिला व त्यांत परमेश्वरभक्तीचा साधा व सरळ मार्ग प्रतिपादन केला. इ. स. १२९० मध्यें हा ग्रंथ लिहून पुरा झाला. ज्ञानेश्वरानें प्रतिपादन केलेल्या भक्तिमार्गाचा पुढें अनेक साधुसंतांनीं पुरस्कार केल्यामुळें या पंथाला महाराष्ट्रांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. या पंथाचें दैवत पंढरीचा विठोबा हें होय.

**वैष्णव पंथः**—इ. स. च्या बाराव्या शतकांत होयसळांच्या राज्यांत रामानुज नांवाचा प्रसिद्ध पुरुष उदयास आला. त्यानें वैष्णव पंथाचा पुरस्कार केला. रामानुज हा श्रीरंगपूरमचा रहिवासी. त्यानें प्रथम अद्वैताचा अभ्यास केला पण पुढें त्याचा त्याग करून त्यानें वैष्णव गुरूचें शिष्यत्व पत्करिलें व त्याच्या पश्चात् तो वैष्णव पंथाचा प्रमुख बनला. श्रीभाष्य या ग्रंथांत ब्रह्मसूत्रावर व गीताभाष्य ग्रंथांत भगवद्गीतेवर त्यानें टीका केली. शंकराचार्यांनीं प्रतिपादन, केलेल्या 'जग ही माया आहे' या तत्त्वाला त्यानें विरोध केला. उपनिषद्, गीता, महाभारत व पुराणें यांतील तत्त्वांचा समन्वय घालणें हें त्याचें मुख्य ध्येय होतें. चोल राजांनीं त्याचा छळ केल्यामुळें तो म्हैसूर प्रांतांत गेला व तेथील होयसळ

राजांना त्यानें आपल्या पंथाची दीक्षा दिली. इ. स. च्या बाराव्या शतकाच्या मध्यांत तो श्रीरंगमला परत आला व तेथेंच मरण पावला.

## ११ दक्षिणेंतील सामाजिक स्थिति

दक्षिणेंतील कोणत्याही राज्यास उत्तरेंतील मगधाच्या राज्याप्रमाणें साम्राज्याचें स्वरूप प्राप्त होऊं शकलें नाहीं. दक्षिणेंतील सर्व राज्यें नष्ट करून सर्वत्र एकछत्री अंमल स्थापन करण्याचें कार्य कोणीही करूं शकला नाहीं. यामुळें एकमेकांच्या सरहद्दीजवळ प्रबळ व महत्त्वाकांक्षी सत्ता कायम राहिल्या व त्यामुळें या सत्ताधीशांत वारंवार भांडणें व युद्धें चालू राहिलीं. पण त्याचा परिणाम वाङ्मय, कला किंवा व्यापार यांवर फारसा झाल्याचें दिसत नाहीं. यासंबंधीं ह्युएन्त्संगनें लिहिलेलें वर्णन उद्‌बोधक आहे. तो म्हणतोः—

"येथें समाजांतील मोठा वर्ग शेतकऱ्यांचा असून तो अत्यंत शांतताप्रिय आहे. त्या वर्गाला लष्करी नोकरीची माफी आहे. त्यांच्या शेतीच्या धंद्याला लढाऊ लोकांकडून मुळींच उपद्रव होत नाहीं. एकीकडे लढाई चालू असली तरी दुसरीकडे शेतकरी आपलीं शेतीचीं कामें बिनधोकपणें पार पाडीत असे."

दक्षिणेकडील तामीळ देशांत मिरीं, वेलदोडे वगैरे पदार्थ व मोतीं, पाच यांसारखे मौल्यवान जिन्नस फार पैदा होत. मिऱ्यांचा व्यापार युरोपबरोबर चालत असून त्या पदार्थाला तिकडे चांगला भाव येई. पाच रत्न हें रोमन लोकांना फार आवडे व त्यासाठीं ते भारी किंमत देत. येथील मोतीं नेण्यासाठीं दूरदूरचे व्यापारी येत असत.

दक्षिणेकडील राजे स्वतः विद्वान् असून विद्येस त्यांचा मोठा पाठिंबा असे. या काळांत ज्ञानेश्वर, रामानुज, भास्कराचार्य यांसारखे विद्वान् लोक दक्षिणेंत होऊन गेले. ज्ञानेश्वरानें गीतेवरील टीका म्हणून ज्ञानेश्वरी हा मराठी ओंवीबद्ध ग्रंथ लिहिला. रामानुजानें श्रीभाष्य, गीताभाष्य हे ब्रह्मसूत्र व भगवद्‌गीतेवरील टीकाग्रंथ लिहिले. भास्कराचार्य हा प्रसिद्ध गणिती इ. स. ११५० च्या सुमारास होऊन गेला. त्यानें सिद्धांतशिरोमणी नांवाचा ज्योतिषशास्त्रावर ग्रंथ लिहिला. भास्कराचार्यांचा दुसरा ग्रंथ लीलावती त्यांत त्यानें बीजगणिताचें स्पष्टीकरण केलें आहे. यादव राजा सिंधण याच्यावेळीं शारंगधर यानें संगीतावर

संगीत–रत्नाकर नांवाचा ग्रंथ लिहिला. रामदेवराय यादवांचा मंत्री हेमाद्रि किंवा हेमाडपंत यानें चतुर्वर्ग चिंतामणि नांवाचा धर्मग्रंथ लिहिला. त्यांतील व्रतखंड फार प्रसिद्ध आहे. मोडी लिपी त्यानेंच शोधून काढली.

दक्षिणेंतील बहुतेक राज्यकर्ते हिंदुधर्माभिमानी असून शैव किंवा वैष्णव पंथाचे पुरस्कर्ते होते. त्यांनीं आपल्या देवतांचीं सुंदर व भव्य देवळें बांधिलीं. अशीं देवळें मदुरा, रामेश्वर, या भागांत अनेक आहेत. त्या देवळांची भव्यता प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय ध्यानांत येणार नाहीं. त्यांपैकीं एका देवळाचा प्रदक्षिणेचा मार्ग १ मैलाचा आहे यावरून देवळांची कांहींशीं कल्पना येईल. देवळाप्रमाणेंच धार्मिक कार्य करणारे मठही प्रसिद्ध आहेत.

शिक्षण देण्यासाठीं खेड्यांत पाठशाळा असत. परंतु पुराणें व महाकाव्यांची सर्व सामान्य लोकांना शिकवण देवळांत होणाऱ्या प्रवचनांत मिळत असे. उच्च दर्जाच्या शिक्षणासाठीं बरीच सोय केली होती. मीमांसा व व्याकरण यांशिवाय धर्माचें शिक्षण देणारीं विद्यापीठें असून त्यांत अनेक विषय शिकविले जात. अर्काट जिल्ह्यांत असें एक विद्यापीठ होतें. तेथें ३४० विद्यार्थी असून वेद, मीमांसा, वेदान्त हे विषय शिकविणारे १४ अध्यापक होते. विद्यार्थी व अध्यापक यांना रोज भात व दक्षिणा मिळे. विद्यापीठाचा खर्च चालण्यासाठीं कांहीं गांवांचें उत्पन्न तोडून दिलेलें असे. तिरुमुक्कुदल येथें असेंच एक विद्यापीठ असून त्यालाच जोडून एक वसतिगृह व दवाखाना होता.

# परिशिष्ट

## अखंड भारतच कां ?

भारतीय इतिहासाच्या प्रारंभापासून तों आजतागायत हा देश अखंड राहिला आहे. या देशावर मुसलमान राज्यकर्त्यांनीं सुमारें पांचशें वर्षें व इंग्रज राज्यकर्त्यांनीं सुमारें दीडशें वर्षें राज्य केलें. परकीय लोकांच्या अंमलाखालीं असूनसुद्धां या देशाचे तुकडे करण्याची कल्पना कोणास कधीं सुचली नाहीं. पण अलिकडच्या दहा वर्षांत मुस्लीम लीगनें या देशाचें विच्छेदन करून त्याचे हिंदु हिंदुस्थान व पाकिस्तान असे दोन भाग पाडण्याची जोराची मागणी चालविली आहे व ती साध्य करून घेण्यासाठीं प्रत्यक्ष रक्त सांडण्याची तयारीही तिच्या अनुयायांनीं दर्शविली आहे. अशा स्थितींत स्वतःला भारतीय म्हणवून घेणारा कोणीही मनुष्य आपल्या मातृभूमीचे तुकडे करण्यास संमति देणें शक्य नाहीं. हिंदुस्थानाचें अखंडत्व राखण्यासाठीं तो आपल्या रक्ताचा शेवटचा बिंदु शिल्लक असेपर्यंत धडपड करील. हिंदुस्थान अखंडच राहिला पाहिजे हा प्रत्येकाचा आग्रह कां ?

भारतवर्ष हें एक अखंड राष्ट्र आहे. नैसर्गिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्ट्या आपल्या राष्ट्राचें हें एकत्व सर्वांच्या मनावर पूर्णपणें ठसलेलें आहे. जगांतील फारच थोड्या देशांच्या वांट्याला आपल्या देशाइतक्या अनादि सृष्टिसिद्ध आणि स्वयंपूर्ण अशा निरंतर परिसीमा लाभल्या आहेत. उत्तरेस हिमालयाची अभेद्य तटबंदी व तिन्ही बाजूंनीं महासागराचा वेढा असण्यांत हा देश सलग एकच आहे ही गोष्ट स्पष्ट ध्यानांत येते. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें तर भारत किंवा हिंदुस्थान हींच या देशाचीं नांवें म्हणून अखंड परंपरेनें चालू आहेत. इंग्रजांचें राज्य सर्व देशावर चालू झालें म्हणून आम्हीं सर्व एक झालों असें म्हणणें चुकीचें आहे. त्याच्याही पूर्वीपासून दूरदूर राहाणारे लोक आपण भारतीय आहोंत ही गोष्ट स्मरून व्यवहार करीत होते.

राज्य व साम्राज्य या कल्पना प्रत्यक्ष वेदांतच आहेत. राजसूय व अश्वमेध यज्ञ हे एकाच राजाचें सार्वभौमत्व सूचित करितात. देशांत अनेक राजे असले तरी 'सम्राट्' ही पदवी फक्त एकाद्यालाच मिळत असे व इतर राजे त्याचे मांडलिक म्हणून राहात. राज्य जिंकल्यावर तें खालसा करून आपल्या राज्यास जोडण्याची कल्पना या देशांत फारशी रुजली नव्हती. एकाद्या राजानें आपलें सार्वभौमत्व मान्य केलें एवढ्यावर समाधान मानून सम्राट् त्याला त्याचें राज्य परत देत असे. शिकंदर, फाहेन, ह्यूएन्त्संग इत्यादि परकीय लोकांनींही हा देश एकच व अखंड आहे याची ग्वाही दिलेली आहे. रामचंद्र, युधिष्ठिर, चंद्रगुप्त, अशोक, हर्ष, अकबर, औरंगजेब, शिवाजी, बाजीराव या सर्वांच्या डोक्यांत हिंदुस्थान एकच आहे ही कल्पना दृढ होती व त्या अखंड देशावर आपलें राज्य असावें याविषयीं त्यांची आपापल्यापरी खटपट चालू होती. एकराष्ट्रीयत्वाची कल्पनाही फार प्राचीन कालापासून येथील लोकांच्या मनांत रुजली आहे. सर्व देशभर विखुरलेलीं पवित्र देवस्थानें, गंगा, सिंधु, कृष्णा, गोदावरी, कावेरी या नद्यांचें पुण्यशीलजल, राम, कृष्ण, विष्णु, महादेव इत्यादि देवतांविषयींची सार्वप्रिय लोकप्रियता; गाय, तुळस, साधुपुरुष यांबद्दलचा आदर या सर्व गोष्टी आपण सर्वजण एकच आहोत या गोष्टीची सदैव जाणीव करून देतात. परकीय लोक येण्यापूर्वींच ही स्थिति होती असें नव्हे तर परकीय लोक आल्यानंतरही ही स्थिति टिकून राहिली. शक, हूण, कुशान या परकीय टोळ्या भारतीय संस्कृतींत विलीन झाल्या. मुसलमान इतके कडवे खरे पण त्यांना देखील भारतीय संस्कृतीशीं एकरूप व्हावें लागलें. हुमायून, अकबर, दारा या मुसलमान राज्यकर्त्यांनीं भारतीय तत्त्वज्ञान आत्मसात् केलें होतें. मुसलमानी शिल्पकला भारतीय शिल्पकलेंत समाविष्ट होऊन गेली. धर्मानें मुसलमान खरे पण मुसलमान लोकही होळी, दीपावली, पाडवा यासारख्या राष्ट्रीय उत्सवांत भाग घेतांना आजही आढळून येतात. खेड्यांत गेलों तर मुसलमानांच्या घरांत हिंदूंचे देव, नवरात्र, खंडोबाची पूजा हे प्रकार पाहावयास सांपडतात. मुसलमानाप्रमाणेंच पारशी, ख्रिश्चन लोकही धर्मानें निराळे असले तरी संस्कृतीनें भारताशीं समरूप झालेले आढळतात.

असें असतांना मुसलमानांनीं ' आम्ही भारतीयच नाहीं ' असें म्हणणें कितपत युक्त आहे ? मुसलमानांची पाकिस्तानाची मागणी ही इतिहासाच्या अभ्यासकाला कधींही न्याय्य वाटणार नाहीं. हिंदूंचें कायम वर्चस्व आपल्यावर बसणार या भीतींतून पाकिस्तानच्या मागणीचा जन्म झाला असें समजलें तरी आज साऱ्या हिंदुस्थानावर इस्लामाचें वर्चस्व स्थापिण्याचीं भाषणें बोलत आहेत. तथापि मुसलमानांची ही भीति किती निराधार आहे हें ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध करून देतां येईल. आपल्या हातीं सत्ता असतांना देखील हिंदु राजांनीं मशिदी पाडल्या नाहींत, कुराणें जाळलीं नाहींत, परधर्मीय लोक बाटविले नाहींत, इतकेंच काय पण ज्याला जुलुम म्हणतां येईल अशी एकही गोष्ट त्यांनीं केली नाहीं. आजही मुसलमानांना जेवढें म्हणून संरक्षण पाहिजे तेवढें देण्यास हिंदु तयार आहेत. मग असें असतांनाही मुसलमानांनीं पाकिस्थानासाठीं हट्ट धरावा याचा अर्थ कोणाच्याही सहज ध्यानांत येण्यासारखा आहे.

मुसलमानांना पाकिस्तान दिलें तरी देखील तें आर्थिकदृष्ट्या, संरक्षणाच्या दृष्टीनें, सरहद्दीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनें स्वयंपूर्ण होणार नाहीं. उलट त्यामुळें हिंदुस्थान कायमचा दुबळा व निःसत्त्व होऊन बसेल. अशा परिस्थितींत मुसलमानांची मागणी मान्य न करितां भारताचें अखंडत्व कायम राखण्यासाठीं जिवापाड परिश्रम करणें हे प्रत्येक भारतीयाचें परम कर्तव्य आहे.

## आधुनिक ऋषिवर्य

**स्वामी दयानंद सरस्वतीः**–यांचा जन्म काठेवाडांतील एका खेड्यांत इ. स. १८२४ मध्यें झाला. त्यांचें मूळ नांव मूळशंकर. त्यांचे वडील अंबाशंकर हे त्या संस्थानांत मोठे हुद्देदार असले तरी अतिशय कर्मठ शिवभक्त होते. एका शिवरात्रीच्या प्रसंगीं देवळांत शिवलिंगावर उंदिर उड्या मारतांना पाहून मूळशंकराच्या मनांत मूर्तीविषयीं अनेक शंका निर्माण झाल्या. व त्यांचें निरसन करण्यासाठीं त्यानें धर्मशास्त्राचा अभ्यास सुरू केला. मूळशंकर वैराग्य पत्करणार अशी शंका येतांच त्याच्या आईबापांनीं त्याचें लग्न करण्याचा घाट घातला. परंतु त्याची कुणकुण लागतांच मूळशंकर घरांतून पळून गेले. यानंतरचा

बराच काळ त्यांनीं निरनिराळ्या साधु पुरुषांजवळ धर्मशास्त्राचा अभ्यास करण्यांत घालविला व तो पुरा झाल्यानंतर संन्यास घेऊन त्यांनीं स्वतःला दयानंद सरस्वती हें नांव घेतलें. पंधरा वर्षें साऱ्या हिंदुस्थानभर त्यांनीं प्रवास करून, साधुजनांजवळ चर्चा करून व विद्याभ्यास करून आपल्या ज्ञानांत भर टाकिली. दयानंदांच्या अनेक गुरूंपैकीं विरजानंद हे त्यांचे प्रमुख गुरु होते त्यांनीं दयानंदांच्याजवळ 'तूं आपलें ज्ञान देशबांधवांच्या सेवेंत खर्च कर' अशी गुरुदक्षिणा मागितली होती व त्याप्रमाणें दयानंदांनीं आपलें आयुष्य देशसेवेंत घालविलें. इ. स. १८७५ मध्यें त्यांनीं 'आर्य समाजा'ची स्थापना केली. पंजाबांत व इतरत्र या समाजानें अनेक शाळा व अनाथालयें उघडलीं; जे लोक हिंदु धर्म सोडावयास तयार झाले होते, त्यांना त्या गोष्टीपासून परावृत्त करून हिंदु धर्माचे अभिमानी बनविलें व बाटलेल्यांची शुद्धि करून हिंदु धर्मांत नवचैतन्य निर्माण केलें. इ. स. १८८३ मध्यें हा थोर पंथप्रवर्तक मरण पावला.

**श्रीरामकृष्ण परमहंसः**—स्वामी विवेकानंदांचे हे गुरु. यांचा जन्म बंगाल्यांतील एका खेड्यांत इ. स. १८३६ सालीं झाला. लहानपणापासूनच रामकृष्णांना ईश्वरभक्तीचें अतोनात वेड जडलें. त्यापायीं त्यांना भूक-तहान इत्यादि गोष्टींचीहि शुद्ध नसे. ईश्वरानें आपणांस भेट द्यावी म्हणून ते तळमळून ढसढसां रडत. त्यांच्या या वेडाची माहिती एका साधूस लागल्यानंतर त्यानें रामकृष्णांना शास्त्रग्रंथांची माहिती करून दिली. रामकृष्णांचे हें ईश्वरभक्तीचें वेड जाण्यासाठीं त्यांचा विवाह करून देण्यांत आला, पण त्यांना लाभलेली पत्नी एक साध्वी स्त्री असल्यामुळें ती रामकृष्णांच्या मार्गाआड कधींच आली नाहीं. इतर शिष्यांप्रमाणें ती त्यांची सेवा करीत आजन्म त्यांच्याजवळच राहिली. सतत परमार्थचिंतनामुळें रामकृष्ण मोठे ज्ञानी झाले व त्यांचा उपदेश ऐकण्यासाठीं मोठमोठे विद्वान् लोक त्यांच्याभोंवतीं जमा होऊं लागले. त्यांच्या दिव्य उपदेशामुळें पुष्कळ नास्तिक लोक ईश्वरभक्तीकडे वळले. त्यांना द्रव्याचा लोभ अजिबात नव्हता. भंगी, महार, यांसारख्यांचीं लहान व घाणेरडीं कामें करून त्यांनीं आपला अहंकार नष्ट केला. या प्रयत्नामुळें त्यांचें मन निष्पाप

झालें. स्वतःला पडणाऱ्या श्रमांची यत्किंचितही पर्वा न करितां अनेक लोकांना परमार्थमार्गाला लावण्याचें कार्य रामकृष्णांनीं अखंड चालू ठेविलें होतें. स्वामी विवेकानंद हे त्यांचे पट्टशिष्य होत. इ. स. १८८६ मध्यें रामकृष्ण समाधिस्थ झाले.

**स्वामी श्रद्धानंद**— पंजाबांत जालंदर शहरांत इ. स. १८५४ मध्यें यांचा जन्म झाला. त्यांचें मूळ नांव लाला मुनशीराम. बालपणांत त्यांनीं खूप हूडपणा केला व तरुणपणचे दिवसही मोठ्या चैनींत घालविले. हिंदुधर्म सोडून ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा विचारही त्यांनीं केला होता. पण पुढें त्यांना उपरति होऊन त्यांनीं आर्यसमाजाचें अनुयायित्व पत्करून ते हिंदुधर्माचे कट्टे अभिमानी बनले. जालंदरला वकिलींत त्यांना खूप पैसा मिळाला पण त्यापैकीं बराच भाग त्यांनीं स्त्रीशिक्षण, राष्ट्रीय शिक्षण अशा कामीं खर्च केला. गंगेच्या पवित्र तीरावर हरिद्वार येथें राष्ट्रीय शिक्षण देणारी गुरुकुल नांवाची संस्था स्थापन केली व तिच्यासाठीं आपली सर्व रक्कम देऊन टाकिली. या त्यांच्या सेवेमुळें लोक त्यांना महात्मा मुनशीराम म्हणूं लागले. इ. स १९१७ मध्यें त्यांनीं संन्यास दीक्षा घेतली. आतां लोक त्यांना स्वामी श्रद्धानंद म्हणून ओळखूं लागले. यानंतर त्यांनीं राजकारणांत भाग घेतला. १९१९ मध्यें दिल्लींतील एका मिरवणूक-प्रसंगीं सैनिकांनीं त्यांच्या छातीवर बंदुका रोखल्या असतांही ते जागचे ढळले नाहींत. उलट ' मैं खडा हूं, चलाव तेरी गोली. म्हणून त्यांनीं गुरख्यांना आव्हान दिलें. या धैर्यामुळें त्यांची कीर्ति चोहोंकडे पसरली. कांहीं मुसलमान लोकांनीं त्यांना आपल्या मशिदींत बोलावून त्यांचा सन्मान केला. हिंदु धर्मांतील दुर्बलता नष्ट करण्यासाठीं त्यांनीं अस्पृश्यता निवारण व शुद्धि हीं दोन कार्यें अंगावर घेतलीं. त्यांच्या शुद्धिकार्यामुळें मुसलमान बिथरले. एकदां ते आजारी पडून अंथरुणावर खिळले असतांना एका भ्याड मुसलमानानें कपटानें त्यांच्यावर पिस्तूल झाडून त्यांचा खून केला. (इ. स. १९२६)

**स्वामी विवेकानंद**—यांचें मूळ नांव नरेंद्र दत्त. यांचा जन्म इ. स. १८६३ मध्यें कलकत्याजवळ झाला. त्यांची आई फार भाविक होती. तिच्या

तोंडून ऐकलेल्या पुराणांतील गोष्टी त्यांना फार आवडत. खेळण्यांत पटाईत व अभ्यासांत हुषार यामुळें लहानपणापासूनच ते आपल्या सोबत्यांत फार प्रिय होते. महाविद्यालयामध्यें त्यांनीं तत्त्वज्ञान व धर्म या विषयांचा चांगला अभ्यास केला. हर्बर्ट स्पेन्सरच्या पुस्तकांवर टीकात्मक निबंध लिहून त्यांनीं स्वतः त्या लेखकाकडून शाबासकी मिळविली. रामकृष्ण परमहंसांच्या उपदेशामुळें त्यांनीं विवाह न करितां संन्यास घेतला व धर्मोपदेशकाचें काम सुरू केलें. त्यांची भाषा गोड, वागणूक पवित्र, वक्तृत्व अमोघ व विद्वता गाढ यामुळें त्यांचा उपदेश लोकांना तात्काळ पटे. १८९३ मध्यें शिकागोला भरलेल्या जागतिक धर्मपरिषदेंत त्यांनीं आपल्या अमोघ वक्तृत्वानें व बुद्धिमत्तेनें श्रोत्यांचीं मनें भारून टाकिलीं. हजारों लोक त्यांचा उपदेश ऐकण्यासाठीं जमा होऊं लागले. वेदान्त धर्माचा प्रसार करण्यासाठीं त्यांनीं अमेरिकेंत संस्था स्थापन केल्या. इ. स. १८९७ मध्यें हिंदुस्थानांत परत आल्यावर दुष्काळाच्या तडाख्यांत सांपडलेल्या असंख्य लोकांना सर्वतोपरी मदत करण्याचें कार्य त्यांनीं उत्तम प्रकारें पार पाडलें. इ. स १९०० मध्यें पॅरिसच्या सर्वधर्मपरिषदेंत त्यांनीं भाग घेतला व स्वतः फ्रेंच भाषा शिकून त्या भाषेंत त्यांनीं जमलेल्या लोकांना हिंदु धर्माची थोरवी पटवून दिली कामाच्या प्रचंड ओझ्याखालीं त्यांची प्रकृति खालावली व वयाला चाळीस वर्षें पुरी होण्याच्या आंतच त्यांनीं देह ठेविला.

**बाबू अरविंद घोषः**—इ. स. १८७२ मध्यें कलकत्त्यांत यांचा जन्म झाला. त्यांचे वडील प्रसिद्ध डॉक्टर होते व त्यांच्याबरोबर लहानपणींच अरविंदबाबू इंग्लंडमध्यें गेले. आय्. सी. एस्. च्या परीक्षेंत घोड्यावर बसण्यांत अपयश आल्यामुळें त्यांना फक्त बी. ए. ची पदवी घेऊन परत यावें लागलें. इंग्लडांत असतांनाच सयाजीराव महाराजांना त्यांच्या हुषारीची ओळख पटली होती व त्यामुळें त्यांनीं अरविंदांना आपल्या संस्थानच्या कॉलेजांत नोकरी दिली. तेथें ते प्रिन्सिपॉल झाले. पण ती नोकरी सोडून राष्ट्रकार्यासाठीं ते कलकत्त्याला गेले व तेथल्या राष्ट्रीय विद्यालयाचे प्राचार्य बनले. नंतर त्यांनीं 'वंदे मातरम्' या पत्राचें संपादकत्व स्वीकारिलें. त्यांतील जहाल लेखांमुळें सरकारची त्यांच्यावर गैरमर्जी होऊन त्यांना इ. स. १९०८ मध्यें अटक

झाली, पण ते लगेच सुटले. कारागृहांतील हा एक वर्षाचा काल त्यांनीं परमार्थचिंतनांत, योगाभ्यासांत घालविला. १९१० मध्यें त्यांना पुन्हां पकडण्याचे सरकारी प्रयत्न सुरू होतांच ते फ्रेंच हद्दींत पॅांडिचरीला पळून गेले. सध्यां ते तेथेंच योगाभ्यास करीत आहेत. त्याचे शिष्य अनेक असून त्यांत मुसलमान देखील आहेत. वर्षांतून एकच वेळ ते आपल्या शिष्यांना दर्शन देतात. भारतीय तत्त्वज्ञानच जगाचा उद्धार करील अशी त्यांची खात्री आहे.

**स्वामी रामतीर्थः**—यांचें मूळ नांव तीर्थराम. त्यांचा जन्म पंजाबांत झाला. एम. ए. उत्तीण होतांच ते प्राध्यापक झाले. लहानपणापासून परमार्थाकडे ओढा असल्यामुळें तरुण वयांतच त्यांनीं संन्यासदीक्षा घेतली. मुलांचा, कुटुंबाचा व पैशाचा मोह सोडून ते हिमालयांत गेले. तेथें एक वर्ष परमार्थचिंतनांत घालविल्यावर त्यांना दिव्य ज्ञान प्राप्त झालें. त्यानंतर ते स्वामी रामतीर्थ म्हणून ओळखिले जाऊं लागले. इ. स. १९०२ मध्यें ते अमेरिका, जपान वगैरे देशांत गेले व तेथें त्यांनीं वेदान्तावर अनेक व्याख्यानें दिलीं. त्यांच्या उपदेशामुळें या दूरच्या देशांत हिंदुधर्माचें नांव उज्ज्वल झालें. १९०६ मध्यें हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यांनीं जलसमाधि घेतली.

## प्राचीनकाळची आठवण देणाऱ्या आधुनिक संस्था

**शांतिनिकेतनः**—रवींद्रनाथांच्या 'शांतिनिकेतना'ची कीर्ति आज फक्त हिंदुस्थानांतच आहे असें नाहीं तर इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, जपान, इत्यादि दूरच्या देशांतहि या संस्थेविषयीं फार आदर असून ती पाहण्यासाठीं असंख्य लोक दरवर्षीं हिंदुस्थानांत येतात. सध्यांच्या शिक्षणपद्धतींतील दोष, पाश्चात्यांचें अंधानुकरण करण्याची प्रवृत्ति, धार्मिक वृत्तीचा लोप, राष्ट्रीय शिक्षणाविषयींची तळमळ, यांमधूनच इ. स. १९०१ मध्यें शांतिनिकेतनाचा जन्म झाला. कलकत्त्यापासून सुमारें शंभर मैलांवर बोलपूरजवळ हा आश्रम आहे. इ. स. १९१० पर्यंत ही संस्था बुडित खर्चांत चालली होती. पण रवींद्रनाथांनीं अलोट स्वार्थत्याग करून ही संस्था आज नांवारूपास आणिली आहे. 'गीतांजली'बद्दल मिळालेल्या नोबेल पारितोषकाची सव्वा लाखाची रक्कम त्यांनीं आपल्या या आवडत्या संस्थेस देणगी म्हणून दिली. आश्रमाची जागा फार

रमणीय असून सहज पहाणाराच्या मनांतही या ऋषिनिवासतुल्य स्थानाविषयीं फार आदर व प्रेम वाटतें. आर्यावर्तांतील प्राचीन ऋषी ज्याप्रमाणें एकांतस्थळीं वास करून आपल्या शिष्यांना शिकवीत त्याप्रमाणें या शांत जागीं रवींद्रनाथ इतर अध्यापकांच्या मदतीनें विद्यार्थ्यांना विद्या, शील, भारतीय संस्कृतीचा अभिमान, पौर्वात्य व पाश्चात्य संस्कृतींची ओळख, कला, शास्त्र इत्यादि विविध विषय शिकवीत. प्रार्थनामंदिराच्या एका बाजूस एक प्रचंड वटवृक्ष आहे. त्याच्या गर्द व शीतल छायेंत ज्ञानदानाचें हें पवित्र कार्य चालतें. रवींद्रनाथांच्या या कार्यांत त्यांना ब्रह्मबांधव उपाध्याय व रेवाचंद या दोन सहकाऱ्यांची फार मदत झाली. येथील विद्यार्थ्यांना पहाटे लवकर उठावें लागतें, नंतर प्रातःस्मरण, व्यायाम, शीत स्नान, संध्या, अभ्यास, वाचन, उपदेश इत्यादि कामें व्यवस्थित व वेळच्या वेळीं पार पाडावीं लागतात. दर गुरुवारीं प्रार्थनामंदिरांत विद्वान् लोकांचीं प्रवचनें होतात. सुट्टीच्या दिवशीं विद्यार्थी रवींद्रनाथांचीं सुंदर नाटकें करून दाखवितात. या आश्रमांत रवींद्रनाथांना गुरुदेव म्हणून संबोधीत. येथें मातृभाषेच्या शिक्षणावर विशेष जोर देऊन सर्व शिक्षण त्याच भाषेंतून दिलें जातें. शिवाय संस्कृत, प्राकृत, पाली वगैरे प्राचीन भाषाही शिकविल्या जातात. कलाभुवनमध्यें भारतीय चित्रकलेस प्राधान्य देऊन युरोपियन चित्रकलेचाही अभ्यास केला जातो. सर्व विद्यार्थ्यांना भारतीय संगीत व नृत्य शिकविलें जातें. याशिवाय जवळच्या खेड्यांत जाऊन आपल्या बांधवांची सेवा करण्याचे प्रत्यक्ष धडेही येथें दिले जातात. शेतीच्या शिक्षणासाठीं जवळच सुरुल येथें शेतकींची प्रयोगशाळा, गोशाळा, वगैरे आहेत. संस्थेंत परीक्षा नाहींत; फक्त वार्षिक चांचणी असते व कच्च्या विषयासाठीं स्वतंत्र अभ्यासाची सोय केलेली असते. या संस्थेबद्दल प्रत्यक्ष रवींद्रनाथांना किती आपुलकी वाटत असे हें त्यांच्याच शब्दांत दिसून येईल. "माझ्या शांतिनिकेतनसाठीं मी आपल्या प्रिय काव्यप्रतिभेसही दूर लोटलें आहे" असें ते म्हणत. प्रसिद्ध फ्रेंच लेखक रोमाँ रोलाँ एकदां म्हणाले, "ज्या दिवशीं मला शांतिनिकेतनच्या वटवृक्षाच्या छायेंत उभें राहावयास मिळेल त्या दिवशीं मी धन्य होईन!"

**गुरुकुलः**—या संस्थेच्या नांवावरूनच त्या संस्थेचा उद्देश ध्यानांत

येईल. प्राचीन कालीं ज्याप्रमाणें एका गुरूच्या घरीं विद्यार्थी अध्ययनासाठीं म्हणून जमत व १२ वर्षें एकाच कुटुंबांतील घटक म्हणून राहात त्याप्रमाणें याही कालीं विद्यार्थ्यांनीं गुरूच्याजवळ राहून अध्ययन करावें असा या संस्थेचा उद्देश आहे. अशा प्रकारची कल्पना प्रथम स्वामी श्रद्धानंदांना सुचली व त्यांनीं आपलें पहिलें गुरुकुल गंगेच्या पवित्र तीरावर हरिद्वार येथें स्थापन केलें. या गुरुकुलांत विद्यार्थ्यांना सर्व विद्या शिकविल्या जातात. त्यांपैकीं धर्म, संस्कृति व तत्त्वज्ञान या विषयांना प्राधान्य दिलेलें असतें. विद्यार्थी व गुरु एके ठिकाणींच राहातात. सबंध दिवसाचा कार्यक्रम पूर्वींच्या काळच्या आश्रमांतील दिनचर्येप्रमाणें आंखलेला असतो. विद्यार्थ्यांना गुरूजवळ राहून, पडतील तीं कामें करून व ब्रह्मचर्य पाळून विद्याध्यायन करावें लागतें. येथून बाहेर पडणारे विद्यार्थी आर्य संस्कृतीचे अभिमानी, तेजस्वी व आपल्या कार्याला सदैव वाहून घेतलेले असे असतात व त्यांच्या मार्फत भारतीय संस्कृतीचा कीर्तिध्वज अखंड फडकत ठेवण्याच्या कार्यास मोठें साहाय्य होतें.

**आश्रमः**——भारतीय संस्कृतीबद्दल पाश्चात्यांना फार पूर्वीपासून एक प्रकारचा आदर वाटत आहे. ज्या वेळीं शिकंदर बादशहा हिंदुस्थानांत आला होता त्या वेळीं त्याला तक्षशीलेच्या वनांत तपश्चर्या करीत बसलेले अनेक साधू दिसले. त्यांना त्यानें आपल्या आश्रयास येऊन राहण्यास सुचविलें पण त्यांनीं शिकंदराच्या विनंतीस नकार दिला. शिकंदराच्या वेळीं उत्पन्न झालेली ही आस्था भावी काळांत कमी न होतां उलट वाढतच गेली व अरब, इंग्रज, चिनी, जपानी लोक भारतीय संस्कृतीचा परिचय करून घेऊं लागले. भारतीय संस्कृतीची थोरवी पुन्हां एकदां विवेकानंदांच्या तोंडून पाश्चात्यांना ऐकावयास मिळाली व तिकडील अनेक लोक भारतीय विज्ञानाचा अभ्यास करूं लागले. त्यांची इच्छा पुरी करण्यासाठीं कायम स्वरूपाची कांहीं तरी सोय करणें आवश्यक झालें तेव्हां ही आश्रमाची किंवा मठांची कल्पना पुढें आली. अशा तऱ्हेचे मठ अमेरिकेंत बरेच आहेत व त्यांच्या मार्फत भारतीय संस्कृतीचा परिचय पाश्चात्यांना करून देण्याचें कार्य अखंड चालू आहे. हिंदुस्थानांत विशेषतः बंगाल्यांत अशा आश्रमांची संख्या बरीच मोठी आहे. भारतीय

संस्कृतीच्या अभ्यासाबरोबरच आपद्‌ग्रस्तांना मदत, अनाथ बायका-मुलांना आश्रय, संकटप्रसंगीं लोकांना आधार व आश्रमाच्या हेतूचा प्रसार हीं कामेंही केलीं जातात. हे सर्व आश्रम एका मध्यवर्ती संस्थेच्या अधिकारक्षेत्राखालीं असून आश्रमाचा मुख्य म्हणून एकाद्या श्रेष्ठ व विद्वान् माणसाची निवड केली जाते.

## भारतीयांचा अतिभारतीय विकास

**भारतीय संस्कृतीचे परदेशीं ठसे:**— कोणत्याहि देशाचा इतिहास हा त्याच्या भूरचनेशीं संलग्न असतो. इंग्रज लोक दर्यावर्दी कां आणि स्विस लोक नौकानयनापासून अलिप्त कां, या प्रश्नांचीं उत्तरें इंग्लंड आणि स्वित्झर्लंड या देशांच्या भूरचनेंतून शोधलीं म्हणजे सहज कळूं शकतात. भारतवर्षाच्या भूगोलाकडे पाहिलें तर असें आढळून येईल कीं, वायव्येकडील प्रदेश वगळला असतां त्याच्या इतर सीमांना दुर्लंघ्य पर्वत आणि दुस्तर सागर हातपाय पसरून पडले आहेत. तथापि हीं पर्वतप्राय आणि सागरप्राय विघ्नें दूर सारून प्राचीन भारतीय त्यांपलीकडील देशांमध्यें व द्वीप-द्वीपकल्पांमध्यें यथेच्छ विहार करीत असत, हें सिद्ध करण्याला वाटेल तेवढा भरभक्कम पुरावा आजमितीला उपलब्ध झाला आहे. फ्रेंच इंडोचायना, जावा ( म्हणजेच प्राचीन यवद्वीप ) इत्यादि देशांमध्यें जें उत्खनन आणि संशोधन फ्रेंच आणि डच पंडितांनीं केलें त्यांत त्या त्या देशांवर भारतीयांच्या संस्कृतीचे खोल ठसे निर्विवादपणें दाखविणारे किती तरी शिलालेख व अन्य पुरावे मिळाले आहेत. कांबोडियाचें प्राचीन नांव ‘ कंबुज ’ देश असें होतें. किंबहुना, ‘ कांबोडिया ’ हा ‘ कंबुज ’ याच शब्दाचा अपभ्रंश आहे. सध्यांच्या ‘ अनाम ’ प्रांताच्या आसपासच्या भागाला पूर्वीं ‘ चंपा ’ हें नांव होतें. या देशांत जे शेंकडों शिलालेख सांपडले आहेत त्यांतले दोन तृतीयांशाहून अधिक संस्कृत भाषेंत आहेत; त्यांत शालि-वाहन शक या कालगणनेचा प्रचार आहे; कांहीं शिलालेख तामिळ भाषेंत आहेत; कांबोडियामध्यें ‘ अंकोर वाट ’ आणि ‘ बेयन ’ या नांवांचीं जीं दोन अतिभव्य देवालयें आहेत त्यांची स्थापत्यशास्त्रदृष्ट्या रचाई दक्षिण हिंदु-स्थानांतल्या प्रचंड गोपुरांशीं फारच सदृश आहे; प्रस्तुत देशांत सांपडलेल्या

शिवविष्णूंच्या मूर्तीची वेषभूषा द्राविडी पद्धतीची आहे; शैव–वैष्णव पंथांच्या प्राबल्याचे तर जागोजाग विपुल उल्लेख आहेत; आणि विशेष गोष्ट ही कीं, हिंदु देवदेवतांच्या पीठिका आणि हिंदूंची समाजरचना यांचाही तेथें फार मोठ्या प्रमाणानें बस बसला होता. एवढेंच नव्हे, तर कांबोडियन लोक भारतवर्षाला आपली पुण्यभूमि समजत असून या पुण्यभूमीचा उल्लेख ते '**आर्यदेश**' अशा नांवानें करीत असत. उदाहरणार्थ, ख्रिस्तोत्तर ४१३ मध्यें चम्पा देशाच्या हिंदु वसाहतीचा राजा भद्रवर्मा याचा मुलगा गंगाराज यानें गंगेच्या पवित्र तीरावर उर्वरित आयुष्य घालवावें, म्हणून राज्यत्याग केला व तो हिंदुस्थानांत आला, असा एक उल्लेख आहे.

वर दिलेल्या माहितीवरून हें सहज लक्ष्यांत येण्यासारखें आहे कीं, हिंदुस्थानामधून हे धाडसी निर्गमन करणारे व परदेशीं वसाहती स्थापणारे लोक प्राधान्यानें दक्षिण–भारतीय होते. प्रा. जादुनाथ सरकार यांचें मत असें आहे कीं, हे सर्व खलाशी, व्यापारी व साहसी लोक कारोमांडेल किनाऱ्याहून म्हणजे प्राचीन कालिंग, तैलंगण यांच्या किनाऱ्याहून व विशेषतः कृष्णा–गोदावरीच्या मुखांजवळील प्रदेशांमधून समुद्रद्वारा निघत असत. या मताला समर्थक असे पुष्कळ पुरावे आज उपलब्ध झालेले आहेत.

**'फूनान' मधील भारतीयांची वसाहत**:–ख्रिस्ती शकाच्या पहिल्या अथवा दुसऱ्या शतकांत भारतीयांनीं आपल्या वसाहती फूनान, कांबोडिया व चंपा ( = अनाम ) या देशांत वसविल्या. फूनानमध्यें ( Funan ) प्रथमतः पाय ठेवणाऱ्या गृहस्थाचें नांव '**कौण्डिन्य**' असें होतें. फूनानच्या या भारतीय वसाहतीनें ख्रिस्ती शकाच्या पांचव्या शकापर्यंत आपली सत्ता स्वतंत्र आणि अबाधित राखिली होती. पांचव्या शतकामध्यें लिहिलेल्या कांहीं चिनी जनकथांमध्यें कौण्डिन्य हा भारतीय ब्राह्मण असून त्यानें फूनानमध्यें हिंदु पद्धतीनुसार नवीन नियमावलि व हिंदु चालीरीती रूढ केल्या आणि सोमा नांवाच्या एका नागकन्येशीं विवाह केला, असा उल्लेख आहे. कांबोडियांत आजमितीलाही विवाहविधीच्या वेळीं धर्माचार म्हणून कौण्डिन्य ब्राह्मण व सोमानागी यांचा नामोच्चार करावा लागतो.

फूनानचा आणि भारतवर्षाचा पहिला अधिकृत राजकीय संबंध तिसऱ्या शतकांत आला. या शतकांत फूनानच्या राजानें हिंदुस्थानाला एक शिष्टमंडळ पाठविलें. या वेळीं पाटलीपुत्रास मुरुंद (इ. स. २४०-२४५) नांवाचा राजा राज्य करीत होता; त्यानें या शिष्टमंडळाचें स्वागत केलें, आपल्या राज्यांतलीं निवडक स्थळें व व्यवस्था दाखविलीं आणि परतीच्या वेळीं आपले दोन वकील व चार जातिवंत घोडे नजराणा म्हणून त्यास दिले.

**कंबुजदेश ( = कांबोडिया )**—फूनानचें राज्य सातव्या शतकाच्या आरंभीं आरंभीं ' चित्रसेन ' नामक कांबोडियाच्या राजानें बुडविलें आणि त्या घालमेलींतूनच कांबोडियामधील हिंदूंचें भव्य साम्राज्य उदयास आलें. कांबो-डियाच्या वसाहतीचा संस्थापक ' श्रुतवर्मन् ' नांवाचा एक भारतीय गृहस्थ होता. शिलालिखित माहितीवरून असें दिसतें कीं, श्रुतवर्मन् याच्या वंशांत श्रेष्ठवर्मन्, रुद्रदामन्, भववर्मन्, महेंद्रवर्मन् ( = चित्रसेन ) इत्यादि आठ राजे होऊन गेले. या घराण्याच्या राजवटींत कांबोडियामध्यें हिंदु संस्कृतीची मुरवण पुष्कळच झाली. या वंशांत रुद्रदामन् हा राजा फार थोर होऊन गेला, असें दिसतें. कारण एका शिलालेखांत त्याची तुलना त्रिविक्रमाशीं ( = विष्णूशीं ) व त्याच्या सुराज्याची तुलना रघुकुलोत्पन्न दिलीपाशीं केलेली आहे. पुढील श्लोक पाहा—

" राजा श्रीरुद्रवर्माऽसीत् **त्रिविक्रमपराक्रमः** ।
यस्य **सौराज्य**मद्यापि **दिलीपस्येव** विश्रुतम् ॥ "

यावरून प्रस्तुत राजाचें लष्करी सामर्थ्य आणि मुलकी राज्यव्यवस्था हीं पुष्कळच प्रगल्भता पावलीं होतीं, हें उघड दिसतें. या वेळीं शैव पंथ प्रजेमध्यें भक्कमपणें रुजला होता.

' वील कंतेल ' च्या अश्मलेखांत भववर्मन् राजाच्या एका " पतिव्रता व धर्मरता " बहिणीला गौरवितांना तिचें असें वर्णन केलें आहे—

" श्रीवीरवर्मदुहिता स्वसा श्रीभववर्मणः ।
पतिव्रता धर्मरता द्वितीया ऽरुन्धतीव या ॥ "

भववर्मन् हा स्वतः शिवोपासक असल्यामुळें राजधर्म असलेला शैव पंथ हा राष्ट्रधर्म बनला आणि सर्व राज्यांत शिवालयें बांधण्याची एकच धूम उडून

गेली. परंतु भववर्मन् हा अत्यंत सहिष्णु व संग्राहक वृत्तीचा होता, कारण स्वतः शिवोपासक असूनहि त्यानें हरिहराची व विष्णूची मूर्ति स्थापिली. हरिहरांचें असें संयुक्त पूजन चम्पेच्या राज्यांत तर पुढें फारच लोकप्रिय झालें.

आठव्या शतकामध्यें कांबोडियाच्या या राज्याचीं दोन शकलें झालीं आणि शम्भुपुर व व्याधपुर या दोन राजधान्या होऊन तेथें दोन वंश राज्य करूं लागले. हें द्विदल राज्य सुमारें १०० वर्षें चालल्यावर यवद्वीपस्थ अशा दुसऱ्या जयवर्मन्नें इ. स. ८०२ या वर्षी राज्यारोहण केलें. राज्यारूढ होतांच त्यानें पूर्वीची राजधानी बदलून महेंद्रपर्वतावर नवी राजधानी वसविली. **यशोधापुर** ( आधुनिक **अंकोर थोम** ) नांवाचें जें भव्य नगर पुढें विख्याति पावलें तें वसविण्यास याच वेळेपासून प्रारंभ झाला. जयवर्मन् हा शिल्पकृतींचा महान् रचयिता होता. हरिहरालय, अमरेंद्रपुर आणि महेंद्रपर्वत अशा तीन राजधान्या यानें बांधिल्या. जयवर्मन् हा ८६९ मध्यें मृत्यु पावला.

**यशोवर्मन् याची भव्योदात्त राजवट**-- कांबोडियामध्यें अत्यंत भव्य राजवट जर कोणाची झाली असेल तर ती यशोवर्मन् ( इ. स. ८८९-९१० ) याचीच होय. यशोधरपुर या सुंदर राजधानीची वसाहत या राजवटींत पूर्ण झाली; बेयन ( Bayon ) हा शिवाश्रम बांधला गेला; शेंकडों देवालयें, आश्रम व राजवाडे यांची रेलचेल उडून गेली. नागरी लिपी प्रचालित झाली आणि हिंदु संस्कृतीला एकंदरींत अत्यंत ववववीत फुलोरा आला. " श्रीमान्, गंभीर, राजनीतिविशारद व समुद्रसमान असा हा राजेंद्र राजकुलांत खरोखर वैजयंतीमधील कौस्तुभरत्नाप्रमाणें झगमगत असे " असें त्याचें वर्णन आढळतें. त्यानें एका बेटावर ' यशोधरतटाक ' खोदविला. यशोवर्मन्विषयीं शिलालेखांत एके ठिकाणीं ' मनुस्मृती ' च्या दुसऱ्या अध्यायांतील १३६ वा श्लोक उद्धृत केला आहे. शिवालयप्रवेशासंबंधीं त्यानें कांहीं नियम घालून दिले होते. देशभर त्यानें शेंकडों आश्रम बांधून त्या सर्वांना उत्पन्नें लावून त्यांची सुसूत्र व्यवस्था लावून दिली. बेयनचा जो सुविख्यात शिवाश्रम तो त्यानें बांधला. त्याच्या भिंतींवर शिवाचें मदनदहन, तपस्यामग्न ब्राह्मण, आरमारी युद्धें, इत्यादिकांचीं सुंदर दृश्यें कोरलेलीं आहेत. तज्ज्ञांचें असें मत आहे कीं, जगतांत एखादेंही नगर नवव्या

शतकांत भव्यतेच्या व सुधारणेच्या दृष्टीनें यशोधरपुराशीं स्पर्धा करूं शकलें नसतें.

शिलालिखित उल्लेखांवरून यशोवर्मन् याची विद्वत्ता व अभिजात रसिकताही उत्तम रीतीनें प्रत्ययास येते. लोलेच्या ( Loley ) अश्मलेखांत वेद, यज्ञसंस्था, रघुवंश, सुश्रुत, यांचा थेट हिंदु वळणानें उल्लेख आहे– " वेदाध्ययन, होमहवन व योगाभ्यास यांमध्यें निमग्न असल्याकारणानें यशोवर्मन् हा प्रत्यक्ष विधात्यासारखाच भासे. त्याचा संतत चाललेला यज्ञधूम म्हणजे जणूं कांहीं इंद्रपदाची सोपानपरंपराच होती. दिलीपानें केलेल्या नंदिनीच्या सेवेप्रमाणें तो प्रजांचें अनुरंजन करीत असे. सुश्रुतसंहितेंत निष्णात असल्याकारणानें तो सर्वांचे रोग बरे करीत असे... " या व अशा इतर उल्लेखांवरून हिंदु संस्कृति व तिला आनुषंगिक असलेल्या इतर गोष्टी यांचे जीवनरस कांबोडियांतील ख्मेर लोकांच्या जीवितांत कसे सर्वत्र खळाळत होते, याची उत्कृष्ट कल्पना येईल.

परंतु याच्याइतकी भाग्यशाली राजवट आणि इतका अभागी राजा असा योग क्वचितच घडला असेल; कारण इ. स. ९१० च्या सुमारास हा थोर राजा कुष्ठरोगानें मृत्यु पावला. बेयनच्या शिवाश्रमांत यशोवर्मन्ची एक रुबाबदार व भव्य प्रतिमा आहे.

यशोवर्मन्ची राजवट मुळांतच इतकी भव्य व उत्कृष्ट होती कीं, तिच्या मानानें मागाहून सिंहासनारूढ होणाऱ्या राजांचें कर्तृत्व कांहींसें अळणी वाटावें, यांत नवल नाहीं. परंतु त्यांच्याही राजवटी आपापल्या मानानें यशस्वी झाल्या, हें खरें आणि हिंदु संस्कृतीचा वृक्षही भरपूर फोफावला. याप्रमाणें सयाम ( शामदेश ), अनाम ( चंपा ), या देशांतही हिंदु संस्कृतीचा विस्तार ठायींठायीं पाहावयास सांपडतो. परंतु परिशिष्टात्मक लेखामध्यें सर्व संस्कृतिप्रसाराचा तपशीलवार आढावा घेणें शक्य नसल्यामुळें तूर्त येथेंच थांबणें युक्त होईल.

# आधारभूत ग्रंथ


| | | |
|---|---|---|
| १ | ऋग्वेदकालीन सांस्कृतिक इतिहास | श्री. काशीकर |
| २ | महाभारताचा उपसंहार | श्री. चिं. वि. वैद्य |
| ३ | रामायणाचा उपसंहार | श्री. महाराष्ट्रीय |
| ४ | रामायणासंबंधीं कांहीं विचार | श्री. का. न. केळकर |
| ५ | रामायणावरील व्याख्यान | श्री. छत्रे |
| ६ | हिंदुस्थानचा इतिहास–प्राचीन भाग | डॉ. बालकृष्ण |
| ७ | प्राचीन हिंदु साम्राज्य | प्रा. ओतुरकर |
| ८ | ज्ञानकोश | डॉ. केतकर |
| ९ | आर्यांचा इतिहास | श्री. पावगीशास्त्री |
| १० | संस्कृत वाङ्मयाचा इतिहास | श्री. लेलेशास्त्री |
| ११ | आर्यांचे सण | श्री. वा. गो. आपटे |
| १२ | रामायण | चिपळूणकर प्रकाशन |
| १३ | महाभारत | यंदे प्रकाशन |
| १४ | गौतमबुद्धाचें चरित्र | श्री. कोसंबी |
| १५ | जगांतील प्रमुख धर्म | प्रा. आठवले |
| १६ | आंध्रांचा इतिहास | डॉ. गोपाळाचारी |
| १७ | श्रीहर्षचरित्र | आपटे |
| १८ | मध्ययुगीन भारत, खंड १ व २ | श्री. चिं. वि. वैद्य |
| १९ | अखंड भारतच कां ? | हेमाग्रज |
| २० | भारतीय थोर पुरुष | श्री. कुलकर्णी |
| २१ | रवींद्रनाथ टागोर | श्री. आपटे |
| २२ | पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ | प्रा. माटे |
| २३ | भारतयि श्रेष्ठत्व | श्री. लिमये व बेडेकर |

२४ भारतीय संस्कृति — श्री. साने गुरुजी
२५ राष्ट्रमीमांसा — दुर्गातनय
२६ आपला हिंदुस्थान — अनुवादक ना. ग. गोरे
२७ नवा हिंदुधर्म — श्री. महादेवशास्त्री दिवेकर
२८ आर्य संस्कृतीचा उत्कर्षापकर्ष — ,,
२९ कौटिलीय अर्थशास्त्र — भाषां. श्री. ज. स. करंदीकर
३० सम्राट् अशोक — श्री. शहा
३१ राजपुत संस्कृतीचा इतिहास — श्री. देशपांडे
३२ गुप्तांचा इतिहास — प्रा. रा. ना. दांडेकर

1 Culture & Civilization of Ancient India. — R. C. Mukerjee
2 Chandragupta & his Times — ,,
3 Samudragupta — ,,
4 Harsha — ,,
5 History of Ancient India — S. Ayar
6 History of India — V. Smith
7 History of India — R. Datta
8 History of India — Dr. Sen
9 History of Ancient Civilization — Aiyangar
10 History of the Guptas — Dr. Saletore
11 History of Ancient India — Shah
12 Cambridge History of India
13 The Riddle of Ramayana — C. V. Vaidya
14 Great Men of India — 'Times of India' Pub.
15 Ashoka — R. C. Mukerjee
16 Hundred Great Lives — 'Times of India' Pub.
17 Mohenjodaro — Modern Review Oct., 1945.

कालतक्ता क्र. १ : पृष्ठ २०४ पाहा


| काल | भारतांत काय घडलें ? | जगांत काय घडलें ? |
|---|---|---|
| इ. स. पू. ४००० चे पूर्वी | ऋग्वेदरचना | ट्युटॅनिक लोकांची स्कॅंडेनेव्हियांत वसाहत. इ. स. पू. ५००० |
| इ. स. पू. ३१०१ | भारतीय युद्ध | |
| ,, ५६७ | गौतम बुद्धाचा जन्म | |
| ,, ५३९ | महावीर वर्धमानाचा जन्म | |
| ,, ४८३ | गौतम बुद्धाचा मृत्यु | ग्रीक लोकांकडून पर्शियन लोकांचा पराभव. इ. स. पू. ४९०–४८०. |
| ,, ४६७ | महावीराचा मृत्यु | |
| ,, ५८२–५५४ | राजा बिंबिसार | |
| ,, ५५४–५२७ | अजातशत्रु | रोममध्यें प्रजासत्ताक राज्याची स्थापना. इ. स. पू. ५१० |
| ,, ५१६ | दरायसची स्वारी | |
| ,, ३२७–३२३ | अलेक्झांडरची स्वारी | ग्रीक साम्राज्याची स्थापना इ. स. पू. ३२५ |
| ,, ३२२ | मगधांतील राज्यक्रान्ति | अलेक्झांड्रिया शहराची उभारणी इ. स. पू. ३३२ |
| ,, ३२२–२९८ | चंद्रगुप्त मौर्य | |
| ,, २७३–२३७ | सम्राट् अशोक | रोमन लोकांचें ग्रीक लोकांशीं युद्ध |

## कालतक्ता क्र. २

: पृष्ठ २६४ पाहा

| काल | भारतांत काय घडलें ? | जगांत काय घडलें ? |
|---|---|---|
| इ.स.पू.१८८-१५२ | पुष्यमित्र शुंग | |
| ,, १७५ | मिनँडरची स्वारी | कार्थेज शहराचा नाश इ. स. पू. १४६ |
| इ.स. १२०–१६२ | कनिष्काच्या सत्तेचा काल | |
| इ. स. पू. २३५ | पहिला राजा सिमुक | हॅनिबॉलचा पराक्रम. |
| इ.स. १०६–१३० | गौतमीपुत्र शातकर्णी | |
| ,, १३०–१५८ | पुलुमायी शालिवाहन | |
| ,, ७८ | शालिवाहन-शक-स्थापना | |
| ,, ३२० | गुप्त-साम्राज्य-स्थापना | पूर्व रोमन साम्राज्याची स्थापना |
| ,, ३३०–३७५ | सम्राट् समुद्रगुप्त | चीनमधील प्रचंड भिंतीच्या बांधकामास सुरवात |
| ,, ३४७ | समुद्रगुप्ताचा दक्षिण-दिग्विजय | रोमन साम्राज्याची पिछेहाट |
| ,, ३८०–४१३ | विक्रमादित्य ( पहिला ) | ब्रिटनमधून रोमन लोक निघून गेले इ. स. ४१० |
| ,, ३८०–३९२ | शकांचें निर्दालन | |
| ( इ. स. पू. ५७) | 'मालव संवता'चा 'विक्रम-संवत' | सीझरची ब्रिटनवर स्वारी इ. स. पू. ५५ |
| इ.स. ६०६–६४७ | सम्राट् हर्षवर्धन | ब्रिटनमध्यें अँगल्स सॅक्सन लोकांची राज्यें स्थापन झाली इस्लामधर्म स्थापना इ. स. ६३० |


: पृष्ठ १९६ पाहा.


भारतवर्ष
मौर्य-कालीन साम्राज्यें
पाटलीपुत्र
कामरूप
कलिंग
चोल
केरल
पाण्ड्य
लंका
चंद्रगुप्त
बिंदुसार
अशोक

## कालतक्ता क्र. २ : पृष्ठ २६४ पाहा

| काल | भारतांत काय घडलें ? | जगांत काय घडलें ? |
|---|---|---|
| इ.स.पू.१८८-१५२ | पुष्पमित्र शुंग | |
| ,, १७५ | मिनँडरची स्वारी | कार्थेज शहराचा नाश इ. स. पू. १४६ |
| इ.स. १२०—१६२ | कनिष्काच्या सत्तेचा काल | |
| इ.स.पू. २३५ | पहिला राजा सिमूक | हॅनिबॉलचा पराक्रम. |
| इ.स. १०६—१३० | गौतमीपुत्र शातकर्णी | |
| ,, १३०—१५८ | पुलुमायी शालिवाहन | |
| ,, ७८ | शालिवाहन-शक-स्थापना | |
| ,, ३२० | गुप्त-साम्राज्य-स्थापना | पूर्व रोमन साम्राज्याची स्थापना |
| ,, ३३०—३७५ | सम्राट् समुद्रगुप्त | चीनमधील प्रचंड भिंतीच्या बांधकामास सुरवात |
| ,, ३४७ | समुद्रगुप्ताचा दक्षिण-दिग्विजय | रोमन साम्राज्याची पिछेहाट |
| ,, ३८०—४१३ | विक्रमादित्य ( पहिला ) | ब्रिटनमधून रोमन लोक निघून गेले इ. स. ४१० |
| ,, ३८०—३९२ | शकांचें निर्दालन | |
| ( इ. स. पू. ५७) | 'मालव संवता'चा 'विक्रम-संवत' | सीझरची ब्रिटनवर स्वारी इ. स. पू. ५५ |
| इ.स. ६०६—६४७ | सम्राट् हर्षवर्धन | ब्रिटनमध्यें अँगल्स सॅक्सन लोकांची राज्यें स्थापन झालीं<br>इस्लामधर्म स्थापना इ. स. ६३० |


: पृष्ठ १९६ पाहा.


भारतवर्ष
मौर्य-कालीन साम्राज्यें
पाटलीपुत्र
कामरूप
कलिंग
चोल
केरल
पाण्ड्य
लंका
चंद्रगुप्त
बिंदुसार
अशोक


: पृष्ठ २१७ पाहा.


प्राचीन भारतवर्ष
इसवी सनाच्या
२ऱ्या शतकांतील
राज्यें
काशगर
यारकंद
खोतान
गांधार
तक्षशिला
पुरुषपूर
कुरुक्षेत्र
पाटलीपुत्र
शक
उज्जयिनी
आंध्र
प्रतिष्ठान
कनिष्क
पश्चिमेचे शक
आंध्र


: पृष्ठ १६५ पाहा.




: पृष्ठ २५७ पाहा.


ANCIENT
प्राचीन भारतवर्ष
हर्षाचें साम्राज्य
गांधार
सिंधु
इंद्रप्रस्थ
काशी
गंगा
प्रयाग
पाटलीपुत्र
वल्लभी
नर्मदा
लंका


: पृष्ठ २३६ पाहा.



गुप्तांचें साम्राज्य
इ. स. ३४० ते ४५०
चिनाब
ब्रह्मपुत्रा
सिंधु
मथुरा
अयोध्या
पाटलीपुत्र
प्रयाग
गंगा
उज्जैन
महाकांतार
देवराष्ट्र
कृष्णा
पिष्टपूर
कांची
लंका

: पृष्ठ २५७ पाहा.


ANCIENT
प्राचीन भारतवर्ष
हर्षाचें साम्राज्य
गांधार
तक्षशिला
ब्रह्मपुत्रा
स्थानेश्वर
सिंधु
इंद्रप्रस्थ
कनोज
काशी
गंगा
यमुना
उज्जैन
प्रयाग
पाटलीपुत्र
वल्लभी
नर्मदा
तापी
गोदावरी
कृष्णा
लंका
INDIA

: पृष्ठ २३६ पाहा.


गुप्तांचें साम्राज्य
इ. स. ३४० ते ४५०
चिनाब
ब्रह्मपुत्रा
सिंधु
मथुरा
अयोध्या
पाटलीपुत्र
यमुना
प्रयाग
गंगा
उज्जैन
महाकांतार
गोदा
देवराष्ट्र
पिष्टपुर
कृष्णा
कांची
लंका


प्राचीन भारतवर्ष
हिंदुकुश
गांधार
कांबोज
पुरुषपूर
तक्षशिला
मानस सरोवर
सिंधु
कुरुक्षेत्र
मरुतदेश
इंद्रप्रस्थ
पांचाल
मथुरा
हिमालय पर्वत
ब्रम्हपुत्रा
अयोध्या
मिथिला
अंग
प्रयाग
काशी
वैशाली
पाटलीपुत्र
गया
नालंदा
गुर्जर
अवंती
वंग
उत्कल
सुराष्ट्र
नर्मदा
तापी
महानदी
पंचवटी
कलिंग
गोदावरी
प्रतिष्ठान
आंध्र
कृष्णा
पाण्डय
लंका

# प्राचीन नांवांची नवीन ओळख

गांधार—कंदाहारजवळील प्रदेश. पुष्करावती व तक्षशिला या प्रांताच्या राजधान्या होत्या.

तक्षशिला—गांधार प्रांताची राजधानी; म्हणजे हल्लींचें वायव्य सरहद्द प्रांतांतील शालिश्वरी शहर.

पुरुषपूर—पेशावर, सरहद्द प्रांत.

कुरुक्षेत्र—पानिपतचा प्रदेश. सरस्वती व दृषद्वती या नद्यांमधील चिंचोळ्या पट्टीचा प्रदेश. पानपतच्या मैदानाअलीकडे खिंडीसारखा भूभाग.

इंद्रप्रस्थ—राजधानी दिल्ली.

मरुत्‌देश—मारवाडचा रेताड प्रदेश.

पांचाल—रोहिलखंड.

वत्स—प्रयागच्या पश्चिमेकडील देश.

मिथिला—उत्तर बिहारांतील विदेहाची राजधानी.

अंग—पश्चिम बंगाल. याची राजधानी चंपा ही होती. हा देश भागलपूरजवळ येतो.

पाटलीपुत्र—पाटणा.

कामरुप—आसाम.

नालंदा—बंगालमधील बुद्धकालीन प्रसिद्ध विश्वविद्यालय.

वैखाली—(वैशाली) गंडकी नदीच्या पूर्वेस बेसार म्हणून एक खेडें आहे, तेंच वैखाली (वैशाली) नगर असावें.

वंग—पूर्व बंगाल.

कांबोज—हल्लींच्या अफगाणिस्थानांतील काफिरीस्थानचा प्रदेश.

अवंती—माळव्याची राजधानी उज्जयिनी.

सुराष्ट्र—काठेवाड.

मालवदेश— माळवा.

प्रतिष्ठान—पैठण.

आंध्र—कृष्णा व गोदावरी यांच्या मधील प्रदेश.

कलिंग—ओरिसा प्रांत. महानदीपासून गोदावरीच्या मुखापर्यंतचा समुद्रकिनाऱ्याच्या कांठचा प्रदेश.

चेर—मलबार प्रांत.

चोल—कारोमांडेलचा किनारा.

पाण्ड्य—पदुकोटा ते कन्याकुमारी येथपर्यंतचा प्रदेश.

केरळ—मलबार प्रांत.

लंका—सिंहलद्वीप.

उत्कल—ओरीसा.

देवराष्ट्र—नागपूर ते म्हैसूरपर्यंतच्या प्रदेशांत मध्यभागीं; शक २७२ च्या सुमाराचा देश. सह्याद्रीच्या किनाऱ्याचा टापू या प्रदेशांत मोडतो.

६६७० ६७६७

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | २१ | अंतस्थ | अंत:स्थ |
| १४ | ९ | ज्यूट | ताग |
| ३९ | १६ | तेजकिरणांची | तेज:किरणांची |
| ३९ | १५ | अन्धःकारमय | अन्धकारमय |
| ४५ | २२ | डोळ्यादें | डोळ्यापुढें |
| ४६ | २ | गेली आहे. | गेली आहे, |
| ४६ | १७ | अभ्गासूदृष्टीनें | अभ्यासु दृष्टीनें |
| ४६ | २० | दीर्धता | दीर्घता |
| ४८ | ३ | गृहित | गृहीत |
| कालतक्ता क्र. १ | १ | इ. स. पू. ४०००० | इ. स. पू. ४००० |

# मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणे ४

**प्रवासी राम :**
ले. अमरेन्द्र : २ रु.

**अखंड भारतच कां ? :**
ले. हेमाग्रज : २॥ रु.

**राष्ट्रसेवकाची शिदोरी :**
सं. अमरेन्द्र-गोपाल : १। रु.

**चाकोरीबाहेर :**
ले. अमरेन्द्र : १ रु.

**अज्ञाताचीं वचनें** (भाग १) :
ले. अज्ञात : १। रु.

**हिंदूंचा धर्मग्रंथ :**
ले. मोहन करन्दीकर . ६ आ.

**संताजी घोरपडे :**
ले. ना. ह. पालकर : १२ आ.

**आमचे राष्ट्रगुरु :** (दुसरी आ.)
ले. गो. नी. दाण्डेकर : १० आ.

**दीक्षा :**
कवि यतीश : १॥ रु.

**मङ्गल साहित्य :**
सं. अमरेन्द्र गाडगीळ : ३ रु.

**परमाणूंच्या युगांत :**
ले. अमरप्रकाश गोखले : २ रु.

**गांवरान गोष्टी :**
ले. चिं. य. मराठे : ३ रु.

× **ताई अन् भाऊ** (तिसरी आ.) :
ले. अमरेन्द्र : १। रु.

**आईची देणगी** (भाग १,२,३) :
ले. गो.नी.दाण्डेकर : प्र.१२आ.

* **सुभाषचंद्र :**
ले. अमरेन्द्र : २॥ रु.

* **हिंदूंच्या सामाजिक अवनतीची मीमांसा** : के. ल. पुराणिक : ५ आ.

**सुभाषचंद्र-पोवाडा :**
शाहीर शरद जोशी : ३ आ.

**दाशराज्ञ युद्ध :**
ले.अ.ज.करंदीकर:१रु.१४आ.

## — आ गा मी —

**रुद्रवीणा :**
ले.साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास

**क्रांतिवीर बाबाराव सावरकर :**
ले. द. न. गोखले

**प्राचीन भारत :**
ले.व.द.ताम्बे आणि मा.गो.काटदरे

**बहुरंगी करमणूक :**
ले. रा. त्र्यं. रानडे

× मुंबई सरकारच्या शाळाखात्याकडून मंजूर. * आवृत्ति संपली.

REFBK-0006767